अहवाल क्रमांक : १५८

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या नाशिक जिल्हा परिषदेच्या
सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेख्यांवरील लेखा परिक्षा
पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत

# चौदावा अहवाल

(सदर अहवाल दिनांक      जुलै, २०१८  रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस
सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर
२०१८

# पंचायती राज समिती

## २०१७-२०१८

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या नाशिक जिल्हा परिषदेच्या
सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेख्यांवरील लेखा परिक्षा
पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत

# चौदावा अहवाल

## पंचायती राज समिती

## (सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

१. श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
३. श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
४. श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
५. ॲड. राहुल कुल, वि.स.स.
६. श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.
७. डॉ. देवराव होळी, वि.स.स.
८. डॉ. सुरेश खाडे, वि.स.स.
९. डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
१०. श्री.सुधाकर कोहळे, वि.स.स.
११. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री.किशोर पाटील, वि.स.स.
१३. श्री.राजेश क्षीरसागर, वि.स.स.
१४. श्री.तुकाराम काते, वि.स.स.
१५. श्री.राहुल बोंद्रे, वि.स.स.
१६. श्री.भारत भालके, वि.स.स.
१७. प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स.
१८. श्री.दिलीप सोपल, वि.स.स.
१९. श्री.राहुल मोटे, वि.स.स.
२०. श्री.दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री.प्रविण दरेकर, वि.प.स.
२२. प्रा.डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.
२३. श्री.विक्रम काळे, वि.प.स.
२४. श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.
२५. श्री.अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

२६. श्री.बाळाराम पाटील, वि.प.स.
२७. श्री.श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
२८. श्री.दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी
(५) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

# पंचायती राज समिति
## (सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिति प्रमुख**

१. *श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
५. श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.
६. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
७. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
८. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
९. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
१०. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.
१४. ॲड. के.सी.पाडवी, वि.स.स.
१५. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१६. श्री. अमित झनक, वि.स.स.
१७. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१८. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
१९. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२०. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२१. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२२. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२३. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
२४. **रिक्त
२५. **रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

* सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजी पासून श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची 'कार्यकारी समिति प्रमुख' म्हणून नामनियुक्ती केली आहे.

** सन्माननीय समिती प्रमुख श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

# पंचायती राज समिती
## (सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

१. श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स.
३. श्री.अनिल गोटे, वि.स.स.
४. श्री.विकास कुंभारे, वि.स.स.
५. श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.
६. श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.
७. श्री.उन्मेश पाटील, वि.स.स.
८. श्री.समीर कुणावार, वि.स.स.
९. श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.
१०. श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.
११. श्री.अनिल बाबर, वि.स.स.
१२. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१३. श्री.हेमंत पाटील, वि.स.स.
१४. श्री.राजाभाऊ वाजे वि.स.स.
१५. ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स.
१६. श्री.बसवराज पाटील, वि.स.स.
१७. श्री.अमित झनक, वि.स.स.
१८. श्री.राहुल मोटे, वि.स.स.
१९. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
२०. श्री.दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री.पांडुरंग फुंडकर; वि.प.स.
२२. श्री.अनिल तटकरे, वि.प.स.
२३. श्री.संदीप बाजोरिया, वि.प.स.
२४. श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.
२५. श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले,उप सचिव
(३) श्री. प्रदीप मयेकर,अवर सचिव (समिती)
(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा चौदावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता समिती दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परिक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी केले. समिती पध्दतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती साहजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Lesgislature) या समितीला “Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पाहरा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहित तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहित पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात, त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो, परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो. शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पध्दतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुध्दा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारक रितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिका-यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालन सुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुस-या सदस्यांनी माहिती विचारण्याची पध्दत जोपासली आहे. या पध्दतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करुन आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करुन विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्या दृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाई देखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्यांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पध्दती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पध्दतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याच प्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणे देखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णय देखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचना देखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई देखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचा-यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करुन ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करुन काही चांगल्या बाबींचे समर्थन करुन संबंधितांना प्रोत्साहित देखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २००८-२००९ व २०११-२०१२ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१५-२०१६ साठी गठीत झालेल्या समितीने नाशिक जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने नाशिक जिल्हा परिषदेस दिनांक ५, ६ व ७ मे, २०१६ रोजी भेट देऊन श्री.मिलिंद शंभरकर, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता गठीत झालेल्या समितीने नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिका-यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक १४ व १५ फेब्रुवारी, २०१८ रोजी जिल्हा परिषद, नाशिक संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/ प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचे वेळी श्री. मुकेश खुल्लर, अतिरिक्त मुख्य सचिव, सामान्य प्रशासन (सेवा) विभाग,श्री.श्यामलाल गोयल, अतिरिक्त मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग,श्री.विजय कुमार, अतिरिक्त सचिव, कृषी विभाग, श्री.नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव, महसुल विभाग, श्री.असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.एकनाथ डवले, सचिव, जलसंधारण विभाग, श्री.किरण कुरुंदकर, सचिव, पशुसंवर्धन विभाग, श्री.संजय देशमुख, सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग (अतिरिक्त कार्यभार), श्रीमती विनिता वेद सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, ग्रामविकास विभाग, श्री.दिनेश वाघमारे, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री.र.प्र.आटे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.डी.एल.सुळ, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री.राजेश क्षीरसागर, सह सचिव, महसूल विभाग, श्री.र.अ.नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.गिरीश भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.सुग्रिव धपाटे, उप सचिव, कृषी विभाग, श्री.संजीव कुमार, आयुक्त, आरोग्य विभाग, श्री.शिवाजी दौंड, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ,तसेच श्रीमती शुभांगी पाटोळे, सह संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेख्यांवरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या नाशिक जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक ११ जुलै, २०१८ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : ११ जुलै, २०१८.

**सुधीर पारवे**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरण क्रमांक | विषय | परिच्छेद क्रमांक क्रमांक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| (१) | एक | प्रोत्साहन भत्त्याचे अनियमित प्रदानाबाबत (सन २०११-१२) | ३.८० | १ |
| (२) | दोन | विशेष घटक योजनेअंतर्गत ५० टक्के अनुदानावर दुधाळ जनावरांचे वाटप योजनेतील अनियमितता (सन २००८-०९) | ३.७३५ | ६ |
| (३) | तीन | नैसर्गिक आपत्ती खर्चाबाबत (सन २००८-०९) | ३.४६८ | १४ |
| (४) | चार | पाणीपट्टी थकीत वसुली (सन २०११-१२) | ३.८०९ | १९ |
| (५) | पाच | लेखापरिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे (सन २००८-०९) व (सन २०११-१२) | ३.८१२/४५, ३.१०३७/३, ३.८१२ (१२)/३२२ | २४ |
| (६) | सहा | थकित आगाऊ रक्कमांबाबत (प्रलंबित अग्रिम) (सन २००८-०९) | ३.१०३९/६/५ | ३२ |
| (७) | सात | मार्च, २०१२ अखेर शिल्लकेच्या तपशिलाबाबत (सन २०११-१२) | ३.७९४/८ | ३५ |
| (८) | आठ | पंचायत समित्यांमधील अफरातफर व गैरव्यवहारांबाबत (पंचायत समिती, दिंडोरी) (सन २००८-०९) | ३.१०४०/५/९ | ३९ |
| (९) | नऊ | अपूर्ण स्थितीतील बांधकामे (सन २०११-१२) | ४.३९४ (१४ ते २२६) | ४५ |
| (१०) | दहा | बंबालेफाटा ते कुशेगाव (ग्रामा २८) रस्त्याचे कि.मी. ५/०० ते ८/०० मजबुतीकरण व डांबरीकरणातील अनियमितता (सन २००८-०९) | ३.१७३/२३ | ५७ |
| (११) | अकरा | प्रजिमा ५६ वरील मांजरगाव फाटा ते मांजरगाव रस्ता (ग्रामा-४) सुधारणा या कामातील अनियमिततेबाबत (सन २०११-१२) | ३.२०४/७० | ६१ |
| (१२) | बारा | सन २०१०-२०११ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (सन २०११-१२) | ३.८१५ (३) | ६६ |
| (१३) | तेरा | सन २००९-१० या वर्षात पंचायत समिती मध्ये झालेल्या नियमबाह्य बाबी (सन २०११-१२) | ४.३९८ | ६९ |
| (१४) | चौदा | अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा जादा व शिवाय केलेल्या खर्चाबाबत (ग्रामपंचायत, सोनगांव, ता.निफाड) (सन २०११-१२) | ५.३ | ७३ |
| (१५) | पंधरा | कोल्हापूर पध्दतीचा बंधारा कामातील अनियमितता (सन २००८-०९) | ३.३३७ | ७५ |
| (१६) | सोळा | निवासस्थान गैर वापराबाबत (सन २००८-०९) | ४.७ | ८३ |
| (१७) | सतरा | जिल्हा परिषद उपकर निधीतून अंगणवाडींना आयर्न टॅबलेट/फोलिक ॲसिड टॅबलेटस अतिरिक्त आहार पुरवठा करणेबाबत (सन २००८-०९) | ३.८९४/३ | ८७ |

**अनुक्रमणिका—**चालू


| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| (१८) | अठरा | लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करणेबाबत (सन २००८-०९) व (सन २०११-१२) | | ९२ |
| (१९) | एकोणीस | कुपोषित बालकांना आदिवासी उपयोजनेतून अतिरिक्त आहार पुरवठा करणेबाबत (सन २००८-०९) | ३.८९६/३० | १८६ |
| (२०) | वीस | पंचायत समिती सेस मधून अंगणवाडी केंद्रासाठी खेळणी खरेदी करणेबाबत (सन २०११-१२) | ४.३४३ | १९१ |
| | | **परिशिष्ट**<br>शासनाचे आदेश व परिपत्रके आणि<br>समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | | १९९ |

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, नाशिक

## प्रोत्साहन भत्याचे अनियमित प्रदानाबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.८० (सन २०११-२०१२)**

अतिसंवेदनशिल म्हणून घोषित केलेल्या आदिवासी भागात मुख्यालय असलेल्या कर्मचा-यांना प्रोत्साहन भत्ता अदा केलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक शिक्षण-एफ/२०००/प्र.क्र.३ /बारा, दिनांक ६/८/२००२ मधील परिच्छेद क्र. २ ब नुसार अतिसंवेदनशिल आदिवासी भागात असलेल्या शासकीय कर्मचा-यांना मुळ वेतनाच्या १५ टक्के किमान रुपये २००/- व कमाल रुपये १,५००/- प्रोत्साहन भत्ता लागू केलेला आहे. मूळ वेतन म्हणजे महागाई वेतनाशिवाय मूळ वेतन नमुद आहे.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन अधिसूचना, दिनांक २२/४/२००९ नुसार महाराष्ट्र नागरी सेवा सुधारित वेतन नियम, २००९ लागू केलेला आहे. सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतनाच्या १५ टक्के दराने दरमहा प्रोत्साहन भत्ता प्रदान करणेबाबत शासनाकडून शासन निर्णय अद्यापही निर्गमित झालेला नाही. तोपर्यंत ५ व्या वेतन आयोगाचे मूळ वेतनाचे १५ टक्के दराने कमाल रुपये १५००/- या मर्यादेत प्रदान केले जाणे आवश्यक आहे. पंचायत समिती सुरगणा अंतर्गत सर्व कर्मचा-यांना सहाव्या वेतन आयोगातील सुधारित वेतनाच्या १५ टक्के तथापि कमाल रुपये १५००/- प्रमाणे प्रोत्साहन भत्ता प्रदान केलेला आहे. त्यामुळे साधारणपणे ८०० शिक्षक कर्मचारी व उर्वरित २०० कर्मचारी अशा एकूण १००० कर्मचा-यांना जून-२०११ ते जून २०१२ या १३ महिन्यांच्या कालावधीत दरमहा रुपये ५,२५,०००/- याप्रमाणे साधारणपणे रुपये ६८,२५,०००/-नियमबाहय प्रदान झाल्याचे दिसुन येते. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांचेकडील परिपत्रक क्रमांक जिपना/अर्थ/आस्था/१४७/२०११, दिनांक ७/३/२०११ नुसार कर्मचा-यांना एकस्तर वेतनाचा लाभ मंजूर करणेबाबत कळविले आहे ; परंतु प्रोत्साहन भत्ता प्रदानाबाबतचा उल्लेख नाही. प्रोत्साहन भत्ता असुधारित वेतनश्रेणीत द्यावा किंवा सुधारित वेतनश्रेणी देण्याबाबत मार्गदर्शन घेतल्याचे दिसून आलेले नाही.

६ व्या वेतन आयोगाच्या वेतन संरचनेतील वेतनानुसार प्रोत्साहन भत्ता प्रदान करण्यात यावा. याबाबत शासनाचे आदेश प्राप्त करुन दाखविणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र टीआरए/२००० प्र.क्र.३/१२ दिनांक ६/८/२००२ मधील परि. क्र. २ ब नुसार अतिसंवेदनशिल म्हणून घोषित केलेल्या आदिवासी भागात असलेल्या अधिकारी/कर्मचा-यांच्या बाबत त्यांच्या मूळ वेतनाच्या १५ टक्के किमान रु. २००/- व कमाल रुपये १५००/- या मर्यादेत दरमहा प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय राहील असे नमूद आहे.

आदिवासी विकास विभाग, शासन परिपत्रक दिनांक २/२/२०१० नुसार मूळ वेतन म्हणजे महागाई वेतनाशिवाय असलेले मूळ वेतन असे नमूद आहे. वित्त विभाग शासन अधिसूचना दिनांक २२/४/२००९ नुसार महाराष्ट्र नागरी सेवा सुधारित वेतन नियम, २००९ प्रसिध्द करण्यात येवून शासकिय कर्मचारी व जिल्हा परिषद कर्मचारी यांना ६ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली आहे.

सुधारित आयोगाप्रमाणे १५ टक्के प्रमाणे प्रोत्साहन भत्ता दिल्याने लेखा परिक्षणात सर्व कर्मचा-यांचे ५ व्या वेतन आयोगाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता अदा करावे असे आक्षेप घेतल्याने लेखा परिक्षणानंतर सर्व कर्मचा-यांचे ५ व्या वेतन आयोगाप्रमाणे आता प्रोत्साहन भत्ता अदा करण्यात येत आहे.

गट स्तरावर वसुलीचे तक्ते तयार करुन माहे जानेवारी, २०१६ च्या वेतनातून कपात करण्यासाठी या कार्यालयाचे पत्र क्र.शिक्षण/आस्था ३/५/२०१६ दि. २/१/२०१६, बील विभाग शिक्षण यांना दिलेले आहे. तसेच सोबत अतिप्रदान वेतन यादी व वसूलीचे फरक तक्त्यासह एकूण रुपये ६१,७७,८३६/- (एकसष्ट लाख सत्त्याहत्तर हजार आठशे छत्तीस रुपये) अतिप्रदान वसुली आहे. ती खालील प्रमाणे वसूल केली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | जाने. २०१६ पेड फेब्रु-२०१६ | रु. ५,०४,०००/- |
| २ | फेब्रु. २०१६ पेड मार्च, २०१६ | रु. ४१,२८,७८८/- |
| | एकूण वसूली रक्कम | रु. ४६,३२,७८८/- |

**एकूण वसूल ४६,३२,७८८/- (अक्षरी शेहेचाळीस लाख बस्तीस हजार सातशे अठ्ठ्याऐंशी रुपये मात्र)**

१) वसूली बाकी असलेली रक्कम रु. १५,४५,०४८/-इतर गटाकडून वसूल होऊन येणे बाकी होती त्यापैकी दिनांक...........................

१) श्री. बाबुराव महाले.वि.अ. दि.११/४/२०१६ रु. ६५००/-

२) कै. श्री.ढवळु देवाजी गाढवे. दि. ११/४/२०१६ रु. ९५४८/-

३) श्री. संजय सोमनाथ दोबाडे. दि.१२/४/२०१६ रु. ९५५०/-

एकूण वसूल रक्कम रु. २५,५९८/- वसूल झालेली आहे.

वसूल होणे बाकी रक्कम रु. १५,१९,४५०/-

आजपावेतो वसूल झालेली एकूण रक्कम १) रु. ४६,३२,७८८/-

रु. २५,५९८/-

एकूण वसूल झालेली रक्कम रु. ४६,५८,३८६/-

इतर गटाकडून वसूल होऊन येणे बाकी रु. १५,१९,४५०/- त्याबाबत जिल्हयातील सर्व गट शिक्षणाधिकारी व जिल्हा बदलीने गेलेले कर्मचा-यांचे मा.शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि. प., नांदेड/जालना/बीड/लातूर/परभणी/पुणे/कोल्हापूर/चंद्रपूर/नंदूरबार/हिंगोली/जळगांव/रायगड/सांगली/इत्यादींना वसुली यादी व पत्र देण्यात आलेले आहे. त्यांचेकडून रक्कम येताच अंतिम अहवाल सादर करण्यात येईल तरी कृपया खुलासा स्विकृत होणेस विनंती.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ मे, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, नियमबाह्यपणे प्रोत्साहन भत्ता प्रदान करण्यास कोण जबाबदार आहे, संबंधितांवर कोणती कारवाई केली जाणार आहे, तसेच नियमबाह्य प्रोत्साहन भत्त्यापैकी शिल्लक वसुली रक्कम रु.१५,१९,४४९/- वसूल न होण्याची कारणे काय आहेत व सदर वसुली करण्याबाबत कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक यांनी समितीस विदित केले की, एकूण ६१ लाख ७७ हजार रुपयांची वसुली करायची होती. त्यापैकी पहिल्या टप्प्यात ४६ लाख ५८ हजार रुपये आणि त्यानंतर १५ लाख १३ हजार रुपयांची वसुली करण्यात आली. ही वसुली संबंधितांच्या पगारातून करण्यात आली, तसेच काही जणांनी चलनाद्वारे रक्कम भरली आहे. सदर कागदपत्रे उपलब्ध आहेत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, आतापर्यंत असे प्रदान कसे करण्यात आले ? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी समितीस विदित केले की, आदिवासी क्षेत्रात अतिसंवेदनशील क्षेत्रात पाचव्या वेतन आयोगानुसार मूळ वेतनाच्या १५ टक्के प्रोत्साहन भत्ता दिला जात होता. त्यानंतर सहावा वेतन आयोग आला. सुधारित आयोगाप्रमाणे कर्मचा-यांना १५ टक्क्यानुसार प्रोत्साहन भत्ता प्रदान करण्यात आला.

यावर समितीने असे निदेश दिले की, शासनाच्या कोणत्याही सूचना नसताना वेतन आयोगानुसार प्रोत्साहन भत्ता अदा करण्यात आला. या संदर्भात संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन कारवाई करावी. तसेच उर्वरित रक्कम तातडीने वसूल करणे अत्यावश्यक आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, नियमबाह्य पध्दतीने प्रोत्साहन भत्ता अदा करण्यास कोण जबाबदार आहेत, त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली, यासंबंधी लेखी उत्तरात कोणताही उल्लेख न करता वेगळीच माहिती देऊन समितीची दिशाभूल केली आहे. चुकीच्या पध्दतीने प्रोत्साहन भत्त्याचे वाटप करुन उर्वरित रकमेच्या वसुलीबाबत सर्व गट शिक्षण अधिकारी तसेच जिल्हा बदलीने इतरत्र ठिकाणी बदलून गेलेल्या कर्मचा-यासंबंधी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिका-यांना वसुली यादी दिल्याचे लेखी स्पष्टीकरणात नमूद केले आहे. परंतु सदर प्रोत्साहन भत्ता देण्यास जे कोणी जबाबदार आहेत त्यांच्याविरुध्द जबाबदारी निश्चित करुन कारवाई करणे आवश्यक आहे. जेणेकरुन भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होणार नाही. या प्रकरणी कोण जबाबदार आहेत ? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी समितीस विदित केले की, संबंधित गट विकास अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी आणि तत्कालिन देयक लिपिक यांनी सदर देयके मंजूर केली असल्यामुळे ते या प्रकरणी जबाबदार आहेत. या संदर्भात काही रक्कम वसूल करण्यात आली आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, पंचायती राज समिती येणार असल्यामुळे आपण काही रक्कम वसूल केली. संबंधितांकडून व्याजासह रकमेची वसुली करणे अत्यावश्यक आहे. कायद्यात तशी तरतूद आहे.

यावर समितीने असे निदेश दिले की, शासनाचे निदेश नसताना सुध्दा पाचव्या वेतन आयोगातील प्रोत्साहन भत्ता सहाव्या वेतन आयोगात वाटप केल्यामुळे संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन त्यांच्याकडून सदर रक्कम व्याजासह वसूल करावी व त्याबाबतचा अहवाल समितीकडे सादर करावा. यासंबंधी सचिवांची साक्ष घेऊ. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सदर रक्कम पाचव्या व सहाव्या वेतन आयोगातील फरकाची आहे का ? यावर संचालक, स्थानिक निधी लेखा, यांनी विचारणा केली की, प्रोत्साहन भत्त्याची रक्कम पाचव्या वेतन आयोगानुसार अदा करावयास पाहिजे होती. सहाव्या वेतन आयोगात ही रक्कम प्रदान करण्याचे आदेश नव्हते. ही फरकाची रक्कम आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्द्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) प्रस्तुत प्रकरणातील ६८,२५,०००/-नियमबाहय प्रदानास जबाबदार असणा-या अधिका-याकडून सदर रक्कम व्याजासह वसुल करून संबंधित अहवाल सादर करण्याचे समितीने निर्देश दिलेले आहेत, त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

(२) समितीने नियमबाहय प्रोत्साहन भत्ता प्रदान करण्यास जे जबाबदार आहेत त्यांच्याकडून सदर रकमेचे व्याज वसुल करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याअनुषगांने ६८,२५,०००/-रुपयांच्या नियमबाहय अतिप्रदानावरील व्याजाची रक्कम संबंधित गट विकास अधिकारी, गट शिक्षण अधिकारी व कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांच्याकडून वसुल करणे संयुक्तिक आहे.तरी अतिप्रदान रकमेची शिक्षकांकडून व्याजाची वसुली करण्याची कारणे काय आहेत, तसेच आजपावेतो एकूण मूळव्याज रक्कम किती होती व शिल्लक व्याज रक्कम किती आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी तत्कालिन गट शिक्षण अधिकारी श्रीमती मंदाकिनी देवकर यांचे विरूध्द महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणुक नियम, १९७९ अनुसार शिस्तभंग विषयक कार्यवाही शिक्षण आयुक्त,महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे प्रस्तावित केली असून त्याची सद्यःस्थिती काय आहे व सदरहु कार्यवाही नियमानुसार किती कालावधीत पुर्ण होणे अपेक्षित असते.

(४) सदर प्रोत्साहन भत्ता ३० दिवसापेक्षा जास्त असल्यास देय ठरत नाही, तरीही सदरहू प्रकरणात ५,३३,४०५/-रुपयांचे अतिप्रदानास जबाबदार असलेल्या तत्कालीन गटशिक्षणाधिकारी श्री.एम.एम.पाटील यांचेकडून वसूली करण्यात आली आहे काय, तसेच श्री.एम.आर.वाघमारे,गट शिक्षणाधिकारी व पाटील तसेच तत्कालिन गट विकास अधिकारी,सहाय्यक लेखा यांच्या वरील विभागीय चौकशी प्रकरणांची सद्यःस्थिती काय आहे,नियमानुसार विभागीय चौकशी प्रकरणांची किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित असते.

(५) अतिसंवेदनशिल म्हणून घोषित केलेल्या आदिवासी भागात मुख्यालयी असलेल्या कर्मचा-यांना दिनांक ६ ऑगस्ट २०१२ रोजीच्या शासन निर्णयानुसार मूळ वेतनाच्या १५ टक्के किमान २००/-व कमाल १५००/- रुपये प्रोत्साहन भत्ता लागू करण्यात आलेला होता. सद्यःस्थितीत सदर भत्ता सुरू करणे शासनाच्या विचाराधीन आहे काय ?

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

आयुक्त, शिक्षण यांचे क्र. आस्था -अ १०३/नावि-ना/२१९४३/सर्वगशिअ/नाशिक, दि.१.१.२०१८ च्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे आदेश क्र.शिक्षण/प्राथ/लेखा-२५८९-५९२, दिनांक १८.१२.२०१७ अन्वये खालील अधिका-यांविरूध्द शिक्षेचे आदेश बजावलेले आहेत.

१) श्रीमती एम. यु. देवकर तत्कालिन गट शिक्षणाधिकारी सुरगणा,

२) श्री. एम. आर. वाघमारे तत्कालिन गट शिक्षणाधिकारी इगतपूरी,

३) श्री. एम. एन. पाटील गट शिक्षणाधिकारी इगतपूरी,

४) श्री. एस. व्ही. देवरे तत्कालिन अधीक्षक पं. स. दिंडोरी जि. नाशिक

अतिप्रदान रकमेची व्याजासह वसुली करण्याबाबतची कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक यांच्याकडून सुरु आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्रायः-**

याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक यांनी या विभागाच्या अधिपत्याखाली त्यांच्याकडे प्रतिनियुक्तीवर कार्यरत संबंधित ४ अधिका-यांविरूध्द शिक्षेचे आदेश बजावलेले आहेत. तसेच अतिप्रदान रकमेची वसुली सुरू असल्याचे कळविले आहे. सबब, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी केलेली कार्यवाही संयुक्तिक आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नाशिक जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, प्रस्तुत प्रकरणातील ६८,२५,०००/- रुपयांच्या नियमबाहय प्रदानास जबाबदार असणा-या अधिका-याकडून सदर रक्कम व्याजासह वसुल करून समितीस अहवाल सादर करण्याचे समितीने निर्देश दिलेले आहेत, त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे. यावर प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, सन २०११ मध्ये सहावा वेतन आयोग आल्यानंतर हे घडलेले आहे. या संदर्भात व्याजासह वसूली पूर्ण झालेली असून संबंधित जबाबदार अधिका-यांवर कारवाई केलेली आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २०१२-२०१३ मध्ये ही बाब लक्षात आल्यानंतर आता सन २०१८ पर्यंत चार-पाच वर्षे कारवाई करिता का लागली, यावर प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, ही सर्व कारवाई जिल्हापरिषद पातळीवर करण्यात आलेली आहे. यातील कोणतेही प्रकरण विभागापर्यंत आलेले नाही. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या पातळीवर एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई केलेली आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, नियमबाहय अतिप्रदान केले गेलेले आहे, परंतु त्याची वसूली झालेली आहे का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी समितीस विदित केले की, पाचव्या वेतन आयोगानुसार प्रोत्साहन भत्ता लागू होता. सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे तो लागू आहे की नाही, याबाबत आदेश काढण्यात आले नव्हते.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ६८.२५ लाख रुपयांच्या अतिप्रदानाची वसुली व्याजासह वसुल झालेली आहे का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी समितीस विदित केले की, ही रक्कम प्रत्यक्षात ६१.७८लाख रुपये एवढीच होती. यापैकी ५६.८४ लाख रुपयांची वसुली झालेली आहे. उर्वरित रक्कम वसुलीची कारवाई दोन महिन्यांमध्ये पूर्ण करण्यात येईल. यावरील व्याजाची रक्कमही वसुल झालेली आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सद्यःस्थितीत हा प्रोत्साहन भत्ता लागू करणे शासनाच्या विचाराधिन आहे का, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, यासंबंधीचे परिपत्रक सामान्य प्रशासन विभागाने काढलेले आहे. याबाबत माहिती सादर करण्याकरिता अगोदर सामान्य प्रशासन विभागाकडून माहिती घ्यावी लागेल. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, संविधानिक समितीसमोर साक्षीला येताना विभागाच्या सचिवांनी अभ्यास, तयारी करुन व माहिती घेऊन येणे अभिप्रेत आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, प्रोत्साहन भत्त्याबाबत उच्च न्यायालयात केस झालेली आहे. त्यानुसार हा भत्ता अद्यापही

बंद करण्यात आलेला नाही. यवतमाळ येथे हा भत्ता बंद करण्यात आला होता. यामध्ये न्यायालयाचे आदेश देण्यात आलेले आहेत. यामध्येही एक पातळरेषा आहे. यामध्ये न्यायालयाने योग्य निर्णय घेतलेला नाही. परंतु हा प्रोत्साहन भत्ता बंदही केलेला नाही. असे गृहित धरुन सध्या नक्षल विभागामध्ये एक वेतनवाढ जादा प्रोत्साहन भत्ता म्हणून बंद केलेली नाही. याबाबत सहाव्या वेतन आयोगात आदेश (ऑडर्स) नसले तरीही तो अजुनही सुरु आहे. काही प्रकरणांमध्ये न्यायालयानेही याच बाजूने निर्णय दिलेला आहे. यामध्ये एकच तांत्रिक मुद्दा आहे, तो असा की, पाचव्या वेतन आयोगानुसार हा प्रोत्साहन भत्ता लागू होता. सहाव्या वेतन आयोगामध्ये प्रोत्साहन भत्त्याबाबत कोणताही आदेश दिलेला नाही. परंतु न्यायालयातील प्रकरणांमध्ये प्रोत्साहन भत्त्याच्या बाजूने निर्णय दिलेले आहेत. त्याप्रमाणे प्रोत्साहन भत्याचे प्रदान सुरु आहे. यावर समितीने समाधान व्यक्त केले.

**अभिप्राय व शिफारशी**

सन २०११-१२ मध्ये नाशिक जिल्हा परिषदेतील सुरगणा पंचायत समिती अंतर्गत कर्मचा-यांनी माहे जून, २०१२ दरम्यान सहाव्या वेतन आयोगातील सुधारित वेतनाच्या १५% व कमाल रु.१५००/- प्रमाणे अतिसंवेदनशिल म्हणून घोषित आदिवासी भागात असलेल्या अधिकारी/कर्मचा-यांच्या मूळ वेतनात प्रोत्साहन भत्ता प्रदान केलेला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाकडून दिनांक २२ एप्रिल, २००९ रोजी महाराष्ट्र नागरी सेवा सुधारित वेतन नियम, २००९ लागू करण्यात आला होता; परंतू संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी ५ व्या वेतन आयोगाप्रमाणे १५% प्रमाणे प्रोत्साहन भत्ता अदा करावेत असे आक्षेप घेतल्याने लेखा परिक्षणानंतर सर्व कर्मचा-यांचे प्रोत्साहन भत्ते अदा करण्यात आले आहेत.

माहे जून, २०१६ च्या वेतनातून रुपये ६१,७७,८३६/- अतिप्रदान वसुली करण्यात आलेली आहे. उर्वरित रुपये १५,१६,४५०/- वसुली होण्याबाबत सर्व संबंधितांना सन २०१६ मध्ये तसेच विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी निदेश देऊन ही वसुली झालेली नाही. जिल्ह्यातील सर्व गट शिक्षणाधिकारी व जिल्हा बदलीने गेलेले कर्मचा-यांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड, जालना, बीड, लातूर, परभणी, पुणे, कोल्हापूर, चंद्रपूर, नंदूरबार, हिंगोली, जळगांव, रायगड व सांगली इत्यादी जिल्ह्यांच्या वसुली यादी बाबत पत्र देऊनही अद्याप अंतिम अहवाल अप्राप्त असल्यामुळे समितीने नाराजी व्यक्त केली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी या प्रकरणात संबंधित गट विकास अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी व तत्कालिन देयक लिपिक जबाबदार असून उर्वरित रक्कम वसुलीची कार्यवाही दोन महिन्यात पूर्ण करण्यात यावी. सन २००८-०९ च्या अग्रिमातून सन २०१४-१५ अखेर रुपये १,११,६७९/- रक्कम गुंतलेली आहे. सन १९६९ ते १९७२ दरम्यान दुष्काळी परिस्थिती होती. तसेच लेखाशिर्ष व अनुदान उपलब्ध करुन न दिल्यामुळे अग्रिम प्रलंबित आहे.

समितीने जिल्हा परिषद, नाशिक येथे दिनांक ५ मे, २०१६ रोजी साक्ष घेऊन विचारणा केली असता, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सदरहू थकित रक्कम वसुली बाबत आश्वासित केले आहे. दिनांक २३ मार्च, २०१७ अन्वये अग्रिम व वसुलीच्या दस्तऐवजांचा शोध घेऊन रक्कम समायोजनाची कार्यवाही तसेच न्यायालयीन प्रकरणांचा निकाल न लागल्यामुळे थकित रक्कम समायोजित करता येत नाही, परंतु समायोजन अधिका-याच्या अग्रिमाअंतर्गत समाविष्ट करण्यात यावी.

**सदरहू प्रकरणी सर्वश्री १) एस. एस. साळवे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, सुरगणा, २) एन. आर. जाधव, ३) ए. आर. निकम व ४) पी. डी. चव्हाण यांनी कर्तव्यात कसूर केल्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम ३ व ७ च्या शर्तीचा भंग केल्याने त्यांच्याविरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८ रोजी सहाय्यक आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे दोषरोपाच्या चौकशीसाठी प्रकरण वर्ग केलेले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत समिती समाधान व्यक्त करीत आहे. तद्वतच याप्रकरणी सुरु असलेली चौकशी विहित वेळेत पूर्ण करावी व दोषींवर कडक स्वरुपाची कारवाई करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, नाशिक

## विशेष घटक योजनेअंतर्गत ५० टक्के अनुदानावर दुधाळ जनावरांचे वाटप योजनेतील अनियमितता

**परिच्छेद क्रमांक ३.७३५ (सन २००८-२००९)**

पंचायत समिती, सिन्नर अंतर्गत पशुसंवर्धन विभागामार्फत सन २००८-०९ या वित्तीय वर्षात ५० टक्के अनुदानावर दुधाळ जनावरांचे गट वाटप योजनेसाठी एकूण रु. १२,२२,२१४/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) सदर योजना ५० टक्के अनुदानावर राबविण्यात आलेली असल्याने ३० म्हैस गट लाभार्थ्यांकडून प्रत्येकी २४,०००/- प्रमाणे रक्कम रुपये ७,२०,०००/- व २० गाय गट लाभार्थ्यांकडून प्रत्येकी रुपये २१,०००/- प्रमाणे ४,२०,०००/- असे एकूण रु. ११,४०,०००/- लाभार्थी हिस्सा जमा करण्यात आलेला नाही.

(२) लाभार्थी हिश्याची रक्कम रुपये ११,४०,०००/- व शासन अनुदानाची रक्कम रुपये ११,४०,०००/- असे एकूण रु. २२,८०,०००/- पंचायत समितीने म्हैस गट व गाय गट विक्रेत्यांना प्रदान करणे आवश्यक असतांना लाभार्थ्यांनी परस्पर व स्वहिस्सा व शासन अनुदानाच्या रकमा विक्रेत्यांना प्रदान केल्या आहेत व शासन अनुदान रकमा धनादेशाव्दारे लाभार्थ्यांना प्रदान केल्या आहेत.

(३) शासन निर्णय दि. २८.२.२००३ व शुध्दीपत्रक दि. २.२.२००५ या योजनेसाठी एका गावामधून ५ लाभार्थ्यांची निवड करणे बंधनकारक आहे. तसेच शासन निर्णय क्र. बीडीएस/१००७/प्र.क्र.३२०/पदुअ-४, दि. २८/३/२००८ नुसार ज्या गावातून लाभार्थ्यांची निवड करावयाची आहे ते गाव दुध संकलन मार्गावर असावे. सदर गावांस डेअरी कार्यान्वित होवून त्यांच्या विपणनाची सोय उपलब्ध असावी, अशी अट निश्चित करण्यात आली आहे. पंचायत समितीने तशी माहिती व दाखले प्राप्त केलेले नाही, त्यामुळे शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पालन झालेले नाही.

(४) मा.आयुक्त, पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. एस.डी.एस/ १८/ १४२८/ ५४९/१२४४/२००८/ पं.स.१३, दि.६.६.२००६ अन्वये सन २००८-०९ या वित्तीय वर्षात दुधाळ जनावरांच्या गट वाटपासंबंधात मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत, त्यानुसार खालील प्रमाणे पुर्तता केलेली नाही.

**अ. सूचना क्र. ५** नुसार एका वर्षात संकरित गाईस/म्हशीस लाळ खुरकत लसीच्या मात्रा २ वेळेस व जंतुनाशक १०० टक्के अनुदानावर पुरविले जातील तथापि, तसा पुर्तता अहवाल नस्तीसोबत जोडण्यात आलेला नाही.

**ब. सूचना क्र. १०** नुसार पशुधन विकास अधिकारी, विस्तार यांनी दर तीन महिन्यांनी योजनेतील प्रत्येक जनावरांची प्रत्यक्ष पहाणी करुन सद्यःस्थिती अहवाल जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांना सादर करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही झालेली नाही.

**क. सूचना क्र. १०** नुसार जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, उपआयुक्त प्रादेशिक पशुसंवर्धन व सह आयुक्त यांनी किमान १० टक्के जनावरांची पडताळणी करणे व लाभार्थ्यांच्या समक्ष भेटी घेवून त्यांना तांत्रिक मार्गदर्शन करणे अगत्याचे असताना तशी कार्यवाही झाली नाही.

(५) सदर योजनेमुळे लाभार्थ्यांचे दैनंदिन राहणीमान, उत्पन्न यात कितपत सुधारणा झाली, योजनेचे उद्दिष्ट कितपत सफल झाले त्याचा सखोल अहवाल योजना राबविल्यानंतरच्या पुढील वर्षातील जून अखेर पर्यंत आयुक्तालयात सादर करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) अति. आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे मार्गदर्शक सूचना परिपत्रक जा.क्र. एसडीएस १८/१४२८/ ५४९/१२४४/२००६, पसं-१३, पुणे-१, दि. २९/०५/०८ प्राप्त दि. ०६/०६/२००८ अन्वये परिच्छेद क्र. ७ मध्ये नमुद केल्याप्रमाणे लाभार्थी हिस्सा ५०% रक्कम भरण्याची जबाबदारी लाभार्थ्यांची असुन सदर रक्कम कुठे जमा करावी याबाबत स्पष्ट उल्लेख नाही.

(२) वरील १ मध्ये नमुद परिपत्रक दि. ६/०६/२००८ मधील मुद्दा क्र. ७ अन्वये लाभार्थी शासन अनुदान ५०% हिस्सा रक्कम धनादेशाव्दारे अदा करण्यात आली आहे.

(३) अतिरिक्त आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे मार्गदर्शक सुचना परिपत्रक जा.क्र. एसडीएस १८/१४२८/५४९/१२४४/२००६/पसं-१३/पुणे-१, दि. २९/०५/०८ प्राप्त दि. ०६/०६/२००८ अन्वये मुद्दा क्र. १ मध्ये केल्याप्रमाणे लाभार्थ्यांची निवड मा.जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचे अध्यक्षतेखाली समिती मार्फत करण्यात आलेले आहे.

(४) (अ) संबंधित कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय दवाखान्याकडून लाळ खुरकत लसीच्या दोन वेळा मात्रा व जंतूनाशक औषधे १००% अनुदानावर पुरविलेली आहेत.

(४) (ब) पशुधन विकास अधिकारी (वि) यांनी पडताळणी केली आहे.

(४) (क) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि. प., नाशिक यांनी तसेच जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त नाशिक यांनी समक्ष भेटी दिल्या आहेत. सोबत दैनंदिनी जोडलेल्या आहेत.

(५) योजनेतील लाभार्थ्यांच्या पाठपुराव्याची नोंदवही ठेवण्यात आली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ मे, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, लाभार्थ्यांकडून लाभार्थी हिस्सा रक्कम वसूल न करण्याची कारणे काय आहेत, (३० म्हैस गट लाभार्थ्यांकडून प्रत्येकी रू.२४,०००/- प्रमाणे रू.७,२०,०००/- आणि गाय गट २० लाभार्थ्यांकडून प्रत्येकी रू.२१,०००/- प्रमाणे रू.४,२०,०००/- असे एकूण रू.११,४०,०००/- लाभार्थी हिस्सा पंचायत समितीकडे जमा होणे आवश्यक आहे.) लाभार्थ्यांकडून लाभार्थी हिश्श्याची रक्कम वसूल करून त्यामध्ये अनुदानाची रक्कम एकत्र करून ती रक्कम गाय गट व म्हैस गट विक्रेत्यांना प्रदान करावयाची असताना ही बाब डावलून लाभार्थी हिश्श्याची रक्कम परस्पर विक्रेत्याला प्रदान करण्याचे कारण काय आहे, या अनियमिततेस कोण जबाबदार आहे.

यावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस विदित केले की, गट विकास अधिकारी यांच्या मान्यतेने खरेदी करण्यात आली आहे. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, लाभार्थी हिस्सा तुमच्याकडे जमा करायचा होता. तो हिस्सा आणि शासनाचा हिस्सा एकत्रित करून विक्रेत्याला दिला पाहिजे होता आणि मग ते जनावर खरेदी केले पाहिजे होते. पण तसे न करता परस्पर तो हिस्सा विक्रेत्याला देण्याबाबत लाभार्थ्याला सांगण्यात आले, त्यानंतर मग शासनाचा हिस्सा दिला. तुम्ही ते दोन्ही एकत्र करून खरेदी प्रक्रिया केली पाहिजे होती. यावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस विदित केले की, शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये लाभार्थ्यांचा हिस्सा कुठे जमा करायचा या संदर्भात मार्गदर्शक सूचना नाहीत. यानंतर गट विकास अधिकारी यांनी सांगितले आहे की, लाभार्थ्याने बाजारात जनावराच्या खरेदीच्या वेळी लाभार्थी हिस्सा ५० टक्के भरावा, जनावर खरेदी केल्याची खात्री करूनच संबंधित लाभार्थ्याला अनुदान अदा करण्यात यावे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, जनावराची मूळ किंमत किती आहे. यावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस विदित केले की, प्रत्येक लाभार्थ्याला ३ जनावरे दिली आहेत. एका जनावराची किंमत १६ हजार रूपये असते. लाभार्थ्याकडून ५० टक्के रक्कम थेट बाजारामध्ये दिली आहे.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, लाभार्थ्याने बाजारामध्ये पैसे दिले. हे कसे सिध्द केले, लाभार्थ्याने आपल्याला जनावर दाखविले आणि आपण त्या व्यापा-यांना पैसे दिले. आतापर्यंत शासनाच्या गाईडलाईन्सवर जोर देत होता. शासनाच्या गाईडलाईन्स अशाही आहेत की, जनावर आहे का हे ३-३ महिन्यांनी पहावे. कारण शासनाने त्यासाठी ५० टक्के अनुदान दिले आहे. शेतक-याच्या जीवनात बदल व्हावा या अपेक्षेने ते अनुदान लाभार्थ्याला दिलेले असते. किमान २ वर्षे तरी जनावर त्यांच्याकडे राहिले पाहिजे. आपण त्याप्रमाणे तपासणी केली आहे का आणि त्याचा अहवाल आपल्याकडे उपलब्ध आहे का, यावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस विदित केले की, पाहणीचे रजिस्टर पंचायत समिती स्तरावर ठेवले आहे. संबंधित जनावराला लसीकरण केल्याची नोंद आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेला असे उत्तर देता येणार नाही. पंचायती राज समिती तेथे जाऊन पाहू शकत नाही. आपण लाभार्थ्याकडून पैसे न घेता हे केले आहे. तसेच लाभार्थ्याने जनावर आणून दाखविले आणि आपण पैसे दिले. कोणत्या स्तरावरची खरेदी समिती असते, यावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, प्रत्यक्ष जनावर खरेदी करताना खरेदी समिती असते, त्यांच्या मदतीने लाभार्थी जनावर खरेदी करीत असतो. तालुकास्तरीय खरेदी समिती असते. त्यामध्ये विस्तार अधिकारी, संबंधित दवाखान्यातील पशुधन अधिकारी असतो.

यावर समितीने अशी विचारणा केली की, प्रत्येक समितीचे रेकॉर्ड आहे का, यावर समितीला होकारार्थी उत्तर प्राप्त झाले. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, प्रत्येक जनावराची किंमत आपल्याकडे आहे का, जनावरे दुधाळ आहेत का याची पाहणी केली का, जनावरांना रोग आहे का, ते कसे आहेत अशा प्रकारचा जनावरांच्या संदर्भातील अहवाल ३ महिन्यांनी देणे बंधनकारक आहे. यावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी जनावर खरेदी केल्याच्या मार्केटच्या पावत्या आहेत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, शेतक-यांना जोडधंदा म्हणून दुधाळ जनावराचे वाटप केले जाते. एका जनावराची किंमत १६ हजार रुपये असली तरी ८ हजार रुपये शासनाचे अनुदान आणि ८ हजार रुपये लाभार्थ्याचा हिस्सा असतो. लाभार्थ्याचा हिस्सा तुमच्याकडे घेऊन शासनाचे अनुदान घालून त्यांना दुधाळ जनावराचे वाटप करावयाचे आहे, जेणेकरुन त्यांचे जीवनमान उंचावणार आहे. अधिकारी तीन-तीन महिन्यानंतर जनावराची तपासणी करण्यासाठी, लाभार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी जातात का, गेले असते तर पशुधनाची संख्या वाढली असती, पशुधन विकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांनी दर तीन महिन्यांनी जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी करुन सद्यस्थितीबाबतचा अहवाल देणे अनिवार्य आहे. असा अहवाल दिला आहे का यावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस विदित केले की, जनावरांना लसीकरण केल्याची नोंद आहे. जनावरांची संबंधित दवाखान्यामार्फत पश्चात पाहणी केली जाते. अहवाल दिलेला नाही. यावर समितीने असे निदेश दिले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करावी व प्रत्यक्ष अहवाल तयार करुन एका महिन्यात समितीला कळवावा. यावर समितीला होकारार्थी आश्वासित करण्यात आले. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, लाभार्थ्यांकडून किती रक्कम वसूल केली व जनावराची किंमत किती होती? यावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सरासरी प्रत्येकी १६ हजार रुपये किंमत आहे. ३ जनावरांपोटी ५० टक्के रक्कम म्हणून २४ हजार रुपये लाभार्थ्यांकडून वसूल केले आहेत. लाभार्थ्याचे २४ हजार रुपये मार्केटमध्ये जमा करायचे आणि २४ हजार रुपये विभागाच्या अधिका-यांनी जमा करायचे होते. यावर समितीने असे निदेश दिले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी हा मुद्दा गांभीर्याने विचारात घेतला नाही. लसीकरणाचा हा विषय नाही. दर तीन महिन्यांनी त्यांनी तुमच्याकडे अहवाल दिला पाहिजे, ते बंधनकारक आहे. हा मुद्दा सचिवांच्या साक्षीमध्ये घेण्यात येणार आहे. विभाग प्रमुख म्हणून तुमची जबाबदारी आहे. तालुका स्तरावरील अधिका-यांना पाठीशी का घालता, पशुधन पर्यवेक्षकांनी लसीकरण केल्याची नोंद ठेवली आहे असे का सांगत आहात, दर तीन महिन्यांनी तपासणी केल्याचा अहवाल का उपलब्ध नाही, फक्त यांचा अहवाल यावा असे नव्हे तर आयुक्तांना सुध्दा अहवाल द्यायचा आहे. शेतक-यांच्या राहणीमानामध्ये काय सुधारणा झाली. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, लाभार्थ्यांचा हिस्सा जनावराचे वाटप केल्यानंतर देता की अगोदर देता. यावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस विदित केले की, जनावरे घेतल्यानंतर देतो. यावर समितीने अशी विचारणा केली की, सर्व जनावरे सारख्या किंमतीची नसणार हे आपल्याला माहिती असेल. डावा उजवा प्रकार असतो. आपण किती किंमतीला जनावरांची खरेदी केली व ५० टक्के रक्कम म्हणून लाभार्थ्यांकडून किती रक्कम घेतली, यावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस विदित केले की, म्हैस गट व गाय गट ४८ हजार रुपयांना ३ विकत घेतले. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, ४८ हजार रुपये तीन जनावरे मिळूच शकत नाही. एका म्हशीची किंमत किमान २५ ते ३० हजार रुपये असावी. ४८ हजार रुपयांना तीन म्हशी विकत घेतल्या हे उत्तर संयुक्तिक वाटत नाही. तीनही म्हशी समान किंमतीला मिळाल्या का?

यावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस विदित केले की, आपल्याकडे पावत्या उपलब्ध आहेत. पावतीवर ३ म्हशींची किंमत ४८ हजार रुपये आहे. मार्केटमधून खरेदी केल्या आहेत. खरेदी केल्यानंतर लाभार्थ्यांनी मार्केटमध्ये २४ हजार रुपये दिले आणि गट विकास अधिका-यांमार्फत २४ हजार रुपये देण्यात आले. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी समितीस विदित केले की, योजना अशी होती की, ३ गाई किंवा म्हशींचा एक गट तयार केला होता. प्रत्येकी एका गायीची १६ हजार रुपये आणि एका म्हशीची १७ हजार रुपये किंमत होती. ५० टक्के रक्कम लाभार्थ्याची व ५० टक्के हिस्सा शासनाने अनुदान म्हणून द्यायचा होता. लाभार्थ्यांनी थेट कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गायी खरेदी केल्याबद्दलची पावती दिली. गट विकास अधिका-यांकडे पूर्ण पैसे दिल्यानंतर ५० टक्के रक्कम प्रतिपूर्ती केली.

यावर समितीने पुढे विचारणा केली की, बाजारामध्ये पावत्या मिळतात. तुम्ही जनावरांची प्रत्यक्ष लाभार्थ्यांच्या घरी जाऊन पाहणी केली नसेल तर खरेदी केल्याचे कसे सिध्द करता येईल, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस चौकशी करण्याचे आश्वासित केले. यावर समितीने पुढे विचारणा केली की, एकाच बाजारातून खरेदी केली का? यावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सिन्नर मार्केटमधून खरेदी केली. यावर समितीने पुढे विचारणा केली की, त्या गटात दूध संकलन किती वाढले. योजनेची मर्यादा ४८ हजार रुपये आहे. सरसकट ४८ हजार रुपयांमध्ये तीन जनावरे देऊ शकत नाही. किती किंमतीला जनावरांची खरेदी केली याची खात्री कशी केली. तुम्ही योजना भागिले ४८ हजार रुपये अशी

विभागणी केली. लाभार्थ्यांचे जनावरांसोबत फोटो घेतले आहेत का, अनुदान देत असताना तुमच्याकडे पुरावा पाहिजे. जनावरांचे वाटप केले याचा काही पुरावा आहे का, जनावरांची सद्यःस्थिती काय आहे. यावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस विदित केले की, तपासणी करुन समितीला माहिती देण्यात येईल. यावर समितीने असे निदेश दिले की, जिल्हापरिषदेने या समितीला गांभीर्याने घेतलेले नाही. तीन महिन्यांचा तपासणी अहवाल नाही, कागदोपत्री जनावरे वाटप केल्याचा पुरावा नाही, जनावरांची सद्यःस्थिती तुम्हाला माहिती नाही. कारवाई कोणावर करायची याची अद्ययावत माहिती का उपलब्ध नाही, लाभार्थ्यांनी २४ हजार रुपयांची पावती दिली म्हणून तुम्ही २४ हजार रुपये दिले. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या प्रकरणाची चौकशी करुन अहवाल सादर करावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी समितीला होकारार्थी आश्वासित केले. यावर समितीने लाभार्थ्यांच्या यादीची मागणी केली असता जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीला होकारार्थी आश्वासित करुन यादी देण्याचे मान्य केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्द्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

विशेष घटक योजने अंतर्गत ५० टक्के अनुदानावर दुधाळ जनावरांचे गट योजनेतील अनियमितता.

(१) पशुधन विकास अधिकारी यांनी दर तीन महिन्यांनी जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी करून सद्यःस्थितीबाबतचा अहवाल देणे अनिवार्य असल्याने प्रस्तुत प्रकरणात असा अहवाल न देण्याची कारणे काय आहे, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करून प्रत्यक्ष अहवाल तयार करून १ महिन्याच्या आत समितीला सादर करावा असे समितीने निर्देश दिलेले होते त्यानुसार कोणती कार्यवाही केली ?

(२) विशेष घटक योजनेंतर्गत ५० टक्के अनुदानावर दुधाळ जनावरांचे गट वाटप योजनेत लाभार्थी हिश्श्याची रक्कम परस्पर विक्रेत्याला प्रदान केल्यामुळे संबंधित गट विकास अधिकारी व पशुधन विकास अधिकारी (वि) पंचायत समिती, सिन्नर यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा नियमांतर्गत शिस्तभंग विषयक कारवाई दिनांक २९.११.२०१६ रोजी सुरू करण्यात आली असून तिची सद्यःस्थिती काय आहे,नियमानुसार ती केव्हा पुर्ण होणे आवश्यक होते व सद्यःस्थिती ती प्रलंबित असल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

(३) जनावरे लाभार्थीकडे आहेत की नाही याचा दर तीन महिन्यानंतर आढावा घेणे आवश्यक असते तसेच किमान दोन वर्ष ते जनावर लाभार्थीकडे राहिले पाहिजे अशा शासनाच्या सूचना आहेत काय व त्याची प्रस्तृत प्रकरणात अंमलबजावणी झाली असल्याचे शासनाने चौकशी केली आहे काय?

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदर बाबतीत तत्कालीन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि. प., नाशिक डॉ. पी. आय. फालक यांनी दिनांक ०१.१२.२०१६ रोजी सिन्नर येथे जाऊन चौकशी करून अहवाल सादर केलेला आहे.

तत्कालिन पविअ (वि) डॉ.एस.एच.महाजन यांची जून २००९ मध्ये बदली झाल्याने सदर अहवाल देण्याची जबाबदारी त्या कालावधीत रुजू झालेले डॉ.एस.सी.कोहोक,पविअ (वि) पं.स.सिन्नर यांची असल्याने त्यांना सदर योजनेतील अनियमिततेबाबत या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र.जिपना/पंस/आस्था-१/२२९२/२०१७ नाशिक, दि.२८.११.२०१७ अन्वये खुलासा मागविण्यात आलेला होता. त्याचा त्याबाबतच्या खुलासा दिनांक ०४/१२/२०१७ रोजी प्राप्त झाला असुन सदर खुलाशायामध्ये त्यांनी दुधाळ जनांवराच्या पाठपुराव्या बाबतच्या नोंदी नोंदवहीत घेऊन अद्ययावत नोंदवही तालुकास्तरावर ठेवण्यात आलेली आहे. परंतु सदरचा पाठपुरावा व तत्सम नोंदी कामाच्या व्यापामुळे शासन सुचनेनुसार दर तीन महिन्यांनी वरिष्ठ कार्यालयास सादर करु शकलो नाही व या पुढे अशी चुक होणार नाही याची मी दक्षता घेईल असा उल्लेख केलेला आहे.

त्यानुसार दिनांक ४/१२/१७ रोजी कार्यरत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी पुनःश्च संबंधित विषयान्वये पंचायत समिती सिन्नरला भेट देऊन दुधाळ जनावरांच्या पाठपुरावा बाबतच्या नोंदी रजिस्टर मध्ये ठेवल्याची खात्री केली आहे. तसेच डॉ.एस.सी.कोहोक, पशुधन विकास अधिकारी यांना या कार्यालयाचे पत्र दिनांक २७/१२/२०१७ अन्वये भविष्यात अशा प्रकारची चुक झाल्यास आपल्या विरुध्द एकतर्फी शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्याची सक्त ताकीद देण्यात आली आहे व तशी नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेण्यात आलेली आहे.

२. तत्कालीन पशुधन विकास अधिकारी (विस्तार),डॉ.एस.एस.महाजन यांना सदर योजनेच्या खरेदीच्या अनियमितते विषयी या कार्यालयानी कारणे दाखवा नोटीस क्र. जिपना/पंस/आस्था-१/ १८९६ /१६ नाशिक दि. २९/११/२०१६ बजविण्यात येवुन खुलासा मागविण्यात आलेला होता. त्यानुसार डॉ. महाजन, पविअ (व) यांनी दि. ०६/१२/२०१६ रोजी सविस्तर खुलासा मा.सचिव कृषि व पदुम, मंत्रालय -३२,यांचेकडे सादर करणेत आलेला होता. त्यावर मा. उपसचिव, कृषि व पदुम, मंत्रालय-३२ यांचेकडील प्रत्र क्र. परास-२०१७/ प्र. क्र. ३८/ पदुम-४ दि. २७/०२/२०१७ नुसार तत्कालीन पविअ (व), पं.स. सिन्नर डॉ. महाजन यांचे विरुध्द कार्यवाही प्रस्तावित करण्याची आवश्यकता नसल्याचे दिलेले अभिप्राय कळविल्याने कार्यवाही करण्यात आलेली नाही.

३. होय,

अति. आयुक्त, पुणे-६७ यांचेकडील सदर योजनेबाबतच्या दि.०६.०६.२००८ च्या निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांमधील मुद्दा क्रमांक १० नुसार दर तीन महिन्यांनी उपरोक्त दुधाळ जनावरांचा पाठपुरावा करून वरिष्ठांना अहवाल सादर करण्याबाबतच्या सुचना आहेत.

दिनांक ०१.१२.२०१६ रोजी तत्कालीन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,जि.प.नाशिक डॉ.पी.आय.फालक यांनी केलेल्या चौकशी नुसार पंचायत समिती, सिन्नर स्तरावर जनावरांचा पाठपुरावा करून नोंदी तालुकास्तरावरील नोंदवहीत ठेवण्यात आल्याचे दिसून आलेले आहे. परंतू दर तीन महिन्यांनी पाठपुरावा अहवाल वरिष्ठांना सादर करणे आवश्यक असतांना तसे न केल्याचे चौकशीवेळी दिसून आलेले आहे.

तसेच दिनांक ४.१२.२०१७ रोजी कार्यरत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,जि.प.नाशिक यांनी पुनश्चः सदर दुधाळ जनावरांच्या दर ३ महिन्यांनी ३ वर्षांपर्यंत सादर करावयाच्या पाठपुरावा अहवालाबाबत पंचायत समिती सिन्नर येथे भेट देऊन चौकशी करून सविस्तर अहवाल सोबत सादर करण्यात आलेला आहे.

४. विशेष घटक योजना सन २००८-०९ या योजनेच्या मार्गदर्शक सुचनेतील मुद्दा क्र.८ अन्वये नाबार्ड बँकने ठरवून दिलेल्या किंमतीनुसार जनावरांची किंमत राहील असे नमूद केलेले असल्याने त्यानुसार जनावरांची खरेदी केलेली आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**कृषी व पदुम विभागाचे अभिप्रायः-**

१) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र दि.२८.११.२०१७ अन्वये पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती, सिन्नर, जि.नाशिक यांना दर तीन महिन्यानी वाटप केलेल्या गटाची पडताळणी करून तसा पडताळणी अहवाल सादर न केल्याबाबत नोटीस बजावलेली आहे. तसेच जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि.प.नाशिक यांच्या दि.२७.१२.२०१७ पत्रान्वये डॉ.एस.सी.कोहक, पशुधन विकास अधिकारी यांना भविष्यात अशा प्रकारची चूक झाल्यास आपल्याविरूध्द एकतर्फी शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल, अशा प्रकारची सक्त ताकीद देण्यात आली आहे.

२) प्रस्तृत प्रकरणी योजनेंतर्गत निवडलेल्या लाभार्थ्यांना गाई व म्हशींचा गट प्रत्यक्ष खरेदी करुन त्याचा ताबा दिल्याची खातरजमा करुनच देय असलेले शासनाचे ५० टक्के अनुदान धनाकर्षाव्दारे संबंधित लाभार्थ्यास अदा करण्याची पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती, सिन्नर यांनी केलेली कार्यवाही नियोजन विभागाचा थेट लाभ हस्तांतरणाबाबतचा शासन निर्णय दि.५.१२.२०१६ यास अनुसरून असल्याने त्यांच्याविरूध्द प्रशासकीय कार्यवाही करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

३) योजनेंतर्गत लाभार्थ्यांस लाभ दिल्यानंतर त्या लाभार्थ्याकडे जनावरे असल्याबाबतचा पाठपुरावा जिल्हा पशुसवंर्धन अधिकारी जिल्हा परिषद, नाशिक व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, नाशिक यांनी देखील केलेला असून तशा नोंदी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, नाशिक व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, नाशिक यांनी सादर केलेल्या मासिक दौरा दैनंदिनीमध्ये नमूद केलेल्या आहेत. तथापि, तसा अहवाल सादर करणे आवश्यक असतांना तो सादर करण्यात आलेला नाही.

योजनेंतर्गत दुधाळ जनावरांचे वाटप केल्यानंतर लाभार्थ्यांनी किमान २ वर्ष ते जनावर त्यांच्याकडे ठेवले पाहीजे अशा शासनाच्या सुचना नसून, लाभार्थीने दुग्धव्यवसाय किमान ३ वर्ष करणे आवश्यक आहे. योजनेअंतर्गत दुधाळ जनावर मृत पावल्यास विम्याच्या रक्कमेतून किंवा दुध उत्पादन कमी झाल्यास पशुसंवर्धन विभागाच्या संमतीने दुसरे जनावर विकत घ्यावयाचे आहे.

४) योजने अंतर्गत नाबार्डने ठरवून दिल्याप्रमाणे संकरीत गाय व म्हशीची किंमत अनुक्रमे रू.१४,०००/-व रू.१६,०००/- निश्चित केलेली असून सदर जनावरांचा पुरवठा ५० टक्के अनुदानावर करावयाचा असल्याने अनुदानाची रक्कम गाय व म्हशीसाठी अनुक्रमे रू.७,०००/-व रू.८,०००/- इतकी येते. संपूर्ण राज्यामध्ये शासन निर्णय क्र.सीडीएस-१०२००२/१८५५८/ प्र.क्र.३१५/पदुम-४,मुंबई-३२दि.२८.०३.२००३ अन्वये योजना राबविण्यात आलेली आहे. सदर योजनेच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने आयुक्त पशुसंवर्धन यांचे पत्र क्र.एसडीएस-१८/१४२८/५४९/१२४४/२००८/पंस-१३,पुणे-१ दि.०६.०६.२००८ अन्वये मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर योजनेमध्ये कोणतीही अनियमितता निदर्शनास आलेली नाही.

## चौकशी अहवाल

आज दिनांक ०४/१२/२०१७ रोजी सन २००८-०९ या आर्थिक वर्षात विशेष घटक योजनेअंतर्गत ५०% अनुदानावर दुधाळ जनावरांचे गट वाटप योनजेसंदर्भात मा.पंचायती राज समितीने दिनांक ५ मे, २०१६ ते ७ मे, २०१६ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी सदर योजनेसंदर्भातील परिच्छेदाबाबत घेतलेल्या आक्षेपांच्या प्रश्नावलीबाबत पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती, सिन्नर येथे भेट दिली.

त्यानुसार सन २००८-०९ या आर्थिक वर्षात विशेष घटक योजने अंतर्गत ५०% अनुदानावर दुधाळ जनावरांचे गट वाटपासाठी रुपये १२,२३,१००/- एवढे अनुदान पंचायत समिती सिन्नर पशुसंवर्धन विभागास प्राप्त झाले होते. सदर अनुदानातून ३ म्हशींचे ३० गट व ३ गाईंचे २० गटांचे ५०% शासकीय अनुदान व ५०% लाभार्थीचा हिस्सा रककम मिळून तत्कालिन पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती, सिन्नर यांनी जनावरांची खरेदी करुन लाभार्थींना लाभ दिल्याचे दिसून आले.

तसेच तत्कालिन पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती, सिन्नर यांनी त्यांची जून, २००९ मध्ये बदली होईपर्यंत उपरोक्त जनावरांच्या पाठपुरावाच्या नोंदी तालुकास्तरावरील नोंदवहीत ठेवण्यात आलेल्या आहेत, परंतु त्यांनी पाठपुरावा अहवाल दर तीन महिन्यांनी ते कार्यरत असेपर्यंत वरिष्ठांना सादर केलेला नसल्याचे दिसून आले.

त्यानंतर रुजू झालेले पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी तालुकास्तरावर सदर दुधाळ गटांचा पाठपुरावा करुन त्याची नोंद पाठपुरावा नोंदवहीत ठेवण्यात आल्याचे दिसून आले. परंतु खात्याच्या मार्गदर्शक सुचनेनुसार योजनेतील दुधाळ जनावरांचा पाठपुरावा अहवाल दर तीन महिन्यांनी वरिष्ठ कार्यालयास सादर करणे आवश्यक असताना तत्कालिन पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी उपरोक्त मार्गदर्शक सुचनांचे पालन केले नसल्याचे आढळून आले.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नाशिक जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पशुधन विकास अधिकारी यांनी दर तीन महिन्यांनी जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी करून सद्यस्थितीबाबतचा अहवाल देणे अनिवार्य असल्याने प्रस्तृत प्रकरणात असा अहवाल न देण्याची कारणे काय आहेत. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करून प्रत्यक्ष अहवाल तयार करून १ महिन्याच्या आत समितीला सादर करावा असे समितीने निर्देश दिलेले होते त्यानुसार कोणती कार्यवाही केली. यावर सचिव, पशुसंवर्धन विभाग यांनी समितीस विदित केले की, विशेष घटक योजनेंतर्गत ५० टक्के अनुदानांतर्गत आपण दुधाळ जनावरांचे वाटप करतो त्यामध्ये अनियमितता झाल्याचे समितीच्या निदर्शनास आले होते. त्याचे कारण असे आहे की, पशुधन विकास अधिका-यांनी विकास अधिका-यांनी दर तीन महिन्यांनी जी जनावरे दिली जातात त्यांची प्रत्यक्ष पडताळणी करुन दर तीन महिन्यांनी त्याचा अहवाल दिला पाहिजे आणि शासन निर्णयानुसार संबंधित अधिका-याने ही जबाबदारी पार पाडणे अनिवार्य आहे ती कार्यवाही केली नसल्यामुळे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असे निर्देशित केले होते की, त्यासंबंधी कार्यवाही करुन समितीला एक महिन्याच्या आत अहवाल सादर करावा. त्यानुसार जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांच्यामार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी केली असून त्या काळातील पशुधन विकास अधिकारी डॉ. एस.सी. काहोक यांना कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांचा खुलासा मागविला आहे. तो खुलासा प्राप्त झाला असून त्यानुसार त्यांनी दुधाळ जनावरांच्या नोंदी घेऊन सदरची नोंदवही तालुका स्तरावर ठेवलेली आहे पण वेळेवर तपासणी न केल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांना ताकिद देऊन त्यानुसार त्यांच्या सेवा पुस्तकामध्ये नोंद घेतलेली आहे.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, अधिका-याला ताकीद देणे किंवा त्याच्या सेवा पुस्तकात नोंद घेणे ही काही फार मोठी कार्यवाही होत नाही. कारण दुधाळ जनावरांसाठी शासनाकडून इतक्या मोठ्या प्रमाणात निधी दिला जात असताना अशी दुधाळ जनावरे तेथे आहेत काय, पशुधन विकास अधिकारी त्याची पाहणी करतो काय, शेतक-यांच्या उन्नतीसाठी शासन दुधाळ जनावरांसाठी अनुदान देत असताना आपला पशुधन अधिकारी त्या ठिकाणी भेट देऊन योग्य प्रकारे काम करतो काय ते सांगा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, त्यांनी भेटी दिलेल्या आहेत, यावर समितीने असे मत व्यक्त केले की, समिती सदस्य या समितीच्या माध्यमातून संपूर्ण राज्यात फिरतात. आपल्या पशुधन विकास अधिका-याने कधी तरी वैरण विकास कार्यक्रम फलक लावून घेतला आहे काय, कधी तरी सकाळी हे डॉक्टर्स दवाखान्यात जातात काय, समितीने प्रत्यक्ष गावांमध्ये भेटी दिल्या आहेत. त्यावरुन समितीला तेथे असे आढळून आले की, सकाळी हे डॉक्टर कधीच गावात जात नाहीत. सकाळी शेतकरी घरी असतात. त्यामुळे सकाळी हे डॉक्टर्स गावात हजर असले पाहिजेत व त्यांनी सेवा दिली पाहिजे. पण हे डॉक्टर्स दुपारी जातात. दुपारच्या वेळात सर्व शेतकरी शेतावर असतात गावात कोणीच नसते. त्या डॉक्टरजवळ रेकॉर्डही नीट नसतो.

यावर समितीने अशी विचारणा केली की, या ठिकाणी मंत्रालयीन विभागाने उत्तराच्या टिप्पणीमध्ये लिहून दिले आहे की, भविष्यात अशा प्रकारची चूक झाल्यास त्यांच्याविरुध्द एकतर्फी शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल. त्यामुळे भविष्यात अशा प्रकारची चूक म्हणजे त्यांनी कोणती चूक केली पाहिजे याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, या प्रकरणी संबंधित डॉक्टरने भेट दिली आहे आणि त्यासंबंधी पंचायत समिती स्तरावर नोंदवही सुध्दा ठेवली आहे. त्यांनी दर ३ महिन्यांनी भेट दिल्याची नोंद आहे पण त्यांनी त्यासंबंधीचा जिल्हा स्तरावर जो अहवाल पाठवावयाचा असतो तो पाठविलेला नाही. यावर समितीने पुढे विचारणा केली की, डॉक्टर कोहोक यांनी नेमकी कोणती चूक केली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, तालुका स्तरावर रजिस्ट्रर आहे. त्यामध्ये नोंद सुध्दा आहे. परंतु त्यांनी जिल्हा स्तरावर जो दर ३ महिन्यांतून अहवाल पाठवावयाचा असतो तो पाठविला नाही. मात्र त्या ठिकाणी रजिस्टर आहे. म्हणजे त्यांनी पूर्तता केलेली असून तालुका स्तरावरील पंचायत समितीच्या रजिस्टरमध्ये संपूर्ण नोंदी आहेत. मात्र दर ३ महिन्यांनी जिल्हा पशुधन विकास अधिका-यांना जो अहवाल पाठविणे अपेक्षित असते तो त्यांनी पाठविला नाही.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, म्हणजे आपल्या म्हणण्यानुसार त्याने रेकॉर्ड बरोबर ठेवला आहे फक्त त्यांनी जो अहवाल जिल्हा स्तरावर पाठवायला हवा होता तो पाठविला नाही. कदाचित त्यानंतर काही अधिका-यांनी जाऊन तो रेकॉर्ड दुरुस्त केला असेल. शेतक-याला शेतीपुरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय वाढीस लागला पाहिजे. कुक्कूटपालन आणि गाई म्हशी पालनाचे उद्योग सुध्दा शेतक-यांसाठी सुरु झाले पाहिजेत. ख-या अर्थाने शासनाचा हा उपक्रम असताना कोणत्या तरी पशुधन विकास अधिका-यांनी एखाद्या गावामध्ये जाऊन वैरण विकास कार्यक्रमाचा फलक लावला आहे असे आपण कोठेतरी पाहिले आहे काय, असा कार्यक्रम करण्यासाठी कोणीच डॉक्टर्स गेले नाहीत या बाबतीत तर आपल्याही अधिका-याने अचानक भेट देऊन आपला पशुधन विकास अधिकारी तेथे जातो किंवा नाही हे तपासले पाहिजे. जिल्हा आरोग्य अधिकारी कोण आहेत ? आपण कधी त्या गावामध्ये गेला आहात काय, गावामध्ये संकरीत गायींचा किंवा म्हशीचा मेळावा गावामध्ये घेतला आहे काय, एखाद्या गावामध्ये दूध वाढले पाहिजे यासाठी काही उपक्रम राबविला आहे काय ? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, त्यांनी जिल्ह्याच्या पशुसंवर्धन विकास अधिका-यांची यासंबंधी दोन वेळा भेट घेतली. त्यांनी जिल्हा स्तरावर अहवाल पाठविला नाही ही वस्तुस्थिती आहे. तालुकास्तरावर अहवाल पाठविला आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा आरोग्य अधिकारी यांना पंचायत समिती स्तरावर भेटी द्याव्या लागतात. वर्षातून किती भेटी दिल्या पाहिजेत.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारीयांनी समितीस विदित केले की एक महिन्यामध्ये ६ ते ८ वेळा भेटी देण्यात येतात. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, एवढ्या भेटी होत नाहीत. समितीने सहा जिल्ह्यांना भेटी दिलेल्या आहेत त्यावेळी एवढ्या भेटी दिल्याचे समितीला आढळून आलेले नाही. कॅफो, मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, यासह सर्व विभागप्रमुखांना किती भेटी द्यायच्या आहेत हे नियमानुसार ठरविण्यात आलेले आहे. किमान तेवढ्या तरी भेटी विभागप्रमुखांनी दिल्य पाहिजेत. तेवढया सुध्दा भेटी अधिकारी देत नाहीत हे दुर्देव आहे. समिती पंचायत समितीला भेट देते तेव्हा विभागप्रमुख येत नसल्याची माहिती स्थानिक लोक देतात. जिल्ह्यात भेट देऊ शकत नाही. हा गभीर विषय आहे. जनावर शासनाने दिले असेल किंवा त्या मालकाने विकत घेतले असेल. त्या जनावराची तपासणी करण्यासाठी शासनाचा किंवा जिल्हा परिषदेचा पशुवैद्यकीय अधिकारी नियुक्त करण्यात येतो. हे पशुवैद्यकीय अधिकारी त्याची जेथे नियुक्ती केलेली असते तेथे राहत नाहीत. ते शहरात राहतात. वरिष्ठ पशुअधिका-यांना विचारुन, त्यांच्या अनुमतीने जनावरांवर औषधोपचार करण्यात यावा अशा आशयाचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, श्रेणी-१ व श्रेणी -२ अशा प्रकारचे पशुवैद्यकीय दवाखाने असतात. श्रेणी-२ च्या दवाखान्यासाठी पशुधन पर्यवेक्षक असतात. त्यांनी श्रेणी-१ चे पशुधन विकास अधिकारी यांच्या सल्ल्याने उपचार करावेत असे शासनाचे निदेश आहेत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, पशुधन विकास अधिकारी उपलब्ध होत नसेल तर तो पर्यंत त्या पशुधन पर्यवेक्षकाने काय करायचे एखाद्या जनावराला विषबाधा झाली किंवा त्याचा पाय मोडला किंवा एखादी म्हैस जनावराला जन्म देत असताना काही अडचण निर्माण झाली तर त्यावेळी त्या पशुधन पर्यवेक्षकाने हाताची घडी घालून गप्प बसायचे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, पशुधन विकास अधिकारी यांचा सल्ला घेतो.

यावर समितीने अशी विचारणा केली की, ज्या अधिक-याने अभिलेख उपलब्ध करुन दिलेला नाही त्यासंबंधी सचिवांचे काय म्हणणे आहे, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, यात चूक झालेली दिसते. त्यांनी भेट दिलेली आहे. त्याचा रिपोर्ट तालुका स्तरावर उपलब्ध आहे. पण ज्यांनी त्यांचा रिपोर्ट तीन महिन्यांतून एकदा जिल्हा परिषदेकडे पाठविणे आवश्यक होते. तो त्यांनी पाठविलेला नाही हे सिध्द झालेले आहे त्यामुळे त्यांना ताकिद देण्यात आली आहे. तसेच भविष्यात अशी चूक झाली तर ती बाब गंभीरपणे घेण्यात येईल अशी देखील नोंद करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेला रिपोर्ट कळविण्यात आलेला नाही म्हणजे तालुका स्तरावर देखील रिपोर्ट नव्हता अशी शंका समितीला आहे. उपलब्ध कागदपत्रावरुन तालुका स्तरावर रिपोर्ट होता हे स्पष्ट होत आहे. मुख्य कर्यकारी अधिकारी यांनी तालुका स्तरावरुन रिपोर्ट वेळेवर कसा येईल हे पाहिले पाहिजे. यावर समितीने असे निदेश दिले की, संबंधित अधिका-याला ताकिद न देता जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर कारवाई करावी व तत्संबंधीचा अहवाल समितीला १५ दिवसांमध्ये सादर करावा. यात अनियमितता झालेली आहे असे स्पष्ट म्हटलेले आहे तेव्हा संबंधितांवर कारवाई झाली पाहिजे. या प्रकरणाची पुन्हा तपशीलवार चौकशी करुन कारवाईसह १५ दिवसांत समितीला अहवाल सादर करावा.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायत समिती, सिन्नर (जि.नाशिक) या ठिकाणी पशुसंवर्धन विभागामार्फत सन २००८-०९ या आर्थिक वर्षात ५० टक्के अनुदानावर दुधाळ जनावरांचे गट वाटप योनजेमध्ये अनियमितता झाल्याचे दिसून येते. कारण शासन निर्णयानुसार लाभार्थ्यांकडून ५०% हिस्सा जमा न करता शासनाचे ५० टक्के अनुदान विक्रेत्यांना धनादेशाद्वारे प्रदान करण्यात आले आहे. तसेच लाभार्थ्यांची निवड करताना त्यांचे गाव दुध संकलन मार्गावर असावे व त्या गावासाठी डेअरी कार्यान्वित होवून विपणनाची सोय उपलब्ध असावी अशी अट असताना सदर अटींचे उल्लंघन झालेले आहे. लसीच्या मात्रा व जंतुनाशक १००% अनुदानावर पुरवून त्याबाबतची पुर्तता केली असल्याचा अहवाल नस्तीसोबत जोडण्यात आलेला नाही. दुधाळ जनावरांच्या खरेदी प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आढळून येत नाही. कारण लाभार्थ्यांने ५०% स्वतःच्या हिश्याची रक्कम व्यापा-यांना कशाप्रकारे व किती रुपये दिली व सर्व जनावरांच्या किंमती समान व एकसारख्या असणे दुरापास्त आहे. शेतक-याने/लाभार्थ्यांने दुधाळ जनावरे खरेदी केल्यानंतर किमान २ वर्षे ते त्याच्याकडेच असणे आवश्यक आहे, याकरिता जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी सदर जनावरांच्या अस्तित्वासंदर्भातील अहवाल दर ३ महिन्यांनी जिल्हा पशुधन अधिकारी यांना देणे बंधनकारक असताना तशी कार्यवाही झालेली नाही व त्याचा अभिलेख समितीला सादर न करता केवळ मौखिकरित्या होकारार्थी उत्तर दिल्याने सर्व काही सुव्यवस्थित असल्याचे दिसून येत नाही. आणखी दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे तीन जनावरांचा मिळून एक गाय गट किंवा म्हैस गट अवघ्या ४८ हजार रुपयांमध्ये विकत घेतला जाणे हे उत्तर अतिशोक्तीपूर्ण वाटते कारण या किंमतीमध्ये बाजारात दुधाळ जनावरे मिळणे अवघड आहे. लाभार्थ्यांकडून थेट कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गायी खरेदी केल्याबद्दलची पावती देण्यात आली आहे. मात्र सदर खरेदी तालुकास्तरीय खरेदी समितीमार्फत केलेली नाही. तसेच **जनावरे खरेदी करतेवेळीची छायाचित्रे अथवा जनावरांचे वय, दूध देण्याची क्षमता, वाण इत्यादी बाबतचे वर्णन समितीला सादर करण्यात आलेले नाही. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी व त्यात सर्व संबंधीत दोषींवर जबाबदारी निश्चित करुन त्याबाबतचा सर्वंकष अहवाल समितीसमोर तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, नाशिक

## नैसर्गिक आपत्ती खर्चाबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.४६८ (सन २००८-२००९) :**

जिल्हा परिषद, नाशिक अंतर्गत पंचायत समिती दिंडोरी, तालुका दिंडोरी यांनी सन २००८-०९ मध्ये रक्कम रु. २,३३,७३४/- खर्च नोंद केला आहे.

शासकीय टँकर एम.डब्ल्यू.एन-२०८२ व्दारे म्हसरुळ येथील उद्‌भवावरुन ढंकाबे येथे दिनांक १९/०३/२००८ पासून दररोज तीन ट्रिपा व मानोरी दि. ३/०५/२००८ पासून दररोज १ ट्रिप तसेच टँकर एम.डब्ल्यु.एन. १४१६ व्दारे रडतोंडी (ननाशी) येथे गट क्र. १५१ येथून दररोज ३ ट्रीप पाणी पुरवठा करण्यात आला आहे. याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने पाण्याच्या टँकरची लिटरची क्षमता व त्याप्रमाणे ट्रिपा व पाणी वाटप याबाबतचे आदेश नाहीत. त्यामुळे पाणीपुरवठा योग्य असल्याची खात्री करता आली नाही.

(२) रडतोंडी येथे प्रस्तावानुसार २ ट्रिपांची आवश्यकता असतांना गटविकास अधिकारी यांचे दिनांक १३/०६/२००८ चे आदेशात ३ ट्रिपा पाणीपुरवठा करण्याचे आदेश आहेत. त्यानुसार दिनांक १४/०६/२००८ ते दि. १/०७/२००८ या कालावधीत ३ ट्रिपा प्रमाणे पुरवठा केला आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

(३) टँकरव्दारे पाणीपुरवठा करताना प्रति टँकर पाणी क्षमता नमूद नाही.

(४) शासन परिपत्रक क्र.टंचाई/१००५/प्र.क्र.३०५/पाणीपुरवठा-१४/दि. २४/०१/२००६ मधील मुद्दा क्रमांक ७ नुसार नोंदवही ठेवलेली नाही. तसेच मुद्दा क्रमांक ६ नुसार पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने नामनिर्देशित केलेल्या सहका-यांच्या स्वाक्ष-या पाणीपुरवठा झाल्याबाबतच्या घेण्यात आलेल्या नाहीत. त्यात दिनांक २४/०३/२००८पासून प्रति ट्रिप एका ग्रामस्थाची स्वाक्षरी घेतली आहे. परिपत्रकानुसार कार्यवाही केलेली नाही.

(५) मा. विभागीय आयुक्त नाशिक विभाग यांचे परिपत्रक क्र म.शा./कार्या २/टंचाई/ ३/२२८६२/ ६५३८/२००८ दि.१७/४/२००८ नुसार गट विकास अधिकारी/तहसिलदार यांनी तपासणी करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. परंतु तशी कार्यवाही केलेली नाही.

(६) लॉगबुकात ट्रिपानिहाय वेळ व दिनांक नाही.

(७) शासकीय टँकरची सरासरी बाब प्रमाणित केलेली नाही.

(८) टँकर एम.डब्ल्यू.एन.२०८२ च्या लॉगबुकात मा.तहसिलदार यांनी शेरा रकान्यात नोंद घेतली असून त्यात सदर टँकर ११.३० पर्यंत ढंकाबे १ ट्रिप, मानोरी एक ट्रिप व तिसरी ट्रिप ढंकाबे जात असल्याचे नमुद आहे. प्रत्यक्ष लॉग बुकात १ ली व २ री ट्रिप म्हसरुळ ते ढंकाबे अशी असून ३ री म्हसरुळ ते मानोरी अशी नोंद आहे. तसेच तलाठी ढंकाबे यांनी दि २४/०७/२००८ रोजी १२ वाजता ढंकाबे येथे दोन ट्रिप व ट्रँकर इंधन भरण्यासाठी दिंडोरी गेल्याची नोंद आहे. लॉगबुकात ३ री ट्रिप मानोरी ४ ट्रिप्स ढंकाबे व नंतर दिंडोरी येथे इंधन भरण्यासाठी गेल्याची नोंद आहे. वापरत १९ वाजता म्हसरुळ येथे पोहचल्याची नोंद आहे. प्रत्यक्ष भेटी नमुद शेरा व टँकर फिरती यामध्ये तफावत आहे.

(९) श्री. हिरामण काशीनाथ भुसारे, खदाळे यांचे गट नं. १२ अ ची विहिर अधिग्रहीत दि. २२/०५/२००८ पासून केली आहे. त्यात प्रतिदिन रु. ३००/- प्रमाणे रु. १७,१००/- प्रदान केले आहे. सदर विहीरी वरुन कोणते भागास/गावात पाणी पुरवठा केला याबाबत नस्तीसोबत अभिलेखे नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) शासकीय टँकर क्रमांक एमडब्ल्युएन-२०८२ व टँकर क्रमांक एमडब्ल्यु एन-१४१६ ही सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ट्रक असुन त्यांचे वर साधारणतः ९००० लिटर क्षमतेची टाकी बसविण्यात आलेली होती. सदर टँकरचे क्षमतेबाबत दाखला जोडला आहे. तसेच गाव टँकर मंजुरीचे आदेश सोबत जोडण्यात येत आहे.

(२) मौजे रडतोंडी अंतर्गत हनुमानवाडी लोकसंख्या ९९ इतकी असुन सदर पाडा रडतोंडी अंतर्गत येत असल्याने तेथील पाणी टंचाई निवारणार्थ एक ट्रिप वाढवून देण्याबाबतचे गट विकास अधिकारी पं.स.दिंडोरी यांचे पत्र क्र. पसदि/टंचाई/२०५ दि १३/०६/२००८समवेत पत्र जोडले आहे.

(३)शासकीय सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ट्रकवर तात्पुरत्या स्वरुपात साधारणतः ९००० लिटर पाण्याची टाकी बसविण्यात येऊन पाणीपुरवठा करण्यात आलेला आहे. समवेत क्षमतेबाबतचा दाखला जोडला आहे.

(४) शासकीय टँकरच्या लॉगबुकात त्यावेळी गावात टँकर खाली करण्यात येतो त्या वेळेस उपस्थित ग्रामस्थ यांच्या स्वाक्ष-या घेण्यात आलेल्या आहे. तसेच ग्रामसेवक यांनी प्रतिस्वाक्षरी केलेली आहे. लॉगबुकाच्या छायांकित प्रती सोबत जोडल्या आहेत. पाणी पुरवठयाबाबत कुणाचीही तक्रार नाही. परिपत्रकानुसार कार्यवाहीबाबत नोंद घेण्यात येत आहे.

(५) तहसिलदार यांनी दिनांक ०३/०७/२००८ रोजी ढंकाबे व मानोरी येथे भेट दिल्याची नोंद टँकर क्र. एमडब्ल्युएन-२०८२ च्या लॉगबुकामध्ये घेतलेली आहे. सदर लॉगबुकाची छायांकित प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

(६) टँकरच्या लॉगबुकामध्ये गाव निहाय ट्रिपनिहाय वेळ व दिनांक ची नोंद घेणे बाबत ग्रामसवेक व वाहनचालक यांना लेखी सुचना करण्यात येवुन त्यानुसार कार्यवाही करणेबाबत कळविणेत आले होते. यापुढे टँकरग्रस्त गावांना भेटीच्या वेळी लॉगबुकात वेळ व दिनांक नोंद केली किंवा नाही याची तपासणी करणेची दक्षता घेण्यात येईल.

(७) टँकर क्रमांक एमडब्ल्यूएन-२०८२ हा सपाट भागात पाणीपुरवठा करीत होता. त्यामुळे प्रतिकिलोमीटर सरासरी ३.०० कि.मी. दर्शविण्यात आलेली आहे. टँकर क्रमांक एमडब्ल्यू एन १४१६ हा डोंगराळ व घाटाच्या रस्त्याने पाणीपुरवठा करीत असल्यामुळे प्रति किलोमीटर सरासरी २.५० कि.मी. दर्शविण्यात आलेली आहे. सदरच्या टँकरची बाब ही विभागाने प्रमाणीत केली आहे. सोबत लॉगबुकाची छायांकित प्रत जोडली आहे.

(८) दिनांक ३.७.२००८रोजी मा.तहसिलदार यांनी टँकर क्रमांक एमडब्ल्यू एन २०८२ च्या लॉगबुकात नोंदविलेला शे-यानुसार ढंकाबे येथे १ ट्रिप व मानोरी येथे १ ट्रिप केली असलेची नोंद केली आहे व तिसरी ट्रिप ढकांबे येथे जात आहे. टँकर चालक यांना विचारल्यानुसार मा.तहसिलदार यांनी लॉगबुकात शेरा नोंदविलेला आहे. तथापि वाहनचालक यांनी सदरील नोंदी लॉगबुकात करताना त्यांचे सोयीनुसार प्रथमतः २ ट्रिपा ढंकाबे व तिसरी ट्रिप मानोरी येथे केली आहे.

दि. २४.७.२००८ रोजी तलाठी १२.०० वाजता ढकांबे येथे ट्रिपा झाले बाबत व टँकर इंधन भरणे करीता दिंडोरी येथे गेला आहे. असा शेरा नमूद केला आहे. तथापि टँकर वाहनचालक यांनी सदरील नोंदी लॉगबुकात करतांना त्यांनी केलेल्या फिरतीनुसार केलेल्या आहेत.

(९) श्री. हिरामण काशिनाथ भुसारे, खदाळे गट नंबर १२-अ मधील खाजगी विहीर तहसिलदार, दिंडोरी यांचेकडील आदेश क्र. टंचाई/वशि/२१५/०८, दि. १७/०५/२००८ अन्वये अधिग्रहीत करण्यात आलेली असुन तशी नोंद ग्रामसेवकांच्या विहीर अधिग्रहरण नोंदवहीत घेण्यात आली आहे. सदरील विहीर मौजे साद्राळे येथील पाणी टंचाई निवारणार्थ अधिग्रहीत केलेली आहे. तरी शक स्विकृत होणेस विनंती.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ मे, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पाणीपुरवठा करणा-या टँकरची क्षमता प्रमाणित केल्याचे प्रमाणपत्र व पाणी वाटपाचे आदेश लेखापरिक्षणास त्याचवेळी का उपलब्ध केले नाहीत, रडतोंडी यांच्या प्रस्तावानुसार टँकरच्या २ खेपांची मागणी असताना गट विकास अधिकारी यांनी ३ खेपांसाठी आदेश कोणत्या प्राधिकारान्वये दिले, शासन परिपत्रक दि.२४.०१.२००६ नुसार टंचाई काळात होणा-या पाणी पुरवठ्याची उद्‌भव नोंदवही का ठेवण्यात आली नाही, यावर कार्यकारी अभियंता यांनी समितीस विदित केले की, हे काम सन २००८-०९ चे असल्यामुळे त्यावेळी कोणता कायदा होता त्यानुसार दंड करावा लागेल. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, हे संशयास्पद आहे. २ खेपांची मागणी असताना ३ खेपा का कराव्या लागल्या, यावर कार्यकारी अभियंता यांनी समितीस विदित केले की, दिंडोरी पंचायत समिती अंतर्गत मुद्दा आहे. हा ग्रामीण पाणी पुरवठा आहे. २ खेपांचा मुद्दा आहे. दिंडोरी तालुक्यात रडतोंडी गाव आहे, तेथे २ खेपा मंजूर झाल्या होत्या. मात्र रडतोंडी गावातच एक हनुमानवाडी आहे. त्यासाठी खेप ट्रिप वाढवून दिली आहे. त्या संदर्भातील आदेशही आहेत. ९९ एवढी

त्या आदिवासी वाडीची लोकसंख्या होती. त्यामुळे वाटप केले आहे. त्याचे आदेश आहेत. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, कोणत्या तारखेचे आदेश आहेत. यावर कार्यकारी अभियंता यांनी समितीस विदित केले की,दिनांक १३.०६.२००८ चे आदेश आहेत. टंचाई कालावधीसाठी हे दिले आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, एकूण खेपा किती दिवसांत किती झाल्या आहेत. यावर कार्यकारी अभियंता यांनी समितीस विदित केले की, या संदर्भातील सविस्तर माहिती पंचायत समितीकडे उपलब्ध आहे. यावर गट विकास अधिकारी, पंचायत समिती, ईगतपुरी यांनी समितीस विदित केले की, दि.१४.०६.२००८ ते दि.०१.०७.२००८ या १६ दिवसांच्या कालावधीतखेपा झाल्या आहेत. लोकांकडून मागणी आल्यामुळे १६ खेपा अधिकच्या झाल्या आहेत. शासकीय टँकरने या ट्रिप झाल्या आहेत. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी समितीस विदित केले की, एका खेपेची किती रक्कम अधिकची झाली होती. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, ईगतपुरी यांनी समितीस विदित केले की, शासकीय टँकर असल्यामुळे आपण डिझेलचे पैसे देतो. प्रति दिन २४ कि.मी. असे एकूण ७३० कि.मी.साठी डिझेल देण्यात आले. यावर समितीने असे निदेश दिले की, अनियमिततेच्या संदर्भात नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**नैसर्गिक आपत्ती खर्चाबाबतः-**

१) दिंडोरी पंचायत समिती अंतर्गत पाणी पुरवठा करणा-या टँकरची लॉगबुकनुसार प्रत्यक्ष ट्रिपा व तहसिलदार यांच्या लॉगबुकमधील शे-यानुसारच्या ट्रिपा यामध्ये तफावत आढळून येणे, गावाची लोकसंख्या केवळ ९९ असतांना दोन ट्रिपची मागणी असताना तीन ट्रिप कोणत्या आदेशाने दिल्या?

२) टंचाईग्रस्त गावाची प्रत्यक्ष भेट देवुन गटविकास अधिकारी यांनी तपासणी केल्याचे कोणते अभिलेख आहेत या संपूर्ण विषयाबाबत सखोल चौकशी करण्याचे निदेश आहेत याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे?

३) नैसर्गिक आपत्ती खर्च निवारण, टँकरने पुरवठा करताना उक्त प्रकरणासारख्या अनियमितता होऊ नये याकरीता शासनाचे आदेश काय आहेत?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

दिंडोरी पंचायत समिती अंतर्गत, ननाशी या ग्रामपंचायती अंतर्गत रडतोंडी या गावातील पाणी टंचाईच्या अनुषंगाने उप विभागीय अधिकारी, नाशिक यांनी त्यांच्या दिनांक १२.०६.२००८ च्या आदेशान्वये सदर गावाच्या एकुण ३७१ एवढया लोकसंख्येसाठी टँकर मंजुरीचे आदेश निर्गमित केले होते.

रडतोंडी या गावातील पाणी टंचाईच्या अनुषंगाने त्यांनी मागणी केलेल्या प्रस्तावामध्ये रोज टँकर्सच्या २ खेपाबाबत मागणी केली होती. तथापि, या मागणीमध्ये सदर गावाच्या नजीक १ कि.मी. अंतरावरील ९९ लोकसंख्या असलेल्या या वस्तीसाठी पिण्याच्या पाण्याच्या मागणीचा उल्लेख सदर मागणी मध्ये नव्हता.

तथापि, उप विभागीय अधिकारी, नाशिक यांच्या दिनांक १२.०६.२००८ च्या आदेशाच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी, दिंडोरी यांनी त्यांच्या दि. १३.०६.२००८ च्या आदेशान्वये सदर रडतोंडी गावासाठी टँकर्सच्या ३ खेपा मंजुर केल्या. सदर गावाच्या मागणीनुसार २ खेपा मंजुर असताना गट विकास अधिकारी यांनी त्यांच्या अधिकारात ३ खेपा मंजुर केल्या.

दिनांक १४/०६/२००८ ते १/७/२००८ या कालावधीत शासकीय टँकर लावण्यात आला होता व सदरच्या टँकरच्या एक दिवसाला एक फेरी या प्रमाणे १६ दिवसात १६ फे-या करण्यात आल्या असुन त्यांचे एकुण अंतर कि.मी.७३० आहे. त्या करीता १८३ लिटर इतके डिझेल लागले असुन त्याचा एकुण खर्च रुपये ६९५९/- इतका झाला आहे.

तत्कालीन गट विकास अधिकारी यानी त्यांच्या अधिकाराचा दुरुपयोग करुन टँकरची १ अतिरिक्त खेप मंजुर केली असल्याने त्यांच्याकडून उपरोक्त नमुद खर्चाची रक्कम रु.६९५९/- वसुल करुन चलनाद्वारे शासन खाती जमा करण्यात आली आहे.

तसेच भविष्यात अशा प्रकारे अधिकाराचा दुरुपयोग न करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी तत्कालीन गट विकास अधिकारी यांना सक्त ताकीद दिली आहे.

(२) मौजे ननाशी पैकी रडतोंडी या गावाची तहसिलदार, दिंडोंरी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, दिंडोंरी व उप अभियंता, ल.पा.दिंडोरी यांनी दिनांक ३०.४.२००८ रोजी संयुक्त पहाणी केली असुन त्याबाबतचा अहवाल प्राप्त आहे.

मौजे ननाशी पैकी रडतोंडी या गावात उपलब्ध साधनांना अतिशय कमी प्रमाणात पाणी असुन सदरचे पाणी गावांसाठी कमी पडते. त्यामुळे सदर गावांत टँकरने पाणी पुरवठा करणे आवश्यक असल्याचे प्रत्यक्ष पाहणीअंती आढळुन आले.

(३) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक : टंचाई १०९९/प्र.क.१२/पापु-१२, दिनांक ३.२.१९९९ मध्ये नमुद केल्यानुसार टंचाई अंतर्गत उपाययोजना घेतांना अनियमितता होऊ नये या साठी खालीलप्रमाणे सूचना दिल्या आहेत.

" टंचाई निवारणार्थ उपाययोजना घेतांना त्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येत असलेल्या निधीचा विनियोग योग्य प्रकारे होत असल्याची व या उपाययोजनांमुळे संबंधित गावांत/वाडयांत खरोखर पाणी मिळत असल्याची दक्षता, जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एक किंवा आवश्यकतेनुसार अधिक तपासणी पथके गठीत करुन या पथकांकरवी वेळोवेळी क्षेत्रीय तपासण्या करुन घ्यावी. याशिवाय विभागीय आयुक्तांनी देखील विभागीय स्तरावरुन टंचाई कार्यक्रमांच्या अमंलबजावणीवर कडक पर्यवेक्षण करण्याच्या दृष्टीने विभागीय स्तरावर स्वतंत्र तपासणी पथक स्थापन करावे व त्यांच्या माध्यमातुन टंचाई कार्यक्रम व्यवस्थितपणे राबविण्यात येत आहे किंवा कसे याचीखात्री करावी व निधीचा दुरुपयोग होत असल्याचे आढळुन आल्यास, संबंधितांवर कारवाई करावी.

शासन परिपत्रक दिनांक २४.०१.२००६ अन्वये पिण्याच्या पाण्याचे टँकर लावण्याबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

तसेच आता राज्यातील ग्रामीण व नागरी भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घ्यावयाच्या उपाययोजनांबाबत टँकरने पाणीपुरवठा करण्याबाबत दिनांक ४ जानेवारी ,२०१४ च्या परिपत्रकान्वये खालील प्रमाणे सुचना दिल्या आहेत.

टँकरच्या फे-या नियोजित वेळापत्रकाप्रमाणे निर्धारित वेळेत होत नाहीत व टँकरच्या बनावट फे-या दर्शवून त्यासाठी रकमेची आकारणी केली जाते असे गैरप्रकार टाळण्याच्या दृष्टीने पाणी पुरवठा करणा-या टँकरवर जी.पी.एस. प्रणालीचा वापर करण्यात यावा, त्याच्या पर्यवेक्षणाकरीता जिल्हयाच्या ठिकाणी एका नोडल अधिका-याची नेमणूक करण्यात यावी असे बंधनकारक करण्यात आले आहे.

त्यानुसार सद्यःस्थितीत राज्यात पाणीपुरवठा करण्यासाठी वापरात असलेल्या खाजगी टँकर्सवर जी.पी.एस.प्रणाली लावण्यात येते.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**पाणीपुरवठा व स्वच्छताविभागाचे अभिप्राय :**-जिल्हा परिषद नाशिक यांनी दिलेल्या अभिप्रायाशी सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नाशिक जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीला अतिरिक्त मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी अशी माहिती दिली की, यातील पहिल्या विषयामध्ये नाशिक जिल्हयातील दिंडोरी तालुक्यामध्ये गटविकास अधिका-यांनी एका गावामध्ये टँकरच्या दोन खेपा मंजूर असताना ३ खेपा दिल्या, एवढा त्यांनी कसूर केला आहे. जिल्हा परिषदेमार्फत त्यांना ताकिद देऊन चौकशी करण्यात आली. सदरच्या टँकरच्या १ दिवसाला १ फेरी या प्रमाणे १६ दिवसात १६ फे-या करण्यात आल्या. जवळपास ७००० रुपये एवढा अनाठायी खर्च झाला होता, याचा भरणादेखील त्यांनी केला आहे. शासनाच्या धोरणानुसार गटविकास अधिकारी, तहसिलदार आणि उप अभियंता या तिघांनी गावाची तपासणी केली पाहिजे आणि प्रांतामार्फत जिल्हाधिका-यांच्या आदेशास्तव एका गावामध्ये टँकर द्यायचे आहे. त्यानुसार या गावामध्ये टँकरची परवानगी देण्यात आली होती. यासाठी २ खेपा मंजूर करण्यात आल्या होत्या. पण या गावाला लागून १०० लोकसंख्येची एक वाडी होती तर त्यावेळी ती वाडी कोणाच्या लक्षात आली नव्हती. गटविकास अधिका-यांना जेव्हा हे लक्षात आले तेव्हा त्यांनी यासाठी एक वेगळी खेप मंजूर केली. त्यांना अधिकार नसताना त्यांनी ही खेप मंजूर केली. त्यामुळे त्यांना समज देऊन त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. लोकांना पाण्याची तातडीची आवश्यकता असल्यामुळे त्यांनी ही मंजुरी दिली होती.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, दोन खेपा आधीच मंजूर होत्या तर तुम्ही वाडीसाठी एक तीसरी खेप मंजूर करण्यात आली या बद्दल दुमत नाही पण त्या तीन खेपा जनतेच्या वापरात आल्या काय, की अभिलेख्यांमध्ये आले आहे. कारण महाराष्ट्रात अशी अनेक प्रकरणे घडलेली आहेत की, दोन खेपा टाकायच्या आणि तीन लिहायच्या. एका टँकरमध्ये २००० लिटर लिहिले आहे आणि त्याची मोजणी केली तर कमी क्षमतेचा असायचा. त्यामुळे या केसमध्ये आपण तपासले पाहिजे की, हे तीनही टँकर जनतेला उपयोगी पडले आहेत काय, परवानगी न घेता त्यांनी ही खेप मंजूर केलेली आहे आणि ती फक्त पेपरवर आली आहे. यावर अतिरिक्त मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, रेकॉर्डवरुन असे दिसते की, एका टँकरच्या २ खेपांची परवानगी होती तर त्यांनी ३ खेपांची परवानगी दिलेली आहे. ही खेप वाढविण्याचे त्यांना अधिकार नव्हते म्हणुन त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. १६ दिवस १६ खेपा जास्त झाल्यामुळे जो काही डिझेलचा खर्च झालेला आहे त्याचा त्या गटविकास अधिका-यानी भरणा केलेला आहे. सन २०१४ मध्ये शासनाने निर्णय काढलेला आहे की, प्रत्येक टँकरवर जीपीएस बसविण्यात आले आहे.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, हा पिण्याच्या पाण्याचा विषय असल्यामुळे महत्वाचा विषय आहे. यात काही आक्षेपार्ह गोष्टी आल्या असतील पण ज्यांनी जे काम केले आहे ते गावाच्या हितासाठीच केलेले आहे. त्या गटविकास अधिका-यावर काही कारवाई केली आहे काय, यावर अतिरिक्त मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, समज देण्यात आली आहे. यावर समितीने विचारणा केली की, या तीनही टँकरचा योग्य वापर झाला आहे असे समिती गृहीत धरते. त्या गटविकास अधिका-याने चांगलेच काम केले असेल त्यामुळे त्याला कारवाईपासून थोडे बाजूला घ्या. यावर अतिरिक्त मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, त्या अधिका-याने कारवाई करण्यासारखे एवढे काही चुकीचे काम केलेले नाही. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, समितीच्या म्हणण्याप्रमाणे त्या अधिका-याला कारवाईपासून बाजूला ठेवा आणि प्रोत्साहन द्या.

## अभिप्राय व शिफारशी

नाशिक जिल्हा परिषदेअंतर्गत पंचायत समिती, दिंडोरीद्वारे सन २००८-०९ मध्ये शासकीय टँकरमधून ढंकाबे व रडतोंडी (ननाशी) या ठिकाणी पाणी पुरवठा करण्यात आला. यासाठी रक्कम रुपये २,३३,७३४/- एवढा खर्च करण्यात आला आहे. दिनांक १९ मार्च, २००८ पासून शासकीय टँकरद्वारे म्हसरुळ उद्‌भववावरुन ढंकाबे येथे दररोज तीन फे-या व दिनांक ३ मे, २००८ रोजी मानोरी पासून १ फेरी तसेच रडतोंडी (ननाशी) येथे दररोज ३ फे-या टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला आहे. नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यामध्ये गट विकास अधिका-यांनी एका गावामध्ये टँकरच्या दोन खेपा मंजूर असताना व त्यांना कोणताही अधिकार नसताना त्यांनी दोन खेपांऐवजी ३ खेपा करण्यास मान्यता दिली. परंतू या तीन खेपा खरोखररीत्या जनतेच्या वापरात आल्या किंवा कसे, की याबाबत केवळ अभिलेख्यावर आले आहे याचा बोध होत नाही. टँकरच्या पाणी क्षमतेचा देखील स्पष्टपणे उल्लेख केल्याचे आढळून आलेले नाही. २ खेपांऐवजी ३ खेपा करण्यास परवानगी दिल्याप्रकरणी संबंधित गट विकास अधिका-याकडून केवळ १६ खेपा जास्त झाल्या म्हणून या प्रकरणी केवळ इंधनाचा खर्च भरणा करुन घेतल्याने प्रकरण संपत नाही. कारण जरी गट विकास अधिका-याने पाणीपुरवठा सुयोग्य पध्दतीने होण्याच्या उद्देशाने परवानगी दिली असली तरी प्रत्यक्षात स्थानिक जनतेला पाणी पुरवठा योग्य व पुरेशा प्रमाणात झाला आहे किंवा कसे याचा लेखाजोखा कोठेही आढळून आलेला नाही. **टँकरच्या लॉगबुकामध्ये गावनिहाय व खेपनिहाय वेळ व दिनांकाची नोंद घेऊन प्रत्यक्षात पाणीपुरवठा झाल्याबाबत शासन परिपत्रकानुसार पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने नामनिर्देशित केलेल्या सहका-यांच्या स्वाक्ष-या घेणे बंधनकारक असल्याबाबत नमुद केलेले असताना तसे न करता गावात टँकर मधील पाणी खाली करताना तेथे उपस्थित असलेल्या ग्रामस्थांच्या स्वाक्ष-या घेणे ही बाब निश्चितच चुकीची आहे व यापुढे ग्रामसेवक व वाहनचालक यांनी टँकरच्या लॉगबुकमध्ये गावनिहाय व खेपनिहाय वेळ व दिनांकाची नोंद करुन घेणे कटाक्षाने पाळण्याबाबत दक्षता घेण्यात यावी. तसेच याकरीता जिल्हा परिषद कार्यालयाने टंचाई कालावधीत संबंधित गावाकरीता पाणी पुरवठा करणारी अद्ययावत प्रणाली विकसित करावी जेणेकरुन टँकरची संख्या व एकूण लोकसंख्या यामध्ये पारदर्शकता व व्यवस्थापन अचूक राहील व गावांत पिण्याच्या पाण्याच्या टँकरच्या एकूण फे-यांची रितसर नोंद घेण्याबाबत आवश्यक ती दक्षता घेण्यात यावी व त्या अनुषंगाने एक सुधारित परिपत्रक सर्व संबंधितांना निर्गमित करावे, व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत पाठवावा अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण चार

## जिल्हा परिषद, नाशिक

## पाणीपट्टी थकीत वसुली

**परिच्छेद क्रमांक ३.८०९ (सन २०११-२०१२) :**

जिल्हा परिषदा ह्या प्रादेशिक पाणीपुरवठयाच्या योजना पुर्णपणे कार्यान्वित झाल्यावर त्या योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करुन पिण्याच्या पाण्यासाठी व औद्योगिक विभागांसाठी वेगवेगळ्या दराने पाणीपट्टी वसुल करतात. पाणीपट्टीच्या रक्कमा ग्रामपंचायतीकडे थकीत राहिल्याचे सन २०११-१२ च्या लेखापरिक्षणातून दिसून आले आहे. याबाबतच्या उणिवा खालील प्रमाणे आहेत.

१) वसूलपात्र रक्कमांबाबत नोंदवहया ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदा परिपुर्ण करीत नाहीत त्यामुळे हिशोब तपासणीत अडचणी येतात. मागील थकबाकी, चालु मागणी व व्याज आणि एकूण थकित रक्कमा याचा आढावा घेऊन रक्कमा वसुलात आणणे आवश्यक असताना याकडे विशेष लक्ष दिले जात नाही.

२) काही जिल्हा परिषदांच्या लघुपाटबंधारे विभागाच्या स्वतंत्र योजना आहेत. तर ज्या ठिकाणी अशा योजना नाहीत त्या ठिकाणी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळामार्फत पाणी पुरवठा जिल्हा परिषदा करतात. त्यांची रक्कम थकित राहिल्याने व्याजरहित व वर्षागणिक रक्कम वाढत आहे. वसुलीसाठी ठोस उपाययोजना जिल्हा परिषदा अंमलात आणत नाहीत.

३) लघुपाटबंधारे विभागाने योजना राबविल्यानंतर त्या योजना जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित करण्यासाठी जास्त कालावधी लागतो. अशा योजनांची वसुली जास्त प्रमाणात जिल्हा परिषदांकडे थकित दिसते. तरी याबाबत योग्य उपाययोजना करुन रक्कमा वसुलात आणणे आवश्यक आहे. सदर थकीत रक्कमा काही कोटी रुपयाहून जास्त आहेत. अशा जिल्हा परिषदांची माहिती उदाहरणादाखल पुढील तक्त्यात देण्यात येत आहे. तरी रक्कम रुपये ४७,६०,९४,८०४/- वसुलात आणणे आवश्यक आहे.

| अ. न. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ९ | नाशिक | ग्रा.पा.पु. | ८ | ७,५८,९५,३९०/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या पाणी पट्टी वसुलीच्या नोंदी जिल्हा परिषद स्तरावर ठेवण्यात आल्या आहेत. वेळोवेळी लेखापरिक्षणास नोंदवहया दाखविण्यात येतात. त्यात थकबाकी व चालु मागणी नमूद करणेत आली आहे. विभागीय व क्षेत्रियस्तरावर वसुलीसाठी पाठपुरावा करण्यात येतो.

२) जिल्हा परिषद, नाशिक अधिनस्त चालविण्यात येत असलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांमधून महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळामार्फत जिल्हा परिषद, नाशिक पाणी पुरवठा करत नाही. त्यामुळे पाणी पट्टीची चालू व मागील थकीत मागणी नाही.

३) लघुपाटबंधारे विभागाने योजना राबविल्यानंतर जिल्हा परिषद नाशिककडे हस्तांतरित करण्यात आलेल्या नाहीत. पाणी पुरवठा योजना जिल्हा परिषद चालवित आहे. जिल्हा परिषद स्तरावरुन पाणीपट्टी वसुलीबाबत पत्रव्यवहार करण्यात येतो. जिल्हा परिषद नाशिककडे थकित पाणीपट्टी सन २०११-१२ मध्ये रक्कम रुपये ७,५८,९५,३९०/- इतकी आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ मे, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ग्रामीण पाणी पुरवठा अंतर्गत एकूण पाणीपट्टी थकबाकी रुपये ७ कोटी, ५८ लक्ष ९६ हजार ३९० रुपये प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत, वसुलीची सद्यःस्थिती काय आहे. पाणीपट्टी वसुली वेळेत व परिणामकारकरित्या होण्याकरिता ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने कोणत्या उपाययोजना केल्या

आहेत. यावर कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा यांनी समितीस असे विदित केले की, प्रादेशिक पाणी पुरवठ्यासंदर्भातील हा मुद्दा आहे. नांदगाव, निफाड आणि देवळा तालुक्यातील एकूण ७७ गावे आणि ७८ वाड्यावस्त्यांची देखभाल दुरुस्ती जिल्हा परिषदेमार्फत केली जाते. यावर समितीने अशी विचारणा केली की, थकबाकी राहिलेली रक्कम मिळाली आहे काय तसेच ७ कोटी रुपयांच्या रकमेच्या वसुलीबाबत सद्यःस्थिती काय आहे. यावर कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांनी समितीस असे विदित केले की,थकबाकी राहिलेल्या रक्कमेच्या वसुलीच्या संदर्भात जिल्हा परिषद प्रयत्न करीत आहे. सद्यःस्थितीत ७ कोटी १६ लाख ८१ हजार ७८५ रुपयांची थकबाकी शिल्लक आहे. ही थकबाकी १९९८ पासूनची आहे. मागील वर्षीपासून करांची वसुली ९३ टक्क्यांपर्यंत गेली आहे. तसेच करांची थकबाकी ७५ टक्क्यांपर्यंत आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, सर्वात जास्त थकबाकी नांदगाव तालुक्यातील ५६ गावांमधील आहे. तेथील नळ पाणीपुरवठा योजना सुरु नाहीत का, तेथील लोकांना पाणी मिळत नाही का, या संदर्भात त्यांना काय अडचणी आहेत. यावर कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांनी समितीस असे विदित केले की,नांदगावला ३.४० रुपयांप्रमाणे आकारणी केली जाते. ही थकबाकी १९९८ पासून आहे. सद्यःस्थितीत वसुली १०० टक्के होत आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन १९९८ पासून असलेल्या थकबाकीच्या रकमेपैकी एक रुपया सुध्दा वसुली झाली नाही. थोडी रक्कम वसूल झाली असती तर तसे आपल्याला सांगता आले असते. मध्यंतरीच्या काळात वसुलीच्या संदर्भात काही टक्के रक्कम भरल्यास उर्वरित रकमेची सूट अशा प्रकारे शासनाने काही योजना सुरु केल्या होत्या. त्यानुसार आपण वसुलीची कार्यवाही करावयास पाहिजे होती.पाणीपुरवठा करीत असल्यास त्यांच्याकडून थकबाकीची रक्कम वसूल करण्यासंबंधी अधिका-यांनी प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे. ही रक्कम फार मोठी आहे. समितीने अनेक जिल्ह्यांचे दौरे केले परंतु त्या तुलनेत नाशिक जिल्हा परिषदेतील थकबाकीची रक्कम फार मोठी आहे. यावर कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा यांनी समितीस अशी माहिती दिली की, यावर्षी ग्रामपंचायतीत मुद्रांक शुल्कामधून सुध्दा रक्कम वसूल केली आहे. तसेच सदरहू वसुलीबाबत दरवर्षी पंचायत समितीनिहाय आढावा देखील घेतला जात आहे.

यानंतर समितीने असे निदेश दिले की, तेराव्या तसेच चौदाव्या वित्त आयोगात ग्रामपंचायतीकडून सदर रकमेची वसुली करता येईल का, ही बाब तपासून घ्यावी. वीज बिलाच्या थकबाकी संदर्भात संचित योजना सुरु करण्यात आली व ५० टक्के माफी दिली. उर्वरित ५० टक्क्यांच्या संदर्भात असे सांगण्यात आले की, चौदाव्या वित्त आयोगाचे स्वतंत्र खाते उघडून त्या एमएसईबीला जोडावे जेणेकरुन येणारा निधी एमएसईबीला मिळू शकेल. या धर्तीवर यासंबंधी कार्यवाही करता येईल का, ही बाब तपासून घ्यावी. रक्कम मोठी असल्यामुळे गटविकास अधिकारी, सरपंच तसेच ग्रामसेवक व इतर संबंधितांना सूचना देऊन जास्तीत जास्त रकमेची वसुली कशी होईल यासंबंधी कार्यवाही करुन समितीकडे अहवाल सादर करावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) सन १९९८ पासून नांदगाव व ५६ खेडी,दाभाडी व ११ गावे आणि देवळा व ९ गावे,तसेच मनेगाव व १६ गावे या पाणी पुरवठा योजनांची सन २०११-१२ या अहवाल वर्षात पाणी पट्टी थकबाकी ७.५८ कोटी एवढी होती.सद्यःस्थितीत सदर थकबाकी एकूण किती आहे व नांदगाव नगरपरिषदेची थकबाकी किती आहे.

(२) मोठ्या प्रमाणावर पाणीपट्टी थकीत राहिल्यामुळे योजनांची विद्युत देयके,कर्मचारी यांचे वेतन व भत्ते,रसायने,देखभाल दुरूस्ती प्रकाशित होऊन योजना बंद पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.तरी सदर योजनांचा संकल्पन कालावधी किती होता व योजनानिहाय आजपर्यत किती खर्च झालेला आहे,तसेच सद्यःस्थितीत योजनांतून पाणी पुरवठा होत आहे काय.

(३) ज्या ग्रामपंचायतींनी उक्त पाणी पुरवठा योजनांची पाणीपट्टी थकीत ठेवली आहे,त्या ग्रामपंचायतीकडून वसुली करण्याकरीता शासनाने कोणता पाठपुरावा केला आहे.१४व्या वित्त आयोगाच्या अनुदानातून अशी थकीत पाणीपट्टी कपात करण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे.

(४) एकट्या नांदगाव नगरपरिषदेची पाणीपट्टीची थकीत रक्कम जास्त असल्यामुळे त्यांच्या वसुलीकरिता नगरविकास विभागाकडे पाठपुरावा का करण्यात आला नाही.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१) सन १९९८ पासून सदर प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची,सन २०११-१२ या अहवाल वर्षात पाणीपट्टी थकबाकी रू.७.५८ कोटी होती.तथापि,सद्यःस्थितीत माहे मार्च-२०१७ अखेर थकबाकीत वाढ होऊन रु.१०८५.९० लक्ष इतकी आहे.सदर थकबाकीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | योजनेचे नाव | थकीत रक्कम |
|---|---|---|
| १ | नांदगाव व ५६ खेडी प्रादे.पा.पु.योजना | |
| | अ) नांदगाव नगरपरिषद | २४६.७७ |
| | ब) मालेगाव गट | २८६.८२ |
| | क) नांदगाव गट | १५९.८२ |
| २ | दाभाडी व १२ गावे प्रादे.पा.पु.योजना | २७१.१७ |
| ३ | देवळा व ९ गावे प्रादे.पा.पु.योजना | १२१.३४ |
| | एकूण . . | १०८५.९० |

तसेच मनेगाव व १६ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना संयुक्त समितीमार्फत चालविण्यात येत आहे.सोबत थकबाकीचा तक्ता सादर करण्यात येत आहे.

(२) सदर योजनांची पाणीपट्टी थकीत राहील्यामुळे विद्युत देयके,कर्मचारी यांचे वेतन व भत्ते,रसायने,देखभाल दुरुस्ती प्रभावित होऊन योजना बंद झालेल्या नाहीत.सदरचे देयके २० टक्के जि.प.सेस,निधी देखभाल दुरुस्तीमध्ये वर्ग करून तसेच जमा होणा-या पाणीपट्टी मधून अदा करण्यात येतात.सदर योजनांचा संकल्पन कालावधी सन २००६ मध्ये संपुष्टात आला आहे.तसेच योजनानिहाय २००४ ते २०१७ पर्यंतचा आजपर्यंतचा खर्च रू.४६,५२,३९,४१६/-इतका आहे.सदर खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | योजनेचे नाव | खर्च |
|---|---|---|
| १ | नांदगाव व ५६ खेडी प्रादेशिक पा.पु.योजना | ३२८६.४१ |
| २ | दाभाडी व १२ गावे प्रादेशिक पा.पु.योजना | ६४३.१६ |
| ३ | देवळा व ९ गावे प्रादेशिक पा.पु.योजना | ४८४.८४ |
| ४ | मनेगाव व १६ गावे प्रादेशिक पा.पु.योजना | २३७.९९ |
| | एकूण . . | ४६५२.४० |

सोबत खर्चाबाबत तक्ता सोबत सादर करण्यात येत आहे.सद्यःस्थितीत सदर योजनांतून पाणी पुरवठा सुरू आहे.

(३) सदर योजना अंतर्गत ग्रामपंचायतींनी पाणीपट्टी थकीत ठेवली आहे.त्या ग्रामपंचायतीकडून थकीत वसुली करण्याकरिता जि.प.स्तरावरून संबंधित गटास व नगरपरिषदेस वेळोवेळी पत्रव्यवहाराव्दारे कळविण्यात आलेले आहे.तसेच गटस्तरावर वेळोवेळी होणा-या आढावा बैठकींमध्ये देखील सदर वसुली होण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.मा.जिल्हाधिकारी,नाशिक यांना सदर वसुली बाबत कळविण्यात आले आहे.१४ व्या वित्त आयोगाच्या अनुदानातून थकीत पाणीपट्टी वसुल करण्यात येत नाही.

(४) नांदगाव नगरपरिषदेची थकीत पाणीपट्टी रक्कम जास्त असल्यामुळे वसुलीकरीता जिल्हाधिकारी,नाशिक व मुख्यधिकारी,नांदगाव नगरपरिषद यांच्याशी वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात मंत्रालयीन विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**पाणी पुरवठा व स्वच्छताविभागाचे अभिप्राय :-** (१) सहमत आहे.

(२) सहमत आहे

(३) सहमत आहे

(४) नांदगाव नगरपरिषदेकडे थकीत असलेल्या पाणीपट्टी रक्कम वसुलीबाबत नगर विकास विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नाशिक जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीला अतिरिक्त मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी अशी माहिती दिली की, पाणीपट्टीच्या थकीत वसुलीबाबत ब-याच ठिकाणी आढावा घेतला आहे तर ठिकठिकाणी जिल्हा परिषदेमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ज्या प्रादेशिक योजना आहेत त्याची वसुली ग्रामपंचायतीमार्फत होत नाही. वसुली होत नाही तर याबाबत विभाग प्रयत्नशील आहे आणि याबाबत ग्रामविकास विभागाला विनंती करुन लेखी देणार आहे की, यामध्ये ग्रामसेवकांची काहीतरी जबाबदारी निश्चित केली पाहिजे. ग्रामसेवकाची जबाबदारी आहे की, गावामध्ये जेव्हा पाणीपुरवठा केला जातो त्या अनुषंगाने पाणीपट्टी वसूल केली पाहिजे. त्यानंतर ती जिल्हापरिषद किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला भरणा केला पाहिजे. यामध्ये सध्या कारवाई होत नाही त्यामुळे ग्रामपंचायती व नगरपरिषदा पैसे देत नसल्यामुळे अनेक ठिकाणी पैसे प्रलंबित आहेत. ग्रामविकास विभागाला अशी विनंती आहे की त्यांनी ग्रामसेवकांना किती टक्के वसुली झाली पाहीजे याचे काहीतरी उद्दिष्ट ठरवून दिले पाहिजे आणि ती वसुली केली नाही तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल असे निदेश दिले पाहिजेत.

यावर समितीने अशी विचारणा केली की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि पाणीपुरवठा विभाग यांच्यामध्ये समन्वय नाही. तसेच वसुलीच्या संदर्भात पाणीपुरवठा विभागाची जबाबदारी नाही असे म्हटले जाते. पाणीपुरवठा विभागाचे सचिव या नात्याने शासनाच्या वतीने काहीतरी मार्गदर्शक सूचना दिल्या पाहिजे. ब-याच ठिकाणी या कारणामुळे योजना प्रलंबित आहेत. यासाठी एक कार्यक्रम तयार करुन पूर्ण महाराष्ट्राला दिशा दिली पाहिजे. अतिरिक्त सचिव, पाणी पुरवठा विभाग यांनी म्हटल्याप्रमाणे याची काही अंमलबजावणी होत नाही त्यामुळे ग्रामविकास विभागाने याबाबत विनाविलंब परिपत्रक निर्गमित केले पाहिजे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, नाशिक अंतर्गत सन २०११-१२ या वर्षाच्या लेखा परिक्षणातून असे निदर्शनास आले आहे की, ग्रामपंचायतीकडे पाणीपट्टी वसुलीची एकूण थकित रक्कम रुपये ७,५८,९५,३९०/- एवढी असून सदर पाणीपट्टीची थकबाकी रक्कम दरवर्षी वाढत आहे. सन १९९८ पासून नाशिक जिल्हा परिषदेमधील नांदगाव तालुक्यातील ५६ खेडी, दाभाडी तालुक्यातील १२ गावे, देवळा तालुक्यातील ९ गावे तसेच मालेगाव तालुक्यातील १६ गावांमधील पाणीपुरवठा थकबाकीची एकूण रक्कम १०८५.९० लक्ष रुपये एवढी आहे. तसेच योजनानिहाय सन २००४ ते २०१७ पर्यंतच्या नांदगाव, दाभाडी, देवळा व मनेगाव येथील गावांचा प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचा एकूण खर्च रुपये ४६५२.४० लक्ष एवढा आहे. तसेच नांदगाव नगरपरिषदेकडे थकीत असलेली पाणीपट्टी रक्कम नगरविकास विभागाकडून अद्याप वसुल करण्यात आलेली नाही. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ज्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजना आहेत त्याची वसुली ग्रामपंचायतीमार्फत होत नाही. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व पाणीपुरवठा विभाग यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव दिसून येत आहे.

**अनेक ठिकाणी ग्रामीण पाणी पुरवठा करण्यासाठी राज्यात प्रादेशिक पाणीपुरवठा योजना कार्यरत आहेत. तथापि, पाणी वापराची पाणीपट्टीची वेळीच वसुली होत नसल्याने वापरकर्त्यांकडून मोठ्या प्रमाणावर रक्कम येणे प्रलंबित आहे. ग्रामपंचायतीकडून पाणीपट्टी वसुली करण्यासंदर्भात ग्रामसेवकांवर ग्रामविकास विभागाने जबाबदारी निश्चित करण्याबाबत विभागीय सचिव, पाणी पुरवठा यांनी सुचित केले आहे. त्याप्रमाणे ग्रामसेवकाची जबाबदारी आहे की गावामध्ये जेव्हा पाणीपुरवठा केला जातो त्यावेळी पाणीपट्टी वसुली करणे देखील आवश्यक आहे. याकरीता ग्रामसेवकांना पाणीपट्टी वसुलीचे उद्दिष्ट साध्य करण्याची जबाबदारी सोपविण्यात यावी. जनतेमध्ये यासंदर्भात जनजागृती देखील करावी. पाणीपट्टी वसुल न झाल्यास संबंधित ग्रामसेवकावर कारवाई करण्यात यावी तसेच पाणी पुरवठा विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व ग्रामविकास विभाग यांनी समन्वय साधण्याच्या दृष्टीने पाणीपुरवठा विभागाच्या पाणीपट्टी वसुलीबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या पाहिजेत यासाठी एक सर्वसमावेशक धोरण तयार करुन ग्रामसेवकांवर अथवा अन्य यंत्रणेवर पाणीपट्टी वसुली करण्यासंदर्भात जबाबदारी निश्चित करण्यात यावी व कोणत्याही परिस्थितीत पाणीपट्टी वसुली एक वर्षापेक्षा जास्त प्रलंबित ठेवू नये. तद्वतच जनजागरण मोहिम आखण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करुन यासंदर्भात एक सर्वंकष शासन निर्णय निर्गमित करावा व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

नांदगाव नगरपरिषदेची पाणी पुरवठा योजनेची २४६.७८७ लक्ष रुपयांची थकीत रक्कम ब-याच वर्षांपासून प्रलंबित आहे. सदर प्रलंबित थकबाकीची रक्कम नगरविकास विभागाकडून लवकरात लवकर प्राप्त करुन घ्यावी. वसुलपात्र रकमांबाबत ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदांमध्ये नोंदवह्या परिपूर्ण नसल्यामुळे हिशेब तपासणीमध्ये अडचणी येत असून मागील थकबाकी, चालू मागणी, व्याज आणि एकूण थकित रक्कमा यांचा आढावा घेऊन वसुली करण्यासाठी विशेष दक्षता घेणे आवश्यक आहे. सर्वात जास्त थकबाकी नांदगाव तालुक्यातील ५६ गावांमधील आहे. सदर थकबाकीची रक्कम सन १९९८ पासूनची आहे. तसेच मालेगाव गट, नांदगाव गट, दाभाडी व देवळा येथील प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेची एकूण थकीत रक्कम रुपये १०८५.९० लक्ष एवढी आहे. सदर बाब जिल्हापरिषदेस नक्कीच भूषणावह नाही, असे समितीचे मत आहे.

**समितीने राज्यामध्ये केलेल्या अनेक जिल्ह्यांच्या दौ-यांमध्ये सर्वात जास्त पाणीपट्टीच्या थकबाकीची रक्कम नाशिक जिल्ह्यामध्ये आहे. त्यामुळे दरवर्षी पंचायत समितीनिहाय आढावा घेऊन थकबाकीची रक्कम वसुलीसंदर्भात संबंधित अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, नाशिक

## लेखापरीक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे

**(१) परिच्छेद क्रमांक ३.८१२/४५ (सन २०११-१२) :**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखापरिक्षणाचे काम सुरु करण्याचे ठरविले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरीक्षण सुरु झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरी सुध्दा लेखापरिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाही. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही अशी अभिलेखे उपलब्ध करणे टाळण्यात येते, त्यामुळे असे परिच्छेद लेखापरिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेद लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवुन त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसांच्या आत सादर करणे बाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभिर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमुद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करुन देवुन सुध्दा लेखापरिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत घेतलेले आक्षेप खालील तीन परिच्छेदांमध्ये दर्शविण्यात आले आहेत.

| अ. न. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्र. | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | नाशिक | सामान्य प्रशासन विभाग | ४५ | ————/- |

**(२) परिच्छेद क्रमांक ३.१०३७/३ (सन २००८-०९)**

| अ. न. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्र. | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | नाशिक | सामान्य प्रशासन विभाग | ३ | ————/- |

**(३) परिच्छेद क्रमांक ३.८१२ (१२)/३२२ (सन २०११-२०१२)**

| अ. न. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्र. | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | नाशिक | बांधकाम विभाग | ३२२ | ८,४८,४४,८२२ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) नाशिक जिल्ह्यातील १५ तालुक्यांपैकी सन २०११-१२ मध्ये ५३४ ग्रामपंचायतींचे एकूण ३४२४ घटकांचे लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध झालेले नव्हते.

सन २०१२ ते ३१ डिसेंबर २०१५ अखेर स्थानिक निधी लेखा यांनी ग्रामपंचायतींचे लेखा परिक्षण केले व अभिलेखे उपलब्ध करुन न दिलेल्या ग्रामपंचायतींसाठी जानेवारी, २०१६ ते ३१ मार्च, २०१६ पर्यंत लेखापरिक्षणाचा कालबध्द कार्यक्रम राबविला.

३१ मार्च, २०१६ नंतर दि. ७ एप्रिल, २०१६ रोजी स्थानिक निधी लेखा यांनी जिल्हा परिषदेला दिलेल्या अहवालानुसार सन २००७-०८ ते सन २०१४-१५ या कालावधीतील १७६ ग्रामपंचायतींचे ५५९ घटक अद्याप प्रलंबित आहेत. संबंधित घटकांचा वर्षनिहाय तक्ता खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | वर्ष | प्रलंबित घटक |
|---|---|---|
| १ | २००७-०८ | ९७ |
| २ | २००८-०९ | ७९ |
| ३ | २००९-१० | ७० |
| ४ | २०१०-११ | ८० |
| ५ | २०११-१२ | ५७ |
| ६ | २०१२-१३ | ५५ |
| ७ | २०१३-१४ | ५७ |
| ८ | २०१४-१५ | ६४ |
| | एकूण | ५५९ |

वरील प्रलंबित घटक असलेल्या ग्रामपंचायतींच्या ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांना या कार्यालयाचे पत्र क्र.साप्रवि/ग्रापं/अफरातफर/८१-अ/२०१६, दिनांक १३/४/२०१६ अन्वये सर्व गट विकास अधिकारी यांना संबंधित ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकारी यांनी महाराष्ट्र जि.प. जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ कलम ३ चा भंग केल्यामुळे मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम १९३० चे कलम ६ नुसार पोट-कलम (१) खंड (अ) (ब) अन्वये रुपये २५०००/- दंडाचा प्रस्ताव मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना सादर करणेकामी या कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करणेबाबत आदेशित केलेले आहे. रु. २५,०००/-दंडाचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर मा. विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडून मान्यता प्राप्त होताच संबंधित ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांचेकडून दंडाची रक्कम वसुल करण्याची कारवाई करण्यात येईल. तरी कृपया खुलासा स्विकृत होणेस विनंती.

(२) नाशिक जिल्ह्यातील १५ तालुक्यांपैकी सन २००८-०९ मध्ये ५९० ग्रामपंचायतींचे एकूण ३६५८ घटकांचे लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध झालेले नव्हते.

सन २००९-१० ते ३१ डिसेंबर २०१५ अखेर स्थानिक निधी लेखा यांनी ग्रामपंचायतींचे लेखा परिक्षण केले व अभिलेखे उपलब्ध करुन न दिलेल्या ग्रामपंचायतींसाठी जानेवारी, २०१६ ते ३१ मार्च, २०१६ पर्यंत लेखापरिक्षणाचा कालबध्द कार्यक्रम राबविला.

३१ मार्च, २०१६ नंतर दि. ७ एप्रिल, २०१६ रोजी स्थानिक निधी लेखा यांनी जिल्हा परिषदेला दिलेल्या अहवालानुसार सन २००७-०८ ते सन २०१४-१५ या कालावधीतील १७६ ग्रामपंचायतीचे ५५९ घटक अद्याप प्रलंबित आहेत. संबंधित घटकांचा वर्षनिहाय तक्ता खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | वर्ष | प्रलंबित घटक |
|---|---|---|
| १ | २००७-०८ | ९७ |
| २ | २००८-०९ | ७९ |
| ३ | २००९-१० | ७० |
| ४ | २०१०-११ | ८० |
| ५ | २०११-१२ | ५७ |
| ६ | २०१२-१३ | ५५ |
| ७ | २०१३-१४ | ५७ |
| ८ | २०१४-१५ | ६४ |
| | एकूण | ५५९ |

वरील प्रलंबित घटक असलेल्या ग्रामपंचायतींच्या ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांना या कार्यालयाचे पत्र क्र. साप्रवि/ग्रापं/अफरातफर/८१-अ/२०१६, दिनांक १३/४/२०१६ अन्वये सर्व गट विकास अधिकारी यांना संबंधित ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकारी यांनी महाराष्ट्र जि.प. जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ कलम ३ चा भंग केल्यामुळे मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम १९३० चे कलम ६ नुसार पोट-कलम (१) खंड (अ) (ब) अन्वये रुपये २५०००/- दंडाचा प्रस्ताव मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना सादर करणेकामी या कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करणे-बाबत आदेशित केलेले आहे. रु. २५,०००/-दंडाचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर मा. विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडून मान्यता प्राप्त होताच संबंधित ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांचेकडून दंडाची रक्कम वसुल करण्याची कारवाई करण्यात येईल. तरी कृपया खुलासा स्विकृत होणेस विनंती.

(३) लेखापरिक्षण पथकाने मागणी केल्याप्रमाणे एकूण ९८४ कामापैकी ८८१ एवढ्या कामांची अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या होत्या. एकूण कामांपैकी खालील कामांचे अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध केलेले आहेत.

| कामांची रक्कम | दर्शविलेल्या कामाच्या मोजमाप पुस्तिकेसह नस्ती | लेखापरिक्षणांस न दाखविलेल्या फक्त नस्ती | प्रलंबित मोजमापे पुस्तिका |
|---|---|---|---|
| ० ते ०.५० | ५२ | ४ | ४ |
| १ ते ३.०० | २५० | ४१ | ४१ |
| ३ ते ५.०० | १९४ | १० | १० |
| ५ ते १५.०० | ४८१ | ४७ | ४७ |
| १५ ते पुढे | ७ | १ | १ |

आक्षेपात नमुद केलेल्या कामांची मोजमापपुस्तिका उपविभागीय स्तरावरील अधिका-याकडे असल्यामुळे त्या विभागीय स्तरावर संकलित करुन दाखविण्यामध्ये कार्यबहुल्यामुळे विलंब झाला तो पर्यंत लेखापरिक्षण संपल्यामुळे अभिलेखे त्यांना दाखविता आले नाही.

त्यानंतर या कार्यालयाचे पत्र क्रमांक जिपना/बांखा/इवद १/लेखा १/२६७ ते २७५/१३, दि.१९.११.२०१३ नुसार याबाबतचे अनुपालन व मोजमाप पुस्तिका उपलब्ध असल्याबाबत स्थानिक निधी विभागास कळविण्यात आले व सदरच्या मोजमाप पुस्तिका लेखापरिक्षणासाठी उपलब्ध आहे. मोजपुस्तिकेमध्ये नमुद केलेली कामे पुर्ण झाली असून त्यांचे पुर्णत्वाचे अहवाल दप्तरी ठेवले आहेत. परिच्छेद वगळण्याची कार्यवाही सुरु आहे. याबाबतीत सर्व अभिलेखे स्थानिक निधी विभागाने पुढील संभाव्य पंचायत राज समितीचे अंतर्गत प्रस्तावित परिच्छेदांचे अनुपालन पडताळणी कॅम्पमध्ये अनुपालने अद्ययावत कागदपत्रांसह सादर करणार आहोत.

तसेच या कार्यालयाचे पत्र क्र.जिपना/बाखा/इवद १/ कावि/लेप/२१/२०१६, दि. १६.४.२०१६ अन्वये गटविकास अधिकारी/ उपअभियंता, जि.प.उपविभाग यांना याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद व जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ कलम ३ चा भंग केल्यामुळे मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम १९३० चे कलम ६ नुसार पोट-कलम (१) खंड (अ) (ब) अन्वये रुपये २५,०००/- दंड करण्याची कार्यवाही करीत असून याबाबत पत्र व्यवहार गट स्तरावर करण्यात आलेला असून कृपया अनुपालन स्विकृत होणेस विनंती आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ मे, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,यापूर्वी अभिलेखे सादर न करण्याबाबत संबंधितांना २५ हजार रुपयांचा दंड करण्याबाबत निदेश दिलेले आहेत. परंतु १५ तालुक्यातील ५३४ ग्रामपंचायतींचे ३४२४ घटकांचे अभिलेखे वारंवार प्रयत्न करुनही लेखा परिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आले नाहीत. यामुळे फक्त २५ हजार रुपयांचा दंड करुन उपयोग होणार नाही. या संदर्भात तपासणी करुन दंडाच्या रकमेसमवेत संबंधितांविरुध्द एफआयआर दाखल करावेत व त्यासंबंधी समितीकडे अहवाल सादर करावा.

तद्‌नंतर समितीस एकूण १०३ मोजमाप पुस्तिका आणि १०३ नस्ती लेखा परिक्षणाकरिता उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता कार्यकारी अभियंता, इवद-१ यांनी समितीस लेखा परिक्षणाच्या वेळी मोजमाप पुस्तिका दर्शविण्यात आल्या नाहीत ही वस्तुस्थिती आहे अशी माहिती देण्यात आली. अपहार प्रकरणांमध्ये दोषी असलेल्या किती जणांना बडतर्फ केले व किती जणांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल केलेले आहेत अशी समितीने विचारणा केली असता एकूण ग्रामनिधीच्या १८ प्रकरणांमध्ये संबंधितांवर गुन्हे दाखल केलेले आहेत असे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला माहिती दिली. यावर समितीने अशी विचारणा केली की, प्रलंबित असलेल्या मोजमाप पुस्तिकेसंबंधी आपण समितीला माहिती द्यावी. यावर कार्यकारी अभियंता, इवद-१ यांनी समितीस विदित केले की, लेखा परीक्षणाच्या वेळी ९८४ कामांपैकी ८८१ कामांची अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात आली होती. तद्‌नंतर समितीने असे निदेश दिले की, लेखा परिक्षणाच्या वेळी मोजमाप पुस्तिका/ अभिलेखे उपलब्ध करुन देणा-या विरुध्द लेखापरिक्षा अधिनियमातील नियम ७ नुसार समितीने दिलेल्या निदेशानुसार कारवाई करावी. तसेच त्यानंतर सुध्दा अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्यास संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करावेत व सचिवांच्या साक्षीच्या वेळी त्याबाबतची माहिती सादर करावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस एफआयआर दाखल करण्यासंबंधी कायदेशीर बाब तपासून कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासित केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) व (२)सन २००७-०८ ते सन २०१४-१५ या कालावधीतील १७६ ग्रामपंचायतीचे ५५९ घटकांचे अभिलेख समितीने नाशिक जिल्हा परिषदेला भेट देईपर्यंत उपलब्ध करून देण्यात आलेले नव्हते अतः समितीने महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अनुसार संबंधितावर २५,०००/- रुपये दंडाची कारवाई करण्याचे निर्देश दिल्यानुसार समितीस प्राप्त झालेल्या चौकशी अहवालात ७८ ग्रामपंचायतींच्या संदर्भात मोठ्या प्रमाणात वेतनवाढी रोखने,सेवापुस्तिकेत नोंदी घेणे,दंडात्मक कारवाई करण्यात आल्याचा उल्लेख आहे.  एकूण किती रूपये दंड वसुल करणे बाकी असून तो किती कालावधी मध्ये वसुल करण्यात येईल.

(३) (१) समितीने सदरहू प्रकरणी तब्बल १०३ कामांच्या मोजमाप पुस्तिके लेखापरिक्षणास उपलब्ध करून न दिल्याबाबत लेखापरिक्षणाच्या अधिनियमाबाबत कलम ७-अ नुसार रक्कम रू.२५०००/- वसुल करणे व दंडासह फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी फौजदारी गुन्हे दाखल करण्यासंदर्भात कायदेशीर बाब तपासून घेण्याचे आश्वासन दिले असता विधानमंडळाच्या समिती संदर्भात एखाद्या खाजगी वकिलाच्या सल्ल्यावर अवलंबून न राहता शासनाच्या विधी व न्याय विभागाचे अभिप्राय का घेण्यात आलेले नाहीत.

(२) खाजगी विधी तज्ञाने दिलेल्या मोघम अभिप्रायामुळे फौजदारी गुन्हे दाखल करण्याची आवश्यकता नाही असा उल्लेख नाही तसेच महाराष्ट्र सेवा नियमाप्रमाणे कारवाई करावी तसेच ठपका ठेवावा व एक छोटी शिक्षा द्यावी असे मत दिलेले आहे, इत्यादी बाबी शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आलेल्या आहेत काय ? असल्यास विधीमंडळ समितीच्या कामकाजासंबधी जिल्हा परिषद प्रशासन गांभिर्यांनी घेत नसल्याबाबत शासनाने कोणत्या सुचना दिलेल्या आहेत.

(३) समितीने १०३ कामांच्या नस्ती व मोजमाप पुस्तिका यांचे पुन्हा लेखापरिक्षण करून घ्यावे असे निर्देश नसतांनाही सह संचालक स्थानिक निधी लेखा, नाशिक यांचेकडे समितीचे निदेशावरून वारंवार पत्र पाठवून पुन्हा लेखी परिक्षण करण्याचा पाठपुरावा समितीची साक्ष झाल्यानंतर करणे असे लेखापरिक्षण नियमानुसार करता येते काय ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) व (२) लेखापरिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणेबाबत नाशिक जिल्ह्यातील १५ तालुक्यातील सन २००७-०८ ते सन २०१४-१५ या कालाधीतील १७६ ग्रामपंचायतींचे ५५९ घटकांचे अभिलेख समितीने नाशिक जिल्हा परिषदेला भेट देईपर्यंत उपलब्ध करून देण्यात आलेले नव्हते. अतः समितीने महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम १९३० च्या कलम ७ नुसार संबधितांवर २५,०००/- रुपये दंडाची कारवाई करण्याचे निर्देश दिल्यानुसार लेखापरीक्षा विभागाकडील पत्रानुसार मा.विभागीय आयुक्त,नाशिक विभाग, नाशिक यांच्याकडे दंड वसूल करणेबाबतचे पत्र क्र.विकास/लेख ३-२/३६३९४/२०१६, दि.०७.०८.२०१६ अन्वये परवानगी दिलेली आहे.या कार्यालयाकडील आदेश क्र.साप्रवि/ग्राप/अफरातफर सं १०/१२/१७, दि.०६.०१.२०१७ अन्वये सर्व संबधितांवर २५,०००/- रुपयांच्या दंड आकारून वेतनातून वसुलीबाबत गटविकास अधिकारी यांना निर्देश दिल्याप्रमाणे दंड वसुल करण्यात आलेल्या वसुलीची व सदर आदेशाची नोंद संबंधिताचे मुळ सेवा पुस्तकात घेण्याबाबत सर्व गटविकास अधिकारी यांना आदेश देण्यात आले असून गटविकास अधिकारी यांच्या अभिरक्षेत सेवा पुस्तक असल्याने त्यांच्या स्तरावर नोंदी घेण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

| अ.क्र | सद्यःस्थिती | ग्रामपंचायत संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| १ | ७८ ग्रामपंचायती पैकी माहे नोव्हेंबर, २०१७ अखेर लेखा परीक्षणाकरिता अभिलेखे उपलब्ध करून दिलेल्या ग्रामपंचायती | १५ | सोबत विवरण जोडले आहे (पृष्ठ क्र.१) |
| २ | दंड वसूल केलेल्या ग्रामपंचायतीची रक्कम | २० | ४,२५,०००/-रू.दंड संबंधित ग्रासे/ग्राविअ वेतनातून वसूल करण्यात आला आहे (पृष्ठ क्र.३) |
| ३ | निलंबित केलेले ग्राविअ/ग्रासे | ०९ | ९ ग्रामपंचायतीचे ६ ग्रासे (पृष्ठ क्र. ५) |
| ४ | सेवा समाप्ती केलेले ग्राविअ/ग्रासे | ०४ | ४ ग्रामपंचायतीचे ३ ग्रासे (पृष्ठ क्र. ७) |
| ५ | मयत ग्राविअ /ग्रासे | ०३ | ३ ग्रामपंचायतीचे २ ग्रासे (पृष्ठ क्र. ७) |
| ६ | खाते चौकशी सुरू केलेले ग्राविअ/ग्रासे | २१ | २१ ग्रामपंचायतीचे १५ ग्रासे (पृष्ठ क्र.९ ते १७) |

तसेच आतापर्यंत मा.पंचायती राज समितीने माहे मे, २०१६ मध्ये भेट दिल्यानंतर माहे नोव्हेंबर,२०१७ पर्यंत एकूण १९,९६,०००/-इतकी रक्कम वसुल करण्यात आली आहे, तसेच उर्वरित १२४ ग्रासे/ग्राविअ यांचे रक्कम रू.३१,००,०००/- दंड वसूल करणेबाबतची कार्यवाही गटस्तरावर सुरू आहे.

(३) नाशिक जिल्हा परिषदेने सर्व साधारण सभा दि.२१.०२.२०१४ विषय क्र.७ अन्वये नाशिक जिल्हा परिषदचे कायदेविषयक सल्लागार म्हणून तीन वर्षाकरीता एकूण १२ कायदेविषयक सल्लागार यांची पॅनलवर नेमणूक केली आहे.

समितीने घेतलेल्या मुद्यांची पुर्तता करण्यासाठी जिल्हा परिषद पॅनल वरील कायदेशीर सल्लागार ॲड सौ.भुसे यांचेकडून दि.२०.१२.२०१६ रोजी कायदेविषयक बाबीबाबत मार्गदर्शन मागविण्यात आले होते. तथापि फेर मुद्यात नमुद अभिप्रायानुसार विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायाबाबत मा.सहसचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग मुंबई यांना दि.१३.११.२०१७ अन्वये अभिप्रायबाबत कळविण्यात आले आहे.

प्रस्तुत मुद्याबाबत कायदेविषयक सल्ला दिलेल्या ॲड सौ.एस.एस.भुसे या जिल्हा परिषद नाशिकच्या कायदेविषयक सल्लागार पॅनलवरील अधिकृत वकील आहेत. याबाबत मा.सहसचिव,ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय,मुंबई यांचेकडे अभिप्रायासाठी कळविण्यात आलेले आहे.

१०३ कामांच्या नस्ती व मोजमाप पुस्तिकांचे पुन्हा लेखापरिक्षण करून घेणे बाबत समितीच्या सुचना नाहीत.मात्र सदर १०३ मोजमाप पुस्तिकांचे लेखापरिक्षण करून घेणे विभागाची धारणा असल्याने व आक्षेपाचे अनुपालन करणेसाठी पाठपुरावा केलेला आहे, यापुढे दक्षता घेण्यात येईल.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**(१) व (२) ग्रामविकास विभागाचे अभिप्राय (वित्त-७)**:-जिल्हापरिषदेने केलेल्या कार्यावाहीशी शासन सहमत आहे.

**(३) ग्रामविकास विभागाचे अभिप्राय**:- (वित्त-७) जिल्हा परिषद नाशिक यांचे दिनांक १३.११.२०१७ चे पत्र १५.०१.२०१८ रोजी कार्यासनास प्राप्त झाले आहे.त्यानुषंगाने विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात येत आहेत.

**सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय** :- सदर प्रश्नामधील भाग (२) च्या अनुषंगाने हा प्रश्न सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित असल्याचे दर्शविले आहे असे दिसते. जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत असलेल्या कर्मचा-यांच्या अनियमितताबाबतची कार्यवाही प्रकरणे ही महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६४ अन्वये हाताळली जातात. जिल्हा परिषद कर्मचा-यांच्या शिस्तभंगविषयक बाबी वा दंड वसुलीच्या /अफरातफर/गैरव्यवहार या अनुषंगाने कोणतेही आदेश सामान्य प्रशासन विभागाकडून विहित केले जात नाहीत .जिल्हा परिषदेअंतर्गत घडलेल्या काही अनियमिततांच्या प्रकरणात राज्य शासकीय अधिका-यांचा समावेश असला तरी त्या प्रकरणांचा तपशील हा ग्रामविकास विभागाकडेच उपलब्ध असतो. सदर मुद्यात नमूद प्रकरणातील कार्यवाहीची माहिती संबंधित प्रशासकीय विभाग म्हणून ग्रामविकास विभागाकडून प्राप्त होऊ शकेल. सदर बाबीशी या विभागाचा संबंध नसल्याने संबंधित प्रशासकीय विभाग म्हणून ग्रामविकास विभागाकडे हस्तांतरित करण्यात येत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नाशिक जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १४ व १५ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, या अभिलेख्यांच्या संदर्भात समितीला हे समजत नाही की, जेव्हा लेखापरिक्षण होते त्यावेळी अभिलेखे सादर केले जात नाहीत आणि ते त्यानंतर सादर केले आहेत असे सांगितले जाते. त्यांच्याकडे उपलब्ध असताना अभिलेखे सादर न करणे हे सातत्याने संपूर्ण महाराष्ट्रात होत आहे. त्यामुळे प्रश्न वाढतात आणि विनाकारण त्यावर चर्चा होते. या बाबतीत सचिव म्हणुन मंत्रालयीन सचिवांनी संपूर्ण महाराष्ट्रभर निर्देश दिले पाहिजेत. याबाबतीत निश्चितपणे विचार केला पाहिजे कारण ही तर नियमित प्रक्रिया आहे. या बाबतीत पंचायती राज समितीने अशा सूचना दिल्या होत्या की, या अभिलेख्यांमध्ये फार मोठया प्रमाणात अफरातफर होते आणि निधीची रक्कम जास्त असल्याने त्यामध्ये गैरव्यवहार होतात. त्यामुळे याबाबतीत सचिव म्हणून काही तरी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने काही तरी विचारविनिमय करावा असे समितीला वाटते. या समितीच्या प्रश्नावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, किमान २५ हजार रुपये किंवा जी रक्कम गुंतलेली असेल त्या

रक्कमेच्या १ टक्का रक्कम ज्यामध्ये जी रक्कम जास्त असेल ती घेण्याबाबत विभागाकडून सुधारणा करण्यात येत आहेत. तसेच विभाग आणखी एक प्रयत्न करीत आहे की, येत्या १ मे नंतर सर्व ग्रामपंचायतीमधील रेकॉर्ड्स संगणकीकृत करण्याचा निर्णय विभागाने घेतला आहे. ही प्रक्रिया संपूर्ण जिल्हयामधील सर्व ग्रामपंचायतीमध्ये राबविण्यात येणार आहे. यासंबंधी विभागाने यापूर्वी दिनांक ११ नोव्हेंबर, २०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित करुन राज्यातील संपूर्ण ग्रामपंचायतींमध्ये एक सहकार सेवा केंद्र उघडले असून त्यांना ग्रामपंचायतीमधील ३३ अभिलेख आहेत संपूर्ण संगणकीकृत करण्याचे काम दिले आहे. याबाबतीत विभागाला खात्री आहे की, १ मे पर्यंत उर्वरित डाटा एन्ट्रीचे काम पूर्ण होऊ शकेल आणि त्यानंतर विभाग हस्तलिखीत नोंदणी रद्द करु शकेल. तसेच विभागाने मागील दोन-तीन महिन्यांपासून व्हीडीओ कॉन्फरसींगव्दारे सूचना दिल्या आहेत की, १ मे पासून सर्व ग्रामपंचायत स्तरावरील हस्तलिखित नोंदणीची प्रक्रिया रद्द करण्यात येणार आहे व त्यानंतर संपूर्ण संगणकीकृत नोंदी केल्या जाणार आहेत.

तद्‌नंतर समितीने अशी विचारणा केली की, ३१ लाख रुपये किती कालावधीत वसुल केले जाणार आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, या प्रकरणी संबंधितांना नोटीस देऊन त्यांचा खुलासा मागवून पगारातून वसुली करण्याचे आदेश काढले आहेत. सदरहू वसुली नोव्हेंबर पर्यंत २० लाख रुपये जमा झालेले आहेत. परंतु ३१ लाख रुपये इतकी रक्कम वसुल करण्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी लागेल. यावर समितीने विचारणा केली की, म्हणजेच १ जून, २०१८ पर्यंत रुपये ३१ लाख वसुल करणार आहात. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले.

तद्‌नंतर समितीच्या प्रश्नावलीतील मुद्दा क्रमांक १५ परिच्छेद क्रमांक ३.८१२ (१२) /३२२ बाबत पुढील प्रमाणे विचारणा केली की, नाशिक जिल्हा परिषदेने सर्वसाधारण सभा दिनांक २१.०२.२०१४ विषय क्र.७ अन्वये नाशिक जिल्हा परिषदेचे कायदेविषक सल्लागार म्हणून तीन वर्षाकरीता सौ.भुसे यांची पॅनलवर नेमणूक झाली आहे, त्यासंबंधात खुलासा करावा. या समितीच्या प्रश्नावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, जिल्हा परिषदेच्या पॅनलवर वकिलांची नेमणूक करण्यात आली होती. यासाठी आम्ही अर्ज मागवून नेमणूक करतो. वकिलांचा सल्ला घेण्यासाठी पॅनलची नियुक्ती करण्यात येते. यावर समितीने अशी विचारणा केली की, या आक्षेपासंदर्भात विधी व न्याय विभागाचा अभिप्राय का घेण्यात आला नाही. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, दंड वसुली एक विषय आहे त्यावर कायदेशीर गुन्हा दाखल करावा आणि त्याबद्दल त्यांनी पूर्वी यावर गुन्हा दाखल करण्याची गरज नाही असा कायदेशीर सल्ला घेतला होता.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक जिल्हा परिषद यांची दिनांक ५ मे, २०१६ रोजी साक्ष घेतली असता सन २०११-१२ मध्ये ५३४ ग्राम पंचायतींचे एकूण ३४२४ घटकांचे अभिलेखे वारंवार प्रयत्न करुनही लेखा परिक्षणास उपलब्ध करुन दिले नसल्यामुळे संबंधितांवर केवळ २५ हजार रुपयांचा दंड करुन उपयोग होणार नाही. याप्रकरणांमध्ये तपासणी करुन दंडाच्या रक्कमेसमवेत संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करावेत व त्यासंबंधी समितीकडे अहवाल सादर करावा तसेच १०३ मोजमाप पुस्तिका आणि १०३ नस्ती लेखा परिक्षणाकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत अशी माहिती कार्यकारी अभियंता (इमारत व दळणवळण) यांनी दिली. **ग्रामनिधीच्या ९८४ कामांपैकी ८८१ कामांचे अभिलेख उपलब्ध करण्यात आले व १८ अपहार प्रकरणांमध्ये दोषी असलेल्या संबंधितांवर गुन्हे दाखल केले आहेत, त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे व लेखा परिक्षण करीत असतांना अभिलेखे तपासणीच्या वेळी मोजमाप पुस्तिका उपलब्ध असतांनाही त्या जाणीवपूर्वक न दाखविल्यामुळे सदर रक्कम अपहारित धरण्यात आली, अशा प्रकरणांच्या संदर्भात कायदेशीर बाब तपासून दंडात्मक कारवाई व फौजदारी गुन्हे दाखल करुन केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत असलेल्या कर्मचा-यांच्या अनियमिततेची कार्यवाहीची प्रकरणे महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९६४ अन्वये कलम ३ चा भंग केल्यामुळे मुंबई स्थानिक लेखा परिक्षा अधिनियम, १९३० चे कलम ७ नुसार पोट-कलम (१) खंड (अ) (ब) अन्वये रुपये २५०००/- दंडाचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या मान्यतेनुसार संबंधितांकडून दंडाची वसूली करण्यात आली आहे काय, असल्यास त्याची माहिती समितीस पाठविण्यात यावी.

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखापरिक्षणाचे काम सुरु करण्यात येते, त्या कालावधीत त्या कामात गांभिर्याने लक्ष न देता, जाणीवपूर्वक संबंधितांकडून दुर्लक्ष केले जाते तसेच लेखापरिक्षणासाठी अभिलेखे न दाखविण्याचे प्रकार वारंवार घडत असल्यामुळे अपहार व अनियमितता झालेली असल्याची शंका निर्माण होते. त्यामुळे **विभागाने भविष्यात असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी कठोर उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने अभिलेखे न दाखविणा-यांस २५०००/- रुपये दंडात्मक कारवाई करण्याव्यतिरिक्त लेखा आक्षेपातील रक्कमेचे स्वरुप पाहून प्रसंगी मोठी रक्कम असल्यास व कागदपत्रे न दाखविण्याचे स्वरुप गंभीर असल्यास अशा कर्मचा-यांची एक वेतनवाढ रोखून त्याबाबतची त्यांच्या सेवा पुस्तिकेत नोंद घेण्यात यावी तसेच आवश्यकता भासल्यास फौजदारी कारवाई देखील करण्याबाबत कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.याप्रकरणी शासनाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यांच्या आत समितीस पाठविण्यात यावा.**

## प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, नाशिक

## थकित आगाऊ रकमा (प्रलंबित अग्रिम)

**परिच्छेद क्रमांक ३.१०३९/६/५ (सन २००८-०९)**

जिल्हा परिषदांमध्ये निरनिराळ्या योजना, बांधकाम वगैरे बाबी कार्यान्वित करण्यासाठी संबंधित ठेकेदार, विभाग प्रमुख अथवा कर्मचारी यांना वेळोवेळी आगाऊ रक्कमा देण्यात येतात. अशा प्रकारे दिलेल्या रक्कमांचे संबंधित वर्षाअखेर खर्चाची प्रमाणके व हिशोब देऊन समायोजन/वसुली करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे अगोदर दिलेल्या आगाऊ रक्कमांचे समायोजन/ वसुली झाल्यावर नविन आगाऊ रक्कमा देता येतात. परंतु जिल्हा परिषदांकडील आगाऊ रक्कमांच्या नोंदवह्या पहाता वेळोवेळी दिलेल्या आगाऊ रक्कमांचे समायोजन/वसुली होत नसल्याचे आढळून येते अशा थकित आगाऊ रक्कमांमध्ये फार जुन्या म्हणजेच सन १९६२ पासूनच्या आगाऊ रकमाचे समायोजन/वसुली थकित असल्याचे दिसुन येते. उदाहरणादाखल पुढील जिल्हा परिषदांमध्ये सन २००८-०९ अखेर खाली दिल्या प्रमाणे आगाऊ रक्कमा समायोजन/वसुली अभावी थकित होत्या.

| अ. न. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ६ | नाशिक | वित्त विभाग | ५ | २०,३३,७१३/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ च्या नियम २१० (ब) नुसार तातडीची बाब म्हणून खातेप्रमुखांना अग्रिम मंजूर करण्याची तरतूद आहे. नाशिक जिल्हा परिषद अंतर्गत सन २००८-०९ अखेर खातेप्रमुख अग्रिमासाठी रक्कम रुपये २०,३३,७१३/- प्रलंबित असल्याचे लेखापरिक्षणात आक्षेप आहे. त्यानुसार प्रलंबित अग्रिमाबाबत समायोजन करणेची कार्यवाही चालू आहे.

आक्षेपातील प्रलंबित अग्रिम रक्कम रुपये २०,३३,७१३/- पैकी रुपये १५,२५,४६७/- चे सन २०१४-१५ अखेर समायोजन करण्यात आले असुन रुपये ५,०८,२४६/- प्रलंबित असून त्यापैकी रक्कम रुपये २,३८,८३०/- ही न्यायालयीन प्रकरणांमुळे अडकलेली असुन रक्कम रुपये १,११,६७९/- ही सन १९७१-७२ मधील दुष्काळ कालावधीतील उप अभियंता यांना दिलेल्या अग्रिमापैकी आहे. सदर बाबीसाठी लेखाशिर्ष व अनुदान उपलब्ध न झाल्यामुळे अग्रिम प्रलंबित दिसते.

ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लेपअ/१०९२/पक्र १४६९/३० दिनांक २६.२.१९९३ नुसार प्रलंबित अग्रिम समायोजनाबाबत पाठपुरावा चालु असुन अग्रिम समायोजनेची रक्कम ७५% पेक्षा जास्त वसुली झालेली आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ मे, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,वित्त विभागाकडील अधिकारी /कर्मचारी यांना वेळोवेळी देण्यात आलेले अग्रिम रुपये २०,३३,७१३/- दीर्घकाळ प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत. थकीत अग्रिम वेळीच वसूल होण्यासाठी आरोग्य विभागाने कोणते नियोजन केले तसेच प्रलंबित अग्रिमे वेळीच वसूल न करण्यास कोण जबाबदार आहे.

यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस विदित केले की, प्रलंबित अग्रिम रक्कम रुपये २०,३३,७१३/- पैकी रु.१५,२५,४६७/- सन २०१४-१५ मध्ये समायोजन करण्यात आले असून रक्कम रुपये ५,०८,२४६/- इतकी प्रलंबित आहे. या संदर्भात संबंधितांना पत्रव्यवहार केलेला आहे. प्रलंबित रकमेपैकी महिला व बालविकास विभागाकडे ८०२०/- रुपये, इमारत व दळणवळण विभागाकडे ३१,३२५/- रुपये, इमारत व दळणवळण विभाग(२) कडे ५७,७६०/- रुपये तसेच आरोग्य विभागाकडे ६०,६६५/- रुपयांची थकबाकी आहे.

यावर समितीने असे निदेश दिले की, या संदर्भात संबंधित विभागाकडून लवकरात लवकर वसुली करावी. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस होकारार्थी आश्वासित केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्द्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

समितीने नाशिक जिल्हा परिषदेला भेट दिली असता महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ च्या नियम २१० (ब) नुसार तातडीच्या बाबीसाठी मंजूर केलेल्या आगाऊ रकमांची वसुली/समायोजन मोठया प्रमाणावर प्रलंबित होते एकूण रुपये २०,३३,७१३/- पैकी १५,२५,४६७/- रुपयांची वसुली / समायोजन झाले असल्याचे समितीस प्राप्त झालेल्या चौकशी अहवालावरून दिसून येते. परंतु सन १९६९ ते १९७२ या दुष्काळ कालावधीत सुमारे ४५ वर्षा पूर्वीच्या रक्कमा रुपये १,११,६७९/- अग्रिमांच्या समायोजनाकरिता शासनाचे नियम काय आहेत तसेच उर्वरित थकित अग्रिमांच्या समायोजनासाठी जिल्हा परिषद स्तरावरून कोणकोणती कार्यवाही करण्यात येत आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ च्या नियम २१० (ब) नुसार तातडीची बाब म्हणून खातेप्रमुखांना अग्रिम मंजूर करण्याची तरतुद आहे. नाशिक जिल्हा परिषद अंतर्गत सन २००८-०९ अखेर खातेप्रमुख अग्रिमासाठी रक्कम रुपये- २०,३३,७१३/- प्रलंबित असल्याचे लेखापरिक्षणात आक्षेप आहे. त्यानुसार प्रलंबित अग्रिमाबाबत समायोजन करणेची कार्यवाही चालू आहे.

आक्षेपातील प्रलंबित अग्रिम रक्कम रुपये २०,३३,७१३/- पैकी रुपये १५,४१,०५८/- चे सन २०१६-१७ अखेर समायोजन करण्यात आले असून रुपये ४,९२,६५५/- प्रलंबित असून त्यापैकी रक्कम रुपये २,०३,८३०/- ही न्यायालयीन प्रकरणांमुळे अडकलेली असून रक्कम रुपये १,११,६७९/-ही सन १९७१-७२ मधील दुष्काळ कालावधीतील उप अभियंता यांना दिलेल्या अग्रिमांपैकी आहे. सदर बाबीसाठी लेखाशिर्ष व अनुदान उपलब्ध न झाल्यामुळे अग्रीम प्रलंबित आहे. तसेच खाते प्रमुखांकडून समायोजन होणे योग्य रक्कम रुपये १,७७,१४६/- इतकी आहे.

अग्रिमाचे समायोजना बाबतचा शासन निर्णय पुढील प्रमाणे आहे.

ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२०१७/प्रक८/वित्त ९ दिनांक २३.०३.२०१७ नुसार अं. नं. ५ कार्यालय प्रमुखांना जे अग्रिम दिले आहेत त्यांचे कागदपत्राचा शोध घेऊन समायोजनाची कार्यवाही करावी.

अ. नं. ६वरिल अ. नं. ५ प्रमाणे कार्यवाही करुनही वसुली होत नसल्यास संबंधिताचे मालमत्तेतुन वसुली नियमाप्रमाणे करण्याची कार्यवाही महसुल खात्यामार्फत करावी म्हणजेच आर.आर.सी. द्वारे वसुलीची कार्यवाही करावी, असे नमुद केले आहे.

उर्वरित खातेप्रमुख अग्रिम समायोजन करण्यासाठी खातेप्रमुख बैठक सहाय्यक लेखाधिकारी यांची मासिक बैठकांमध्ये समायोजन करण्याबाबत कळविलेले आहे.

खाते प्रमुख अग्रिम समायोजनासाठी दरमहा जिल्हा परिषदेचे खातेप्रमुख व पंचायतखाते प्रमुख अग्रिम समायोजनासाठी दरमहा जिल्हा परिषदेचे खातेप्रमुख व पंचायत समिती कार्यालयाकडील सहाय्यक लेखाधिकारी व अधिकारी यांच्या मासिक सभेमध्ये विषय ठेवुन प्रलंबित अग्रिमांच्या समायोजना बाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्रायः-** (वित्त-९) जिल्हा परिषदांमधील प्रलंबित अग्रिम वसुलीच्या अनुषंगाने जि.प.नाशिक यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत सहमत आहे.

**वित्त विभागाचे अभिप्राय :-** संबधित नाही.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, न्यायालयीन प्रकरणांमुळे हे प्रलंबित आहे का, यावर कोणती न्यायालयीन स्थगिती आहे का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला नकारार्थी (नाही) असे उत्तर दिले. यावर समितीने अशी विचारणा केली की, न्यायालयीन स्थगिती नाही तर मग न्यायालयीन प्रकरणांमुळे अडकलेले आहे असे उत्तर चुकीचे आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, न्यायालयात तातडीने पैसे भरावयाची गरज होती, त्यावेळी ते जिल्हापरिषद सेसमधून तातडीने न्यायालयात भरले होते.

यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, न्यायालयीन प्रकरणांतर्गत न्यायालयात पैसे जमा केलेले आहेत त्यामध्ये समायोजन होत आहे. न्यायालयास पैसे जमा करावयाचे होते. त्याकरिता अधिका-यांच्या नावावर असाच अग्रीम काढला आणि न्यायालयाला दिला होता. तो अग्रीम ॲडव्हान्समध्ये न्यायालयाला दिला होता. त्याकरिता न्यायालयाची पावती मागवून समायोजन करावयाचे आहे. न्यायालयात भरलेले पैसे हे न्यायालयातील केस संपत नाही तोपर्यत मिळत नाहीत. यासंदर्भात समायोजन करण्यात येईल.

यावर समितीने पुढे असे निदेश दिले की, सदर पैसे न्यायालयीन प्रकरणांमध्ये अडकलेले आहेत. सदर पैसे न्यायालयामध्ये तातडीने भरावयाचे होते, याकरिता अधिका-याच्या नावावर ॲडव्हान्स काढून तो भरलेला आहे. याकरिता कोर्टाची रिसीट दाखवून त्याचे समायोजन करण्यात यावे. या प्रकरणामध्ये रिलीफ देण्यात यावा. याचे समायोजन अधिका-यांच्या अग्रीमाअंतर्गत समाविष्ट करण्यात येईल. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला होकारार्थी आश्वासित केले.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषदांमध्ये विविध योजना, बांधकाम इत्यादी बाबी कार्यान्वित करण्यासाठी संबंधित ठेकेदार, विभाग प्रमुख अथवा कर्मचारी यांना वेळोवेळी आगाऊ रक्कमा दिल्या जातात. सदर रक्कमांचे संबंधित वर्षाअखेर खर्चाची प्रमाणके व हिशोब देऊन समायोजन/वसुली करणे आवश्यक आहे. सदर रक्कमांचे समायोजन/वसुली झाल्यानंतर नवीन आगाऊ रक्कमा दिल्या जातात.

नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाकडील अधिकारी/कर्मचारी यांना सन २००८-०९ अखेर वेळोवेळी देण्यात आलेले अग्रिम रक्कम रुपये २०,३३,७१३/- पैकी रक्कम रुपये १५,४१,०५८/- एवढे सन २०१६-१७ अखेर समायोजन करण्यात आले असून रुपये ४,९२,६५५/- एवढ्या प्रलंबित रकमेपैकी रुपये २,०३,८३०/- एवढी रक्कम न्यायालयीन प्रकरणांमुळे अडकलेली असून रक्कम रुपये १,११,६७९/- ही सन १९७१-७२ मधील दुष्काळ कालावधीमध्ये उप अभियंता यांना दिलेल्या अग्रिमांपैकी आहे. सदर रक्कम लेखाशिर्ष व अनुदान उपलब्ध न झाल्यामुळे अग्रिम प्रलंबित असल्याचे दिसून येते.

**जिल्हा परिषदांच्या कामकाजात अग्रिम रक्कम देण्याच्या पध्दतीमध्ये सुसुत्रता आणण्याची अत्यंत आवश्यकता आहे, कारण सन १९७१-७२ मध्ये राज्यात पडलेल्या दुष्काळाच्या कालावधीमध्ये उप अभियंता यांना दिलेल्या अग्रिम रकमेचे समायोजन/वसुली होण्यास प्रदीर्घ कालावधी (सुमारे ४६ वर्ष) लोटला असल्याचे सकृतदर्शनी दिसून आले आहे. तसेच इतर विभागांकडून देखील समायोजन/वसुली ठराविक कालावधीत होणे अभिप्रेत आहे. याकरिता ग्रामविकास विभागाने राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना विविध योजना तसेच बांधकामे इत्यादींसाठी देण्यात येणारा अग्रिम देत असताना सदर अग्रिम रक्कमेचे विहीत कालमर्यादेत समायोजन/वसुली होण्याच्या दृष्टीने एक सर्वसमावेशक धोरण निश्चित करावे, अशी समितीची शिफारस आहे. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

## प्रकरण सात

## जिल्हा परिषद, नाशिक

## मार्च, २०१२ अखेर शिल्लकेच्या तपशिलाबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.७९४/८ (सन २०११-२०१२)**

मार्च, २०११ अखेर रोख पुस्तकात रु. २,१९,२०,८०,३८५/- रक्कम शिल्लक असून सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षात रु. ७५,००,३६,४३८/- रक्कम रोख पुस्तकात जमा झाली आहे व रक्कम रुपये ३१,३८,३४,२६७/- खर्च असून शिल्लक रक्कम रु. २,६२,८२,८२,५५६/- दिसुन येते.

कोषागार लेखेनुसार मार्च-२०११ अखेर शिल्लक रु.२,१४,३२,७८,७४१/- असुन सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षात रु. ७५,०१,०२,५८८/- इतकी जमा दिसते व रक्कम रु. ३१,३८,३४,२६७/- खर्च असून शिल्लक रक्कम रु. २,५७,९५,४७,०६२/-

भविष्य निर्वाह निधी रोख वही आणि कोषागार लेख्यातील शिल्लकेतील रक्कम यात रु.४,८७,३५,४९४/- तफावत असून त्याबाबत ताळमेळ घेऊन दाखविणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

जिल्हा परिषदेकडुन सन १९८५ ते सन २०१४ पर्यंतचा ताळमेळ कोषागार कार्यालयाशी घेण्यात आला आहे. दि. ०१/०४/१९८५ ची सुरुवातीची रक्कम रुपये ४,७९,२५,७८३/- ही जिल्हा परिषदेने एप्रिल १९८५ ला सुरुवातीची शिल्लक म्हणुन जमा घेतलेली आहे. परंतु कोषागार कार्यालयाने ती निरंक घेतलेली असल्याने तफावत जमा दिसुन येत आहे.

परंतु कोषागार कार्यालयाकडून अद्याप तफावत दूर करुन मिळालेली नाही. सदर बाब मा.महालेखापाल मुंबई, मा. सहाय्यक संचालक लेखा व कोषागारे नाशिक व मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, मुंबई. यांना देखील लेखी स्वरुपात अवगत करण्यात आले आहे. या विषयी जिल्हा कोषागार कार्यालयाने त्यांच्याकडील पत्र क्र./कोष/ठेव/८३३६/ताळमेळ/कावी/४८६/२०१५ दि. २९/०९/२०१५ चे पत्रान्वये शासन निर्णय, वित्त विभाग क्र. संकिर्ण-/१००८/प्र.क्र./६८/कोषा प्र-५ दि. ३०/३/२००९ अन्वये ८३३६ च्या रक्कमाबाबत शासन निर्णयातील मुद्दा क्र. ८ अन्वये दि. १/०४/२००९ रोजी मा.महालेखाकार/कोषागाराकडे दर्शविलेली सुरुवातीची शिल्लक आधारभुत समजून सदर पध्दती अंमलात आणण्याबाबत सुचित केलेले आहे. या विषयी दि. ०१/०४/२००९ च्या मा.महालेखाकार/कोषागाराच्या शिल्लके प्रमाणे पुढील लेखे ठेवावेत असे शासन आदेश असल्याचे कळविले आहे. या कार्यालयाची दि.०१/०४/१९८५ पुर्वीची शिल्लक रुपये ४,७९,२५,७८३/- एवढी होती. तथापि, कोषागाराकडील लेखाशिर्ष ८३३६ चे लेखे दि. ०१/०४/१९८५पासुन सुरु झालेले असल्याने त्यांच्याकडे या विषयाची दि. ०१/०४/१९८५ पुर्वीची शिल्लक नसल्याने त्यांनी ती निरंक घेतलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी या कार्यालयाने दर्शविलेली दि. ०१/०४/१९८५ ची शिल्लक कोषागाराकडे नसल्याने कोषागार प्रमाणित करुन देऊ शकत नाही.

उर्वरित तफावतीपैकी रु. ८,६८,८६१/- हे मा.महालेखाकार, मुंबई यांचेकडील

१) आदेश क्र.भनि/१०AG/TOB/SVB/२७९ DATE-२९/६/२०१० अन्वये श्री. ऐ.व्ही.जाधव यांची रक्कम रु. २,५४,७७८/-

२) आदेश क्र.भानि/१०AG/TOB/NASHIK/२८५ DATE-३०/६/२०१० अन्वये श्री.आर.ए.ढवळे यांची रक्कम रु. १,९६,९४३/-

३) आदेश क्र.भानि/१०AG/TOB/NASHIK/२८६ DATE-३०/६/२०१० अन्वये श्री. आर. एस. जावरे यांची रक्कम रु. ४,१७,१४०/-(एकूण रु ८,६८,८६१/- )

अन्वये या कार्यालयास प्राप्त झालेल्या भ.नि.नि.च्या रक्कमा जमा घेतल्या तथापि, कोषागाराने सदरच्या रक्कमा त्यांच्या लेख्यात जमा घेतल्या नाहीत. त्यामुळे या कार्यालयाची रक्कम जास्त दिसते. या विषयी कार्यालयाने वेळोवेळी कोषागारास खालील पत्रान्वये कळविलेले आहे. तसेच सदरची बाब मा.महालेखापाल मुंबई, मा. सहाय्यक संचालक लेखा व कोषागारे, नाशिक व मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा कोकण भवन, मुंबई यांना देखील लेखी अवगत करण्यात आली आहे.

याशिवाय रक्कम रु. ७०००/- (गट शिक्षणाधिकारी, पं.स.देवळा यांनी दि. २४ मार्च, २०११ रोजी भ.नि.नि.लेखाशिर्ष ८३३६ वर भरणा केलेली रक्कम) कोषागाराने जमा घेतलेली नाही.

तसेच रक्कम रु. ६५५५०/-(गटविकास अधिकारी पं.स. बागलाण यांनी गटविमा योजना लेखाशिर्ष ८०११ ची रक्कम रु. ४१,९४०/- दि. २९/४/२०११ व रु. २३,६१०/- दि. ०३/०५/२०११) तसेच गट शिक्षणाधिकारी पं.स.देवळा यांनी गटविमा योजना लेखाशिर्ष ८०११ ची रु.६००/- दि.२०/०५/२०११ रोजी भरणा केलेली आहे. परंतु या सर्व रक्कमा भ.नि.नि.च्या नसतांना कोषागाराने त्या भ.नि.नि. लेखाशिर्ष ८३३६ वर जमा घेतल्या आहेत. या विषयी या कार्यालयाने कोषागारास खालील प्रमाणे पत्रव्यवहार करुन व सक्षम कोषागारास रेकॉर्ड उपलब्ध करुन दिले आहे. तसेच मा.महालेखाकाराकडून दुरुस्ती ज्ञापन मंजूर करुन घेऊन शिल्लक कमी करण्यास विनंती केलेली आहे.

सदर तफावत दूर करणेबाबत कोषागार कार्यालयाला वेळोवेळी या कार्यालयाकडून खालील प्रत्र क्रमांक अन्वये व प्रत्यक्ष आवश्यक रेकॉर्ड दाखवून विनंती केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | जिपना/अर्थ/भनिनि/४३९/०९ | दि.२३/०६/०९ |
| २) | जिपना/अर्थ/भनिनि/४८४/०९ | दि.०२/०७/०९ |
| ३) | जिपना/अर्थ/भनिनि/६८७/०९ | दि.३०/०९/०९ |
| ४) | जिपना/अर्थ/भनिनि/८२/११ | दि.२८/०३/०९ |
| ५) | जिपना/अर्थ/भनिनि/६८७/०९ | दि.३०/०९/०९ |
| ६) | जिपना/अर्थ/भनिनि/४५५/११ | दि.०१/११/११ |
| ७) | जिपना/अर्थ/भनिनि/४७३/११ | दि.२३/११/११ |
| ८) | जिपना/अर्थ/भनिनि/४४/१२ | दि.२२/०२/१२ |
| ९) | जिपना/अर्थ/भनिनि/४३५/१२ | दि.२६/०६/१२ |
| १०) | जिपना/अर्थ/भनिनि/३२८/१२ | दि.३०/०५/१२ |
| ११) | जिपना/अर्थ/भनिनि/४३५/१२ | दि.२६/०६/१२ |
| १२) | जिपना/अर्थ/भनिनि/४८२/१२ | दि.१७/०७/१२ |
| १३) | जिपना/अर्थ/भनिनि/४४६/१३ | दि.१०/०६/१३ |
| १४) | जिपना/अर्थ/भनिनि/९२५/१३ | दि.२१/११/१३ |
| १५) | जिपना/अर्थ/भनिनि/२/८६९/१५ | दि.०४/०९/१५ |
| १६) | जिपना/अर्थ/भनिनि/२/१०६०/१५ | दि.१८/११/१५ |

प्रस्तुत तफावतीचे निराकरण करण्यासाठी सातत्याने सक्षम प्राधिका-याकडे या कार्यालयाने पत्रव्यवहार केलेला आहे. सदरची तफावत ही मुख्यतः तांत्रिक कारणास्तव असल्याने आणि या विषयी कोषागार कार्यालय/मा.महालेखाकार कार्यालयाने अंतिम निर्णय घ्यावयाचा असल्याने उपरोक्त खुलासा स्विकृत होऊन परिच्छेद मान्य व्हावा, ही विनंती.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ मे, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,ताळमेळ कोषगार हा मुद्दा यापुढे कधीही ऑडिटमध्ये येता कामा नये यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस विदित केले की, हा फरक सन १९८५ पूर्वीचा आहे. ८३३६ हे भविष्य निर्वाह निधीचे स्वतंत्र हेड सन १९९५ साली ओपन झालेले होते. कोषागार कार्यालयात दिनांक १/४/१९८५ रोजी हेड ओपन झालेले आहे. कोषागार कार्यालयाने आमचे बॅलन्स धरले नाही त्यामुळे भविष्य निर्वाह निधी रोखवही आणि कोषागार लेख्यातील शिल्लक रक्कम यात तफावत दिसून येते. ए.जी. कार्यालयाने निर्देश दिलेले आहेत की, की सन २००९ पर्यंतचे बॅलन्स कन्सिडर करावे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ऑडिटमध्ये ताळमेळ नाही असा आक्षेप आला तर त्यामध्ये कोठेतरी चुकीचे झालेले असते.

यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ओपनिंग बॅलन्समध्ये ही तफावत आहे. आमची बुक ॲडजेस्टमेंटची अडचण असून दुसरी कोणतीही अडचण नाही. आम्ही कोषागार कार्यालयाला वारंवार विनंती करीत आहोत की, आमचा फरक कोषागार कार्यालयाने कन्सिडर करावा. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ही धोरणात्मक बाब असल्यामुळे हा मुद्दा सचिवांच्या साक्षीला घेऊ. यावर स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, ८३३६ हेडची एकाच जिल्हा परिषदेची अडचण नसून सर्वच जिल्हा परिषदांची ही अडचण आहे. कोणत्याही परिस्थितीत रिकन्सीलेशन पूर्ण करुण फरक संपवावा, लेखे अद्ययावत करावेत या प्रकरणी चर्चा करुन मार्ग काढला पाहिजे. सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकच पध्दत आहे त्यामुळे दोघांनीही रिकन्सिलेशन केले पाहिजे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, हे दोन्ही विभाग तयार होत नसतील तर हा मुद्दा सचिवांच्या साक्षीला घेण्यात यावा. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस विदित केले की, आम्ही समन्वय करुन घेतो.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्द्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता नियम ५७ नुसार निधीची शिल्लक व कोषागार अभिलेख्यातील शिल्लक याचा ताळमेळ घेऊन लेखे जूळून घेणे आवश्यक असते.परंतू भविष्य निर्वाह निधीचे लेखाशिर्ष ८३३६ च्या शिल्लक रकमांचा ताळमेळ जूळत नसल्याची ही केवळ नाशिक जिल्हा परिषदेची अडचण नसून सर्वच जिल्हा परिषदांची आहे.समितीने निर्देश दिल्याप्रमाणे ताळमेळ पुर्ण करून फरक संपविण्यात यावा.त्याच प्रमाणे लेखे अद्ययावत करणे, सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकच पध्दत असल्याने जिल्हा परिषदेने व कोषागार कार्यालयाने दोघांतही रिकन्सिलेशन (ताळमेळ) करण्याकरिता धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असल्याने याबाबत विभागाने कोणती कार्यवाही केली आहे.

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१) प्रस्तुत आक्षेपात नमुद केलेली फरक रक्कम रु.४,८७,३५,४९४/- पैकी मा. महालेखाकार कार्यालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.deposit/ ८३३६-cd /Nashik/२०१७-१८/८६६ व ८६७ दि.०२/०१/२०१८ अन्वये दि.०१/०४/१९८५ ची सुरूवातीची शिल्लक रु.४,७९,२५,७८३/- ही कोषागार कार्यालय, नाशिकला त्यांचेकडील भविष्य निर्वाह निधी लेख्यांत जमा घेण्याबाबत आदेशित केले आहे. त्यानुसार कोषागार कार्यालय, नाशिकने त्यांचेकडील पत्र क्र. कोष/ठेव/कावि/८३३६/१५६/२०१७ दि.०५/०१/२०१८ च्या पत्रान्वये सदरची रक्कम माहे जानेवारी, २०१८ मधे जमा दर्शविण्यात येईल असे जिल्हा परिषद, नाशिकला कळविले आहे.

२) दि.०१/०४/१९८५ ची सुरुवातीच्या तफावतीशिवाय उर्वरित तफावतीपैकी रु.८,६८,८६१/- ही रक्कम सन २०१०-११ मध्ये मा. महालेखाकार, मुंबई यांचेकडील माहे जुन २०१० च्या प्राप्त आदेशान्वये जिल्हा परिषद भ.नि.नि.लेख्यात जमा घेतलेली आहे. परंतु कोषागार कार्यालय नाशिकने जमा घेतलेली नव्हती. तद्नंतर मा. महालेखाकार, मुंबई यांचेकडील दि.०३/०५/२०१६ च्या आदेशान्वये सदरची रक्कम रु.८,६८,८६१/- कोषागार कार्यालयाने माहे मे २०१६ रोजी त्यांचेकडील लेख्यांत जमा करुन घेतली आहे.

३) उर्वरीत तफावत रक्कम रु.७३१५०/-(७०००+२३६१०+४१९४०+६००) बाबत कोषागार कार्यालयाने दुरुस्ती करणे बाबतचे दुरुस्ती ज्ञापन क्र. कोष / ठेव / कावी / ६८६ /२०१५ /६४७४ /दि.१८/१२/२०१५ अन्वये मा. महालेखाकार कार्यालय, मुंबई यांना पाठविले आहे. त्यानुसार मा. महालेखाकार कार्यालय, मुंबई यांनी दि.०४/०९/२०१७ च्या पत्रान्वये कार्यवाही चालु असलेल्याबाबत कळविले आहे. तद्नंतर कोषागार कार्यालयाने पुनश्चः दुरुस्ती ज्ञापन क्र. कोष / ठेव / कावी / ८३३६ / १७२ / २०१७ दि. ०६/०१/२०१८ अन्वये मा. महालेखाकार कार्यालय, मुंबई यांना पाठविले आहे.

एकूण तफावत रक्कम रू.४,८७,३५,४९४/- पैकी रू.७३१५०/-ची तफावत असून सदर रक्कमेचे दुरूस्ती ज्ञापन मा.महालेखाकार कार्यालय,मुंबई यांचेकडून प्राप्त होताच सदर तफावत निरंक होईल.

तरी उपरोक्त खुलासा स्विकृत करून परिच्छेद वगळणेस विनंती.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्रायः-** (आस्था-१०) जिल्हा परिषद नाशिक यांनी सदर प्रकरणी कार्यवाही केलेली आहे.जि.प.नाशिक यांनी दिलेल्या अभिप्रायाशी सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने नाशिक जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता नियम ५७ नुसार निधीची शिल्लक व कोषागार अभिलेख्यातील शिल्लक याचा ताळमेळ घेऊन लेखे जूळून घेणे आवश्यक असते.परंतू भविष्य निर्वाह निधीचे लेखाशीर्ष ८३३६ च्या शिल्लक रकमांचा ताळमेळ जूळत नसल्याची ही केवळ नाशिक जिल्हा परिषदेची अडचण नसून सर्वच जिल्हा परिषदांची आहे.समितीने निर्देश दिल्याप्रमाणे ताळमेळ पुर्ण करून फरक संपविण्यात यावा.त्याच प्रमाणे लेखे अद्ययावत करणे सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकच पध्दत असल्याने जिल्हा परिषदेने व कोषागार कार्यालयाने दोघांतही रिकन्सिलेशन (ताळमेळ) करण्याकरिता धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असल्याने याबाबत विभागाने कोणती कार्यवाही केली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की हे १९८५ ला ओपन झाले होते. यामध्ये ४.८७ लाख बॅलन्स ओढला गेला नव्हता. आता तो ओढला जातो. त्यामुळे आता ती तफावत आहे. तो कप्लायन्स होत आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याची पुरवठा योजना, विहिरी, खेड्यातील रस्ते, प्राथमिक आरोग्य केंद्रे, प्राथमिक शाळा, इमारती इत्यादी सारख्या स्थानिक व सामुहिक विकासाच्या जिल्हा परिषद शासकीय व अभिकरण निधीतील योजनांना ज्या वर्षी मंजूरी दिली जाते त्या वर्षातच ती कामे पूर्ण होण्याची शासनाची अपेक्षा असते.

सन १९८५ ते २०१४ या कालावधीचा ताळमेळ कोषागार कार्यालयात घेण्यात आला असता दिनांक १ एप्रिल, १९८५ रोजी रुपये ४,७९,२५,७८३/- शिल्लक रक्कम जिल्हा परिषदेकडून दाखविण्यात आली, परंतू कोषागार कार्यालयाने ती निरंक असल्याचे दर्शविल्याने तफावत दिसून येते. सदरची बाब सहाय्यक संचालक, लेखा व कोषागारे, नाशिक व मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा यांना देखील अवगत करण्यात आली आहे. तसेच पंचायत समिती, देवळा यांचा भविष्य निर्वाह निधी लेखाशीर्ष ८३३६ आणि पंचायत समिती, बागलाण यांनी गट विमा योजना लेखाशीर्ष ८०११ ची एकूण रुपये ६५,५५०/- या रक्कमेबाबत महालेखाकाराकडून दुरुस्ती करुन ज्ञापन मंजूर करुन शिल्लक कमी करण्यास दिनांक २३ जून, २००९ ते दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत १६ वेळा पत्रे पाठविण्यात आली असता तांत्रिक कारणास्तव अंतिम निर्णय घ्यावयाचा आहे. अशी माहिती देण्यात आली. तसेच सन २००९ पर्यंतची रक्कम समायोजित करावी अशी माहिती प्राप्त झाली आहे. दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजीच्या महालेखाकार, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना एकूण तफावत रक्कम रुपये ४,८७,३५,४९४/- पैकी रुपये ७३,१५०/- च्या रक्कमेचे दुरुस्ती ज्ञापन प्राप्त झाल्यानंतर सदर तफावत निरंक समजण्यात येईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस आश्वाासित केले.

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता नियम ५७ नुसार निधीची शिल्लक व कोषागार अभिलेख्यातील शिल्लक याचा ताळमेळ घेऊन लेखे जुळून घेणे आवश्यक आहे. समितीने निर्देश दिल्याप्रमाणे ताळमेळ पूर्ण करुन फरक संपुष्टात आणावा आणि जिल्हा परिषद व लेखा कोषागार कार्यालयाने आपसात ताळमेळ साधुन लेखे जुळवून घेण्यासंदर्भात आवश्यक तो निर्णय घ्यावा, अशी समितीची शिफारस आहे.याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांत पाठविण्यात यावा.**

## प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, नाशिक

## पंचायत समित्यांमधील अफरातफर व गैरव्यवहाराबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.१०४०/५/९ (सन २००८-२००९)**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबीचे स्वरुप | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्र. | गुंतलेली रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| ५ | अपहार प्रकरणे | नाशिक | सामान्य प्रशासन | ९ | ४,१८,५५,२३३/- |
| | अपहार प्रकरणे | नाशिक | सामान्य प्रशासन | ३० | १५,८७,४५६/- |
| | अपहार प्रकरणे | नाशिक | सामान्य प्रशासन | ३२ | ५,८१,१६१/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २००८-२००९ ची ग्रामनिधी/जरोयो अफरातफर प्रकरण नोंदवही स्थानिक निधी लेखा विभाग नाशिक यांचेकडील विवरणपत्रातील आजअखेर ताळमेळ घेण्यात आला आहे.

**परिच्छेद क्रमांक ९:-** जिल्हा परिषद नाशिक मध्ये दिनांक ३१ मार्च, २००९ अखेरपर्यंत ग्रामनिधीचे ३६८ व जरोयोची २४७ गैरव्यवहारासंबंधातील अशी एकूण ६१५ प्रकरणे प्रलंबित होती.

ग्रामनिधीच्या ३६८ प्रकरणांमध्ये रुपये २,०५,९९,४९३.९२ व जरोयोच्या २४७ प्रकरणांमध्ये रक्कम रुपये २,१२,५५,७३९.५० अशी एकूण ६१५ प्रकरणात रुपये ४,१८,५५,२३३.४२/- इतकी रक्कम गुंतली होती.

स्थानिक निधी लेखा विभागाच्या रजिस्टरनुसार प्रत्यक्ष ताळमेळ घेऊन ग्रामनिधीची ११६ प्रकरणे निकाली काढण्यात आलेली असून रुपये ३७,१६,८५४ इतकी रक्कम वसुल करण्यात आली आहे व जवाहर रोजगार योजनेची १३ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून रुपये १,४०,५५२/- इतकी रक्कम वसुल करण्यात आली आहे.

वरील सर्व प्रकरणात गटविकास अधिकारी यांना संबंधितांकडून वसुल करुन संबधितावर कारवाई करणेबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत खालील प्रमाणे पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

१) या कार्या पत्र क्र साप्रवि/ग्राप/संकीर्ण/३४३/१० दि. २१/१०/१०
२) या कार्या पत्र क्र साप्रवि/ग्राप/संकीर्ण/३५३/१० दि. २७/१०/१०
३) या कार्या पत्र क्र साप्रवि/ग्राप/संकीर्ण/३६७/१० दि. १/११/११
४) साप्रवि/ग्रापं/संकीर्ण-१/७७/११, नाशिक दि.१६/०३/११
५) का.दा.नो.साप्रवि/ग्रांप/संकीर्ण-१/११८ ते १३३/११ नादि ०५/०५/११
६) का.दा.नो.साप्रवि/ग्रांप/संकीर्ण-१/२१७ ते २३२/११ नादि- २८/७/११
७) साप्रवि/ग्रापं/संकीर्ण-१/२३५/१२, नाशिक दि.१२/१२/१२
८) अ.शा.क्र.साप्रवि/ग्रांप/अफरातफर/४२१/१३ नाशिक दि.१३/१२/१३
९) का.दा.नो.साप्रवि/ग्रांप/अफरातफर/७१ ते ८६/१४ दि. १५/०३/१४
१०) साप्रवि/ग्रापं/अफरातफर/३८३/२०१४ दि.१६/१२/२०१४
११) साप्रवि/ग्रापं/अफरातफर/३० ते ४४/१४ दि.२७/०१/२०१५
१२) का.दा.नो.साप्रवि/ग्रापं/अफरातफर/७१ ते ८५/१५ दि.१०/०३/१५
१३) साप्रवि/ग्रापं/अफरातफर/१६१ ते १७४/१५ दि.३०/०६/१५
१४) साप्रवि/ग्रापं/अफरातफर/२२४ ते २३८/१५ दि.१४/१०/१५

सर्व गट विकास अधिकारी यांना या बाबत गट स्तरावर वसुल करुन संबंधितांवर कारवाई करणे बाबत सुचना देण्यात आल्या आहेत. वसुल न होणा-या रक्कमांबाबत हयात असलेल्या संबंधित ग्रा.से./ग्रा.वि.अधि. यांचेवर फौजदारी गुन्हे दाखल करणे बाबत सक्त सुचना देण्यात आल्या आहे. तसेच मयत कर्मचा-यांच्या व्यक्तींच्या (मयत, सेवानिवृत्त, बडतर्फ सक्तीने सेवानिवृत्त) मालमत्तेवर (जमिन/मिळकत) यावर शासन परिपत्रकानुसार मिळकतीवर बोजा चढविण्याची कार्यवाही करणेच्या सुचना गटस्तरावर देण्यात आलेल्या आहे.

**परिच्छेद क्रमांक ३० :- थकीत अफरातफर प्रकरणांबाबत**

१) **पंचायत समिती, पेठ गटातील ग्रामनिधीच्या** एकूण १४ प्रकरणांत ५,६७,०६३/- इतकी रक्कम गुंतलेली होती. त्यापैकी ८ प्रकरणामधील रक्कम रुपये १,४८,५५५/- इतकी वसुली करण्यात आली असून पैकी ६ प्रकरणे निकाली निघालेली असून त्यांची रक्कम रुपये ७९,०४९/- असून प्रकरणे निकाली काढण्यासाठी स्थानिक निधी लेखा विभागाकडे पाठविण्यात आली आहे. उर्वरित ६ प्रकरणांची रक्कम रुपये ४,१८,५०८/- इतकी रक्कम वसुल करणे बाकी आहे.

संबंधित जबाबदार असलेले ग्रामसेवक/सरपंच/कर्मचारी यांना रक्कम वसुल करणेसाठी फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. वसुलीबाबत कार्यवाही सुरु आहे.

२) जवाहर रोजगार योजनेची पेठ गटातील १३ प्रकरणे असुन त्यात ६,४०,३१३/- इतकी रक्कम गुंतलेली होती. पैकी ६ प्रकरणाची रक्कम रुपये १,६८,५६२/- वसुली करण्यात आली असून सदरची प्रकरणे निकाली काढण्यासाठी स्थानिक निधी लेखा विभागाकडे पाठविण्यात आली असून एक प्रकरण निकाली निघाले असून उर्वरित ७ प्रकरणांमध्ये ४,७१,७५१/- इतकी रक्कम गुंतलेली असून संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकांना अपहारीत रक्कम भरण्यासाठी नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. वसुलीबाबत कार्यवाही सुरु आहे.

**परिच्छेद क्रमांक ३२ :-**पंचायत समिती, मालेगांव गटातील ग्रामनिधी व जवाहर रोजगार योजना याची एकूण ३९ प्रकरणे प्रलंबित होती व त्यामध्ये ग्रामनिधीची ४,२२,१०८.८५/- व जरोयोची १,६४,०५३.००/- इतकी अशी एकूण रक्कम रुपये ५,८६,१६१.८५/- इतकी रक्कम गुंतलेली होती. त्यापैकी ग्रामनिधीच्या प्रकरणातील ३,९५,५९९/- व जवाहर रोजगार योजनेच्या प्रकरणातील ७३,४२१/- अशी एकूण ४,६९,०२०/- इतकी रक्कम वसुल करण्यात आली असून रक्कम रुपये १,१७,१४१.८५/- वसुल करणे बाकी आहे. वरील सर्व प्रकरणात गटविकास अधिकारी यांना संबंधिताकडून वसुल करुन संबंधितांवर कारवाई करणेबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच संबंधितावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत खालील प्रमाणे पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

१) या कार्या पत्र क्र साप्रवि/ग्राप/संकीर्ण/३४३/१० दि. २१/१०/१०
२) या कार्या पत्र क्र साप्रवि/ग्राप/संकीर्ण/३५३/१० दि. २७/१०/१०
३) या कार्या पत्र क्र साप्रवि/ग्राप/संकीर्ण/३६७/१० दि. १/११/११
४) साप्रवि/ग्रापं/संकीर्ण-१/७७/११, नाशिक दि.१६/०३/११
५) का.दा.नो.साप्रवि/ग्रांप/संकीर्ण-१/११८ ते १३३/११ नादि ०५/०५/११
६) का.दा.नो.साप्रवि/ग्रांप/संकीर्ण-१/२१७ ते २३२/११ नादि- २८/७/११
७) साप्रवि/ग्रापं/संकीर्ण-१/२३५/१२, नाशिक दि.१२/१२/१२
८) अ.शा.क्र.साप्रवि/ग्रांप/अफरातफर/४२१/१३ नाशिक दि.१३/१२/१३
९) का.दा.नो.साप्रवि/ग्रांप/अफरातफर/७१ ते ८६/१४ दि. १५/०३/१४
१०) साप्रवि/ग्रापं/अफरातफर/३८३/२०१४ दि.१६/१२/२०१४
११) साप्रवि/ग्रापं/अफरातफर/३० ते ४४/१४ दि.२७/०१/२०१५
१२) का.दा.नो.साप्रवि/ग्रापं/अफरातफर/७१ ते ८५/१५ दि.१०/०३/१५
१३) साप्रवि/ग्रापं/अफरातफर/१६१ ते १७४/१५ दि.३०/०६/१५
१४) साप्रवि/ग्रापं/अफरातफर/२२४ ते २३८/१५ दि.१४/१०/१५

सर्व गट विकास अधिकारी यांना या बाबत गट स्तरावर वसुल करुन संबंधितांवर कारवाई करणे बाबत सुचना देण्यात आल्या आहेत. वसुल न होणा-या रक्कमांबाबत हयात असलेल्या संबंधित ग्रा.से./ग्रा.वि.अधि. यांचेवर फौजदारी गुन्हे दाखल करणे बाबत सक्त सुचना देण्यात आल्या आहे. तसेच मयत कर्मचा-यांच्या व्यक्तींच्या (मयत, सेवानिवृत्त, बडतर्फ सक्तीने सेवानिवृत्त) मालमत्तेवर (जमिन/मिळकत) यावर शासन परिपत्रकानुसार मिळकतीवर बोजा चढविण्याची कार्यवाही करणेच्या सुचना गटस्तरावर देण्यात आलेल्या आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ मे, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,सामान्य प्रशासन विभागातील ग्रामनिधीची ३६८ प्रकरणे व जवाहर रोजगार योजनेची २४७ अशी एकूण ६१५ प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे. थकीत रकमेपैकी ग्रामनिधीची १८ टक्के व जवाहर रोजगार योजनेची ०.६६ टक्के इतकी कमी वसुली होण्याची कारणे काय आहेत, सदर वसुलीसंबंधी जिल्हा परिषदेने अक्षम्य दुर्लक्ष का केले ? यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं) यांनी समितीस विदित केले की, ग्रामनिधीच्या ११६ प्रकरणांमध्ये ३७,१६,८५४/- रुपये इतकी रक्कम वसूल करुन त्यासंबंधी स्थानिक निधी लेखा विभागाकडून क्लिअरन्स घेतलेला आहे. तसेच जवाहर रोजगार योजनेच्या १३ प्रकरणांमध्ये १.४० लक्ष रुपयांची वसुली करुन स्थानिक निधी लेखा विभागाकडे सादर केली आहे. जवाहर रोजगार योजनेच्या ८८ प्रकरणांमध्ये ५९,९५,२६४/- रुपयांची रक्कम वसूल करुन क्लिअरन्स करण्यासाठी स्थानिक निधी लेखा विभागाकडे सादर केली आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, जवाहर रोजगार योजनेअंतर्गत किती रक्कम वसूल पात्र होती. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं) यांनी समितीस विदित केले की, जवळपास दीड कोटी रुपयांपर्यंत सदर रक्कम आहे. तसेच ग्रामनिधीच्या ३४ प्रकरणांमध्ये जवळपास ५७,८६,२५७ रुपयांची वसुली केली आहे. जवाहर निधीच्या ७ प्रकरणांत ७ लाख ३५ हजार रुपये ही मागची वसुली होती. ४१ प्रकरणांत ६३ लाख रूपये वसुली झाली आहे. ४ कोटी १८ लाख रूपयांपैकी रू.१,९३,७५,८१७/- इतकी रक्कम वसूल केली आहे. कार्यवाहीमध्ये संबंधित जबाबदार ग्रामसेवकांकडून पैसे भरून घेतो. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, किती वर्षांची रक्कम आहे, आपण पूर्ण रक्कम घेता की पगारात वसुली करता, समितीचा प्रश्न असा आहे की, ग्रामसेवकांची ही योजना चांगली आहे की, एक कोटी-दीड कोटी रूपये काढून घ्यायचे आणि विनाव्याजी पगारातून वसूल करू द्यायचे आपण याकडे गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता आहे.यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं) यांनी समितीस विदित केले की, बरीचशी प्रकरणे सन १९६१-६२ ची आहेत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, आपण वसुली केली आहे हे बरोबर आहे. मात्र ही अफरातफर होती. आपण संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल केले पाहिजेत. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं) यांनी समितीस विदित केले की, ग्राम निधीच्या १८ प्रकरणांत फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत, त्यामध्ये ४३ लाख ३७ हजार रूपये गुंतले आहेत. जवाहर रोजगार योजनेच्या ७ प्रकरणांतही गुन्हे दाखल केले आहेत, त्यामध्ये ५ लाख ३५ हजार रूपये गुंतले आहेत. गुन्हे दाखल करताना अडचण होते, ते वसुली करु देत नाहीत. त्यामुळे ती रक्कम तशीच राहते. आता वसुली केली आहे. मात्र मोठ्या रकमेच्या वसुलीमध्ये अडचण येते. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, मोठी रक्कम असेल तर निश्चितच फौजदारी कारवाई करावी. लहान रक्कम असेल तर तात्काळ प्रशासकीय कारवाई करून वेतनाच्या माध्यमातून वसुली करता येऊ शकते. अफरातफरचे पैसे वसूल होण्याची आवश्यकता आहे. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं) यांनी समितीस विदित केले की, ४३ प्रकरणांत विभागीय चौकशी केली आहे. काही संबंधितांना मूळ वेतनावर आणले आहे तर संबंधित २ जणांच्या २ वेतनवाढी कायमस्वरूपी बंद केल्या आहेत. यावर समितीने पुढे असे निदेश दिले की, आपल्याकडून कालबध्दरितीने कारवाई झाली पाहिजे. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं) यांनी समितीस विदित केले की, सन १९६० ते सन १९६८ ची जुनी प्रकरणे आहेत. त्यामुळे वसुली कमी झालेली आहे. संबंधित जबाबदार हयातही नाहीत. यावर समितीने पुढे असे आदेश दिले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संदर्भात आढावा घ्यावा. सदर प्रकरणांत वेतनवाढ रोखता येते का, एफआयआर करता येतो का ते पहावे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी समितीस होकारार्थी आश्वासित केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

पंचायत समिती, दिंडोरी गैरव्यवहाराच्या प्रकरणात गुंतलेली परंतू वसूल होणे बाकी असलेली रक्कम किती आहे.सदरहू रक्कम वसुल करण्याकरिता जिल्हा परिषद प्रशासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे व वसुलीस होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामनिधी प्रकरणे :-**

१) पंचायत समिती, दिंडोरी ग्रामनिधीच्या एकूण २५ प्रकरणामध्ये रक्कम रू.६,९४,२२१/-रक्कम गुंतलेली आहे. २) १३ प्रकरणामध्ये एकूण गुंतलेली रक्कम रूपये १,२६,४६८/-इतकी रक्कम वसुली करण्यात आली असून व ५ प्रकरणात रु.१,४५,८७०/-इतकी रक्कम समायोजित करण्यात आली आहे.एकूण वसूल रक्कम २,७२,३३८/-रूपये. ३) ६ प्रकरणात रक्कम रूपये २,९८,४५४/-वसूल करणे बाकी आहे.

४) वरखडे ता.दिंडोरी हे प्रकरण पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल असल्याने न्याय प्रविष्ठ आहे त्याची रक्कम रूपये १,२३,४२९/-जरोयो प्रकरणे :-

१) जरोयो चे एकूण १६ प्रकरणामध्ये रक्कम रूपये २४,९७,८११/-रक्कम गुंतलेली आहे. २) ६ प्रकरणात एकूण गुंतलेली रक्कम रूपये ५,८०,७२४/-पैकी रुपये ४,६६,२४४/- इतकी रक्कम वसूली करण्यात आली असून व ३ प्रकरणात रुपये १,१४,४८०/-इतकी रक्कम समायोजित करण्यात आली आहे. ३) वरखेडा ता.दिंडोरी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल असल्याने न्यायप्रविष्ठ आहे त्याची रक्कम रुपये २,०४,०००/-

४) ३ प्रकरणे संबधिताच्या मालमत्तेवर बोजा दाखल करण्यात आला असून रक्कम रूपये २,९३,६५५/-

५) ६ प्रकरणात रक्कम रूपये १४,४९,४३२/- वसूल करणे बाकी आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय** :-ग्रामविकास विभागाचे अभिप्राय (वित्त-७):- जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यावाहीशी शासन सहमत आहे.

**सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय:**-सदर बाब ही पंचायत समिती मधील अफरातफर आणि गैरव्यवहाराबाबतची आहे.सामन्य प्रशासन विभागाकडून केवळ शासकीय कर्मचा-याच्या शिस्तभंग विषयक बाबींच्या अनुषंगाने तरतूदी विहित केल्या जातात.महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम १३ (चार) मधील तरतूदीनुसार शासकीय कर्मचा-याचा मृत्यू झाल्यानंतर त्याच्या विरूध्दची शिस्तभंगाची कारवाई तात्काळ संपुष्टात आणली जाते. त्यामुळे अशा कर्मचा-यांच्याविरूध्द शासकीय हानी वा अफरातफरीच्या रकमेच्या वसुलीचे दोषारोप असले तरी त्या रकमेची शिक्षा म्हणून वसूली करता येत नाही.

गैरव्यवहारामध्ये अंतर्भूत असलेल्या रकमेच्या वसूलीचे दोषारोप ठेवून शासकीय कर्मचा-याविरूध्द शिस्तभंगाची कारवाई केल्यास त्या वसूलीसंबधीचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असले तरी शिस्तभंग विषयक कार्यवाहीत अफरातफर / गैरव्यवहाराचे दोषारोप सिध्द होत असल्यास वसूली करता येते.

जिल्हा परिषदेअंतर्गत कार्यरत असलेल्या कर्मचा-याच्या अनियमितताबाबतच्या कार्यवाहीची प्रकरणे ही महाराष्ट्र जिल्हा परिषद,जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६४ अन्वये हाताळली जातात.जिल्हा परिषद कर्मचा-यांच्या शिस्तभंगविषयक बाबी दंड वसूलीच्या /अफरातफर / गैरव्यवहार या अनुषंगाने कोणतेही आदेश सामान्य प्रशासन विभागाकडून विहित केले जात नाहीत. जिल्हा परिषदेअंतर्गत घडलेल्या काही अनियमिततांच्या प्रकरणात राज्य शासकीय अधिका-याचा समावेश असला तरी त्या प्रकरणांचा तपशिल हा ग्राम विकास विभागाकडेच उपलब्ध असतो.सदर मुद्यात नमूद प्रकरणातील कार्यवाहीची माहिती संबंधित प्रशासकिय विभाग म्हणून ग्रामविकास विभागाकडून प्राप्त होऊ शकेल.सदर बाबींशी या विभागाचा संबंध नसल्याने संबंधित प्रशासकिय विभाग म्हणून ग्रामविकास विभागाकडे हस्तांतरित करण्यात येत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने नाशिक जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,पंचायत समिती दिंडोरी गैरव्यवहाराच्या प्रकरणात गुंतलेली परंतू वसूल होणे बाकी असलेली रक्कम किती आहे. सदरहू रक्कम वसुल करण्याकरिता जिल्हा परिषद प्रशासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे व वसुलीस होणा-या विलंबाची कारणे काय आहेत. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, प्रत्येक पंचायत

समिती संबंधात त्यांनी किती रक्कम वसूल केली आहे. किती पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल आहे अशा प्रकारची तपशीलवार माहिती दिलेली आहे. जिल्हा परिषदेचे जवळ जवळ सर्वच प्रकरणांमध्ये कारवाई केलेली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी समितीस विदित केले की, दिंडोरी पंचायत समितीमध्ये गुंतलेली रक्कम रुपये २,७२,३३८/- वसूल केलेली आहे. अद्याप रक्कम रुपये २,९८,४५४/- वसूल करावयाचे आहेत. वरखेडा ता. दिंडोरी या प्रकरणी पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, ही ६ प्रकरणे केव्हाची आहेत, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांनी समितीस विदित केले की, एकूण २५ प्रकरणे आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, ही प्रकरणे कधी पासूनची आहेत, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांनी समितीस विदित केले की, सन १९९१-१९९२ पासुनची ही प्रकरणे आहेत. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, सगळी प्रकरणे ही सन २०१२-२०१३ पूर्वीची आहेत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ही सर्व २६ वर्षापूर्वीची प्रकरणे आहेत. या प्रकरणातील रक्कम वसूल करण्यास कोणती अडचण आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांनी समितीस विदित केले की, वरखेडा, ता.दिंडोरी प्रकरणात पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. यात एकूण रक्कम रुपये १,२३,४२९/- इतकी रक्कम गुंतलेली आहे. सदर प्रकरण हे न्यायप्रविष्ट आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, उर्वरित ५ प्रकरणांची सद्यःस्थिती काय आहे, ते कर्मचारी निवृत्त झाले आहेत काय, यात बोजा चढविण्याचा विषय आहे, ते केले आहे काय, मयत कर्मचा-यांकडे गैरव्यवहारातील रक्कम वसूल होणे बाकी आहे. त्यास कोणता पर्याय आहे, मयत कर्मचा-याच्या वारसाला पेन्शन सुरु असणार. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांनी समितीस विदित केले की, फॅमिली पेन्शन सुरु आहे. आम्ही वसुलीचे आदेश काढलेले आहेत. आम्ही इन्स्टॉलमेंटने रक्कम वसूल करीत आहोत. यावर समितीने पुढे विचारणा केली की, या प्रकरणाला २६-२७ वर्षे झाली आहेत. यात फार उशीर झालेला आहे. दोन-पाच वर्षाचा कालावधी कोणीही मान्य करेल. याचा अर्थ रक्कम वसूल करण्यासाठी काहीच पाठपुरावा करण्यात आलेला नाही. शासनाला सहकार्य, मदत व्हावी म्हणून सचिवांना नेमलेले आहे. समितीला देखील शासनाला मदत, सहकार्य व्हावे यासाठी नेमलेले आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, कोणाकडून रक्कम वसूल करणे शक्यच नसेल तर चर्चा करुन ती रक्कम निर्लेखित करण्यात येईल.

## अभिप्राय व शिफारशी

दिनांक ३१ मार्च, २००९ अखेर पर्यंत ग्रामनिधी व जवाहर रोजगार योजनेच्या गैरव्यवहारासंबंधातील एकूण ६१५ प्रकरणे असून त्यात एकूण गुंतलेली रक्कम रुपये ४,१८,५५,२३३.४२ इतकी आहे. स्थानिक निधी लेखा परिक्षण विभागाने एकूण १२९ प्रकरणे निकाली काढली असून त्यात रुपये ३८,५७,४०६/- इतक्या रक्कमेची वसुली करुन संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यासाठी दिनांक २१ ऑक्टोबर, २०१० ते दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत १४ वेळा पत्रव्यवहार केला आहे.

अपहार केलेली रक्कम जर वेळीच वसुल होत नसेल तर ही बाब योग्य नाही अशी खंत समितीने व्यक्त केली.सर्व गटविकास अधिका-यांनी गट स्तरावर वसुली करावी व वसुल न होणा-या रकमांबाबत हयात असलेल्या संबंधित ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकारी यांचेविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत तसेच **मयत कर्मचा-यांच्या तसेच ज्या व्यक्ती सेवानिवृत्त, बडतर्फ किंवा सक्तीने सेवानिवृत्त झालेल्या आहेत अशा व्यक्तींच्या मालमत्तेवर जसे की जमीन किंवा मिळकत यावर शासन परिपत्रकानुसार बोजा चढविण्याची कार्यवाही करण्याच्या सुचना गट स्तरावर देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे तसेच संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी.**

पंचायत समिती, पेठ गटातील ग्रामनिधीच्या एकूण १४ प्रकरणात रुपये ५,६७,०६३/- इतकी रक्कम गुंतलेली होती, त्यापैकी ८ प्रकरणातील रक्कम रुपये १,४८,५५५/- एवढी वसुली करण्यात आलेली आहे. **उर्वरित ६ प्रकरणांची वसुली रक्कम रुपये ४,१८,५०८/- इतकी वसुली करण्यात यावी व संबंधित जबाबदार असलेल्या ग्रामसेवक, सरपंच व कर्मचारी यांचेवर रक्कम वसुल करणेसाठी फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार वसुली करण्यासाठी मालमत्तेवर किंवा जमिनीवर बोजा चढविण्यात यावा व रक्कम वसुली करण्यात यावी. वसुलीची रक्कम अद्याप प्राप्त नसल्यास संबंधितांवर निश्चित केलेल्या जबाबदारीनुसार पुढे केलेल्या कारवाईची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.**

जवाहर रोजगार योजनेची पेठ गटातील १३ प्रकरणे असून त्यात रुपये ६,४०,३१३/- इतकी रक्कम गुंतलेली होती त्या पैकी ६ प्रकरणांची रक्कम रुपये १,६८,५६२/- वसुली करण्यात आली असून उर्वरित ७ प्रकरणांमध्ये गुंतलेली रक्कम रुपये ४,७१,७५१/- वसुल करण्यात यावी व **संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकांना अपहारीत रक्कम भरण्याबाबत नोटीस बजाविण्यात यावी व वसुलीबाबतची कार्यवाही करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी.**

पंचायत समिती, मालेगांव गटातील ग्रामनिधी व जवाहर रोजगार योजना याची एकूण ३९ प्रकरणे प्रलंबित होती. सदर ३९ प्रकरणांत एकूण रक्कम रुपये ५,८६,१६१.८५/- इतकी रक्कम गुंतलेली होती. त्यापैकी रुपये १,१७,१४१/- एवढी वसुली करणे बाकी आहे. **वरील सर्व प्रकरणांत गटविकास अधिकारी यांनी संबंधितांकडून रक्कम वसुल करण्यासाठी संबंधितांच्या मालमत्तेवर किंवा जमिनीवर बोजा चढविण्याबाबतची कार्यवाही करावी व रक्कम वसुल करण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी.**

## प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, नाशिक

## अपूर्ण स्थितीतील बांधकामे

**परिच्छेद क्रमांक ४.३९४ - १४ ते २६ (सन २०११-२०१२)**

**परिच्छेद क्र. ४.३९४ (१४)**

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याची पुरवठा योजना, विहिरी, खेड्यातील रस्ते, प्राथमिक आरोग्य केंद्रे, प्राथमिक शाळा, इमारती इ. सारख्या स्थानिक विकासाच्या व सामुहिक विकासाच्या बांधकामांसाठी योजनेअंतर्गत तरतुदींतून अर्थसहाय्य देण्यात येते. अर्थ सहाय्याच्या रकमेमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती यांनी त्यांच्या हिस्सा घालून व स्थानिक भागातून लोकवर्गणी हिस्सा (श्रमदान अगर रोखस्वरुपात) घालून सदर बांधकामाला ज्या वर्षी मंजूरी दिली जाते त्यावर्षात पुर्ण करण्याची शासनाची अपेक्षा असते. ही कामे सर्वसाधारणपणे ग्रामपंचायतीच्या अभिकरणामार्फत पार पाडली जातात. परंतू वस्तुस्थिती पाहता सदर बांधकामांना शासनाचे जेवढे अर्थसहाय्य मिळते तेवढ्याच रकमेचे बांधकाम पुर्ण करुन उर्वरीत काम पुर्ण केले जात नाही. अशी अपुर्ण अवस्थेत राहिलेली बांधकामे, वर्षानुवर्षे पडून असतात. त्यामुळे त्या बांधकामांत गुंतलेला पैसा निरर्थक अडकून पडतो. त्याचप्रमाणे स्थानिक जनतेला विकासाचा लाभ मिळू शकत नाही. तसेच अशी बांधकामे फार काळ अपुर्णावस्थेत राहिल्याने त्यांची पडझड होण्याची शक्यता जास्त असते. यास्तव जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी योजनांतर्गत अथवा योजनेतर विकास कार्यक्रमांप्रमाणे हाती घेतलेली कामे अपुर्ण अवस्थेत पडुन राहणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

उदा. लेखापरिक्षणाच्या वेळी पंचायत समित्यांनी पुरविलेल्या माहितीनुसार अशा प्रकारे अपुर्ण अवस्थेत पडून असलेल्या ३१ मार्च, २०१२ अखेर बांधकामाचा तक्ता पुढील प्रमाणे दिलेला आहे.

| अ. क्र | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र. | गुंतलेली रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १४ | नाशिक | नाशिक | ५५ | — |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) प्रस्तुत प्रकरण परिशिष्टामध्ये १६ विहिरी दाखविल्या आहेत. परंतु १ नाव परिशिष्टात दुबार झाल्याने प्रत्यक्षात १५ विहिरी अपुर्ण होत्या, प्रशासकीय मान्यतेच्या दिनांकापासून २ महिन्याच्या आत कामे सुरू करण्यात आलेली होती. परंतु वेळेवर अनुदान उपलब्ध झाले नसल्याने तसेच लाभार्थीची परिस्थिती दुर्बल असल्यामुळे विहिर वेळेवर पुर्ण झालेल्या नाही. परंतु आज अखेर सर्व विहिरी पुर्ण आहे.

(२) एकूण १६ विहिरी पैकी एक विहिरी दुबार नाव झालेले आहे. म्हणजेच १५ विहिरी पैकी प्रत्यक्षात ७ विहिरी पुर्ण होत्या, परंतु अनुदानाअभावी अपुर्ण दिसत होत्या. तसेच ८ विहिरी बहुतांशी पुर्ण होत्या व त्या सर्व विहिरीचा प्रत्यक्षात लाभार्थींना सिंचनाचा लाभ होतो, त्यामुळे सदर विहिरीचा खर्च व्यर्थ गेला नसल्याने लाभार्थ्यास १८% दराने व्याज आकारणी करून दंडनीय कार्यवाही करणे उचित होणार नाही. आज अखेर सर्व विहिरी पूर्ण झालेल्या आहेत. (सोबत पुर्णत्वाचे दाखले जोडण्यात आलेले आहे.) पंचायत समिती नाशिकचे सन २०११-२०१२ चे लेखा परिक्षणात लघुपाटबंधारे विभागाकडील परिशिष्ट क्र. ७ मध्ये नमुद केल्याप्रमाणे १६ विहिरींचे काम अपुर्ण दिसत होते. त्यापैकी अनुदान अभावी ७ विहिरी पुर्ण असून अपुर्ण दिसत होत्या. सदर

विहिरींचे अनुदान उपलब्ध झाल्याने दि. २५/०७/२०१२ रोजी ७ विहिरी पुर्ण आहेत. तरी सदर विहिरींची माहिती खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.

| अ. न. (१) | लाभार्थ्यांचे नाव (२) | काम पुर्णत्वाचा दिनांक (३) |
|---|---|---|
| १ | श्री. फकिरा सखाराम पारधी .. .. .. .. | १८/०५/२०११ |
| २ | श्री. प्रदिप तुकाराम मालुंजकर .. .. .. .. | ३०/०४/२०११ |
| ३ | श्री. मधुकर लहानु थेटे .. .. .. .. | २५/०४/२०११ |
| ४ | श्री. शंकर नामदेव थेटे .. .. .. .. | २६/०५/२०११ |
| ५ | श्रीम. मथुराबाई जयराम थेटे .. .. .. .. | ३१/०३/२०१२ |
| ६ | श्री. हिरामण महादु गभाले .. .. .. .. | ३१/०३/२०१२ |
| ७ | श्री. सोमनाथ श्रावण पोटिंदे .. .. .. .. | ३१/०३/२०१२ |
| ८ | श्री. जगन दामु तांबेरे .. .. .. .. | ६/०१/२०१४ |
| ९ | श्री. निवृत्ती काशिनाथ बेडंकोळी .. .. .. .. | २४/१२/२०१२ |
| १० | श्रीम. मंजुळाबाई त्रंबक कसबे .. .. .. .. | २५/०३/२०१३ |
| ११ | श्री. काळु रामजी खाडे .. .. .. .. | २३/०७/२०१३ |
| १२ | श्रीम. मिराबाई पदमाकर बोंबले .. .. .. .. | २५/०३/२०१३ |
| १३ | श्री. शंकर नामदेव थेटे (दुबार नाव) .. .. .. .. | २५/०३/२०१३ |
| १४ | श्री. संतु गोपाळा पारधी .. .. .. .. | २३/०७/२०१३ |
| १५ | श्री. शंकर गंगाराम पारधी .. .. .. .. | २३/०७/२०१३ |
| १६ | श्री. कोडाजी गोपाळा खेडुलकर .. .. .. .. | १३/०२/२०१४ |

कृपया शक स्विकृत होणेस विनंती.

**परिच्छेद क्र. ४.३९४ (१५)**

| अ. क्र (१) | जिल्ह्याचे नाव (२) | पंचायत समितीचे नाव (३) | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र. (४) | गुंतलेली रक्कम रु. (५) |
|---|---|---|---|---|
| १५ | नाशिक | नाशिक | ५६ | — |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) नाशिक तालुक्यात भुस्तराची रचना ही जवळपास सारखीच असल्याने त्यानुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. तथापि, प्रत्यक्ष खोदकाम करताना आढळुन आलेल्या भूगर्भाच्या स्तरानुसारच मोजमाप पुस्तिकेत नोंद घेवून लाभार्थ्यास अनुदान अदा करण्यात आले.

(२) नाशिक गटात तिरडशेत ग्रा.पं. ही अति उत्सर्जन गटात तर पिंप्री सय्यद ग्रा.पं. ही क्रिटिकल झोन मध्ये येतात, सदर ठिकाणी विहिरीची कामे घेण्यात आलेली नाहीत. उर्वरित गावे सुरक्षित गटात येत असल्याने भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणेच्या प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.

(३) **अपुर्ण असलेल्या विशेष घटक योजनेतील २ लाभार्थी अनुक्रमे**

१. श्री. सुभाष नथू आल्हाटे, रा. गणेशगाव (त्रं), व

२. श्री. गौतम भास्कर तपासे, रा. गौळाणे,

**तसेच आदिवासी उपयोजनेतील ७ लाभार्थी अनुक्रमे**

१. श्री. नथु बारकु पालवे, रा. गंगाम्हाळूंगी,

२. श्री. लक्ष्मण नारायण पालवे, रा. गंगाम्हाळूंगी,

३. श्री. बुधा काळु फसाळे, रा. गंगाम्हाळूंगी,

४. श्री. विठठल भिका फसाळे, रा. गंगाम्हाळूंगी,

५. श्री. भारत सिताराम पालवे, रा. गंगाम्हाळूंगी,

६. श्री. त्रंबक सुका पिंपळके, रा. देवरगाव,

७. श्री. निवृत्ती सिताराम पालवे, रा. गंगाम्हाळूंगी

अशा एकूण ९ विहिरी पुर्ण करून विहिर पुर्णत्वाचा दाखला नमुना नं. ६५ मध्ये देवून मोजमाप पुस्तिकेतील मुल्यांकन प्राप्त करुन अद्यावत करण्यात आलेले आहे. (सोबत पुर्णत्वाचे दाखले जोडले आहेत.)

(४) विहिरीचे काम पुर्ण करुन छायाचित्र, लाभार्थीचे ७/१२ उता-यावर विहिरीची नोंद करुन उतारा व वीज जोडणी घेतलेबाबतचा दाखला दप्तरी अद्यावत ठेवण्यात आलेले आहे.(सोबत ०७/१२ उतारे जोडले आहेत.)कृपया खुलासा मान्य होणेस विनंती.

**परिच्छेद क्र. ४.३९४ (१६)**

| अ. क्र | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र. | गुंतलेली रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १६ | नाशिक | पेठ | ५० | रु. २३,६२,३१८ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

जि.प.ल.पा.उपविभाग, पेठ कार्यालयांतर्गत सन २०११-१२ अखेर एकुण ४४ विहिरी अपुर्ण होत्या. जवाहर विहिर योजना ही वैयक्तीक लाभाची योजना असून लाभार्थ्यांने विहिरीचे केलेल्या कामाचे मुल्यांकनानुसार अनुदान वाटप केले जाते. त्यानुसार अपुर्ण असलेल्या विहिरी शासन निर्णय दिनांक १/७/१९९८ नुसार विहित मुदतीत पुर्ण करणे करीता लाभार्थी यांना वारंवार सुचना देऊनही लाभार्थी आदिवासी दुर्बल घटकातील असुन, आर्थिक परिस्थिती व विहिर खोल करणेचे साधनसामुग्रीची उपलब्धता या कारणास्तव अपुर्ण दिसुन येतात. त्यापैकी ३२ विहिरी पुर्ण करणेत आलेल्या असुन, ९ विहिरी दिनांक २३ जानेवारी २०१४ च्या शासन निर्णयानुसार जवाहर विहिर योजने अंतर्गत अपुर्ण असलेल्या विहिरी मगांराग्रारोहयो मधून प्रशासकीय मान्यता घेऊन वर्ग करणेत आलेल्या आहेत. पैकी आजरोजी ४ विहिरी पुर्णत्वाच्या मार्गावर आहेत. उर्वरित ५ विहिरी जास्त प्रमाणात पाणी असल्यामुळे सुरु करता येत नाही. सदर विहिरी शासन निर्णय दिनांक २९ जुलै २०१५ नुसार माहे जुन २०१६ अखेर पुर्ण करणेत येईल. सन १९९९-२००० मधील १ व सन २००५-०६ मधील ३ अशा एकुण ४ अपुर्ण विहिरी मुदतीत पुर्ण न केल्याने संबंधित लाभार्थी यांचे ७/१२ उता-यावर बोजा चढविणे बाबत तलाठी यांना दि. २२/८/२०१४ व तहसिलदार पेठ यांना पत्र क्र. उविपे/ लपा/ आस्था/४६/१६ दि. २२/१/२०१६ रोजी पत्र देण्यात आले आहे.

४४ पैकी पुर्ण झालेल्या ३१ विहिरीमुळे आजमितीस ६०.८८ हेक्टर क्षेत्र ओलीताखाली आले आहे. पुर्ण झालेल्या विहिरींचा उपयोग होत असुन खर्च वाया गेलेला नाही.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्र. ४.३९४ (१७)**

| अ. क्र (१) | जिल्ह्याचे नाव (२) | पंचायत समितीचे नाव (३) | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र. (४) | गुंतलेली रक्कम रु. (५) |
|---|---|---|---|---|
| १६ | नाशिक | दिंडोरी | २१ | रु. २७,१५,४६७ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती दिंडोरी सन २०११-२०१२ चे लेखा परिक्षणात जवाहर विहिरींच्या अपुर्ण बांधकामांबाबत घेतलेल्या परिच्छेदाबाबत खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे.

प्रशासकीय मान्यतेच्या आदेशातील दिनांकानुसार १२ महिन्याचे आंत काम पूर्ण करणे आवश्यक होते. परंतु जवाहर विहिरीचे खोदकाम करतांना तांत्रिक अडचणी तसेच लाभार्थींची आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे वेळीच काम पुर्ण करणेस आर्थिक अडचणी येतात. तसेच ब्लास्टिंग व क्रेनयुनिट एकाच वेळी अनेक काम चालु असल्यामुळे उपलब्ध झालेली नाहीत. सन २०११-२०१२ मध्ये जवाहर विहिरींसाठी कुठल्याही प्रकारचा निधी प्राप्त झालेला नाही. करीता मार्च २०१२ अखेर ५५ विहिरी अपुर्ण असल्याने परिशिष्टात दर्शविण्यात आलेले आहे तथापी सदर परिशिष्टातील अ.क्र.४९, ५१ व ५३ वरील लाभार्थी यांचे नावे दुबार दर्शविण्यात आलेले आहे. म्हणजेच मार्च २०१२ अखेर एकुण अपुर्ण ५४ विहिरी आहेत. पैकी मार्च २०१३ अखेर २५ पूर्ण करणेत आलेल्या आहेत.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. जविका/२०१३/प्र.क्र.२२/रोहयो/दि.२०/४/२०१३ अन्वये अपुर्ण असलेल्या सन २००७-०८ व २००८-०९ मधील जवाहर विहिर पुर्ण करणेस १४ महिन्यांत काम पुर्ण करणेची अट शिथिल करण्यात येवून दि. ३० जून २०१३ पावेतो मुदतवाढ देणेत आलेली असून त्यानंतर ही महाराष्ट्र शासन निर्णय क्र. योजना/२०१३/ प्र.क्र. १२३/रोहयो/५ मंत्रालय मुंबई दि. २३ जानेवारी २०१४ तसेच व दि. ३०/१२/२०१४ अन्वये दि. ३१/१२/२०१४ पर्यंत व दि. ३०/६/२०१५ पावेतो मुदतवाढ देणेत आलेली आहे. त्यानुसार अपुर्ण असलेल्या विहिरी पैकी २२ विहिरी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनाकडे वर्ग करणेत आलेल्या आहेत. उर्वरित ०७ विहिरी पैकी ०४ लाभार्थी यांनी विहिरींची कामे सुरु न केल्यामुळे सदरच्या विहिरी रद्द करण्यात आलेल्या आहेत. आजमितीस ०१ विहिर उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे (सिमांत शेतकरी) या प्रवर्गातील भौतिकदृष्ट्या पुर्ण आहे.

| एकुण मंजूर विहिरी | मार्च २०१३ अखेर पुर्ण विहिरी | मार्च २०१४ अखेर अपुर्ण विहिरी | MRE GS कडे वर्ग | रद्द करण्यात आलेल्या विहिरी | आज मितीस अपुर्ण विहिरी |
|---|---|---|---|---|---|
| ५४ | २५ | २९ | २२ | ०६ | ०१ |

**परिच्छेद क्र. ४.३९४ (१८)**

| अ. क्र (१) | जिल्ह्याचे नाव (२) | पंचायत समितीचे नाव (३) | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र. (४) | गुंतलेली रक्कम रु. (५) |
|---|---|---|---|---|
| १८ | नाशिक | दिंडोरी | २४ | रु. २४,८५,६२३ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

विशेष घटक योजनेंतर्गत / आदिवासी उपयोजनेतील अपूर्ण विहीरींबाबत अनुपालन करण्यात येत आहे.

(१) मूळ परिच्छेदात पूर्ण झालेल्या विहीरींचे अंदाजपत्रक व नमूद विहीरींचे अंदाजपत्रके सारख्या पध्दतीने तयार केल्याची अनियमितता नमूद आहे तथापि भुपृष्ठ स्तर खोदकाम व झालेल्या मुल्यांकनानुसार १.०० लक्ष मर्यादित अनुदान प्रदान करण्यात आलेले आहे.

तसेच शा.नि. परिपत्रक क्रमांक रो.ह.यो.-२००७/प्र.क्र./१७९रोहयो/१/मंत्रालय, मुंबई-३२ दि.१०.४.२००४ अन्वये भूजल सर्व्हेक्षण यंत्रणेचे प्रमाणपत्र बंधनकारक आहे परंतु दिंडोरी गटातील भुजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणेच्या वाटरशेड करंट स्टेटस (२००८/०९) नुसार निवड लाभार्थ्यांची गावे सेफ झोन मध्ये असलेने सदर दाखले आवश्यक नाही.

(२) पूर्ण झालेल्या विहीरींचे नमूना नं.६५ चा दाखला, मोजमाज पुस्तीकेतील मुल्यांकन, पूर्ण झालेले विहीरीचे फोटो छायाचित्र, लाभार्थ्यांची ७/१२ वर विहीरीची नोंद असलेले उतारे तसेच वीज जोडणी बाबत पूर्ण झालेल्या विहीर लाभार्थ्यांची यादी महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसीटी डिस्ट्रीब्युशन कंपनी लि.विभागाला सदर लाभार्थ्यांना प्राधान्याने वीज जोडणी करण्याकरिता कळविण्यात आले आहे. सदरील दस्तऐवज अद्ययावत असून दप्तरी दाखल आहेत.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती

**परिच्छेद क्र. ४.३९४ (१९)**

| अ. क्र (१) | जिल्ह्याचे नाव (२) | पंचायत समितीचे नाव (३) | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र. (४) | गुंतलेली रक्कम रु. (५) |
|---|---|---|---|---|
| १९ | नाशिक | कळवण | ४४ | रु. १६,०७,२४२ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) जवाहर रोजगार विहीरींची कामे लाभार्थ्यांमार्फत पूर्ण करावयाची असल्याने लाभार्थी हे आर्थिक दृष्ट्या कमकुवत असतात. त्यांचेकडून विहीरींचे कामे मुदतीत पूर्ण होऊ शकली नाहीत.

(२) उपविभागात लेखा परिक्षण वर्षा अखेर ४६ विहीरी अपूर्ण होत्या त्यापैकी ९ विहीरींचे लाभार्थी काम करीत नसल्याने ९ विहीरी रद्द करणेबाबत प्रस्ताव उपअभियंता जि.प.ल.पा. उपविभाग कळवण यांचेकडील पत्र क्र. बाखा/लपाउविक/३७२/२०१५ कळवण दि.०२.११.२०१५ अन्वये कार्यकारी अभियंता ल.पा. (पश्चिम) यांचेकडे सादर केला आहे.

उर्वरित ३७ विहीरींपैकी ३२ विहीरींची कामे पूर्ण झालेली आहेत व ४ विहीरींना पाणी लागलेले असल्याने व लाभार्थी काम करीत नसल्याने आहे त्या स्थितीत अंतीम करण्यात आलेल्या आहेत.उर्वरित १ विहीर जवाहर रोजगार योजना बंद झाल्याने मागांराग्रारोहयो मध्ये वर्ग करून पूर्ण करण्यात आलेली आहे. सोबत सर्व ३७ विहीरींचे पूर्णत्वाचे दाखले जोडलेले आहेत. २०१५ अखेर अपूर्ण ४६ विहीरींपैकी एकही विहीर अपूर्ण नाही.

**परिच्छेद क्र. ४.३९४ (२०)**

| अ. क्र (१) | जिल्ह्याचे नाव (२) | पंचायत समितीचे नाव (३) | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र. (४) | गुंतलेली रक्कम रु. (५) |
|---|---|---|---|---|
| २० | नाशिक | मालेगाव | ४० | रु. ३६,६४,६५४ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) जवाहर विहिरींची कामे ही ब-याच लाभार्थ्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे व पावसाळ्यापासून ते डिसेंबर पर्यंत पाणी असल्याने विहिरीची कामे होऊ शकली नाहीत. पंचायत समितीस्तरावर पाठपुरावा करून उर्वरित अपूर्ण विहिरी पैकी १५ विहिरींची कामे पूर्ण करून देण्यात आलेली आहे व सदर लाभार्थी विहिरीच्या पाण्यावर पिके घेत आहेत.

(२) सदर परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे ८६ विहिरी अपूर्ण होत्या त्या विहिरींपैकी ५८ विहिरी पूर्ण करण्यात आलेल्या आहेत. तसेच १३ विहिरी शेतक-यांनी विहिरी सुरू न केल्याने रद्द करण्यात आलेले आहे. उर्वरित १५ अपूर्ण विहिरी पूर्ण करण्यात आलेल्या आहेत व आता या कार्यालयात अपूर्ण विहिरींची संख्या निरंक आहे. पूर्ण झालेल्या विहिरींचे पूर्णत्वाचे दाखले देण्यात आलेले आहेत. एकूण अपूर्ण विहिरी ८६ पैकी रद्द विहिरी १३ असून एकूण सुरू विहिरी ७३ त्यापैकी सन १२/१३ पूर्ण ५८ झाल्या व उर्वरित १५ विहिरी सन १३/१४ पूर्ण झाल्या. आज अखेर एकही विहिर अपूर्ण नाही.

**परिच्छेद क्र. ४.३९४ (२१)**

| अ. क्र (१) | जिल्ह्याचे नाव (२) | पंचायत समितीचे नाव (३) | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र. (४) | गुंतलेली रक्कम रु. (५) |
|---|---|---|---|---|
| २१ | नाशिक | मालेगाव | ४१ | रु. ८,६६,५६९ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०११-१२ अखेर विशेष घटक योजनांतर्गत यासोबत परिशिष्टात ४ नमूद केल्याप्रमाणे एकूण ६ विहिरी अपूर्ण असून सदर विहिरीवर रक्कम रू.३,९४,३५४/- इतका खर्च झालेला आहे. तसेच बिगर आदिवासी उपयोजनांतर्गत ८ विहिरीवर रक्कम रू.४,७२,२१५/- इतका खर्च झाला आहे.

(१) काम मंजूर झालेपासून सदरचे विहिरीचे काम हे दोन वर्ष मुदतीत करावे अशा मार्गदर्शक सूचना आहेत. योजनेचा कालावधी हा दोन वर्षांचा आहे. तरी सदर काम हे त्या मुदतीत करणे अपेक्षित आहे. तसेच सदर विहिरीचे काम हे लाभार्थीने दोन वर्षांच्या कालावधीत पूर्ण केलेले आहे. सन २०१२-१३ मध्ये कामे पूर्ण झालेले असल्याने मार्गदर्शक सूचना प्रमाणेच कार्यवाही झालेली आहे. सोबत मार्गदर्शक सूचना सन २०११-१२.

(२) विहिरीचे अंदाजपत्रक हे एक सारख्या प्रकारचे आहे. कारण मालेगांव तालुक्याचा भूस्तर हा सर्वसाधारण सर्व ठिकाणी एकसारखाच आहे. त्यामुळे एकाच स्वरूपाची (Typed Estimate) सर्व लाभार्थीच्या प्रकरणासोबत जोडण्यात आलेले आहे. प्रत्यक्ष काम सुरू असतांना मोजमापे हे भूस्तराच्या प्रकाराप्रमाणे घेण्यात येऊन त्याचप्रमाणे मुल्यांकन करण्यात येऊन लाभार्थीस अनुदान अदा केलेले आहे. आवश्यक तेथे भुजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणेचे प्रमाणपत्र घेऊनच विहिरीचा लाभ देण्यात आलेला आहे. सुरक्षित पाणलोटातील विहीरी GSDA चा दाखला आवश्यक नाही.

(३) सदरच्या विहिरी मा.आयुक्त कृषी विभाग, विहीरी मार्गदर्शक सूचना, कृषी आयुक्तालय, म.रा. पुणे यांचे सन २०११-१२ अन्वये कामे पूर्ण करून नमुना नं.६५ चा दाखला, मोजमाप पुस्तिकेतील मूल्यांकन, विहिरी पूर्ण केल्याचे फोटो तसेच ७/१२ उता-यावर विहिरीची नोंद असलेला उतारा घेऊनच अंतिम अनुदान अदा केलेले आहे. याबाबत कुठलीच अनियमितता झालेली नाही. तसेच वीज जोडणी ही लाभार्थीने स्वतः घ्यावयाची बाब असून त्यास शासनाकडून अनुदान देण्यात येत नाही.

**परिच्छेद क्र. ४.३९४ (२२)**

| अ. क्र (१) | जिल्ह्याचे नाव (२) | पंचायत समितीचे नाव (३) | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र. (४) | गुंतलेली रक्कम रु. (५) |
|---|---|---|---|---|
| २२ | नाशिक | नांदगांव | ३६ | रु. १५,२३,६२६ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) शकात नमूद केल्याप्रमाणे सादर करण्यात येते की, २७ पैकी २६ लाभार्थ्यांनी विहिरींची कामे विहीत मुदतीत सुरू केलेली होती. लाभार्थ्यांना विहिरींची कामे पूर्ण करण्यासाठी वेळोवेळी क्षेत्रीय स्तरावर तसेच लेखी पत्राद्वारे पाठपुरावा करण्यात आलेला आहे. परंतु लाभार्थ्यांनी विहिरींची कामे आर्थिक अडचणींमुळे वेळेवर पूर्ण केलेली नाहीत. या विहिरींची कामे अनुदानप्राप्त झाल्यानंतर पूर्ण करण्यात आलेली आहेत. तसेच विहिरींची कामे पूर्ण करण्यास झालेल्या विलंबाबाबत तत्कालीन शाखा अभियंता यांचेकडून नोटीसीद्वारे खुलासा मागविण्यात आलेला आहे. सुरू करण्यात आलेल्या २६ विहिरींची कामे पूर्ण झालेली असून या विहिरींच्या काम पूर्णत्वाच्या दाखल्यांची सत्यप्रत सोबत जोडण्यात आलेली आहे. श्री.रमेश जयराम सावंत यांनी विहिरीचे काम विहित मुदतीत सुरू केलेले नसल्याने महाराष्ट्र शासन नियोजन विभाग शासन निर्णय क्र.जाविका/१२९८/प्र.क्र.१०४ /रोहयो/ १० दि.१/७/१९९८ मधील परिच्छेद क्र.१७ व १८ अन्वये तसेच प्रशासकीय मंजुरी आदेश व कार्यारंभ आदेश या मधील अटी व शर्ती नुसार सदर विहिरीचे काम रद्द केलेले आहे. सदर विहिरींवर झालेला खर्च निरंक आहे.

(२) शकात नमूद केल्याप्रमाणे अपूर्ण २७ विहिरींपैकी २६ विहीरी पूर्ण झालेल्या असून या २६ विहिरींच्या काम पूर्णत्वाच्या दाखल्यांची सत्यप्रत सोबत जोडण्यात आली आहे. श्री.रमेश जयराम सावंत यांनी विहित मुदतीत काम सुरू न केल्यामुळे त्यांचा लाभ रद्द झाला आहे. सदर लाभार्थ्यांच्या विहिरींची कामे सुरू असतानांच विहिरींना पुरेसा पाणीसाठा उपलब्ध झाल्याने व या लाभार्थ्यांनी उपलब्ध पाण्याचा सिंचनासाठी वापर करून नगदी बागायती पिके घेतलेली आहेत. शासन परिपत्रक क्र. २०००/ प्र.क्र.६५/२०००/रोहयो- १० दि.१३/०९/२००१ अन्वये लाभार्यांना कामासाठी अग्रीम दिलेले असेल तरच व्याजाची १८% दराने वसुली करण्यात यावी अशी तरतूद आहे. परंतु प्रस्तुत प्रकरणी लाभार्थ्यांना अग्रीम देण्यात आलेले नसल्याने लाभार्थ्यांकडून १८% दराने व्याजाची आकारणी करणे योग्य होणार नाही.

(३) परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे सदर ०३ विहीरींपैकी ०२ विहिरींची कामे सुरू करण्यात आलेली होती. परंतु लाभार्थ्यांच्या आर्थिक अडचणींमुळे कामे वेळेवर पूर्ण झालेली नव्हती. कामे पूर्ण करण्याबाबत लाभार्थ्यांना वेळोवेळी क्षेत्रीय स्तरावर तसेच लेखी पत्राद्वारे पाठपुरावा करण्यात आलेला आहे. झालेल्या विलंबाबाबत तत्कालीन शाखा अभियंता यांचा नोटीसीद्वारे खुलासा मागविण्यात आलेला आहे. या ०२ लाभार्थींपैकी श्री.म्हसू रखमाजी सरोदे यांचे विहिरीचे काम दि.२५/०३/२०१३ रोजी व श्री.निवृत्ती त्र्यंबक देशमुख यांच्या विहिरीचे काम दि.०३/१०/२०१२ रोजी अंतिम करण्यात आलेले आहे. तसेच श्री.रमेश जयराम सावंत यांनी विहित मुदतीत काम सुरू न केल्याने त्यांचा लाभ रद्द झालेला आहे.

**परिच्छेद क्र. ४.३९४ (२३)**

| अ. क्र<br>(१) | जिल्ह्याचे नाव<br>(२) | पंचायत समितीचे नाव<br>(३) | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र.<br>(४) | गुंतलेली रक्कम रु.<br>(५) |
|---|---|---|---|---|
| २३ | नाशिक | येवला | २९ | रु. ६८,०३,७६३ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

जिल्हा परिषद लघु पाटबंधारे उप विभाग येवला, जवाहर विहिर योजना अंतर्गत सन २०११-१२ मध्ये शकात नमूद केलेल्या १०१ अपूर्ण विहिरीवर रू.६८,०३,७६३/- इतका खर्च नोंदविण्यात आलेला आहे. १०१ विहिरीपैकी ८९ विहिरी पूर्ण झालेल्या आहेत. ५ विहिरी रद्द करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित ७ विहिरींची कामे प्रगतीपथावर आहेत.

**परिच्छेद क्र. ४.३९४ (२४)**

| अ. क्र<br>(१) | जिल्ह्याचे नाव<br>(२) | पंचायत समितीचे नाव<br>(३) | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र.<br>(४) | गुंतलेली रक्कम रु.<br>(५) |
|---|---|---|---|---|
| २४ | नाशिक | इगतपुरी | ३५ | रु. ३०,२३,१९६ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) इगतपुरी हा डोंगराळ तालुका असुन कठिण खडक स्थर १ ते २ मीटर खोलीनंतर लगेच लागतो व कठिण खडक खोदण्यास जादा कालावधी लागत असल्याने विहिरीचे काम १२ महिण्यात पूर्ण होत नाही. सन २०११-१२ या वर्षात अनुदान उपलब्ध न झाल्याने सदरची कामे प्रगतीत होती. तथापि या कार्यालयामार्फत अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येऊन पूर्ण कामांची स्थिती खालील प्रमाणे आहे. परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे २००४-०५ मधील ९ व सन २००७-०८ मधील ५७ अशा एकूण ६६ विहिरीपैकी आज अखेर ५६ विहिरी पुर्ण झालेल्या असून उर्वरीत १० विहिरीपैकी ६ विहिरींची कामे सुरुच न केल्याने त्यांचा रद्दचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालय मा. सचिव, जवाहर विहिर कार्यक्रम जिल्हा समिती तथा कार्यकारी अभियंता, ल.पा. (पश्चिम), जिल्हा परिषद, नाशिक येथे या कार्यालयाचे पत्र क्र.जिपना/लपा/ताशा/६७०/२०१३ दि.०७/१०/१३ अन्वये सादर केलेला आहे. तसेच ४ लाभार्थी काम करत नसल्याने त्यांच्या ७/१२ उता-यावर बोजा चढविण्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्र.जिपना/लपा/ताशा/५१४/२०१४ दि. २२/१२/१४ व पत्र क्र. जिपना/लपा/३४३/२०१४ दि. २५/०७/२०१४ अन्वये मा. तहसिलदार, तहसिल कार्यालय इगतपूरी यांना सादर करण्यात आलेले आहे. पुर्ण झालेल्या सर्व विहिरींना पुरेसे पाणी असुन लाभार्थी सदर पाण्याचा उपयोग सिंचनासाठी करत असल्याने ३०,२३,१९६/- हा खर्च निष्फळ गेलेला नाही.

(२) १६ सुरू न केलेल्या विहिरींपैकी ३ विहिरींची कामे सुरू करुन पूर्ण करण्यात आलेली आहेत. उर्वरीत १३ विहिरींची कामे सुरू न केल्याने तसेच लाभार्थ्यांना कोणताही निधी वितरीत न केल्याने शासन निर्णय क्रमांक योजना २०१३/प्र.क्र. १२३/ रोहयो-५, मुंबई-३२ दि. २३ जानेवारी, २०१४ अन्वये अशा विहिरी रद्द झालेल्या आहेत.

**परिच्छेद क्र. ४.३९४ (२५)**

| अ. क्र (१) | जिल्ह्याचे नाव (२) | पंचायत समितीचे नाव (३) | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र. (४) | गुंतलेली रक्कम रु. (५) |
|---|---|---|---|---|
| २५ | नाशिक | त्र्यंबकेश्वर | ३३ | रु. ३७,००,८८२/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर सन २०११-१२ मध्ये ६४ विहिरी अपूर्ण होत्या. सदर योजनेअंतर्गत कामासाठी २ वर्षांची मुदत असल्याने त्यापैकी मार्च २०१३ पर्यंत २७ विहिरी पुर्ण झाल्या व सदर लाभार्थ्यांना संपुर्ण अनुदान देण्यात आले. सदर लाभार्थींचे विहिरींचे फोटो घेणेत आले आहेत. तसेच ७/१२ उता-यावर टी.एस.पी. विहिर नोंदविणेत आले व पुर्णत्वाचे दाखले देण्यात आले आहेत. सोबत सदर बाबींच्या छायांकीत प्रती जोडण्यात आलेल्या आहेत. तसेच उर्वरीत लाभार्थीपैकी १६ लाभार्थींनी मुदतीत म्हणजे मार्च २०१३ अखेर काम पुर्ण करणे शासन नियमानुसार बंधनकारक होते व तशा सुचना लाभार्थींनी कार्यारंभ आदेशात देण्यात आल्या होत्या. मुदतीनंतर १६ लाभार्थींनी स्वखर्चाने विहिरी पुर्ण केल्या आहेत. व ७/१२ खाते उता-यावर नोंदी घेणेत आलेल्या आहेत त्याचे फोटो घेण्यात आलेले असून त्याच्या छायांकीत प्रती सोबत जोडण्यात आलेल्या आहेत. उर्वरीत २१ विहिरीपैकी ४ विहिरींची प्रत्यक्ष पाहणी केली असता त्या पुर्ण झाल्याचे आढळुन आले आहे. त्याचे छायाचित्र सोबत जोडले आहे. तसेच सदर लाभार्थी त्यापासून उत्पन्न घेत आहेत उर्वरीत १७ विहिरी मुदतीत पुर्ण न केल्याने त्या अपुर्ण आहेत. त्यांची प्रत्यक्ष पाहणी केली असुन आता त्यापैकी ११ विहिरी अपुर्ण असल्या तरी त्यांना पाणी लागलेले असल्याने ते त्यावर पिके घेत आहेत. उर्वरीत ६ पैकी लाभार्थ्यांनी मुदतीत काम केलेले नसल्याने त्यांना फक्त झालेल्या कामाएवढीच रक्कम अदा केलेली आहे. तरी ते लाभार्थी सदर विहिरीव्दारे पावसाने ओढ दिल्यास पिकास पाणी देवून उत्पन्न घेतात. त्यापैकी ३ लाभार्थ्यांनी कामच केलेले नसल्याने त्यांना रक्कम अदा करण्यात आलेली नाही तसा No Bill चा दाखला सोबत जोडला आहे. म्हणून सदर १८ लाभार्थ्यांना कामासाठी अग्रीम देण्यात आलेले नाही. झालेल्या मुल्यांकनाएवढीच रक्कम अदा करण्यात आलेली नाही. व त्यांचे आहे त्या स्थितीत पुर्णत्वाचे दाखले व छायाचित्र सोबत जोडण्यात आलेले आहेत. ३ विहिरींचे No Bill चे दाखले सोबत जोडले आहे.

तरी खुलासा मान्य होणेस विनंती.

**परिच्छेद क्र. ४.३९४ (२६)**

| अ. क्र<br>(१) | जिल्ह्याचे नाव<br>(२) | पंचायत समितीचे नाव<br>(३) | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र.<br>(४) | गुंतलेली रक्कम रु.<br>(५) |
|---|---|---|---|---|
| २६ | नाशिक | देवळा | ३९ | रु. ४,७१,६९३/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

जवाहर रोजगार विहिरींची कामे लाभार्थ्यांमार्फत पूर्ण करावयाची असतात, लाभार्थी हे आर्थिकदृष्ट्या कमकुवत असल्याने त्याचेकडुन विहिरींची कामे मुदतीत पूर्ण होऊ शकली नाहीत.

उपविभागात अपुर्ण असलेल्या आठ विहिरींची कामे पुर्ण झालेली आहेत व लाभार्थ्यांना त्याचा फायदा होत आहे.

जवाहर रोजगार विहिरींची अपुर्ण कामे पुर्ण झालेली आहेत.

तरी खुलासा मान्य होणेस विनंती.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ मे, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,मुद्दा क्रमांक ५४ ते ६६ हे अपूर्ण स्थितीतील बांधकामे या संदर्भात आहेत. सदर अपूर्ण स्थितीतील बांधकामे कधी पूर्ण होतील आणि त्याचा लाभार्थ्यांना कधी लाभ मिळेल या संदर्भातील सविस्तर एकत्रित माहिती समितीला अहवाल रूपाने सादर करण्यात यावी. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यास सकारात्मक उत्तर दिले. अ.क्र.५४ मध्ये १६ विहिरी अपूर्ण असल्याचे सांगण्यात आले आहे, त्या संदर्भातील सद्यःस्थिती काय आहे अशी विचारणा समितीने केली असता १६ विहिरी पूर्ण झालेल्या आहेत असे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नाशिक यांनी समितीस आश्वासित केले. अ.क्र.५५ मधील जवाहर विहिरी सुध्दा पूर्ण झाल्या आहेत का, तसेच अ.क्र.५६ पंचायत समिती, पेठ यांच्या ४४ विहिरी होत्या, त्यांची सद्यःस्थिती काय आहे अशी समितीने विचारणा केली असता गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पेठ यांनी समितीस अशी माहिती दिली की,४० विहिरींचे काम पूर्ण झाले असून ४ विहिरी अपूर्ण आहेत. अपूर्ण विहिरींबाबत लाभार्थ्यांना नोटीसा दिलेल्या आहेत आणि त्यांच्या ७/१२ वर बोजा देखील चढविला आहे.

शेतक-यांच्या आत्महत्या थांबविण्याच्या दृष्टीने शासन या संदर्भात खूप पैसा देत आहे. त्यामुळे विहिरी वेळेत पूर्ण होणे गरजेचे आहे. जिल्ह्यातील अपूर्ण विहिरींच्या संदर्भात तातडीने प्राधान्य दिले गेले पाहिजे. कालबध्दरितीने विहिरी पूर्ण झाल्या पाहिजेत. आपण त्या संदर्भात आढावा घेतला पाहिजे अशी समितीने विचारणा केली असता गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पेठ यांनी जवाहर विहीर योजनेतील काम एमआरईजीएसमध्ये वर्ग करून पूर्ण करणार असल्याचे समितीस आश्वासित केले. शेतक-यांच्या विहिरींची कामे ४-४ वर्षे पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत अशी समितीने विचारणा केली असता एकूण ५१ पैकी माहे मार्च, २०१३ अखेर २५ विहिरी पूर्ण झाल्या, २९ विहिरी सन २०१४ अखेर पूर्ण झाल्या, ६ विहिरी वर्ग करण्यात आल्या, १ विहीर अपूर्ण होती, ती ३१ मार्चअखेर अनुदान प्राप्त झाल्यामुळे आजअखेर पूर्ण झाली आहे अशी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, दिंडोरी यांनी समितीस माहिती दिली.

तद्‌नंतर विहिरींची कामे कालमर्यादेत पूर्ण झाली पाहिजेत याची नोंद घ्यावी आणि जवाहर विहिरी योजना बंद झाली असून त्या योजनेत मंजूर झालेली कामे एमआरईजीएसमध्ये कन्व्हर्ट करूप पूर्ण होण्यासारखी आहेत. संबंधित पंचायत समितीच्या गटविकास अधिका-यांना बोलावून ही कामे पूर्ण होण्याबाबत प्रयत्न करावा असे समितीने निदेश दिले असता त्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होकारार्थी उत्तर दिले. तद्‌नंतर विहिरींच्या कामाचा कार्यारंभ आदेश केव्हा देण्यात आला व सदरहू कार्यक्रम कोणत्या वर्षाचा आहे, त्यास काही कालमर्यादा घालून दिलेली आहे काय अशी विचारणा समितीने केली असता सन २०११-१२ मध्ये १८ महिन्यांचा कालावधी घालून दिला असून नियोजनबध्द कार्यक्रम तयार करुन प्रत्येक बाबनिहाय आढावा घेऊन तयार करण्यात येत आहे अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस दिली.

यानंतर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ३०० ते ४०० विहिरींची कामे अपूर्ण आहेत. दलित, आदिवासी, गोरगरीब लोकांना मंजूर झालेल्या विहिरी आहेत. विहिरीची गरज नाही, पाणी उपलब्ध झालेले आहे असे लेखी लिहून दिले आहे का, तसेच दिंडोरी, नांदगाव, देवळा तालुक्यात देखील हीच परिस्थिती आहे. या समितीच्या प्रश्नावर गट विकास अधिकारी, पंचायत समिती, दिंडोरी यांनी १३४ विहिरी पूर्ण झालेल्या असून ३४ विहिरींची कामे डिसेंबर, २०१५ पूर्वी पूर्ण झाली आहेत अशी माहिती समितीस दिली. यानंतर समितीने पुढे असे निदेश दिले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी १५ तालुक्यांच्या गटविकास अधिका-यांना बोलावून १८ महिन्यांच्या काळात काम पूर्ण केले नाही त्याची जबाबदारी निश्चित करावी व याबाबतचा अहवाल सचिवांच्या साक्षीच्या वेळी सादर करावा. तसेच संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी. शेतक-यांचा दाखला नसला तरी दिंडोरी तालुक्यात ज्या ठिकाणी समिती जाईल त्या ठिकाणच्या विहिरी दाखविण्याची व्यवस्था करण्यात येईल आणि लाभार्थ्यांच्या विहिरीचे काम पूर्ण झाल्याचे छायात्रिक व कामे दाखविण्यात येतील असे गटविकास अधिकारी, पंचायत समिती, दिंडोरी यांनी समितीसमोर खुलासा केला.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**अपूर्ण स्थितीतील बांधकामे :-**जिल्हा परिषद नाशिक मधील पंचायत समितीतील जवाहर विहीरींची कामे मोठ्या प्रमाणात दिर्घकाळापर्यंत अपूर्ण असल्याने या प्रकरणी संबधित गटविकास अधिकां-यावर जबाबदारी निश्चीत करून याबाबतचा अहवाल समितीस सादर करण्याबाबत समितीने निर्देशित केले होते या प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे.

उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.

प्रस्तुत प्रकरणी खालील वस्तुस्थिती निदर्शनास आणण्यात येत आहे.

(१) जवाहर विहीर योजनेतील विहिरी लाभार्थ्याने स्वतःकाम करून १४ महिन्याच्या आत पूर्ण करावयाच्या होत्या.या लाभार्थ्यांना अग्रीम दिले जात नव्हते केलेल्या कामाच्या मुल्यांकनानुसार प्रदाने करण्याची पध्दत होती.

(२) उपविभागीय कृषी अधिकारी यांनी पात्र ठरविलेल्या विहिरींची मंजूर कामे, लाभार्थीने मुदतीत पुर्ण करणे आवश्यक असते. परंतू विहीरी मंजूर नंतर लाभार्थीने स्वतः विहीरीचे काम स्वखर्चाने करावयाचे असून केलेल्या कामाच्या मुल्यांकनानुसार लाभार्थीस देयके अदा केली जातात.यामुळे काही लाभार्थी आर्थिक परिस्थिती बिकट असलेने,त्यास उपलब्ध होणा-या स्वतःकडील आर्थिक परिस्थिती नुसार तो विहीरीचे काम पुर्ण करीत असतो.

(३) लाभार्थ्याकडून कामे पुर्ण न होण्याबाबतची सर्वसाधारण कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१. कौटुंबिक विवाद किंवा भाऊबंदकीचा विवाद यामुळे ही कामे विलंबाने होतात किंवा सुरू होत नाहीत.

२. जमिनीसंबंधी न्यायालयीन प्रकरणामुळे ही कामे विलंबाने होतात.

३. दुष्काळ,नापिकी,कर्जाचा बोजा, विहिरींची जागा दुर्गम,डोंगराळ भागात असलेली यंत्रसामुग्री पोहचविणे जिकीरीचे होते. इत्यादी कारणामुळेही कामास विलंब होतो.

(४) काही लाभार्थीच्या बाबत लाभार्थी कामे सुरू करतात झालेल्या मुल्यांकनानुसार देयकेही दिली जातात. परंतू उपरोल्लेखीत कारणामुळे लाभार्थी पुढील काम पुर्ण करू शकत नाहीत.त्यावेळी यंत्रणेकडून काम पूर्ण करण्याबाबत लाभार्थीस वेळोवेळी सुचना व मार्गदर्शन केले जाते.परंतू लाभार्थी काम पुर्ण करत नाहीत.अशावेळी लाभार्थीस दिलेली अनुदानाची रक्कम वसूल करणेची वेळ येते. परंतू लाभार्थी रक्कम भरत नसल्यास,अशावेळी लाभार्थीच्या क्षेत्राच्या ७/१२ उता-यावर शासकीय महसूलाची थकबाकी अशी नोंद घेऊन बोजा चढविला जातो.काही बाबतीत लाभार्थी हे आर्थिकदृष्टया पुरेसे सक्षम नसल्याने तसेच विहीरी दुर्गम/ डोंगराळ / खडकाळ भागात असल्याने यंत्र सामुग्री पोहाचविणे जिकीरीचे होते. नैसर्गिक आपत्ती लाभार्थीची आर्थिक परिस्थिती अशा अनेक कारणांनी लाभार्थीची कामे विलंबाने पूर्ण होतात.

(५) शासनाने वेळोवेळी परिपत्रक निर्गमित करून एकंदर पाच वेळा या विहिरीच्या कामांना मुदतवाढ दिलेली आहे. सद्यःस्थितीत सन २०११-१२ या वर्षाअखेर अपूर्ण असलेल्या विहीरींपैकी एकही विहीर अपूर्ण नाही. विहिरींची कामे लाभार्थ्यांनी पूर्ण करावयाची असल्याने अधिकारी/कर्मचारी यांनी लाभार्थ्याकडे पाठपुरावा करून अपूर्ण विहीरीची कामे पूर्ण करून घेतलेली आहेत. त्यामुळे याबाबत कोणत्याही अधिकारी/कर्मचा-यांना जबाबदार धरणे योग्य होणार नसल्याने,गटविकास अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही.

पंचायती राज समितीने दिलेल्या निदेशास अनुसरून प्रत्येक तालुक्यातील अपूर्ण कामासंबंधीचा वर्षनिहाय आढावा घेण्यात आला असून सन २०१५-१६ अखेर पर्यतच्या जवाहर विहीर योजनेअंतर्गत पूर्ण केलेल्या कामांचा तपशिल सोबतच्या विवरणपत्रात सादर केला आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात नियोजन विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**नियोजन विभागाचे अभिप्राय :**-जिल्हा परिषद नाशिक यांच्या विभागाशी रोहयो सहमत आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

नाशिक जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी पंचायत समिती, नाशिक, पेठ, दिंडोरी, कळवण, मालेगांव, नांदगाव, येवला, त्र्यंबकेश्वर, देवळा येथील अपूर्ण बांधकामांमध्ये एकूण रुपये २,९२,२५,०३०/- एवढी रक्कम गुंतलेली असल्याचे निदर्शनास आले आहे. पंचायत समिती, पेठ अंतर्गत एकूण गुंतलेली रक्कम रुपये २३,६२,३१८/- एवढी आहे. सन २०११-१२ अखेर ४४ विहिरी जवाहर विहिर योजनेअंतर्गत अपूर्ण होत्या. त्यापैकी ३२ विहिरी पूर्ण करण्यात आलेल्या असून उर्वरित ५ विहिरी जास्त प्रमाणात पाणी असल्याच्या कारणास्तव अपूर्ण असल्या तरी उर्वरित ७ विहिरींबाबत स्वयंस्पष्ट खुलासा करणे आवश्यक आहे. दिंडोरी पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीमध्ये एकूण ५४ मंजूर विहिरींपैकी मार्च, २०१३ अखेर केवळ २५ विहिरी पूर्ण असल्याचे नमुद केले असून उर्वरित विहिरी विविध कारणास्तव उदा.एम.आर.इ.जी.एसकडे वर्ग केलेल्या, रद्द केलेल्या विहिरी अपूर्ण असल्याचे दर्शविले आहे. **दिंडोरी पंचायत समितीमध्ये रुपये २७,१५,४६७/- एवढी रक्कम गुंतलेली आहे तसेच दिंडोरी पंचायत समिती मध्ये विशेष घटक योजनेअंतर्गत/आदिवासी उपयोजनेतील अपूर्ण विहिरींबाबत रुपये २४,८५,६२३/- एवढी रक्कम गुंतलेली आहे तसेच मुळ परिच्छेदांत पूर्ण झालेल्या विहिरींचे अंदाजपत्रक व नमूद विहिरींचे अंदाजपत्रक सारख्या पध्दतीने तयार केल्याची अनियमितता नमूद करण्यात आली आहे. दिनांक १० एप्रिल, २००४ च्या शासन निर्णयान्वये भूजल सर्वेक्षण यंत्रणेचे प्रमाणपत्र बंधनकारक असताना देखील लाभार्थ्यांनी सेफ झोन मध्ये गावे असल्याच्या कारणास्तव दाखले दिलेले नाहीत ही बाब तांत्रिकदृष्ट्या अयोग्य आहे. तसेच पूर्ण झालेल्या विहिरींना वीज जोडणीबाबत महावितरण कंपनीला कळविण्यात आलेले असल्यास किती लाभार्थ्यांना वीज जोडणी देण्यात आलेली आहे, याबाबतची माहिती समितीला एक महिन्यात पाठविण्यात यावी.**

पंचायत समिती, कळवण अंतर्गत गुंतलेली रक्कम रुपये १६,०७,२४२/- एवढी आहे. जवाहर रोजगार विहिरींची कामे लाभार्थ्यांमार्फत पूर्ण करावयाची असताना लाभार्थी हे आर्थिकदृष्ट्या कमकुवत असल्यामुळे विहिरींची कामे पूर्ण होऊ शकली नाहीत हे कारण समितीस अप्रस्तुत वाटते, वर्षा अखेर ४६ विहिरी अपूर्ण होत्या. **९ विहिरींचे लाभार्थी काम करीत नसल्याने ९ विहिरी रद्द करणेबाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे (पश्चिम) विभाग यांचेकडे सादर करण्यात आला आहे. याबद्दल समितीला सखेद आश्चर्य वाटते कारण लाभार्थ्यांची निवड करताना सर्व बाबी विचारात घेणे आवश्यक होते. उपरोक्त ४६ विहिरींच्या सद्यःस्थितीची माहिती समितीला पाठविण्यात यावी.**

मालेगांव पंचायत समिती अंतर्गत गुंतलेली रक्कम रुपये ३६,६४,६५४/- एवढी आहे. जवाहर विहिरींची कामे ही बहुतांशी लाभार्थ्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे व पावसाळ्यामध्ये पाणी असल्यामुळे विहिरींची कामे होऊ शकली नाहीत. १३ विहिरी शेतक-यांनी काम सुरु न केल्यामुळे रद्द करण्यात आलेल्या आहेत. **एकूण अपूर्ण ८६ विहिरींबाबतची सद्यःस्थिती समितीस पाठविण्यात यावी. मालेगांव पंचायत समिती अंतर्गत विशेष घटक योजनांतर्गत रुपये ८,६६,५६९/- एवढी रक्कम गुंतलेली आहे. एकूण ६ विहिरी अपूर्ण असून रुपये ३,९४,३५४/- एवढा खर्च झालेला आहे. बिगर आदिवासी उपयोजनांतर्गत ८ विहिरींवर रक्कम रुपये ४,७२,२१५/- इतका खर्च झाला आहे. याबाबतची वस्तुस्थिती समितीस पाठविण्यात आली नाही ही बाब योग्य नाही, याबाबत समिती नापसंती व्यक्त करते.**

नांदगाव पंचायत समिती अंतर्गत गुंतलेली रक्कम रुपये १५,२३,६२६/- एवढी आहे. २६ विहिरींच्या कामाबाबतची सद्यःस्थितीची माहिती समितीस पाठविण्यात यावी.

येवला पंचायत समितीमध्ये जवाहर विहिरी योजनेंतर्गत सन २०११-१२ मध्ये रुपये ६८,०३,७६३/- एवढी रक्कम गुंतलेली आहे. वरील रक्कम १०१ अपूर्ण विहिरींवर खर्च करण्यात आलेली आहे. १०१ अपूर्ण विहिरींबाबतची सद्यःस्थितीची माहिती समितीस पाठविण्यात यावी.

इगतपुरी पंचायत समितीमध्ये विहिरींच्या कामांतर्गत रुपये ३०,२३,१९६/- एवढी रक्कम गुंतलेली आहे. एकूण ६६ विहिरींबाबतची सद्यःस्थितीची माहिती समितीस पाठविण्यात यावी.

त्र्यंबकेश्वर पंचायत समितीमध्ये विहिरींच्या कामांतर्गत रुपये ३७,००,८८२/- एवढी रक्कम गुंतलेली आहे. ६४ अपूर्ण असलेल्या विहिरींबाबतची सद्यःस्थितीची माहिती समितीस पाठविण्यात यावी.

देवळा पंचायत समितीमधील जवाहर रोजगार विहिर योजनेंतर्गत गुंतलेली रक्कम रुपये ४,७१,६९३/- एवढी आहे. सदर ठिकाणच्या आठ विहिरींच्या कामाबाबतची सद्यःस्थितीची माहिती समितीस पाठविण्यात यावी.

**उपरोक्त पंचायत समितीनिहाय जवाहर रोजगार विहिर योजना व विशेष घटक योजनेंतर्गत, आदिवासी उपयोजनेतील अपूर्ण बांधकामांचा व अखर्चित खर्चाचा तपशील समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा. ज्या पंचायत समित्यांच्या रक्कमा गुंतलेल्या आहेत त्या रक्कमांचा विनियोग कशाप्रकारे केलेला आहे याबाबतची माहिती द्यावी. ज्या विहिरी आर्थिक कारणास्तव संबंधित लाभार्थ्यांनी रद्द केल्या आहेत परंतु त्यांनी विहिरीसाठी शासनाकडून लाभ घेतला असल्यास त्या लाभाची रक्कम तात्काळ वसुल करण्यात यावी तसेच विशेष घटक योजनेअंतर्गत आदिवासी उपयोजनेतील बांधण्यात येणा-या विहिरी विहित मुदतीत पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित पंचायत समित्यांच्या गटविकास अधिका-यांवर सोपविण्यात यावी. अशी समिती शिफारस करीत आहे. उपरोक्त प्रकरणी काम पूर्ण करण्याबाबतच्या कार्यवाहीचा सर्वंकष अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

## प्रकरण दहा

## जिल्हा परिषद, नाशिक

### बंबालेफाटा ते कुशेगाव (ग्रामा २८) रस्त्याचे कि.मी. ५/०० ते ८/०० मजबुतीकरण व डांबरीकरणातील अनियमितता

**परिच्छेद क्रमांक ३.१७३/२३ (सन २००८-२००९)**

सदर कामावर एकूण रक्कम रुपये १९,०२,७४७/- एवढा खर्च नोंद केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) सदर कामास मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांचे पत्र क्र. ८५८/८६/०५ दिनांक १८/०२/०५ अन्वये प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये १९,२९,०१९/- साठी ३ कि. मी. मध्ये ५/०ते ८/० या साखळीसाठी देण्यात आली आहे. प्रत्यक्षात कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, नाशिक यांचे पत्र क्रमांक १०३७/०६ दिनांक १९/०१/०६ अन्वये रक्कम रुपये १९,२९,०१९ रक्कमेस कि. मी. ५/० ते ७/३०० या कामासाठी तांत्रिक मान्यता दिलेली असताना दै. देशदूत दिनांक २२/०४/०८ मध्ये निविदा मागणी केलेली असून निविदेत किमी ३ साठी ५/०० ते ८/०० अशी साखळी नमूद आहे.

(२) मक्तेदाराने वाटाघाटीमध्ये सदर कामाचे प्राकलनाचे दर हे ०५/०६ हे असल्याने ०७/०८ च्या दरसूचीनुसार ५५.५५+४.९९ जादा दर अशी एकूण ६०.५४ जादा दराने काम करणेसाठी संमती दर्शविली आहे.

(३) उपअभियंता यांनी दरांचा तुलनात्मक तक्ता तयार केला आहे. त्यानुसार प्राकलनाचे सन ०५/०६ चे दरसूची नुसार रुपये १९,२९,०१८/- पेक्षा व सन ०७/०८चे दरसूची नुसार कामाची रक्कम रुपये ३०,००,५९७/- एवढी आहे. मक्तेदाराची नोंदणी ही दिनांक २१/११/०९ पर्यंत असुन ती रुपये ३० लक्षच आहे.

(४) मक्तेदारास कामाचे आदेश दिनांक ११/०९/०८ रोजी दिले असुन काम ५/०० ते ८/०० या साखळीत २३०० मी. दिले आहे.

(५) प्रत्यक्ष कामाची मापे मोजमाप पुस्तिका क्र.५८ मध्ये नोंदवितांना ५/०० ते ७/३०० साखळीत फक्त १३९०मीटरच काम केले असुन उर्वरित काम झालेले नसुन याबाबतचा कोणताही पत्रव्यवहार नस्तीमध्ये नाही.

(६) प्रशासकीय मान्यता रक्कम रु. १९,९०,०००/- या मध्ये ५/० ते ८/० या ३ कि.मी. साठी असतांना फक्त १३९० मीटर काम झाले आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्र. आर.एम.आर/१०९९/प्र.क्र.१६०/- रस्ता-१, दि. १८/८/९९ नुसार डांबरी रस्त्याचे नुतनीकरण करणे संबंधीचे आदेश असतांना आदेशानुसार साहित्याची तरतुद केलेली नाही. कामाचे बदलास मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, नाशिक यांची मंजुरी प्राप्त झालेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(५) मा.मुख्य अभियंता सार्व.बांधकाम विभाग नाशिक यांचे आदेश दि. १८/२/२००५ अन्वये ३०५४ मार्ग व पुल आदिवासी उपयोजना या लेखाशिर्षांतर्गत रक्कम रु. १९.९० लक्ष ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार विभागाने पुरेसे अनुदान उपलब्ध झाल्यावर कार्यकारी अभियंता, जि.प.नाशिक यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.

प्रत्यक्षात प्रशासकीय मान्यता देताना ५.०० ते ८.०० या साखळी क्रमांक मध्ये देण्यात आली होती. अंदाजपत्रक करतांना प्रशासकीय मान्यता रक्कमेच्या मर्यादेत म्हणजे ५.०० ते ७.३०० या साखळी क्रमांकावर २३०० मी. लांबी साठी अंदाजपत्रक तयार करण्यात आले.

सन २००७-०८ मध्ये अनुदान उपलब्ध झाल्याने निविदा काढणेत आली. सन २००५-०६ चे दर सूची नुसार तांत्रिक मंजुरी दिलेली असल्याने सन २००७-०८ च्या दराची तुलना करुन शासन निर्णय ग्राम विकास विभाग झेडपीए १०८९/प्र.क्र.२९८२/२८ दि.२७/०५/१९८९ चे अधिन राहून ६०.५४ % जादा दराने मक्तेदार यांची निविदा मंजूर करणेत आली.

जादा दराची निविदा मंजुरी नुसार कामाची एकूण रक्कम रु.३०,००,५९७/- इतकी येते. प्रत्यक्षात प्रशासकीय मान्यता रु.१९.९० लक्ष असलेने प्रशासकीय मान्यतेच्या अधिन राहून १३९० मीटरचे काम पुर्ण करणेत आले. कार्यकारी अभियंता यांनी सुधारित तांत्रिक मान्यता क्र. २४०/२००९ दि. ५.३.२००९ अन्वये दिलेली आहे. (सोबत अंदाजपत्रकाची प्रत) कामावरील खर्च प्रशासकीय मान्यता रक्कमे पर्यंत झालेला आहे.

(६) सदर कामास तांत्रिक मान्यता मा. कार्यकारी अभियंता यांनी दिलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय, मुंबई ३२ डीबीएम/१०८२/सीआर/२४५७/नि.३ दि. ४.३.२००३ नुसार नवीन डांबरीकरण करणेचे काम असल्याने त्यानुसार ७५ मि.मी. बीबीएम २० मि.मी.कारपेट सिलकोट सह अंदाजपत्रकात समावेश करुन काम पुर्ण करण्यात आले आहे.

आक्षेपात नमूद केल्याप्रमाणे डांबरीकरण नुतनीकरणाचे काम नाही.

प्रशासकीय मान्यतेच्या रुपये १९.९० लक्ष रक्कमेत काम केलेले आहे. सदर रक्कमेत १३९० मी.लांबीचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे व त्या Working Estimate ला कार्यकारी अभियंता यांनी २४०/२००९ दि. ५.३.२००९ अन्वये प्रदान करण्यात आलेली आहे.

वरील दिलेला खुलासा ग्राहय धरुन परिच्छेद वगळणेकामी शिफारस होणे कामी विनंती आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ मे, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,बंबाले फाटा ते कुशेगाव रस्त्याच्या कामात साखळी क्रमांक ५/०० ते ७/३०० अशा २३०० मीटर लांबीस तांत्रिक मान्यता असताना केवळ १३९० मीटर लांबीचा रस्ता का केला, मंजूर लांबीपेक्षा कमी लांबीचा रस्ता केल्याने कामाचा मूळ उद्देश सफल कसा झाला. तसेच बंबालेफाटा ते कुशेगाव रस्त्याच्या कामास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता सन २००५-०६ मध्ये मिळाली असताना सदर काम सन २००८-०९ पर्यंत सुरु न करण्याची कारणे काय आहेत. यावर कार्यकारी अभियंता, इवद-१ यांनी समितीस विदित केले की, सन २००५ साली मुख्य अभियंत्यांनी सदर रस्त्याला प्रशासकीय मान्यता दिली होती. सन २००५ साली निविदा काढण्यात आली होती. परंतु निविदेला प्रतिसाद न मिळाल्यामुळे सदर काम करण्यात आले नाही. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, २३०० मीटर लांबीऐवजी १३९० मीटर लांबीचा रस्ता का करण्यात आला.यावर कार्यकारी अभियंता, इवद-१ यांनी समितीस विदित केले की, सन २००५-०६ च्या डीएसआरनुसार २३०० मीटर लांबीचा रस्ता करायचा होता. परंतु १९.९० लक्ष रुपयांपर्यंत सिमित राहून सन २००५-०६ मध्ये तांत्रिक मान्यता घेण्यात आली होती. त्यात २३०० मीटर लांबीचा रस्ता होऊ शकत नव्हता. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, आपला उद्देश सफल झाला का, यावर कार्यकारी अभियंता, इवद-१ यांनी समितीस विदित केले की, सन २००८-०९ मध्ये सदर काम सुरु झाले. ३ वर्षांचा कालावधी उलटून गेल्यामुळे डीएसआर वाढला. यामुळे नवीन प्रशासकीय मान्यतेमध्ये १३९० मीटर लांबीचा रस्ता होऊ शकला. यावर समितीने पुढे असे मत व्यक्त केले की, आपण नवीन डीएसआरनुसार काम घ्यावयास पाहिजे होते. इमारत बांधत असताना डीएसआर वाढल्यास इमारतीची साईज कमी केली असती का,यावर कार्यकारी अभियंता, इवद-१ यांनी समितीस विदित केले की, इमारतीच्या बांधकामाकरिता नवीन प्रशासकीय मान्यता घ्यावी लागली असती. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, त्याच धर्तीवर रस्त्याच्या संदर्भात नवीन प्रशासकीय मान्यता घ्यावयास पाहिजे होती. यावर कार्यकारी अभियंता, इवद-१ यांनी समितीस विदित केले की, प्रशासकीय मान्यतेच्या अधीन राहून रस्त्याचे काम करण्यात आले. परंतु ३ वर्षांच्या काळात डीएसआर वाढल्यामुळे कमी लांबीचा रस्ता करण्यात आला.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, दिनांक १८/२/२००५ रोजी मुख्य अभियंत्यांनी प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर दिनांक ९/३/२००९ रोजी रस्त्याचे काम पूर्ण होणे गरजेचे होते. यावर समितीने पुढे विचारणा केली की, समितीच्या माहितीप्रमाणे प्रथम तांत्रिक मान्यता घेणे गरजेचे आहे. ३ वर्षानंतर नवीन डीएसआर नुसार काम करणे अत्यावश्यक होते. २३०० मीटर लांबीचा रस्ता करायचा असताना १३९० मीटर लांबीचा रस्ता तयार करुन ९१० मीटर लांबीचा रस्ता कमी तयार केला. परिणामी तेथील जनतेला मिळणा-या लाभापासून वंचित ठेवले. सन २००६ मध्ये तांत्रिक मान्यता मिळाली होती. त्यानुसार तेथे २३०० मीटर लांबीचा रस्ता तयार करुन लोकांना सुविधा मिळणे गरजेचे होते. परंतु विलंबाने काम केले, परिणामी डीएसआर वाढल्यामुळे कमी लांबीचा रस्ता करुन जनतेला सुविधेपासून वंचित ठेवले. याकरिता कोण जबाबदार आहे, या संदर्भात संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली तसेच सदर कंत्राटदाराचे नाव काय आहे. यावर कार्यकारी अभियंता, इवद-१ यांनी समितीस विदित केले की, प्रथम निविदा काढली त्यावेळी शिंदे नावाचे कंत्राटदार होते. त्यांनी बिलो निविदा भरली होती. परंतु त्यांनी वर्कऑर्डर स्वीकारली नाही व काम सुरु केले नाही. त्यानंतर पुन्हा निविदा काढण्यात आली त्यावेळी कंठे नावाचे कंत्राटदार होते. त्यांनी सदर काम पूर्ण केले. यावर संचालक, स्थानिक लेखा संचालनालय यांनी विचारणा केली की, ३ वर्षे विलंबाने काम सुरु झाल्यामुळे नवीन डीएसआरनुसार करणे गरजेचे होते.जेणेकरुन जनतेला पूर्ण रस्ता वापरण्यासाठी मिळू शकला असता. परंतु २३०० मीटर ऐवजी १३९० मीटर रस्त्याचे काम केल्यामुळे जनतेला २३०० मीटर रस्त्याची सुविधा मिळू शकली नाही.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, कमी लांबीचा रस्ता केल्यामुळे कोणती कारवाई करणार आहात, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी समितीस विदित केले की, या प्रकरणी तत्कालिन अधिका-यांकडून खुलासा मागावून घेऊ. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ३ वर्षानंतर काम करीत असताना अंदाजपत्रकाच्या डीएसआरनुसार रस्त्याचे काम करणे गरजेचे होते. या प्रकरणी चौकशी करुन त्यात जे कोणी दोषी आढळून येतील त्यांच्याविरुध्द कारवाई करुन त्याबाबतचा अहवाल समितीकडे सादर करावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी समितीस आश्वासित केले की, समितीच्या निदेशानुसार कार्यवाही केली जाईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) बंबाळेफाटा ते कुशेगांव (ग्रामा २८) रस्त्याचे किमी ५/०० ते ८/०० मजबुतीकरण व डांबरीकरणातील अनियमितता प्रकरणी चौकशी करून त्यात दोषी आढळलेल्यांवर कारवाई करण्याबाबत समितीचे निर्देश होते.त्यानुसार सर्वप्रथम सर्वात कमी दराची निविदा प्राप्त झालेल्या कंत्राटदाराने कार्यारंभ आदेश घेतलेला दिसून येत नाही.त्यामुळे कामास वाजवी पेक्षा जास्त विलंब झाला असल्याचे चौकशी अहवालात नमुद आहे.अशा ठेकेदारास काळया यादीत टाकण्यात आले आहे काय नसल्यास त्याची कारणे काय ?

(२) शासनाच्या अर्थसंकल्पीय पुस्तकामध्ये मोठया प्रमाणावर कामांचा समावेश होतो.परंतु वर्षानुवर्ष त्यावरील तरतूद अल्प स्वरूपात असते.परिणामी कालांतराने वाढणा-या डी.एस.आर.मुळे वरील प्रमाणे लेखा आक्षेप उद्‌भवतात व क्षेत्रीय स्तरावर काम करणा-या अधिका-यांच्या अडचणी वाढतात असे प्रसंग वारंवार उद्‌भवू नयेत याकरिता शासनाने कोणती उपाययोजना हाती घेतली आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदर कामाची सर्वात कमी दराची निविदा प्राप्त झालेल्या कंत्राटदाराने कार्यारंभ आदेश घेतला नसल्यामुळे कंत्राटदार श्री.बी.टी.कडलग, सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांना बी-१ निविदा शर्तअनुसार काळया यादीत समाविष्ट करण्यात आले आहे.तसेच मा.अधीक्षक अभियंता सा.बां.मंडळ नाशिक यांचेकडे सदर मक्तेदारास काळ्या यादीत टाकणेबाबत शिफारस करण्यात आली आहे.

तद्‌नंतर जिल्हा परिषद, नाशिक अंतर्गत संबंधित मक्तेदारास कोणतेही काम देण्यात आलेले नाही. सदर मुद्याबाबत शासनास अवगत करण्यात आले आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-**(बांधकाम-३) जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी सहमत.

**नियोजन विभागाचे अभिप्रायः-**

(२) जिल्हयातील पंचायत राज संस्था आणि नागरी स्वराज्य संस्था यांनी प्रस्तावित केलेल्या विविध योजना एकत्र करून सर्व समावेशक विकास जिल्हा वार्षिक योजनेचा मसूदा तयार करून राज्य शासनास सादर करणे हे जिल्हा नियोजन समितीचे महत्वाचे काम आहे.जिल्हयाचा वार्षिक योजनेचा आराखडा तयार करतांना जिल्हयाच्या प्राथम्यता व गरजा यांचा विचार करून जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सर्व प्रशासकीय विभागाच्या विविध योजनांचा किती निधी उपलब्ध करून द्यावा,याबाबतचे अधिकार जिल्हा नियोजन समितीस आहेत. यानुसार तयार करण्यात आलेला प्रारूप जिल्हा वार्षिक योजनेचा आराखडा राज्यस्तरीत बैठकीत मान्यता प्राप्त झाल्यानंतर त्याप्रमाणे संबधित जिल्हयाकरीता मंजूर झालेला निधी अर्थसंकल्पित करण्यात येतो व हा निधी नियोजन विभागाकडून जिल्हा नियोजन समितीला वितरीत करण्यात येतो.सबब जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत जिल्हयातील पंचायत राज संस्था आणि नागरी स्वराज्य संस्था यांचे प्रस्तावित विविध योजनांतर्गत निधी उपलब्ध करून देण्याबाबतचे संपूर्ण अधिकारी जिल्हा नियोजन समितीला असल्याने,त्याकरिता शासनाकडून उपाययोजना करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.तसेच वित्तिय अधिकारी नियम पुस्तिका १९७८,भाग पहिला उपविभाग पाच मध्ये नमूद केलेल्या प्रशासकीय मान्यता देण्याच्या अटीनुसार प्रत्येक काम ४ वर्षात पूर्ण होईल असे कामाचे नियोजन करण्याबाबत शासनाच्या स्थायी सूचना आहेत.तथापि, जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गतची कामे ही २ वर्षात पूर्ण होणे आवश्यक असून निधी उपलब्धतेच्या मर्यादेत जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सर्व प्रशासकीय विभाग तसेच जिल्हयातील पंचायत राज संस्था आणि नागरी स्वराज्य संस्था यांचा विविध

योजना अंतर्गत कामांना किती निधी द्यावयाचा ही बाब स्थानिक गरजा,प्राथम्यता विचारात घेवून जिल्हा नियोजन समितीने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.ही बाब महाराष्ट्र राज्य जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) (सुधारणा) अधिनियम,२००० च्या तरतूदीप्रमाणे जिल्हा नियोजन समितीच्या कार्यकक्षेतील असल्याने,शासनाकडून कार्यवाही अपेक्षित नाही.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने नाशिक जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, १) बंबाळेफाटा ते कुसेगांव (ग्रामा २८) रस्त्याचे किमी ५/०० ते ८/०० मजबुतीकरण व डांबरी करणातील अनियमितता प्रकरणी चौकशी करून त्यात दोषी आढळलेल्यांवर कारवाई करण्याबाबत समितीचे निर्देश होते.त्यानुसार सर्वप्रथम सर्वात कमी दराची निविदा प्राप्त झालेल्या कंत्राटदाराने कार्यारंभ आदेश घेतलेला दिसून येत नाही.त्यामुळे कामास वाजवी पेक्षा जास्त विलंब झाला असल्याचे चौकशी अहवालात नमुद आहे.अशा ठेकेदारास काळया यादीत टाकण्यात आले आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय ?

(२) शासनाच्या अर्थसंकल्पीय पुस्तकामध्ये मोठया प्रमाणावर कामांचा समावेश होतो.परंतू वर्षानुवर्ष त्यावरील तरतूद अल्प स्वरूपात असते.परिणामी कालांतराने वाढणा-या डी.एस.आर.मुळे वरील प्रमाणे लेखा आक्षेप उद्‌भवू नयेत याकरिता शासनाने कोणती उपाययोजना हाती घेतली आहे. यावर सचिव, एम.एम.जी.एस.वाय यांनी समितीस विदित केले की, सदर रस्त्याच्या कामाला विलंब झाल्यामुळे संबंधित ठेकेदाराला काळया यादीत समाविष्ट करावे असे समितीने निदेश दिले होते. त्याप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्रस्ताव सादर केला आहे. सदर ठेकेदाराला जिल्हा परिषदेने काळया यादीत टाकले आहे. सदर काम हे सन २००९ चे आहे तेव्हापासुन जिल्हा परिषद त्यांना काम देत नाही. त्या ठेकेदाराचे रजिस्ट्रेशन रद्द करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्रस्ताव सादर केला आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, समितीने कारवाई करावी असे भेटीच्या वेळी सांगितले होते. त्यामुळे आता विभागीय सचिवांची साक्ष घेत आहोत तेव्हा यासंबंधतात काय कारवाई केली याची माहिती दयावी. यावर सचिव एम. एम. जी. वाय. यांनी समितीस विदित केले की, संबंधित ठेकेदारावर कारवाई केली आहे. त्या ठेकेदाराला जिल्ह्या परिषदेने काळ्या यादीत समाविष्ट केले आहे. जिल्हा परिषदेने त्यांना एकही काम दिले नाही. त्या ठेकेदाराचे रजिस्ट्रेशन रद्द करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला कळविले आहे. यावर समितीने समाधान व्यक्त केले.

**अभिप्राय व शिफारशी**

बंबालेफाटा ते कुशेगाव (ग्रामा-२८) रस्त्याचे कि.मी. ५/०० ते ८/०० मजबुतीकरण व डांबरीकरणातील अनियमिततेबाबतचा मुद्दा समितीच्या नाशिक जिल्ह्याच्या भेटी व साक्षीच्या वेळी उपस्थित झाला असता ३०५४ मार्ग व पुल आदिवासी उपयोजना या लेखा शीर्षातंर्गत सदर कामास मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांनी रुपये १९,९०,०००/- रक्कमेची प्रशासकीय मान्यता आणि कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, नाशिक यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केली होती. डांबरी रस्त्याचे नुतनीकरण करण्यासंदर्भात मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांची मंजुरी प्राप्त झालेली नसतांनाही नियमबाह्यपणे काम करण्यात आले.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांची दिनांक ५ मे, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीदरम्यान साखळी क्र.५/०० ते ७/३०० अशा २३०० मिटर लांबीस तांत्रिक मान्यता असतानाही केवळ १३९० मिटर मंजूर लांबीपेक्षा कमी लांबीचा रस्ता केल्याने कामाचा मुळ उद्देश सफल झालेला नाही. तीन वर्षाचा कालावधी संपुष्टात आल्याने डीएसआर वाढल्याने नवीन प्रशासकीय मान्यतेमध्ये १३९० मिटर लांबीचा रस्ता होऊ शकला नाही. तीन वर्ष विलंबाने काम सुरु झाल्यामुळे २३०० मिटरचा रस्ता पूर्ण होऊ शकला नाही अशी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, नाशिक यांनी समितीस माहिती दिली.

याप्रकरणी चौकशी करुन दोषी आढळून येणा-यांविरुध्द कारवाई करुन त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करावा असे निदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना समितीने दिले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस आश्वासित करुन समितीच्या निदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले. **कालांतराने वाढणा-या डीएसआर मुळे वरील प्रमाणे लेखा आक्षेप उद्‌भवू नये म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली. यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी सदरहू ठेकेदाराला काळ्या यादीत समाविष्ट करुन त्याची नोंदणी रद्द करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला कळविण्यात आल्याने याबाबत समिती समाधान व्यक्त करीत असून सदर कंत्राटदार भविष्यात येणकेन प्रकारे जिल्हा परिषदेच्या कोणत्याही कामाच्या प्रक्रियेत सहभागी होणार नाही याची दक्षता जिल्हा परिषद प्रशासनाने घ्यावी अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण अकरा

## जिल्हा परिषद, नाशिक

### प्रजिमा ५६ वरील मांजरगाव फाटा ते मांजरगांव रस्ता (ग्रामा-४) सुधारणा या कामातील अनियमिततेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.२०४/७० (सन २०११-२०१२)**

वरील कामावरील एकूण खर्च रक्कम रुपये १४,९६,४४७/- बाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत :-

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक पंरास/१०९१/सीआर ४२७/२६, दिनांक ११/२/१९९५ नुसार सदर रस्ता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या नावावर केलेबाबतचे अभिलेखे लेखापरिक्षणास सादर केलेले नाहीत.

(२) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्रमांक संकिर्ण/२००३/प्र.क्र.१२८/रस्ते-१, दि. ०६/०५/२००३ नुसार रस्ता कामासाठी संपादित केलेल्या जमिनीचा ७/१२ चा उतारा नस्ती सोबत आढळला नाही.

(३) बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक १३२ नुसार तांत्रिक अधिकारी यांचा स्थळ निरिक्षण प्रथम चाचणी अहवाल व प्रस्तावीत कामाचा चिन्हांकित नकाशा नस्ती सोबत जोडलेला नाही.

(४) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग परिपत्रक क्रमांक पंरास/१०८८/सीआर/३०४१/२६, दिनांक १४/९/१९८८/सीआर/३०४१/२६, दिनांक १४/९/१९८८ नुसार कार्यवाही केली नाही.

(५) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक आर.एम.आर./ १०९५/२८८/रस्ते-१, दिनांक ८ मार्च, १९९६ नुसार सविस्तर सर्वेक्षणानंतर अंदाजपत्रके तयार करण्यात आली नाही.

(६) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग निर्णय क्रमांक ग्रासयो/२००७/प्र.क्र-१/यो-९, दि. २०/४/२००७ नुसार ठेकेदार नोंदणीकृत आणि काम करण्यास पात्र असलेबाबत प्रमाणपत्र देणे आवश्यक असताना नस्तीसोबत तसे प्रमाणपत्र आढळले नाही.

(७) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम क्रमांक १९८ नुसार निविदा प्रपत्रामध्ये निविदाकारासंबंधी आवश्यक असलेली माहिती भरलेली नसतानाही विभागाने निविदा ग्राहय धरलेली आहे.

(८) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए २००४/प्र.क्र१८/वित्त-९/३३, दिनांक ३०/६/२००४ तसेच महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक झेडपीए २००८/प्र.क्र. ४७२/वित्त-९/३३ दिनांक ९/२/२००९ अन्वये निविदेशिवाय कामे देताना ग्रामपंचायतींना प्राधान्य देणे आवश्यक आहे आणि ग्रामपंचायतीच्या वतीने काम नाकारल्यास मजूर संस्थांना प्राधान्य दयावे असे आदेश आहेत. सदर कामाच्या नस्तीसोबत अशा प्रकारचे लेखे आढळले नाहीत.

(९) महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ मधील नियम १४८(१) नुसार कामाच्या अटी/शर्ती बाबत परिपूर्ण करारनामा केलेला नाही.

(१०) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास/१०९८/प्र.क्र.२९/९८ शासन हमी, दि. १९/८/१९९८ व महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक जिप २/ २०००/प्र.क्र.८३७/पंरा८(३५)दिनांक १५/९/२००३, तसेच विमा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक प्रविनि/१/१८०१/सीआर/जिप/संकीर्ण, दिनांक ३०/७/२००२ नुसार काम सुरु करणेपुर्वी संबंधित कामाचा व कामावरील मजूरांचा विमा उतरविण्यात आलेला नाही.

(११) महाराष्ट्र शासन, महसूल आणि वनविभाग परिपत्रक क्रमांक गौखनि/१०/२००१/ प्र.क्र.३०८/ख/मुंबई, दिनांक १५/१२/२००३ नुसार खोदकामातून निघालेल्या साहित्याचा वापर त्याच ठिकाणी केल्यास अशा गौण खनिजापोटी स्वामित्वधनाची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे. सदर प्रकरण रक्कम रुपये ५८,०२०/- वसुल करणे आवश्यक आहे.

(१२) महाराष्ट्र शासन, निर्णय क्रमांक /प्र.क्र.४४/३३, दि.२१/१२/२००० नुसार काम पुर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणेत आलेला नाही.

(१३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ नियम १९७ नुसार पुर्ण कामांच्या नोंदी नमुना क्रमांक ६९ व नियम ९७ नुसार नमुना क्रमांक ४० मधील रस्ते नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. तशा नोंदी घेतलेल्या नाहीत.

(१४) महाराष्ट्र शासन, निर्णय क्रमांक सीआर /४४८/आ-३९/दिनांक १७/०९/२००४ अन्वये किरकोळ दुरुस्तीच्या कामांची नोंद इतिहास नोंदवहीत घेण्यात आलेली नाही.

(१५) सदर कामाच्या अंदाजपत्रकासोबत क्वारी चार्ट जोडण्यात आलेला नाही त्यामुळे कामासाठी वापरलेले साहित्य शासकीय खाणी वरुन आणल्याबाबत खात्री झाली नाही.

(१६) सदर कामाच्या क्रश थिकनेस संदर्भात ०/४०० ते ०/८०० या कामाच्या विभागात ७५ एम.एम.बी.बी.एम, २० एम एम सिलकोट आणि ४० एमएमचे काम याबाबत चुकीचा दर आकारणी केल्याने रक्कम रुपये १,१४,६००/- जादा प्रदान झाल्याचे दिसून येते.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) परिच्छेदात नमूद केलेला रस्ता हा शासनाच्या रस्ते विकास सुची १९८१ ते २००१ मध्ये समाविष्ट असुन ग्रामीण मार्ग क्र. ८४ आहे. त्यांची नोंद उपविभागीय स्तरावर नमुना क्रमांक ४० मध्ये घेण्यात आली आहे त्यांची छायांकित प्रत सोबत अवलोकनार्थ सादर.

(२) सदरचा रस्ता ग्रामीण मार्ग क्र. ८४ आहे. अस्तित्वातील खडीकरणाच्या रस्त्यावर डांबरीकरण करण्याचे काम केले आहे. महा.जि.प. व पं.स. लेखासंहिता १९६८ चे नियम ९७ अनुसार रस्त्याची नोंद नमुना क्रमांक ४० मध्ये घेण्यात आलेली आहे. तसेच सदर कामासाठी नव्याने भूसंपादन करण्यात आलेले नाही.

(३) बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्र. १३२ नुसार उपअभियंता, शाखा अभियंता यांनी स्थळ निरीक्षण पहाणी करुन सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यात पहाणी केल्याचा शाखा अभियंता, उपअभियंता यांचा दाखला, तालुका नकाशा, क्वारी चार्ट इ. आवश्यक कागदपत्रे सविस्तर अंदाजपत्रकासोबत आहेत. त्याची छायांकित प्रत अवलोकनार्थ सादर केली आहे.

(४) वर्गीकृत ग्रामीण मार्ग क्र.८४ आहे.

(५) शासन निर्णयातील तरतुदीनुसार सविस्तर सर्वेक्षणानंतर आवश्यक तरतुदी सविस्तर अंदाजपत्रकात करण्यात आल्या आहेत व त्यास सक्षम प्राधिका-याकडून तांत्रिक मंजुरी घेणेत आली आहे.

(६) शासन निर्णयानुसार आदेशातील कामाचे ठेकेदार पंजीकृत असल्याबाबत खात्री करण्यात आली असून त्यांची प्रमाणित प्रत सोबत सादर केली आहे.

(७) सा.बां.नियम पुस्तिका नियम क्र. १९८ नुसार निविदा प्रपत्रामध्ये निविदाकारासंबंधी आवश्यक असलेली माहिती नमूद केली आहे. जिल्हा परिषद स्तरावर मक्तेदार यांची नोंदणी करतांना सर्व कागदपत्रे उपलब्ध आहेत. व त्यांचा नोंदणी क्रमांक ६४६ असा आहे. कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या आहेत. निविदा प्रपत्रात आता आवश्यक माहिती भरलेली आहे.

(८) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णयानुसार ग्रामपंचायतींची सदर काम करण्यास इच्छुक नसलेबाबत पत्राची छायांकित प्रत समवेत अवलोकनार्थ सादर केली आहे.

(९) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम १४८(१) अनुसार अटी व शर्ती करारनामा करण्यात आलेला आहे. छायांकित प्रत समवेत अवलोकनार्थ सादर.

(१०) शासन नियमाप्रमाणे मक्तेदारांच्या प्रथम धावते देयकातुन रु. १४९६४/-रक्कमेचा विमा वसुल करण्यात आलेला आहे. भरणा रजिस्टरची छायांकित प्रत सोबत सादर केली आहे.

(११) आक्षेपात नमूद केल्यानुसार ८२१.०० घ.मि.परिमाण हे गटारीतून निघालेल्या साहित्याचे आहे. इगतपुरी तालुक्यात सरासरी ३.०० मी.मी. पेक्षा जादा पाऊस पडत असल्याने अस्तित्वातील रस्त्याचे भराव दोन्ही बाजुने मोठया प्रमाणात ढासळतात. सदरहू रस्त्याचाही दोन्ही बाजूचा भराव वाहून रस्त्याच्या गटारीत गेल्याने काम करताना गटारातील वाहून गेलेली भरावाचीच माती दोन्ही बाजुच्या रस्त्याचा भराव सुस्थितीत आणण्यासाठी गटारातील वाहून गेलेला मुरुम वापरण्यात आलेला आहे.

उर्वरित ९७.७८ घ.मि. मुरुम बाहेरुन आणून वाहून गेलेल्या भरावाचे रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सदर साहित्याचे गौण खनिज रक्कम रु. ६,९१०/- देयकातून वसूल करण्यात आली आहे. तसेच एकूण गौणखनिज रक्कम रु. ५३,५५८/- देयकातून वसूल करणेत आले आहेत.

(१२) शासन निर्णयानुसार मोजमाप पुस्तिका क्र. ३३६४ पा.क्र.६८ वर काम पूर्णत्वाचा दाखला नोंदविण्यात आला आहे. मोजमाप पुस्तिकेची छायांकित प्रत अवलोकनार्थ सादर.

(१३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १९७ नुसार नमुना नंबर ६९ व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ९७ अनुसार नमुना नंबर ४० मध्ये आवश्यक त्या नोंदी घेण्यात आल्या असून सोबत छायांकित प्रत अवलोकनार्थ सादर.

(१४) शासन निर्णयानुसार सदरचे काम किरकोळ दुरुस्तीचे नाही आदिवासी उपाययोजना लेखाशिर्षाखाली रस्त्याचे डांबरीकरण करणेचे काम केले असुन नमुना नंबर ४० मध्ये नोंद घेतली आहे.

(१५) सदर कामाच्या अंदाजपत्रकासोबत क्वारी चार्ट जोडण्यात आलेला आहे. शासकीय खदानी उपलब्ध नसल्याने आवश्यक उपलब्ध होणा-या साहित्याचे कमीत कमी अंतर (लिड) देण्यात आलेले आहेत. व त्या बाबत उप अभियंता यांनी प्रमाणित केलेले आहे. सोबत क्वारी चार्ट छायांकित प्रत सादर.

(१६) मुद्यात नमुद केल्यानुसार रस्त्याच्या अस्तित्वातील खडीची जाळी (क्रॅश) दाखविणारा तक्ता अंदाजपत्रकासोबत जोडलेला आहे. त्याची तपासणी केली असता आवश्यक साखळी क्रमांकातच ४० मी.मी.खडीची १० सें.मी. लुजथराची तरतुद करणेत आली होती, व त्यानुसार प्रत्यक्षात काम करण्यात आलेले आहे. त्यावर ७५ मि. मि.बी.बी.एम २० मि.मी. कारपेट सिलकोट करणेचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. खडीची अस्तित्वातील जाडी सरासरी करुन १० सें.मी. लुज खडीकरण (७.५० ) जाडीचे काम करण्यात आलेले आहे. त्यामुळे वसुली केली नाही.

वरील प्रमाणे केलेला खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ मे, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,मांजरगाव फाटा ते मांजरगाव रस्ता हा जिल्हा परिषद वा पंचायत समितीच्या अखत्यारितील असल्याबाबतचे अभिलेख लेखापरीक्षणास का उपलब्ध केले नाहीत. यावर समितीने असे निदेश दिले की, स्थानिक निधी लेखापरीक्षण कलम ७ अन्वये दंडात्मक कारवाई करावयाची आहे. वारंवार तोच विषय पुढे येत आहे. आम्ही सूचना करुन कारवाई करण्यास सांगण्यापेक्षा अशा प्रकारच्या मुद्याबाबत कलम ७ अन्वये दंडात्मक कारवाई करावी. यावर कार्यकारी अभियंता, इवद-१ यांनी समितीस विदित केले की, रस्ते विकास सूची १९८१ ते २००० मध्ये हे काम आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सदर कामाचे स्थळ, निरीक्षण अहवाल, तालुका नकाशा, क्वारी चार्ट इत्यादी अभिलेख त्याचवेळी लेखापरीक्षणास का दर्शविण्यात आले नाहीत. कामाच्या निविदा प्रपत्रातील निविदाकरारासंबंधीची माहिती केव्हा भरण्यात आली आहे. महसूल व वन विभाग परिपत्रक दिनांक १५.१२.२००३ नुसार खोदकामातून निघालेल्या साहित्याचा त्याच ठिकाणी वापर केल्यास गौण खनिज फी वसूल करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही का करण्यात आली नाही. यावर कार्यकारी अभियंता, इवद-१ यांनी समितीस विदित केले की, खोदकामातून काढलेले मटेरियल तेथेच वापरले असेल तर त्याला रॉयल्टी लावू नये. बाहेरुन मुरुम आणले त्याला रॉयल्टी दिली, त्याचे डॉक्यूमेंट जोडले आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ०/४०० ते ०/८०० या साखळीमध्ये ७५ एमएम बीबीएम, २० व ४० एमएम सिलिकोटचे कामाबाबत चुकीचा दर दिल्याने झालेल्या १,१४,६०० चे जादा प्रदानास कोण जबाबदार आहे? सदरचे जादा प्रदान वसुलीबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे. यावर कार्यकारी अभियंता, इवद-१ यांनी समितीस विदित केले की फ्रेश स्टेटमेंट जोडले आहे. ०.२०० ते ०.८०० त्या भागामध्ये ७.५ सीएम क्रश टाकून काम करुन घेण्यात आले आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, लेखापरीक्षणाचा कॉमन मुद्दा आहे. त्याबाबत कॉमन रुलिंग द्यावे.

स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम कलम ७ अन्वये दंडात्मक कारवाई करण्याबाबत शासनाच्या सूचना आहेत. ज्या ज्या परिच्छेदामध्ये अभिलेखे उपलब्ध करुन दिलेले नाहीत त्या प्रकरणी दंडात्मक कारवाई करायची आहे. अशा प्रकारचे जे मुद्दे उपस्थित होतील, लेखापरीक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करुन दिले नाहीत त्याबाबत २५ हजार रुपये दंड करायचा आहे. अशा प्रकारच्या प्रत्येक परिच्छेदाबाबत ही कारवाई करण्यात यावी. ज्या परिच्छेदामध्ये अभिलेखे लेखापरीक्षणासाठी दिले नाहीत त्याबाबत कॉमन रुलिंग आहे. कलम ७ नुसार दंडात्मक कारवाई करावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

प्रजिमा ५६ वरील मांजरगाव फाटा ते मांजरगाव रस्ता (ग्राम) सुधारणा या कामावरील अनियमितेबाबत :-

(१) यामध्ये मांजरगाव फाटा ते मांजरगाव रस्ता हा जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीच्या अखत्यारितील असल्याने (१) अभिलेख (२) कामाचे स्थळ (३) निरिक्षण अहवाल (४) तालुका नकाशा (५) क्वारी चार्ट इत्यादी अभिलेख (६) काम पूर्ण झालेल्या नोंदी नमुना नं.४० व ६९ मधील कामांच्या नोंदी हे अभिलेख लेखा परिक्षणाच्या वेळी उपलब्ध करून देण्यात आलेले नव्हते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालामध्ये उक्त कागदपत्रे अवलोकन लेखा परिक्षकांनी केले असल्यामुळे महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार सदरहू प्रकरणी २५०००/-रूपये वसूल करणे उचित होणार नाही असा अहवाल दिला आहे. तरी कागदपत्र अवलोकन केले याबाबतच्या खुणा (मार्क) समवेत लेखापरिक्षकांनी त्यांची स्वाक्षरी करणे बंधनकारक असते. तरी अशा प्रकारची कार्यवाही सदरहू प्रकरणात झाली आहे काय किंवा सदरहू बाब समितीच्या निदर्शनास वेळीच आणून का देण्यात आली नाही.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

स्थानिक निधी लेखा परिक्षण अहवाल सन २०११-१२ मध्ये सदर कामाची मुळ नस्ती व मोजमाप पुस्तिका लेखापरिक्षणाचे वेळी सदर नस्ती तपासणी करण्यात आली होती.लेखापरिक्षक यांनी कागदपत्र अवलोकन केले बाबतच्या खुणा () मार्क केलेल्या आहेत परंतु लेखापरिक्षकांनी स्वाक्षरी केलेली नाही तसेच इतरही कामांचे लेखापरिक्षण केलेल्या नस्तींवर लेखापरिक्षकांनी टिकमार्क () खुणा केलेल्या असून स्वाक्षरी केलेली नाही.त्यामुळे सदरहू बाब समितीच्या निदर्शनास आणून देता आली नाही.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(बांधकाम-३) जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी सहमत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नाशिक जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली असता समितीस सचिव एम.एम.जी.एस.वाय, श्री.विवेक नाईक यांच्याकडून अशी माहिती प्राप्त झाली की, सदर कामाचे लेखा परिक्षण केले त्यावेळी सहया केल्या नसल्याची बाब निदर्शनास आली होती. यावर समितीने अशी विचारणा केली की, कामाची मूळ नस्ती व मोजमाप पुस्तिका लेखा परिक्षणाचे वेळी सादर करण्यात आली नव्हती. यावर सचिव एम.एम.जी.एस.वाय, श्री.विवेक नाईक यांनी समितीस विदित केले की, नस्ती व मोजमाप पुस्तिकेची तपासणी करण्यात आली आहे. लेखापरिक्षणाच्या वेळी लेखा परिक्षकांनी टीक मार्क केली आहे. सहया केलेल्या नाहीत. यावर सह संचालक स्थानिक निधी लेखा यांनी समितीस माहिती दिली की, लेखा परिक्षणाच्या वेळी ५-६ कागदपत्रे सादर करण्याचे निदेश देण्यात आले होते. त्यापैकी ३ कागदपत्रे दिलेली आहेत. उर्वरित कागदपत्रे दिलेली नाहीत. त्यामुळे सहया केलेल्या नसाव्यात. यावर समितीने अशी विचारणा केली की, याचा अर्थ आपण कागदपत्रे सादर केलेली नाहीत. यावर सचिव एम.एम.जी.एस.वाय यांनी समितीस विदित केले की, कागदपत्रे दिलेली आहेत. ती लेखा परिक्षकांनी पाहिलेली आहेत. त्या कागदपत्रांवर टीकमार्क देखील केलेले आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, मग त्यांनी सही का केली नाही, त्यांनी टीकमार्क केले आहे तर मग परिच्छेद वगळून का घेतला नाही ती आपली जबाबदारी होती. यावर सचिव, एम.एम.जी.एस.वाय यांनी समितीस विदित केले की, यात लेखा परिक्षकाचा दोष आहे. त्यांनी सही केलेली नाही. यावर सह संचालक,स्थानिक निधी लेखा यांनी समितीस माहिती दिली की, लेखापरिक्षकाने लेखा परिक्षण करताना ७-८ कागदपत्रे मागितली होती. त्यापैकी ३ प्रकारचीच कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आली होती. उर्वरित कागदपत्र उपलब्ध करुन देण्यात आली नव्हती त्यामुळे त्यांनी सही केलेली नाही. ती स्वाक्षरी का केली

नाही याचे उत्तर सांगितले की, पूर्ण रेकॉर्ड त्यांनी दिलेच नव्हते. एमबी ही महत्वाची कागदपत्रे दिलेले नव्हते. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सर्व टीकमार्क केल्या आहेत याचा अर्थ सर्व रेकॉर्ड दिले आहे. सह-संचालक, स्थानिक निधी लेखा यांच्या म्हणन्यानुसार रेकॉर्ड अपूर्ण दिले पण सर्व टीकमार्क दिसत आहेत. फक्त स्वाक्षरी करायची राहिली आहे. टीकमार्क केली आहे परंतु एमबी दाखविलेली नाही. यावर सह संचालक स्थानिक निधी लेखा यांनी समितीस विदित केले की, लेखा आक्षेपातील रस्ते जिल्हा परिषदेच्या नावावर असल्याबाबतचा उतारा मागितला होता तो दिलेला नाही. यावर समितीने पुढे विचारणा केली की, जिल्हा परिषदेचा रस्ता हा ग्रामविकास विभागाच्या मालकीचा आहे काय, रस्त्याचा उतारा कोणी देते काय, रस्त्याच्या यादीमध्ये नाव नसते तर नंबर असतो. यावर सचिव एम.एम.जी.एस.वाय यांनी समितीस विदित केले की, समितीचा मुद्दा असा आहे की, लेखापरिक्षणाच्या वेळेला टीकमार्क केलेली आहे आणि सही केलेली नाही टीकमार्क केलेली परिक्षणाच्या वेळी दाखविलेली आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, हा विषय काही खूप मोठा नाही. त्यामुळे यावर सही करुन स्पष्ट करा आणि हे प्रकरण पूर्ण करा.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषदेमध्ये लेखा पुनर्विलोकन अहवालाचे परिक्षण करीत असताना स्थानिक निधी लेखा कार्यालयाचे लेखा परिक्षक जिल्हा परिषद मुख्यालयात जाऊन सर्व संबंधित नस्तींची पाहणी करीत असतात. त्यावर हिरव्या पेनाने खूण (मार्क) करतात आणि त्या प्रश्नासंबंधित अधिका-यांकडून कागदपत्रांची पूर्तता झाली किंवा नाही असे मार्किंग (खूण) हिरव्या पेनने केली जाते, परंतु याबाबत ज्या अधिकारी/कर्मचा-यांकडून कागदपत्रे येणे आहे किंवा त्याची पूर्तता केली आहे यावरुन बोध होत नाही. संबंधित लेखा परीक्षकांनी कागदपत्रे परीक्षित केली किंवा कसे याचाही बोध होत नाही. यासाठी चेकलिस्ट करुन ती संबंधित नस्तीत लावणे व कोणकोणत्या कागदपत्रांची पूर्तता संबंधित अधिकारी/कर्मचा-यांनी केली याची स्पष्टता होणे आवश्यक आहे. लेखा परीक्षकांकडून ही बाब हिरव्या पेनने केवळ (मार्किंग) खूणा करुन कागदपत्रांची पूर्तता झाली किंवा नाही, असा आक्षेप संबंधित नस्तीवर केला जातो. नस्तीमधील संबंधित आक्षेपाची पूर्तता करावी याचीही स्पष्टपणे नोंद केलेली नसते. अशा प्रकारे लेखा परीक्षकांकडून आणि जिल्हा परिषदेच्या कार्यालयाकडून याबाबत आक्षेपाची पूर्तता वेळीच होत नाही. स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० मध्ये दंडाची तरतूद केली असल्यामुळे नेमका कोण दोषी आहे हे ही तपासले जात नाही. लेखा परीक्षकांकडे अधिकारी/कर्मचारी यांनी कागदपत्रांची पूर्तता केली आहे असे लेखा परिक्षण झाल्यानंतरसांगतात. परंतु प्रत्यक्षात समिती जेव्हा याची माहिती घेत असते त्या वेळेला या बाबीची पूर्तता झाल्याचे समितीला नस्तीत दिसून येत नाही ही अनियमितता टाळण्यासाठी लेखा परीक्षकांनी किंवा वित्त विभागाने या संदर्भातील स्वयंस्पष्टता आखून कोणकोणत्या कागदपत्रांची पूर्तता केली किंवा कोणकोणत्या कागदपत्रांची पूर्तता केली नाही तसेच नस्तीतील कागदपत्रे ठेवण्यास व त्याची अभिरक्षा नेमकी कोणत्या अधिकारी/ कर्मचा-यांकडे असावी. दंडात्मक तरतूद असल्यामुळे संबंधित दोषी असणा-यांनाच त्याची शास्ती झाली पाहिजे. अन्यथा अनेक निरपराध व कनिष्ठ कर्मचा-यांवर कारवाई होण्याची शक्यता असते. याबाबत हिरव्या पेनने स्पष्ट माहिती संबंधित नस्तीवर लिहिणे आवश्यक आहे. खूणा (मार्किंग) केल्या असल्या तरी यावरुन वेळोवेळी कागदपत्रांची पूर्तता झाली आहे असे केवळ लेखा परिक्षक सांगू शकतो. या पध्दतीने संबंधित नस्तीचे परिक्षण आयुक्त कार्यालयाकडून देखील होत असते त्यांचेकडून देखील फेर तपासणी करण्याबाबत ठोस अशी तपासणी होणे आवश्यक आहे.

**अतः वित्त विभागाने लेखा परिक्षकांच्या या पध्दतीत आणखी सुस्पष्टता येण्यासाठी या तपासणी पध्दतीमध्ये बदल करुन त्याचा लेखाजोखा संबंधित नस्तीवर कशा पध्दतीने होईल याबाबत योग्य ते निर्णय घेऊन त्या संदर्भातील सर्वंकष शासन निर्णय निर्गमित करावा, अशी समितीची शिफारस आहे व याबाबतच्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

प्रकरण बारा

## जिल्हा परिषद, नाशिक

### सन २०१०-२०११ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी

**परिच्छेद क्रमांक ३.८१५ (३) (सन २०११-१२)**

| अ. क्र. (१) | नियमबाहय बाबींचे स्वरुप (२) | जिल्हा परिषदेचे नाव (३) | जिल्हा परिषदेचा विभाग (४) | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्र. (५) | रक्कम रुपये (६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | अपहार प्रकरणे | नाशिक | सामान्य प्रशासन विभाग | २० | ३,४२,७८,९०१/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

जिल्हा परिषद नाशिक मध्ये दिनांक ३१ मार्च, २०१२ अखेरपर्यंत ग्रामनिधीची ३८० व जरोयोची २७१ गैरव्यवहारासबंधातील अशी एकूण ६५१ प्रकरणे प्रलंबित होती.

ग्रामनिधीच्या ३८० प्रकरणांमध्ये १,९५,७१,४४८/- व जरोयोच्या २७१ प्रकरणांमध्ये रक्कम रुपये १,४७,०७,४६१/- अशी एकूण ६५१ प्रकरणात ३,४२,७८,९०९.००/- इतकी रक्कम गुंतली होती.

स्थानिक निधी लेखा विभागाच्या रजिस्टरनुसार प्रत्यक्ष ताळमेळ घेऊन ग्रामनिधीची ९७ प्रकरणे निकाली काढण्यात आलेली असून रक्कम रुपये ३५,८३,०२१/- इतकी रक्कम वसुल करण्यात आलेली आहे. जवाहर रोजगार योजनेची १३ प्रकरणे निकाली काढण्यात आलेली असुन रुपये १,४०,५५२/- इतकी रक्कम वसुल करण्यात आली आहे.

(१५) या कार्या पत्र क्र साप्रवि/ग्राप/संकीर्ण/३४३/१० दि. २१/१०/१०

(१६) या कार्या पत्र क्र साप्रवि/ग्राप/संकीर्ण/३५३/१० दि. २७/१०/१०

(१७) या कार्या पत्र क्र साप्रवि/ग्राप/संकीर्ण/३६७/१० दि. १/११/११

(१८) साप्रवि/ग्रापं/संकीर्ण-१/७७/११, नाशिक दि.१६/०३/११

(१९) का.दा.नो.साप्रवि/ग्रांप/संकीर्ण-१/११८ ते १३३/११ नादि ०५/०५/११

(२०) का.दा.नो.साप्रवि/ग्रांप/संकीर्ण-१/२१७ ते २३२/११ नादि- २८/७/११

(२१) साप्रवि/ग्रापं/संकीर्ण-१/२३५/१२, नाशिक दि.१२/१२/१२

(२२) अ.शा.क्र.साप्रवि/ग्रांप/अफरातफर/४२१/१३ नाशिक दि.१३/१२/१३

(२३) का.दा.नो.साप्रवि/ग्रांप/अफरातफर/७१ ते ६/१४ दि. १५/०३/१४

(२४) साप्रवि/ग्रापं/अफरातफर/३८३/२०१४ दि.१६/१२/२०१४

(२५) साप्रवि/ग्रापं/अफरातफर/३० ते ४४/१४ दि.२७/०१/२०१५

(२६) का.दा.नो.साप्रवि/ग्रापं/अफरातफर/७१ ते ८५/१५ दि.१०/०३/१५

(२७) साप्रवि/ग्रापं/अफरातफर/१६१ ते १७४/१५ दि.३०/०६/१५

(२८) साप्रवि/ग्रापं/अफरातफर/२२४ ते २३८/१५ दि.१४/१०/१५

सर्व गट विकास अधिकारी यांना याबाबत गट स्तरावर वसुली करुन संबंधितांवर कारवाई करणे बाबत सुचना देण्यात आल्या आहेत. वसुल न होणा-या रक्कमांबाबत हयात असलेल्या संबंधित ग्रा.से./ग्रा.वि.अधि. यांचेवर फौजदारी गुन्हे दाखल करणे बाबत कळविलेले आहे. तसेच मयत कर्मचा-यांच्या (मयत, सेवानिवृत्त, बडतर्फ सक्तीने सेवानिवृत्त) मालमत्तेवर (जमिन मिळकत) यावर शासन परिपत्रकानुसार मिळकतीवर बोजा चढविण्याची कार्यवाही करणेच्या सुचना गटस्तरावर देण्यात आलेल्या आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ मे, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,६५१ अपहारांची प्रकरणे दीर्घकाळ प्रलंबित असून ठराविक कालमर्यादेत रक्कम वसूल करुन संबंधितांवर कारवाई करणे आवश्यक आहे. तसेच रक्कम समायोजित करण्यासाठी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांच्या अधिपत्याखाली एक समिती गठीत करुन वसुलीची रक्कम येणे पात्र आहे त्यांच्याकडून ती वसुली करावी व त्याबाबत समितीला अहवाल सादर करावा असे समितीने निदेश दिले.

यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी समितीस विदित केले की, लेखा परीक्षणाच्या वेळी व्हाऊचर्स उपलब्ध नसल्यामुळे सदर रकमेचा अपहार झालेला आहे. व्हाऊचर्स उपलब्ध झाल्यास त्या रकमेचे समायोजन केले जाते, परंतु ही बाब जबाबदार अधिका-यांनी प्रमाणित करणे अत्यावश्यक आहे, जेणेकरुन ती रक्कम समायोजित करणे सोयीस्कर होईल. यावर समितीने असे निदेश दिले की, लेखा परीक्षणाच्या वेळी अभिलेखे न दाखविल्यामुळे सदर रकमेचा अपहार झाल्याचे समजले जाते. परंतु अभिलेखे प्राप्त झाल्यानंतर सक्षम अधिका-यांनी त्यासंबधी तपासणी करुन त्या रकमेचे समायोजन केल्यास त्या रकमेचा अपहार झालेला नाही असे लक्षात येते. अनेकवेळा व्हाऊचर्स न मिळाल्यामुळे अपहारित रक्कम मोठ्या प्रमाणात वाढते. रक्कम समायोजित करण्यासाठी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांच्या अधिपत्याखाली एक समिती गठीत करावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सन २०११-१२ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समिती मध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (अपहार प्रकरणे १) ६५१ अपहाराची प्रकरणे दिर्घकाळ प्रलंबित असून त्यामध्ये गुंतलेली एकूण रक्कम किती आहे. समितीच्या नाशिक जिल्हा भेटीनंतर त्यापैकी किती रक्कम वसुल झाली व किती रक्कम समायोजित करण्यात आली आहे.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप) यांच्या समिती गठीत केल्यापासून दि.२७/१२/२०१६ पासून आजपर्यंत किती प्रमाणके तपासली व त्याद्वारे किती रकमेची वसुली व समायोजन केले आहे, त्याचे मासिक विवरण सादर करावे.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सन २०११-१२ ची ग्रामनिधी/जरोयो अफरातफरीची एकूण ६५१ प्रकरणे प्रलंबित होती, त्यात एकूण रक्कम रुपये ५,९१,१९,९३१/- गुंतलेली आहे. समितीच्या नाशिक भेटीनंतर सदर रकमेपैकी रक्कम रुपये ९८,७३,४७६/- वसूल व रक्कम रुपये १,५५,९३,०८९/- समायोजित अशी एकूण २,५४,५६,५६४/- इतकी रकमेची कार्यवाही पुर्ण करण्यात आली आहे.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप) यांची समिती गठीत केल्यापासून दि.२७ डिसेंबर, २०१६ पासून नाशिक जिल्हा परिषदेच्या पंचायत समिती, येवलाचे ४, पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर १ व पंचायत समिती, इगतपुरी १ अशी एकूण ६ प्रकरणे स्थानिक निधी कडे निकाली काढण्यासाठी सादर करण्यात आली असून सदर प्रकरणांमधील एकूण १,१२,३६९/- इतकी रक्कम संबंधिताकडून वसूल करण्यात आली. त्याच प्रमाणे ६१९७/- इतकी रक्कम समायोजित करण्यात आली आहे. सदर प्रकरणी मासिक विवरण खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | कालावधी | पंचायत समिती | ग्राम पंचायत | वसूल | समायोजन | एकूण | स्थानिक निधीकडे वगळण्यात करिता सादर दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| (१) | ८९/९० ते ९२/९३ | येवला | ठाणगाव | ८४५५/- | ०/- | ८४५५/- | १५/०६/२०१७ |
| (२) | १/२ ते ६/७ | येवला | गुजरखेडा | १७८३२/- | ०/- | १७८३२/- | १५/०६/२०१७ |
| (३) | ७/८ ते ९/१० | येवला | एरडगा व खुर्द | ११९२६/- | ६१९७/- | १८१२३/- | ०२/०६/२०१७ |
| (४) | ७/८ ते १२/१३ | येवला | राहाडी | ५१३९/- | ०/- | ५१३९/- | ०२/०६/२०१७ |
| (५) | ९/१० ते ११/१२ | त्रंबकेश्वर | वाघेरा | ६७७००/- | ०/- | ६७७००/- | २३/०८/२०१७ |
| (६) | ८०/८१ | इतगतपुरी | शेनवड बु | १३१७/- | ०/- | १३१७/- | १४/०६/२०१७ |
| | एकूण | | | ११२३६९/- | ६१९७/- | ११८५६६/- | |

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय (वित्त-९) :-** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने नाशिक जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, अपहाराची ६५१ प्रकरणे प्रलंबित असून सदरहू प्रकरणांत रुपये ५,९१,१९,९३१/- इतक्या रकमेचा अपहार झालेला आहे. उक्त रकमेपैकी ३.५ कोटी रुपये वसूल करणे बाकी आहे. सदरहू प्रकरणे सन २०११-२०१२ पासूनची आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदीत केले की, यामध्ये समायोजनाची प्रकरणे आहेत. ६५१ प्रकरणांपैकी ३३६ प्रकरणांमध्ये २,५४,५६,५६४ कोटी रुपयांची वसुली झालेली आहे. यामध्ये काही अपहार कायमस्वरुपी आहेत, काही अपहार ताप्तुरत्या स्वरुपाचेही आहेत. अशी एकूण ३.४४ कोटी रुपयांची वसुली झालेली आहे.

यावर समितीने असे निदेश दिले की, समितीने भेट दिल्यामुळे ३३६ प्रकरणांचा निपटारा करण्यात आलेला आहे. उर्वरित प्रकरणांचा निपटारा किती महिन्यात करण्यात येईल, तसेच या प्रकरणांच्या प्रलंबनाकरीता जे अधिकारी जबाबदार आहेत, त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन योग्य ती कारवाई तातडीने करुन ही वसुली करण्यात यावी व याबाबतची माहिती समितीला चार महिन्यांत सादर करावी.

**अभिप्राय व शिफारशी**

सन २०१०-११ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समिती नाशिक मधील दिनांक ३१ मार्च, २०१२ अखेर पर्यंत ग्राम निधीची ३८० व जवाहर रोजगार योजनेची २७१ गैरव्यवहारासंबंधातील एकूण ६५१ प्रलंबित प्रकरणात रुपये ५,९१,१९,९३१/- इतकी रक्कम गुंतलेली होती. त्यात संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी ९७ प्रकरणे निकाली काढून त्यातून रुपये ३,५८,३३,०२१ इतकी वसुली झालेली आहे. जवाहर रोजगार योजनेच्या १३ प्रकरणात रूपये १,४०,५५२ इतकी वसुली झालेली आहे. थकीत वसुली होणेबाबत दिनांक २१ ऑक्टोबर, २०१० ते दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ पर्यंत एकूण १४ वेळा पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. याबाबत हयात असलेले ग्रामसेवक/ग्रामविस्तार अधिकारी यांचेवर फौजदारी गुन्हे दाखल केले असून मयत, सेवानिवृत्त, बडतर्फ, सक्तीने सेवानिवृत्त यांचे मालमत्तेवर शासन परिपत्रकानुसार बोजा चढविण्याची कार्यवाही गट स्तरावर सुरु असल्याची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी माहिती दिलेली आहे.

थकीत रक्कम समायोजित करण्यासाठी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांच्या अधिपत्याखाली एक समिती गठीत करुन वसुली करावी व त्याबाबतचा अहवाल समितीला सादर करावा असे समितीने निदेश दिले असता समितीस तसा अहवाल पाठविला नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची आहे,याप्रकरणी शंका घेण्यास नक्कीच वाव आहे. **लेखा परिक्षणाच्या वेळी लेखापरिक्षकांस पावत्या उपलब्ध नसल्यामुळे सदरहू बाब सर्व संबंधित जबाबदार अधिका-यांनी लेखापरिक्षकांकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक असताना तसे केले नाही. याप्रकरणी ज्या अधिकारी/कर्मचा-यांनी लेखा परिक्षकांस कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नाहीत अशा सर्व अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचेवर कारवाई करणे आवश्यक असताना जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिका-यांनी याकडे दुर्लक्ष केले आहे. अशा दुर्लक्ष करणा-या अधिका-यांचा तपास करुन त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करावी तसेच ज्या अधिकारी/कर्मचा-यांनी लेखा परिक्षकांस कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नाहीत अशा सर्व अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये दंडात्मक कारवाई करावी, अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी.**

समितीच्या नाशिक भेटी नंतर रुपये २,५४,५६,५६५/- इतकी रक्कम समायोजित केली असल्याची जिल्हा परिषदेकडून माहिती प्राप्त झालेली आहे. तसेच उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी दिनांक २७ डिसेंबर, २०१६ रोजी पंचायत समिती, येवला, त्र्यंबकेश्वर व इगतपुरी यांची संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी सहा प्रकरणे निकाली काढून त्यात एकूण रुपये १,१८,५६६/- रकमेची वसुलीची कार्यवाही पूर्ण झाली आहे. **एकूण ६५१ प्रकरणांत रुपये ५,९१,१९,९३१/- इतक्या रकमेचा अपहार झालेला आहे. सन २०११-१२ च्या दरम्यानच्या प्रकरणात रुपये ३.५० कोटी रुपये वसुली शिल्लक असल्याचे विचारणा केली असता रुपये ३.४४ कोटी रुपये रक्कमेची वसुली झाली आहे. उर्वरित रकमेची वसुली करण्यासाठी जबाबदारी निश्चित करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी.**

**समितीने नाशिक जिल्ह्याला भेट दिल्यामुळे ३३६ प्रकरणांचा निपटारा करण्यात आलेला आहे. उर्वरित प्रकरणांचा निपटारा तातडीने करुन या प्रकरणाच्या प्रलंबनामध्ये जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन वसुली बाबतची कारवाई पूर्ण करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन माहिन्यात पाठविण्यात यावा अशीही समितीची शिफारस आहे.**

प्रकरण तेरा

## जिल्हा परिषद, नाशिक

## सन २००९-१० या वर्षात पंचायत समितीमध्ये झालेल्या नियमबाह्य बाबी

**परिच्छेद क्रमांक ४.३९८ (१४ ते २६) (सन २०११-२०१२)**

**परिच्छेद क्र. ४.३९८ (१७)**

**सन २००९/१० या वर्षात पं.स. मध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी प्रोत्साहन भत्ता वसुलीबाबत**

| अ. क्र. (१) | नियमबाह्य बाबींचे स्वरूप (२) | जिल्ह्याचे नांव (३) | पं.स. चे नांव (४) | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक (५) | रक्कम (६) |
|---|---|---|---|---|---|
| १७ | प्रोत्साहन भत्ता वसुली बाबत | नाशिक | पेठ | ४५ | ५,६४,३८०/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

माहे मे, २०११ मध्ये प्राथमिक शिक्षकांना मासिक वेतनामध्ये आदिवासी प्रोत्साहन भत्ता हा सुटीचा कालावधी असतानांही एकूण रक्कम रूपये ५,६४,३८०/- इतका देण्यात आलेला आहे. सदर रकमेपैकी माहे डिसेंबर, २०१३ पेड इन जानेवारी, २०१४ चे वेतनातून रक्कम रूपये ४,२२,८७७/- वसुल करण्यात आलेली आहे. (जवळपास ७५ टक्के रक्कम वसुल करण्यात आलेली आहे.) व रक्कम रूपये १,४१,५०३/- ही माहे मे, २०११ मध्ये पेठ गटात कार्यरत असलेले काही कर्मचारी पेठ गटातून बदलून गेल्याने तसेच सेवानिवृत्त झाल्याने त्यांचे वेतनातून वसुली करणेबाबतची कार्यवाही सुरू आहे. तसे पत्र संबंधित गटांना या कार्यालयामार्फत देण्यात आलेले आहे. ज्या शिक्षकांची वसुली केली त्यांची यादी सोबत जोडलेली आहे. (वसुल रक्कम धनादेश क्रमांक ५४६१७४ दिनांक १५/१/२०१४ अन्वये केली आहे.)

कृपया खुलासा मान्य होण्यास विनंती आहे.

**परिच्छेद क्र. ४.३९८ (१८)**

**सन २००९/१० या वर्षात पं.स. मध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी जादा प्रदानाबाबत.**

| अ. क्र. (१) | नियमबाह्य बाबींचे स्वरूप (२) | जिल्ह्याचे नांव (३) | पं.स. चे नांव (४) | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक (५) | रक्कम (६) |
|---|---|---|---|---|---|
| १८ | जादा प्रदानाबाबत | नाशिक | देवळा | ७ | १,१६,४२३/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

संबंधित अधिकारी श्री.पी.वाय.शिंपी, सहायक लेखा अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून त्यांचे कडून वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ मे, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,३० दिवसापेक्षा जास्त सुट्टीच्या कालावधीत प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय नसताना तो प्रदान करण्यास कोण जबाबदार आहे. नियमबाह्य प्रोत्साहन भत्ता रु.५,६४,३८०/- प्रदान

करणा-यावर खात्याकडून कोणती प्रशासकीय कारवाई करण्यात आली आहे. यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, एकूण प्रोत्साहन भत्ता रु.५,६४,३८०/- दिला होता. त्यापैकी रु.४,७३,९०३/- वसुली केली असून उर्वरित रकमेची वसुली सुरु आहे. समितीने आणखी पुढे अशी विचारणा केली की, वसुली कोणत्या तारखेला केली, तसेच ज्यांच्या चुकीमुळे हे घडले त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, डिसेंबर, २०१३ पेड इन जानेवारी, २०१४ मध्ये वसुली केली आहे तसेच ती नियमानुसार करीत आहोत आणि व्याजासह वसूल करण्यात येईल.

यानंतर समितीने पंचायत समिती देवळा कडील अतिप्रदानाची रक्कम रुपये १,१६,४२३/- यास कोण जबाबदार आहे? संबंधितांवर याबाबत कोणती प्रशासकीय कारवाई करण्यात आली आहे, जादा प्रदानाची रक्कम ७ वर्षे होवून सुध्दा वसूल न होण्याची कारणे काय आहेत, जादा प्रदानाच्या रकमेच्या वसुलीबाबत खात्याने कोणती कार्यवाही केली अशी विचारणा केली असता गट विकास अधिकारी, देवळा पंचायत समिती यांनी १,१६,४२३/- रुपये तत्कालिन सहायक लेखा अधिकारी यांच्याकडून वसूल करणे आवश्यक होते अशी माहिती समितीस दिली.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, हे काम कोणत्या योजनेतून केलेले आहे. सदरहू कामावर तांत्रिक मान्यतेपेक्षा अधिकचा खर्च कसा झाला आहे. तसेच हे काम किती रकमेचे होते, या रस्त्याची लांबी किती होती. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, ठक्कर बाप्पा योजनेतील रस्ता दुरुस्तीचे हे काम आहे. सदरहू काम ५ लाख ६३० रुपयांचे होते.

यावर समितीने असे निदेश दिले की, समितीच्या प्रश्नावलीमध्ये हा विषय असतांना या प्रश्नाचे उत्तर गट विकास अधिकारी यांना माहिती नाही. कार्यकारी अभियंता बैठकीला उपस्थित राहिले नाहीत. संबंधित कामासंदर्भात कनिष्ठ अभियंता, उप अभियंता, गट विकास अधिकारी, कार्यकारी अभियंता या सर्वांची ही जबाबदारी आहे. प्रशासकीय मान्यता, तसेच तांत्रिक मान्यतेपेक्षा जास्त रक्कमेचे काम करण्यात आले. पूर्व मान्यता घेतल्याशिवाय जास्त रकमेचे काम करता येत नाही. या प्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांची चौकशी करावी आणि दोषी असणा-यांची सेवा पुस्तिकेमध्ये नोंद करावी.

यावर संचालक स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी समितीस अशी माहिती दिली की, आदिवासी वस्तीतील ०० ते १३४० मीटर रस्त्याच्या लांबीचे हे काम आहे. यासाठी ४ लाख ५८ हजार ८०८ रुपये खर्च झाला. पहिल्या बिलातून ५६ हजार ६७२ रुपये कपात करुन घ्यावयाला पाहिजे होती कारण ही अतिप्रदान रक्कम होती. हे अतिप्रदान रकमेचे काम भीलवाडा आदिवासी रस्ता दुरुस्तीचे आहे. दुसरे काम ०० ते ०७६५ मीटर लांबीचे ४ लाख ५५ हजार २१८ रुपयांचे होते, परंतु या कामासाठी ५ लाख १४ हजार रुपये खर्च झाले. या दोन्ही कामांमध्ये १ लाख १६ हजार ४२३ रुपये अतिप्रदान झालेले आहेत, ती रक्कम वसूल केली पाहिजे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्द्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**सन २००९-१० या वर्षात पंचायत समितीमध्ये झालेल्या नियमबाह्चे बाबी प्रोत्साहन भत्ता वसुली बाबत** (१) राज्यातील आदिवासी क्षेत्राच्या सर्वांगीन विकासाची तसेच आदिवासींच्या कौटूंबिक, सामुहिक व वैयक्तीक विकासासाठी ठक्कर बाप्पा योजना राबविण्यात येते. पंचायत समिती देवळा येथे ठक्कर बाप्पा योजने अंतर्गत दोन रस्त्यांचा कामांचे देयक दुबार अदा झाल्या प्रकरणी समितीने संपुर्ण प्रकरणाची चौकशी करून सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिलेले असून प्रस्तुत प्रकरणी समितीस प्राप्त झालेल्या अहवाला नुसार तत्कालीन सहा. लेखाधिकारी, शाखा अभियंता, उप अभियंता यांचे विरूध्द विभागीय चौकशी सुरू करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. तथापि उक्त विभागीय चौकशी विहित मुदतीत पुर्ण झाली आहे काय किंवा तसेच चौकशी नियमानुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली आहे ?

**पंचायत समितीमध्ये झालेल्या नियमबाह्य बाबी (प्रोत्साहन भत्ता वसुलीबाबत)**

(२) आदिवासी क्षेत्रातील काम करणा-या शिक्षकांना सुट्टीच्या कालावधीत दिलेल्या प्रोत्साहन भत्याबाबत पंचायत समिती पेठ यांनी ५६४३८०/- रुपयांचे अतिप्रदान केलेले असून त्याची वसूली माहे डिसेंबर २०१३ च्या वेतनातून केल्याबाबत समिती समाधान व्यक्त करते परंतू अशा प्रकारे चुकीचे प्रदान करण्यास जबाबदार गट विकास अधिकारी /गट शिक्षण अधिकारी, वरीष्ठ प्रशासन अधिकारी जबाबदार असतांना कनिष्ठ सहाय्यक लिपिक दर्जाच्या कर्मचा-यांवर विभागीय चौकशी सुरू करण्यात आलेली आहे. याबाबीशी शासन सहमत आहे काय ?

(३) प्रस्तुत अतिप्रदानास जबाबदार असणा-या अधिका-याकडून उक्त रकमेच्या व्याजाची वसूली करण्यात आली आहे काय, नसल्यास सदरहू व्याजाची रक्कम नियमानुसार कोणाकडून करण्यात येणार आहे.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) प्रस्तुत प्रकरणी श्री. पी. वाय. शिंपी, स.ले.अ.व आर.आर. बाविस्कर शाखा अभियंता हे जिल्हा परिषदेच्या सेवेतील असल्याने त्यांचे विरूध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ नुसार विभागीय चौकशी कार्यवाही सुरू करणेत आली आहे. श्री. पी. वाय. शिंपी, स. ले. अ. यांचे विरूध्द असलेली चौकशीची कार्यवाही पूर्ण झाली असून खाते चौकशीअंती त्यांना अंतिम कारणे दाखवा नोटीस बजाविणेत आली.कारणे दाखवा नोटीसीस त्यांना १० दिवसात खुलासा सादर करणे बाबत मुदत देणेत आली होती तद्दनुषंगाने श्री. पी. वाय. शिंपी, स. ले. अ. यांचा प्राप्त झालेला खुलासा विचारात घेऊन त्यांना प्रस्तावित करण्यात आलेल्या शिक्षेत वाढ करून त्यांना मुळ वेतनावर आणण्याची शिक्षा बजावणेकामी दि.१.२.२०१८ रोजी अंतिम नोटीस देण्यात आली आहे.

त्याच प्रमाणे श्री. आर. आर. बाविस्कर यांचे विरूध्दच्या विभागीय चौकशी प्रकरणी दोषारोप व जोडपत्रासह प्रस्ताव दिनांक २.१.२०१८ अन्वये सहा.आयुक्त (विभागीय चौकशी), नाशिक यांचेकडे सादर करणेत आले आहे. श्री.बाविस्कर, शाखा अभियंता यांचेकडे असलेली अतिप्रदान वसुली रू.२०६६३ दि.२८.०२.२०१७ रोजी पं. स. देवळा येथे भरणा केली आहे. श्री.शेखर मुरलीधर मराठे, उप अभियंता यांचे विरूध्दच्या विभागीय चौकशीच्या अनुषंगाने परि.१ ते ४ सह ज्ञापन अधिक्षक अभियंता (सा.बा.) मंडळ नाशिक यांचेकडे पाठवण्यात आले असून म.अधिक्षक अभियंता (उ.वि), नाशिक यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविले आहे.

(२) पंचायत समिती, पेठ, जि.नाशिक अंतर्गत आदिवासी क्षेत्रात काम करणा-या शिक्षकांना सुट्टीच्या कालावधीत दिलेल्या प्रोत्साहन भत्ता देय ठरत नसतांना रक्कम रुपये ५६४३८०/-अतिप्रदान झालेली रक्कम माहे डिसेंबर २०१३ चे वेतनातून वसूल करण्यात आली आहे.

सदर अतिप्रदान होण्यास जबाबदार असलेले तत्कालीन वरिष्ठ सहा.श्री.एस.डी.भोर यांचेवर दोषारोप पत्र १ ते ४ भरून पुढील कार्यवाहीस्तव मा.विभागीय आयुक्त, नाशिक यांना सादर केले आहे.तसेच तत्कालीन गटशिक्षणाधिकारी श्री.एस.जी.निर्मळ यांना याबाबात दि. २५.०१.२०१८ चे पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस देऊन प्रशासकीय कारवाई सुरू केली आहे.तत्का.गट विकास अधिकारी, श्री म. एम. एम. जाधव व सहाय्यक लेखाधिकारी,श्री म. व्ही. बी. गायकवाड, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, श्री. आर. जे. चौधरी यांचेवर दिनांक २५.०१.२०१८ चे पत्रान्वये प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करणेबाबतची कार्यवाही सुरू करणेत आली आहे.

(३) अतिप्रदान झालेल्या रकमेच्या व्याजाची वसूली ज्या शिक्षकांना जादा रक्कम प्रदान झाली आहे त्यांचेकडून करण्यात आली असून वसुलपात्र रक्कम रुपये १३२४५१/- पैकी रू.९४३३२/- वसुल झालेली आहे.उर्वरित रक्कम रू.३८११९/- वसुल करणेबाबत कार्यवाही सुरू आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**(१) मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय:-** (उ.स.जि.प.आस्था) संबधित स.ले.अ.व शाखा अभियंता यांचेवर जि.प.कडून कार्यवाही करण्यात येत आहे.

**(२) सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभिप्राय:-**श्री.मराठे यांच्या संबंधिचा प्रस्ताव सा.बा.वि.कडे अद्याप प्राप्त झालेला नाही.

**(३) ग्रामविकास विभागाचे अभिप्राय:-** प्रस्तुत प्रकरणी जिल्हा परिषद, नाशिककडून कार्यवाही सुरू आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने नाशिक जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अशी माहिती दिली की, यामध्ये डबल बिल काढले गेले होते. देयक एकदा अदा केले गेले होते. त्यानंतरही ते डबल काढल्यामुळे अदा केले गेले. ही चूक लक्षात आल्यावर ताबडतोब कारवाई प्रस्तावित केली गेली. व्हॅटमध्ये उपकर अडकलेला आहे. संबंधित अधिका-यांकडून वसूल केलेला आहे. उप अभियंता, श्री. मराठे, स. ले. अ. श्री. शिंपी अशी यामधील जबाबदार अधिका-यांची नावे आहेत.

यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, संदर्भित अधिका-यांना मूळ वेतनावर आणलेले आहे. यासंदर्भात मूळ वेतनावर आणणे ही सर्वात मोठी कारवाई झाली. ही गंभीर कारवाई आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, सन २०१२-२०१३ पासूनचे हे प्रकरण असून ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविलेले आहे का, कायद्यातील तरतुदीनुसार याचा पाठपुरावा केलेला आहे का, यासंदर्भात गट विकास अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनाही जबाबदार धरले पाहिजे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, हे बिल डबल पाठवित असताना एकदा बिल सही केल्यानंतर दुस-यांदा तेच बिल सही करताना पूर्वी त्या बिलावर सही केली आहे की नाही हे गट विकास अधिकारी यांनी न पाहता सही केली.

यावर समितीने असे निदेश दिले की, या प्रकरणाची योग्य व सखोल चौकशी करुन जबाबदार अधिका-यांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी.

## अभिप्राय व शिफारशी

**परिच्छेद क्र.४.३९८ (१७)**

**सन २००९-१० या वर्षात पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी प्रोत्साहन भत्ता वसुलीबाबत :-**

प्राथमिक शिक्षकांना मासिक वेतनामध्ये आदिवासी प्रोत्साहन भत्ता ३० दिवसापेक्षा जास्त सुट्टीच्या कालावधीत अनुज्ञेय नसतानाही नियमबाह्यरित्या प्रदान करण्यात आल्याचे दिसून येते. याप्रकरणी संबंधित जबाबदार अधिका-यांवर नियमानुसार प्रशासकीय कारवाई करणे अभिप्रेत असतानाही तसे झाल्याचे दिसून येत नाही. तसेच अदा करण्यात आलेल्या **प्रोत्साहन भत्त्या पैकी ७५% रक्कम म्हणजेच ४,७३,९०३/- रुपये एवढी रक्कम माहे जानेवारी, २०१४ मध्ये मोठ्या विलंबाने वसूल केलेली असून उर्वरित रक्कम रु. ३८११९/- अद्यापही ज्या शिक्षकांना जादा रक्कम अदा केलेली आहे त्यांच्याकडून वसूल करण्यात आलेली नाही. त्यामुळे याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी व याप्रकरणी संबंधित अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

**परिच्छेद क्र. ४.३९८ (१८)/७/देवळा**

**सन २००९-१० या वर्षात पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी जादा प्रदानाबाबत :-**

पंचायत समिती, देवळा (जि.नाशिक) या ठिकाणी जादा प्रदानाची रुपये १,१६,४२३/- एवढी रक्कम ७ वर्षे होवून सुध्दा वसुलीबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. **देवळा पंचायत समिती अंतर्गत ठक्कर बाप्पा योजनेतील रस्ता दुरुस्तीमध्ये तांत्रिक मान्यतेपेक्षा अधिकचा खर्च झाल्यामुळे रुपये १ लाख १६ हजार ४२३ एवढी रक्कम जादा प्रदान करण्यात आली आहे. या ठिकाणी प्रशासकीय मान्यता तसेच तांत्रिक मान्यतेपेक्षा जास्त रकमेचे काम करण्यात आल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. यासाठी पूर्व मान्यता घेणे आवश्यक होते, सबब, कनिष्ठ अभियंता, उप अभियंता, गट विकास अधिकारी व कार्यकारी अभियंता यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन जादा प्रदान करण्यात आलेली रक्कम रुपये १,१६,४२३/- वसुल करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

## प्रकरण चौदा

## जिल्हा परिषद, नाशिक

### अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा जादा व शिवाय केलेल्या खर्चाबाबत (ग्रामपंचायत, सोनगांव, ता.निफाड)

**परिच्छेद क्रमांक ५.३ (सन २०११-२०१२)**

ग्रामपंचायतीने अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा जादा खर्च केला आहे. याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) ग्रामपंचायतीचे मंजुर अंदाजपत्रक व त्यातील अर्थसंकल्पीय तरतुदीचा प्रत्यक्ष खर्चाशी मेळ घेता ग्रामपंचायतीने मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ६२ (अ) नुसार पुरक अर्थसंकल्प अथवा मुंबई ग्रामपंचायत अंदाजपत्रक व हिशोबा चे नियम १९५९ (४) (१) (२) नुसार पुनर्विनियोजन विवरणपत्र तयार करुन त्यास पंचायत समितीची वेळीच मंजुरी घेणे आवश्यक आहे.

(२) ग्रामपंचायतीने सन २००९-१० मधील मंजुर अंदाजपत्रक लेखापरीक्षणास दर्शविले नाही. तसेच मंजुरीशिवाय खर्च केला असल्यास अशा खर्चास सक्षम अधिका-यांची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

आक्षेपात नमुद केल्याप्रमाणे अर्थसंकल्पीय तदतुदीपेक्षा जादा खर्च केल्याबाबत खालीलप्रमाणे पुर्तता अहवाल सादर केलेला आहे.

(१) ग्रामपंचायतीचे अंदाजपत्रकातील मंजुर तरतुदीपेक्षा प्रत्यक्ष खर्च जादा झालेला आहे. त्यामध्ये सार्वजनिक आरोग्य, हातपंप, हागणदारी मुक्त कमेटी खर्च, सदरचा खर्च करणे अत्यावश्यक सेवा व निकडीची सेवा असल्यामुळे ग्रामपंचायतीने ग्रामपंचायत मासिक सभा दिनांक ३०/११/२०१५ ठराव क्रमांक ७ अन्वये खर्च करण्यात आलेल्या जादा खर्चास मंजुरी घेऊन पंचायत समिती, निफाड यांच्याकडे दिनांक १/१२/२०१५ रोजी प्रस्ताव सादर करण्यात येऊन पंचायत समिती, निफाड यांनी पंचायत समितीची मासिक सभा दिनांक ४/१२/२०१५ ठराव क्र. ७२३ अन्वये अंदाजपत्रक तदतुदीपेक्षा जादा खर्चास मंजुरी देण्यात आली असून पत्र नं विअप/९२३/२०१५ दिनांक ४/१२/२०१५ अन्वये ग्रामपंचायतीस कळविण्यात आले आहे. सोबत सदर पत्राची छायांकित प्रत जोडलेली आहे.

(२) सन २००९-१० मधील अंदाजपत्रक ग्रामपंचायतीत उपलब्ध नसल्याने लेखा परिक्षणास दाखवले नाही. त्यामुळे तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, श्री. पी. बी. महाले यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येऊन त्यांच्या दोन वेतनवाढी कायमस्वरुपी बंद करण्यात आलेल्या आहेत. सोबत आदेशाची छायांकित प्रत जोडली आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ मे, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सन २०११-२०१२ मधील अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा जास्त झालेल्या खर्चास ग्राम पंचायतीने दिनांक ३०/११/२०१५ चा ठराव क्रमांक ७ व पंचायत समिती, निफाड यांनी दिनांक ४/१२/२०१५ चा ठराव क्रमांक ७२३ अन्वये मंजुरी दिल्याचे अनुपालनामध्ये नमूद केलेले आहे. तसेच जादा झालेल्या खर्चास ३ वर्षानंतर कार्योत्तर मंजुरी कोणत्या प्राधिकारान्वये घेतली, लेखा परिक्षणाच्या वेळी अंदाजपत्रक न दर्शविण्याची कारणे काय आहेत तसेच मंजुरीशिवाय केलेल्या नियमबाह्य जादा खर्चास कोण जबाबदार आहे. याबाबत खात्याने संबंधितांवर कोणती प्रशासकीय कारवाई केली आहे अशी समितीने विचारणा केली.

यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, निफाड यांनी समितीस असा खुलासा केला की, सन २००७ ते २०१० या कालावधीत जे लेखा परिक्षण झाले त्यामध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा खर्च करण्यात आला, यामध्ये तथ्य आढळून आले म्हणून तत्कालिन ग्रामविकास अधिकारी श्री.महाले यांचेवर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्या दोन वेतनवाढी कायमसवरुपी बंद करण्याची कारवाई करण्यात आली आहे.

समितीने पुढे अशी सूचना केली की, समितीच्या बैठकीला तत्कालिन अधिका-यांना आमंत्रित करण्यात आले होते. ज्या अधिका-यांना कळवून देखील जे अधिकारी जाणुनबुजून समितीसमोर उपस्थित राहिले नाहीत. त्यांचा खुलासा मागवावा तसेच त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी व त्या तत्कालिन अधिका-यांवर मुख्य कार्यकारी अधिका-यांनी आपल्या स्तरावर कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सादर करावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ मे, २०१६ या कालावधीत नाशिक जिल्हा परिषदेला भेट दिली होती. या भेटीनंतर एक वर्षापेक्षा अधिक कालावधी उलटून गेला आहे. परंतु समितीच्या बैठकीस अनुपस्थित अधिका-यांचे खुलासे अद्याप जिल्हा परिषद प्रशासनास प्राप्त झालेले नाहीत. अतः समितीच्या निर्देशानुसार उपस्थित न राहणा-या व खुलासा देखील न पाठविणा-या अधिका-यांविरुध्द संबंधित मंत्रालयीन विभागाकडे महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियमांचे भंग विषय कार्यवाही अद्याप सुरु न करण्याची कारणे काय आहेत, असा विलंब करुन समितीच्या कामकाजात व्यत्यय आणणे समितीच्या निदेशाचे भंग करण्यास जबाबदार अधिका-यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायती राज समितीच्या दिनांक ५ मे, २०१६ ते ७ मे, २०१६ या कालावधीत नाशिक जिल्हा परिषदेच्या भेटी व बैठकीबाबत सन २००८-०९ व सन २०११-१२ या कालावधीत जे अधिकारी कार्यरत होते. अशा अधिका-यांना उपस्थित राहणेबाबत त्या-त्या विभागामार्फत जिल्हास्तर व पंचायत समिती स्तरावरुन लेखी पत्रान्वये कळविण्यात आलेले होते. तत्कालिन कालावधीत कार्यरत असलेल्या मुख्यालय स्तरावर ४९ खाते प्रमुख व पंचायत समिती स्तरावर ४२ गट विकास अधिकारी यांच्या पैकी एकूण १४ अधिकारी पंचायती राज समितीच्या बैठकीस उपस्थित राहीले नाहीत. अशा अधिका-यांना लेखी पत्रान्वये त्यांचे अनुपस्थिती बाबत स्पष्टीकरण मागितलेले आहे. तथापि, अनुपस्थित असलेल्या १४ अधिका-यांपैकी १० अधिकारी सेवानिवृत्त असून १ अधिकारी यांनी राजीनामा दिलेला आहे. २ अधिकारी वैद्यकीय रजेवर व १ महिला अधिकारी प्रसुती रजेवर होते. सेवा निवृत्त व राजीनामा दिलेल्या अधिका-यांनी कोणताही खुलासा सादर केलेला नाही. उर्वरित तीन अधिकारी वैद्यकीय कारणास्तव अनुपस्थित होते. त्यांनी केलेले खुलासे समाधानकारक असल्याने त्यांचेविरुध्द कार्यवाही करण्यात आली नाही.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :**-जिल्हा परिषद, नाशिक यांच्या अभिप्रायाशी सहमत.

### अभिप्राय व शिफारशी

सोनगाव, ता.निफाड येथील ग्रामपंचायतीने सन २०११-१२ या दरम्यान अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा जादा व शिवाय केलेल्या खर्चाबाबतचे प्रकरण आहे. खर्चाचा ताळमेळ बसण्यासाठी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम ६२ (अ) नुसार पुरक अर्थसंकल्प अथवा मुंबई ग्रामपंचायत अंदाजपत्रक व हिशोबाचे नियम, १९५९ च्या नियम (४) (१) (२) नुसार पुनर्विनियोजन विवरण पत्र तयार करुन त्यास पंचायत समितीची वेळीच मंजूरी घेणे आवश्यक असते. याप्रकरणी तत्कालिन ग्रामविकास अधिकारी, श्री.पी.बी.महाले यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्या दोन वेतनवाढी कायमस्वरुपी बंद करण्यात आलेल्या आहेत. **तसेच दिनांक ५ मे, २०१६ रोजी पंचायती राज समितीच्या साक्षीच्या वेळी लेखी कळवून देखील जे १४ अधिकारी जाणूनबुजून समितीसमोर उपस्थित राहीले नाहीत तसेच जे ३ अधिकारी वैद्यकीय कारणास्तव अनुपस्थित असतानाही व त्यांनी केलेले खुलासे समाधानकारक असतानाही त्यांच्या विरुध्द कारवाई करणा-या सर्व संबंधितांकडून खुलासा मागवून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कारवाई करावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

## प्रकरण पंधरा

## जिल्हा परिषद, नाशिक

## कोल्हापूर पध्दतीच्या बंधारा कामातील अनियमितता

**परिच्छेद क्रमांक ३.३३७ (सन २००८-२००९)**

एकुण ४ कोल्हापूर टाईप बंधा-यांच्या कामांवर रक्कम रू.२,१३,२४७/- (परि. क्र. ४) रू. ९,५८,२४१/- (परि. क्र. ५), रू. १९,३२,२०९/-(परि. क्र. ६)व रू. ६,६९,६३७/-(परि. क्र. ७) अशा एकूण रक्कम रू. ३७,७३,३३४/- च्या खर्चावर खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) सदर कामांचा मक्ता निविदा शर्त क्र.३ (क ) नुसार रद्द करण्यात आल्याने उर्वरित कामासाठी होणारा जादा खर्च मक्तेदारांकडून वसूल होणे आवश्यक आहे. (परि. क्र. ४ रू.२७००/- परि. क्र. ५ रू.१२,१४,३७४/- परि. क्र. ६ रू.९,४४,१८४, परि. क्र. ७ रू.१,४०,०००/- एकूण रक्कम रू. २३,२५,५५८/-.)

(२) प्रथम मक्तेदारांनी विहित मुदतीत काम पूर्ण केलेले नसतांना व पुढील मुदत वाढीसाठी अर्ज सादर केलेला नसतांना त्वरीत मक्ता रद्द करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही विलंबाने करण्यात आलेली आहे.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ च्या नियम १४८(२) नुसार मुदत संपण्यापूर्वी १५ दिवस अगोदर मक्तेदाराने मुदतवाढ मागणी अर्ज सादर केलेला नसतांना विनादंडाने मुदत वाढ मंजूर करण्यात आलेली आहे. निविदा बी-१ मधील कलम -२ नुसार १ टक्का दंडाची रक्कम रू.२,६३१/- वसूल होणे आवश्यक आहे.(परि.क्र.४).

(४) मक्ता रद्द केल्याने कामावर होणारा जादा खर्च रू.१२,१४,३७४/-वसूलीचे आदेश देण्यात आले आहेत. तथापि, सदर कामावर रू. २,११,२४०/- इतका जादा खर्च झालेला आहे.सदर विसंगतीबाबत साधार खुलासा होणे आवश्यक आहे. (परि.क्र.५)

(५) मक्ता रद्द केल्याने प्रथम मक्तेदारांची परत केलेली सुरक्षा अनामत जिल्हा परिषद सदरी जमा केली आहे.शासन अनुदानातील कामे असल्याने सदर रक्कमा शासन सदरी जमा होणे आवश्यक आहे. (रू. १०,००५/-परि.क्र.५, रू. ७०,४२७/-परि. क्र. ६, रू. २१,५९९/-परि. क्र. ७)

(६) वेळोवेळी मुदतवाढ मंजूर करतांना केलेल्या दंडात्मक कार्यवाही नुसार दंडाची रक्कम रू.११,४७९/- ची प्रथम मक्तेदाराकडून वसूल होणे आवश्यक होते. (परि. क्र. ७)

(७) खात्यामार्फत पुरविण्यात आलेल्या सिमेंट गोण्यांची रू. ३७,८००/-संबधित प्रथम मक्तेदारांकडून वसूली होणे आवश्यक आहे. (परि.क्र.७)

(८) कामावर ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे झालेल्या जादा खर्चाची निश्चित केलेली रक्कम रू.४६,१२९/-प्रथम मक्तेदारांकडून वसूली होणे आवश्यक आहे. (परि.क्र.७)

(९) पत्रक जिपना-बाखां/लपापु/१०६, दि. १६.०३.०१ नुसार सदर कामांतील अनियमिततेबाबत उप अभियंता व शाखा अभियंता जबाबदार असल्याने त्यांचेविरूध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित केलेली आहे. त्यानुसार उचित कार्यवाही होणे आवश्यक आहे.

(१०) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. व्हीपीएन-१०९९/ प्र.क्र.५४ /०८, दि. २०.०५.९९ नुसार कामाचे ठिकाणी माहिती फलक बसविल्या शिवाय अंतिम देयक अदा करू नये असे आदेश असतांना तशी कार्यवाही झालेली नाही. (परि. क्र. ४, ५, ६)

(११) उपरोक्त कामाच्या नोंदी नमुना नंबर-३९ नोंदवहीतील रकाने परिपुर्ण केल्याचे प्रमाणित करणे आवश्यक आहे. (परि. क्र. ४, ५, ६)

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

**मुद्दा क्र. १**

सदर कामाचा मक्ता निविदा ३ (क) नुसार रद्द करणेत आलेने उर्वरीत कामासाठी होणारा खर्च मक्तेदाराकडून होणे आवश्यक आहे.याबाबतचे परि.क्र.४,५,६,७ चे अनुपालन पुढील प्रमाणे :—

**परि. क्र. ४** : कोल्हापूर पध्दतीचा बंधारा पळाशी ता.नांदगाव प्रथम मक्तेदार भाग्यश्री रंग काम बांधकाम वाहतूक मजूर सह.संस्था मनमाड ह्यांनी वेळेत काम पुर्ण केले नाही त्यामुळे सदर कामाचा मक्ता ३ (क) अंतर्गत रद्द करण्यात आला आहे.रू.२७,०००/-संबधित संस्थेकडून वसूलीसाठी फेडरेशनला दि.३०.११.२००५ रोजी पत्र दिले आहे.सदर अभिलेख दप्तरी ठेवण्यात आले आहे. तद्‌नंतर अन्य विभागाशी पत्रव्यवहार झालेला असून वसूली बाबत कार्यवाही करण्यात येत आहे. तद्‌नंतर आजतगायत ह्या विभागात त्या मक्तेदारास कोणतेही काम देण्यात आलेले नाही.

**परि. क्र. ५** : को.टा.बंधारा चिंचला, ता.सुरगणा मक्तेदार श्री.संदिप शांताराम दरगोडे या मक्तेदारांकडून रू.२,११,२४०/- एवढ्या वसूल करावयाच्या रक्कमेची खात्री करून घेण्यात आली आहे.सदरची रक्कम अद्याप वसूल झाली नाही. तथापि, वसूली बाबत मक्तेदारास नोटीस पाठविण्यात आली आहे.जो पर्यंत वसूली होत नाही तो पर्यंत या मक्तेदाराचे नाव काळ्या यादीत टाकण्यात आलेले आहे.सदर अभिलेख दप्तरी ठेवण्यात आले आहेत.

**परि. क्र. ६** : कोल्हापूर पध्दतीचा बंधारा पांझणदेव, ता.नांदगाव हे काम मे.रचना कंन्स्ट्रक्शन, मु.पो.चंदवड यांनी वेळेत काम पुर्ण केले नाही. त्यामुळे विहित शर्ती ३(क) खाली मक्ता रद्द करणेत आला. संबंधित मक्तेदाराकडून रू.९,४४,१८४/- अद्याप पर्यंत वसुल झालेले नाही. तथापि, वसुली बाबत मक्तेदारास नोटीस पाठविण्यात आली आहे. जो पर्यंत वसुली होत नाही तो पर्यंत या मक्तेदाराचे नाव काळ्या यादीत टाकण्याबाबत पत्र व्यवहार करण्यात आला आहे. संबंधित संस्थेस ह्या विभागात नंतर एकही काम देण्यात आले नाही.

**परि. क्र. ७** : कोल्हापूर पध्दतीचा बंधारा कळमदरी, ता.नांदगाव येथील श्री. जे. एस. मुरखे, ता.धुळे यांना देण्यात आला होता परंतू मक्तेदाराने वेळेत काम पुर्ण न केल्याने रू.१,४०,०००/-रक्कमेची वसुली अद्याप झालेली नाही. काळ्या यादीत टाकण्याबाबत पत्र व्यवहार करण्यात आला आहे. संबधित मक्तेदारास ह्या विभागात नंतर एकही काम देण्यात आले नाही.

**मुद्दा क्र. २**

**परि. क्र. ४** : कोल्हापूर पध्दतीचा बंधारा पळाशी, ता.नांदगाव या कामाबाबत संबंधित मक्तेदार यांनी काम पुर्ण करणे बाबत प्रथमतः सहमती दर्शविली होती.कामाचे मुदतवाढीसाठी दि.१३.१०.१९९७ रोजी विलंबाने अर्ज केला होता तद्‌नंतर वेळोवेळी सुचना देवूनही काम पुर्ण न केलेने कामाचा मक्ता विलंबाने रद्द करणेत आला आहे.

**परि. क्र. ५** : मक्ता रद्द करण्यास विलंब झालेला आहे.त्याअनुषंगाने विलंबाबाबत जबाबदार सर्व अधिकारी / कर्मचारी यांना या कार्यालयाचे पत्र दिले आहे आणि खुलासे प्राप्त करून घेण्यात आले आहे. सदर अभिलेख दप्तरी ठेवण्यात आले आहे.

**परि. क्र. ६** : कोल्हापूर पध्दतीचा बंधारा पांझणदेव ता.नांदगाव या कामाबाबत संबंधित मक्तेदार यांनी काम पुर्ण करणेबाबत प्रथमतः सहमती दर्शवली होती तद्‌नंतर वेळोवेळी सुचना देवूनही काम पुर्ण न केलेने कामाचा मक्ता विलंबाने रद्द करणेत आला आहे.

**परि. क्र. ७** : कोल्हापूर पध्दतीचा बंधारा कळमदरी, ता. नांदगाव काम पुर्ण करणेसाठी मुदतवाढ घेणेसाठी दि.५.५.१९९५, दि.२१.०३.१९९६, दि.२०.०३.१९९७, दि.२२.०१.१९९८ असे ४ अर्ज प्राप्त झालेले होते काम पुर्ण करून घेणेकामी मुदतवाढ देण्यात आली परंतू मक्तेदाराने काम न केल्याने सदर कामाचा मक्ता विलंबाने रद्द करणेत आला आहे.

**मुद्दा क्र. ३**

**परि. क्र. ४** : कोल्हापुर पध्दतीचा बंधारा पळाशी, ता.नांदगाव या कामास मुदतवाढ मंजूर करणेत आली आहे व १ टक्के दंडाची रक्कम रू.२,६३१/- वसुल करण्यात आली आहे.सोबत चलनाची प्रत जोडली आहे.

**मुद्दा क्र. ४**

**परि. क्र. ५** : मुळ कामावर झालेला खर्च रक्कम रू. ३,४७,०००/- असून सुधारित अंदाजपत्रकाची किंमत रु.१५,६१,३७४/- इतकी आहे. यातील तफावत रक्कम रू. १२,१४,३७४/- इतक्या वसुलीचे आदेश विभागाने दिले होते, तथापि लेखापरिक्षण सन २००८-०९ मध्ये सदर वसुलीची रक्कम रू. २,११,२४०/- इतकी निश्चित केलेली आहे. याबाबत कार्यालयाने खात्री केली आहे.सदर वसुली बाबत संबंधित मक्तेदारास दि. २५.०१.२०१६ रोजी नोटीस दिलेली असून त्याचा समावेश काळ्या यादीत केला आहे. सदर अभिलेख दप्तरी ठेवण्यात आले आहे.

**मुद्दा क्र. ५**

**परि. क्र. ५** : मक्तेदाराकडील जप्त केलेली सुरक्षा अनामत रक्कम रू.१०,००५/- शासन सदरी जमा करण्याची कार्यवाही तातडीने करण्यात येत आहे.

**परि. क्र. ६** : कोल्हापुर पध्दतीचा बंधारा पांझणदेव ता.नांदगाव सदर काम २००७-०८ मध्ये पुर्ण करण्यात आलेले आहे. त्यांचे लेखा परिक्षण सन २००८-०९ मध्ये पुर्ण करण्यात आले आहे व कामाची मक्तेदाराकडील सुरक्षा अनामत रक्कम रू. ७०,४२७/- जप्त करणेत आलेली आहे.या बाबातचे रेकॉर्ड दप्तरी ठेवले आहे.व सदरची रक्कम रु.७०,४२७/- शासन सदरी जमा करणेसाठी जि.प. सर्वसाधारण सभेवर मान्यता ठेवला असून मान्यतेनंतर जि.प. सेस मधील जमा रक्कम शासनास भरण्यात येणार आहे.

**परि. क्र. ७** : सदर काम २००७, २००८ मध्ये पुर्ण करण्यात आलेले आहे. त्यांचे लेखापरिक्षण सन २००८-०९ मध्ये करण्यात आले आहे. मक्तेदाराकडील सुरक्षीत अनामत रक्कम रू. २१,५९९/- जप्त करणेत आलेली आहे. या बाबतचे रेकॉर्ड दप्तरी ठेवले आहे. सदर रक्कम रू. २१,५९९/- शासन सदरी जमा करणेसाठी जि.प.सर्वसाधारण सभेवर मान्यता प्रस्ताव ठेवला असून मान्यतेनंतर जि. प. सेस मधील जमा रक्कम शासनास भरण्यात येणार आहे.

**मुद्दा क्र. ६**

**परि. क्र. ७** : कोल्हापूर पध्दतीचा बंधारा कळमदरी ता.नांदगाव या कामास वेळोवेळी मुदतवाढ मंजूर करतांना केलेल्या दंडात्मक कार्यवाही नुसार रू.११,४७९/- वसुली झालेली नाही.वसुली बाबत मक्तेदारास नोटीस पाठविण्यात आली आहे.जो पर्यंत वसुली होत नाही तो पर्यंत या मक्तेदाराचे नाव काळया यादीत टाकण्याबाबत पत्रव्यवहार केलेला आहे.तदनंतर मक्तेदारास आजपर्यंत एकही काम देण्यात आले नाही.

**मुद्दा क्र. ७**

**परि क्र. ७** : कोल्हापूर पध्दतीचा बंधारा कळमदरी ता.नांदगाव सिंमेट गोण्यांची रक्कम रू. ३७,८००/-संबंधित मक्तेदार यांचे कडून वसुली झालेली नाही.वसुली बाबत मक्तेदारास नोटीस पाठविण्यात आली आहे.जो पर्यंत वसुली होत नाही तो पर्यंत या मक्तेदाराचे नाव काळया यादीत टाकण्याबाबत पत्र व्यवहार केलेला आहे.तदनंतर मक्तेदारास आजपर्यंत एकही काम देण्यात आले नाही.

**मुद्दा क्र. ८**

**परि. क्र. ७ :** कोल्हापूर पध्दतीचा बंधारा कळमदरी ता. नांदगाव कामावर ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे खर्च रू. ४६१२९/- ठेकेदाराकडून अद्याप पर्यंत वसुल झालेला नाही. वसूलीबाबत मक्तेदारास नोटीस पाठविण्यात आली आहे. जो पर्यंत वसुली होत नाही तो पर्यंत या मक्तेदाराचे नाव काळ्या यादीत टाकण्याबाबत पत्र व्यवहार केलेला आहे. तदनंतर मक्तेदारास आजपर्यंत एकही काम देण्यात आले नाही.

**मुद्दा क्र. ९**

**परि. क्र. ७** : कोल्हापूर पध्दतीचा बंधारा कळमदरी कामाच्या विलंबाबाबत उप अभियंता ता. नांदगाव यांना दि. १६.०३.२००१ रोजी कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. सदर कामाचे संबधित शाखा अभियंता श्री. पी. एच. पाटील व उप अभियंता नांदगाव यांना नोटीस दिलेली आहे.

**मुद्दा क्र. १०**

**परि. क्र. ४** : कोल्हापूर पध्दतीचा बंधारा पळाशी/ता.नांदगाव कामाचे नावाचे फलक बसविणे आले आहे.

**परि. क्र. ५** : कामाच्या ठिकाणी फलक बसविलेला नसल्यामुळे संबंधित ठेकेदारास सदर रक्कम रू. ३०००/- इतकी अदा केलेली नाही.

**परि. क्र. ६** कोल्हापूर पध्दतीचा बंधारा पांझणदेव ता.नांदगाव कामाचे फलक बसविणेत आले आहे.

**मुद्दा क्र. ११**

**परि. क्र. ४** : कोल्हापूर पध्दतीचा बंधारा पळाशी/ता.नांदगाव उपरोक्त कामाच्या नोंदी नमुना नं.३९ नोंदवहीत पा.क्र. ५६ वर घेणेत आली आहे.सदर काम पुर्ण करण्यात आले आहे व काम हस्तांतरा संबधी कार्यवाही पुर्ण केलेली आहे.

**परि. क्र. ५** : कोल्हापूर पध्दतीचा बंधारा चिंचला ता.सुरगणा या कामाची नमुना नं.३९ ची छायांकित प्रत तसेच हस्तांतर टिपणी सोबत जोडण्यात आली आहे. सदर काम पुर्ण करण्यात आले आहे.

**परि. क्र. ६** : कोल्हापूर पध्दतीचा बंधारा पांझणदेव ता.नांदगाव या कामाची नोंद नमुना नं.३९ नोंदवहीत घेण्यात आली आहे व काम हस्तांतरासंबंधी कार्यवाही पुर्ण केलेली आहे.

तरी कृपया आक्षेपांचे अनुपालन स्विकृत होणेस विनंती आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ मे, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, कोल्हापूर पध्दतीचा बंधारा पळशी, चिंचला, पांझणदेव व कळमदरी या कामांच्या ठेकेदारांवर निविदा शर्ती ३(क) नुसार कारवाई केलेली आहे. या कामांसाठींचा वाढीव खर्च एकूण रक्कम रु. २३,२५,५५८/- सदर मक्तेदारांकडून वसूल होणे आवश्यक आहे. तो वसूल न करण्याची कारणे काय आहेत? तसेच चारही कामे वेळेत पूर्ण न झाल्यामुळे सदर मक्ते वेळीच रद्द करुन पुढील आवश्यक कार्यवाही करण्यासाठी झालेल्या विलंबास कोण जबाबदार आहेत? या अनियमिततेसाठी संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली.

यावर कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (पूर्व) विभाग यांनी समितीस असे विदित केले की, दिनांक ११/९/२००० रोजी कोल्हापूर बंधा-याचे काम टर्मिनेट केले होते. त्यानंतर २००८ मध्ये सुधारित अंदाजपत्रक करण्यात आले. सदर काम दिनांक २४/७/२००८ रोजी पूर्ण झाले. सदर कामाकरिता २.१३ लक्ष रुपये इतका खर्च झाला होता. यावर सह संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी अशी विचारणा केली की, निविदा शर्ती ३(क) नुसार या कामांसाठींचा वाढीव खर्च रक्कम रु. २३,२५,५५८/- मक्तेदारांकडून वसूल होणे आवश्यक आहे. तसेच चार कामांमध्ये जप्त केलेली सुरक्षा अनामत रक्कम ३६,४८९/- शासनाकडे जमा केली आहे काय यासंदर्भात समितीला माहिती द्यावी. या समितीच्या प्रश्नावर कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (पश्चिम) विभाग यांनी चिंचला कामाच्या संदर्भात २,११,२४०/- रुपयांची रक्कम वसूल केली आहे अशी माहिती समितीस दिली.

यावर समितीने पुढे विचारणा केली की, रु. २३,२५,५५८/- इतकी रक्कम मक्तेदाराकडून वसूल होणे आवश्यक आहे असा आक्षेप काढला आहे. आता या रकमेचे काय करायचे? यावर कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (पुर्व) विभाग यांनी समितीस असे विदित केले की, एका मक्तेदाराच्या बाबतीत रु. २,११,०००/- इतकी रक्कम वसूल झाली आहे. यावर समितीने पुढे आणखी विचारणा केली की, बाकी मक्तेदारांच्या बाबतीत काय कार्यवाही करायची आहे? यावर कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (पुर्व) विभाग यांनी समितीस असे विदित केले की, वसुलीचे प्रयत्न सुरू आहेत. नियमाप्रमाणे कार्यवाही करतो.

यावर, सह संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी अशी विचारणा केली की, चिंचलाचे काम मोठे आहे. कोल्हापूर पध्दतीचा बंधारा, चिंचला या कामाचा वाढीव खर्च रू.१२,१४,३७४/- इतका आहे. मग रु. २३,२५,५५८/- चे बायफरकेशन कसे होते ? कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (पश्चिम) विभाग यांनी समितीस विदित केले की, लेखापरिक्षणात रु. २,११,०००/- इतके दिले आहेत, त्याप्रमाणे वसुली केली आहे. रु. २,११,२४०/- इतके चिंचलाचे होते. ते वसूल झाले आहेत. यावर समितीने अशी हरकत घेतली की, चिंचलाचे रु.१२,१४,३७४/- असल्याचे दिले आहे.कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (पश्चिम) विभाग

यांनी समितीस असा खुलासा केला की, लेखापरिक्षकांनी लिहिले होते की, आमची नोटीस पूर्वी १२ लाख रूपयांसाठी दिली होती. परंतु प्रत्यक्षात तेवढे येत नाही, इतकेच येते. लेखापरिक्षणात रू. २,११,२४०/- झाले, ते वसूल केले आहेत.

यावर सह संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी अशी विचारणा केली की, प्रशासकीय मान्यता रू. ३,४६,६४६ आणि त्यानंतर अंदाजपत्रकीय रक्कम रू. ३,२२,७४०/- आहे. आपण काम रद्द केले, आपण सुधारित अंदाजपत्रक किती रकमेचे केले आहे ? यावर कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (पश्चिम) विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, सुधारित अंदाजपत्रक रू.१५,६१,३७४/- इतक्या रकमेचे केले आहे. यावर सह संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी अशी विचारणा केली की, मग यामध्ये किती रूपये रकमेचा फरक झाला आहे, यावर कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (पश्चिम) विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, ढोबळमानाने ही आकडेवारी घेतली होती. प्रत्यक्षात खर्च रू. ६,११,२४०/- झाला आहे. यावर सह संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी अशी विचारणा केली की, समितीला एवढेच उत्तर द्यावे की, आपल्याला या संदर्भात किती वसुली करायची आहे आणि ती आपण केव्हापर्यंत कराल? यावर कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (पश्चिम) विभाग यांनी समितीस असे विदित केले की, चिंचलामध्ये रू. २,११,२४०/- इतकी वसुली करायची होती आणि ती त्याप्रमाणे केली आहे. तद्नंतर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ४ कामांपैकी एका कामाची वसुली करण्यात आली आहे. बाकीच्या ३ कामांची वसुलीची रक्कम किती आहे व त्यासंदर्भात काय कार्यवाही केली? यावर कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (पूर्व) विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, ३ कामांच्या संदर्भातील वसुली बाकी आहे.कळमदरी संदर्भात रू. २,१३,०००/- आहे, पळशी संदर्भात रू. २७,०००/- आहे आणि पांझणदेव संदर्भात रू. ९,४४,०००/- इतकी वसुली बाकी आहे. तसेच एक ठेकेदार मयत झाला, दोन ठेकेदारांकडून पैसे घ्यायचे आहेत.

यावर समितीने अशी विचारणा केली की, रू. ९,४४,०००/- येणे बाकी आहे. आपल्याला त्याच्या स्थावर मालमत्तेवर बोजा चढविण्याचा अधिकार आहे का आणि बोजा चढविला नसेल तर किती दिवसात चढविणार आहात, तसेच शासकीय निधी वसूल करायचा असेल तर कायद्यामध्ये प्रावधान आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, हे सिव्हिल अग्रिमेंट आहे. त्यामुळे त्याच्या टर्म्स व कंडिशन्स यांना दोन्ही पार्टी बांधील आहेत, ते त्याच्या बाहेर जाऊ शकत नाहीत. आपल्याला त्या संदर्भात बोजा चढविता येईल किंवा सिव्हिल सूट दाखल करता येईल आणि त्याप्रमाणे कार्यवाही करावी लागेल. यावर समितीने पुढे विचारणा केली की, स्टॅम्प पेपरवर कामाचे नाव घेऊन रक्कम लिहून करार केलेला नाही का, कारण हे बी-१ निविदा असे अग्रिमेंट आहे. बी-१ निविदेच्या संदर्भात कायद्यामध्ये ब-याच तरतुदी आहेत. काहीही झाले तरी ३ (क) अन्वये कशी कारवाई करायची हे ठरले आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी व कार्यकारी अभियंता यांनी बी-१ वर काय कारवाई करतात हे सांगितले पाहिजे. त्यामुळे तो त्या ॲग्रिमेंटचा भाग असू शकतो. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सदरहू समितीच्या प्रश्नाबाबत सर्व कागदपत्रे तपासून कार्यवाही करतो असे आश्वासित केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्द्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) कोल्हापुर टाईप बंधारा कामातील अनियमितता को.प.बं.पळाशी, पांझनदेव, कळमदरी ता.नांदगाव व चिंचला ता.सुरगाणा या कामांच्या ठेकेदारांवर निविदा शर्ती ३(क) नुसार कारवाई केली आहे. तसेच या कामांसाठीचा वाढीव खर्च रू. ९,४४,०००/- येणे बाकी असल्याने तो समितीच्या निर्देशानुसार व्याजासह वसुल करण्यात आली आहे काय ?

(२) को. प. बं. पळाशी, पांझनदेव, कळमदरी ता.नांदगाव व चिंचला ता.सुरगाणा या कामांच्या ठेकदारांवर निविदा शर्ती ३ (क) नुसार कारवाई झालेली असून त्यांचेकडून येणे असलेली रक्कम रुपये २३,२५,५५८/- अद्याप पर्यंत वसुल न होण्याची काय कारणे आहेत ? होणा-या विलंबास कोण जबाबदार आहे ?

(३) चिंचला येथील कामाचा वाढीव खर्च १२,१४,३७४/- रुपये इतका परिगणित केलेला असुन त्याची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले ?

(४) कळमदरी कामाच्या विलंबाबात उप अभियंता व शाखा अभियंत्यांवर दिनांक १६/३/२०११ मध्ये शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित केलेली असून सदर कारवाई किती कालावधीमध्ये पूर्ण होणे आवश्यक होते ती पूर्ण झाली आहे काय, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

(५) अशाप्रकारे मोठ्या प्रमाणावर रकमा शासन खाती जमा होणे बाकी आहे. याचा आढावा घेतला आहे का, या रकमा शासन खाती जमा करण्यासंदर्भात नियम व त्याची मुदत किती असते नियमाप्रमाणे या रकमा शासन खाती जमा करणे यथास्थिती वसुल करणे याची जबाबदारी कोणावर असते असल्यास जबाबदार अधिका-यांवर शासनाने काय कार्यवाही केली आहे ?

(६) प्रस्तावित वसुलीच्या रकमा/सुरक्षा रकमा ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्याने ही रक्कम व्यपगत झालेली असल्याचे जिल्हा परिषद लघुपाटबंधारे पूर्व विभागाने समितीस कळविले आहे, या अभिप्रायाशी शासन सहमत आहे काय तो वसुल न करण्याची कारणे काय, असल्यास अनामत रक्कम, वसुलीच्या रकमा व्यपगत करण्यासंबंधीचे नियम, शासन निर्णय काय आहेत ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) को. प. बं. पळाशी ता. नांदगाव या कामाची वसुलपात्र रक्कम रु. २९६३१/- असून त्यापैकी रु. २६३१/- रक्कम वसुल करणेत आली आहे. उर्वरीत रक्कम वसुली करणेसाठी नोटीसीद्वारे उप अभियंता जि.प.ल.पा.उपविभाग नांदगाव यांचेमार्फत तसेच नाशिक जिल्हा मजुर संस्थांचा संघ मर्या. नाशिक यांना रक्कम वसुली साठी पत्र देवुन वसुलीबाबत पाठपुरावा सुरु आहे. परंतु अद्याप वसुली रक्कम रु. २७०००/- अप्राप्त आहेत.

(२) को. प. बं. पांझणदेव ता. नांदगाव या कामाची वसुलपात्र रक्कम रु. ९४४१८४/- असून संबंधित मक्तेदाराचे रचना कंस्ट्रक्शन संस्थेकडून रक्कम वसुल झालेली नाही. मात्र नोटीसीद्वारे उपअभियंता, जि.प.ल.पा.उपविभाग, नांदगाव मार्फत संबंधिताकडे वारंवार पाठपुरावा सुरु आहे.

(३) को. प. बं. कळमदरी ता. नांदगाव या कामाची वसुलपात्र रक्कम रु. २१३८०९/- असून संबंधित मक्तेदार श्री. जे. एस. मुर्खे हे मयत झालेले आहेत. तरीही नोटीसी द्वारे प्रो. पा. मक्तेदार श्री. मुर्खे यांच्या मालमत्तेवर बोजा चढविणेबाबतची कार्यवाही करणेबाबत उप अभियंता जि.प.ल.पा. उपविभाग नांदगाव यांनी सत्वर कार्यवाही करावी याबाबत आदेशीत करणेत आलेले आहे. परंतु सदरची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) को. पं. बंधारा चिंचला, ता. सुरगणा सदर कामाचे मक्तेदार श्री. संदीप शांताराम दरगोडे या मक्तेदाराकडून वसुल करावयाची रक्कम रूपये २११२४०/- वसुल करण्यात आलेली आहे.

कोल्हापूर टाइप बंधारा पळाशी, पांझणदेव, कळमदरी, चिंचला ता.सुरगणा या कामाची वसुली रक्कमेची विगतवारी खालीलप्रमाणे आहे.—

कोल्हापूर पध्दती बंधारा पळाशी, रू. २७,०००/-

कोल्हापूर पध्दती बंधारा पांझणदेव रू. ९४,४,१८४/-

कोल्हापूर पध्दती बंधारा कळमदरी रू. १,४०,०००/-

कोल्हापूर पध्दती बंधारा चिंचला सुरगाणा रू. १२,१४,३७४/- एकूण वसुली रक्कम रू. २३,२५,५५८/-

सदर ४ कामांपैकी १ ते ३ कामांची वसुली अद्याप झालेली नाही. या कामाचा मक्ता निविदा शर्ती ३ (क) नुसार संबंधित कामाचा मक्ता रद्द करणेत आलेला आहे.

(१) **को. प. पं. पळाशी ता. नांदगांव** या कामाची वसुलीपात्र रक्कम रू. २९६३१/- असून त्यापैकी रू. २६३१/- रक्कम वसुल करण्यात आली आहे उर्वरित रक्कम वसुल करणेसाठी नोटीसीद्वारे उपअभियंता जि.प.ल.पा. उपविभाग नांदगांव यांचे मार्फत तसेच नाशिक जिल्हा मजूर संस्थांचा संघ मर्या. नाशिक यांना रक्कम वसुली साठी पत्र देवून वसुली बाबत पाठपुरावा सुरू आहे. परंतु अद्याप वसुली रक्कम २७०००/- अप्राप्त आहे.

(२) **को. प. बं. पांझणदेव ता. नांदगांव** या कामाची वसुलपात्र रक्कम रू. ९४४१८४/- असून संबंधित मक्तेदार चे. रचना कंस्ट्रक्शन संस्थेकडून रक्कम वसुल रक्कम झालेली नाही मात्र नोटीसीद्वारे संबंधिताकडे वारंवार पाठपुरावा सुरू आहे.

(३) **को. प. बंधारा कळमदरी ता. नांदगांव** या कामाची वसुलपात्र रक्कम रू. २१३८०९/- असून संबंधित मक्तेदार श्री. जे. एस. मुर्खे हे मयत झालेले आहेत. तरीही नोटीसीद्वारे प्रो.पा. मक्तेदार श्री. मुर्खे यांच्या मालमत्तेवर बोजा चढविणेबाबतची कार्यवाही करणेबाबत उपअभियंता जि.प.ल.पा. उपविभाग नांदगाव यांनी सत्वर करावी याबाबत लेखी कळविण्यात आलेले आहे. सदरची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) **को. प. बंधारा चिंचला, ता. सुरगणा** कोल्हापूर टाईप बंधारा चिंचला ता.सुरगणा कामाची रू.१२,१४३७४/- नसून त्याऐवजी रू. २,११,२४०/- असल्याची खात्री केली आहे. सदर कामाचे मक्तेदार श्री. संदीप शाताराम दरगोडे या मक्तेदारांकडून वसूल करावयाची रक्कम रूपये २११२४०/- वसूल करण्यात आलेले आहे.

को. प. बंधारा चिंचला, ता. सुरगाणा

(३) चिंचला येथील मूळ कामावर झालेला खर्च रक्कम रू. ३४७००००/- असून सुधारित अंदाजपत्रकाची किंमत रूपये रू.१५६१३७४/- इतकी आहे. यातील तफावत रक्कम रूपये १२१४३७४/- इतक्या वसुलीचे आदेश विभागाने दिले होते. तथापि लेखापरीक्षण सन २००८/०९ मध्ये सदर वसुलीची रक्कम रू. २११२४०/-इतकी निश्चित केलेली आहे. याबाबत कार्यालयाने खात्री केली आहे.

(४) को. प. बं. कळमदरी ता. नांदगांव विलंबाबाबत तत्कालीन उपअभियंता व शाखा अभियंतांवर यांना दि.१६/३/२०११ ऐवजी दि.१६/३/२००१ रोजी मध्ये शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित का करणेत येवू नये याबाबत कारणे दाखवा नोटीस दिलेली होती सदर कारवाई सन २००१ मध्ये पूर्ण होणे आवश्यक होते ती पूर्ण झालेली नाही. संबंधित तत्कालीन शाखा अभियंता श्री. पी. एच. पाटील हे सेवानिवृत्त झालेले आहेत.

शासन सदरी जमा करावयाच्या रकमेचा आढावा घेतला आहे. अशा प्रकारे ३ कामांच्या रकमा शासन खाती जमा होणे बाकी आहे. अशा रकमा विनाविलंब शासन खाती जमा करणे आवश्यक आहे, अशा प्रकारच्या रकमा गटस्तरावरील उपअभियंता, उपविभागामार्फत करण्यात येतो या संदर्भात संबंधित अधिका-यांना नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.

सुरक्षा अनामत रकमेस ३ वर्षे झाल्यामुळे व्यपगत झाल्या आहेत, हे समितीस कळविले आहे. सदर सुरक्षा अनामत रक्कम ३ वर्षात मागणी न केल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ च्या नियम २०९ (७) नुसार व्यपगत झाल्यानंतर त्या जिल्हा परिषद महसुली जिल्हा परिषद सेसमध्ये जमा होते. सदर रक्कम व्यपगत ठरल्यामुळे त्या पुन्हा काढून परतावा करावयाचा असल्यास, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ च्या परिशिष्ट ४ (९६)नुसार महसुली परतावा करण्यासाठी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजुरी आवश्यक ठरते. सदर सुरक्षा अनामत नोंदीचा ताळमेळ घेण्यात आला आहे. परंतु सदर व्यपगत रकमेच्या नोंदी जुन्या असल्याने त्या शोधण्यास जादा कालावधी लागला सदरच्या नोंदी उपलब्ध झाल्याने त्यानुसार दि.२२/१२/२०१७ रोजीच्या संपन्न झालेल्या जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत सदरच्या विषयास मंजुरी घेण्यात आलेली असून व्यपगत रक्कमा शासन सदरील भरणा करण्याची दक्षता घेण्यात आलेली आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**मृद व जलसंधारण विभागाचे अभिप्राय :-**

जिल्हा परिषद नाशिक यांनी दिलेल्या स्पष्टीकरणाशी शासन सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नाशिक जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सचिव, जलसंधारण विभाग यांनी समितीस असा खुलासा केला की, समितीची भेट झाली त्यावेळी कोल्हापूर पध्दतीच्या बांधकामामध्ये झालेल्या अनियमिततेबाबतचा मुद्दा होता. पळाशी, पांझणदेव, कळमदरी ता.नांदगाव व चिंचला ता.सुरगाणा या कामांच्या ठेकेदारांवर कारवाई करुन अपूर्ण कामे पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात येते. ९ लाख ४४ हजार रुपये वाढीव खर्च वसूल केला काय असा विषय होता. सुरगाणा ता.चिंचाला बंधारा कामावरील २ लाख ११ हजार रुपयांची वसुली करण्यात आली होती. नाशिकमध्ये जिल्हा परिषदेचे २ विभाग होत. यातील पूर्व विभागातील चांदवड, नांदगाव येथील पांझणदेव, कळमदरी, पळाशी या बाबत अंशतः कारवाई झालेली आहे. पळाशी येथे २९ हजार ६३१ रुपयांपैकी २ हजार ६३१ रुपयांची वसुली झालेली आहे.

याबाबत अधिका-यांकडून आम्ही आढावा घेतला. आता या संस्था ट्रेस होत नाही. ३ संस्थांची आरआरसी करण्याबाबत दिनांक २४ जानेवारी रोजी नोटीस काढली आहे. या संस्थांचे पत्ते सापडले नाहीत. सन १९९५ चे टेंडर असून त्या नंतर सन २००८ मध्ये ते बंद करण्यात आले होते. १६-१७ वर्षे कामाची फारशी प्रगती न झाल्यामुळे ते टेंडर रद्द करुन काम करुन घेतले. आता हा ठेकेदार ट्रेस होत नाहीत. आत पर्यंत ९ लाख ४४ हजार रुपयांपैकी २ लाख ११ हजार २४० अधिक २ हजार ६३१ रुपये वसुल झाले आहेत. यातील मुर्खे नावाचा कंत्राटदार मयत झालेला आहे. कळमदरीच्या प्रकरणाची सुधारित प्रशासकीय मान्यता सन १९९३ मधील होती. आता २५-३० वर्षापूर्वीचा हा मुद्दा आहे. आरआरसी म्हणजे रेव्हेन्यु रिकव्हरी केल्याशिवाय वसुली होणार नाही.

यावर समितीने अशी विचारणा केली की, सदर व्यक्ती कधी मयत झाली आहे, यावर सचिव, जलसंधारण यांनी समितीस माहिती दिली की, सदर व्यक्ती सन २००८ पूर्वी मयत झालेली आहे. यावर समितीने असे निदेश दिले की, या प्रकरणाबाबत बराच विलंब झालेला आहे, वसुलीची रक्कम देखील मोठी आहे. याबाबत लवकरात लवकर कारवाई करावी, वसुली करावी. यावर सचिव, जलसंधारण यांनी होकारार्थी उत्तर दिले व मी २४ जानेवारी रोजी अधिका-यांना पत्र दिलेले आहे. आता पुन्हा त्यांना सांगतो असे समितीस आश्वस्त केले.

## अभिप्राय व शिफारशी

कोल्हापूर पध्दतीचे बंधारे पळाशी ता. नांदगाव या कामाची वसुलपात्र रक्कम रुपये २९,६३१/- असून त्यापैकी केवळ रुपये २६३१/- एवढी रक्कम वसुल करण्यात आलेली असून उर्वरित रक्कम रुपये २७,०००/- अद्याप अप्राप्त आहे. सध्या या संस्थांचा शोध घेता येत नाही ही बाब अनाकलनीय आहे असे समितीस वाटते. तीन संस्थांची आरआरसी (महसूल वसुली प्रमाणपत्र) बाबत २४ जानेवारी, २०१८ रोजी नोटीस काढली आहे, परंतु या संस्थांचे पत्ते सापडले नाहीत त्यामुळे कारवाई केल्याचे दिसून येत नाही. तसेच कोल्हापूर पध्दतीचे बंधारे पाझणदेव ता.नांदगाव या कामाची वसुलपात्र रक्कम रुपये ९,४४,१८४/- एवढी असून **या कामाचे मक्तेदार रचना कंस्ट्रक्शन या संस्थेकडून त्वरित वसुली करण्यासाठी कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे कोल्हापूर पध्दतीचे बंधारे कळमदरी ता.नांदगाव या कामाची वसुलपात्र रक्कम रुपये २,१३,८०९/- असून या कामाचे मक्तेदार श्री. मुर्खे जरी मयत झाले असले तरी मक्तेदाराची संस्था अस्तित्वात असून रितसर व कायदेशीर कारवाई करुन वसुलपात्र रक्कम सत्वर प्राप्त होण्याच्या दृष्टीने कारवाई करण्यात यावी आणि याप्रकरणी झालेल्या विलंबाबाबत तत्कालिन उप अभियंता व तत्कालिन शाखा अभियंता यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी तसेच पळाशी, पांझनदेव व कळमदरी या कोल्हापूर पध्दतीच्या बंधारे कामाच्या वाढीव खर्चाच्या वसुलीची रक्कम तात्काळ शासनखाती विहित कालावधीत जमा करण्याची जबाबदारी संबंधित अधिका-यावर सोपविण्यात येऊन १ महिन्याच्या आत सर्व वसुलीची रक्कम जमा करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे. उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

## प्रकरण सोळा

## जिल्हा परिषद, नाशिक

## निवासस्थान गैरवापराबाबत

### परिच्छेद क्रमांक ४.७ (सन २००८-२००९)

पंचायत समिती, मालेगांव यांचेकडे निवासस्थान क्रमांक ७ हे श्री.सी.एस.मोरे, सेवानिवृत्त, कृषि अधिकारी, यांना दिनांक २०.१२.१९७९ पासून देण्यात आलेले आहे. श्री.मोरे हे दिनांक १/१०/१९९३ रोजी सेवानिवृत्त झाले असून यानंतरही त्यांनी निवासस्थान रिक्त केलेले नाही.

बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील पत्र क्रमांक जीआर/५/८८/ दिनांक ८/८/१९८८ नुसार रुपये १०५८/- दरमहा भाडे वसुल करणे अपेक्षित आहे. सन २००८-२००९ अखेर एकूण रुपये २,४५,४५९/- एवढी रक्कम संबंधितांकडून वसुल होणे बाकी आहे. सदर मासिक भाड्यांचे दर चार वर्षांनी फेरनिर्धारण झालेले नसल्याने सेवानिवृत्तीच्या दिनांकापासून फेर निर्धारणासह थकबाकीची रक्कम वसुल होणे व निवासस्थान रिक्त करुन घेणेबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे. उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.

निवासस्थान क्र. ७ बाबत श्री. सी. एस. मोरे, यांनी मालेगांव कोर्टात रे.मु.नं.३९/९७ चा दावा दाखल केला होता. सदरचा निकाल दिनांक ०१/०१/२००३ रोजी जिल्हा परिषदेच्या बाजुने लागलेला आहे. सदर निकालाविरुध्द मालेगांव सेशन कोर्टात दिवाणी अपिल नं. ३२/२००३ दाखल केलेले आहे. जिल्हा परिषदेने मा. जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे डी.जी.पी.ई. अपिल नं.१/२००२ दाखल केले होते. त्यांचा निकाल दिनांक २३/०९/२००२ रोजी जिल्हा परिषदेच्या बाजुने दिला आहे. सदर निकालाविरुध्द श्री.मोरे यांनी मालेगांव सेशन कोर्टात अपिल नं.९६/०२ दाखल केले होते. सदर अपिलचा निकाल दिनांक २२/१२/२००५ रोजी जिल्हा परिषदेच्या बाजुने लागलेला आहे. सदर निकालाविरुध्द श्री. मोरे यांनी दिवाणी पुर्ननिरिक्षण अपिल नं.१९/२००६ दाखल केले आहे. त्याचा निकाल दिनांक २४/०८/२०१५ रोजी अर्जदार यांचे लाभात होवून जिल्हा परिषद/सामनेवाले यांचे अपिल ना-मंजूर करण्यात आलेले आहे. त्यानंतर जिल्हा परिषद/सामनेवाला याने ना.मुंबई हायकोर्टात पिटीशयन नंबर १२६९/२००६ दाखल केले होते. सदर ना. हायकोर्टाचे अपिलामध्ये जिल्हा परिषद/सामनेवाला यांना कुठल्याही प्रकारचा स्थगिती आदेश निवासस्थान रिक्त करण्याचा मिळालेला नाही. श्री.मोरे यांचेकडे रक्कम रुपये १,४२,९४६/- भाडे वसुलीची रक्कम बाबत फेर चौकशी करण्याची परवानगी दिली होती. परंतु त्या फेर परवानगीचे आदेशानुसार श्री. मोरे यांनी मालेगांव येथील सेशन कोर्टात दिवाणी अपिल नं.१९/२००६ दाखल केले होते, त्याचा निकाल जिल्हा परिषदेच्या बाजुने लागलेला आहे. तसेच त्यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दावा दिनांक १९/०३/२०१४ रोजी मालेगांव कोर्टात दाखल केला आहे. सदरचे दिवाणी अपिल न्यायप्रविष्ट आहे. तसेच श्री. सी. एस. मोरे, सेवानिवृत्त कृषी अधिकारी यांचेकडून निवासस्थान क्र. ७ हे रिक्त करुन घेण्यात आलेले आहे.

निवासस्थान क्र. नं. ७ ची बाब न्यायप्रविष्ट असल्याने केसचा निकाल लागल्यावर तात्काळ निवासस्थान भाडे वसुलीबाबत कार्यवाही करण्यात येईल. श्री. मोरे यांना अजुन कोणत्याही शासकीय सेवेचा आर्थिक लाभ देण्यात आलेला नाही. शासकीय निवासस्थान क्र. ७ बाबत दावा न्यायालयात असल्याने कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ मे, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, श्री. मोरे, सेवानिवृत्त कृषी अधिकारी यांनी निवृत्तीनंतरही निवासस्थान रिक्त न करण्याची कारणे काय आहेत, निवासस्थानाचे भाडे त्या त्या वेळी त्यांच्या वेतनातून वसूल न करण्यास कोण जबाबदार आहे, निवासस्थानाचे भाडे न भरण्यास निश्चित कोणते कारण आहे, यामुळे रुपये १,४२,९४६/-च्या झालेल्या जिल्हा परिषदेच्या नुकसानीस कोण जबाबदार आहे. सन २००८-०९ या वित्तीय वर्षापर्यंत त्यांच्याकडे एकूण रुपये २,४५,४५९/- इतकी थकबाकी होती, आता थकबाकी किती आहे आणि त्यापैकी किती वसूल केली आहे. यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगांव यांनी श्री. मोरे, कृषी अधिकारी हे सन १९९० मध्ये सेवानिवृत्त झाले. सन १९९० पासून निवासस्थान त्यांच्या ताब्यात होते. त्यांची पेन्शन व इतर रक्कम सन १९९३ ला अदा केली आहे. ३ वर्षांचा फरक आणि इतर रक्कम विलंबामुळे ते कोर्टात गेले, तोपर्यंत निवासस्थान रिक्त केले नव्हते. कोर्टाचा निकाल ऑक्टोबर, २०१५ मध्ये लागला, नोव्हेंबरमध्ये निवासस्थान रिक्त केले आहे. वसुली बाकी आहे अशी समितीस माहिती दिली.

यावर समितीने विचारणा केली की, कोर्टाने याबाबत काय सांगितले आहे. समितीच्या प्रश्नावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगांव यांनी अशी माहिती दिली की, पूर्वी कोर्टाने काहीही सांगितले नव्हते. आता कोर्टाने सांगितले की, निवासस्थान रिक्त करून घ्यावे. पूर्वी निवासस्थान दिलेले नव्हते. वसुलीसाठी पुन्हा कोर्टात दावा दाखल केलेला आहे. वसुलीचा मुद्दा कोर्टात प्रलंबित असल्यामुळे २ लाख ४२ हजार रूपयांची वसूली केलेली नाही. सद्यःस्थितीत निवासस्थान खाली करून घेतले असून याबाबत वसुलीची कार्यवाही करणार आहोत.

समितीने पुढे विचारणा केली की, जवळपास २५ वर्षे निवासस्थान त्यांनी स्वतःजवळ ठेवले आहे. २५ वर्षांचे भाडे किती घेतले. यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगांव यांनी अशी माहिती दिली की, सन २००४ पर्यंत २ लाख ४२ हजार रूपये वसुली काढली आहे पुढील कॅल्क्युलेशन केलेले नाही. कोर्टाच्या निकालानंतर पुढचे कॅल्क्युलेशन करावे लागेल.

यावर समितीने पुढे असे निदेश दिले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संदर्भातील माहिती घ्यावी. सदर बाबतीत काही प्लॅनिंग झाले आहे असे वाटते. स्टे नव्हता, मग पैसे का वसूल केले नाहीत. स्टे आताही नाही. आपण त्यांच्या देय रकमेतून ती रक्कम कापून घ्यावी. घरभाड्याच्या रकमेमध्ये फॉल्ट वाटतो. २ लाख रूपये २५ वर्षांमध्ये घरभाडे होऊ शकत नाही. वाढीव दराने म्हणजे मार्केट रेटप्रमाणे भाडे लावणे आवश्यक आहे, नियम पाहून त्यांच्या देय रकमेतून रक्कम वसून करून घ्यावी. यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगांव यांनीअसे विदीत केले की, मी वसुलीची कार्यवाही करतो.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) श्री. सी. एस. मोरे, से. नि. कृषि अधिकारी यांनी सुमारे २४ वर्षे अवैधपणे कोणत्याही न्यायालयाच्या स्थगन आदेशाशिवाय शासकीय निवासस्थान आपल्या ताब्यात ठेवले प्रकरणी दंडनीय भाडे इ. नियमानुसार शासनाने त्याची प्रगणना केली आहे काय तसेच जिल्हा परिषद, नाशिक/स्थानिक निधी लेखापरिक्षा आक्षेपातील सूचनेनुसार मासिक भाड्याचे फेरनिर्धारण केले आहे काय याची व्याजासह एकूण रक्कम किती येते ?

(२) सदरहू प्रकरणी सन २००७-२००८ व २००८-२००९ या दोन्ही वर्षी आक्षेप घेऊनही त्याची वसुली न करण्यास कोण जबाबदार आहे ?

(३) सदरहू प्रकरणाप्रमाणे राज्यात इतर ठिकाणी अशा बेकायदेशीर निवासस्थान असणा-यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे ?

(४) श्री. मोरे यांच्या निवृत्ती वेतनातून अशा प्रकारची वसूली करतेवेळी संपूर्ण वसुली होण्यास आणखी किती वर्षाचा कालावधी लागणार आहे. मानवी आयुष्य लक्षात घेता संपूर्ण वसुली शक्य आहे काय, नसल्यास त्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) श्री. सी. एस. मोरे, सेवानिवृत्त कृषि अधिकारी हे नियत वयोमानानुसार दिनांक ३१/०५/१९९० रोजी सेवानिवृत्त झाले. श्री.सी.एस.मोरे यांची पंचायत समिती, मालेगांव येथून दिनांक ०९/०३/१९८३ रोजी प्रशिक्षण व भेट योजना कृषी विभाग मालेगांव जि.नाशिक येथे बदली झाली त्यानंतर नांदगांव येथे बदली झाली होती. सेवेच्या कालावधीत पुनश्च मालेगांव येथे बदली होईल या हेतूने त्यांनी निवासस्थान रिक्त केले नव्हते.

सेवानिवृत्तीनंतर पेन्शन प्रकरणाची पुर्तता करण्यास व ना-देय/ना-चौकशी दाखल्यांची पुर्तता करण्यात उशिर व निवासस्थान वसुलीच्या रक्कमेसाठी झालेल्या पत्रव्यवहारात गेलेला कार्यकाळ यामुळे त्यांना अदा करण्यात येणारी उपदान रक्कम रु. ४०,९२०/- व पेन्शनची रक्कम रु. ५०,९६०/- दिनांक ०३.०९.१९९३ रोजी विलंबाने अदा करण्यात आली. मात्र रक्कम उशिराने मिळाल्याने त्यांनी विलंब कालावधीतील अदा करावयाच्या रक्कमेवर व्याजाची मागणी केली होती व श्री. सी. एस. मोरे, यांनी निवासस्थान ताब्यात ठेवून मे.न्यायालय, मालेगांव येथे दावा दाखल केला होता. त्यामुळे निवासस्थान रिक्त करण्यास दिनांक ३१/१२/२०१५ रोजी पावेतो उशिर झाला.

न्यायालयाच्या निकालानंतर श्री. सी. एस. मोरे से. नि. कृषि अधिकारी यांना पंचायत समिती मालेगांव मार्फत पत्र क्र. आस्था-१/०४/२०१७ मालेगांव दिनांक ०५/०१/२०१७ व पं.स.कार्यालयाचे पत्र जाक्र/पंसमा/आस्था-१/१८२/२०१७ दिनांक १८/०२/२०१७ अन्वये निवासस्थान क्र. ७ बाबत वसुलीची रक्कम रुपये २,४५,४५९/- वसुल करण्याबाबत नोटीस देण्यात आलेली आहे. तसेच शासकीय नियमाप्रमाणे दरमहा रुपये १०५८/- प्रमाणे निवासस्थान भाडे रक्कम आकारण्यात आली आहे. ती पुढीलप्रमाणे आहे.

| वर्ष (१) | रक्कम (२) | वर्षाचे भाडे (३) | एकूण रक्कम (४) |
|---|---|---|---|
| २००९-१० | २४५४५९/- | १२६९६/- | २५८१५१/- |
| २०१०-११ | २५८१५१/- | १२६९६/- | २७०८४७/- |
| २०११-१२ | २७०८४७/- | १२६९६/- | २८३५४३/- |
| २०१२-१३ | २८२५४३/- | १२६९६/- | २९६२३९/- |
| २०१३-१४ | २९६२३९/- | १२६९६/- | ३०८९३५/- |
| २०१४-१५ | ३०८९३५/- | ९५२२/- | ३१८४५७/- |

तसेच सदरचे शासकीय निवासस्थान हे दिनांक ३१/१२/२०१५ रोजी रिक्त करुन घेण्यात आल्याने माहे डिसेंबर, २०१५ अखेर वसुलीची रक्कम रु. ३१८४५७/- इतकी असून सदर रक्कम वसुलीबाबत नोटीस देण्यात आलेली आहे. तसेच त्यांचे पेन्शनमधून सदर रक्कम वसूल करणेबाबत मा.कोषाधिकारी, नाशिक या कार्यालयाकडील पत्र जाक्र/पंसमा/आस्था-१/४६४/२०१७ मालेगांव, दिनांक २१/०६/२०१७ अन्वये ते पेन्शन घेत असलेल्या देना बँकेस या कार्यालयाकडील पत्र जाक्र/पंसमा/आस्था-१/९३०/२०१७ मालेगांव, दिनांक २१/०६/२०१७ पत्र देवून विनंतीपूर्वक कळविण्यात आलेले आहे.

(२) सदर कालावधीत श्री. एल. एम. पवार तत्कालिन गट विकास अधिकारी व श्री. ए.व्ही.सोनवणे तत्कालिन सहाय्यक लेखा अधिकारी कार्यरत होते मात्र श्री.एल.एम.पवार हे दिनांक ३०.६.२०१३ रोजी सेवानिवृत्त झाले व श्री ए व्ही सोनावणे सलेअ हे दिनांक १६.१२.२०१७ रोजी मयत झालेले आहेत. मे. न्यायालयाकडून अंतिम निकाल दिनांक २४/०८/२०१५ रोजी जिल्हा परिषद, नाशिक यांचे बाजूने लागल्यानंतर सदरचे पंचायत समिती आवारातील शासकीय निवासस्थान क्रमांक ०७ हे दिनांक ३१/१२/२०१५ रोजी रिक्त करुन घेण्यात आलेले आहे.

श्री. सी. एस. मोरे, से. नि. यांनी वेळोवेळी मे.न्यायालयात त्यांचे कडील प्रलंबित असलेली थकबाकी संदर्भात शासकीय निवासस्थान रिक्त न करण्यासंदर्भात दावे शासकीय निवासस्थान रिक्त न करण्यासंदर्भात दाखल केले होते.

(१) मा.निवासी उप जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी मुंबईचा शासकीय निवासस्थान (इव्हीक्शन) कायदा, १९५५ नाशिक यांचेकडील दि.२३/०९/२००२ च्या निकालाची छायांकित प्रत.

(२) मे. सेशन कोर्ट दिवानी, मालेगांव यांचा निकाल ०१/०१/२००३ चा जि. प. च्या बाजूने लागलेला निकालाची छायांकित प्रत.

(३) मे. सेशन कोर्ट दिवानी, मालेगांव यांचा दिनांक २२/१२/२००५ चा जि. प.च्या बाजूने लागलेला निकालाची छायांकित प्रत.

(४) मे. सेशन कोर्ट दिवानी, मालेगांव यांचा दिनांक १०/०१/२०१४ चा जि. प. च्या बाजूने लागलेल्या निकालाची छायांकित प्रत.

(५) मे. सेशन कोर्ट दिवानी, मालेगांव यांचा दिनांक २४/०८/२०१५ चा जि. प. च्या बाजूने लागलेल्या निकालाची छायांकित प्रत.

(६) श्री. सी. एस. मोरे, से. नि. कृषी अधिकारी यांनी मे.उच्च न्यायालय मुंबई येथे दिनांक १९/०३/२०१४ रोजी दाखल केलेल्या अपिलाची छायांकित प्रत.

श्री. मोरे यांनी वेळोवेळी मे. न्यायालयात दावे दाखल केल्यामुळे निवासस्थान रिक्त करण्यास विलंब झालेला आहे.

(३) सदर बाब शासन स्तरावर संबंधित आहे.

(४) श्री.मोरे यांचे वारसपुत्रांकडून प्राप्त मृत्यू दाखल्याच्या अन्वये श्री.मोरे हे दिनांक ०५/१०/२०१७ रोजी मयत झालेले आहेत त्यानंतर त्यांचे वारसपत्नी, वय वर्षे-७५ यांना अदा होणा-या कुटूंब निवृत्ती वेतनातून सदर रक्कमेची वसुली लवकरात लवकर समान हप्त्यांनी करणेची कार्यवाही मा.कोषाधिकारी, नाशिक यांचेमार्फत होण्यास त्यांना विनंती करण्यात आलेली आहे. याप्रमाणे एकूण रक्कम वसुलीबाबतची कार्यवाही करण्यात येत आहेत तसेच श्री.मोरे यांच्याकडील वसुलीबाबत त्यांच्या वारसाकडून वसुलीकामी तसेच बोजा चढविण्याकामी जमीन महसुल अधिनियमाअंतर्गत कार्यवाही सुरु आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-**

(१) श्री. सी. एस. मोरे, हयात असताना त्यांचेकडून निवासस्थानाच्या थकीत भाड्याची दंडासह वसुली करण्याची जबाबदारी, जिल्हा परिषद नाशिकची होती. सध्या श्री.सी.एस.मोरे, मयत झालेले असल्याने त्यांचे नावे असलेली थकीत भाडे व दंडाची रक्कम वसुल करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या रफीक मसीहा विरुध्द पंजाब या प्रकरणात दिनांक १८ डिसेंबर, २०१४ च्या आदेशानुसार सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांकडून वसुली अनुज्ञेय नाही. सदर प्रकरणी कर्मचारी सेवा निवृत्त होऊन तो मयत झालेला आहे. त्यामुळे सदर प्रकरणी वसुली करता येणार नाही.

(२) निवासस्थान वाटप तसेच त्याचा वापर या बाबी जिल्हा परिषद प्रशासनाशी निगडीत असून त्यांवर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे संनियंत्रण असते. त्यामुळे प्रश्नामध्ये उपस्थित केलेल्या मुद्याप्रमाणे शासन स्तरावर अशाप्रकारे बेकायदेशीर निवासस्थान असणा-यांवर कार्यवाही करण्याबाबतची बाब प्रलंबित नाही. राज्य स्तरावर प्रलंबित नाही.

## अभिप्राय व शिफारशी

नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे घेतलेल्या साक्षीदरम्यान असे निदर्शनास आले की, श्री. सी. एस. मोरे यांना दिनांक २० डिसेंबर, १९७९ पासून शासकीय वसाहतीत निवासस्थान दिलेले होते. ते दिनांक १ ऑक्टोबर, १९९३ रोजी कृषी अधिकारी म्हणून सेवानिवृत्त झालेले असून त्यांच्याकडून सन २००८-०९ अखेर दिनांक ८ ऑगस्ट, १९८८ नुसार रुपये १०५८ प्रमाणे रुपये २,४५,४५९/- रक्कम वसुल होणे बाकी आहे. सदर मासिक भाड्यांचे दर चार वर्षांनी सेवानिवृत्त दिनांकापासून फेर निर्धारणासह थकबाकीची रक्कम वसुल करुन शासनाचे निवासस्थान रिक्त करुन घेणे आवश्यक आहे.

श्री. मोरे यांनी जिल्हा परिषद विरुध्द मालेगाव न्यायालयात ३९/९७ मालेगांव सेशन कोर्टात दिवाणी अपिल ३२/२००३ आणि ९३/०२ अशा प्रकारे तीन दावे दाखल केले असता जिल्हा परिषदेच्या बाजूने न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. तद्नंतर सदर निकालाविरुध्द श्री.मोरे यांनी दिवाणी पुनर्निरिक्षण अपिल १९/२००६ दाखल केले असता त्यांच्या बाजूने निकाल लागला. त्यानंतर जिल्हा परिषदेने मुंबई उच्च न्यायालयात पिटीशन १२६९/२००६ दाखल केले असता रुपये १,४२,९४६/- च्या भाडे वसुलीची रक्कम फेर चौकशी करण्याची परवागनी दिली. मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दिनांक १९/३/२०१४ रोजी दावा दाखल केला आहे. दिवाणी अपिल न्यायप्रविष्ट आहे. श्री.मोरे यांच्याकडून निवासस्थान क्र.७ हे रिक्त करुन घेतले आहे. त्यांना कोणत्याही शासन सेवेचा आर्थिक लाभ दिलेला नाही.

साक्षीच्यावेळी निदर्शनास आले की, श्री. मोरे, सेवानिवृत्त कृषी अधिकारी यांनी निवृत्ती नंतरही निवासस्थान रिक्त न करण्याची कारणे काय आहेत, त्यांच्या वेतनातून निवासस्थान भाडे वसुल न करण्यास कोण जबाबदार आहेत. **श्री. मोरे, कृषी अधिकारी हे दिनांक ३१ मे, १९९० रोजी सेवानिवृत्त होण्यापूर्वी भाडे वसुल न करणा-या संबंधित अधिका-यांविरुध्द जबाबदारी निश्चित करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

## प्रकरण सतरा

## जिल्हा परिषद, नाशिक

### जिल्हा परिषद उपकर निधीतून अंगणवाडींना आयर्न टॅबलेट/फोलिक ॲसिड टॅबलेटस अतिरिक्त आहार पुरवठा करणेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.८९४/३ (सन २००८-२००९)**

फॉलिक ॲसिड टॅबलेट खरेदीवर सन २००८-०९ या वित्तीय वर्षात रक्कम रुपये १०,९९,९२९/- इतका खर्च केला आहे याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) फॉलिक ॲसिड टॅबलेटचा पुरवठा करण्यापुर्वी नमुना प्राप्त करून नमुना योग्य असल्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही.

(२) पुरवठादाराकडून हमीपत्र करारनामा घेण्यात आलेला नाही.

(३) औषधांचा चाचणी अहवाल केंद्रीय मध्यवर्ती प्रयोगशाळा यांचा घेणे आवश्यक असतांना पुरवठादार कंपनीचाच घेतल्याने औषधांच्या दर्जाबाबत खात्री होत नाही.

(४) दरकराराची छायांकित प्रत प्राप्त असून ती स्वाक्षांकित केलेली नसल्याने त्याची सत्यता प्रमाणित होत नाही.

(५) टॅबलेटची मुदत जुलै २००८ ते डिसेंबर २००९ अशी आहे.तथापि, वाटप करतांना साठा नोंदवहीत दिनांक नमुद नसलेने मुदतीत वाटप झाल्याचे प्रमाणित होत नाही.

(६) प्रकल्प नाशिक यांना पुरवठा केलेल्या ६८२०० टॅबलेट पैकी ४९९०० टॅबलेटची साठा नोंदवहीत नोंद नसल्याने त्याची रक्कम रुपये ५०,२९९/- वसुल होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) औषधी पुरवठा करण्याअगोदर पुरवठादार यांनी दरकरारात नमुद केलेली औषधी व पुरवठा करण्यात येणारी औषधी ही एकच असल्याची खातरजमा मा.उप.मु.का.अ.(बा.क.) यांनी केलेली असून तसे प्रमाणपत्र दिलेले आहे.तसेच पुरवठा झालेनंतर पुरवठा केलेल्या औषधाचा प्रयोगशाळेचा तपासणी अहवाल घेण्यात आलेला आहे.

(२) सदरचा पुरवठा हा शासन दरकरारानुसार झालेला असून दरकरार करतांना संबंधित पुरवठादार यांनी शासनाशी दरकरार केलेला असल्याने व पुरवठाधारकाने पुरवठा आदेशातील सर्व औषधी संचाचा पुरवठा सुस्थितीत केला आहे.अटी/शर्ती यांचे पालन पुरवठाधारकांने केलेले आहे.तसेच येणारा पावसाळा लक्षात घेता सदरची खरेदी करणे अत्यावश्यक होते.खरेदीपूर्वी करारनामा करण्याबाबत यापुढे दक्षता घेण्यात आलेली आहे.

(३) मा. सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, औसौप्र/नमुनेतपा/६७२-१०/झोन-३ दि.६-८-२०१० अन्वये औषधी व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याखालील नियम १९४५ अंतर्गत उत्पादक उत्पादित औषधाच्या प्रत्येक समुह क्रमांकाचे औषध नमुने उत्पादकाच्या प्रयोगशाळेत स्वतः विश्लेषण करण्याचे कायद्याच्या तरतुदीप्रमाणे बंधनकारक आहेत.सदर उत्पादकास दिलेल्या परवान्यावर तसे नमुद आहे.या प्रशासनाचे औषध निरिक्षक हे स्वतः randomly बाजारातून शासकीय रूग्णालयातून व उत्पादित स्थळातून नमुने घेण्याची पध्दत प्रचलित आहे.प्रत्येक परवानाधारक औषध उत्पादकाकडील प्रत्येक समुहाचा नमुना,प्रशासनाने चाचणीसाठी घेण्याचा व चाचणी अहवाल देण्याची तरतुद कायद्याप्रमाणे अपेक्षित नाही.त्यामुळे पुरवठा झालेल्या औषधांच्या दर्जाबाबत तक्रार असल्यास तसे आपल्या क्षेत्रातील या प्रशासनाच्या कार्यालयास कळविल्यास संबंधित औषधाच्या संबंधित समुह क्रमांकाचा नमुना घेवून त्याची चाचणी करण्यात येईल. अन्यथा उत्पादकाकडील चाचणी अहवाल ग्राह्य धरणे योग्य राहील.त्यामुळे शकात नमुद केलेप्रमाणे आयर्न व फोलीक ॲसिड टॅबलेटस दर्जा तपासणी ही केंद्रीय मध्यवर्ती प्रयोगशाळेत केलेली नाही मात्र सदर कंपनीची Drugs and Cosmetics Act १९४० च्या नियमांतर्गत शासनमान्य प्रयोगशाळा असल्याने व या औषधीबाबत कोणतीही तक्रार नसल्याने पुन्हा तपासणी करण्यात आलेली नाही.कंपनीचा तसा परवाना व कंपनीची नोंदणी ही WHO अंतर्गत केलेली असल्याने प्रमाणपत्र सोबत सादर केलेले आहे.

(४) दरकराराची सत्यता पडताळणी करण्यात येवून मुळ दरकराराची छायांकित प्रत ही मुळ दरकरार पाहून सांक्षांकित करण्यात आलेली आहे.

(५) सदर टॅबलेटची मुदत ही जानेवारी २०१० अशी आहे. तसे पुरवठादार यांचे देयकामध्ये नमुद केलेले आहे. सदरचे टॅबलेट ह्या प्रकल्पस्तरावर मुदतीत प्राप्त झाल्याच्या बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्या स्वाक्षरीच्या पावत्या व साठा नोंदवहीत कधी वाटप केल्या त्याच्या तारखा नमुद असून त्याच्या सत्यप्रती सोबत सादर केलेल्या आहेत.

(६) प्रकल्प नाशिक यांना पुरवठा आदेशात नमुद केलेप्रमाणे ६८२०० टॅबलेट प्राप्त झालेल्या असून त्या सर्व टॅबलेटसचे संपूर्णपणे वाटप केल्याचे वाटप नोंदवहीत नमुद असून सोबत वाटप नोंदवहीची सत्यप्रत जोडलेली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ मे, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने प्रकल्प नाशिक यांना पुरवठा केलेल्या ६८२०० टॅबलेट पैकी ४९९०० टॅबलेटची नोंद नोंदवहीत नसल्याचे लेक्षा परिक्षणात दिसून आले. सर्व टॅबलेटची नोंद घेतल्याचे खुलाशात नमूद आहे, ही नोंद केव्हा घेतली, सदरचे अभिलेखे लेखा परिक्षणाच्या वेळी का दाखविण्यात आले नाहीत अशी विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण विभाग यांनी जिल्हा परिषदेच्या सेसच्या निधीतून १० लाख ९९ हजार ९२९ रुपयांचा खर्च फॉलिक ॲसिड आणि टॅबलेट्सवर केलेला आहे. सह आयुक्त (कोकण विभाग), अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, चौथा माळा, राज्य कामगार विमा योजना रुग्णालय वागळे इस्टेट, ठाणे यांच्या दिनांक ६/८/२०१० रोजीच्या पत्रात पुढीलप्रमाणे उल्लेख केलेला आहे. 'औषधी व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याखालील नियम १९४५ अंतर्गत उत्पादक उत्पादित करीत असलेल्या औषधांचा दर्जा योग्य राखण्यासाठी औषधीच्या प्रत्येक समूह क्रमांकाचे औषध नमुने उत्पादकाच्या प्रयोगशाळेत स्वतः विश्लेषण करण्याचे विषयांकित कायद्याच्या तरतूदीप्रमाणे बंधनकारक आहे. सदर उत्पादकास दिलेल्या परवान्यावर तसे नमूद आहे. ते त्यांनीच तपासून द्यावयाचे आहे.' अशी माहिती विशद करण्यात आली.

यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी अशी विचारणा केली की, संबंधित कंपनीने स्वतः चाचणी करणे आवश्यक आहे असे त्यात म्हटलेले आहे, परंतु तुम्ही तपासणी केलेली नाही. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आम्ही फॉलिक ॲसिड व टॅबलेटस संबंधी शासनाकडे मार्गदर्शन मागितले होते. शासनाने दिनांक ६/८/२०१० रोजीच्या पत्रात खुलासा केलेला आहे की, अशा प्रकारची तपासणीची आवश्यकता नाही. नाशिक प्रकल्पाच्या साठवण नोंदवहीत पूर्ण अंगणवाड्यांना सदरहू औषधांचा पुरवठा झालेला आहे अशी समितीला माहिती दिली.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, आपण यासोबतच करारनामा का केलेला नाही. करारनामा करणे आवश्यक आहे. त्यांनी वेळेत पुरवठा केला नसता तर आपण काय कारवाई करु शकला असता. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा. व स्व.) यांनी आर.सी. करारनामा केलेला नाही, परंतु वेळेत औषधांचा पुरवठा झालेला आहे तसेच कंपनीनेच औषधांची तपासणी करुन द्यावयाची आहे अशी समितीस माहिती दिली. महाराष्ट्र शासनाचे आलेले पत्र कृपया वाचून दाखवावे अशी समितीने विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) यांनी सह आयुक्त (कोकण विभाग), अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, चौथा माळा, राज्य कामगार विमा योजना रुग्णालय वागळे इस्टेट, ठाणे यांचे दिनांक ६/८/२०१० रोजीच्या पत्राचे वाचन करण्यात आले.

यावर समितीने असे निदेश दिले की, संबंधित विभागाने शासनाला दिलेले पत्र आणि शासनाने त्यावर दिलेले मार्गदर्शन या दोन्ही बाबींवर सचिवांची साक्ष घेण्यात येईल. तसेच एका गोळीची किंमत किती आहे याबाबत समितीने विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) यांनी १०० गोळ्यांचे एक पाकीट असून एका पाकिटाची किंमत १०० रुपये ८० पैसे आहे अशी माहिती समितीस दिली.तद्नंतर विभागाने दिलेले पत्र आणि शासनाकडून आलेले मार्गदर्शन या दोन्हीचा अहवाल समितीस सादर करावा असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्द्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) जिल्हा परिषद सेस निधीतून अंगणवाडी केंद्राना आर्यन टॅबलेटस अतिरिक्त आहार पुरवठा करण्याकरीता सन २००८-०९ या कालावधीमध्ये १०,९९,९२९/- एवढा खर्च करण्यात आला.परंतू या मध्ये फोलिक ॲसिड गोळ्यांचा पुरवठा करण्यापूर्वी नमूना प्राप्त करून घेतलेला नाही, पुरवठादाराबरोबर करारनामा करुन घेतलेला नाही, केंद्रीय मध्यवर्ती प्रयोगशाळेचा चाचणी अहवाल प्राप्त करून घेतलेला नाही, दरकराराची अधिकृत प्रत सादर न करणे,वाटप करतांना साठा नोंदवहीत दिनांक टाकलेला

नसल्यामुळे मुदतीत वाटप केले नसल्याचे आढळून येणे,६८२०० गोळया पैकी ४९९०० गोळयांची साठा नोंदवहीत नोंदच नसणे,अशा गंभीर बाबी समितीस आढळून आल्या आहेत.त्या संदर्भात शासनाने काही चौकशी केली आहे काय ?असल्यास त्यात काय आढळून आले आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणी केंद्रीय मध्यवर्ती प्रयोगशाळेकडून औषधांच्या दर्जाची तपासणी करण्याची आवश्यकता नसल्याचे वैद्यकीय शिक्षण विभागाचे अभिप्राय असल्याचे समितीस सांगण्यात आले आहे,या बाबत वैद्यकीय शिक्षण विभागाचे अभिप्राय काय आहेत.

(३) प्रस्तुत प्रकरणी केंद्रीय मध्यवर्ती प्रयोग शाळेकडून औषधांचा दर्जा तपासणी करण्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मार्गदर्शक सुचना काय आहेत.तसेच महिला व बालकल्याण विकास विभागाने या संदर्भात वैद्यकीय शिक्षण तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग यापैकी कोणत्या विभागाचे अभिप्राय घेणे आवश्यक होते, शासनाने या बाबत चौकशी केली आहे काय ?

(४) अहवाल वर्षात सुमारे ११ लक्ष एवढा निधी महिला व बालके यांच्या आरोग्यासाठी खर्च केलेला असून अशा योजना राबवण्यासंदर्भात महिला व बालविकास विभागाचे शासन निर्णय,मार्गदर्शन सुचना काय आहेत तसेच त्यांचे पालन प्रस्तुत प्रकरणात झाले आहे काय तसेच सदरचा निधी खर्च झाल्यानंतर ग्रामीण भागातील महिला व बालके यांच्या एकंदर आरोग्यात कोणती सुधारणा दिसून आली आहे ?

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) जिल्हा परिषद सेस निधीतून अंगणवाडी केंद्रांना आर्यन टॅबलेटस,फोलिक ॲसिड टॅबलेटस अतिरिक्त आहार पुरवठा करण्याकरीता सन २००८-०९ या कालावधी मध्ये रुपये १०,९९,९२९/- एवढा खर्च करण्यात आला.यामध्ये फोलिक ॲसिड गोळयांचा पुरवठा करण्यापूर्वी नमूना प्राप्त करून घेतलेला असून तसे प्रमाणपत्र सोबत सादर केलेले आहे.सदरची खरेदी ही शासनाने केलेल्या दरकरार धारक यांचे कडून केलेली असल्याने दरकरार करतांना शासनस्तरावर करारनामा केला जात असल्याने पुन्हा या विभागाने करारनामा केलेला नाही.सदर औषधांचे गुणवत्तेबाबत संबंधित उत्पादक कंपनीचे प्रयोगशाळेचा दाखला घेण्यात आलेला आहे.तसेच याबाबत अन्न व औषध प्रशासनास कळविले असता त्यांनी औषधाचा दर्जा योग्य राखण्यासाठी औषधाच्या प्रत्येक समुह क्रमाकांचे औषध नमुने उत्पादकाच्या प्रयोग शाळेत स्वतः विश्लेषण करण्याचे कायदयाच्या तरतुदीप्रमाणे बंधनकारक आहे. सदर बाब उत्पादकास दिलेल्या परवान्यावर तसे नमुद आहे.अन्न व औषध या प्रशासनाचे औषध निरिक्षक हे स्वतः Randomly बाजारातून शासकीय रूग्णालयातून व उत्पादित स्थळातून नमुने घेण्याची पध्दत प्रचलीत आहे.प्रत्येक परवानाधारक औषधे उत्पादकाकडील प्रत्येक समुहाचा नमुना प्रशासनाने चाचणीसाठी घेण्याचा व चाचणी अहवाल देण्याची तरतूद कायद्याप्रमाणे अपेक्षित नाही.दरकराराच्या मुळ प्रतीवरून उप मुख्य कार्यकारी अधिकारी (म.बा.क) यांनी प्रत साक्षांकित केलेली आहे.वाटप नोंदवहित दिनांक नमुद केलेला असून ६८२०० गोळयांचे पुर्णपणे वाटप केलेले असून प्रत सोबत सादर केलेली आहे.

(२) **औषधाच्या दर्जाबाबत आयुक्त,अन्न व औषध प्रशासनाचे अभिप्रायः-** औषधी व सौदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याखालील नियम १९४५ अंतर्गत संबंधित कंपनीची व त्यांचे प्रयोगशाळेची नोंदणी

झालेली असल्याने या अधिनियमामध्ये नमुद बाबींच्या अनुषंगाने शासनाच्या आरोग्य संचालनालयाकडून करण्यात येणा-या दरकरारात नमुद केलेप्रमाणे Inspection मध्ये Inspection By consingnee at destination अशी तरतुद आहे.तसेच या औषधीबाबत काही तक्रार असल्यास अशा तपासणी प्रयोगशाळेतुन करता येतील.प्रस्तुत प्रकरणी सर्व औषधी सुस्थितीत प्राप्त झालेल्या असून त्याचे वाटप देखील योग्य प्रकारे करण्यात आलेले असुन औषधाच्या दर्जाबाबत कोणतीही तक्रार आलेली नाही.

(३) औषधी व सौदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याखालील नियम १९४५ अंतर्गत संबंधित कंपनीची व त्यांच्या प्रयोगशाळेची नोंदणी झालेली असल्याने या अधिनियमामध्ये नमुद बाबींच्या अनुषंगाने शासनाच्या आरोग्य संचालनालयाकडून करण्यात येणा-या दरकरारात नमुद केलेप्रमाणे Inspection मध्ये Inspection by consigns at destination अशी तरतुद आहे.तसेच या औषधीबाबत काही तक्रार असल्यास अशा तपासणी प्रयोग शाळेतून करता येतील. प्रस्तुत प्रकरणी अन्न व औषध प्रशासनास कळविले असता त्यांनी औषधाचा दर्जा योग्य राखण्यासाठी औषधाच्या प्रत्येक समुह क्रमांकाचे औषध नमुने उत्पादकाच्या प्रयोगशाळेत स्वतः विश्लेषण करण्याचे कायदयाच्या तरतुदीप्रमाणे बंधनकारक आहे. सदर उत्पादकास दिलेल्या परवान्यावर तसे नमुद आहे.अन्न व औषध प्रशासनाचे औषध निरिक्षक हे स्वतः randomly बाजारातून शासकीय रूग्णालयातून

व उत्पादित स्थळातून नमुने घेण्याची पध्दत प्रचलित आहे.प्रत्येक परवानाधारक औषधे उत्पादकाकडील प्रत्येक समुहाचा नमुना प्रशासनाने चाचणीसाठी घेण्याचा व चाचणी अहवाल देण्याची तरतुद कायदयाप्रमाणे अपेक्षित नाही असे नमुद आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणी महिला व बाल कल्याण समितीने राबवावयाच्या योजनांचा शासन निर्णय हा ग्रामविकास विभागाने निर्गमित केलेला असून त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर Tablets खरेदी करण्यात आलेल्या आहेत.कुपोषित बालके, गरोदर माता व स्तनदा माता तसेच किशोरवयीन मुलींच्या आरोग्य संदर्भात एकात्मिक बाल विकास सेवा योजना,तसेच राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य व पोषण मिशन हे कामकाज करीत असतात त्यामुळे या लाभार्थ्यांच्या आरोग्य संदर्भात वेळोवेळी विभागाने मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या असून त्यांचे पालन प्रस्तुत प्रकरणात करण्यात आलेले आहे.त्यामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील महिला व बालके यांचे आरोग्यात सुधारणा होऊन कुपोषित बालकांचे प्रमाण तसेच ॲनिमियाचे प्रमाणात घट होणेस मदत झालेली आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय :-**

**महिला व बालकल्याण विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद नाशिक यांचे अभिप्रायाशी सहमत आहे.

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे अभिप्राय:-**आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई यांनी दिलेल्या अभिप्रयाशी सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नाशिक जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी जिल्हा परिषदेमध्ये महिला व बालकल्याण विभागासाठी १० टक्के निधी असतो. त्या निधीतून रुपये १०,९९,९२१/- इतक्या रकमेच्या आयर्न आणि फोलीक टॅबलेटस खरेदी करण्यात आल्या आहेत. जिल्हा परिषदेने या टॅबलेटसचे सॅम्पल ठेवले नाही अशा प्रकारचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. भेटीच्या वेळी ते दाखविण्यात आले नसले तरी प्रत्यक्षात सॅम्पल तेथे होते. त्याचा पुरावा देखील जिल्हा परिषदेकडे उपलब्ध आहे अशी माहिती समितीस दिली.

यावर समितीने अशी विचारणा केली की, त्यावेळी सॅम्पल दाखविले नसल्यामुळे हा मुद्दा उपस्थित झाला आहे. लेखा आक्षेपाच्या वेळी अभिलेख दाखविण्यात येत नाही म्हणून दंडात्मक कारवाई करण्यात येते. लेखा परिक्षणाचे वेळी सॅम्पल दाखविले असते तर हा मुद्दाच आला नसता.

यावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी विदित केले की, यामध्ये दुसरा मुद्दा असा आहे की, जी काही खरेदी केली आहे ती आर.सी.नुसार करण्यात आली आहे. आर.सी. हे शासन स्तरावर झालेले आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेने वेगळा करारनामा केलेला नाही. आर.सी.मध्ये ज्या अटी व शर्ती होत्या त्या आधारावर वर्क ऑर्डर प्लेस करण्यात आली आहे. वेगळा करारनामा केला नाही असा आक्षेप आहे. त्यांनी वेगळा करारनामा केला नाही ही बाब खरी आहे. कारण शासनाची आर.सी. असल्यामुळे त्या अटी व शर्तीवर खरेदी केलेली आहे. शासनाची आर.सी. असेल तर जिल्हा परिषद वेगळा करारनामा करीत नाही. बायसिकल खरेदीसह अन्य खरेदीसंबंधात शासनाची आर.सी. असेल तर वेगळा करारनामा करण्यात येत नाही. तसेच सचिव, ग्रामविकास विभाग यांनी आता आर.सी. बंद झाली आहे. आर.सी.मध्ये ज्या अटी व शर्ती असतात त्या बंधनकारक असतात. त्यामुळे आर.सी. असेल तर वेगळा करारनामा करण्याची गरज नाही. आता आर.सी.पध्दती बंद झाली आहे. आता जेमच्या मार्फत किंवा डायरेक्ट टेंडर काढून खरेदी करण्यात येते.

सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी जेव्हा मालाचा पुरवठा करण्यात आला तेव्हा कंत्राटराने शासकीय प्रयोगशाळेतून सेल्फ सर्टिफिकेशन करुन घेतलेले आहे. ते प्रमाणपत्र त्याने दिलेले आहे. जेव्हा जिल्हा परिषदेने माल घेतला तेव्हा त्यांनी स्वतंत्र चाचणी केलेली नाही असा आक्षेप आहे. त्यावेळी जिल्हा परिषदेची अशी धारणा होती की, कंत्राटदाराने सेल्फ सर्टिफिकेशन करुन दिलेले आहे. तक्रार असेल तर एफडीए मार्फत चौकशी करीत असता त्यांना जो माल उपलब्ध झालेला आहे त्याची तपासणी केलेली नाही. त्यांनी मालाचा जो पुरवठा केला आहे त्यांची नोंदवहीमध्ये नोंद नाही अशा प्रकारचा मुद्दा होता. त्यासंबंधातील पुरावा आमच्याकडे उपलब्ध आहे. ६०८२ पॅकेटसची नोंद करण्यात आलेली आहे अशी माहिती समितीस दिली.

या औषधांची चाचणी कोण करते याबाबत समितीने विचारणा केली असता सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी शासनाचा करारनामा असेल तर बॅच निहाय सेल्फ सर्टिफिकेशन द्यावे लागते. ते बॅच निहाय सेल्फ सर्टिफिकेशन जिल्हा

परिषदेकडे उपलब्ध आहे. जिल्हा परिषदेने स्वतंत्रपणे प्रयोगशाळेमध्ये माल पाठवून चाचणी केली नाही असा मुद्दा होता असे सुचित केले. यावर समितीने पुढे अशी विचारणा केले की, ती चाचणी करणे अनिवार्य होते काय.

यावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी असे विशद केले की, त्यांना तसे बंधनकारक नाही. नियमामध्ये तरतुद अशी आहे की, कोणी विषय उपस्थित केला किंवा तक्रार केली तर एफडीए मार्फत चाचणी करणे गरजेचे आहे. परंतु, त्यावेळी असा विषय निर्माण झाला नाही म्हणून सॅम्पल घेऊन एफडीए मार्फत चाचणी करण्यात आलेली नाही.

## अभिप्राय व शिफारशी

सन २००८-०९ या वित्तीय वर्षात जिल्हा परिषदेच्या उपकर निधीतून अंगणवाडींना आयर्न टॅबलेट/फॉलिक ॲसिड टॅबलेटचा अतिरिक्त आहार पुरवठ्यासाठी रुपये १०,९९,९२९/- इतकी रक्कम खर्च केल्याने त्याबाबत आक्षेप घेण्यात आले होते. त्यानुसार प्रकल्प, नाशिक यांना पुरवठा केलेल्या ६८,००० टॅबलेटपैकी ४९,९०० टॅबलेट्सची नोंदवहीत नोंद नसल्याचे लेखा परिक्षणाचे वेळी दिसून आले असे समितीच्या निदर्शनास आणून दिले असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) यांनी सह आयुक्त (कोकण विभाग), अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, चौथा माळा, राज्य कामगार विमा योजना रुग्णालय वागळे इस्टेट, ठाणे यांना दिनांक ६/८/२०१० रोजीच्या पत्रान्वये लेखी कळविले होते. औषधी व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याखालील नियम १९४५ अंतर्गत औषधांचा दर्जा योग्य राखण्यासाठी कायद्याच्या तरतुदीप्रमाणे बंधनकारक असल्याचे नाशिक जिल्हा परिषदेने खुलासा केलेला आहे.

(१) नाशिक प्रकल्पाच्या साठवण नोंदवहीत पूर्ण अंगणवाड्यांना सदरहू औषधांचा पुरवठा करण्यात येणे, (२) आर.सी. करारनामा न करणे (३) सह आयुक्त (कोकण विभाग), अन्न व औषध प्रशासन, ठाणे यांनी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) नाशिक यांना कळविले (४) १०० गोळ्यांचे १ पाकीट असून एका पाकीटाची किंमत १८० रुपये ८० पैसे असणे (५) शासन स्तरावर विभागाने पुन्हा करारनामा केलेला नसणे ६) औषधाचा दर्जा योग्य राखण्यासाठी आरोग्य संचालनालयाकडून समुह क्रमांकाचे औषध नमुने उत्पादकाच्या प्रयोगशाळेत स्वतः विश्लेषण करण्याचे कायद्याच्या तरतुदीप्रमाणे बंधनकारक असणे (७) ग्रामीण व आदिवासी भागातील महिला व बालके यांचे आरोग्यात सुधारणा होऊन कुपोषित बालकांचे प्रमाण तसेच ॲनिमियाचे प्रमाण घटविले आहे.

जिल्हा परिषदेमध्ये महिला व बालकल्याण विभागासाठी १०% निधीतून औषधे खरेदी करण्यात आलेली आहेत. भेटीच्या वेळी औषधांचे नमुने प्रत्यक्षात न दाखविल्यामुळे हा मुद्दा उपस्थित झाला होता. परंतु नमुने तेथे उपलब्ध होते असे सचिव, महिला व बालकल्याण विभाग यांनी समितीस सांगितले. शासनाची आर.सी. असल्यामुळे त्या अटी व शर्तींवर खरेदी केलेली आहे. त्या आधारावरच कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. वेगळा करारनामा केलेला नाही असे सचिव, महिला व बालकल्याण विभाग यांनी समितीस माहिती दिली. आता आर.सी. पध्दत बंद झालेली असून जेमच्या मार्फत थेट निविदा काढून खरेदी करण्यात येत असल्याची माहिती सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस दिली. जिल्हा परिषदेने माल खरेदी केला त्यावेळेस कंत्राटदाराने शासकीय प्रयोगशाळेतून स्वतंत्र चाचणी करुन घेतलेली नाही. नोंदवहीत उल्लेख नाही अशा प्रकारचा मुद्दा उपस्थित झाला आहे.

सन २००८-०९ या वित्तीय वर्षात जिल्हा परिषद उपकर निधीतून अंगणवाडींना आयर्न टॅबलेट/फोलिक ॲसिड टॅबलेट्स या अतिरिक्त आहार पुरवठा करण्यासाठी रुपये १०,९९,९२९/- इतक्या रक्कमेचा खर्च करण्यात आला. महिला व बालकल्याण विभागासाठी १०% निधी राखीव असतो. समितीच्या भेटीच्या वेळी औषधे व गोळ्यांचे नमुने पुराव्यासाठी दाखविण्यात आले नसल्याने समितीने नाराजी व्यक्त करुन लेखा आक्षेपात अभिलेखे दाखविण्यात येत नसल्यामुळे महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार दंडात्मक कारवाई करण्यात यावी. अन्न व औषध प्रशासनामार्फत चौकशी करीता उपलब्ध झालेल्या साहित्याची तपासणी केलेली नव्हती. औषधाचा दर्जा योग्य राखण्यासाठी प्रत्येक समुह क्रमांकाचे औषध नमुने उत्पादकाच्या प्रयोगशाळेत स्वतः विश्लेषण करण्याचे कायद्याच्या तरतुदीप्रमाणे बंधनकारक आहे.

**सबब, कुपोषित बालके, गरोदर माता व स्तनदा माता तसेच किशोरवयीन मुलींच्या आरोग्य संदर्भात एकात्मिक बाल विकास सेवा योजना व राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य व पोषण मिशन हे लाभार्थ्यांसाठी ग्रामीण व आदिवासी भागातील महिला व बालके यांचे आरोग्यात सुधारणा होण्यासाठी काम करतात. त्यानुसार कुपोषित बालकांचे प्रमाण तसेच ॲनिमियाचे प्रमाणात घट झाल्याने समिती समाधान व्यक्त करते.**

## प्रकरण अठरा

## जिल्हा परिषद, नाशिक

## लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करणेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.७८/११ :- शालेय पोषण आहार शिजवणे खर्चाबाबत (सन २०११-१२)**

शालेय पोषण आहार शिजविणेकरिता पंचायत समिती दिंडोरीने रक्कम रुपये १,३४,३४३/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

महाराष्ट्र शासन, शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. ५-प्रशा /१०९५/२१३४/प्रा.शि-२/दिनांक २२/११/१९९५ नुसार इयत्ता १ ली ते ५ वी तील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजना लागू करण्यात आलेली आहे. शिक्षण उपसंचालक प्राथमिक यांचे पत्र क्र ३१/०५/२००७ नुसार घेतलेला आहे. शासन निर्णय क्र पंरास/-१०८५/५/५८७/२३ दिनांक ०३/१२/१९८५ नुसार उर्वरीत अखर्चित रक्कम रुपये ३३,१५७/- बाबत कार्यवाही केलेली नाही. प्रत्येक मुलास २०० दिवस शिजविलेला तांदुळ देणे, उपस्थितीचे आवश्यक प्रमाण ८० %, वाटपाचा हिशोब व रोखवही ठेवणे आवश्यक आहे. हिशोब पडताळणीचे काम शिक्षण विभागाने अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे पत्र क्र. शापोआ/प्र.क्र.४८५/नाप१७/ दिनांक ०६/०५/२००३ नुसार करावयाचे आहे. लेखे पडताळणी बाबत अभिलेखे उपलब्ध झालेले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

शालेय पोषण आहार योजनेतर्गत पंचायत समितीस रू.१,३४,४२,५००/- अनुदान प्राप्त झाले आहे. त्यापैकी रक्कम रु.१,३४,०९,३४३/- इतका खर्च केलेला असून उर्वरीत रक्कम ३३,१५७/- अखर्चित आहे.

पंचायत समितीने सन २०११/१२ मध्ये जिल्हा परिषदेकडील लेखा विभाग यांचेकडे धनादेश क्र.०२०७१७ दि.३१/१०/२०१२ अन्वये वित्त प्रेषण राज्यहिस्सा रू. १००२२/- केंद्रहिस्सा रू. २९,५५८/- असे एकत्रित रू.३९,५८०/- जमा करण्यात आलेले आहे. सदरच्या जमा केलेल्या रकमेत अखर्चित रक्कम रु, ३३,१५७/- चा समावेश आहे.

इयत्ता १ ली ते ५ वी च्या पात्र शाळेतील प्रत्येक मुलास २०० दिवस आहार देण्यात आलेला आहे. प्राप्त तांदुळ व धान्यादी मालाची नोंद  ठेवण्यासाठी शाळास्तरावर तांदुळ व धान्यादी मालाची नोंदवही, रोख नोंदवही विहित कार्यपध्दतीप्रमाणे ठेवण्यात आलेली आहे. अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे पत्र क्रं शापोआ/प्र.क्र. ४८५/नाप१७/दि. ६/५/२००३ नुसार तांदुळ वाटपाच्या हिशोब पडताळणीचे काम शिक्षण विभागाने केलेले आहे. शाळाभेटी दरम्यान गटशिक्षणाधिकारी, अधीक्षक, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख यांनी तांदुळ वाटप पडताळणी व लेखे पडताळणी केलेली आहे. पडताळणी अहवाल/उपयोगिता प्रमाणपत्र कार्यालयात उपलब्ध आहेत. यास्तव शाळा भेट प्रपत्र, शेरे पुस्तकात दिलेले शेरे, वार्षिक तपासणीच्या वेळी केलेल्या नोंदी व रक्कम अदा केल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र इ. सोबत सादर केले आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे सादर केलेला खुलासा मान्य होवून परिच्छेद स्विकृत व्हावा ही विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.७९ :-  विज्ञान प्रयोगशाळा स्थापन करणेबाबतचे खर्चाबाबत (सन २०११-१२)**

सदर योजनेवर पंचायत समिती दिंडोरीने जिल्हा परिषद नाशिक प्राथमिक शाळा वाघाड यांना रक्कम रुपये २,००,०००/- अदा केलेले आहेत. प्रमाणक क्रमांक ८४ दिनांक २७/३/२०१२ अन्वये यावर खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) संबंधित शाळेच्या खातेवर दिनांक २३/४/२०१२ रोजी रक्कम जमा झालेली आहे. सन २०११-१२ मध्ये रक्कम खर्च होणे आवश्यक असतांना रक्कम पुढील वर्षात खर्च केलेली आहे. अखर्चित रक्कम रुपये ३५,४४२/- चा विनियोग करुन खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरिक्षणास सादर करणे आवश्यक आहे.

(२) शिक्षण अधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद नाशिक यांचेकडील पत्र क्रं.शिक्षण/प्राथ/लेखा२/९१/१२ दिनांक २३/२/२०१२ नुसार साहित्याची खरेदी महाराष्ट्र स्टेट कंझुमर्स फेडरेशन लि.मुंबई यांचेकडून खरेदी करावी. परंतु विज्ञान प्रयोगशाळा स्थापन करणेकामी लागणा-या साहित्याची मागणी पत्र तपासणीस प्राप्त झालेले नाही.

(३) महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शा.नि.क्र.भाखंसङ१०८८/८५१२/उद्योग-६ दिनांक २/१/२९९२ नुसार वार्षिक खरेदी रुपये ५०,०००/- किंवा त्यापेक्षा अधिक असेल अशा वेळी राजपत्रात प्रसिद्धी करणे आवश्यक आहे.

त्याप्रमाणे अंमलबजावणी झालेली नाही. तसेच पुरवठादाराकडून करारनामा केल्याचे दिसून येत नाही. पुरवठादाराकडून साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त केलेला नाही. पुरवठादाराकडून अनामत ठेव जमा केलेली नाही.

(४) उपरोक्त शासन निर्णयानुसार साहित्य पुरवठा झाल्यानंतर मुख्याध्यापक, गट शिक्षणाधिकारी, गटविकास अधिकारी यांची परिच्छेद ८.६ अ ब क ड प्रमाणे प्रमाणपत्र दिलेले नाही. साठा नोंदवही नमुना नं.३३ तपासणीस प्राप्त झालेला नाही. पुरवठादाराने साहित्य केव्हा पुरविले यांचा दिनांक नमुद केल्याचे दिसून येत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

जिल्हाधिकारी यांचेकडील आदेश क्र.जिनिस/क१२/संस-४/१७८/५/११ दिनांक २४/६/२०११ नुसार व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.नाशिक यांचेकडील आदेश क्र.शिक्षण/प्रा.लेखा/२/३९३/२०११ दिनांक २९/११/२०११ अन्वये रु.१,००,०००/- इतकी रक्कम वितरीत करण्यात आलेली आहे.

(१) विज्ञान प्रयोगशाळा स्थापन करणे या योजनेसाठीचे अनुदानाचा खर्चाचा धनादेश पंचायत समिती स्तरावरुन दिनांक ३१/३/२०१२ रोजी शाळेला प्रत्यक्ष प्राप्त झाला आहे. धनादेश बँकेमध्ये शाळेच्या खात्यावर जमा केल्यानंतर बँकेकडून दिनांक २३/४/२०१२ रोजी प्रत्यक्ष खात्यावर रक्कम जमा झाली आहे. त्यामुळे साहित्य खरेदीबाबतची प्रक्रिया पुढील वर्षात सन २०१२-१३ मध्ये झालेली आहे.

प्राप्त झालेल्या अनुदानातून दिनांक २६/७/२०१२ रोजी महाराष्ट्र स्टेट को.ऑप. कन्झुमर्स फेडरेशन लि. अपना भांडार नाशिक यांचेकडून रु.६४,५५८/- ची वैज्ञानिक उपकरणे खरेदी केली आहे. उर्वरित अखर्चीत रक्कम रुपये ३५,४४२/- चा विनियोग करण्यात आला आहे. सदर रकमेतून विज्ञान प्रयोगशाळेच्या भौतिक सुविधेसाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यात आलेले आहेत. सोबत अनुदान खर्चाच्या प्रमाणकांच्या सत्यप्रती जोडल्या आहेत. संपूर्ण अनुदान रु.१,००,०००/- चा विनियोग केलेबाबतचे मुख्याध्यापक, गटशिक्षण अधिकारी व गट विकास अधिकारी, यांच्या स्वाक्षरीचे उपयोगिता प्रमाणपत्र सोबत सादर केले आहे.

(२) मा.शिक्षण अधिकारी (प्राथ) जि.प.नाशिक यांचेकडील पत्र क्रं.शिक्षण/प्राथ/लेखा-२/९९/१२ दिनांक २३/२/२०१२ नुसार साहित्याची खरेदी महाराष्ट्र स्टेट कंझुमर्स फेडरेशन लि.अपना भांडार, रविवार कारंजा, नाशिक यांचेकडून करण्यात आलेली आहे. त्यानुसार विज्ञान प्रयोगशाळा स्थापन करणेकामी लागणा-या साहित्याची मागणी जा.क्र.४९/दिनांक २५/५/२०१२ अन्वये केलेली आहे.

(३) महाराष्ट्र स्टेट को ऑफ कन्झुमर्स फेडरेशन लि.यांचेकडून साहित्य खरेदी केलेले असल्याने करारनामा करण्यात आला नसून अनामत रक्कम घेण्यात आलेली नाही. साहित्य खरेदीचा धनादेश पुरवठादाराने शालेय स्तरावर साहित्य पोहोच केल्यानंतर पुरवठादारास धनादेश देण्यात आलेला आहे.

(४) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग शा.नि.क्र.भारवस-१०८८/(२५१२)/उद्योग-६ दिनांक २/१/१९९२ अन्वये परिशिष्ट ८.६ (अ) (ब) (क) (ड) अन्वये मुख्याध्यापक गटशिक्षण अधिकारी व गटविकास अधिकारी यांचे स्वाक्षरीचे साहित्य सुस्थितीत मिळाल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केले आहे. साहित्य प्राप्त झालेनंतर त्याची नोंद साठा नोंदवही नमुना नं.३३ मध्ये घेण्यात आली असून ती लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली होती. लेखापरिक्षकांनी नोंदवही तपासणेबाबत त्यावर स्वाक्षरी केलेली आहे. सदर नोंदवहीची सत्यप्रत सोबत सादर केली आहे. पुरवठादाराने विज्ञान प्रयोग साहित्य दिनांक २६/७/२०१२ रोजी शाळेत पोहोच केलेले आहे. व भौतिक सुविधांसाठीचे साहित्य दिनांक १/९/२०१२ ते ३०/११/२०१२ या कालावधीत शाळेस पुरवठा केले आहे. तशी नोंद साठा नोंदवहीत घेण्यात आली आहे. संबंधीत पुरवठा दारास सुधारीत पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही. खर्चाची प्रमाणके व उपयोगिता प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे यांच्या सत्यप्रती सोबत अवलोकनार्थ सादर केली आहेत.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.८२ :- प्राथमिक शिक्षकांना वरिष्ठ श्रेणीबाबत (सन २०११-१२)**

पंचायत समिती त्र्यंबकेश्वरचे शिक्षण विभागातील शिक्षकांना वरीष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देऊन फरक अदा केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) अ.क्र.जिल्हा परिषद नाशिक यांचे आदेश क्र.शिक्षण/प्राथ-३/१०३/११ दिनांक ९/२/२०११ नुसार तानाजी यशवंत कोरडे प्राथमिक शिक्षक यांचे मंजूर यादीत नाव समाविष्ट नसल्याने रुपये १,४५,४७१/- अदा केली. रक्कम अदा झाल्याबाबत कागदपत्रे उपलब्ध नाही.

(२) अ.क्र.२ दिनांक २९/१/२००८ पासून वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर असून माहे १/०६ ते ३/२०११ या कालावधीचे फरक अदा केला आहे. दिनांक १/०६ ते २८/१/२००८ या कालावधीची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

(३) अ.क्र.४ संदर्भात पाचवे वेतन आयोग फरक दिनांक १/७/२००२ ते ६/१/२००५ या कालावधीची रक्कम यापुर्वी अदा न केले बाबत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(४) अ.क्र.८ संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांचे परिपत्रक क्र.जिपना/अर्थ/आ-२/१४७/११ दिनांक ७/३/२०११ अन्वये सप्टेंबर, २००९ पासून रोख रक्कम अदा करावी असे असल्याने फरकाची रक्कम रुपये २९,५५८/- वसुली करणे आवश्यक आहे.

(५) अ.क्र.११, १२ मधिल क्रं. १,७,८ यांना वरिष्ठ वेतनश्रेणी दिनांक ३०/११/२००८ दिनांक २/१२/२००४ दिनांक २९/११/२००८ पासून मंजूर असताना माहे ७/०२ ते ११/०६ या कालावधीचे फरकाची रक्कम रुपये ८,५६१/- वसुल करणे आवश्यक आहे.

(६) अ.क्र.१२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे शिक्षकांची नावे समाविष्ट नसतांना कशाच्या आधारे रक्कम अदा केली याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

(७) अ.क्र.१४,१५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे एकस्तर वेतन फरक माहे ०७/०३ ते ११/०६ या कालावधीचा फरक अदा केला आहे. त्यांना यापूर्वी अदा न केल्याबाबत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन ग्रामविकास शासन निर्णय क्र.डीएमआर-२४९/२१२६/प्र.क्र.५२७/१८ दिनांक ४/४/१९९० मधील मुद्दा क्रमांक ८ प्रमाणे वेतननिश्चिती पडताळणी मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे कार्यालयाकडून पडताळणीअंती लाभ देणे बाबतची कार्यवाही केलेली नाही.

(८) अ.क्र.१७ नुसार दिनांक ७/३/०११ अन्वये सप्टेंबर, २००९ पासुन रोख अदा करावे असे नमुद असतांना माहे १०/२००८ ते ऑगस्ट, २००९ या कालावधीची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

(९) अ.क्र.१८ संदर्भात मंजुरीचे आदेश दप्तरी नाहीत सेवापुस्तके अर्धसमास पत्राद्वारे मागणी करुनही तपासणीस सादर केल्याचे दिसुन आले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

**अ.क्र.१**

श्री.तानाजी यशवंत कोरडे प्राथमिक शिक्षक यांनी ईगतपुरी गटात असतांना वरिष्ठ वेतनश्रेणी मंजुर करण्यात आलेली होती. तद्नंतर त्यांची बदली त्र्यंबकेश्वर गटात झाल्याने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.नाशिक यांचेकडील चटोपाध्याय मंजुर आदेश क्रमांक शिक्षण/प्राथ/३/९४/११ दिनांक ९/२/२०११ च्या आदेशाची व ईगतपुरी गटातील ना-देय दाखला वेतननिश्चिती आदेशाची छायांकित प्रत समवेत सादर करण्यात आली आहे.

**अ.क्र.२**

श्री.अंकुश गणपत कांबळे प्रा.शि.यांचे वरिष्ठ वेतनश्रेणी मंजुरी बाबत माहे १/०६ ते ३/२०११ या कालावधीतील रक्कम वसुल करणेत आलेली असून चलनाची छायांकित प्रत समवेत सादर करणेत आलेली आहे.

**अ.क्र.३**

श्री.सतिश वसंतराव अहिरे प्राथमिक शिक्षक यांचा पाचवे वेतन आयोगाचा दिनांक १/७/२००२ ते ६/१/२००५ पावेतोचा फरक रुपये १५,६५७/- संबंधितांचे वारसाकडुन वसुल करण्यात आलेला असुन समवेत धनादेश व चलनाची छायांकित प्रत जोडण्यात आलेली आहे.

अ.क्र.४

श्री.किशोर हरिभाऊ गिते प्रा.शि.व श्रीमती अंजली अ.दावभट प्रा.शि.यांचेकडून जादा रक्कम रुपये २९,५५८/- वसुली करण्यात आलेली असुन चलनाची प्रत समवेत सादर करण्यात आलेली आहे.

अ.क्र.५

श्रीमती वैशाली चंद्रकांत पंडीत, श्रीमती अपर्णा शिवाजी वाबळे, श्री.धनंजय भिला शिंदे, श्री.चंद्रकांत शिवदास ठाकरे प्राथमिक शिक्षक यांचेकडून वसुली पात्र रक्कम भरणा करण्यात आला असून चलनाची प्रत समवेत जोडण्यात आलेली आहे.

अ.क्र.६

श्री.अंकुश गणपत कांबळे प्रा.शि, राजाराम हरी मंडलीक, प्रा.शि, रविंद्र शंकर देवरे प्रा.शिक्षकांची वरिष्ठ वेतनश्रेणी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.नाशिक यांचेकडील आदेश क्रमांक शिक्षण/प्राथ/:/१०३/११ दिनांक ९/२/२०११ च्या मंजुरीचे आदेश समवेत छायांकित प्रती सादर करण्यात आलेले आहेत.

अ.क्र.७

१४,१५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे १ ते २९ प्राथमिक शिक्षक यांना माहे ०७/०३ ते ११/०६ या कालावधीतील फरक यापुर्वी अदा न केले बाबतचे प्रमाणपत्र समवेत सादर करण्यात येत आहे. तसेच सदर प्रा.शि.याचे मुळसेवापुस्तक मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.नाशिक यांचेकडील वेतनपडताळणी पथकाकडून पडताळणी करण्यात आली असून मा.लेखाधिकारी यांचे पडताळणी दाखल्याच्या सेवापुस्तकाची नोदींची छायांकित प्रत समवेत सादर करण्यात येत आहे.

अ.क्र.८

श्रीमती मंगला प्रेमनाथ ब्राम्हणकर प्रा.शि.यांचेकडून एकस्तर अतिप्रदान फरक रक्कम रुपये ९,९७३/- वसुल करण्यात आलेली असुन चलनाची प्रत समवेत सादर करण्यात आलेली आहे.

अ.क्र.९

लेखा परिक्षण कालावधीत लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कार्यवाही झालेली होती तसेच सदर दप्तर जमा करण्यात आलेले असल्याने तपासणी कामी दप्तर सादर करण्यात आलेले असल्याने तपासणी कामी दप्तर सादर करण्यात आलेले नव्हते. मा.मु.का.अ.जि.प.नाशिक यांचेकडील मंजुर आदेश क्रमांक शिक्षण/प्राथ/३/१०३/२०११ दिनांक ०९/२/२०११ ची व गटविकास अधिकारी पं.स.त्र्यंबकेश्वर यांनी मंजुर केलेली मुळ नस्तीची छायांकित प्रत समवेत सादर करण्यात येत आहेत. तरी कृपया परिच्छेद स्विकृत होणेस विनंती आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक३.२०३ :- एकात्मिक बालविकास योजनांतर्गत अंगणवाडी बांधकामावरील अनियमितता (सन २०११-१२)**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे पत्र क्र.एबाविसेयो/विअसां/१०५२/१० दिनांक १३/१२/२०१० अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेल्या एकुण ११७ अंगणवाडी बांधकामांवरील खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) पिंपळगांव बसवंत माळीनगर, भाऊनगर व कोळीवाडा या ठिकाणच्या अंगणवाडी कामांसाठी एकाच अंगणवाडी इमारतीचे फोटो आणि बांधकामाचे फलकाचे फोटो वापरण्यात आल्याचे आढळून आले.

(२) फुलेनगर, चांदवड येथे अंगणवाडी संदर्भात मोजमाप नोंदवही क्र.८७२ पृष्ठ क्र.६० मधील जादा परिमाणासाठी जादा प्रदान रक्कम रुपये ३९४/- वसुल होणे आवश्यक आहे.

(३) अंदरसूल मधारवाडी येथील कामासंदर्भात दिनांक ८/२/२००७ रोजी खरेदी केलेला मुद्रांक दिनांक २६/११/२०११ रोजी वापरुन करारनामा केलेला आहे. मुद्रांक अधिनियमाचे कलम ५२(३) नुसार मुद्रांकाची वैधता खरेदी दिनांकानंतर सहा महिनेपर्यंतच असल्याने संबंधित ठेकेदाराकडून रुपये १००/- वसूल करणे आवश्यक आहे.

(४) जळगांव नेऊर ता.येवला येथील अंगणवाडी बांधकाम मोजमाप परिमाणासाठी जादा प्रदान रक्कम रुपये ७,०९९/- वसूल होणे आवश्यक आहे.

सदर कामासाठी वापरलेल्या सिमेंट क्युब चाचणी अहवालानुसार एम-१५ चे सिमेंट वापरलेले आहे. तथापि मोजमाप नोंदवही व दर पृथःकरणामध्ये एम २० च्या दराने सिमेंट वापरल्याची नोंद आहे. त्यामुळे एम २० च्या दराने प्रदान केल्याने रक्कम रुपये ७,६४८/- चे जादा प्रदान वसुल करणे आवश्यक आहे.

(५) लोढरे ठाकरवाडी तालुका नांदगाव सिमेंट चाचणी अहवालानुसार एम-१५ दर्जाचे सिमेंट वापरलेले असतांना मोजमाप नोंदवही आणि दर पृथ्थकरण मध्ये एम-२० दर्जाचे सिमेंट वापरल्याचे दर्शवून व एम-२० च्या दराने प्रदान करुन रक्कम रु.८,१२३/- चे जादा प्रदान केले आहे. ते वसूल करणे आवश्यक आहे.

(६) तळेगांव रोही, बजरंग नगर तालुका चांदवड या कामाची मोजमाप नोंदवही क्र.९२४४ तपासणीस उपलब्ध झाली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) पिंपळगांव (ब) माळीनगर, भाऊनगर व कोळीवाडा येथील अंगणवाडी बांधकामांच्या जागेवर जाऊन प्रत्यक्ष काढलेली वेगवेगळी छायाचित्रे संबंधीत नस्ती सोबत सादर केले आहेत. तरी खुलासा स्विकृत होणेस विनंती आहे.

(२) चांदवड फुलेनगर येथे अंगणवाडी बांधणे या कामावर जादा प्रदान झाली असून ती रक्कम रु.३९४/- वसूल करण्यात आली असुन चलनाची प्रत सोबत जोडली आहे.

(३) अंदरसूल मधारवाडी येथे अंगणवाडीच्या कामावरील मुद्रांकांची वैधता संपल्यानंतर करारनामा केला असल्याने संबंधीतांकडून रु.१००/- वसूल केले आहे. सोबत चलन जोडले आहे.

(४) जळगांवनेऊर ता.येवला अंगणवाडीच्या कामाची जादा प्रदान रक्कम रु.७,०९९/- वसुल करण्यात आली असून चलनाची प्रत सोबत जोडली आहे. तसेच अंदाजपत्रकासोबत खदान नकाशा नस्ती सोबत जोडले आहे. सदर कामावर मक्तेदाराने एम २० ग्रेडचे क्रॅांक्रीट वापरले आहे. व त्या सोबत उपअभियंता प्रधानमंत्री ग्रामसडक योजना जिल्हा प्रयोग शाळा नाशिक यांचा दिनांक १५/३/२०१२ एम २० चाचणी अहवाल क्युबचे टेस्ट रिपोर्ट देयकासोबत जोडला आहे.

(५) लोंढरे ठाकरवाडी ता.नांदगांव येथील अंगणवाडी इमारत बांधकामावर वापरलेल्या सिमेंटची चाचणी अहवाल जॉब क्र.एनएसके.११/८/०७८ दिनांक २/९/२०११ मध्ये एक १५ चे सिमेंट वापरल्याचे नमुद केले आहे. सदर कामाचे दर पृथःकरणात व मोजमाप नोंदवहीत एम २० चे सिमेंट कॉंक्रीट वापरलेले दर्शविण्यात आले आहे. त्यामुळे संबंधीत ठेकेदार यांना सिमेंटचे सर्व कामासाठी रु.८,१२३/- चे जादा प्रदान झाले आहे. जादा प्रदानाची रक्कम संबंधीतांकडून वसूल करण्यात आली आहे. सोबत चलनाची झेरॉक्स प्रत जोडली आहे.

(६) सदरच्या कामाची मोजमाप पुस्तिका क्रमांक ९२४४ तपासणी वेळी उपलब्ध करुन देता आली नाही. तथापि आता सदर मोजमाप पुस्तिका उपलब्ध आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.२०५ :- १३ वा वित्त आयोगांतर्गत केलेल्या बांधकामाबाबत (सन २०११-१२)**

१३ वा वित्त आयोगांतर्गत केलेल्या बांधकामा संदर्भात खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक १३२ नुसार तांत्रिक अधिकारी यांनी कामाचे स्थळ निरीक्षण करुन प्रथम पाहणी अहवाल व प्रस्तावित कामाचे चिन्हांकित नकाशे कामाच्या नस्ती सोबत जोडलेले नाहीत.

(२) महाराष्ट्र बांधकाम नियमावली २९६(२) फेब्रुवारी व मार्च महिन्यात कामाचे आदेश निर्गमित करण्यात प्रतिबंध असताना दिनांक १५/२/२००७ रोजी कार्यारंभ आदेश निर्गमित केलेला आहे.

(३) अंदाजपत्रकासोबत क्वॉरी चार्ट जोडण्यात आलेली नाही. १३६(१) नुसार आणि अधिनियमाचे कलम १२४ नुसार ग्रामपंचायत आणि मजूर सहकारी संस्था यांना प्राधान्य द्यावयाचे आहे. मात्र ग्रामपंचायत काम करण्यास सहमत नसल्याच्या ठरावाची प्रत नव्हती सोबत नाही.

(४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ नियम ग्रामपंचायत आणि मजुर सहकारी संस्था यांना प्राधान्य नसल्याच्या ठरावाची प्रत नस्ती सोबत नाही.

(५) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास१०९८/प्र.क्र.२९/९८/शासन हमी, दिनांक १९/८/१९९८ व ग्रामविकास विभाग परिपत्रक क्रमांक जिप-२/२०००/प्र.क्र. ८३७/पंरा-८(३५) दिनांक ३०/७/२००२ तसेच विमा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. प्रविनि/१/२८०१/सीआर/जि.प./संकिर्ण, दिनांक ३०/७/२००२ नुसार काम सुरू करण्यापुर्वी कंत्राटदाराने कामाचा आणि कामावरील मजुरांचा विमा उतरविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही न करता १ टक्का दराने विम्याची रक्कम कपात केली आहे.

(६) महाराष्ट्र, शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग नियम पुस्तिका १९८८ चे परि.क्र. २४(१३) तसेच लेखा संहिता नियम १८०(३) नुसार देयक मंजुर करतांना मोजमाप पुस्तिकेतील संबंधित नोंदींवर लाल शाईने काट मारण्यात यावी व मोजमाप पुस्तिका आणि देयक यावर प्रमाणक क्रमांक, दिनांक व प्रदान रक्कम यांचा तपशिल लिहीणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

(७) रेडगाव ते गोरठाण रस्ता या कामाची नस्ती, मोजमाप पुस्तिका क्र.५४४ मागणी करुनही उपलब्ध करुन दिली नाही.

(८) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र.झेडपीए/२०००/प्र.क्र.४/३३/दिनांक २२/१२/२००० नुसार काम पुर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक असतांना आणि एका कामासाठी एकच मोजमाप पुस्तिका वापरणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

(९) सदर काम संदर्भात सोशल वेलफेअर ची १ टक्का रक्कम आणि रॉयल्टीची रक्कम वसुल केलेली नाही कामावरील माहिती फलक आणि फोटो साठी प्रदान खर्च वसुल करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) तांत्रिक अधिकारी यांचा प्रथम पहाणी अहवाल सोबत सादर करण्यात येत आहे. तथापि कामे दुरूस्ती स्वरुपाची असल्याने चिन्हांकित नकाशे तयार केलेले नाहीत. शा.अ.यांनी सविस्तर सर्वेक्षण करुनच अंदाजपत्रक तयार केली असल्याने तरतुदी योग्य आहेत. त्यास तांत्रिक मान्यता सक्षम स्तरावर झालेली असल्याने सदर मुद्याचे अनुपालन स्विकृत होणेस विनंती.

(२) उपलब्ध निधी हा मार्च अखेर खर्च होणे अपेक्षित होते, अन्यथा निधी प्रत्यर्पित (Surrender) होणार असल्याने कार्यारंभ आदेश मार्च मध्ये निर्गमित करण्यात आले. यात शासकीय कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही. तरी सदर मुद्याचे अनुपालन स्विकृत होणेस विनंती.

(३) लेखापरिक्षणाच्या वेळेस सादर केलेल्या अंदाजपत्रकात अनावधानाने क्वारी चार्ट जोडलेला नव्हता तथापि दुस-या प्रतीत हा चार्ट उपलब्ध होता. तो आता सादर करण्यात येत आहे. तरी सदरचा मुद्याचे अनुपालन स्विकृत होणेस विनंती.

(४) सदरचे २३ कामांपैकी २ काम हे ग्रामपंचायतीस व उर्वरीत मजूर सह.संस्था यांना देण्यात आले आहेत. तरी सदरच्या मुद्याचे अनुपालन स्विकृत होणेस विनंती. (सोबत ग्रामपंचायत काम करण्यास सहमत नसल्याबाबतचे दाखले जोडलेले आहेत.)

(५) सदरची १ टक्का विमा रक्कम ही कपात केली आहे. यापुढे कामे सुरु करतांना कामगारांचा विमा उतरवून त्याची प्रत जिल्हा परिषदेकडे सादर करण्याबाबत कंत्राटदारांकडून पुर्तता करुन घेण्यात येईल तरी सदरच्या मुद्याचे अनुपालन स्विकृत होणेस विनंती.

(६) मापपुस्तिकेत लाल शाईने काट मारणे तसेच प्रतिसंदर्भ, प्रमाणक क्रमांक व दिनांक नमुद करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच फॉर्म नं.६५ हा साक्षांकीत करण्यात आला आहे. सदरच्या मुद्याचे अनुपालन स्विकृत होणेस विनंती.

(७) सदरच्या कामाची नस्ती व मोजमाप पुस्तिका क्र.५४४ ही सन ११-१२ च्या लेखापरिक्षणात दाखविली नव्हती. त्याबाबत तत्कालीन परिरक्षक यांचेवर रु.२५०००/- (अक्षरी रक्कम रुपये पंचवीस हजार मात्र) दंडात्मक कार्यवाहीचा प्रस्ताव विभागीय कार्यालयाने म.मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक ह्यांचेकडे सादर केला असून सदर कामाचे स्थानिक निधी लेखा परिरक्षक यांचेकडून लेखापरिक्षण करुन घेतले आहे. तरी सदरच्या मुद्याचे अनुपालन स्विकृत होणेस विनंती.

(८) आता कामाचा पुर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविला असून साक्षांकीत केल्या आहे. यापुढे एका कामासाठी एकच मापपुस्तिका वापरण्याची दक्षता घेण्यात येईल. तरी सदरच्या मुद्द्याचे अनुपालन स्विकृत होणेस विनंती.

(९) सदरचे कामाच्या अनामत रक्कमेच्या देयकातून सुचित केल्यानुसार वसुली प्रस्तावित करण्यात आली आहेत. तरी सदरच्या मुद्याचे अनुपालन स्विकृत होणेस विनंती.

**परिच्छेद क्रमांक ३.३११:- सिमेंट प्लग बंधारा सुरगाणा ता.सुरगाणा (सन २०११-१२)**

कामावर नमुद एकूण खर्च रक्कम रुपये ७,३७,८९७/- झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ नियम १४८(१) नुसार आदेश देणे पुर्वी करारनामा करणे आवश्यक आहे. तशी पद्धत अवलंबण्यात आलेली नाही.

(२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग निर्णय क्र.व्हीपीएन-१०९९/प्रक्र५४/०८ दिनांक-२०/५/१९९९ नुसार व शासन निर्णय क्र.स्थाविका/२००३/प्र.क्र.३६९/का-१४४५ दिनांक-२८/११/२००३ नुसार रक्कम रुपये २०,०००/- वरील कामाचा माहिती फलक बसविल्याशिवाय अंतिम देयक अदा करु नये असे आदेश असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(३) कामावरील एकुण खर्च रुपये ७,३७,८९७/- चे रक्कमेतून रॉयल्टीची रक्कम रुपये ३६,८९५/- वजा करुन रक्कम रुपये ७,०१,००२/- रक्कमेवर आयकर व विक्रीकर कपात केलेली आहे. अंदाजपत्रकीय दराने ठेकेदाराने काम करण्याचे मान्य केल्यामुळे व रॉयल्टी सुद्धा अंदाजपत्रकाचाच भाग असल्यामुळे झालेल्या खर्चावर कपाती करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. तरी कमी कपात रुपये १,९९३/- संबंधितांकडून वसुल करुन शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

(४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ नियम १९७ नुसार पुर्ण कामांच्या नोंदी नमुना नंबर-६९ मध्ये नियम ९७ नुसार नमुना नंबर-३९ मधील अचल मालमत्ता नोंदवहीत घेणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम १४८ (१) नुसार आदेश देणेपूर्वी करारनामा दिनांक २५/१/२०११ रोजी केलेला आहे. (सोबत करारनामाची छायांकित प्रत सादर केली आहे.)

(२) सदर कामाचा माहिती फलक क्षेत्रीय ठिकाणी बसवुन त्यांचे छायाचित्र अंतिम देयका सोबत सादर केले होते. सोबत कार्यालयीन टिपणी व छायाचित्राची प्रत सादर केली आहे.

(३) सदर कामांचे आयकर व विक्रिकर कमी कपात केलेली रक्कम रु.२,२७९/- व्याजासह वसुल करुन पावती क्रमांक ८६१०८३ दिनांक २५/१/२०१६ अन्वये शासन सदरी भरणा करण्यात आली आहे.

(४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ नियम १९७ नुसार पुर्ण कामांच्या नोंदी नमुना नंबर-६९ मध्ये नियम ९७ नुसार नमुना नंबर-३९ मधील अचल मालमत्ता नोंदवहीत घेतली आहे. (सोबत प्रत सादर केली आहे.)

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.३१२ :- गांवतळे प्रिंपज ता.दिंडोरी जिल्हा नाशिक कामातील अनियमितता (सन २०११-१२)**

उपरोक्त कामावर रक्कम रुपये ११,९८,५२२/- खर्च करण्यात आलेला आहे. या बाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.झेडपीए/२०००/प्र.क्र.४४/३३/दिनांक २२/१२/२००० निर्णयातील बाब क्र.१३ नुसार काम पुर्ण झाल्यावर पुर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

(२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम क्र.१२० (२) प्रमाणे अंदाजपत्रकातील काही बाबीचे काम न केल्यामुळे होणारी बचत इतर बाबीवर खर्च करण्याची तरतुद नाही तसेच नियम १५३(३) नुसार अंदाजपत्रकाप्रमाणे काम करणेची जबाबदारी मक्तेदाराची आहे. असे असतांना देखील इतर बाबी मिळून रक्कम रुपये २,६१,३६८.२९ बचत दर्शवुन सदरील रक्कम इतर मिळुन जादा खर्च रक्कम रुपये ५८,२३४.०६ इतका केला आहे. यास तांत्रिक अधिका-यांची पुर्व मान्यता घेतलेली नाही. सदरील जादा खर्चास तांत्रिक अधिका-यांची मान्यता घेणे आवश्यक आहे.

(३) नस्तीसोबत काम ज्या जागेवर करण्यात आले आहे. त्या मालकाचा ७/१२ उतारा व संमतीपत्र घेणे आवश्यक आहे. ते तपासणीस आढळून आलेले नाही.

(४) सदरील कामाची नोंद नमुना नं.३९ वर घेणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) शासन निर्णय परिपत्रक क्र.झेडपीए/२०००/प्र.क्र.४४/३३ दिनांक २२/१२/२००० मधील बाब क्र.१३ नुसार काम पूर्ण झाल्यावर पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिका क्र.४५३ पान क्र.५० वर नोंद घेतली आहे.

(२) वाढ-घट तक्त्यात प्रत्येक बाबीवर कारण दिले असुन त्यावर मा.कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग (पश्चिम) जिल्हा परिषद, नाशिक यांची स्वाक्षरी आहे. म्हणजेच या बाबीतील वाढ-घट ला मान्यता घेतली आहे.

(३) सदर गांवतळेचे काम हे स्थानिक नाल्यावर घेण्यात आलेले आहे. त्यामुळे संमतीची आवश्यकता नाही.

(४) सदर कामाची नोंद नमुना नं.३९ मध्ये अनुक्र.६९ वर घेण्यात आली आहे. सोबत त्यांची छायांकित प्रत जोडणेत आली आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.३९१ :- नळ पाणी पुरवठा विशेष दुरूस्ती योजना शहा, ता.सिन्नर (सन २०११-१२)**

सदर योजनेवर प्रमाणक क्रमांक ७७, दिनांक ३१/१०/२०११ रक्कम रु.९,६६,०४५/- खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप नमुद करण्यात येत आहे.

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम १४० करारनामा केलेला नाही.

(२) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ नियम ५ नुसार नोंदणीकृत प्रमाणपत्र जोडलेले नाही.

(३) कामाच्या देयकात आयकराची रक्कम रुपये २२,७९९/- कपात करणेऐवजी रु.२१,८१६/- कपात केलेली आहे. म्हणजेच रु.९८३/- कमी कपात केलेली आहे.

(४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ प्रमाणे नियम १२०/२१ प्रमाणे कामाची होणारी बचत इतर कामावर खर्च करण्याची तरतूद नाही. तसेच नियम क्र.१५३(१) नुसार अंदाजपत्रकाप्रमाणे काम करणे आवश्यक असतांना बाब क्र. २.३.६.७ मध्ये एकूण रुपये १,६५,९२२/- चे अधिक्य व इतर बाबतीत रक्कम रुपये १,४५,१७१/- ची बचत दर्शविली आहे. म्हणजेच रुपये १,६५,९२२/- जादा खर्च झाल्याचे दिसून येते.

(५) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.व्हीपीएम १०९९/प्र.क्र.५४/०८, दिनांक २०/०५/१९९९ नुसार महाराष्ट्र शासन निर्णय क्र.स्थाविका/२००३/प्र.क्र.३६९/का/१४४५, दिनांक २८/११/२००३ नुसार कामाचा फलक लावणेची कार्यवाही केलेली नाही.

(६) महाराष्ट्र शासन निर्णय क्र.१०९९/प्र.क्र.५६/३५, दिनांक ३०/६/२००० नुसार कामासाठी वापरण्यात येणा-या रेती, खडी, सिमेंट, इत्यादी साहित्याची चाचणी अहवाल प्रयोगशाळेकडून घेतलेले नाही.

(७) देयकातून कपात केलेली ५ टक्के सुरक्षा ठेव पंचायतीने रोजकिर्दीत पंचायत समितीकडे येणे दर्शविणे आवश्यक आहे.

(८) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.झेडपीए २०००/प्र.क्र.४४/३३, दिनांक २२/१२/२००० शासन निर्णय बाब क्र.१३ नुसार काम पुर्णत्वाचे दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविल्याचे दिसून येत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) शहा, ता.सिन्नर येथील नळ पाणी पुरवठा योजना विशेष दुरुस्ती करणे, याबाबतचा करारनामा दिनांक २२/०७/२०११ रोजी करण्यात आलेला आहे. करारनाम्यात अटी व शर्ती, कामाची मुदत, काम कधी पुर्ण होईल इत्यादी बाबतच्या नोंदी घेण्यात आलेल्या होत्या परंतु दिनांक नमुद करण्यात आलेला नव्हता. तथापि कार्यारंभ आदेशात काम पुर्ण करण्याचा दिनांक नमुद करण्यात आलेला होता. सोबत कार्यारंभ आदेश जोडण्यात आलेले आहे. तरी यापुढे दक्षता घेण्यात येईल.

(२) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ नियम ५ नुसार चेअरमन, भाग्यलक्ष्मी मजुर बांध, सहकारी सोसायटी लि. किर्तांगळी, ता.सिन्नर यांचे नोंदणीकृत प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.

(३) दिनांक २५/१/२०१६ रोजी रक्कम रु.९८३/- कोषागारात भरणा केल्याबाबतची पोहोच सोबत जोडण्यात आलेली आहे.

(४) प्रत्यक्ष काम करतांना, काही बाबींमध्ये वाढ झाली व काही बाबींमध्ये बचत झालेली आहे. परंतु एकूण खर्च मंजुर किंमतीस सिमीत करण्यात आला आहे. सदर कामासाठी मंजुर किंमत रु.९,६६,०४५/- एवढी असून, झालेला खर्च रु.९,६६,०४५/- एवढा आहे. बचत वाढ तक्ता सोबत जोडण्यात येत आहे.

(५) सदर काम पाणी टंचाई नैसर्गिक आपत्ती अंतर्गत जनतेला प्रथम प्राधान्याने पाणी पुरवठा करणे आवश्यक असल्याने अंदाजपत्रकात सदरची बाब समाविष्ट केलेली नाही. त्यामुळे फलक लावलेला नाही.

(६) सदर कामात खडी, सिमेंट रेती यांचा अल्प (कमी) वापर असल्याने, चाचणी अहवाल घेण्यात आलेले नाहीत. सदर बाबत यापुढे दक्षता घेण्यात येईल.

(७) सदरचे काम ग्रामपंचायतीमार्फत करण्यात आलेले नसून, चेअरमन, भाग्यलक्ष्मी मजुर बांध.सहकारी सोसायटी लि.किर्तांगळी, ता.सिन्नर यांनी केलेले आहे. सदर मुद्दा लागु होत नाही.

(८) मोजमाप पुस्तिका क्र.९६५ मधील पान क्र.६० वर काम पुर्णत्वाचा दाखला नोंदविण्यात आलेला आहे. तसेच काम पुर्णत्वाचा दाखला स्वतंत्रपणे जोडण्यात येत आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.३९३ :- नैसर्गिक आपत्ती लेखाशिर्ष २२४५ (सन २०११-१२)**

नैसर्गिक आपत्ती लेखाशिर्षावर रक्कम रुपये ६,६८,४५०/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणचे आक्षेप आहे.

१. परिशिष्ट क्र.३ मध्ये नमुद केले प्रमाणे प्रवासभत्ता देयके व अतिकालीक भत्ता रुपये ७६,३५०/- प्रदान केले आहेत. तथापि सदरची रक्कम एक वर्षाचे वरील प्रदाने असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता नियम ४४(१) एक नुसार कार्यवाही केलेली नाही.

२. परिशिष्ट क्र.३ प्रमाणे सदरचे वाहने ही सन १९८४ ची उत्पादित असून कालबाह्यतेबाबत परिवहन विभागाचे प्रमाणपत्र जोडलेले नाही.

३. टाकीची पाणीवहन क्षमता उपअभियंता यांनी प्रमाणित केलेली नाही.

४. कविता वेल्डींग वर्क पेठ यांची मुळ प्रमाणक नसतांना कोटेशन रक्कम २७,६५०/- प्रदान केल्याने नियोग्रेषित कार्यवाही करणे आवश्यक आहे.

५. महाराष्ट्र शासन, परिपत्रक क्र.टंचाई/१००५/प्र.क्र.३०५/पा.पु.१४२४/१/२००६ मधील मुद्या क्र.७ नुसार उद्‌भवाच्या ठिकाणी उद्‌भव नोंदवही नाही.

६. विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेकडील दिनांक १७/४/२००८ च्या परिपत्रकानुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) परिशिष्ट क्र.३ मध्ये नमुद केले प्रमाणे एक वर्षावरील प्रवासभत्ता व अतिकालिक भत्ता देयके रक्कम रु.७६,३५०/- पंचायत समिती पेठ या कार्यालयाकडे एक वर्षी पूर्वीच सादर झाली होती. परंतु सदरची देयके अदा करणेकरीता शासनाकडून अनुदान उपलब्ध नसल्याने, अनुदान उपलब्ध झालेनंतर सदरची देयके अदा करणेत आली आहे. आता त्यास कार्यात्तर मंजुरी घेण्यात आलेली आहे.

(२) परिशिष्ट क्र.३ मध्ये नमुद केलेली वाहने ही पंचायत समिती पेठ कडील नसून सदरची वाहने ही कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग क्र.९, नाशिक, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक या शासकीय विभागाकडील आहेत.

मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडील आदेश क्र.डेस्क/१३/१/एस.सी.वाय./९५/११ दिनांक २८/४/२०११ व क्र.डेस्क/१३/१/एस.सी.वायङ१०५/दिनांक ३०/४/२०११ अन्वये सदरची वाहने पेठ तालुक्यातील टंचाई कालावधी करीता अधिग्रहीत करणेत आली होती. सदरचे टँकर जिल्हाधिकारी कार्यालयाने पाणी पुरवठाकरणे कामी पुरविले असून, आदेशामध्ये टँकरची स्थिती नमुद नाही. (सोबत आदेशाची सत्यप्रत अवलोकनार्थ जोडणेत आली आहे.) तसेच टँकर वापरा योग्य असले बाबत परिवहन विभागाचे प्रमाणपत्र घेणेची जबाबदारी संबंधित टँकर ज्या विभागाचे आहेत, त्या विभागाची जबाबदारी आहे. या बाबत सदरचे वाहन कालबाह्य असले बाबत या विभागास अवगत नव्हते.

सदर वाहनाचे लॉगबुकाचे उपलब्ध झेरॉक्स प्रती वरुन पाणी पुरवठा केलेचे दिसुन येते.

(३) वाहनावर परिशिष्टात नमुद केले प्रमाणे ६००० लिटर क्षमतेची टाकीचे क्षमतेबाबत उप अभियंता यांनी प्रमाणित केले आहे. सोबत सदरचा दाखल्याची प्रत जोडली आहे.

(४) टंचाई कालावधीमध्ये पाणी पुरवठा करतेवेळी शासकीय टँकरचे पाण्याची टाकी मधुन गळती होऊ लागल्याने तत्काळ वेल्डींग करणे करीता पेठ मधील कविता वेल्डिंग वर्क यांचेकडून वेगवेगळ्या दिनांकास वेल्डींग करणेत आले होते. पेठ तालुका हा दुर्गम भाग असुन, तेथे तत्कालिन परिस्थितीमध्ये एकच वेल्डिंगचे दुकान असल्याने त्यांचे मार्फत टंचाईग्रस्त भागामध्ये पाण्याचा पुरवठा करणे करीता विलंब होऊ नये याकरीता दुरुस्ती करणेत आली होती व त्यानुसार मे.कविता वेल्डिंग वर्क्स, यांनी त्यांचेकडेस उपलब्ध असलेले कोटेशन बील रु.१,०००/- चे आतील वेगवेगळ्या दिनांकाचे दिले असून, मे.कविता वेल्डिंग वर्क्स, यांनी बील पुस्तिका नसल्याने कोटेशन बील रु.१,०००/- चे आतील वेगवेगळ्या दिनांकाचे सादर केलेले असून त्यांना रक्कम रु.२७,६५०/- त्यानुसार त्यांना अदायगी करणेत आली असून असे संबंधितांनी लेखी सादर केले आहे. समवेत लेखी पत्राची प्रत व कोटेशन बीलांच्या प्रती जोडलेल्या आहेत.

(५) शासन परिपत्रक क्र.टंचाई/१००५/प्र.क्र.३०५/पा.पु.१४ दिनांक २४/१/२००६ मधील मुद्दा क्र.७ नुसार प्रत्येक उद्‌भवाच्या ठिकाणी खाजगी विहिर मालक यांनी उद्‌भव नोंदवही ठेवली असून त्याप्रमाणे टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा केलेला आहे. पाणी पुरवठा केले बाबत करणेत आलेल्या प्रत्येक खेपे नुसार देयक अदा झालेले आहे.

(६) गट विकास अधिकारी/तहसिलदार टंचाईग्रस्त गावाना भेटी देऊन तपासण्या केलेल्या असून, सदरचे गावांना भेटी दिले बाबत गट विकास अधिकारी यांचे दैनंदिनी वरुन दिसून येते. सोबत सदरचे दैनंदिनीची झेरॉक्स प्रत जोडली आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.३९४ :- पाणी व्यवस्थापन विभागाकडून केलेल्या टिसीएल खरेदीबाबत (सन २०११-१२)**

पाणी व्यवस्थापन विभागाकडून केलेल्या टिसीएल खरेदीवर रक्कम रुपये १०,३४,१८५/- खर्च करणेत आलेला आहे. खर्चाबाबत खालीलप्रमाणे आक्षेप येत आहे.

(१) लेखासंहिता नियम १०६ नुसार तांत्रिक मंजुरी बाबत कार्यवाही केलेली नाही.

(२) मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ४२ ते ४८ नुसार करारनाम्यामध्ये अनियमितता आहे.

(३) महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा शासन निर्णय दिनांक २/१/१९९२ मधील परिशिष्ट ७ नुसार पुनप्रत्यार्शी आदेश देतांना अट क्र.१ ते ७ ची प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(४) निविदा सुचना **शासकीय राजपत्रामध्ये** प्रसिद्धी नाही.

(५) टिसीएलचा पुरवठा थेट पाणी पुरवठा विभाग, नांदगांव, देवळा व दाभाडी येथे केल्याने साठा नोंदवही नोंद घेतल्याची खात्री करता आलेली नाही.

(६) प्रयोगशाळा चाचणी अहवाल अप्राप्त असल्याने टिसीएल मध्ये क्लोरीनची मात्रा ३४ टक्के कायम आहे किंवा नाही या बाबत पडताळणी करता आली नाही.

(७) अर्धसमास पत्र क्र.१/२४/८/१२ अन्वये पंचायत समिती स्तरावरील साठा नोंदवह्या मागणी करुनही अप्राप्त असल्याने टिसीएल चा विनियोग साठा बाबत खात्री करता आली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) पाणी व्यवस्थापन विभागाकडून केलेल्या टिसीएल खरेदीवर रक्कम रुपये १०,३४,१८५/- खर्च करणेत आलेला आहे. सदर खरेदीस तांत्रिक मंजुरी घेण्यात आलेली नव्हती. तथापि प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेसाठी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सक्षम असुन त्यांची प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. यापुढे तांत्रिक मान्यता घेण्याची दक्षता घेण्यात येईल. खरेदी केलेल्या टीसीएल चा दर्जा चांगला असून सदर कालावधीत कुठल्याही साथरोगांचा प्रसार झालेला नाही.

(२) महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ४२ ते ४८ नुसार निविदेच्या रक्कमेनुसार मुद्रांक शुल्क कमी घेण्यात आलेली होते तथापि उर्वरित मुद्रांक शुल्क रु.४००/- वसुल करणेत आले असून शासन सदरी भरणा करण्यात आले आहे. सोबत भरणा केल्याची प्रत शासन सदरी भरणा करण्यात आले आहे. सोबत भरणा केल्याची प्रत जोडली आहे.

(३) टिसीएल निविदा मुदत संपण्यापूर्वी विहित वेळेत नवीन निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. परंतु निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने सदर निविदा दोन वेळेस पुन्हा प्रसिद्धीस देण्यात आली. साठा संपुष्टात आल्याने निकडीची बाब म्हणुन पुनप्रत्यर्शी आदेश सक्षम अधिका-याच्या मान्यतेने देणेत आला होता. सदर आदेशान्वये रु.१,३१,२८०/- इतक्या रक्कमेची टीसीएल खरेदी करण्यात आली आहे. यापुढे योग्य ती कार्यवाही करणेत येईल. तसेच साथरोग उद्‌भवु नये म्हणुन तातडीची बाब असल्याने मागील दराने टीसीएल खरेदी करण्यात आले आहे.

(४) निविदा सुचना सामान्य प्रशासन विभागाकडून दैनिक वृत्तपत्राचे नाव घेऊन दैनिक देशदुत मध्ये प्रसिद्ध करणेत आली आहे.

(५) टिसीएलचा पुरवठा नांदगांव व दाभाडी योजनेवर करणेत आला आहे. त्याबाबत साठा नोंदवहीत नोंदी घेणेत आल्या आहेत. साठा नोंदवही पान नं.१६२ ते १६५ नोंद घेणेत आली आहे.

(६) प्रयोगशाळा चाचणी अहवाल दिनांक १६/८/१२ व दिनांक ३०/३/१२ अन्वये प्राप्त करुन त्यानुसार क्लोरिन मात्रा ३४ टक्के असल्याची खात्री करण्यात आली आहे. त्यानंतरच वित्त विभागामार्फत देयक अदा होतात. सदरचा अहवाल समवेत जोडला आहे.

(७) सदर टिसीएल साठ्याची प्राप्त झाल्याबाबतची नोंद साठा रजिस्टरवर उपविभागाने केलेली आहे. त्याबाबत साठा नोंदवहीची छायांकित प्रत समवेत जोडण्यात आली आहे. टिसीएल जमा व वाटपाच्या सर्व नोंदी बरोबर व अचुक असल्याची खात्री विभागाने केलेली असून, टिसीएलचा वापर पाणी पुरवठा योजनांसाठी झाला आहे. उपविभागाच्या नोंदवह्या साक्षांकीत करुन दप्तरी दाखल आहेत.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.५३९ :- आदिवासी उपयोजने अंतर्गत शेतक-यांच्या शेतावर वैरण उत्पादनासाठी उत्तेजन देणे योजनेबाबत (सन २०११-१२)**

सदर योजनेवर रक्कम रुपये ११,३७,७१२/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) महाराष्ट्र शासन निर्णय जिवाये-१०१०/प्र.क्र.३४०/पदुम-४/दिनांक ३०/८/२०१० अन्वये अ-५ प्रमाणे वैरण बियाण्यांचे वाटप करण्यापुर्वी लाभार्थींना वैरण पिकांच्या लागवडीबाबत तांत्रिक मार्गदर्शन करण्यात यावे, असे असतांना ते उपलब्ध केलेल्या कागदपत्रावर दिसून आले नाही.

(२) शुद्धता, अनुवंशिकता व उगवण क्षमता याबाबत शासकीय बीज परिक्षण प्रयोगशाळेकडून तपासणी अहवाल प्राप्त केलेले नाही.

(३) बियाणे पुरवठा बियाण्यांची भौतिक शुद्धता व उगवण क्षमता याबाबत बीज पृथ्थकरण प्रयोगशाळा यांचेकडील अहवाल लेखापरीक्षणात उपलब्ध झाला नाही.

(४) संशोधन अधिकारी, गवत संशोधन योजना कृषी विद्यापीठ राहुरी यांचेकडील जयवंत जातीचे ठोबे खरेदीचे मुळ प्रमाणक रुपये ५०,०००/- व युनायटेड फॉस्फरस लि.पुणे यांचेकडून खरेदी केलेले व्हरायटी न्युट्रीफाइड रक्कम रुपये ४९,८००/- चे मुळ प्रमाणक उपलब्ध झाले नाही.

(५) पशुसंवर्धन अधिकारी इगतपुरी यांचेकडील साठा नोंदवही पृष्ठ क्र.९५ वर जयवंत जातीची ठोबे एकूण दिलेले १०,००० नगांची तपासणी केली असता साठा नोंदवहीत ५,००० ठोंबे जमा व वाटप दर्शविले आहेत. तरी कमी जमा ५,००० नग दर प्रति नग रुपये १/- प्रमाणे रुपये ५,०००/- वसुल करणे आवश्यक आहे.

(६) पशुसंवर्धन अधिकारी सटाणा यांचेकडील साठा नोंदवहीची तपासणी केली असता पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांचेकडून दिलेले मका बियाणे आफ्रीकन टॉल एकूण ४००० किलो बियाणे यांची नोंद साठा नोंदवहीत घेतलेली नाही. तरी ४००० किलो रुपये २७.४० किलोप्रमाणे रुपये १,०९,६००/- कमी बियाणे रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

(७) औषधांचा/साहित्याचा विनियोग दाखला व उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हा परिषदेस सादर करणे आवश्यक आहे.

(८) योजनेचा वार्षिक फलश्रुती अहवाल जिल्हा परिषदेस सादर करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) महाराष्ट्र शासन निर्णय जिवायो-१०१०/प्र.क्र.३४०/पदुम-४ मुंबई-३२ दिनांक ३०/८/२०१० मधील आ(५) नुसार वैरण बियाण्याचे वाटप करण्यापुर्वी बियाणे लागवड, पेरणी, कापणी व उत्पादन इ.बाबतची तांत्रिक माहिती प्रत्येक संस्था प्रमुखांमार्फत बियाणे वाटपाच्या वेळी मार्गदर्शन करण्यांत आलेले आहे.

(२) शुद्धता अनुवंशिकता व उगवण क्षमता याबाबत शासकीय बीज परिरक्षण प्रयोगशाळा तपासणी प्रमाणपत्र क्र.एस टी एल एस/६३/१२ दिनांक ३०/३/२०१२ अन्वये प्राप्त झालेले असून त्याची प्रत सोबत जोडली आहे.

(३) शुद्धता अनुवंशिकता व उगवण क्षमता याबाबत शासकीय बीज परिक्षण प्रयोगशाळा तपासणी प्रमाणपत्र क्र.एस टी एल एस/६३/१२ दिनांक ३०/३/२०१२ अन्वये प्राप्त झालेले असून त्याची प्रत सोबत जोडली आहे.

(४) मुळ प्रमाणक हे म.मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.नाशिक यांच्या ताब्यात असून सदर देयकाची रक्कम रु.४९,८००/- ची छायांकित प्रत सोबत सादर करण्यात आलेली आहे.

(५) पशुधन विकास अधिकारी (विस्तार) ईगतपुरी यांचे जयवंत ठोंबा बाबतचे अनुपालन सोबत सादर केलेले आहे.

रजि. क्र. ३३ पान नं. ९५ वरती सदरच्या नोंदी घेण्यात आलेल्या असून त्या दिनांक १७/१०/२०११ रोजी वाटप करण्यात आलेल्या आहेत. सदरची छायांकित प्रत समवेत सादर करण्यात आलेली आहे व १ ते १० लाभधारकांचे दुरूस्तीनुसार दाखले समवेत १००० ठोंबे प्रत्येकी मिळालेल्या पावत्या सोबत जोडल्या आहेत.

(६) पशुधन विकास अधिकारी (विस्तार) बागलाणा यांचे मका बियाणे (African Tall) एकुण ४००० किलो बाबतचे अनुपालन सोबत सादर केलेले आहे.

रजिस्टर क्र. ३३ पान नं. ३ वरती सदरच्या नोंदी घेण्यात आलेल्या असुन त्या दिनांक ३०/१२/२०११ रोजी वाटप करण्यात आलेल्या आहेत. सदरची छायांकित प्रत समवेत सादर करण्यात आलेली आहे.

(७) औषध व साहित्याचा विनियोग व उपयोगिता प्रमाणक १५ तालुक्याचे प्राप्त करुन घेण्यात आलेले आहे.

(८) योजनेचा फलश्रुती अहवालाबाबत आढावा घेतला असुन दप्तरी दाखल केलेला आहे. सदर माहिती तालुका स्तरावर ठेवण्यात आली आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.५७९ :- मागासवर्गीय वस्तीत सौरपथदिप पुरविणेबाबत (सन २०११-१२)**

मागासवर्गीय वस्तीत सौरपथदिप पुरविणेबाबत प्रमाणक क्रमांक ४१७ दिनांक ३०/१/२०१२ अन्वये रक्कम रुपये ३१,३६,५००/- खर्च झालेला आहे. उपरोक्त खर्चाबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.झेडपीई/२००८/प्र.क्र.४४६/वित्त-९/दिनांक २०/६/२००८ अन्वये योजनेचे नियोजन अंमलबजावणी वेळापत्रकानुसार झालेली नाही.

(२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.पंरास/१०९९/प्र.क्र.७८/०५/दिनांक ९/१/१९९७ मधील परिच्छेद क्र.३ प्रमाणे वैयक्तिक लाभांच्या योजना राबवितांना लाभार्थींची निवड शासन निर्णयाप्रमाणे दिल्याचे दिसत नाही.

(३) समाज कल्याण विभागाने गटविकास अधिकारी पंचायत समिती यांचेमार्फत सौरपथदिप ग्रामपंचायत निहाय प्रस्ताव घेतलेले आहे. पुरवठा केलेल्या ग्रामपंचायतीच्या पोच प्राप्त केलेला नाही. महाराष्ट्र शासन, निर्णय २/१/१९९२ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ८३(३) प्रमाणे साहित्य, दर्जा, गुणवत्तेबाबत गट विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही.

(४) भारतीय मानक ब्युरो मान्यताप्राप्त दर्जा असलेले पथदिप संच प्राप्त झालेबाबतची नोंद तपासणीत प्राप्त झालेले नाही. महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.मागास-१०८८/२४१२/उद्योग-६/दिनांक २/१/१९९६ मधील ८-४ चे प्रमाणे लोखंडी खांब वस्तुचे गुणवत्ते विषयी व दर्जा विषयी तपासणी प्राधिकृत संस्थेकडून करुन घेतलेली नाही.

(५) संचाची ग्रामपंचायत स्तरावर उभारणी केलेचे उपअभियंता यांचे काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र व मुल्यांकन तपासणी प्राप्त झालेले नाही. सौर पथदीप सुस्थितीत चालु असल्याच्या बाबतचा जिल्हा परिषद प्रकल्प अधिकारी (उर्जा) नाशिक यांचे तपासणी करुन चाचणी अहवाल प्राप्त केलेला नाही.

(६) सौरपथदिप संच उभारणी नंतर जिल्हा परिषद समाज कल्याण अधिकारी अति.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची तपासणी केले बाबत अहवाल प्राप्त नाही.

(७) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.मागास/ १०९३/प्र.क्र.१२३९/३४/दिनांक १/९/ ९३ अन्वये साहित्यांची खरेदी ज्या आर्थिक वर्षात झाली त्याच आर्थिक वर्षात साहित्यांचे वाटप होणे बंधनकारक असतांना काही ग्रामपंचायतीच्या पोहोच प्राप्त नाहीत.

(८) ग्रामपंचायतीच्या पोच तपासणी केली असता पुरवठा कालावधीच्यानंतर काही ग्रामपंचायतींना सौरपथदिप संच उशिराने पुरवठा केल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे दंडनिय कार्यवाही करुन रुपये २५,२३१/- दंड वसुल केलेला नाही.

(९) तालुका स्तरावर ग्रामपंचायतींना सौरपथदिप वाटप करतांना अटी/शर्तीची पुर्तता केलेली नाही व अधिका-यांनी भेटी देवून सौरपथदिप उभारणीनंतर मागासवर्गीय लाभार्थींना लाभ मिळाल्याची खात्री करता आली नाही.

(१०) शासनाने दरकरारांत नमुद प्रमाणे महाराष्ट्रातील उद्योगांना चालना देणे आवश्यक असताना परराज्यातील उद्योगांना पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

(११) सौरपथदिप, एकुण ३६ नगांची पोच पावती प्राप्त नसल्याने रक्कम रुपये ७३,८००/- वसुल करणे आवश्यक आहे.

(१२) जैन इरिगेशन जळगांव व दर्शन इंजि.नाशिक यांचे दरकरार तपासणीस प्राप्त झाले नाही.

(१३) महाराष्ट्र शासन, निर्णय दिनांक २/१/१९९२ नुसार परि.क्र.८३ नुसार मागणी प्रमाणे साहित्य सुस्थितीत व योग्य गुणवत्तेचे प्राप्त झाले बाबत प्रमाणपत्र देण्यात आले नाही.

(१४) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग निर्णय क्र. झेडपीऐ/ २०००/प्र.क्र.४०२३/३ दिनांक १२/१/२००१ नुसार प्रशासकीय मान्यता दिलेल्या योजनेची माहिती स्थायी समिती/विषय समिती बैठकीत सादर करण्यात आली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) सदर योजनेचा बहुतांश लाभ त्याच आर्थिक वर्षात देण्यात आलेला आहे. यापुढे योजनेची कार्यवाही ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार करणेबाबत दक्षता घेण्यात येईल.

(२) समाज कल्याण समिती सभा दिनांक १७/१०/२०११ ठराव क्रमांक २१६ अन्वये प्राप्त प्रस्तावाप्रमाणे लाभार्थ्यांची निवड केली आहे.

(३) ग्रामपंचायतींना सौरपथदिप सुस्थितीत प्राप्त झालेबाबतच्या ग्रामपंचायतीच्या पोहोच प्राप्त आहेत व त्या दप्तरी ठेवण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रकल्प कार्यकारी अधिकारी (उर्जा) जिल्हा परिषद, नाशिक यांचे कडील दिनांक २५/१/२०१२ चे प्रमाणपत्र अन्वये सौर पथदिपाची पहाणी तपासणी गुणवत्ता व दर्जानुसार करण्यात आलेली आहे.

(५) प्रकल्प कार्यकारी अधिकारी (उर्जा), जिल्हा परिषद नाशिक सौरपथदिपाचे गुणवत्ता व दर्जाबाबतचे प्रमाणपत्र जि.प.प्रकल्प अधिकारी, ऊर्जा दिलेले आहे.

(६) विविध अधिकारी, यांनी दौरा/भेटीच्या वेळी तपासणी केली आहे.

(७) साहित्याचे वाटप त्याच आर्थिक वर्षात झाल्याच्या ग्रामपंचायतीच्या पोहच पावत्या प्राप्त

झालेल्या आहेत व त्या दप्तरी ठेवण्यात आलेल्या आहेत.

(८) पुरवठा आदेशात साहित्य पुरवठ्याची मुदत ४५ दिवसाची असल्याने सर्व साहित्याचा पुरवठा ४५ दिवसाच्या आत झाला असल्याने दंडाची आकारणी करण्यात आलेली नाही.

(९) अटी व शर्तीची पुर्तता करुनच उभारणी केलेली आहे. विविध अधिकारी तसेच प्रकल्प कार्यकारी अधिकारी,(उर्जा), जिल्हा परिषद यांनी त्यांचे दौरा/भेटीच्या वेळी या बाबतची खात्री केलेली आहे.

(१०) समाज कल्याण समिती सभा दिनांक २६/९/२०११ ठराव क्रमांक २१३ अन्वये रश्मी इंडस्ट्रीज, बंगलोर यांची पुरवठादार म्हणून निवड करुन दिल्याने तसेच दरकरार असल्याने त्यांना पुरवठा आदेश देण्यात आला आहे.

(११) एकूण सौरपथदिप १७० मंजूर असून सर्व पोहचपावत्या प्राप्त असून दप्तरी ठेवण्यात आले आहेत.

(१२) जैन इरिगेशन, जळगाव, दर्शन इंजिनिअरींग नाशिक यांचे दरकरार दप्तरी ठेवण्यात आले आहेत.

(१३) साहित्य सुस्थितीत व योग्य गुणवत्तेबाबतच्या पोहच प्राप्त आहेत. पुरवठा करण्यात आलेले साहित्य सुस्थितीत ताब्यात मिळाल्याचे ग्रामसेवकांच्या पोहच पावतीवर नमुद आहे. तसेच सदर साहित्य योग्य गुणवत्तेचे असल्याचे प्रकल्प कार्यकारी अधिकारी (उर्जा), जिल्हा परिषद नाशिक यांनी प्रमाणित केले आहे.

(१४) स्थायी समिती सभा दिनांक १६/७/२०११ ची तहकूब सभा दिनांक २५/७/२०११ ठराव क्र.३४३ व विषय समिती दिनांक २६/४/२०११ ठराव क्र. १९८ अन्वये बैठकीत सादर केले आहे.

कृपया खुलासा मान्या होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.५८० :- मागसवर्गीय महिलांना/बचतगटांना पिठगिरणी पुरविणेबाबत (सन २०११-१२)**

सदर योजनेवर प्रमाणक क्रमांक ३८१ दिनांक ३०/३/२०१२ अन्वये रक्कम रुपये ६,९९,२००/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. झेडपीई/२००८/प्र.क्र.४४६/वित्त-९/दिनांक २०/६/२००८ अन्वये योजनेचे नियोजन अंमलबजावणी वेळापत्रकानुसार झालेली नाही.

(२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.मागास/१०९३/प्र.क्र.१२३९:३४:दिनांक १/९/१९९३ नुसार साहित्यांची खरेदी करुन त्याच आर्थिक वर्षात वाटप करण्यात आले बाबत पालन झाले नाही.

(३) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.१०६९/५५५/दिनांक ५/९/८९ व पंरास/१०९८/प्र.क्र.७३/३४ दिनांक २०/१०/९९ अन्वये प्रपत्र अ नोंदवही नसल्याने दुबार लाभ प्रदानाबाबत तपासणी करता आली नाही.

(४) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.झेडपीए/२००५/प्र.क्र.३७५/वित्त-९/दिनांक ३०/१२/२००६ नुसार ५ ते १० लाखापर्यंतची निविदा प्रसिद्धीचा कालावधी ३० दिवसांचा असणे आवश्यक आहे.

(५) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक ३०/१२/२००६ नुसार ५ ते ५० लाखापर्यंतची अंदाजपत्रकीय रक्कमेची निविदा राज्यस्तरीय मराठी/हिंदी/दैनिकात देण्यात आली नाही.

(६) प्राचार्य शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नाशिक यांनी चाचणी अहवाल सादर केला आहे. तथापि पुरवठा आदेश दिनांक ३/१/२०१२ चा आहे व साहित्य पुरवठा माहे फेब्रुवारी, २०१२ मधील आहे. त्यामुळे चाचणी अहवाल योग्यतेबाबत खात्री होत नाही.

(७) महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भाखस-१०८८/२५१२/उद्योग-६/दिनांक २/१/१९९२ मधील ८-४ नुसार आयएसआय मार्कच्या इले.मोटार खरेदी केली नाही.

(८) सदर योजनेतून मागासवर्गीय बचतगटांना/महिलांना पिठगिरणी पुरविणे आवश्यक असतांना पेठ/चांदवड तालुक्यातील पुरुष लाभार्थींची निवड केलेली आहे.

(९) लाभार्थी प्रस्तावाची तपासणी करता ८ अ चा उतारा विद्युत पुरवठा असलेबाबत एमएसईबी चे बील आढळून आले नाही.

(१०) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.मागास/१०९४/सीआर/२२३९/३४/६७/दिनांक १/९/१९९३ मधील परि.क्र.४ लाभ दिलेल्या लाभार्थीच्या योजनेची पाहणी करुन ती सुस्थितीत असलेबाबत पडताळणी करुन प्रमाणित केले नाही.

(११) भारतीय मानक ब्युरो परवाना दिनांक ३०/११/२०११ पर्यंत उपलब्ध असून त्यापुढील नसल्याने मालाची गुणवत्ते बाबत खात्री करता आली नाही.

(१२) पिठाची गिरणी साईज १४ इंच मंजूर निविदेमध्ये असतांना पुरवठादारांनी १२ इंचची गिरणीचा पुरवठा केला आहे.

(१३) औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांचे पत्र क्र.औप्रसना/भांडार-एस२/५२४८/दिनांक २/११/२०११ मधील पत्रातील नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

(१४) औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांचेकडून मालाची तपासणी केलेली नाही.

(१५) खरेदीबाबत अट क्र.२० प्रमाणे संबंधितांवर कार्यवाही झालेली नाही.

(१६) पिठगिरणीचा सन २०११-१२ या कालावधीतील शासन दरकरार नसले बाबत प्रमाणित करणे आवश्यक आहे.

(१७) कृषी आयुक्तालय, पुणे यांचेकडील क्र.सीपीएम/पीसओ/इनि/०६/०७/२८२/दिनांक १९/१२/००६ नुसार खुला बाजारांतील दरांपेक्षा साहित्यांचे दर अधिक नसल्याची खात्री केलेली नाही.

(१८) निविदा पुरवठा आदेश, नस्ती यामध्ये १४ इंची खोडून १२ इंच करण्यात आले आहे.

(१९) युनिव्हर्सल ट्रेडींग मुरबाडकर बिझनेस लि. व रमेश धुले यांच्या प्रतिनिधी एक असून निविदेवर स्वाक्षरी याच नावाने असल्यामुळे स्पर्धेचा फायदा मिळाला नाही.

(२०) पंचायत समिती पेठ कडील साठा नोंदवहीतील ४ नग शिल्लक दिसून येत आहेत. वाटप करुन दर्शवावे अन्यथा रक्कम रुपये ६०,८००/- वसुल करणे आवश्यक आहे.

(२१) पंचायत समिती नांदगाव कडील दोन प्रस्ताव प्राप्त झाले नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) सदर योजनेचा बहुतांश लाभ त्याच आर्थिक वर्षात देण्यात आलेला आहे. यापुढे योजनेची कार्यवाही ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार करणेबाबत दक्षता घेण्यात येईल.

(२) गटस्तरावर त्याच आर्थिक वर्षात साहित्याचा पुरवठा करण्यात आलेला आहे व गटाने त्याच आर्थिक वर्षात साहित्याचे वाटप केलेले आहे. परंतु दुर्गम भागातील मागासवर्गीय लाभार्थ्यांचे उदरनिर्वाहासाठी शहरात स्थलांतर केल्याने साहित्य वाटप त्याच आर्थिक वर्षात वाटप झालेले नाही.

(३) समाज कल्याण विभागाकडे व सर्व गट स्तरावर प्रपत्र अ नोंदवही (लाभार्थी यादी नोंदवही) ठेवण्यात आली आहे.

(४) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.झेडपीए-२००५/प्र.क्र.३७५/वित्त-९ दिनांक ३०/१२/२००६ नुसार ५ ते ५० लाखापर्यंतच्या निविदा प्रसिद्धीचा कालावधी यामध्ये सुधारणा करण्यात आल्याने सदर कालावधीत बदल करुन ३० दिवसा ऐवजी १५ दिवसांचा करण्यात आला आहे.

(५) ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र.झेडपीए-२००६/प्र.क्र.३६६/वित्त-९ दिनांक ३१/१२/२००९ नुसार ५ ते ५० लाखापर्यंतच्या अंदाजपत्रकीय रक्कमेची निविदा जिल्हा स्तरावरील मराठी दैनिकात देण्यात आली आहे.

(६) साहित्याचा पुरवठा पुर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नाशिक यांचे कडून साहित्याची तपासणी केलेली आहे. यात कार्यालयाने केलेली कार्यवाही उचित आहे.

(७) निवेदेत मिनी फ्लोअर मिल १२ इंच, २ एच.पी.आय.एस.आय. सिंगल फेज इले.मोटारल (RSI ब्रँड) असे नमुद आहे. त्याचप्रमाणे पुरवठा आदेश देखील देण्यात आला आहे. व गटस्तरावर तसाच पुरवठा करण्यात आला आहे. तसे पोहोच पावत्यामध्ये नमुद केलेले आहे.

(८) समाज कल्याण समितीवर सर्व महिला लाभार्थ्यांचीच निवड करुन पिठ गिरणीचा लाभ देखील महिलांनाच देण्यात आला आहे.

(९) प्रस्तावाची छाननी केली असता सर्व निवड केलेल्या लाभार्थी प्रस्तावांना नमुना नं.८ चा उतारा व विद्युत पुरवठा असलेबाबतचे बील जोडलेले आहे. त्यानुसारच लाभार्थींना लाभ दिलेला आहे.

(१०) पर्यवेक्षकीय व क्षेत्रिय अधिकारी यांनी दौ-याच्या वेळी भेटी देवून साहित्याची पडताळणी केली आहे.

(११) पुरवठा आदेशातील वस्तुच्या वर्णनाबरहुकूम तपशीलाप्रमाणे फ्लोअर मिल आय.एस.आय.इले मोटार आर.एस.आय.ब्रॅण्ड व बी.आय.एस.स्टॅन्डर्ड प्रमाणे प्राप्त आहेत.

(१२) निविदा दरपत्रकात पीठ गिरणीची साईज १२ इंच स्पष्टपणे बोल्ड टाईपमध्ये नमूद केलेली आहे. मे.वर्षा ट्रेडिंग कंपनी यांचे निविदेत नजरचुकीने एका ठिकाणी १४ इंच नमुद केले आहे. त्यांची निविदा मंजूर झालेली नाही. निविदा मंजूर असलेल्या पुरवठादाराने १२ इंच साईजच्या पिठगिरणीचा केलेला पुरवठा योग्य आहे.

(१३) औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांचे कडील दिनांक २/१/२०११ चे तपासणी अहवालात पिठ गिरणीची साईज १२ इंच असल्याबाबत औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने अहवालात दुरूस्ती त्याचवेळी केलेली आहे. यासंदर्भात औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस अशा प्रकारची केलेली दुरूस्ती प्रमाणित करुन देणेबाबत या कार्यालयाचे पत्र दिनांक ५/१२/२०११ अन्वये कळविण्यात आले तथापि सदर संस्थेने पत्र स्वीकारले नाही. परंतु या कार्यालयाने १२ इंच साईजच्याच पीठ गिरणीसाठी निविदेत मागणी केलेल्या तपशीलाप्रमाणे पुरवठादाराने १२ इंच साईजचा पिठ गिरणीचा केलेला पुरवठा योग्य आहे.

(१४) वरील अ.क्र. १३ नुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांचे कडील दिनांक २/१/२०११ चे तपासणी अहवालानुसार साहित्याची पुरवठा पूर्व तपासणी केली असल्याने पुरवठ्यानंतर पुनःश्च तपासणी करण्यात आलेली नाही. यापुढे साहित्याचा पुरवठा झाल्यानंतर तपासणी करुन घेण्याची दक्षता घेण्यात येईल.

(१५) खरेदीबाबत अट क्रमांक २० मध्ये गोदामातील साहित्याची तपासणी करतांना साहित्यामध्ये दोष आढळल्यास सात दिवसात निविदा स्पेसिफीकेशन प्रमाणे पुरवठा करणे बंधनकारक राहील त्या विहीत मुदतीनंतर पुरवठा केल्या जाणा-या साहित्य प्रकरणी प्रतिदिन रु.१००/- प्रमाणे दंडात्मक वसूली करण्यात येईल, असे नमूद केले आहे. तथापि अशा प्रकारची कोणतीही दोषात्मक बाब आढळली नसल्याने कार्यवाही केलेली नाही. योग्य साहित्य असल्याच्या पोहच पावत्या प्राप्त आहेत.

(१६) पिठाच्या गिरणीसाठी तसेच या व्यतिरिक्त असलेल्या योजनांसाठीच्या निविदा नस्तीनुसार ज्या साहित्यासाठी दरकरार उपलब्ध आहे अथवा होणार आहे असे साहित्य वगळुनच पिठाच्या गिरणीसाठीची निविदा मागविली आहे. सदरची खरेदी ही निविदा प्रक्रियेद्वारे करण्यात आलेली आहे.

(१७) सदरची खरेदी ही निविदा प्रक्रियेद्वारे न्यूनत्तम दराने करण्यात आलेली आहे.

(१८) निविदा दरपत्रकात पीठ गिरणीची साईज १२ इंच स्पष्टपणे बोल्ड टाईपमध्ये नमूद केलेली आहे. मे.वर्षा ट्रेडिंग कंपनीच्या निविदेत १४ इंच च्या ठिकाणी १२ इंच अशी दुरूस्ती करण्याचे राहून गेले होते. इतर सर्व निविदामध्ये अशा प्रकारची दुरूस्ती करण्यात आली होती.

(१९) प्रत्यक्ष निविदा उघडण्याची कार्यवाही दिनांक ७/१२/२०११ रोजी करण्यात आलेली आहे. तेव्हा युनिव्हर्सल ट्रेडींग कंपनी, यांचे प्रतिनिधी म्हणून राकेश सिंह व मुरबाडकर बिजनेस लि.यांचे प्रतिनिधी म्हणून रमेश भुरे उपस्थित असल्याचे दिसून येते यावरुन या दोन्ही कंपनीचे प्रतिनिधी वेगवेगळे आहेत.

(२०) पंचायत समिती पेठ कडील शिल्लक असलेल्या चार नगाचे वाटप झालेले आहे.

(२१) नांदगांव तालुक्यातील दोन प्रस्ताव असून गटस्तरावर ठेवण्यात आले आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.५८२ :- मागासवर्गीय लाभार्थ्यांना ३ एच.पी.इलेक्ट्रीक मोटर पुरविणे योजनेतील अनियमितता (सन २०११-१२)**

सदर योजनेवर प्रमाणक क्रमांक ७८८ दिनांक ३१/३/२०१२ अन्वये रक्कम रुपये ६,५८,७२०/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) संबंधित तालुक्यांची साहित्य मिळाल्याची दिनांकीत पोच प्राप्त नाही. त्यामुळे विलंबाबत दंडाची आकारणीची परिगणना करण्यात येवून रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

(२) औद्योगिक प्रशिक्षण संस्था नाशिक यांचा साहित्य पुरवठा बाबत तपासणी अहवाल प्रमाणित नाही.

(३) देवळा तालुक्यातील राहणारे महालपाटणे येथील दोन लाभार्थी हे एकाच कुटूंबांतील असल्यामुळे त्यांना नियमबाह्य प्रदान करण्यात आले त्यापैकी एका लाभार्थ्यांची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

(४) महाराष्ट्र शासन, कृषी व पदुम विभाग शासन निर्णय क्र.सुकृओ-२०१०/प्र.क्र.१३५/११ अे, दिनांक ३/८/१० अन्वये मार्गदर्शक सुचना क्र.११ नुसार क्षेत्रीय स्तरावर गुणवत्ता तपासणी करण्यात आली नाही.

(५) तांत्रिक तपासणी अहवाल प्राप्त नाही.

(६) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.झेडपीए/२००८/प्र.क्र.४४६/वित्त९, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक २०/६/२००८ नुसार अंमलबजावणी झालेले नाही.

(७) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्र.मागास/१०९४/सीआर/२२३९/३४/६७, दिनांक १/९/१९९३ चे नुसार लाभार्थ्यांची आर्थिक स्थिती सुधाणा झालेबाबत प्रमाणित करण्यात आलेले नाही.

(८) समाजकल्याण व महिला व बालकल्याण विभाग पत्र क्रमांक संकीर्ण/१०/२००३/प्र.क्र.५४/दिनांक २८/३/२००३ नुसार ३३ टक्के महिलांना लाभ देण्यात आलेला नाही.

(९) प्रस्तावांची तपासणी करतांना दोन लाभार्थ्यांच्या कागदपत्रांच्या उणिवा आढळून आल्यात.

(१०) पुरवठा आदेश व करारनाम्यातील अटीनुसार विहित मुदतीत साहित्यांचा पुरवठा करण्यात आलेला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) सर्व पोच पावत्यांवर साहित्य ताब्यात मिळाल्याचे दिनांक नमूद केलेले आहे. त्यानुसार सर्व पंचायत समितीस साहित्याचा पुरवठा विहीत मुदतीत झाला असल्याने दंडाची आकारणी करण्यात आलेली नाही.

(२) महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्या.यांनी पुरवठा करण्यापूर्वी सर्व इले.मोटार दिनांक ६/३/२०१२ रोजी लक्ष्मी हायड्रोलिक्स प्रा.लि.सोलापूर यांचेकडून तपासणी केलेली आहे. तपासणी अहवालानुसार साहित्य योग्य असल्याचे नमूद केले आहे.

(३) महालपाटणे येथील २ लाभार्थी एकाच कुटुंबातील नसल्याचे खात्री करण्यात आली आहे.

(४) महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्या.यांनी पुरवठा करण्यापूर्वी सर्व इले.मोटार दिनांक ६/३/२०१२ रोजी लक्ष्मी हायड्रोलिक्स प्रा.लि.सोलापूर यांचेकडून तपासणी केलेली आहे.

(५) वरील अ.क्र.४ नुसार महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्या.यांनी पुरवठा करण्यापूर्वी सर्व इले.मोटार दिनांक ६/३/२०१२ रोजी लक्ष्मी हायड्रोलिक्स प्रा.लि., सोलापूर यांचेकडून तपासणी केलेली आहे.

(६) सदर योजनेचा बहुतांश लाभ त्याचा आर्थिक वर्षात देण्यात आलेला आहे. यापुढे योजनेची कार्यवाही ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार करणेबाबत दक्षता घेण्यात येईल. याबाबत समाज कल्याण समिती सभा दिनांक १७/१/२०१३ ठराव क्र. २९ अन्वये क्षमापन घेण्यात आले आहे.

(७) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक १/१/१९९३ नुसार लाभार्थ्यांची आर्थिक स्थितीत सुधारणा व त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली असल्याबाबत विविध अधिकारी यांनी दौरा भेटीच्या वेळी पहाणी केलेली आहे.

(८) सदर योजनेमध्ये ४६ पैकी ०२ महिला लाभार्थीची निवड करण्यात आली आहे. ग्रामीण भागामध्ये महिलांच्या नावे शेतजमीन नसल्याने पुरेशा महिला लाभार्थींची निवड करता आलेली नाही.

(९) लेखापरिक्षणाने निदर्शनास आणून दिलेल्या उणिवानुसार, नांदगांव तालुक्यातील विष्णू वसंत राठोड व आनंदा महादू देसले या लाभार्थ्यांना इले.मोटारचा लाभ देण्यात आलेला नाही. यांची खात्री केली आहे.

(१०) साहित्याचा पुरवठा करण्याचे आदेश दिनांक ३/३/२०१२ असुन पुरवठा मुदत दिनांक ३१/३/२०१२ असुन पुरवठा मुदत दिनांक ३१/३/२०१२ आहे. सर्व साहित्याचा पुरवठा दिनांक ३१/३/२०१२ अखेर झालेला आहे. कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.६९८ :- १० वी १२ वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण देणे (जि.प.सेस) (सन २०११-१२)**

सदर योजनेवर प्रमाणक क्रमांक ७५५ दिनांक ३१/३/२०१२ अन्वये रक्कम रुपये १३,९७,५००/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.झेडपीए/२००८/प्र.क्र.४४६/वित्त-९ दिनांक २०/६/२००८ अन्वये जिल्हा परिषदांनी योजना राबविणे बाबतचे वेळापत्रकानुसार योजना राबविलेली नाही.

(२) विभागाच्या अटी व शर्ती नुसार संबंधित लोकप्रतिनिधींना उद्घाटनसाठी आमंत्रित करण्यात यावे तसेच प्रशिक्षण सुरू असतांना किमान एकदा तरी महिला बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी प्रशिक्षण वर्गास भेट द्यावयाची आहे. तशी कार्यवाही केलेली नाही. तसेच कागदपत्रे/व्हीजीट/शेरेबुक लेखा परिक्षणास उपलब्ध झालेले नाही.

(३) महिला बालकल्याण विभागाने मास्टर नोंदवही (लाभार्थी) ठेवलेली नसल्याने लाभार्थ्यांना दुबार लाभ दिला आहे किंवा कसे, लाभार्थी कुटूंबांपैकी कोणतीही व्यक्ती अंगणवाडी सेविका, मदतनिस, शासकीय/निमशासकीय कर्मचारी यापैकी नसलेबाबत प्रमाणपत्र घेतलेली नाही.

(४) लाभार्थी कुटूंबाने गेल्या १० वर्षात जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण अथवा समाजकल्याण विभागाच्या स्वयंरोजगाराच्या वैयक्तिक योजनेचा लाभ घेतला नसल्याचे प्रमाणपत्र घेतलेले नाही.

(५) महिला बालकल्याण विभाग जिल्हा परिषद नाशिक आदेश क्र.मबाक/अर्थ/६९/११/दिनांक १४/११/२०११ नुसार प्रशिक्षणाचा लाभार्थींना पुरेपूर लाभ घेतल्याची तसेच प्रशिक्षण गुणवत्ता व उपयुक्तता याची खातरजमा केल्या बाबतचा अहवाल उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला बाल कल्याण) यांनी पाठविलेला नाही. तसेच बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी प्रशिक्षण वर्गास भेटी दिल्याचे दिसून आले नाही.

(६) लाभार्थी तंत्रज्ञान परिक्षेस बसला नाही तर दिलेल्या लाभाची रक्कम पुर्णपणे परत घ्यावयाची आहे. त्यासंबंधी लाभार्थीकडून रुपये ५०/- चे मुद्रांकावर हमीपत्र लिहून घेणे आवश्यक असताना कोरे मुद्रांक जोडलेले आहेत. कार्यवाही पुर्ण केलेली नाही.

(७) लेखा परीक्षण वर्षात प्रकल्प सुरगाणाकडील १८ लाभार्थ्यांचे प्रस्ताव व प्रकल्प नांदगांवकडील ४० प्रस्ताव लेखपरीक्षणात उपलब्ध केलेले नाहीत. त्यामुळे सदर प्रकल्पाकडील लाभार्थ्यांचे मंजूर यादीप्रमाणे प्रस्ताव संगणक प्रशिक्षण घेवून एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण झालेबाबत खात्री करता आली नाही. एकूण ११८ लाभार्थी X २५००/- प्रमाणे रक्कम रुपये २,९५,०००/- वसुल करणे आवश्यक आहे.

(८) मुळ अहवालातील परिच्छेद क्र.१ प्रमाणे एकूण ११ लाभार्थींचे उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र तपासणीस उपलब्ध झाले नाही. पुर्तता दाखविणे आवश्यक आहे. अन्यथा रक्कम रुपये २७,५००/- वसुल करणे आवश्यक आहे.

(९) सिन्नर-२ व बागलाण-२ प्रकल्पाकडील लाभार्थींचे प्रस्तावाची तपासणी केली असता सदर लाभार्थी एमएससीआयटी परिक्षा सन २०११-१२ मध्ये उत्तीर्ण झालेचे प्रमाणपत्र आवश्यक होते परंतु सदर लाभार्थी सन २०११-१२ मध्ये उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र उपलब्ध न झाल्याने रक्कम रुपये ५,०००/- वसुल करणे आवश्यक आहे.

(१०) बागलाण १ व २ प्रकल्पाकडील एकूण १७ लाभार्थी एमएससीआयटी परीक्षा अनुत्तीर्ण असल्याचे आढळून आले. एकूण १७ लाभार्थी रुपये २,५००/- प्रमाणे रक्कम रुपये ४२,५००/- वसुल करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) जि.प.अंदाजपत्रक मंजुरी, विविध जि.प.समिती सभांची मान्यता, प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता घेणे, निविदा मागविणे, फेरनिविदा करणे या सर्व प्रक्रियेस लागणारा कालावधी त्यामुळे महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र. झेडपीए-२००८/प्र.क्र.४४६/वित्त-९ दिनांक २० जुन, २००८ अन्वये योजना राबविणेबाबतचे वेळापत्रकानुसार योजना राबविणे शक्य झालेले नाही. मात्र ३१ मार्च पूर्वी उपलब्ध सर्व निधी हा योग्य प्रक्रिया करुनच १००% खर्च करण्यात आलेला आहे.

(२) उप मु.का.अ. जि.प.नाशिक यांच्या अटी व शर्तीनुसार प्रशिक्षण उद्घाटनासाठी स्थानिक जि.प.सदस्य, पं.स.सदस्य व इतर लोकप्रतिनिधी यांना आमंत्रित करण्यात आलेले असून यांना या प्रशिक्षण वर्गास बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी नियमित भेटी दिलेल्या आहेत. तसे कागदपत्रे व शेरे बुक समवेत सादर केलेले आहेत.

(३) लाभार्थी नोंदवही ही जिल्हास्तरावर न ठेवता प्रकल्पस्तरावर ठेवण्यात आलेली आहे. तसेच लाभार्थी शासकीय/ निमशासकीय कर्मचारी यापैकी नसलेबाबतचे प्रमाणपत्र घेणेत आलेले असून ते प्रकल्पस्तरावर जतन करण्यात आलेले आहेत. सोबत नमुनादाखल काही प्रमाणपत्रे सादर केलेले आहेत.

(४) कुटूंबाने गेल्या १० वर्षात जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण अथवा समाजकल्याण विभागाच्या स्वयंरोजगाराच्या वैयक्तीक योजनेचा लाभ घेतला नसल्याचे प्रमाणपत्र बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे घेतलेले असून ते सोबत सादर केलेले आहे.

(५) महिला बालकल्याण विभाग जि.प.नाशिक आदेश क्र.मबाक/अर्थ/६९०/११ दिनांक १४/११/२०११ नुसार प्रशिक्षणाचा लाभार्थींना पुरेपुर लाभ घेतल्याची तसेच प्रशिक्षण गुणवत्ता व उपयुक्तता याची खातरजमा केल्याबाबतचा अहवाल उप मु.का.अ.(बा.क.) यांना पाठविलेला असून त्यानंतरच संबंधित संस्थेस अनुदान वितरीत केलेले आहे.

(६) लाभार्थी तंत्रज्ञान परिक्षेस बसला नाही तर दिलेल्या लाभाची रक्कम पूर्णपणे परत घ्यावयाची आहे. त्यासंबंधी लाभार्थीकडून रु.५०/- चे मुद्रांकार हमीपत्र लिहून घेणे आवश्यक असतांना ज्या प्रकल्पात कोरे मुद्रांक जोडलेले आहेत त्यांनी सदर मुद्रांक परिपूर्ण लिहलेले असून ते सोबत सादर केलेले आहेत.

(७) लेखापरिक्षण वर्षात प्रकल्प सुरगाणा ७८ प्रस्ताव, नांदगाव ४० प्रस्ताव, संबंधित कर्मचारी यांनी दाखविणे कामी आणले होते. परंतु नजरचुकीने सदर प्रकरणे ही लेखापरिक्षक यांना बघता आली नाहीत, मात्र सदरची प्रकरणे ही आतादेखील उपलब्ध असून सर्व लाभार्थी उत्तीर्ण असल्याने वसूली करण्यात आलेली नाही.

(८) मूळ अहवालातील परिच्छेद क्र.१ प्रमाणे एकूण ११ लाभार्थींचे उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र तपासणीस उपलब्ध झालेले नसल्यामुळे सदर लाभार्थी यांचेकडून रु. २७,५००/- वसूल करणेत आलेली असून तसे चलन सोबत सादर केलेले आहे.

(९) सिन्नर-२ व बागलाण-२ प्रकल्पाकडील लाभार्थींचे प्रस्तावाची तपासणी केली असता सदर लाभार्थी एमएस-सीआयटी परिक्षा सन २०११-१२ मध्ये उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र उपलब्ध न झाल्याने रुपये ५०००/- वसूल करणेत आलेली असून तसे चलन सोबत सादर केलेले आहे.

(१०) बागलाण १ व २ प्रकल्पाकडील एकूण १७ लाभार्थी एमएस-सीआयटी परिक्षा अनुत्तीर्ण असल्याचे आढळून आले. एकूण १७ लाभार्थींचे २५००/- प्रमाणे ४२,५००/- वसूल करणेत आलेली असून तसे चलन सोबत सादर केलेले आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.७९५ (४४२)/१९:- नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन रकमेबाबत (सन २०११-१२)**

जिल्हा परिषद, नाशिक, सन २०११-१२ (परिच्छेद क्रमांक १९) : महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अनियो/ १००७/प्र.क्र.१८१/आस्था ११/दि. २१ मे २०१० नुसार परिभाषित अंशदान निवृती वेतन योजना लागू केलेली असून अर्धसमास पत्र क्र.१, दिनांक २०/१०/२०११ नुसार विचारणा केली असता दिनांक ३१.१०.२०११ पर्यंतच्या महिन्याच्या आधारे खालील अनियमितता आढळून आल्या.

(१) उपरोक्त अर्धसमास पत्रान्वये दिनांक ०१/११/२००५ नंतर सेवेत दाखल झालेले शिक्षक कर्मचारी व इतर कर्मचारी जिल्हा परिषदेच्या १५ तालुक्यातील परिशिष्टातील ६ गटाची माहिती प्राप्त असून ९ गटाची माहिती लेखा परिक्षणास उपलब्ध न झाल्याने प्राप्त करुन नोंदवहया पूर्ण करणे आवश्यक आहे.

(२) उपरोक्त अर्धसमास पत्रान्वये व दिनांक २१/०५/२००० च्या शासन निर्णयान्वये शिक्षक कर्मचारी व इतर कर्मचा-यांना निवृत्ती वेतन लेखा क्र. व कपात वर्गणीची रक्कम लेख्यात जमा दिसत नाही. गट निहाय प्राप्त २८०२ डीसीपीएस क्रमांक ऑक्टोबर २०१२ अखेर देण्यात आलेला आहे. उर्वरित कर्मचा-याबाबत कार्यवाही प्रलंबित आहे. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अंनियो/१००७/१८/सेवा-४/दिनांक ०७/०७/२००७ शासन निर्णयानुसार कर्मचा-याची माहिती नमुना नं.१ मध्ये माहिती प्राप्त करुन राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई यांना सादर करुन लेखा क्रमांक प्राप्त करणे आवश्यक आहे. कर्मचा-याचे कपात केलेले अंशदान, संस्थेचे सममुल्य प्राप्त व्याज बाबत जबाबदारी राज्य अभिलेख देखभाल अभिकरण मुंबई यांचेकडे रक्कमा जमा होईपावेतो पंचायत समिती व जिल्हा परिषदेची दिसून येते.

लेखा क्रमांक प्राप्त करुन जमा रक्कम व व्याज संबंधितांचे खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो/१००७/प्र.क्र.१८१/आस्था ११/दि. २१ मे २०१० च्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषद कर्मचा-यांसाठी परिभाषित अंशदान निवृती वेतन योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती विषद केल्यानुसार नाशिक जिल्हा परिषदेने खालील प्रमाणे कार्यवाही केलेली आहे.

(१) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो/१००७/प्र.क्र.१८१/आस्था ११, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दि. २१ मे २०१० मधील परिच्छेद क्रमांक २७ नुसार दिनांक ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर जिल्हा परिषद सेवेत नियुक्त झालेल्या इतर कर्मचा-यांचे (शिक्षक कर्मचारी वगळून) नाशिक जिल्हा परिषदेचे १५ गटांपैकी मालेगाव गट वगळता १४ गटांनी लेखे पूर्ण केले असून नमुना-आर (day book), आर-५ (Ledger), आर-६ (Broadsheet) विहित नमुन्यात जिल्हा परिषद स्तरावर ठेवण्यात आलेले आहेत. सन २००६-०७ ते २०१३-१४ पर्यंतचे अद्ययावत केलेले लेखे सन २०१३-१४ च्या स्थानिक निधी लेखा परिक्षणास उपलब्ध करुन देण्यात येऊन सन २०१३-१४ पर्यंतचे लेखा परिक्षण करुन घेण्यात आलेले आहे.

तसेच शिक्षक कर्मचा-यांच्या बाबतीत नमुना आर-४ व आर-६ अद्ययावत ठेवण्यात आलेले आहे. शिक्षकांच्या बाबतीत अद्यापपर्यंत शासन स्तरावरुन कर्मचारी अंशदानाइतके शासन समरुप अंशदानासाठी व व्याजाची रक्कम (कर्मचारी अंशदान + शासन समरुप अंशदान) जमा करणेबाबत कोणतेही आदेश प्राप्त नसल्यामुळे शिक्षक कर्मचा-यांचे लेखे आर-५ व वार्षिक विवरण पत्र नमुना आर-३ तयार करणेस अडचणी निर्माण झालेल्या आहेत.शिक्षक कर्मचारी यांचे लेखे आर-६, सन २०१३-१४ च्या स्थानिक निधी लेखा परिक्षणास उपलब्ध करुन लेखा परिक्षण करुन घेण्यात आलेले आहे. शासन निर्णय दिनांक २१ मे २०१० नुसार नोंदवहया पूर्ण करुन लेखा परिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

(२) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अंनियो/१००७/१८/सेवा-४/दिनांक ०७/०७/२००७ व ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो/१००७/प्र.क्र.१८१/आस्था ११, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दि. २१ मे २०१० च्या शासन निर्णयान्वये लेखा परिक्षणाचे वेळी पात्र एकूण २८३७ शिक्षकांना व इतर कर्मचारी (शिक्षक कर्मचारी वगळून) सर्व संबंधित कर्मचा-याची माहिती नमुना नं. १ मध्ये प्राप्त करुन घेऊन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेचा लेखा क्रमांक प्रदान करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच पंचायत राज सेवार्थ प्रणाली मध्ये वेतन अदा करण्यासाठी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या इतर कर्मचा-यांना (शिक्षक कर्मचारी वगळून) लेखा क्रमांक घेणे बंधनकारक असल्यामुळे परिभाषित अंशदान निवृती वेतन योजना लागू असलेल्या कर्मचा-यांना लेखा क्रमांक प्रदान करण्यात आलेले आहे. याबाबतची नोंद आर-१ रजिष्टर मध्ये ठेवण्यात आलेली आहे. आजपावेतो शिक्षक व इतर कर्मचारी (शिक्षक कर्मचारी वगळून) एकूण ३६६२ कर्मचा-यांना परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे लेखा क्रमांक प्रदान करण्यात आलेले आहे. शासन निर्णयानुसार लेखा क्रमांक प्रदान करणेची अंमलबजावणी केलेली आहे.

तसेच महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक अ.अंनियो/१००७/प्र.क्र.१८१/आस्था ११, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दि. २१ मे २०१० च्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषद कर्मचा-यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती विषद केल्यानुसार शासन निर्णयामधील परिच्छेद क्रमांक ४ नुसार मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना या योजनेचे उप राज्य अभिलेख देखभाल अभिकरण म्हणून राहतील अशा सूचना दिलेल्या असल्यामुळे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडूनच परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे लेखा क्रमांक प्रदान करण्यात

आलेले आहेत. तसेच या विषयीचे इतर कर्मचा-यांचे लेखे आर-४ (Day book), आर-५ (Ledger), आर-६ (Broadsheet) अद्ययावत ठेवण्यात आलेले आहेत. तसेच शासनाकडून वेळोवेळी कर्मचारी अंशदानाइतकी शासन समरुप अंशदान रक्कम व त्यावरील व्याज रक्कमेचे अनुदान शासनाकडून प्राप्त करुन घेण्यात आलेले आहे. कर्मचारी अंशदान व शासनाचे समरुप अंशदान व त्यावरील व्याजाची परिगणना करण्यात येऊन लेखे आर-५ अद्ययावत करण्यात आलेले आहेत. कर्मचा-यांना नमुना आर-३ वार्षिक विवरण पत्र सन २०१४ अखेर पर्यंत वितरित करण्यात आले आहेत.

शिक्षक कर्मचा-यांच्या बाबतीत अद्यापपर्यंत शासनाकडून कर्मचारी अंशदानाइतके शासन समरुप अंशदान व व्याजाची रक्कम जमा करणेबाबतचे आदेश अप्राप्त आहेत. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून शिक्षक कर्मचारी यांचे अंशदानाइतके शासन समरुप अंशदान व व्याज इत्यादी करिताचे आदेश प्राप्त झाल्याशिवाय शिक्षक कर्मचा-यांचे लेखे नमुना आर-५ व आर-३ पूर्ण करता येत नाही.

त्या व्यतिरिक्त आवश्यक ती कार्यवाही जिल्हा परिषदाकडून पूर्ण करण्यात आली आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.४ (४५८ व ४५९) (२) :- यशवंत ग्राम समृध्दी योजनेतून रुईपेठा येथील अंगणवाडी इमारत खर्चाबाबत (पंचायत समिती पेठ, जिल्हा नाशिक) (सन २०११-१२)**

(१) अंगणवाडी बांधकाम बाबत सन २०११-१२ अखेर पूर्ण व अपूर्ण अंगणवाडी इमारतीची माहिती अर्धसमास पत्र क्रमांक १६, दिनांक ०६.०९.२०१२ देऊन सदर अंगणवाडी बांधकाम पूर्ण तसेच संबंधित ग्राम पंचायतीचा नमुना क्रमांक ८, जागेचा ७/१२ उतारा, मागणी करुन उपलब्ध झाली नाही. महिला व बालकल्याण विभागाने दिलेल्या माहिती तसेच यादी मध्ये रुईपेठा एकच अंगणवाडी असून ती डोंगरी विकास योजनेमधून बांधण्यात आल्याचे नमूद आहे. यशवंत ग्राम समृध्दी योजनेमधून दिनांक २४.०८.२०११ रोजी रु. ८०,०००/-, दिनांक २८.१२.२०११ रोजी रुपये ४०,०००/- असे एकूण रुपये १,२०,०००/- प्रदान केले आहे. सन २००४-०५ मध्ये सदर कामावर रुपये ८०,०००/- खर्च नोंद आहे.

(२) सन २००४-०५ मधील अपूर्ण अंगणवाडी बांधकाम सन २०११-१२ मध्ये पूर्ण केले असून सन २०११-१२ मधील महिला व बालकल्याण विभागाचे माहितीच्या आधारे रुईपेठा येथे यशवंत ग्राम समृध्दी योजना निधी मधून अंगणवाडी बांधकाम केल्याचे नमूद नाही. सदर योजना सन २००८-०९ पासून बंद झाली असून योजना बंद असतांना खर्च नोंद केला आहे. बांधकाम केले नसतांना अंगणवाडी नसतांना केलेला खर्च रुपये २,००,०००/- (सन २००४-०५ मधील रुपये ८०,०००/-, सन २०११-१२ मधील रुपये १,२०,०००/-) वसूली बाबत योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

अंगणवाडी इमारत बांधकाम हे ग्राम पंचायत गावठाण हद्दीत झाले असून त्याची नोंद नमुना नंबर ८ (ड) मध्ये घेऊन सोबत नं.८ ड अवलोकनार्थ जोडलेला आहे. सदर अंगणवाडी ही यशवंत ग्राम समृध्द योजनेमधूनच बांधण्यात आलेली आहे. याबाबत सरपंच, ग्रामसेवक, ग्रामस्थ यांचा जबाब सादर करण्यात येत आहे. यशवंत ग्राम समृध्दी योजनेंतर्गत अंगणवाडी इमारत मंजूर झाल्याचे आदेश समवेत अवलोकनार्थ सादर करण्यात आलेले आहेत. तसेच रुपये २,००,०००/- (दोन लाख मात्र) इतक्या रक्कमेचे शाखा अभियंता (इ. व द.) जिल्हा परिषद उपविभाग पेठ यांचेकडील अंतिम पूर्णत्वाचा दाखला व मोजमाप पुस्तिका व अंगणवाडी इमारत बांधकामाचे छायांकित फोटो इत्यादी कागदपत्र जोडलेले आहेत. सदर अंगणवाडी इमारत बांधकाम दोन टप्प्यात झाले असून सन २००५-०६ व तद्नंतर सन २०१०-११ मध्ये योजनेची मुदत संपल्यानंतर बांधकाम पूर्ण झाले आहे. सदर इमारतीची देयके सादर केलेनंतर संबंधित सहाय्यक लेखाधिकारी, गट विकास अधिकारी यांनी शासनाचे आदेशाचे तंतोतंत पालन केलेले नाही. परिणामी सदरची देयके नियमबाहय रित्या पारित केले असून संबंधितांकडून एक रक्कमी वसूली करण्याबाबतची कार्यवाही पंचायत समिती स्तरावर चालू आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.५ (४५९) (३२) :- ठक्कर बाप्पा योजना अनुदान व खर्चाबाबत (सन २०११-१२)**

(१) पंचायत समिती, सुरगणा येथील नमुना क्र. १३ जमा नोंदवही नुसार ठक्करबाप्पा योजनेंतर्गत विकास कामांसाठी रक्कम रुपये १,०६,०३,०००/- अनुदान प्राप्त झाले असून सन २०११-१२ मध्ये रक्कम रु. ५१,४३,९२४/- इतका खर्च

१८ विकास कामांवर केलेला आहे. तथापि बांधकाम उपविभाग, सुरगणा यांनी सदर योजनेंतर्गत प्राप्त अनुदान पूर्ण व अपूर्ण कामे, त्यावरील खर्च, शिल्लक अनुदान याबाबत नोंदवही ठेवलेली नाही.

(२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील तरतूदी व अर्धसमास पत्र क्रमांक १, दिनांक १०.७.२०१२ व अर्धसमास पत्र क्र.६, दिनांक ३०.०७.२०१२ अन्वये सदर योजनेतील पूर्ण-अपूर्ण कामाची नस्ती, मोजमाप पुस्तिका, अंदाजपत्रक इत्यादी लेखे मागणी करुनही लेखा परिक्षणास उपलब्ध करुन दिले नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

शकात नमूद केल्यानुसार खालील प्रमाणे मुद्देनिहाय अनुपालन सादर करण्यात येत आहे.

(१) ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत १६ कामांची नोंदवही उपविभाग स्तरावर ठेवणेत आलेली आहे. सोबत पूर्ण/अपूर्ण कामांची यादी व नोंदवहीची छायांकित प्रत जोडण्यात आलेली आहे.

(२) सन २०११-१२ चे लेखा परिक्षणाचे वेळी अर्धसमास पत्र क्र.१, दिनांक १०.०७.२०१२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे माहे सप्टेंबर, २०११ व माहे मार्च, २०१२ हे महिने लेखा परिक्षणास निवडण्यात आलेले होते. त्यानुसार लेखा परिक्षणास सदर कालावधीतील २ नस्ती लेखा परिक्षणास उपलबध करुन देण्यात आलेल्या होत्या. त्यानंतर अर्धसमास पत्र क्र. ६, दिनांक ३०.०६.२०१२ अन्वये सर्व नस्ती उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या, परंतु मागणी केलेल्या उर्वरित १४ कामांच्या मोजमाप पुस्तिका विभागीय कार्यालयाकडे असल्याने त्याच दिवशी उपलब्ध करुन देता आल्या नाहीत. सोबत पूर्ण झालेल्या १६ कामाच्या पूर्णत्वाच्या दाखल्याच्या छायांकित प्रती सोबत जोडण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ नुसार पंचायत समितीने आवश्यक ती कागदपत्रे लेखा परिक्षणास उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे, परंतु काही कामाचे मोजमाप पुस्तिका विभागीय कार्यालयाकडे असल्याने त्याच दिवशी उपलब्ध करुन देता आल्या नाहीत. तथापि सन २०१२-१३ लेखा परिक्षणाचे वेळी उर्वरित मोजमाप पुस्तिका सह संपूर्ण नस्त्यासह उपलब्ध करुन दिलेल्या असून त्यानुसार सन २०१२-१३ मध्ये परिच्छेद क्रमांक ६ (२७) घेण्यात आलेला आहे. कृपया शक स्वीकृत होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.५३ (४७९) (२९) :- प्राथमिक शाळांना पट संख्या निहाय मंजूर तसेच भरलेली पदांबाबत (सन २०११-१२)**

पंचायत समिती बागलाण, जिल्हा नाशिक यांनी सन २०११-१२ (परिच्छेद क्र.२९), पंचायत समिती अंतर्गत प्राथमिक शाळेसाठी पटसंख्येनिहाय मंजूर पदे अप्राप्त बाबत खालील प्रमाणे आक्षेप देणेत येत आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, शिक्षण व सेवायोजन विभागाकडील शासन निर्णय क्र. पीआई ७०७८/२३८२/७, डीएफ, दिनांक २८.०८.१९८० अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थाकडील मान्यता प्राप्त प्राथमिक शाळांमधील शिक्षक संख्या निश्चिती बाबतचे आदेश व नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

(२) शासन निर्णय क्र. पी.आर.ई. १०९३/२२१, प्राथमिक-१, दिनांक ३१.०१.१९९६ अन्वये शिक्षकांना (कमी/जादा) शाळेवर सामावून घेणेबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(३) मंजूर पद संख्या निहाय प्राथमिक शिक्षकांना दरमहा प्रदान केलेले मासिक वेतनावर झालेल्या खर्चाबाबत अभिप्राय देता येत नाहीत याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) सोबतचे शकात नमूद केलेप्रमाणे माहे सप्टेंबरच्या पटसंख्येनुसार शासन निर्णय क्रमांक पीआरई-१०९३/२२१/प्राथ-१, दिनांक ३१.०१.१९९६ अन्वये बागलाण गटातील शाळा निहाय शिक्षक संख्या मान्यतेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील आदेश क्र. शिक्षण/प्राथ-२/कॅम्प/२०११, नाशिक, दिनांक ०८.१२.२०११ नुसार ३०९ शाळांना (मुख्या.३६, पदवीधर शिक्षक १४, उपशिक्षक ७८७) एकूण ८३७ शिक्षक संख्या निश्चित करण्यात आलेली आहे व तशी नोंदवही ठेवण्यात आलेली आहे. सदरहू शाळेनिहाय मंजूर करणेत आलेल्या शिक्षक निश्चितीची नोंदवहीतील यादीची छायांकित प्रत समवेत जोडली आहे.शक स्वीकृत होणेस विनंती आहे.

(२) बागलाण गटातील माहे सप्टेंबरच्या पटसंख्येनुसार शिक्षक निश्चिती निकषानुसार उपरोक्त उल्लेखित मंजूर आदेशानुसार करणेत आलेली आहे. तसेच मंजूर केलेल्या पदांनुसार व शासन निर्णयानुसार शिक्षक समायोजनाची कार्यवाही माहे-डिसेंबर, २०११ मध्ये करणेत आलेली असून शिक्षक निश्चिती नंतर तपासणी करणेत आलेल्या माहे मार्च, २०१२ मध्ये बागलाण गटास मंजूर करणेत आलेल्या शिक्षक निश्चितीचे पदांपैकी एकूण-२ मुख्या., १ पदवीधर शिक्षक व २८ प्रा.शि. (मराठी २७ व उर्दू १) शिक्षकांचे पदे रिक्त होती.

(३) प्रत्यक्षात शिक्षकाची २८ पदे व मुख्याध्यापक २ इतकी पदे रिक्त असल्याने मंजूर पदांपेक्षा जास्त शिक्षकांचे वेतन अदा करणेत आलेले नाही. बाबत समवेत रिक्त पदांचा अहवाल अवलोकनार्थ जोडलेला आहे.

तरी कृपया शकाचे अवलोकन होऊन शक स्वीकृत होणेस विनंती.

**परिच्छेद क्रमांक ४.१२० (५०३) (५०४) (३) :- ग्राम पंचायत घोडेगाव, तालुका मालेगाव येथे सिमेंट प्लग बंधारा बांधकामातील अनियमितता (सन २०११-१२)**

याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) सदर कामाच्या अंदाजपत्रकानुसार रुपये १०,००,०००/- ग्राम पंचायतीस प्रदान करण्यात आलेले आहे, परंतु कामावर रक्कम रुपये ९,२०,०००/- एवढा खर्च केलेला आहे. अखर्चित रक्कम रुपये ५०,०५३/- शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

(२) कामाच्या मोजमाप पुस्तिकेनुसार रॉयल्टीची रक्कम रुपये २७,३१३/- शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

(३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.बीसीए २००९/प्रक्र.१०८/कामगार ७ अ, दिनांक १७.०६.२०१०, परिच्छेद ५ नुसार कामगार कल्याण उपकर निधी १०,०००/- शासन भरणा करणे आवश्यक आहे.

(४) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विमस-१०९८/प्र.क्र.२९/९८,शासन हमी, दिनांक १०.०८.१९९८ व ग्राम विकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र. जिप २/२०००/प्र.क्र.८३७/पंरास (३५), दिनांक १५.०९.२००३ तसेच संचालक, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचे पत्र क्रमांक प्रविनी १/१८०१/सीआर/जि.प./संकीर्ण, दिनांक ३०.०७.२००२ नुसार कामाचा विमा रक्कम रुपये १०,०००/- शासन सदरी भरणा करण्याबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे.

(५) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील नियम १५३ (१) नुसार अंदाजपत्रकाप्रमाणे काम केलेले नाही. एका बाबीवरील बचत दुस-या बाबीवर वापरण्यात आलेली आहे. नियम १५३ (२) प्रमाणे सक्षम प्राधिका-याची मान्यता घेतलेली नाही. जादा खर्च रक्कम रुपये ५०,६२५/- बाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे.

(६) कामाचा चाचणी अहवाल नस्ती सोबत जोडलेला नाही, त्यामुळे कामाच्या साहित्याची गुणवत्ताबाबत खात्री करिता आली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ८७ तसेच ग्राम विकास विभाग परिपत्रक क्र. सिमेंट १०९९/प्र.क्र.५६/३५, दिनांक ३०.०६.२००० नुसार व सार्वजनिक बांधकाम विभाग, परिपत्रक एसटीआर/१०९७/प्र.क्र.१०६/साबां, दिनांक ०९.०२.१९९८ अन्वये कार्यवाही करण्यात आलेली नाही. चाचणी अहवाल प्राप्त केलेला नाही. कामावर फलक लावण्यात आलेला नाही. तसेच कामाचा फोटो जोडलेला नाही.

कृपया शकाचे अवलोकन होऊन शक स्वीकृत होणेस विनंती.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) शकाप्रमाणे सन २०११-१२ या वर्षात लेखा शिर्षक २५१५ अंतर्गत ग्राम पंचायत घोडेगाव येथे सिमेंट प्लग बंधा-याचे काम अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १०,००,०००/-मात्र मंजूर करण्यात आले होते. सदर कामासाठी ग्राम पंचायतीस रक्कम रुपये १०,००,०००/- मात्र अनुदान प्राप्त झाले होते. ग्राम पंचायतीने मुदतीत काम पूर्ण करुन घेण्याचे नियोजन केले, त्याप्रमाणे दिनांक ३१.०३.२०१२ अखेर रु. ९,४९,९४७/- मात्र कामावर खर्च करुन मुदतीत काम पूर्ण केले. ग्राम पंचायतीस अखेरचा २० टक्के अनुदान हप्ता हा दिनांक २८.०३.२०१२ ला रेखांकित धनादेशाने प्राप्त झालेला आहे. ग्राम पंचायतीकडे रक्कम रु. ५०,०५३/- मात्र अनुदान ग्रामनिधीत शिल्लक राहिल्याचे दिसून येते. ग्राम पंचायतीस अखेरचे प्राप्त होणारे अनुदान हप्त्यातून कामाच्या अंदाजपत्रकाच्या एक टक्का कामगार कल्याण उपकर शासनास भरणा करण्याचे नियोजन होते, तसेच शिल्लक निधीतून कामावरील इतरही खर्च रक्कमा देणे बाकी होत्या.

शकातील बाब क्र.०४ नुसार सदर काम सुरु करण्यापूर्वी संबंधित कंत्राटी कामाचा व त्या अनुशेषाने कामगाराचा विमा उतरविणे बाकी होते. सदर कामाचे विम्याची रक्कम मा. डायरेक्टर ऑफ इन्शुरन्स, महाराष्ट्र, मुंबई यांना धनादेश क्र. ०००००२४, दिनांक ०४.०२.२०१६ रोजी रक्कम रुपये १०,०००/- मात्र रजिष्टर पोष्टाने भरणा केले आहेत. (सोबत भरणा चेकची व रजिष्टर पोस्टाने पाठविल्याची छायांकित प्रत जोडलेली आहे.)

शकातील सूचनेप्रमाणे उर्वरित अखर्चित संपूर्ण शिल्लक अनुदान रक्कम रु.३०,०५३/- मात्र शासनास चलनाने दिनांक ०५.०२.२०१६ रोजी भरणा केले आहेत. (सोबत भरणा चेक व चलनाची छायांकित प्रत जोडलेली आहे.)

ग्राम पंचायतीकडे अखर्चित शिल्लक निधी नाही. शकाप्रमाणे संपूर्ण शिल्लक निधी शासनास भरणा करण्यात आलेला आहे. तरी शक स्वीकृतीस विनंती आहे.

(२) सदर कामासाठी रेती व खडी वाहतुकदार श्री. दादाजी सुकदेव शेवाळे यांचेकडून करण्यात आले होते. गौण खनिजची (रेती व खडी) रॉयल्टी रक्कम भरणा केलेल्या पुरवठादाराकडून वाहतुकदार श्री. दादाजी सुकदेव शेवाळे यांनी गौण खनिज (रेती व खडी) घेऊन ग्राम पंचायतीस पुरवठा केलेला होता. गौण खनिज पुरवठादार इमॉटल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. नाशिक यांचेकडून श्री. दादाजी शेवाळे यांनी दिनांक २४.०२.२०१२ रोजी ८७ ब्रास रेतीची रॉयल्टी भरणा केल्याची पावती ग्राम पंचायतीस दिलेली आहे. महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई खनिज वाहतुक परवाना पावती क्रमांक ००८६१२५ ने दिनांक २४.१२.२०१२ खडी व रेती खरेदी केल्याची छायांकित प्रत सोबत जोडलेली आहे. ग्राम पंचायतीने खरेदी केलेल्या गौण खनिजाची रॉयल्टीची रक्कम शासनास भरणा झालेली आहे. तरी शक स्वीकृतीस विनंती आहे.

(३) ग्राम पंचायतीस अखेरचे प्राप्त होणारे अनुदान हप्त्यातून उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, निर्णय क्रमांक बीसीए २००९/प्र.क्र.१०८/कामगार ७ अ, दिनांक १७ जून, २०१० नुसार कामाच्या अंदाजपत्रकाच्या एक टक्का कामगार कल्याण उपकर शासनास भरणा करण्याचे व इतरही कामावरील खर्च रकमा देण्याचे नियोजन होते. शकाप्रमाणे ग्राम पंचायतीने कामाच्या अंदाजपत्रकाच्या एक टक्का कामगार कल्याण उपकर, शासन खाते क्र. ००२४२२०११०००००१५३ मध्ये धनादेश क्र. ०००००२२, दिनांक ०३.०२.२०१६ रोजी रक्कम रुपये १०,०००/-मात्र भरणा केले आहेत. (सोबत भरणा बँक चलनाची छायांकित प्रत जोडलेली आहे.) तरी शक स्वीकृतीस विनंती आहे.

(४) सदर कामावर अनुभवी व कुशल कामगार लावून काम मुदतीत पूर्ण करण्याचे ग्राम पंचायतीने नियोजन केले होते. सदर काम ग्राम पंचायतीने कोणत्याही पोट कंत्राटदार यांना दिलेले नाही. ग्राम पंचायतीने स्वतः काम करण्याचे नियोजन केले होते. ग्राम पंचायतीस ४०%, ४०% व २०% याप्रमाणे अनुदान प्राप्त होणार होते, त्यामुळे जास्तीत जास्त निधी हा कामावर खर्च करण्याचे नियोजन होते. त्याप्रमाणे जास्तीत जास्त निधी कामावर खर्च करुन दिनांक ३१ मार्च, २०१२ पूर्वी मुदतीत काम पूर्ण करण्यात आले आहे. सध्या काम सुरु नाही व आता कामावर कामगार नाहीत, त्यामुळे कामगारांची आता काहीही जोखीम (अपघात वा इतर आकस्मिक घटना होणार) नाही. सदर कामाचे विम्याची रक्कम मा. डायरेक्टर ऑफ इन्शुरन्स, महाराष्ट्र, मुंबई यांना धनादेश क्र. ०००००२४, दिनांक ०४.०२.२०१६ रोजी रक्कम रुपये १०,०००/-मात्र रजिष्टर पोष्टाने भरणा केले आहेत. (सोबत भरणा चेकची व रजिष्टर पोष्टाने पाठविल्याची छायांकित प्रत जोडलेली आहे.) तरी शक स्वीकृतीस विनंती आहे.

(५) कामाचे स्थळानुसार प्रारुप अंदाज करुन कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते, परंतु प्रत्यक्ष काम करीत असतांना तांत्रिकदृष्ट्या योग्य व अचूक काम होण्याचे दृष्टीने ग्राम पंचायतीने सक्षम प्राधिकारी मा.उप अभियंता (लपा) उपविभाग, मालेगाव यांचे वेळोवेळी मार्गदर्शन घेवून काम केलेले आहे. मा. उप अभियंता (लपा) उपविभाग, मालेगाव यांचे मार्गदर्शन व कामाचे परिस्थितीनुसार शकातील नमूद एका बाबी वरील बचत दुस-या बाबीवर वापरण्यात आली आहे. ग्राम पंचायतीने अनुदानाचा वापर योग्य करुन अनुदानाची बचत केलेली आहे. ग्राम पंचायतीस कामाचे मुल्यांकन व नं.६५ हे मा. उप अभियंता (लपा) यांचे मान्यतेचे/स्वाक्षरीचे मिळाल्यामुळे सक्षम प्राधिकारी यांची मान्यता असल्याचे ग्राम पंचायतीने गृहीत धरुन काम दिनांक ३१.०३.२०१२ ला मुदतीत पूर्ण केले असून आता कामास ०४ वर्षे पूर्ण झालेली आहेत. शकातील नमूद कमी जास्त खर्च रक्कम रु. ५०,६२५/- हा सक्षम प्राधिकारी, मा. उप अभियंता (लपा) मालेगाव यांचे मार्गदर्शनानुसारच ग्राम पंचायतीने केलेला आहे. त्यामुळे सदरचा कमी जास्त झालेल्या खर्चास मान्यता मिळण्यास व शक स्विकृतीस विनंती आहे.

(६) ग्राम पंचायतीने तांत्रिकदृष्ट्या बंधा-याचे टेस्टींग रिपोर्टची प्रत दप्तरी ठेवली असून सोबत छायांकित प्रत जोडलेली आहे. तरी शक स्वीकृतीस विनंती आहे.

ग्राम पंचायतीने अधिकृत ACC सिमेंट पुरवठादार राधेय बिल्डिंग मटेरियल, सोयगाव यांचेकडून चांगले प्रतीचे ACC सिमेंट खरेदी केलेले होते. तांत्रिकदृष्ट्या बंधा-याचे टेस्टींग रिपोर्टची प्रत ग्राम पंचायतीस मिळालेली आहे, त्यावरुन काम गुणवत्तेचे झालेले आहे.

शकातील सुचनेनुसार ग्राम पंचायत नस्तीला फलकाचा फोटो ठेवण्यात आलेला आहे. कामाच्या माहितीचा फलक वेळीच कामावर लावण्यात आलेला होता. ग्राम पंचायतींने फलकाचा फोटो पंचायत समितीस सादर केल्यानंतर ग्राम पंचायतीस अंतिम अनुदान हप्ता प्राप्त झालेला होता. कामावरील फलकाचा फोटो समवेत जोडलेला आहे. तरी शक स्वीकृतीस विनंती आहे.

उक्त बाब क्रमांक १, ३ व ४ मधील सूचनांप्रमाणे शासनास अनुदान भरणा रक्कम व कामावरील प्रत्यक्ष खर्च रक्कम असे कामावरील एकूण रक्कम रुपये ९,६९,९४७/- मात्र खर्च झालेला दिसत आहे. मुल्यांकन व नं.६५ दाखला रक्कम रु. १०,१५,४५२/- मात्र ग्राम पंचायतीस प्राप्त झालेला आहे. खर्चापेक्षा मुल्यांकन जास्त रक्कमेचे ग्राम पंचायतीस प्राप्त झालेले आहे. उक्त बाब क्रमांक ०१ ते ०६ उणिवांची पुर्तता करण्यात आली आहे. तरी शक स्वीकृतीस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.१२२(५०४) (५०५) (३) :- पाटपिंपरी येथील स्मशान भूमी रस्ता दुरुस्ती करणे (तालुका सिन्नर) (सन २०११-१२)**

पंचायत समिती सिन्नर, जिल्हा नाशिक, सन २०११-१२ (परिच्छेद क्र.३) सदर कामाबाबत (१) प्रशासकीय मान्यता-६, दिनांक २१.०६.२०११ अन्वये मान्यता घेण्यात आलेली असून उपरोक्त खर्चाबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग नियम पुस्तिका नियम १९८४ नियम १९७ ठेकेदार पंजीकृत व काम करणेचे पात्रतेबाबत प्रमाणपत्र नाही.

(२) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक, विभाग नाशिक यांचे परिपत्रक क्रमांक ३१२/रस्ते/१९८४/ २००८, दिनांक २०.०४.२००८ अन्वये बांधकाम साहित्य वाहतुक अंतर १० कि.मी. अंतरावरुन आणलेले असतांना अधिक्षक अभियंता यांनी परवानगी घेतलेली नाही.

(३) शासन निर्णय क्र.बीसीएम/२००९/प्र.क्र.१०८/कामगार-७-अ, दिनांक १७.०६.२०१० नुसार (रोजगार नियम व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ तसेच इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम १९९८ अंतर्गत १ टक्का उपकर वसूल करणे बंधनकारक आहे. उपकर रक्कम रुपये १४४९/- वसूल करुन शासन सदरी भरणा करावी.

(४) रॉयल्टी रुपये १२,६४४/- वसुल करणे आवश्यक असतांना रुपये ९,११६/- कपात केलेली आहे. कमी कपात केलेली रक्कम रुपये ३,५२८/- वसुल करुन शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

(५) क्वॉरी चार्ट वरती क्वॉरी ठिकाण नमूद नाही त्यामुळे अंतराची खात्री करता आलेली नाही.

(६) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग ३ स्थाविका/२००३/प्र.क्र.३६९/का/१४४५ दिनांक २८.११.२००३ अन्वये माहिती फलकाशिवाय अंतिम देयक अदा केलेले आहे. वरील रकमांबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) कार्यकारी अभियंता (इ.व द.) विभाग क्र.१, जिल्हा परिषद, नाशिक यांचे पत्र क्रमांक जिपना/बांखा/इवद/१/नोंदणी/ ९४/२००८, नाशिक दिनांक २०.०९.२००८ अन्वये सदर संस्थेची वर्ग अ मध्ये नोंदणी करण्यात आलेली असल्याने सदर कामासाठी काम वाटप समितीने ह्या संस्थेची शिफारस केलेली आहे.

(२) सदर कामाची अंदाजित रक्कम रुपये १,४४,९००/- इतकी असून कामासाठी वापरण्यात आलेले साहित्य जसे खडी व मुरुम अनुक्रमे १०.०० कि.मी. व मुरुम ६.०० कि.मी. अंतरावरुन आणण्यात आलेले आहे. मुख्य अभियंता सा.बां. विभाग यांचे दिनांक २९.०४.२००८ अन्वये रुपये १० लाखांपेक्षा कमी किंमतीची कामे व १० कि.मी. पेक्षा जास्त वाहतुक नसलेल्या कामांना मा. मुख्य अभियंता यांचे तांत्रिक परिपत्रक क्र. का-२/रस्ते-१/१६८४/२००८, दिनांक २९.०४.२००८ अन्वये मा. अधिक्षक अभियंता यांची परवानगी घेणे आवश्यक नाही.

(३) कामगार कल्याण उपकर रक्कम रुपये १४४९/- बँक ऑफ इंडिया शाखा, माळेगाव, तालुका सिन्नर येथे दिनांक २२.११.२०१२ रोजी चलनाने खाते क्रमांक ००४२२०११००००१५३ या खात्यावर जमा करणेत आलेली आहे.

(४) कमी कपात केलेली रॉयल्टी रु.३५२८/- एस.बी.आय., शाखा सिन्नर येथे दिनांक २६.११.२०१२ रोजी शासन सदरी भरणा केलेली आहे.

(५) अंदाज पत्रकासोबत क्वॉरी चार्ट जोडलेला असून त्यामध्ये क्वॉरीचे ठिकाण नमूद आहे.

(६) कामाचा नामफलक बसविला असून त्याचे छायाचित्र दप्तरी दाखल आहे. सोबत सत्यप्रत जोडलेली आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.१२३ (५०५) (७) :- मनेगाव ते कर्डक मळा रस्ता दुरुस्ती करणे (तालुका सिन्नर) (सन २०११-१२)**

पंचायत समिती सिन्नर, जिल्हा नाशिक सन २०११-१२ (परिच्छेद क्रमांक ७) याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग, नियम पुस्तिका नियम १९८४ नियम १९७ नुसार ठेकेदार पंजीकृत व काम करणेचे पात्रतेबाबत प्रमाणपत्र नाही.

(२) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक, विभाग नाशिक यांचे परिपत्रक क्र.३१२/रस्ते/१९८४/२००८,दि.२०.४.२००८ अन्वये बांधकाम साहित्य वाहतुक अंतर १० कि.मी.अंतरावरुन आणलेले असतांना अधिक्षक अभियंता यांनी परवानगी घेतलेली नाही.

(३) क्वॉरी चार्ट वर क्वॉरी ठिकाण नमूद नाही, त्यामुळे अंतराची खात्री करता आलेली नाही.

(४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ नियम ८७ नुसार बांधकाम साहित्याची चाचणी सार्वजनिक बांधकाम विभाग, परिपत्रक क्र. एसटीआर १०९७/प्र.क्र.१०६, दिनांक ०९.०२.१९९८ अन्वये चाचणी अहवाल प्राप्त झाला नाही.

(५) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग ३, स्थाविका/२००३/प्र.क्र.३६९/का/१४४५, दिनांक २८.११.२००३ अन्वये माहिती फलकाशिवाय अंतिम देयक अदा केलेले आहे. तरी सदर रक्कम रुपये ३४६३/- वसूल करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) कार्यकारी अभियंता (इ.व द.) विभाग क्र.१, जिल्हा परिषद, नाशिक यांचे पत्र क्रमांक जिपना/बांखा/इवद/१/नोंदणी/९४/२००८, नाशिक दिनांक २०.०९.२००८ अन्वये सदर संस्थेची वर्ग अ मध्ये नोंदणी करण्यात आलेली असल्याने सदर कामासाठी काम वाटप समितीने ह्या संस्थेची शिफारस केलेली आहे.

(२) सदर कामाची अंदाजित रक्कम रुपये ७,५२,९००/- इतकी असून कामासाठी वापरण्यात आलेले साहित्य जसे खडी व मुरुम अनुक्रमे १०.०० कि.मी. व मुरुम ६.०० कि.मी. अंतरावरुन आणण्यात आलेले आहे. मुख्य अभियंता सा.बां. विभाग यांचे दिनांक २९.०४.२००८ अन्वये रुपये १० लाखांपेक्षा कमी किंमतीची कामे व १० कि.मी. पेक्षा जास्त वाहतुक नसलेल्या कामांना मा. मुख्य अभियंता यांचे तांत्रिक परिपत्रक क्र. का-२/रस्ते-१/१६८४/२००८, दिनांक २९.०४.२००८ अन्वये मा. अधिक्षक अभियंता यांची परवानगी घेणे आवश्यक नाही.

(३) अंदाज पत्रकासोबत क्वॉरी चार्ट जोडलेला आहे. क्वॉरीचे ठिकाण नमूद आहे.

(४) प्रधानमंत्री ग्रामसडक योजना जिल्हा प्रयोगशाळा नाशिक यांचे चाचणी अहवाल क्र.१२/११८३/२०१२, दिनांक ५.३.२०१२ अन्वये सदर कामांचे साहित्य तपासणीचा अहवाल प्राप्त असून सोबत सत्यप्रत जोडलेली आहे.

(५) कामाचा नामफलक बसविला असून त्याचे छायाचित्र दप्तरी दाखल आहे. सोबत सत्यप्रत जोडलेली आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.१२४ (५०५) (९) :- नायगाव अंतर्गत रस्ता खडी व डांबरीकरण करणे (तालुका सिन्नर) (सन २०११-१२)**

पंचायत समिती सिन्नर, जिल्हा नाशिक सन २०११-१२ (परिच्छेद क्रमांक ९) याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग, नियम पुस्तिका नियम १९८४ नियम १९७ नुसार ठेकेदार पंजीकृत व काम करणेचे पात्रतेबाबत प्रमाणपत्र नाही.

(२) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक, विभाग नाशिक यांचे परिपत्रक क्र.३१२/रस्ते/ १९८४/२००८,दि.२०.४.२००८ अन्वये बांधकाम साहित्य वाहतुक अंतर १० कि.मी.अंतरावरुन आणलेले असतांना अधिक्षक अभियंता यांनी परवानगी घेतलेली नाही.

(३) रॉयल्टी रुपये ३२,०५४/- वसूल करणे आवश्यक असतांना रुपये २२४५/- कपात केलेली आहे. कमी कपात केलेली रक्कम रुपये २९,८०९/- वसूल करुन शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

(४) क्वॉरी चार्ट वर क्वॉरी ठिकाण नमूद नाही, त्यामुळे अंतराची खात्री करता आलेली नाही.

(५) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग ३, स्थाविका/२००३/प्र.क्र.३६९/का/१४४५, दिनांक २८.११.२००३ अन्वये माहिती फलकाशिवाय अंतिम देयक अदा केलेले आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) कार्यकारी अभियंता (इ.व द.) विभाग क्र.१, जिल्हा परिषद, नाशिक यांचे पत्र क्रमांक जिपना/बांखा/इवद/१/नोंदणी/ ९४/२००८, नाशिक दिनांक २०.०९.२००८ अन्वये सदर संस्थेची वर्ग अ मध्ये नोंदणी करण्यात आलेली असल्याने सदर कामासाठी काम वाटप समितीने ह्या संस्थेची शिफारस केलेली आहे.

(२) सदर कामाची अंदाजित रक्कम रुपये ९,९९,३००/- इतकी असून कामासाठी वापरण्यात आलेले साहित्य जसे खडी ८.०० कि.मी., मुरुम ०४.०० कि.मी., वाळू ७०.०० कि.मी., सिमेंट २२.०० कि.मी., डांबर २१०.०० कि.मी. अंतरावरुन आणण्यात आलेले आहे. सदर कामासाठी खडी व मुरुम यांचे वाहतुकीचे अंतर १० कि.मी. पेक्षा कमी देण्यात आलेले आहे. वाळू व डांबर हे शासनाने अधिकृत केलेल्या ठिकाणावरुनच घेण्यात आलेले आहे. सिमेंट सिन्नर येथूनच घेण्यात आलेले आहे. मुख्य अभियंता, सा.बां. विभाग नाशिक यांचे दिनांक २०.०४.२००८ अन्वये रु. १० लाखांपेक्षा कमी किंमतीची कामे व १० कि.मी. पेक्षा जास्त वाहतुक नसलेल्या कामांना मा. मुख्य अभियंता यांचे तांत्रिक परिपत्रक क्र. का-२/रस्ते-१/१६८४/२००८ अन्वये अधिक्षक अभियंता यांची परवानगी घेणे आवश्यक नाही. तरी मुद्या स्विकृतीस विनंती.

(३) रक्कम रुपये २९,८०९/- एस.बी.आय., शाखा सिन्नर येथे दिनांक २८.२.२०१३ रोजी शासन सदरी भरणा केलेली आहे.

(४) अंदाज पत्रकासोबत क्वॉरी चार्ट जोडलेला असून त्यामध्ये क्वॉरीचे ठिकाण नमूद आहे.

(५) कामाचा नामफलक बसविला असून त्याचे छायाचित्र दप्तरी दाखल आहे. सोबत सत्यप्रत जोडलेली आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्र.४.१२६ खामखेडा ते फांगदरवाडी रस्ता भाग-२ किमी १/०० ते १/३४० पंचायत समिती, देवळा (सन २०११-१२)**

याबात खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम १५१ व बांधकाम लेखांसहिता नियम १०७ नुसार कामास प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर मुळ कामाचे नकाशे व अंदाजपत्रक तयार करुन तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक असताना तांत्रिक मंजुरी घेण्यात आलेली नाही.

(२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती, लेखासंहिता १९६८ चे नियम १४० (१) नुसार आदेश देण्यापुर्वी करारनामा करणे आवश्यक असताना अशाप्रकारे कार्यवाही केलेली नाही.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९८४ चे नियम १९७ प्रस्तुत कामाचे ठेकेदार पंजीकृत असल्याबाबत प्रमाणपत्र नस्तीबध्द केलेले नाही.

(४) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्र.झेडपीए/ २०००/प्र.क्र.४४/३३ दिनांक २२.१२.२००० शासन निर्णयातील बाब क्र १३ नुसार काम पूर्ण झाल्यानंतर पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तीकेत नोंदविणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

(५) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.व्हीपीएम/१०९९/प्र.क्र.५४/०८ दिनांक २०-५-१९९९ नुसार व महाराष्ट्र शासन निर्णय क्र. स्थाविका/२००३/प्र.क्र.३६९/का./१४४५ दिनांक २८-११-२००३ नुसार रक्कम रुपये २०,०००/- चे वरील कामाचे माहितीफलक बसविल्याशिवाय अंतिम देयक अदा करु नये असे आदेश असतांना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

(६) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ८७ नुसार बांधकामासाठी वापरण्यात यावयाचे साहित्य सिमेंट, वाळू, खडी, स्टिल, इ. ची व सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.एसटीआर/१०९७/प्रक्र १०६ साबां दिनांक ९-०२-१९९८ अन्वये डांबराची चाचणी व ग्रामविकास विभाग परिपत्रक क्र.सिमेंट/१०९९/प्र.क्र.५६/३५ दि.३०.६.२००० नुसार सिमेंट कामास वापरण्यापुर्वी शासकीय प्रयोगशाळेकडून चाचणी करुन घेण्यात येईल कामावर वापरलेल्या साहित्याच्या गुणवत्तेची खात्री पटली नाही.

(७) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम १९७ नुसार पूर्ण कामाच्या नोंदी नमुना नंबर ६९ मध्ये व नियम ९७ नुसार नमुना नंबर ३९ मधील अचल मालमत्ता नोंदवहीत व नमुना नंबर ४० मधील रस्ता नोंदवहीत घेणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) सदर कामास कार्यकारी अभियंता बांधकाम वि.क्र.२ यांनी जा.क्र.११४/०९ दिनांक १४/०७/२००९ अन्वये तांत्रिक मान्यता दिली आहे.

(२) सदर कामाचा मक्तेदाराचा करारनामा हा केला असून नस्ती सोबत अनावधानाने लावण्यात आलेला नव्हता.

(३) सदर ठेकेदार नोंदणीकृत व पात्र आहे. याबाबत खात्री केली आहे.

(४) मापपुस्तिकेत नोंद घेण्यात आलेली आहे. काम पूर्ण झाल्याबाबत प्रमाणपत्र जोडण्यात आलेले आहे.

(५) माहिती फलक बसविण्यात आल्याची खात्री करण्यात आलेली आहे व सोबत फोटो जोडण्यात आला आहे.

(६) प्रयोगशाळेचे गुणवत्ता प्रमाणपत्र प्राप्त असून गुणवत्तेची खात्री करण्यात आलेली आहे.

(७) सदरचे काम हे श्री.व्ही.पी.बोरसे, सु.बे.अ. यांना दिले होते. मक्तेदार यांनी विमा रक्कम भरली नसल्याने ती देयकातून कपात करुन भरणा केली आहे. रस्त्याचे काम असल्यामुळे नमुना नंबर ४० मधील नोंदवहीत नोंद घेण्यात आली आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.२१८ :- पंचायत समिती सेस मधुन ५० टक्के अनुदानावर शेतक-यांना सुधारित शेती औजारे सायकल, कोळपे पुरविणेबाबत :- (सन २०११-१२)**

पंचायत समिती, कळवण (जिल्हा नाशिक) सन २०११-१२ या वित्तीय वर्षात पंचायत समिती सेस मधून ५० टक्के अनुदानावर शेतक-यांना सुधारित शेती-औजारे, सायकल, कोळपे पुरविणेकरीता रक्कम रुपये १९,९५०/- खर्च केला आहे. याबाबत खाली आक्षेप आहेत.

(१) महाराष्ट्र शासन व ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/२००८/प्र.क्र./४४६/वित्त-९ मंत्रालय, मुंबई दिनांक २०-६-२००८ नुसार सदरची योजना ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार योजना राबविण्यात आलेली नाही.

(२) ग्रामविकास विभाग परिपत्रक क्र.परांस/सीआर/१६३३/५७ दिनांक १९/१/१९८५ नुसार पुरवठा आदेश देण्यापूर्वी लाभार्थी हिश्याची रक्कम वसुली करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करणे आली नाही.

(३) ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.१०९५८/प्र.क्र./७३/३४ दिनांक २०/११/१९९९ नुसार लाभार्थीचे प्रपत्र-अ मध्ये मास्टर नोंदवही ठेवून दुबार लाभ प्रदानाचे दृष्टीने उपाययोजना करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.—**

(१) प्रस्तुत योजनेचा लाभ हा अत्यल्प असल्याने रक्कम रुपये ३५०/- (अदमाशे अक्षरी :- तीनशे पन्नास रुपये मात्र) ही अत्यल्प असल्याकारणाने लाभार्थी निवडीस विलंब झाला आहे. तरी यापुढे शासन परिपत्रकानुसार योजनेची कार्यवाही माहे जुलैमध्ये कार्यान्वीत करुन माहे डिसेंबर अखेर पूर्ण करण्याची दक्षता घेण्यात येईल.

(२) ग्रामविकास विभाग परिपत्रक क्र.पंरास/सीआर/१६३३/५७ दिनांक १९/१/१९८५ नुसार पुरवठा आदेश देण्यापूर्वी वसुल करण्यात आला असून नंतरच साहित्य वाटपाची कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.१०९२८/प्र.क्र./७३/३४ दिनांक २०/११/१९९९ नुसार लाभार्थीचे प्रपत्र-अ मध्ये मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली असून दुबार लाभ न दिल्याबाबत खात्री करण्यात आलेली आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.२१९:- पंचायत समिती वाढीव उपकरातून १००% अनुदानावर शेतक-यांना ताडपत्री खरेदीतील अनियमितता (एस.सी., एस.टी. व एन.टी प्रवर्गातील शेतकरी) (सन २०११-१२)**

याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.—

(१) सन २०११-१२ या वर्षात समाजकल्याण १४ लेखाशिर्षाखाली रुपये ४,५५,७५२/- तरतुद केलेली आहे. तरतुद असतांना वित्तीय वर्षात खर्च करण्यात आलेला नाही.

(२) सन २०१०-११ मध्ये खर्च न केलेल्या २० टक्के अनुशेषाची तरतुद केलेली नाही. लाभार्थी निवड पडताळणीसाठी उपलब्ध झाली नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.पंरास/१०२०/प्र.क्र.१४/३८ दिनांक ०९/०२/२००१ नुसार साहित्य खरेदी करण्यापूर्वी लाभार्थीची निवड करण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(३) साठा नोंदवहीत साहित्य वाटपाचा दिनांक नमुद नाही. दरकरारातील अटी व शर्तीनुसार मालाचा पुरवठा झाल्यानंतर ९० टक्के पुरवठादारास रक्कम प्रदान न करता १०० टक्के रक्कम प्रदान केलेली आहे. सदर कार्यवाही नियमान्वये करण्यात आलेली नाही.

(४) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय, मागास/पंरास/१०९८/प्र.क्र.७३/३४ दिनांक २०/१०/१९९९ नुसार विहित नमुना विवरणपत्र 'अ' लाभार्थीची नोंदवही (मास्टर नोंदवही) ठेवलेली नाही. लाभार्थीस दुबार लाभ दिल्याबाबत तपासणी करता आली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) सन २०११-१२ या वित्तीय वर्षात १४ समाजकल्याण या लेखाशिर्षाखाली रक्कम रुपये ४,५५,७५२/- ची तरतुद करण्यात आलेली होती. मात्र पं.स.सेस ची तरतुद प्रत्यक्षात दिनांक १४/०३/२०१२ रोजी रुपये ४,४४,९०४/- प्राप्त झाल्याने व वित्तीय वर्षाचा कालावधी कमी त्या आर्थिक वर्षात खर्च करता आला नाही.

सन २०१०-११ वर्षातील २०% समाजकल्याण चा अनुशेष रक्कम रुपये २,३१,०४४/- पैकी सन २०११-१२ या वर्षात रक्कम रुपये २,०९,७६०/- इतका खर्च मागासवर्गीय लाभार्थीना ताडपत्री पुरविणे योजनेवर करण्यात आलेला आहे.

(२) योजनेच्या तांत्रिक आदेशातील अटी व शर्तीस अधिन राहून पात्र लाभार्थींना योजनेअंतर्गत लाभ देण्यात आलेला आहे. तसेच योजनेस पं.स. सर्वसाधारण सभा दिनांक २०/११/२०११ ठराव क्र.७८७ अन्वये कार्योत्तर मंजुरी दिलेली आहे.

(३) साहित्य वाटप नोंदवहीत वाटपाचा दिनांक नमुद करुन नोंदवही अद्यावत करण्यात आलेली आहे. दरकरारातील अटीत नमुद केल्यानुसार माल सुस्थितीत कार्यालयास प्राप्त झालेनंतर देयक अदा करणेत आलेली आहे.

(४) दिनांक २०/१०/१९९९ नुसार विहित नमुन्यात विवरण पत्र 'अ' मध्ये लाभार्थीची नोंदवही ठेवण्यात आलेली आहे व दुबार लाभ कोणत्याही लाभार्थीस देण्यात आलेला नाही.

**परिच्छेद क्रमांक ४.२२०:- ५० टक्के अनुदानावर ताडपत्री (प्लॅस्टीक) पुरविणेबाबत (सन २०११-१२)**

पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर, जिल्हा नाशिक सन २०११-१२ पंचायत समितीने ताडपत्री (प्लॅस्टिक) खरेदी करण्याकरीता रक्कम रुपये ४९,८९६/- ५० टक्के अनुदानाचा खर्च केलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) ग्रामविकास विभाग क्रमांक शासन परिपत्रक पी.आर.सी/१०८१/सी.आर १९४०/३४ दिनांक १४/०६/१९८२ नुसार साहित्य प्राप्त झाल्याखेरीज पुरवठादारास रक्कम प्रदान करण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(२) लाभार्थी निवड केल्यानंतर विनीयोग प्रमाणपत्र घेण्यात आले नाही.

(३) साहित्य खरेदी करण्यापूर्वी वृत्तपत्रातून जाहिरात देण्यात आली नाही.

(४) शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.मागास/१०९३/प्र.क्र.१२३९/३४ दिनांक १ सप्टेंबर, १९९३ नुसार कार्यवाही केलेली नाही.

(५) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.मागास/१०९३/प्र.क्र.१२३९/३४ दिनांक ०१/०९/१९९३ नुसार परि.क्र. ४ नुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(६) लाभार्थ्यांचे विनियोजन दाखले व प्रस्ताव तपासणीत प्राप्त झाले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) पुरवठादाराने ताडपत्री पुरवठा दिनांक १३/०३/२०१२ रोजी पंचायत समितीस केलेला आहे व तशी त्याची नोंद ताडपत्री पुरविल्याबाबत साठा रजिस्टर सन २०११-१२ च्या पान क्रमांक १६९ वर घेण्यात आलेली आहे. सदर साठा नोंदवहीची प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे.

सदर साहित्य पुरवठ्याची रक्कम ही साहित्य पंचायत समितीकडे दिनांक १२.०३.२०१२ रोजी प्राप्त झाल्यानंतर रोजकिर्द न.नं.७ मधील व्हौ.नं.२ दिनांक ३१.३.२०१२, धनादेश क्र.८१६९६५ रक्कम रुपये ४९,८९६/- पुरवठादारास अदा करण्यात आलेले आहे. सोबत रोजकिर्द नोंदवहीची छायांकित प्रत जोडण्यात आलेली आहे.

(२) लाभार्थी निवड केल्यानंतर व साहित्य वाटप झाल्यानंतर लाभार्थी साहित्याचा विनियोग करीत असल्याबाबत खात्री करुन संबंधित गावांच्या ग्रामसेवकांचा विनियोग प्रमाणपत्र दप्तरी ठेवण्यात आलेला आहे.

(३) उद्योग व ऊर्जा यांचेकडील दिनांक ०६/०९/२०११ नुसार दरकरार असून त्याचे पत्र सोबत जोडले आहे. तसेच दरकराराची आर.सी.टी. सोबत जोडली आहे. तरी सदरची खरेदी ही दरकरारानुसार केलेली असल्याने वृत्तपत्रातुन जाहीरात देण्यात आलेली नाही.

(४) याबाबत पंचायत समिती सभा दिनांक १०.०३.२०११ रोजी ठराव क्र.१७९ नुसार मुळ अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आलेली होती. त्यानुसार तात्काळ नियोजन करुन योजना राबविली गेली. लाभार्थी साहित्याचा विनियोग करीत असल्याबाबत ग्रामसेवकांचे विनियोग दाखले घेतले आहे. तसेच त्यावरुन खात्री करुन विस्तार अधिकारी (कृषि), कृषि अधिकारी व सहाय्यक गटविकास अधिकारी यांचे उपयोगिता प्रमाणपत्राची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. यावरुन लाभार्थी साहित्याचा विनियोग करीत असल्याने योजनेचा हेतु सफल झाला आहे.

(५) तांत्रिक मान्यता क्र.जा.क्र.पंसत्र्यं/कृषि/२७/१२ पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर, दिनांक १८/०२/२०१२ मध्ये बाब क्र.७ मध्ये योजनेच्या अटी व शर्ती देण्यात आलेल्या असून यात जातीच्या नोंदीबाबत अट नसल्याने तसेच योजना ५०% अनुदानावर राबविली असल्याने जातीच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. तसेच मास्टर नोंदवहीमध्ये गावाची नोंद करण्यात आलेली आहे. दुबार लाभ दिला जावू नये म्हणून मास्टर नोंदवही ठेवली आहे. तसेच यापुर्वी लाभ न दिल्याबाबत ग्रामसेवक यांचा दाखला घेण्यात आलेला आहे व दप्तरी ठेवण्यात आला आहे.

(६) योजनेचा लाभ दिल्यानंतरच त्या साहित्याचा विनियोग लाभार्थी करतात त्यामुळे लेखापरिक्षण कालावधीत सदर दाखले उपलब्ध करुन देता आले नव्हते. लाभार्थ्यांना लाभ मिळाल्यानंतर ग्रामसेवकांकडून विनियोजन दाखले नंतर प्राप्त करुन घेऊन प्रस्तावास जोडण्यात आलेले आहेत व दप्तरी ठेवण्यात आले आहे. तसेच साठा नोंदवहीमध्ये देयकाची नोंद घेण्याचे अनावधानाने राहीले होते. तरी यापुढे सदर बाबीची दखल घेण्यात येत आहे. तरी सदरचा आक्षेप स्विकृत होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.२६७:- पंचायत समिती सेसमधून १००% अनुदानावर मागासवर्गीय लाभार्थ्यांना सौरकंदील पुरविणेबाबत (सन २०११-१२)**

(१) महाराष्ट्र शासन व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक झेडपीए-०८/प्र.क्र.४४६/ वित्त-९ मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक २० जुन, २००८ नुसार योजनेची अंमलबजावणी नियोजन वैधानिक वेळापत्रकानुसार केलेले नाही.

(२) महाराष्ट्र शासन व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक पंरास/१०९६/प्र.क्र.७८/५ दिनांक ९/१/१९९७ चे परिच्छेद ३ प्रमाणे लाभार्थी निवड प्रक्रिया राबविलेली नाही.

(३) महाराष्ट्र शासन व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक मागास/पंरास/१०९८/प्रक.७३/३४ दिनांक २०/११/१९९९ नुसार लाभार्थी नोंदवही तसेच ३% महिला लाभार्थी लाभ दिलेला नाही.

(४) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/ १०९३/प्र.क्र.१२३९/३४ दिनांक ०१/०९/१९९३, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय परिपत्रक क्र.४४६ दिनांक २०.०६.२००८ अनुसार योजना वित्तीय वर्षात राबविलेली नाही.

(५) महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाखंसा १०८८/२५१२ दिनांक ०२/०१/१९९२ जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ८३ (३) नुसार साहित्य प्राप्त झालेबाबतचे प्रमाणपत्र गटविकास अधिकारी यांनी दिलेले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) महाराष्ट्र शासन व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक झेडपीए-०८/प्र.क्र.४४६/ वित्त-९ मंत्रालय, मुंबई ३२, दिनांक २० जुन, २००८ नुसार योजनेची अंमलबजावणी नियोजन वैधानिक वेळापत्रकानुसार योजना राबविण्यात आली आहे.

(२) महाराष्ट्र शासन व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक पंरास/१०९६/प्र.क्र.७८/५ दिनांक ९/१/१९९७ चे परिच्छेद ३ प्रमाणे लाभार्थी निवड प्रक्रिया राबविलेली आहे.

(३) महाराष्ट्र शासन व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक मागास/पंरास/१०९८/प्रक.३४ दिनांक २०/११/१९९९ नुसार लाभार्थी नोंदवही ठेवण्यात आली आहे. तसेच ३०% महिला निवड करण्यात आली होती. परंतु महिलांच्या नावे ८ ड चे उतारे प्राप्त न झाल्याने कुटुंब प्रमुखाच्या नावे सौरकंदील वाटप करण्यात आले आहे.

(४) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/१०९३/ प्र.क्र.१२३९/३४ दिनांक ०१/०९/१९९३, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय परिपत्रक क्र.४४६ दिनांक २०.०६.२००८ अनुसार योजना वित्तीय वर्षात राबविलेली आहे. सोबत साठा नोंदवही मधील प्राप्त झाल्याचा दिनांक व लाभार्थ्यांना वाटप केल्याचा दिनांक नमुद केल्याची छायांकित प्रत जोडलेली आहे.

(५) महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाखंसा १०८८/२५१२ दिनांक ०२/०१/१९९२ जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ८३ (३) नुसार साहित्य प्राप्त झालेबाबतचे प्रमाणपत्र घेण्यात आले आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.२६८ (५७८) (५७९) (२) :- पंचायत समिती स्तरावर ९० टक्के अनुदानावर सौर कंदील पुरविणेबाबत (पंचायत समिती कळवण) (सन २०११-१२)**

पंचायत समिती कळवण यांनी सन २०११-१२ या वित्तीय वर्षात समाजकल्याण योजनेसाठी केलेल्या तरतुदी मधून ९० टक्के अनुदानावर मागासवर्गीय लाभार्थीना सौर कंदील पुरविण्यासाठी रक्कम रुपये ८७,४५०/- खर्च नोंदविला आहे. उपरोक्त खर्चाबाबत खालील प्रमाणे आक्षेप देण्यात येत आहे.

(१) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्र.झेडपी ए/२००८, प्र.क्र. ४४६/वित्त-९, मंत्रालय, मुंबई, दिनांक २०.०६.२००८ नुसार सदरची योजना ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार योजना राबविण्यात आलेली नाही.

(२) ग्राम विकास विभाग परिपत्रक क्र. पंरास/सीआर/१६३३/५७, दिनांक १९.०१.१९८५ नुसार पुरवठा आदेश देण्यापूर्वी लाभार्थी हिश्याची रक्कम वसूली करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करणेत आलेली नाही.

(३) ग्राम विकास विभाग परिपत्रक क्र. १०९५८/प्र.क्र./७३/३४, दिनांक २०.११.१९९९ नुसार लाभार्थीचे प्रपत्र अ मध्ये मास्टर नोंदवही ठेवली असून दुबार लाभ टाळण्याचे दृष्टीने उपाययोजना करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(४) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ नुसार ८७ नुसार साहित्यांची चाचणी अहवाल प्राप्त नसल्यामुळे साहित्यांची गुणवत्तेची खात्री नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती कळवण येथील पंचायत समिती सेस मधून ९० टक्के अनुदानावर मागासवर्गीय सौर कंदील रक्कम रुपये ८७,४५०/- पुरवठा करणेत आलेला आहे.

(१) सदरची योजना राबविताना शासनाचे परिपत्रक व त्यामधील उद्दिष्टांचे पालन करुन दिलेल्या वेळापत्रकानुसार राबविण्यात आलेली आहे. परंतु लाभार्थी मिळणेस विलंब झाल्यामुळे योजना विहित मुदतीत राबविता आली नाही. यापुढे शासन परिपत्रकानुसारच योजना राबविण्याचे नियोजन करण्यात आलेले नाही.

(२) शासनाकडील परिपत्रक, दिनांक १९.०१.१९८५ नुसार लाभार्थी हिस्सा रक्कम वसूल करणेत आलेली आहे. सदर रकमे बाबतचे चलन सोबत जोडले असून दप्तरी ठेवले आहे.

(३) सदरच्या योजनेचा लाभ देताना लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवली असून दुबार लाभ झालेला नसल्याची खात्री केली आहे. पंचायत समिती सभेमध्ये लाभार्थी यादीचे वाचन करणेत आले आहे.

(४) सौर कंदीलाबाबतचा चाचणी अहवाल सेंट्रल पॉवर रिसर्च इन्स्टीट्युट, बंगलोर यांचेकडून प्राप्त करुन दप्तरी ठेवण्यात आला आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.३९३ (१८) (६४० ते ६४२) (५१) :- पंचायत समित्यांनी लेखा परिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे (सन २०११-१२)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखा परिक्षणाचे काम सुरु करण्याचे ठरले जाते, त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरु झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरी सुध्दा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेख उपलब्ध केले जात नाही. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग, पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशाप्रकारचे परिच्छेदांबाबत लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांच्या आत सादर करणेबाबत सूचित केले जाते. तथापि, या सूचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभिर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधीत जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करुन देऊन सुध्दा लेखा परिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याचे ही बाब पंचायत राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखा परिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्र. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १८ | नाशिक | बागलाण | ५१ | — |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) लेखा परिक्षण पथकास बागलाण तालुक्यातील सर्व पशु वैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ व श्रेणी-२ यांचे अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात आले होते. परंतु परिच्छेदात नमूद केलेले वायगाव, जोरण, डांगसौंदाणे, पठावे, तळवाडे, विरगाव या सहा पशु वैद्यकीय उपकेंद्रांचे अभिलेखे अतिरिक्त कार्यभार व अत्यावश्यक तांत्रिक कामकाजाचे कार्य बाहुल्यामुळे (उदा. आजारी जनावरांना औषधोपचार, रोग प्रतिबंधक लसीकरण, गर्भ तपासणी, रोग निदान, नमुने तपासणी, सर्प दंश, विषबाधा, नैसर्गिक आपत्ती, खच्चीकरण, कृत्रिम रेतन, वंधत्व तपासणी, कार्यमोहिम, जंगली श्वापदांचे पाळीव प्राण्यांवर हल्ले, शिवार भेटी विविध योजनेचे प्रसिध्द व प्रचारकार्य, अति तात्काळ कष्ट प्रसृती इत्यादी तांत्रिक कामकाजासाठी नियमित व अतिरिक्त कार्यक्षेत्रात स्थळ व गाव भेट देणे आवश्यक असल्यामुळे लेखा परिक्षण पथकासोबत लेखी व तोंडी समन्वयाअभावी अभिलेखे तपासून घ्यायची राहिलेली आहेत. तपासणी पथकाने निवडक १७ पशु वैद्यकीय संस्थांची अभिलेखे तपासली आहेत.

(२) परंतु उर्वरित सहा उपकेंद्रावरील अभिलेखे सुरक्षित असून ती लेखा परिक्षण पथकास दाखविण्यासाठी तयार ठेवली आहेत. न तपासलेल्या सहा उपकेंद्रांच्या अभिलेखाची तपासणी तालुका स्तरीय पशुसंवर्धन विभागाने केली असून त्यामध्ये कोणतीही अनियमितता आढळून आली नाही.

(३) सदरील सहा उपकेंद्रास जिल्हा स्तरावरुन अथवा तालुका स्तरावरुन कोणतीही आर्थिक तरतूद खर्च करणेसाठी प्रदान करण्यात आलेली नव्हती, त्यामुळे सदर संस्थेस आर्थिक अनियमितता झालेली नाही.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.३९८ (१८)/७ :- सन २००९-१० या वर्षात पंचायत समितीमध्ये झालेल्या नियमबाह्य बाबी :- जादा प्रदानाबाबत (सन २०११-१२)**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबींचे स्वरुप | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्र. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १८ | जादा प्रदानाबाबत | नाशिक | बागलाण | ७ | ७७,२८०/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील पत्र क्रमांक साप्रवि/भांडार/वाहने/कार्य/३२/२०१० दिनांक १४/०१/२०१० अन्वये वाहन कार्यक्षेत्राबाहेर घेऊन जाण्यास गटविकास अधिकारी यांना परवानगी देण्यात आली आहे. सदरहू पत्राची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. परिच्छेद मध्ये आक्षेपीत केलेले सर्व प्रवास हे मुख्य कार्यकारी अधिकारी/ जिल्हाधिकारी/विभागीय आयुक्त यांचेकडील महत्वाचे मिटींग/सभा यांचेसाठीच करण्यात आलेला आहे. तसा तपशील सोबत जोडला आहे. वर नमुद केलेप्रमाणे महत्वाचे मिटींग/सभा या नाशिक मुख्यालयी होत असल्याने व सदरचे मिटींग/सभा यांना उपस्थित राहणे आवश्यक असल्याने वाहन कार्यक्षेत्राबाहेर प्रवास केला आहे. कृपया मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे दिनांक १४.०१.२०१० चे पत्रास अधिन राहून कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.३९८ (१८)/७ :- सन २००९-१० या वर्षात पंचायत समितीमध्ये झालेल्या नियमबाह्यबाबी :- जादा प्रदानाबाबत (सन २०११-१२)**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबींचे स्वरुप | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्र. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १८ | जादा प्रदानाबाबत | नाशिक | देवळा | ७ | १,१६,४२३/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

संबंधित अधिकारी श्री.पी.वाय.शिंपी, सहायक लेखा अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचे कडून वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.३९८ (१८)/१२ :- सन २००९-१० या वर्षात पंचायत समितीमध्ये झालेल्या नियमबाह्य बाबी (सन २०११-१२)**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबींचे स्वरुप | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्र. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १८ | जादा प्रदानाबाबत | नाशिक | मालेगांव | १२ | २,८४,०८८/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

श्री.पी.डी.भामरे, वाहन चालक हे सभापती, पंचायत समिती, मालेगाव यांचे वाहनावर वाहन चालक नसल्याने काम करीत आहेत. या उप विभागाकडे वाहन नसल्याने व वाहन चालक बसून राहण्यापेक्षा त्यांचे सेवेचा उपयोग सभापती, पंचायत समिती, मालेगाव यांचे शासकीय वाहनावर केला असल्याने सदर बाबत केलेली कार्यवाहीस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील आदेश क्र/साप्रवि/अस्था-५/५११/२०१२ दिनांक ०१/०२/२०१२ अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यात आली आहे. सोबत आदेशाची व मुळ सेवापुस्तकात नोंद घेतल्याची छायांकित प्रत जोडण्यात आलेली असून कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.३९८ (१८)/१२ :- सन २००९-१० या वर्षात पंचायत समितीमध्ये झालेल्या नियमबाह्य बाबी :- जादा प्रदानाबाबत (सन २०११-१२)**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबींचे स्वरुप | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्र. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १८ | जादा प्रदानाबाबत | नाशिक | चांदवड | १२ | १,२००/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

शकांत नमुद केल्याप्रमाणे दुबार फिरती १५० कि.मी.ची रुपये ८ प्रति कि.मी. प्रमाणे रुपये १,२०० वसुल करुन जिल्हा परिषद सेस खाती दिनांक ६/८/२०१५ रोजी जमा करणेत आलेली आहे. सोबत चलनाची छायांकित प्रत जोडणेत आलेली आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती.

**परिच्छेद क्रमांक ५.५ :- मौजे वारेगाव येथे क्रिडांगण सपाटीकरण करणेच्या कामाबाबत (सन २०११-१२)**

ग्रामपंचायतीने क्रिडांगण सपाटीकरणाच्या कामाकरीता रक्कम रुपये १,९५,००० इतका खर्च केला आहे. याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) सदर कामासाठी रक्कम रुपये १,९५,००० अनुदान प्राप्त झाले, परंतु सदर कामासाठी एकूण किती अनुदान मंजुर झाले किंवा कसे याबाबत प्राप्त अनुदान दाखले व एकूण मंजुर अनुदान किती याबाबत खात्री पटविणे आवश्यक आहे.

(२) सदर कामाचा नमुना नंबर ६५ काम पूर्णत्वाचा दाखला लेखापरिक्षणास दर्शविला नाही.

(३) सदर कामासाठी अदा केलेल्या रक्कमा रोखीने अदा न करता धनादेशाने अदा करण्यात आल्या याबाबत खुलासा आवश्य आहे.

(४) मोजमाप पुस्तिकेतील अनुक्रमांक ७ प्रमाणे कामासाठी एकूण ७२८.२५ घनमिटर गौण खनिज (मुरुम) चा वापर केलेला आहे. सदर गौण खनिज रक्कम ७२८.२५ x ३५.३४ = रुपये २५७५४ शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

(५) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.झेडपीए-२०००/प्र.क्र.१८/३३ दिनांक १९/१/२००१ अन्वये सुचित केलेप्रमाणे ग्रामपंचातीने सदर कामावर रक्कम रुपये १,९५,००० खर्च केलेला आहे. सदर कामातुन ५ टक्के रक्कम रुपये ९७५० बचत करुन ग्रामनिधीत जमा करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) सदर कामासाठी जिल्हा क्रिडा अधिकारी, नाशिक यांचे आदेश क्रमांक जिक्रीअ/क्रिविअ/२००८-०९/का-४/४१९ दिनांक २४/११/२००८ नुसार रुपये २,००,००० रकमेस मान्यता असून रुपये १,९५,००० वितरीत आहे. सदर रक्कम ग्रामपंचायतीच्या रोजकिर्द मध्ये दिनांक २२/१/२००९ रोजी जमा घेण्यात आलेली आहे.

(२) काम पुर्णत्वाचा दाखला दप्तरी दाखल आहे.

(३) सदर कामाच्या प्रदानाच्या रकमा ग्रामपंचायतीने संबंधितास रोखीने अदा केलेला असून त्या संदर्भातील अभिलेखे दप्तरी दाखल आहेत. यापुढे धनादेशाद्वारे प्रदान करण्याची दक्षता घेण्यात येईल.

(४) दिनांक २७/०१/२०१६ रोजी भारतीय स्टेट बँक ऑफ सिन्नर या शाखेत शासन सदरी रक्कम रुपये २५,७५४ भरणा करण्यात आलेली आहे.

(५) ग्रामपंचायत नमुना नं. ७ सामान्य पावती क्र.११ दिनांक २५/१/२०१६ अन्वये, ग्रामनिधी मध्ये रक्कम रुपये ९,७५० जमा करण्यात आलेली आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.१७१ :- कै.रावसाहेब थोरात सभागृहात वातानुकूलीत यंत्रणेसाठी जनरेटर बसविणेत अनियमितता (सन २००८-०९)**

जिल्हा परिषद उपकरातून १०० केव्ही जनरेटर खरेदीसाठी व बसविणेसाठी रक्कम रू.१२,४९,०८२ इतका खर्च केलेला आहे.याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) १०० केव्ही जनरेटर खरेदी कशाचे आधारे निश्चित केली.याबाबत कोणतीही नोंद अभिलेख्यात आढळून आली नाही.

(२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ८४ नुसार एकाच वा विशिष्ट उत्पादनाची खास यंत्रसामुग्री वा उपकरणे खरेदी करतांना अशा उत्पादकाकडून वा अधिकृत पुरवठा करणा-याकडून थेट खरेदी करणे आवश्यक असतांना रूपये ९,८६,५२५ जनरेटर खरेदी मक्तेदाराकडून बी-१ निविदेनुसार केल्याने अनियमितता झालेली आहे.

(३) जनरेटर सेट खरेदीसाठी मध्यवर्ती भांडार खरेदी अधिकारी, मुंबई यांचेकडून दरकरार करण्यात आलेला आहे किंवा कसे याची खात्री करून त्यानुसार खरेदी करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.दरकरार अस्तित्वात असल्यास त्यापेक्षा जादा दराने खरेदी झाली नसल्याचे प्रमाणित होणे आवश्यक आहे.

(४) कार्यारंभ आदेश दि. २/२/२००१ या असतांना चाचणी अहवाल दिनांक १७/१२/०८ चा आहे.या विसंगतीबाबत साधार खुलासा होणे आवश्यक आहे.

(५) अधीक्षक अभियंता,प्रादेशिक विद्युत मंडळ,सार्वजनिक बांधकाम औरगांबाद यांचे तांत्रिक मान्यता आदेश दिनांक २३/१०/२०१८ नुसार सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभागाकडून कामाची तपासणी केलेली नाही. तसेच विद्युत कामासाठी आयएसआय मार्कचे साहित्य वापरावे विद्युत साहित्य रिजिनल टेस्टीग लॅबोरेटी साकी नाका, मुंबई यांचेकडून तपासून घेण्यात आलेली नाही.तथापि तशी कोणतेही कार्यवाही झालेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

शकात नमुद केल्याप्रमाणे खुलासा सादर करण्यात येतो की जिल्हा परिषद अत्यावश्यक असणा-या या पुरवठयाचा भार स्वतंत्रपणे गणना करून त्या प्रमाणे १०० केव्ही चा जनरेटर खरेदी करावयाची निश्चित केली आहे. (भार गणनेचा तक्ता सोबत जोडला आहे.)

(१) जनरेटर खरेदीसाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या विद्युत विभागाकडे शासकीय मानक उपलब्ध आहे व शासकीय दरही उपलब्ध आहे.त्यानुसार अंदाजपत्रक तयार करून सक्षम अधिका-याची (अधीक्षक अभियंता, विद्युत मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग औरगांबाद) तांत्रिक मंजूरी घेवूनच बी-१ निविदेनुसार केली असल्याने त्यामध्ये अनियमितता झालेली नाही.सदरच्या कामामध्ये केवळ जनरेटर खरेदी नसून त्यामध्ये अनुषंगिक कामे (किरकोळ बांधकामे) अंतर्भूत असून त्या नुसार निविदेव्दारे काम पुर्ण केले आहे.

(२) जनरेटर खरेदीसाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या विद्युत विभागाकडे शासकीय मानक उपलब्ध आहे व शासकीय दरही उपलब्ध आहे.त्यानुसार अंदाजपत्रक तयार करून सक्षम अधिका-याची (अधीक्षक अभियंता, विद्युत मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग औरगांबाद) तांत्रिक मंजूरी घेवूनच बी-१ निविदेनुसार काम केलेले आहे.सदर बाबीसाठी शासनाचा दरकरार नाही त्यामुळे खरेदीत अनियमितता झालेली नाही.

(३) सदर जनित्र हे किर्लोस्कर कंपनीचे आहे.सदर कंपनीने त्यासाठी वॉरंटी दिली आहे.कंपनीने मशीन तयार झाल्यावर त्वरीत अंतिम चाचणी घेतली आहे व त्यानुसार प्रमाणपत्र दिले आहे.कंपनीची तपासणी आधीची असल्यामुळे सदरची तारीख पूर्वीची आहे.कृपया खुलासा स्विकृत होण्यास विनंती.

(४) विद्युत जनित्र हे किर्लोस्कर कंपनीचे बसविण्यात आले आहे सदर कंपनीचे आय एस आय स्पेसीफिकेशन प्रमाणे सर्व (आयएसआय क्र.४७२२/२००१) सर्व साहित्य बनविले आहे कंपनीचा १०/१२/२००८ च्या चाचणी प्रमाणपत्रावर स्पष्ट त्याची पण नोंद करण्यात आली आहे.सोबत चाचणी प्रमाणपत्राची प्रत जोडण्यात आली आहे.

वरील दिलेला खुलासा ग्राह्य धरून परिच्छेद वगळणेकामी, शिफारस होणेकामी नम्र विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.१७५ :- विंचूर भेटाळे उगांव रस्ता कि.मी.१/२०० ते ३/२०० बी.बी.एम.कारवटे सिलकोट (सन २००८-०९)**

सदर कामावर रूपये १५,१३७७१ इतका खर्च झालेला आहे.याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १५३ नुसार अंदाजपत्रकाप्रमाणे काम करणे बंधनकारक असतांना अंदाजपत्रकाप्रमाणे काही बाबींवर बचत करून ४ बाबीमध्ये तांत्रिक अधिकारी यांचे पुर्वमान्यतेशिवाय जादा खर्च केला आहे.

(२) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-२०००/प्र.क्र.४४/३३ दिनांक २२/१२/२००० नुसार मोजमाप पुस्तीकेत काम पुर्णत्वाचा दाखला नोंदविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झालेली नाही.

(३) नमुना नं ४० रस्ता नोंदवही व रोड चार्टमध्ये सदर कामाची नोंद घेण्यात आलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) सदर कामावर रू.१५,१३,७७१ इतका खर्च झालेला आहे.त्याबाबत स्पष्टीकरण खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

सदर कामाचे अंदाजपत्रक करतांना त्यावेळेस साईटचे गरजेनुसार अंदाजपत्रक तयार केले आहे.सदरच्या कामास प्रशासकीय मंजूरी दि.१५/०५/२००७ ला मिळाली व कामाची निविदा प्रक्रिया होवून प्रत्यक्ष कार्यादेश दि. ८/२/२००८ ला दिलेला होता.प्रशासकीय मंजूरीचा दिनांक व प्रत्यक्ष काम सुरू झाल्याचा दिनांक यामध्ये बराच कालावधी गेलेला होता.त्यामुळे प्रत्यक्ष काम सुरू करतांना रस्त्याच्या पृष्ठभागास जास्त प्रमाणात खड्डे पडून कडा तूटल्या होत्या त्यामुळे बाब क्रमांक १ मध्ये वाढ झालेली आहे.त्यास बाब क्रमांक २ संलग्न असल्याने त्यामध्ये सुध्दा वाढ झालेली आहे.तसेच बाब क्रमांक ३ मध्ये रस्त्याच्या बाजूच्या जुन्या गटारी बुजल्या गेलेल्या होत्या प्रत्यक्ष काम करतांना सदर गटारी खोदणे गरजेचे होते.गरजे नुसार गटार खोदकामा मध्ये वाढ झालेली आहे.व त्यास बाब क्रमांक ४ संलग्न असल्याने दबाई करण्यामध्ये सुध्दा वाढ झालेली आहे.

वरील बाबतीत काम सुरू असतांना तत्कालीन कार्यकारी अभियंता यांच्या दौ-यावेळी सदरच्या बाबी निदर्शनास आणून देऊन त्यांनी काढलेल्या निरिक्षण टिपणीनुसार काम करणेत आलेले आहे. तसेच झालेला खर्च हा प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त झालेला नाही तरी कृपया अनुपालन स्विकृती होणेस विनंती आहे.

(२) सदर कामाचा पूर्णत्वाचा दाखला देयकासमवेत स्वतंत्र जोडणेत आलेला होता.काम पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिका क्रमांक-६०५ मधील पान नं. २७ वर नोंदविणेत आलेला आहे.

(३) मालमत्ता नोंदवहित व रोड चार्टमध्ये वर नोंद घेण्यात आली आहे.व मालमत्ता नोंदवहित व रोड चार्टची छायांकित प्रत समवेत सादर केली आहे. तरी परिच्छेदांचे पृष्ठयार्थ सादर केलेले अनुपालन स्विकृत होणेस विनंती.

**परिच्छेद क्रमांक ३.१७८ :- बांधकाम विभाग-जिल्हा परिषद नाशिक.मौजे-कनाशी ता.कळवण.येथे कर्मचारी निवासस्थान भाग (सन २००८-०९)**

उपरोक्त कामांवर रक्कम रू.८,३९,३३१ (परि.क्र.२४७) व रु. ८,६९,८११ (परि.क्र.२४८) असा एकत्रित रू.१६,७९,१४२ इतका खर्च करण्यात आलेला आहे.याबाबत खालील आक्षेप आहेत.

(१) निवासस्थान भाग १ व २ चे दिनांक ३०/०४/२००८ व दि.२/५/२००८ रोजी पूर्ण झाल्याचे नमूद आहे.तथापि नमुना नंबर ६५ मधील पूर्णत्वाचा दाखला देयकासोबत जोडण्यात आलेला नाही.

(२) शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२००२/प्र.क्र.३६४ दि.१३/०२/२००७ नुसार ज्या कामाची मुदत एक वर्षापेक्षा जास्त आहे व कामाचे मुल्य ५ लाखाच्या वर आहेत.या दोन्ही अटी एकाचवेळी लागू

होणा-या कामास भाववाढ अथवा घट मंजूर करण्याचा सार्वजनिक बांधकाम दि.१६/०५/२००५ शासन निर्णय लागु होतो परंतू सदर कामाची मुदत ९ महिने असतांना रू.८० प्रति सिमेंट गोणी प्रमाणे दरवाढीची रक्कम रू.५९८४० (परि.क्र.२४७) व रू.५८,९६० (परि.क्र.२४८) अशी एकूण रू.१,१८,८०० नियमबाहय प्रदान केले आहे.

(३) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-२०००/प्र.क्र.४४/३३ दिनांक २२/१२/२००० नुसार मोजमाप पुस्तीकेत काम पुर्णत्वाचा दाखला नोंदविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झालेली नाही.

(४) काम पूर्ण झाल्यावर कामाची नोंद नमुना नं. ४० रस्ता नोंदविणे आवश्यक आहे.तशी कार्यवाही झालेली नाही.

उपरोक्त, आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.

(१) (भाग-१) व (भाग-२)काम पुर्णत्वाचा दाखला नमुना क्र. ६५ मध्ये सादर केला आहे.

(२) (भाग-१) अधिक्षक अभियंता (सां.बा.) नाशिक मंडळ याचे परिपत्रक दि.२०/०३/२००७ अन्वये सिमेंट दराने ८० रु. प्रत्येक गोणी देय होते.सदर कामास तां.मा. २८/०३/२००७ रोजी देण्यात आली आहे.त्याप्रमाणे गं.प.वरील तपासणी करून देयक पारीत केले आहे.उपरोक्त परिपत्रकान्वये सदरचे दर २०/०३/२००७ पासून लागु आहे.नमुद काम २८/०६/२००७ नंतर सुरू झाल्याने भाववाढीचा फरक अनुज्ञेय आहे.

**(भाग-२)** शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२००२/प्र.क्र.३६४ दिनांक १३/०२/०७ नुसार ज्या कामाची मुदत १ वर्षापेक्षा जास्त नाही.परंतू कामाचे मुल्य ५ लाखाच्यावर आहे.तसेच कामांस तांत्रिक मान्यता २८/०६/२००७ रोजी दिलेली असलेने दिनांक २०/०३/२००७ चे शा.नि. तील बाब ह्या कामास लागु आहे. करीता सिमेंट वसुली करणेचा प्रश्न उद्‌भवत नाही.

**(भाग-१) व (भाग-२)**-मोजमाप पुस्तिकेत काम पुर्णत्वाचा दाखला नोंदविलेला असून छायांकित प्रत समवेत जोडलेली आहे.

**(भाग-१) व (भाग-२)** शकात नमुद केल्यानुसार कामाची नोंद नमुना नं. ४० वर घेणेत आली आहे. छायांकित प्रत समवेत जोडलेली आहे. सदरचा शक स्विकृत होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.४६६ :- कनाशी ता.कळवण येथे पिण्याच्या पाण्यासाठी नळपाणी पुरवठा योजना (सन २००८-०९)**

जिल्हा परिषदेने कनाशी ता.कळवण येथे नळपाणी पुरवठा योजना कामावर रू.२,४८,९९२ एवढा खर्च नोंद केला आहे. या बाबतचे खालीलप्रमाणे आक्षेप देण्यात येत आहे.

(१) उपरोक्त कामासाठी ९० एम.एम.चे ६.के.जी.चे १४५० मिटर पाईप वापरले आहेत. मोजमाप पुस्तिकेत कामाची मापे नोंदवितांना गिरवागिरव करून मापे नोंदविले आहेत.महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६१ चे नियम १६६ चे कलम-२ प्रमाणे एखादया मोजणीची नोंद रद्द करण्यात येते तेव्हा नोंद रद्द करण्याबद्दल आदेशासंबधीचा निर्देश असणे आवश्यक आहे.तशी कार्यवाही केलेली नाही.

(२) कामाचा वर्कींग नकाशा (डॉईंग) नाही. त्यामुळे प्रकरणासोबतच्या नकाशानुसार काम झाले बाबत पडताळणी करता आली नाही.

(३) ९० एम.एम.६, के.जी.पी.व्ही.सी.पाईप शासकीय प्रयोग शाळेत तपासणी केले नाहीत.

(४) ग्रामविकास व जलसंधारण विभाग,शासन निर्णय झेडपीए/२०००/प्र.क्र.१८/३३दि.१९/०१/२००१ नुसार ग्रामपंचायतीने केलेल्या कामाच्या रकमेच्या ५ टक्के रक्कम बचत करून ग्रामनिधीत भरणा करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) योजनेसाठी वापरण्यात आलेले ९० मिमी व्यासाचे ६ केजी/सेमी एकूण लांबी १४५० मी. पाईपाचे खोदकामाचे मापे मोजमाप पुस्तिका क्र. ४४४ पान क्र. ६७ मधील नोंदणीमध्ये गिरवागिरव झालेल्य जागी व नोंद रद्द केल्याबाबत संबंधितांची स्वाक्षरी घेण्यात आली आहे व त्यावर सक्षम अधिकारी यांची स्वाक्षरी करण्यात आली आहे. छायांकित प्रत सोबत सादर करीत आहे.

(२) कामाचा नकाशा (रेकार्ड ड्राईंग) सोबत जोडण्यात येत आहे. त्याप्रमाणे काम पुर्ण करण्यात आले आहे.

(३) ग्रामपंचायतीतर्फे पाईपाचा चाचणी अहवाल घेण्यात आलेला नाही. तथापि ग्रामपंचायतीने खरेदी केलेले पाईप हे आय एस आय दर्जाचे असून त्याबाबत उप अभियंता यांनी मोजमाप पुस्तिका क्र. ४४४ पान क्र. ७० मध्ये खात्री केली असून हायड्रालिक चाचणी घेण्यात आली आहे. तसेच ग्रामपंचायतीने सदरच्या योजनेमधून सुरळीतपणे पाणी पुरवठा सुरू असल्याचा दाखल्याची छायांकित प्रत सोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

(४) ग्रामपंचायतीची नमुना नं. ७ ची पावती सोबत जोडली आहे सदरची रक्कम रू.१२४५० दि.२७/०१/२०१६ रोजी चलनाव्दारे ग्रामनिधी रोख भरल्याची छायांकित प्रत सोबत सादर करण्यात येत आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.४७० :- टंचाईग्रस्त ग्रामीण भागात टँकरने पाणी पुरवठा करणे(२२४५ नैसर्गिक आपती) (सन २००८-०९)**

पंचायत समिती सिन्नर येथे सन २००८-०९ मध्ये रू. ३०,७६,५९८ एवढा खर्च नोंद केला याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) रक्कम रू. ३०,७६,५९८ एवढा खर्च शासकीय टँकर एकूण ९ वर खर्च नोंद केला आहे.त्यात अतिकालीक भत्ता वाहन दुरूस्ती, टाक्या खरेदी, विहिर अधिग्रहीत, प्रवास भत्ता, इंधन, एमआयडीसी कडून पाणी खरेदी, पुस्तक छपाई इ. करण्यात आला आहे.

(२) सदर खर्च हा सन २००८-०९या आर्थिक वर्षात असून एमआयडीसीचे उपप्रमाणक क्र.०७ दि.०६/०७/२००७ रूपये ४,१९३/-असून एप्रिल, २००७ चे पाणी बील आहे.सदर रक्कम देणे बाकी असल्याबाबत कोणतेही लेखे दप्तरी नाही.त्यामुळे रक्कम रू.४,१९३/- प्रदानाबाबत तपासणी करता आली नाही.तसेच मे २००७ चे रू. ३१०४३. जून२००७ चे रू. ३१,५१७ व जुलै ०७ चे रू.२०,८४८ एकूण रू. ७३,४०८ प्रदान १ वर्षाचे कडील असल्यामुळे लेखासंहिता ४४ (१) नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता न घेता पारीत केले आहे.

(३) शासन परिपत्रक क्र.टंचाई/१००५/प्र.क्र.३०५/पा.पु.१४ दि.२४/०१/२००६ मधील मुद्या क्र. ७ नुसार नोंदवही ठेवलेली नाही.तसेच मुद्या क्र. ६ नुसार टँकर पोहच,पाणी वाटप याबाबत संबंधितांनी स्वाक्ष-या करून प्रमाणित केलेले नाहीत.

(४) मा.विभागीय आयुक्त यांचे परिपत्रक क्र.मंश/कार्या-२/टंचाई/३२२८३२/६५३८/२००८ दि.१७/०४/२००८ नुसार गट विकास अधिकारी/तहसिलदार यांनी भेटी देवून तपासण्या कराव्यात, परंतू तशी कार्यवाही झालेली नाही.

(५) वापलेल्या टँकरची सरासरी धावसंख्या/प्रति कि.मी. धाव मोजणी यंत्राव्दारे तपासणी करून सक्षम प्राधिकारी यांचेकडून तपासणी केली आहे.

(६) टँकर क्र. २१३० टँकर क्र.५८७४ यांचे लॉगबुक तसेच टँकर क्र.२२५७ एमटीएस-५२२४ यांचे दि.२५/०३/२००९ ते दि.३१/०३/२००९ या कालावधीचे लेखा परिक्षणसाठी उपलब्ध झाले नाही.

(७) टँकर क्षमता अभियंता यांनी प्रमाणीत केलेली नाही

(८) विहिर अधिग्रहण ठिकाणापासून प्रत्यक्ष टंचाई गावचे अंतर उपअभियंता यांनी तपासून प्रमाणपत्र दिलेले नाही.

(९) विहिर अधिग्रहण अंतराची गट विकास अधिकारी/तहसिलदार यांनी प्रत्यक्ष पाहणी करून प्रमाणपत्र नमुद केलेले नाही.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.

(१) सन २००८-०९ या आर्थिक वर्षात सर्व बाबींवर एकूण रु.३०,७६,५९८ खर्च झालेला आहे.

(२) प्रमाणक क्र.३७ दि.३१/०३/२००९ अन्वये रू.३,३२,३४३/-एम.आय.डी.सी. माळेगांव,सिन्नर यांना अदा करण्यात आले आहे.त्यात रू.४,१९३/-विलंब शुल्क आकारण्यात आल्यानुसार अदा करण्यात आलेले आहे.परंतू सद्यस्थितीत विलंब शुल्क वजा करून देयक अदा होणार नाही याची दक्षता घेण्यात आलेली आहे.सदर प्रमाणका सोबत मे २००७ ते जुलै २००७ एमआयडीसी माळेगांव कडील देयके मुदतीत प्राप्त होती तथापि अनुदाना अभावी प्रलंबित होती अनुदान दि.३१/०३/२००९ रोजी प्राप्त झाल्याने प्रदान करण्यात आलेले आहे.

(३) उदभाव नोंदवही ठेवण्यात आलेली असून पाणी वाटप बाबत वाहन लॉग बुकात ग्रामसेवक/सरपंच/ग्रामस्थ यांची स्वाक्षरी घेतलेली आहे.

(४) गट विकास अधिकारी यांनी सन २००८ मध्ये टंचाई ग्रस्त गावांची पाहणी करून भेट दिलेली असून त्यांची मासिक दैनंदिनीची छायांकित प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

(५) टँकर क्र.एमडब्ल्युएन-२२५७ हा सपाट भागात पाणी पुरवठा करीत होता त्यामुळे प्रति किलोमिटर सरासरी ३.०० कि.मी. दर्शविण्यात आलेली आहे.टँकर क्रमांक एमटीएस- ५२२४ हा डोंगराळ व घाटाच्या रस्त्याने पाणी पुरवठा करीत असल्यामुळे प्रति किलोमिटर सरासरी २.७९ कि.मी.दर्शविण्यात आलेली आहे.सदरच्या टँकरची बाब ही विभागाने प्रमाणीत केली आहे.सोबत लॉगबुकाची छायांकित प्रत जोडली आहे.

(६) वाहन शासकीय असुन संबंधित विभागाकडे सदर लॉग बुक जमा आहेत व त्यातील काही लॉगबुक सत्यप्रती दप्तरी दखल आहेत.वाहन क्र.२१३० व ५८७४ सन २००९-१० मध्ये हजर झालेले आहेत. याबाबत संबंधितास नोटीस देण्यात आली आहे.

(७) शासकीय सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ट्रकवर तात्पुरत्या स्वरूपात साधारणः १०.००० लिटर पाण्याची टाकी बसविण्यात येवून पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे.समवेत क्षमतेबाबतचा दाखला जोडला आहे. तहसिलदार यांचे विहिर अधिग्रहण आदेश क्र.टंचाई/कवि/४९०दि.१०/०७/२००८ सोबत जोडण्यात आलेले असून सदर ची विहिर ही मौजे कुंदेवाडी गावासाठीच अधिग्रहीत करण्यात आलेली आहे.

(८) त्यामुळे अंतराची नोंद करण्यात आलेली नाही.यापुढे उप अभियंता यांचा अंतराचा दाखला घेण्याची दक्षता घेण्यात येईल.

(९) तहसिलदार यांचे विहिर अधिग्रहण आदेश क्र.टंचाई/कवि/४९०,दि.१०/७/२००८ सोबत जोडण्यात आलेले असून सदर ची विहीर ही मौजे कुंदेवाडी गावासाठीच अधिग्रहीत करण्यात आलेली आहे

**परिच्छेद क्रमांक ३.६५८ :- केंद्र राज्य पुरस्कृत कडधान्य विकास कार्यक्रमांतर्गत ५० टक्के अनुदानावर सुधारित शेती औजारे (सन २००८-०९)**

कडधान्य विकास कार्यक्रमांतर्गत पुरविलेल्या शेती उपयोगी साहित्य, जैविक खते, औषधे इत्यादी खरेदीबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.विप्र-३/१४१/०८,दि.१७/०४/२००८ व महाराष्ट्र शासन कृषी,पशुसंवर्धन दुग्धविकास व मत्स्यविकास व्यवसाय विभाग शासन निर्णय क्र.ओएसएपी -१६०/सीआर-९६/४-अे/दि.०८/०७/२००८ अन्वये जाती जमाती आणि महिला यांचेकरीता विहित टक्केवारीनुसार खर्च केलेला नाही.तसेच त्याबाबत तशी नोंदवही ठेवलेली नाही.

(२) सन २००७-०८ व २००८-०९ मध्ये शेतक-यांच्या याद्या तालुका उपविभागीय अधिकारी,पंचायत समिती,जिल्हाधिकारी कार्यालय इत्यादी कार्यालयात इंटरनेटवर देणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झालेली नसल्याने लाभार्थ्यांस दुबार लाभ दिला जाण्याची शक्यता आहे.

(३) महाराष्ट्र राज्य कृषी आयुक्तालय,पुणे यांच्या दि.१७/०४/२००८ च्या पत्रानुसार तपासणी केलेबाबतचे अहवाल लेखा परिक्षणांस उपलब्ध न झाल्यामुळे लाभार्थ्यांस लाभ मिळाला किंवा कसे यांची लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

(४) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण शासन निर्णय क्र.झेडपीए-२००८/प्र.क्र.४४६ दि.२०/०६/२००८ नुसार योजना राबवितांना लाभार्थ्यांची निवड मागणी व लाभार्थी हिस्सा वसूल करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली असल्याचे दिसून येत नाही.

(५) शासन निर्णय क्र.झेडपीए-२००/प्र.क्र.४१/३३ दिनांक १७/०१/२००१ नुसार वैयक्तीक लाभाच्या योजना राबवितांना वेळापत्रकानुसार जुलै ०७ ते जानेवारी ०८ पर्यंतच्या कालावधीत योजनांची अंमलबजावणी केलेली नाही.

(६) कृषी आयुक्तालय,पुणे यांचे मार्गदर्शक सुचना क्र.सीपीएस/३०/औ/हनी/०६-०७/२८२ दि.१९/१२/२००६ अन्वये पुरवठा करावयाच्या साहित्यांचे दरांबाबत खुल्या बाजारात चौकशी करून खरेदी दरापेक्षा साहित्यांचे दर अधिक नसल्याची खात्री केलेली नाही.

(७) महाराष्ट्र लघुउद्योग महामंडळ यांचेकडून उत्पादक अनेक असून परि.क्र.२ रकाना-१३ मधील निवड केल्याची खात्री करता आली नाही व मागणी पत्रांवर उल्लेख नाही.निवड केलेले उत्पादक योग्य असल्याची गटांची मासिक सभेत कृषी अधिका-यांची स्वाक्षरी मोघम नोंदविलेली आहे.निफाड नांदगांव,दिंडोरी,त्र्यंबकेश्वर व इगतपूरी यांना नॅपसॅक स्प्रे पंपाची मागणी नसतांना १०५ नगांचा पुरवठा केलेला आहे.तसेच सुरगाणा गटाला रॅंकिग गटाने पंपाची मागणी नसतांना ५ पंपाचा पुरवठा केलेला आहे.

(८) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.१०९३/प्र.क्र.१२२९/३४,दि.१/९/१९९३ अन्वये ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले त्याच वित्तीय वर्षात वाटप होणे आवश्यक असतांना पीबीएक्स पाकिटे नाशिक,सिन्नर,सुरगाणा दि.०५/०८/२००८ ते १७/१०/२००८ पर्यंत वाटप केलेले आहेत .तसेच लोखंडी नांगर-सिन्नर गटाला दि.२९/०७/२००९ वाटप केलेले आहे.एचडीजीई पाईप सिन्नर,चांदवड,दिंडोरी या गटांना २१/०७/२००९ ला वाटप केलेले असल्याने त्याबाबत वित्तीय अनियमितता झालेली आहे.

(९) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.१०८९/प्र.क्र.५५/३४,दि.०५/१०/१९८९ नुसार लाभार्थी नोंदवही ठेवलेली नसल्याने दुबार लाभ दिला नसल्याची खात्री होत नाही.

(१०) जीवाणू संवर्धन पाकिटे ५० टक्के किमंतीच्या किंवा रूपये ५० प्रती हेक्टर अनुदान देय राहील.एका शेतक-यास ८ पाकिटे वाटप करणे आवश्यक असतांना १३ ग्रामपंचायतींना वाटप केलेले असून दोन गटांनी लाभार्थ्यांची नावे नोंदवहीत नोंदवून वाटप केले आहे.कुठल्याही प्रकारची प्रस्तावांची कागदपत्र न घेता कोणत्या आधारावर वाटप केले,यांचे संयुक्तीक स्पष्टीकरण लेखा परिक्षणात करावे.

(११) पीक संरक्षण औषधींची प्रस्ताव व इतर कागदपत्र न घेता साठा नोंदवहीत नावे पोच घेवून १०९६ लिटर इंडोसल्फाज वाटप केल्याचे आढळून आले व सदर औषधे पुणे येथे शासकीय प्रयोग शाळेकडे तपासणीस पाठवून मुखपत्रांची एक सत्यप्रत पाठविणे आवश्यक आहे. बागलाण व इगतपूरी गट वगळता इतर गटांचे चाचणी अहवाल प्राप्त न करतांच औषधांचे वाटप केल्याचे आढळून आलेले आहेत.

(१२) सदर योजनेअंतर्गत जैविक खते,औषधी खरेदी करतांना तांत्रिक मान्यता व पुरवठादारांचे हमीपत्र घेतलेले नाही. विक्रीपश्चात सेवा, दुरूस्ती, बदली इत्यादी बाबत हमी नसल्याने योजनेची उद्दिष्टे सफल झालेली नसून गटस्तरांवर लोकप्रतिनिधीसमोर पदधिका-यांसमोर वृतपत्रात प्रसिध्दी देवून कृषी निविदा व साहित्य वाटप एकाच दिवशी केल्याचे छायांचित्र लेखापरिक्षणास दर्शविले नाही.

(१३) गट स्तरावर सदर योजनेचे साहित्य वाटप औषध खते लाभार्थीचे प्रस्तावात त्रुटी आढळून आल्या. अटी शर्तीनुसार शेती सुधारीत पीक संरक्षण औजारे, खते, औषधे वाटप योग्य त्या निकषानुसार झाले असल्याची लेखापरिक्षणास खात्री पटत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

शासन निर्णय क्र.आएसओपी १६०८/सीआर-९६/म अदि.८जुलै२००८ अन्वये योजना राबविण्यात आलेली असून नमुद केलेल्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ३ मधील १ प्रमाणे प्राधान्य देण्यात यावे असे नमुद आहे.त्यानुसार खालील प्रमाणे विहीत टक्केवारी प्रमाणे लाभ देण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | वर्गवारी | लक्षांक | साध्य | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | जाती | २८१ | १९१ | ६७.९७ |
| २ | जमाती | १४१ | ५३० | १०० |
| ३ | महिला | ३५१ | ३५० | १०० |

(१) लाभार्थ्याला दुबार लाभ दिला गेलेला नसलेबाबत कृषी अधिकारी पं.समिती यांचे अहवाल प्राप्त आहे.

(२) योजनेवर सनियंत्रण ठेवण्याचे दृष्टिने कृषि विकास अधिकारी पंचायत समिती कृषि अधिकारी,पंचायत समिती विस्तार अधिकारी (कृषि)गटविकास अधिकारी यांनी तपासणी केलेबाबत दाखला प्राप्त आहे.

(३) लाभार्थीस ५० टक्के अनुदानावर साहित्य पुरवठा असल्याने लाभार्थीस वस्तुचा पुरवठा करते वेळी लाभार्थी हिस्सा प्रथम घेवून पुरवठादार संस्थेस धनाकर्षाने पाठविला आहे.

(४) कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे याचेकडील दि.१७/०४/२००८यामध्ये नमुद केलेले योजनेच्या मार्गदर्शक सूचना व कृषि पशुसंवर्धन या विभागाचे दि.८ जुलै,२००८ च्या शासन निर्णया नुसार योजनेस प्रशासकीय मान्यता दिली आहे.तसेच शासनाकडील शासन निर्णय दि.०३/१२/२००८ व कृषि आयुक्तालय पुणे यांचेकडील दि.२३/१२/२००८ प्रमाणे दर पत्रक प्राप्त नुसार योजनेत नमुद केलेले सुधारित कृषी औजारे खरेदीचे पुरवठा आदेश क्र.शेतकी/पीस/पी३/७/२००९ दि.१९/०१/२००९ जा.क्र.शेतकी/पीस/पी३/८/२००९दि.१९/०१/२००९ अन्वये देण्यात आले आहे.

(५) औजारे खरेदी कृषी आयुक्तालय,पुणे यांचेकडून दरपत्रक प्राप्त झाले असून दर पत्रकानुसार खरेदी करण्यात आलेली आहे.

(६) केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत पुरवठादार संस्था महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ असून कृषी आयुक्तालय पुणे यांचे कडील मार्गदर्शक सूचना दरपत्रक जा.क्र.सुकृऔ/दरनि/२००८-०९/२/गुनि-५/०८, दि.२३/१२/२००८ अन्वये निश्चित करून दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार पुरवठादार संस्थेस त्या साहित्याचे मानांकना नुसार आणि तांत्रिक नावानेच मागणी नोंदविण्यात आलेली आहे. गटांच्या एकत्रित मागण्या केलेल्या आहेत.त्या इतर बाबींच्या नस्ती समवेत होत्या, निफाड, दिंडोरी, त्र्यंबकेश्वर व इगतपूरी यांची नॅपसॅक स्प्रे पंपाची मागणी तसेच सुरगाणा गटाची रॅकीग गटोर पंपाची मागणी प्राप्त आहे. औजारांचे वाटप गटस्तरावर झाले असून लाभार्थी हिस्साची रक्कम पुरवठादार संस्थेस अदा करण्यात आलेली.

(७) पीएसबी चे वाटप त्याच आर्थिक वर्षात झालेले आहेत. औजारे ही मार्च अखेर त्याच वित्तीय वर्षात पुरवठा झालेला आहे. पीएसबी पाकिटे नाशिक,सिन्नर,सुरगणा दिनांक ०५/०८ ते १७/१०/२००८ ला पर्यंत वाटप केलेले आहेत. तसेच लोखंडी नांगर दिनांक १९/०१/२००९ पुरवठा आदेशान्वये दिनांक ३१/०१/२००९ रोजी केलेला आहे. तसेच लोखंडी नांगरांचा वेळोवेळी लाभार्थी हिस्सा भरणा दिनांक २१/०७/२००९ रोजी केलेला आहे.तसेच एचडीपीई पाईप दिनांक २७/०१/२००९ रोजी केलेला आहे.तसेच एचडीपीई पाईप दिनांक २७/०१/२००९ पुरवठा आदेशान्वये दिनांक ३/२/२००९ पुरवठा झालेला आहे.तसेच एचडीपीई पाईपचा वेळोवेळी लाभार्थी हिस्सा भरणा केलेला आहे.एचडीपीई सिन्नर चांदवड, दिंडोरी या गटाचा शेवटचा लाभार्थी हिस्सा भरणा दिनांक २१/७/२००९ रोजी केलेला आहे.सर्व लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला असून वसूली रक्कम पुरवठादार संस्थेस अदा करण्यात आलेला आहे.

(८) गटस्तरावर लाभार्थी नोंदवह्या ठेवण्यात आल्या आहेत आणि दुबार लाभ दिलेला नसल्याचे गटस्तरावरील अधिकारी यांचा दाखला प्राप्त आहे.

(९) पीएसबी हे नवीन जैविक पिक संरक्षण उत्पादन असल्याने शेतक-यांना प्रचार व प्रसार करण्यासाठी अतिशय अल्प दरात अनुदानित रक्कम रू.१२.५० ने वाटप करण्यात आलेले आहेत त्यामुळे प्रस्ताव तयार करण्यात आले नव्हते.

(१०) परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे सर्व गटांना बॅच नं.७/०८व २८/०८ इंडोसल्फाज हे औषधाचा पुरवठा करण्यात आला होता.त्यामुळे दोन्ही बॅचचा नमुना बागलाण व इगतपूरी गटाच्या किटकनाशक निरक्षकांनी नमुना घेऊन प्रयोग शाळेत तपासणी करून घेतलेला आहे.त्यामुळे एकच बॅच असल्याने पुनश्चः नमुना इतर गटाने घेतलेला नाही.

(११) केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत औजारे खरेदी बाबत कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग मंत्रालय मुंबई ३२ दिनांक १४ ऑगस्ट,२००८ अन्वये तांत्रिक मान्यता घेण्याची आवश्यकता नाही असे कळविले आहे. पुरवठा आदेश देतांना त्यामध्ये औजारे विक्री पश्चात सेवा दुरूस्ती बदली इ.बाबतचे अटी व शर्ती नमुद करूनच पुरवठादार संस्थेस पुरवठा आदेश देण्यात येतात तसेच हमी पत्र पुरवठादार संस्थेने शासनाकडे दर करार निश्चिती करते वेळी दिलेली आहे असे मा.कृषी संचालक कृषी आयुक्तालय पुणे यांनी दि.४/७/२००९ चे पत्रान्वये स्वतंत्र कळविले आहे आणि नमुद असलेले साहित्य लोकप्रमिनिधीसमोर वाटप केले आहे. त्यासाठी छायांचित्र काढणेसाठी स्वतंत्र तरतुद नसल्याने तसे छायाचित्र काढणेत आलेले नाहीत.

(१२) गटस्तरावर औजाराचे वाटप करतांना विहित नमुन्यातील प्रस्ताव घेवून वाटप केलेले आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती.

**परिच्छेद क्रमांक ३.७८८ :- जिल्हा परिषद २० टक्के सेसअनुदानातून मागासवर्गीय लाभार्थ्यांना सौर कंदिल पुरविणेतील अनियमितता (सन २००८-०९)**

समाजकल्याण विभाग जिल्हा परिषद नाशिक यांनी शासन दरकरारानुसार जिल्हा परिषद उपकरातून मागासवर्गीय लाभार्थ्यांना सौर कंदिल पुरविणेसाठी रक्कम रूपये ३२,९७,१७५/- खर्च केला आहे.याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) समाजकल्याण समितीच्या ठरावामध्ये लाभार्थी यादीस जिल्हा परिषद सभेची कार्योत्तर मंजूरी घेणे आवश्यक आहे.

(२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण शासन निर्णय क्र.झेडपीए-२००८/प्र.क्र.४४६ दि.२०/०६/२००८ नुसार सदरची योजना ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार राबविण्यात आलेली नाही.

(३) दरकरारातील अट क्र.९ (ब) (ii) तसेच अट क्र.८ अन्वये एकूण रक्कमेच्या १० टक्के रूपये ३,२९,७३८/- ची राष्ट्रीयकृत बँकेची गॅरंटी घेण्यात आली नाही.

(४) दरकरार अट क्र.४ नुसार वर्षासाठी देखभालीस पुरवठादार बांधील रहावा यासाठी करारनामा करून घेतलेला नाही.

(५) एकूण ३३ नग सौरकंदील वाटप होणे बाकी आहेत.

(६) मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.त्यामुळे दुबार लाभ दिला किंवा कसे याची खात्री करता आली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) या योजनेच्या लाभार्थी निवड यादीस समाज कल्याण समिती सभा दिनांक ३/११/२००८ ठराव क्र.१०२ अन्वये मंजुरी देण्यात आलेली असून लाभार्थी याद्यास (सर्व योजनांच्या एकत्रित करुन) स्वतंत्रपणे बाईडिंग केलेल्या नस्तीत सुरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत. याशिवाय समाज कल्याण समिती सभा दिनांक ७/३/२०११ ठराव क्र.१९१ अन्वये मंजुरी घेण्यात आलेली आहे.

(२) सदर योजनेत बहुतांश लाभ त्याच आर्थिक वर्षातच देण्यात आलेला आहे. या पुढे वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येईल. तरी कृपया शक पुर्तता स्विकृत होणेस विनंती.

(३) बँक ऑफ इंडिया, शाखा बंगलोर या राष्ट्रीयकृत बँकेची दिनांक २२/१२/२००९ अन्वये रक्कम रुपये ३,६५,६२५/- ची बँक गॅरंटी घेण्यात आलेली असून तिची मुदत २५/२/२०१४ पर्यंत होती.

(४) सदर पुरवठाधाराकडून दरकरारातील अट क्रमांक ४ नुसार देखभालीस पुरवठाधारक बांधिल राहावा म्हणून त्याच्याकडून दिनांक ३१/३/२०१० अन्वये करारनामा केलेला आहे. त्यामध्ये देखभालीची ५ वर्षांची हमी घेतलेली आहे.

(५) एकूण ३३ नग सौर कंदील वाटप झाले आहेत.

(६) प्रपत्र अ मधील मास्टर नोंदवही सर्व पंचायत समितींनी ठेवलेली असून दुबार लाभ दिलेला नाही.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.७८९ :- २० टक्के अनुदानातून अनुदानित वस्तीगृहांना सौर कंदिल पुरविणेतील अनियमितता (सन २००८-०९)**

समाजकल्याण विभाग जिल्हा परिषद नाशिक यांनी जिल्हा परिषद उपकरातून अनुदानित वसतीगृहांना सौर कंदिल पुरविण्यासाठी रक्कम रूपये ९,९७,४९७/-खर्च केला आहे. याबाबत खालील आक्षेप आहेत.

(१) समाजकल्याण समितीच्या ठरावामध्ये वसतीगृह निवड यादी नाही.याबाबत स्पष्टीकरणासह वसतीगृह निवड यादीस कार्योत्तर मंजूरी घेणे आवश्यक आहे.

(२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण शासन निर्णय क्र.झेडपीए-२००८/प्र.क्र.४४६ दि.२०/०६/२००८ नुसार सदरची योजना ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार राबविण्यात आलेली नाही.

(३) देवळा पब्लीक स्कुल देवळा या वसतीगृहास २० सोलर दिवे पुरविण्यात आले.सदरचे वसतीगृह शासन अनुदानीत नाही.शिक्षण विभाग (प्राथमिक) कडून तरतुद करून जिल्हा परिषद स्वतःच्या अनुदानातून वसतीगृह चालविले.त्यामुळे शिक्षण विभागामार्फत जिल्हा परिषद सेस मध्ये तरतुद करून सदरचा खर्च करणे आवश्यक असतांना नियमबाह्यपणे २० टक्के सेस अनुदानातून खर्च केलेला आहे.त्यामुळे सदरची रक्कम जिल्हा सेस मध्ये भरणा करणे आवश्यक आहे.

(४) मास्टर नोंदवही ठेवलेली नसल्याने दुबार लाभ दिला किंवा कसे याची खात्री करता आली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) समाज कल्याण समिती सभा दिनांक ३/११/२००८ ठराव क्र.१०२ अन्वये मंजूरी देण्यात आलेली असून कार्यरत असलेल्या सर्व १२१ वसतिगृहांना लाभ दिलेला आहे.त्यामुळे स्वतंत्र निवड यादी तयार करण्याची आवश्यकता भासली नाही.याशिवाय स.क.समिती सभा दि.७/३/२०११ ठराव क्र.१९१ अन्वये मंजूरी घेण्यात आलेली आहे.

(२) सदर योजना मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतिगृहासाठी असून मंजूर असलेल्या सर्व १२१ वसतिगृहांना लाभ दिलेला आहे.या पुढे वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येईल.तसेच सदर लाभ त्याच आर्थिक वर्षात दिलेला आहे.

(३) देवळा पब्लीक स्कूल वसतिगृह हे जिल्हा परिषदेच्या स्वतःच्या मालकीचे असून सदर वसतिगृहात २००८-०९ ची पटसंख्या २२२ होती व त्यात ९४ मागासवर्गीय विद्यार्थी रहात होते.त्याअनुषंगाने सदर वसतिगृहास समाज कल्याण २० टक्के जि.प.सेस मधून सदर वसतिगृहास लाभ दिला जाणार नाही व शिक्षण विभागाकडूनच लाभ दिला जाईल याची दक्षता घेण्यात येईल.

(४) सदर योजना वैयक्तीक लाभाची नसून मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतिगृहासाठी प्रथमच राबविण्यात आली आहे.तसेच वसतिगृहानिहाय स्वतंत्र साठा रजिस्टर ठेवण्यात आले आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.७९० :- २० टक्के सेस अनुदानातून मागासवर्गीय लाभार्थ्यांना एचडीपीई पुरविणेतील अनियमितता (सन २००८-०९)**

समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद नाशिक यांनी शासन दर करारानुसार जिल्हा परिषद उपकरातून मागासवर्गीय लाभार्थ्यांना एचडीपीई पाईप पुरविणेसाठी रक्कम रूपये ३६,९६,६००/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) समाज कल्याण समितीच्या ठरावामध्ये लाभार्थी यादी नाही.

(२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण शासन निर्णय क्र.झेडपीए-२००८/प्र.क्र.४४६ दि.२०/०६/२००८ नुसार सदरची योजना ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार राबविण्यात आलेली नाही.

(३) एकूण ३७५ पाईप वाटप होणे बाकी आहे.यामुळे रक्कम रूपये १,८९३७५/- जिल्हा परिषद सेसचा निधी अडकून पडलेला आहे.

(४) चांदवड तालुक्यात ४५० पाईप ३० लाभार्थ्यांना वाटप केलेले आहेत परंतू २६ प्रस्ताव लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाही.

(५) मास्टर नोंदवही ठेवलेली नसल्याने दुबार लाभ दिला किंवा कसे याची खात्री करता आली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) या योजनेच्या लाभार्थी निवड यादीस समाजकल्याण समिती सभा दि.३/११/२००८ ठराव क्र.१०२ अन्वये मंजूरी देण्यात आलेली असून लाभार्थी याद्या (सर्व योजनांच्या एकत्रित करून) स्वतंत्रपणे बाईडींग केलेल्या नस्तीत सुरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत.याशिवाय स.क.समिती सभा दि.७/३/२०११ ठराव क्र.१९१ अन्वये मंजूरी घेण्यात आलेली आहे.

(२) सदर योजनेत बहुतांश लाभ त्याच आर्थिक वर्षातच देण्यात आलेला आहे.यापुढे वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येईल.

(३) सदर योजनेतील पाईप वाटप झालेले आहेत.

(४) चांदवड तालुक्यातील २६ प्रस्ताव शोधण्याचे काम सुरू आहे.

(५) प्रपत्र अ मधील मास्टर नोंदवही पंचायत समितींनी ठेवलेली असून दुबार लाभ दिलेला नाही.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.७९१ :- २० टक्के सेस अनुदानातून मागासवर्गीय लाभार्थ्यांना भजनी साहित्य पुरविणेतील अनियमितता (सन २००८-०९)**

समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद नाशिक यांनी जिल्हा परिषद उपकरातून मागासवर्गीय लाभार्थ्यांना भजनी साहित्य पुरविणेसाठी रक्कम रूपये ६,१४,३८३/- खर्च केला आहे.याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) समाजकल्याण समितीच्या ठरावामध्ये लाभार्थी यादी नाही.

(२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण शासन निर्णय क्र.झेडपीए-२००८/प्र.क्र.४४६ दि.२०/०६/२००८ नुसार सदरची योजना ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार राबविण्यात आलेली नाही.

(३) भजनी साहित्य कोणत्या कंपनीचे आहे याचा उल्लेख नसल्याने तसेच तपासणी रिपोर्टवरसुध्दा कंपनीचा उल्लेख नसल्याने योग्य कंपनीचे साहित्य असलेबाबत खात्री करता आली नाही.

(४) करारनाम्यातील अट क्र.३,४,५ नुसार विहित कालावधीत साहित्य पुरवठा केला नसल्यास किमंतीच्या अर्धा टक्के दंड करणे आवश्यक आहे.दंडात्मक कार्यवाही केलेली नाही.

(५) मास्टर नोंदवही ठेवलेली नसल्याने दुबार लाभ दिला किंवा कसे याची खात्री करता आली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) या योजनेच्या लाभार्थी निवड यादीस समाजकल्याण समिती सभा दिनांक ३/११/२००८ ठराव क्र.१०२ अन्वये मंजूरी देण्यात आलेली असून लाभार्थी याद्या (सर्व योजनांच्या एकत्रित करून) स्वतंत्रपणे बाईडींग केलेल्या नस्तीत सुरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत.याशिवाय स.क.समिती सभा दि.७/३/२०११ ठराव क्र.१९१ अन्वये मंजूरी घेण्यात आलेली आहे.

(२) सदर योजनेत बहुतांश लाभ त्याच आर्थिक वर्षातच देण्यात आलेला आहे.यापुढे योजनेची कार्यवाही ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार करणेबाबत दक्षता घेण्यात येईल.

(३) भजनी साहित्याची शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या तपासणी अहवालात सदर साहित्य कोणत्या कंपनीचे आहे.याचा उल्लेख नाही ही बाब खरी आहे.मात्र सदर साहित्य योग्य व नामांकित कंपनीचे असल्याचे नमुद केलेले आहे.

(४) विलंब कालावधी एक आठवडा पेक्षा कमी असल्याने दंड आकारणी केलेली नाही.

(५) प्रपत्र अ मधील मास्टर नोंदवही पंचायत समितींनी ठेवलेली असून दुबार लाभ दिलेला नाही.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.७९२ :- २० टक्के सेस अनुदानातून समाजकल्याण विभागाच्या अधिपत्याखालील अनुदानीत वस्तीगृहांना ब्लॅकेंट/सतरंजी पुरविणेतील अनियमितता (सन २००८-०९)**

समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद नाशिक यांनी जिल्हा परिषद उपकरातून समाजकल्याण विभागाच्या अधिपत्या खालील अनुदानीत वस्तीगृहाना ब्लॅकेंट/सतरंजी पुरविणेसाठी रक्कम रूपये ११,९९,८२८/- खर्च केला आहे.याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) समाजकल्याण समितीच्या ठरावामध्ये वसतीगृह निवड यादी नाही.

(२) नस्तीसोबत वसतीगृहाचे मागणीपत्र नाही. मागणीपत्र नसतांना कशा आधारे ब्लॅकेंट/सतरंजी खरेदी केली याचा खुलासा करणे आवश्यक आहे.

(३) वसतीगृहात १० वी पर्यंतची मुले असतात त्यामुळे ३x६ साईज सतरंजी खरेदी करणे उचित झाले असते,परंतू ४x६ साईज सतरंजी खरेदी केल्याने कमी विद्यार्थ्यांना लाभ झाला.

(४) महाराष्ट्र शासन,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,निर्णय क्रमांक बी.सी.एच.२००८/प्र.क्र./३२०/यावक४,दिनांक १४/०६/२००८ नुसार ब्लॅकेंट/सतरंजी संचालक समाजकल्याण पुणे यांनी खरेदी करावयाचे आहे.अन्य कोणी खरेदी केल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे शासन निर्णयात नमुद असतांना नियमबाह्यपणे खरेदी केली असल्याचे दिसून येत आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) समाजकल्याण समिती सभा दि.३/११/२००८ ठराव क्र.१०२ अन्वये मंजूरी देण्यात आलेली असून कार्यरत असलेल्या १२१ पैकी ८७ वसतिगृहांना मंजूर तरतुदीच्या आधीन राहून लाभ दिलेला आहे.आता समाजकल्याण समिती सभा दि.७/३/२०११ ठराव क्र.१९१ अन्वये मंजूरी घेण्यात आलेली आहे.

(२) वसतिगृहाची गरज व मुलांना याबाबतच्या देय असलेल्या आवश्यक सुविधा या सर्व गोष्टींचा विचार करून वसतिगृहास ब्लॅकेंट व सतरंजी पुरविण्याचा निर्णय झाल्याने व सदर योजना जिल्हा परिषद सर्व साधारण सभा दिनांक २५/३/२००८ ठराव क्रमांक १७५ अन्वये सदर योजना राबविण्यास मान्यता दिलेली आहे.

(३) वसतिगृहातील विद्यार्थींना झोपण्यासाठी पलंगाची व्यवस्था नसल्याने विद्यार्थांना जमीनीवर झोपावे लागते.त्यामुळे पुरेसा बिछाना असावा या उद्देशाने ४x६ साईजची सतरंजी खरेदी करण्यात आलेली आहे.

(४) सदर योजनेवरील खर्च हा राज्य शासनाच्या निधीतून करण्यात आलेला नसून तो जिल्हा परिषद २० टक्के सेस मधून केलेला आहे.तसेच राज्य शासनाने २००८-०९ पर्यंत अशा प्रकरच्या कोणत्याही साहित्याचा पुरवठा केलेला नाही.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.७९३ :- २० टक्के सेस अनुदानातून मागासवर्गीय लाभार्थ्यांना ताडपत्री पुरविणेतील अनियमितता (सन २००८-०९)**

समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद नाशिक यांनी जिल्हा परिषद उपकरातून मागासवर्गीय लाभार्थ्यांना ताडपत्री पुरविणे साठी रक्कम रूपये ६,९७,७४०/- खर्च केला आहे.याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) समाजकल्याण समितीच्या ठरावामध्ये वसतीगृह निवड यादी नाही.

(२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण शासन निर्णय क्र.झेडपीए-२००८/प्र.क्र.४४६ दि.२०/०६/२००८ नुसार सदरची योजना ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार राबविण्यात आलेली नाही.

(३) लेखापरिक्षण कालावधी ११ ताडपत्री वाटप होणे बाकी आहे.त्यामुळे रू.४१,७७३/-अनुदान अडकून पडलेले आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) या योजनेच्या लाभार्थी निवड यादीस समाज कल्याण समिती सभा दिनांक ३/११/२००८ ठराव क्र.१०२ अन्वये मंजूरी देण्यात आलेली असून लाभार्थी याद्या (सर्व योजनांच्या एकत्रित करून) स्वतंत्रपणे बाईडींग केलेल्या नस्तीत सुरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत.याशिवाय स.क.समिती सभा दि.७/३/२०११ ठराव क्र.१९१ अन्वये मंजूरी घेण्यात आलेली आहे.

(२) सदर योजनेत बहुतांश लाभ त्याच आर्थिक वर्षातच देण्यात आलेला आहे.यापुढे योजनेची कार्यवाही ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार करणेबाबत दक्षता घेण्यात येईल.

(३) परिच्छेदात नमुद ११ ताडपत्रीचे वाटप झालेले आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.७९४ : मागासवर्गीय अनुदानातील वसतिगृहांना भाडे मंजूर करणेतील अनियमिततेबाबत (सन २००८-०९)**

समाज कल्याण विभागाने अनुदानित वसतीगृहांना भाडे देणेसाठी रुपये १५,२०,४९४/- एवढा खर्च केला आहे.याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) अधिक्षक पुज्य साने गुरूजी छात्रालय दहीवड ता.देवळा यांचा भाडे मागणी प्रस्ताव क्र.७१ दि.१९/३/२००९ हा जून २००६ ते मे २००८ या २४ महिन्याच्या असतांना समाजकल्याण कार्यालय जिल्हा परिषद नाशिक यांचे आदेश क्रमांक ५४१/०८-०९,दिनांक ३१/३/२००९ अन्वये दिनांक १/६/२००१ ते दिनांक ३१/५/२००९ या ८४ महिन्याचे भाडे प्रतिमहा रूपये १०,७१२/- प्रमाणे एकूण रू.८,२४,६८८/-च्या ७५ टक्के रूपये ६,७४,८५६/- एवढे अनुदान प्रदान केले आहे. त्यामुळे रू.४,८२,०४०/- जादा प्रदान झालेला आहे.

(२) अधिक्षक कमला नेहरू कन्या छात्रालय दहीवड ता.देवळा यांच्या भाडे मागणी प्रस्ताव क्र.७३ दि.१९/३/२००९ हा जून २००६ ते मे २००८ या २४ महिन्याचा असतांना समाजकल्याण कार्यालय जिल्हा परिषद नाशिक यांचे आदेश क्र.५४२/०८-०९ दि.३१/३/२००९ अन्वये १/६/२००१ ते ३१/५/२००९ या ८४ महिन्याचे भाडे प्रतिमहा रूपये ४,५८९/-प्रमाणे एकूण रू.३,८५,४६७/- च्या ७५ टक्के रूपये २,८९,१०७/-एवढे अनूदान प्रदान केलेले आहे.त्यामुळे रू.२,०६,५०५/- जादा प्रदान झालेले आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

**(१) पुज्य साने गुरूजी विद्यार्थी छात्रालय, दहिवड, ता.देवळा**

सदर वसतिगृहाचे सन जून २००१ ते मे २००८ एकूण ८४ महिन्याचे इमारत भाडे प्रलंबित होते. त्यासाठी या कार्यालयाने सदर ८४ महिन्याचे इमारत भाडे रक्कम रूपये ६,७४,८५६/-अदा केले हे बरोबर आहे.संबंधित संस्थेने पुज्य साने गुरूजी विद्यार्थी वसतिगृहाच्या इमारत भाडे मिळणेसाठी दोन टप्प्यात अहवाल त्यांचेकडील पत्र क्र.५९/०८ दिनांक ११/०२/२००८ अन्वये माहे एप्रिल २००१ ते ३१ मे,२००६ या कालावधीचा व पत्र क्र.७१/२००९ दिनांक १९/३/२००९ अन्वये जून २००६ ते ३१ मे २००८ या कालावधीचा भाडे मागणी प्रस्ताव वेगवेगळा या कार्यालयास सादर केलेला होता.अनुदानित वसतिगृह लेखाशिर्षावर तरतुद पुरेशी प्राप्त होत नसल्याने या कार्यालयाने वसतिगृहाच्या इमारत भाड्याचे दोन्ही प्रस्ताव एकत्रित करून माहे जून २००१ ते ३१ मे,२००८ या कालावधीचे एकूण ८४ महिन्याचे रू.६,७४,८५६/- सदर संस्थेस या कार्यालयाचे आदेश क्र.जिपना/सक/१/अनुवगृहे/५४१/०८-०९, दिनांक ३१/३/२००९ अन्वये अदा केलेले आहे.त्यांना कुठलेही इमारत भाडे जादा प्रदान झालेले नाही.

**(२) कमला नेहरू कन्या छात्रालय, दहिवड, ता. देवळा**

सदर वसतिगृहाचे सन जून २००१ ते ३१ मे २००८ एकूण ८४ महिन्याचे इमारत भाडे प्रलंबित होते.त्यासाठी या कार्यालयाने सदर ८४ महिन्याचे इमारत भाडे रक्कम रूपये २,८९,१०७/-अदा केले हे बरोबर आहे.संबंधित संस्थेने **कमला नेहरू कन्या छात्रालय,दहिवड ता.देवळा** या वसतिगृहाचे इमारत भाडे मिळण्यासाठी दोन टप्प्यात मागणी प्रस्ताव त्यांचेकडील पत्र क्र ६२/०८ दिनांक ११/०२/२००८ अन्वये माहे एप्रिल २००१ ते ३१ मे२००६ या कालावधीचा व पत्र क्र.७३/२००९ दिनांक १९/३/२००९ अन्वये जून २००६ ते ३१ मे २००८ या कालावधीचा भाडे मागणी प्रस्ताव वेगवेगळा या कार्यालयास सादर केलेला होता.अनुदानित वसतिगृह लेखाशिर्षावर तरतुदी पुरेशी प्राप्त होत नसल्याने या कार्यालयाने वसतिगृहाच्या इमारत भाड्याने दोन्ही प्रस्ताव एकत्रित करून माहे जून २००१ ते ३१ मे,२००८ या कालावधीचे एकूण ८४ महिन्याचे रूपये २,८९,१०७/-सदर संस्थेस या कार्यालयाचे आदेश क्र.जिपना/सक/१/अनुवगृहे/५४२/०८-०९ दिनांक ३१/३/२००९ अन्वये अदा केलेले आहे.त्यांना कुठलेही इमारत भाडे जादा प्रधान झालेले नाही.

वरील प्रमाणे दोन्ही वसतिगृहांना देय असलेल्या कालावधीचे म्हणजेच ८४ महिन्याचे इमारत भाडे नियमानुसार अदा केलेले आहे.याबाबत या कार्यालयाचे मंजूरी आदेश व बीटीआर ची झेरॉक्स प्रत तसेच संस्थेने मागणी केलेल्या इमारत भाडे प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रति सोबत सादर करणेत येत आहे. तरी कृपया परिच्छेद मान्य होणेस विनंती.

**परिच्छेद क्रमांक ३.८९५ (४००) (८) व (४२) :- पाचवी ते दहावी पर्यंत शाळेत जाणा-या मुलींकरिता जिल्हा परिषद सेस निधीतून वसतीगृहांना पाठविणेबाबतच्या खर्चाबाबत (सन २००८-०९)**

महिला व बालकल्याण विभागाने सन २००८-०९ मध्ये उपरोक्त बाबत जिल्हा परिषद सेस मधून रक्कम रुपये २,६७,३००/- व २२९५ सामाजिक सुरक्षा व कल्याण या लेखाशीर्षांतर्गत रक्कम रुपये १,८०,०००/- असा एकूण रु. ४,४७,३००/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) बालविकास प्रकल्प अधिकारी, येवला यांचे दिनांक ३१.१२.२००८ व सुरगणा यांचे दिनांक २६.०९.२००८ व दिनांक २४.०२.२००९ च्या तपासणी अहवालानुसार पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने तसेच सुरगणा येथे शौचालय नसल्याने अटी व शर्तीची पुर्तता होत नसतांना प्रत्येकी रुपये ९०,०००/- प्रमाणे रुपये १,८०,०००/- नियमबाह्य प्रदान अनुदान वसूल होणे आवश्यक आहे. (परि. क्र.८ व ४२)

(२) दिंडोरी वसतीगृहाची प्रवेशित मुलींची संख्या १९ असल्याने रु.८५,५००/- ऐवजी रु.८७,३००/- प्रदान केल्याने रु.१८००/- चे जादा प्रदान झाले आहे. प्रकल्प अधिकारी, दिंडोरी यांचे दि.३०.०९.२००८ च्या तपासणी अहवालानुसार अटी व शर्तीची पुर्तता संस्था करीत नसल्याने नियमबाह्य प्रदान रक्कम रुपये ८७,३००/- वसूल होणे आवश्यक आहे. (परि.क्र.८)

(३) सौंदाणे वसतीगृहांसाठी २० मुलांचे प्रतिमहा रुपये ४५०/- प्रमाणे १० महिन्यांसाठी रक्कम रुपये ९०,०००/- प्रदान केले आहे. तथापि प्रकल्प अधिकारी, मालेगाव यांचे दिनांक १६.१.२००९ व दिनांक १२.२.२००९ च्या अहवालानुसार १७ मुली उपस्थित असल्याने ३ मुलीचे जादा प्रदान रक्कम रुपये १३,५००/- वसूल होणे आवश्यक आहे. (परि.क्र.८)

(४) प्रकल्प अधिकारी, पेठ यांचे दिनांक १७.३.२००९ च्या अहवालानुसार पेठ वसतीगृहातील २० मुलींचे उत्पन्नाचे दाखले, दारिद्रय रेषा दाखला व क्रमांक संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र उपलब्ध नाहीत. तसेच इमारत भाडोत्री आहे. सदर उणिवांची पुर्तता होणे आवश्यक आहे. (परि.क्र.८)

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) बालविकास प्रकल्प अधिकारी, येवला व सुरगणा यांचे शकात नमूद दिनांकाचे अहवालामध्ये नमूद केलेल्या नुसार दोनही वसतिगृहांसाठी पुरेशी जागा असल्याचे नमूद आहे. दोनही अहवाल सोबत सादर केलेले आहे. तसेच सुरगणा येथील वसतीगृहास शौचालय नसल्याचे नमूद आहे. तसेच सुरगणा येथील वसतीगृह हे अत्यंत दुर्गम व आदिवासी भागात असून अतिदुर्गम भागातील मुलींना शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणे अत्यावश्यक होते. सुरगणा या अतिदुर्गम भागात पाण्याची टंचाई असल्याकारणाने मात्र तपासणीचे वेळी शौचालय बांधकाम सुरु असल्याचे दिसून आलेले आहे. सन २००९-१० पासून योजना बंद झालेने पुढील अनुदान दिलेले नाही. मात्र शौचालय उभारणी करणेचे काम सुरु असल्याने सदर वसतीगृहांना अनुदान वितरित केलेले आहे.

(२) बाल विकास प्रकल्प अधिकारी, दिंडोरी यांनी सादर केलेला दिनांक ३०.०९.२००८ चा तपासणी अहवाल पाहता सदर अहवालाचे दिवशी उपस्थित मुलींची संख्या ही १९ होती. प्रत्यक्षात सदर अहवालातील बाब क्र. २४ मध्ये एकूण विद्यार्थीनींची संख्या २० दर्शविलेली आहे. म्हणजेच प्रवेशित मुली २० असून तपासणीचे दिवशी एक मुलगी गैरहजर होती. तसेच दिनांक २३.३.२००९ च्या तपासणी अहवालात बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी २० मुली उपस्थित असल्याचा अहवाल सादर केल्याने अनुदान वितरण केलेले आहे.

(३) सौंदाणे वसतीगृहाचा बाल विकास प्रकल्प अधिकारी, मालेगाव यांचा शकात नमूद दोनही तारखांचा तपासणी अहवाल पाहता प्रत्यक्ष प्रवेशित मुलींची संख्या ही २० दर्शविलेली असून निरिक्षणाचे वेळी उपस्थित मुलींची संख्या ही १७ दर्शविलेली आहे. अनुदान हे प्रवेशित मुलींच्या संख्येवर दिले जाते, त्यामुळे बाल विकास प्रकल्प अधिकारी, मालेगाव यांनी प्रवेशित मुलींची संख्या ही २० दर्शविल्याने अनुदान वितरित केलेले आहे.

(४) प्रकल्प अधिकारी, पेठ यांचे दिनांक १७.३.२००९ तसेच दिनांक २४.०९.२००८ चे तपासणी अहवाल तपासले असता त्यात कोठेही वसतीगृहातील २० मुलींचे उत्पन्नाचे दाखले, दारिद्रय रेषा दाखला व क्रमांक संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याचे नमूद केलेले आढळून आलेले नाही. सोबत तपासणी अहवालाच्या सत्यप्रती सादर केलेल्या आहेत.

कृपया केलेली पुर्तता विचारात घेऊन शक वगळणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.९६१ (४२८) (०३) पुरकपोषण आहार कार्यक्रमांतर्गत प्रकल्प स्तरावर उपचार शास्त्रभूत आहार पुरवठा करणेबाबत झालेल्या नियमिततेबाबत (सन २००८-०९)**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांनी प्रकल्प स्तरावर रक्कम रु.९०,०६,६६८/- चा उपचार शास्त्रभुत आहार पुरवठयावर खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) मार्गदर्शक सुचनेनुसार अंगणवाडी केंद्रावर उपचार शास्त्रभुत आहार पुरवठा होत असल्याचा बिटातील मुख्य सेविका यांनी खात्री करुन तसा अहवाल प्रत्येक बालविकास प्रकल्प अधिका-यांना सादर करणे आवश्यक असतांना तसा अहवाल सादर केल्याचे दिसून आले नाही. पुरवठादाराचे उत्पादन केंद्र तपासणी मा. आयुक्त यांनी नेमलेल्या समिती मार्फत केल्याचे दिसून आलेले नाही.

(२) करारनाम्यात नमुद केल्याप्रमाणे आहार पुरवठा केल्यानंतर चलन प्रतिवर अंगणवाडी मदतनीस सेविका, सरपंच, उपसरपंच यांच्या पोहच न घेता आलेल्या नाही. पोहच न घेता परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे १५८६ कि. ग्रॅम आहाराची प्रति किलो रु. २०.६० प्रमाणे रक्कम रु. ३२,६७२/- वसुल करुन शासनाकडे भरणा करणे आवश्यक आहे.

(३) आहार पुरवठा चलनात खाडाखोड करुन आहार पुरवठा वाढविल्याचे दिसून आले असून परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे ७३४ कि. ग्रॅम आहाराची प्रतिकिलो २०.६०/- प्रमाणे रुपये १५,१२०/- वसूल करुन शासनाकडे भरणे करणे आवश्यक आहे.

(४) माहे जून व जुलै, २००८ ची थेरेप्युटीक फुड आहार मागणी २२१९४ कि. ग्रॅम असताना पुरवठादाराने परस्पर २६२५२ कि.ग्रॅमचा पुरवठा केलेला आहे. आवश्यकता व मागणी नसतांना ४०५८ कि.ग्रॅम थेरेप्युटीक फुडचा जादा पुरवठा केल्याने २०६० प्रति कि.ग्रॅम प्रमाणे रुपये ८३,५९५/- ची जादा रक्कम पुरवठादारास प्रदान झालेली आहे. सदरची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

(५) परिशिष्टात नमुद केले प्रमाणे प्रकल्पांना करारातील अटी शर्ती नुसार १५ दिवसाच्या आता आहार पुरवठा न झाल्यास मालाच्या किमतीवर १/२ टक्के दराने दंड आकारणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही, तरी दंडाची रक्कम रु.१,१७,४९५/- वसुल करणे आवश्यक आहे.

(६) हरसुल प्रकल्पासाठी रुपये २१,३८३/- व कळवण प्रकल्पासाठी रु.५१,४७९/- असा एकूण ३५३७/- कि.ग्रॅम आहार पुरवठा खर्च दर्शविलेला असून त्याबाबतची चलने, पावती, साठा नोंदवही लेखा परिक्षणास उपलब्ध झालेली नाही.

(७) करारनाम्यातील अटी शर्ती नुसार आहाराचा पुरवठा करणे पुर्वीच चाचणी अहवाल घेणे आवश्यक असतांना एक महिना उशिराने चाचणी अहवाल प्राप्त झालेले आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) मार्गदर्शक सुचनेनुसार अंगणवाडी केंद्रावर उपचार शास्त्रभुत आहार पुरवठा होत असल्याचा बिटातील मुख्य सेविका यांनी अंगणवाडी स्तरावर प्राप्त झालेल्या मालाची खात्री करुन तसा पडताळणी केलेचा अहवाल हा अंगणवाडी स्तरावरील पावतीचे उपप्रमाणकावर दिलेला असून त्या आधारे न्याय यादृच्छिक (रँडम) पध्दतीने काही अंगणवाडी केंद्रांना बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी भेटी देऊन पाहणी केलेली आहे. तसा दाखला प्रत्येक बालविकास प्रकल्प अधिका-यांनी त्यांनी सादर केलेल्या देयकावर स्पष्टपणे नमूद केलेला आहे. पर्यवेक्षिका यांचे दाखले सोबत सादर केले आहेत. तसेच पुरवठादाराचे उत्पादन केंद्र तपासणी मा. आयुक्त, मुंबई यांनी नेमलेल्या समिती मार्फत राज्य स्तरावरुन केले नंतरच पुरवठादार निश्चिती केलेली असल्याने त्याचा अहवाल हा जिल्हा स्तरावर ठेवण्यात आलेला नाही.

(२) करारनाम्यात नमुद केल्याप्रमाणे आहार पुरवठा केल्यानंतर चलन प्रतिवर अंगणवाडी मदतनीस सेविका, सरपंच, उपसरपंच किंवा ग्रामस्थ यांचेपैकी जे कोणी उपस्थित असतील त्यांच्या पोहच न घेता आलेल्या असून सोबत परिशिष्टात नमुद केलेल्या केंद्रांच्या आहाराच्या पावत्या सादर केलेल्या असून त्यावर उपस्थितांच्या स्वाक्षरी असल्याने तसेच अंगणवाडी सेविका यांचे माल प्राप्त झाल्याचे लेखी असल्याने १५८६/- कि.ग्रॅ. आहाराची प्रति किलो रु. २०.६० प्रमाणे रक्कम रु. ३२,६७२/- वसुल करण्यात आलेली नाही.

(३) परिशिष्टात नमुद अंगणवाडी केंद्राचे चलन सादर केलेले असून सदर केंद्रावर प्राप्त झालेल्या आहार पुरवठा कोणतीही खाडाखोड केलेली नसून परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे ७३४ कि. ग्रॅम आहार हा त्या बिटात प्राप्त झालेल्या एकूण सर्व केंद्राची बेरीज आहे, त्यामुळे एका अंगणवाडी केंद्रावर ७३४ कि. ग्रॅम आहार पुरवठा केलेला नसल्याने व संपूर्ण बिटात केलेला पुरवठा हा योग्य व मागणी नुसार केलेला असल्याने प्रति किलो २०.६०/- प्रमाणे रुपये १५,१२०/- वसूल करुन शासनाकडे भरणा करण्यात आलेली नाही. तसे सेविका यांचे लेखी अहवाल सोबत सादर केले आहेत.

(४) ए.बा.वि.से.यो. नाशिक प्रकल्पाने माहे जून व जुलै, २००८ या ५० दिवसासाठी एकूण २२१९४/- कि.ग्रॅम थेरेप्युटीक फुडची मागणी संबंधित पुरवठादार यांचेकडेस नोंदविलेली आहे. पुरवठादार यांनी सदर मागणी नुसार संपूर्ण प्रकल्पात एकूण १६७७४/- कि.ग्रॅमचे थेरेप्युटीक फुडसचा जादा पुरवठा केलेला असून सदर पुरवठादार यांना १६७७४/- कि.ग्रॅमचे एकूण रक्कम रुपये ३,४५,५४३/- इतकी रक्कम अदा केलेली आहे. शकात ४०५८ कि. ग्रॅमचा जादा पुरवठा केल्याचे नमुद केलेले आहे. प्रत्यक्षात संबंधित प्रकल्पात ५४२० कि.ग्रॅम थेरेप्युटीक फुडचा जादा पुरवठा केल्याने २०.६० प्रति कि.ग्रॅम प्रमाणे रु.८३५९२/- ची जादा रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.

(५) परिशिष्टात नमुद केले प्रमाणे प्रकल्पांना करारातील त्रुटी अटी व शर्ती नुसार जिल्हा स्तरावरुन दिलेल्या आहार मागणीच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत आहार पुरवठा केलेला असल्याने व तसा दाखला बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी देयकावर नमूद केलेला असल्याने अर्धा टक्के दराने दंड आकारणी करण्यात आलेली नाही.

(६) हरसुल प्रकल्पासाठी रुपये २१,३८३/- व कळवण प्रकल्पासाठी रु.५१,४७९/- असा एकूण ३५३७/- कि.ग्रॅम आहार पुरवठा खर्च दर्शविलेला असून त्याबाबतची चलने, पावती, साठा नोंदवही लेखा परिक्षणास उपलब्ध झालेली नाही असे नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात सदर प्रकल्पांचे दप्तर लेखा परिक्षणास उपलब्ध करुन दिलेले असून सदरचे दप्तर लेखा परिक्षक यांनी तपासल्याचे खुणा व लेखा परिक्षक यांची स्वाक्षरी नमूद असून सोबत दप्तराचे सत्यप्रती सादर केलेल्या आहेत. कळवण प्रकल्पाचे रु. ५१,४७९/- चे अशा रकमेचे कोणतेही देयक या कार्यालयाने अदा केलेचे दप्तरावरुन दिसून येत नाही.

(७) माहे जून व जुलै, २००८ च्या थेरेप्युटीक फुडसचा पुरवठा करणेपूर्वीच चाचणी अहवाल घेणेत आलेला नाही. सदरचा आहाराचा नमुना हा दिनांक ४.६.२००८ रोजी प्राप्त झालेला असून त्यानंतरच संबंधित पुरवठादार यांनी पुरवठा केलेला असून तसा पुरवठा केल्याच्या अंगणवाडी केंद्राच्या पोहोच पावत्या सोबत सादर केलेल्या आहेत.

तरी केलेली पुर्तता विचारात घेऊन सदरचा परिच्छेद स्विकृत होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.९६२ (४२९) (२०) नाशिक सोशल सर्व्हीस सोसायटी नाशिक यांना सुरगणा गटातील सुक्ष्म नियोजन प्रकल्पासाठी प्रदान केलेल्या रकमेबाबत (सन २००८-०९)**

पंचायत समिति सुरगणा यांचेकडील अनामत नोंदवहीची पडताळणी केली असून दिनांक २४.५.२००७ रोजी जमा केलेली रक्कम रु. ३८,००,०००/- मधून खालीलप्रमाणे खर्च नोंदविण्यात आलेला आहे.

सन २००७-०८ या वित्तीय वर्षात नाशिक सोशल सर्व्हिस सोसायटी नाशिक यांना एकूण रुपये २६,००,०००/- व यशदा पुणे यांचा रक्कम रु. ७,६०,०००/- असा एकूण रु. ३३,६०,०००/- इतका करण्यात आला असून रु. ४,४०,०००/- अनामत सदरी शिल्लक आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक विल्सन रोड्रींक्स संचालक, नाशिक स्पेशल सर्व्हिस सोसायटी यांचेमधील करारमान्याचे अवलोकन केले असता सुरगणा गटातील १९० गावांतील सुक्ष्म नियोजन प्रकल्पासाठी नाशिक स्पेशल सर्व्हिस संस्थेस ३ वर्षात एकूण रक्कम रुपये ३१,७४,६८०/- व यशदा पुणे यांना रक्कम ०६,३४,९३६/- असा एकूण रक्कम रुपये ३८,०९,६१६/- खर्च गट स्तरावरुन करावयाचा असून त्यासाठी रु. ३८,००,०००/- गट स्तरावरुन अनामत सदरी जमा करुन त्यामधून उपरोक्त खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) अनुदान प्रदान करताना अनामत परतावा देयकासोबत जोडण्यात आलेल्या मंजूरी आदेशात महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्र.मुविने-१०९५/प्र.क्र.-५, विनिमय दिनांक ३१.०३.१९९५ नुसार आवश्यक होते. स्वयंस्पष्ट आणि परिपूर्ण तपशील नमूद केलेला नाही.

(२) उपरोक्त करारनामाचे अवलोकन केले असता सूक्ष्म नियोजन प्रकल्प म्हणजेच शासनाची भूमिका नेमकी कोणती योजना आहे. काय उद्दीष्ट आहे, त्यासाठी शासनाचे मार्गदर्शक सूचना अटी व शर्ती यांचा स्पष्ट उल्लेख आढळून येत नाही.

(३) सुरगणा गटातील दुर्गम भागातील सर्व्हेक्षणासाठी नाशिक येथील खाजगी संस्थेची निवड कोणत्या स्तरावरुन करण्यात आली. कोणते निकष वापरण्यात आले. सदर संस्थेकडे कोणता पुर्वानूभव, कोणते तंत्रज्ञान उपलब्ध आहे इत्यादी तपशील नाही.

(४) सदर मोठ्या प्रमाणात प्रदान अनुदान रक्कम विनियोग बाबत प्रभावी नियंत्रणासाठी सक्षम अधिकारी यांनी वेळोवेळी पाहणी करुन सादर केलेल्या पडताळणी अहवाल पंचायत समिती स्तरावर उपलब्ध नाही.

(५) सदर योजना आदिवासी व अशिक्षित भागासाठी असतांना तसेच शासकीय व्यवहार मराठी भाषेत करणे बंधनकारक असतांना करारनामा इंग्रजी भाषेत व क्लिष्ट शब्दात करण्यात आलेला आहे. करारनाम्याचा मसुदा कोणी निश्चित केला त्याबाबत शासनाच्या कोणत्या मार्गदर्शक सूचना आहेत, याबाबत तपशील उपलब्ध झालेला नाही. करारनाम्यात नमुद तपशील पाहता संबंधित संस्थेने करारनाम्याचा मसुदा तयार केल्याचे दिसून येते. यशदा पुणे यांना रुपये ६,३४,९३६/- चे प्रदान करावयाचे निश्चित केलेले असताना प्रत्यक्षात रु. ७.६०,०००/- चे प्रदान केलेले आहे. जादा प्रदान रक्कम झाल्याचे दिसून येते.

(६) करारनाम्यात नमुद केल्याप्रमाणे प्रथम वर्षात प्रदान रक्कम रु. १२,००,०००/- अनुदानाच्या खर्चाचे विवरण जिल्हा परिषदेस सादर करणे आवश्यक असतांना तसेच विवरण पत्र सादर केले किंवा कसे याची माहिती गट स्तरावर उपलब्ध झालेली नाही.

(७) गट स्तरावरुन अनुदान रक्कम प्रदान करण्यात येत असतांना विनियोगाबाबत गट स्तरावरुन कोणतेही नियंत्रण नसल्याचे स्पष्ट होते.

उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.

(१) शकात नमूद केलेनुसार अदा केलेले देयक हे प्रकल्प स्तरावर मंजूर करण्यात आलेले असून सदरचे मंजूरी आदेश हे बाविप्रअ यांनी केलेले आहेत. मंजुरी आदेशात महाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्रक क्रमांक मुविनी-१०९५/प्र.क्र.५/विनिमय दिनांक ३१.३.१९९५ नुसार ज्या बाबीसाठी खर्च करावयाचा आहे ती बाब स्पष्टपणे नमुद करण्यात आलेली असून देयकावर लेखाशीर्ष नमूद करण्यात आलेले आहेत. तसेच सदर शासन निर्णयामध्ये नमूद केले नुसार आदेश निर्गमित करणेची दक्षता घेतलेली आहे.

(२) सदर बाब ही यशदा पुणे या संस्थेची संकल्पना असून सदर संकल्पना राबविणेसाठी यशदा पुणे यांनी संबंधित योजनेची कार्यशाळा घेऊन याची संकल्पना विषद केलेली असून त्यांचे संकल्पनेनुसार सदरची योजना ही कुपोषण व आजारपणा कमी करणे, नियोजनपूर्वक बहुक्षेत्रीय उपाययोजना आणि लोक सहभागाचे माध्यमातून माता व बालकांचा संगोपनाचा स्तर उंचावणे, गाव सुक्ष्म नियोजनाच्या माध्यमातून ग्रामस्थांना स्वतःची वाटणारी आणि ग्रामस्थांच्या माध्यमातून व्यवस्थापन होणारी यंत्रणा स्थापन करणे, तसेच विविध शासकीय विभागाच्या कर्मचा-यांच्या कार्याचा प्रभावीपणा वाढविणे, उपलब्ध पायाभूत सुविधांचा प्रभावी आणि समाधानकारक वापर आणि लोक सहभागातून देखभाल इत्यादी उद्दिष्टांसाठी सदर योजना राबविणेत आलेली आहे. तसे कार्यालयीन टिपणीत सविस्तर नमुद केलेले आहे.

(३) सदर संस्थेची निवड करणे कामी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्रकल्प समन्वयक यशदा पुणे यांचे उपस्थितीत दिनांक १२.७.२००६ रोजी झालेल्या समन्वय सभेत जिल्ह्यात विविध शासकीय विभागांशी समन्वयाने व गतिमान काम करणाःया संस्थांचे प्राप्त प्रस्तावामधून सदर संस्थेचा पूर्व अनुभव व त्यांनी यापूर्वी या विभागाशी तसेच जिल्हा परिषदेच्या अन्य विभागांशी केलेल्या कामाच्या आधारवरच सदर संस्थेची निवड करणेत आलेली आहे.

(४) सदरच्या रकमांचे प्रदान हे सक्षम प्राधिकारी यांचे नियंत्रणाखालीच करणेत आलेले असून योजनेचे कामाची प्रभावी अंमलबजावणी व पाहणी प्रकल्प समन्वयक यशदा पुणे यांनी वेळोवेळी केलेली असून केलेले कामकाज समाधानकारक असल्याचे निदर्शनास आलेनंतरच रकमांचे प्रदान करण्यात आलेले आहे. सदर पाहणी अहवाल हे यशदा पुणे या संस्थेकडेस जमा केलेले आहेत. तसा नाशिक सोशल सर्व्हीस सोसायटी यांनी सादर केलेले अहवाल सोबत सादर केलेले आहे.

(५) सदर करारमान्याचा मसुदा हा मा. प्रकल्प समन्वयक CCMP यशदा पुणे यांनी निश्चित केलेल्या मसुद्यानुसारच केलेला आहे. समवेत मा. प्रकल्प समन्वयक CCMP यशदा पुणे यांनी तयार केलेल्या करारनाम्याची सत्यप्रत समवेत सादर करणेत आलेली आहे. सदर कामकाज हे वैयक्तिक लाभाचे नसून आदिवासी भागातील सद्यःस्थितीत बदल करणे कामी राज्य स्तरावर विविध योजना राबविण्यासाठी केलेला सुक्ष्म नियोजन अहवालासाठी असल्याने सदरचा करारनाम्याचा मसुदा हा यशदा पुणे यांनी करुन दिलेला आहे.

यशदा पुणे यांना रुपये ६,३४,९३६/-चे प्रदान करावयाचे निश्चित केलेले असतांना प्रत्यक्षात ७,७६,०००/- चे प्रदान केलेले असून यशदा पुणे यांना जादा रक्कम ही सॉप्टवेअर विकसित करण्यासाठी देण्यात आलेली आहे.

(६) करारनाम्यात नमूद केलेप्रमाणे प्रथम वर्षात प्रदान रक्कम रुपये १२,००,०००/- अनुदानाच्या खर्चाचे विवरण पत्र जिल्हा परिषदेस सादर केलेले नसून एकत्रित खर्चाचा अहवाल यशदा पुणे यांना सादर करणेत आलेला आहे.

(७) गट स्तरावरुन रक्कम प्रदान करण्यात येत असताना विनियोगाबाबत गट स्तरावर बाल विकास प्रकल्प अधिकारी तसेच प्रकल्प समन्वयक यशदा पुणे तसेच गट विकास अधिकारी यांनी वेळोवेळी सदर बाबींची पाहणी केलेली असून पाहणी मध्ये कामकाज योग्य पध्दतीने होत असून माहिती ही अपलोड केलेची माहिती व पाहणी अहवाल हे योजना यशदा पुणे यांची असल्याने व हे अहवाल शासनास सादर करावयाचे असल्यामुळे व केलेल्या करारनाम्यातील अट क्र.१३ व १४ मध्ये नमूद केलेप्रमाणे यशदा पुणे यांचेकडे या योजनेच्या कामाचे प्रगती अहवाल हे समक्ष प्रकल्प समन्वयक यांचेकडेस सादर केलेले असून त्याच्या प्रती ह्या गट स्तरावर ठेवण्यात आलेल्या नाहीत.

केलेली पूर्तता विचारात घेऊन सदर परिच्छेद स्विकृत होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.९६३ :- अंगणवाडी बांधकामासाठी केलेल्या खर्चाबाबत (सन २००८-०९)**

पंचायत समिती, सिन्नर अंतर्गत महिला व बालकल्याण विभागाचे प्रमाणक क्र.३३(अ) दि.३१/०३/२००९ रक्कम रु.१९,४४,०००/- एकूण १८ अंगणवाडी बांधकामासाठी ग्रामपंचायतीना प्रति रक्कम रु.१,०८,०००/- वाटप केले आहे. व दि.३१/०३/२००९ रक्कम रु.१२,९६,०००/- अनामत सदरी वर्ग करण्यात आली आहे. एकुण रक्कम रु.३२,४०,०००/- खर्च नोंदविण्यात आलेला आहे. या बाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहे.

(१) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, बालकल्याण, जिल्हा परिषद, नाशिक यांचे आदेश क्र.९२/०९ अन्वये मंजुर करण्यात आलेली आहे. तथापी अग्रीम प्रदानाबाबत मंजुर आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्राप्त नाही.

(२) दि.१७/०३/२००९ मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशातील अंगणवाडी केंद्र दत्तनगर बांधकामासाठी ग्रामपंचायत मळवाडी यांना मंजुरी दिलेली असतांना धनादेश ग्रामपंचायत, दत्तनगर यांचे नावे प्रदान केला आहे. या बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी याचा सुधारीत आदेश प्राप्त केलेला नाही.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ नुसार माहे मार्च मध्ये अग्रिम देवु नये असे आदेश असतांना रक्कम रु.१९,४४,०००/- अग्रीम प्रदान केला आहे.

(४) शिल्लक अनुदान रक्कम रु.१२,९६,०००/- खर्च दर्शवून अनामत सदरी वर्ग केले आहे. लेखासंहिता नियम २१८(१) नुसार कोणत्याही महसूल शिर्षाखाली येणा-या रक्कमा ठेव शिर्षाखाती दाखवू नये अशी तरतूद असतांना अनुदान व्यपगत होवू नये, म्हणून नियमबाह्य कृती केलेली आहे.

(५) सदर बांधकामाचे मुल्यांकन दाखले व काम पूर्णत्वाचे दाखले प्राप्त नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) उपरोक्त रक्कमेतून एकूण १८ ग्रामपंचायतींना ग्रामपंचायतींची आर्थिक परिस्थिती नसल्या कारणाने अंगणवाडी इमारत बांधकामासाठी ६० : ४० च्या प्रमाणात निधी वेळीच कामे पूर्ण करुण घेणेसाठी पंचायत समिती स्तरावरिल गट विकास अधिकारी यांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये वर्ग केलेला आहे. वर्ग केलेल्या निधीतून १८ पैकी १३ कामे पुर्णही झालेली आहे.

(२) प्रशासकीय मान्यता आदेशात माळवाडी दत्तनगर अशा अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामास मान्याता दिलेली असल्याणे व दत्तनगर हे त्याच ग्रामपंचायत हद्दीतील असल्याप्रमाणे धनादेश ग्रामपंचायतीस प्रदान करणेत आलेला आहे. त्यामुळे सदर प्रक्रियेस मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश प्राप्त करुन घेणेत आलेले नाहीत.

(३) सदरची बाब अग्रीमाची नसुन जिल्हा परिषद स्तरावरुन पंचायत समितीला वितरीत निधीतून कामे सुरु करणेसाठी ६० % निधी वितरीत केलेला आहे.

(४) जिल्हा वार्षिक योजनेचा निधी हा दोन वर्षाच्या कालावधीमध्ये खर्च करणेसाठीची मान्यता असल्यामुळे निधी व्यपगत होत नाही. त्यामुळे नियमबाह्य कृती केलेली नाही.

(५) प्रदान केलेल्या १८ बांधकामापैकी १३ कामे पूर्ण झालेली आहेत. त्याची मुल्यांकनानुसार ४८,९९,१९६/- एवढी रक्कम होते. सदर बांधकामाचे मुल्यांकन दाखले व कामपुर्णत्वाच्या दाखल्यांच्या सत्यप्रती समवेत जोडलेल्या आहेत. तसेच ५ कामाचा निधी कामे जागेअभावी सुरु न केल्याने व निधीची मुदत संपल्याने ग्रामपंचायतींकडून सदरचा निधी व बचत निधी असा एकूण रुपये २३,००,८०४/- चा शासन सदरी भरणा करुण घेतलेला आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.१०३७/३ जिल्हा परिषदेने लेखा परिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे (सन २००८-०९)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखापरिक्षणाचे काम सुरु करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटिस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरीक्षण सुरु झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरी सुध्दा लेखापरिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाही. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही अशी अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते, त्यामुळे असे परिच्छेद लेखापरिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेद लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवुन त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसांच्या आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभिर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमुद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करुन देवुन सुध्दा लेखापरिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्र. | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १२ | नाशिक | कृषि | ३६ | ——— |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

लेखापरिक्षण तपशिलाप्रमाणे कागदपत्र दप्तरी दाखल असून लेखापरिक्षणाचे वेळी दर्शविणेत येतील.

**परिच्छेद क्रमांक ४.१७४ :- पंचायत राज समिती सेसअंतर्गत ९० टक्के अनुदानावर मागासवर्गीय लाभार्थी सौरकंदील पुरविणेबाबत (सन २००८-०९)**

पंचायत समिती उपकरातून योजना राबविण्यात आलेली असुन त्यावर रक्कम रुपये ३,१३.८७५/- असा एकूण रु. ३,४८,७५०/- इतका खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) सदर योजनेसाठी रुपये ६०,०००/- खर्चास तांत्रिक मान्यता घेण्यात आली होती. अंदाजपत्रकानुसार योजनेतील लाभार्थी संख्येत वाढ केल्याने खर्च रु ३,४८,७५०/- साठी सुधारित तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक असताना घेण्यात आलेली नाही.

(२) पंचायत राज समिती ठराव क्र. ७३ दि.७.११.२००८ अन्वये लाभार्थी निवड करण्यात आलेली आहे. मात्र त्यासोबत लाभार्थी निवड यादीस मान्यता घेण्यात आलेली नाही.

(३) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र.झेडपीए/ २०००/ प्र.क्र.४४६ /वित्त ९ दिनांक २०.०६.२००८ नुसार सदरची योजना ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार राबविण्यात आलेली नाही.

(४) शासन परिपत्रक क्र. पंरास/ १०९५८ /प्र.क्र.७३/३४ दि.२०/११/१९९९ नुसार लाभार्थ्याचे प्रपत्र अ मध्ये मास्टर नोंदवही ठेवून दुबार लाभ प्रदान टाळण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(५) लाभार्थी मंजूर यादीतील अ.क्र.१,१७,१८ ते २० व २५ या लाभार्थीच्या अर्जावर दि.२/६/२००९, ३/६/२००९ व ५/६/ २००९ असा दिनांक नमुद असल्याने लाभार्थींनी माहे जून २००९ मध्ये मागणी अर्ज सादर केल्याचे स्पष्ट होते. ग्रामविकास विभाग परिपत्रक क्र. १०८९ / सी आर/ ४१८ दि.१४/०९/१९८९ नुसार प्रथम लाभार्थी निवड करुन साहित्य खरेदी करणे आवश्यक असतांना उपरोक्त परिपत्रकातील सुचनांचे पालन झालेले नाही.

(६) ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक पंरास/सी आर/ १६९६/ ५७ दि.१९.०१.१९८५ नुसार पुरवठा आदेश देण्यापूर्वी लाभार्थी हिश्श्याची रक्कम वसुल करुन आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(७) लाभार्थी हिश्याची रक्कम रुपये ३४,८७५/- एक रक्कमी दिनांक ०३.०८.२००९ रोजी लेखा शाखेत जमा करण्यात आलेले आहे व साठा नोंदवही नुसार दिनांक २८.०५.२००८ रोजी वाटप करण्यात आलेले आहे. प्राप्त रक्कम हातावर ठेवून एक रक्कमी भरणा केल्याचे गंभीर वित्तीय अनियमितता झालेली आहे. तसेच लाभार्थ्यांना रक्कम प्राप्त झालेबाबत नमुना नं.१० मधील पावती देण्यात आलेली नाही.

(८) तांत्रिक मान्यता आदेश दि.१२/१२/२००८ मधील अट क्र.७ नुसार सदर योजना दिनांक ३१.०३.२००९ पुर्वी पुर्ण करणे आवश्यक असतांना साहित्य वाटप दि.२५.०८.२००९ पासून करण्यास आलेने सदर अटीचे पालन झालेले नाही.

(९) तांत्रिक मान्यतेतील अटी व शर्तीनुसार रुपये २०,०००/- चे आत उत्पन्न असलेल्या मागासवर्गीय लाभार्थीना लाभ देणे आवश्यक असतांना श्री.एकनाथ दळवीचे वार्षिक उत्पन्न रु २१,०००/- असतांना लाभ दिल्याने लाभार्थी रक्कम रुपये ३,३७५/- वसुल होणे आवश्यक आहे. तसेच श्री.नारायण लक्ष्मण उघडे यांचे पत्नी पंचायत समिती सदस्य असतांना त्यांना लाभ देण्यात आल्याने लाभार्थी रक्कम रुपये ३,३७५/- वसुल होणे आवश्यक आहे.

(१०) तांत्रिक मान्यता अट क्र ८ नुसार प्रत्यक्ष भेट देवून योग्य तो विनियोग होत असल्याचे खात्री करुन विनियोग दाखले प्राप्त करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(११) दर करारातील अटी व शर्तीनुसार पुढील ५ वर्षासाठी देखभाल व दुरुस्तीबाबत पुरवठादाराकडून करारनामा करुन घेणे आवश्यक असतांना नस्तीसोबत रुपये १००/- चे मुद्रांकाचा कोरा करारनामा जोडण्यात आलेला आहे.

(१२) तांत्रिक मान्यता अट क्र.५ नुसार ३० टक्के लाभ महिला लाभार्थीना लाभ देण्यात आलेने निवड सदोष झालेली आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

शकात नमुद केलेप्रमाणे सादर करण्यात येते की,

(१) सदर बाबत लाभार्थी संख्येत वाढ झाल्याने रुपये ३,४८,७५०/- या रक्कमेस तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक होते. तथापी ती घेण्यात आलेली नाही यापुढे सदर बाबींची पुनरावृत्ती होणार नाही याबाबत दक्षता घेण्यात येत आहे.

(२) लाभार्थी निवड यादीस पंचायत समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक होते. सदर यादीस पंचायत समिती ठराव क्र.१४१, दि.१३/१२/२०१३ अन्वये कार्योत्तर मान्यता घेण्यात आली आहे.

(३) पंचायत समिती सेसचे अनुदान वित्तीय वर्ष अखेरीस उपलब्ध झाल्याने शासन परिपत्रक क्र.झेडपीए /२००० /प्र.क्र. ४१/ ३३ दि.१७.०१.२००१ व सुधारित शासन परिपत्रक क्र झेडपीए/ २००८/ प्रक्र ४४६/ वित्त ९ दिनांक २०.०६.२००८ नुसार नमुद वेळा पत्रकानुसार राबविणे शक्य झालेले नाही. अनुदान दिनांक २१/०३/२००९ रोजी प्रत्यक्ष जमा झालेले आहे.

(४) योजनेत लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही हे खरे आहे. तथापी विभाग निहाय लाभार्थी नोंदवह्या ठेवण्यांत आलेल्या आहेत. नवीन लाभार्थी निवड करतांना यापुर्वी लाभ दिला नसल्याची खात्री करुनच लाभार्थी निवड करण्यांत आलेली आहे. सर्व योजनांची एकत्रित लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवण्याची दक्षता घेण्यांत येत आहे.

(५) यापूढे लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त करणे, निवड यादी अंतिम करणे याबाबत विहित कालमर्यादेत कार्यवाही होईल याची दक्षता घेणेत येत आहे.

(६) लाभार्थी हिश्श्याची रक्कम रु.३४,८७५/- वसुल करुन जमा करणेत आली आहे.

(७) नमुना नं. १० ची एकत्रित पावती दप्तरी ठेवण्यात आलेली असून यापुढे पुरवठा आदेश देण्यापुर्वी लाभार्थी हिस्साची रक्कम वसुल करुनच साहित्य वाटप करणेत येईलव अनियमितता होणार नाही याची दक्षता घेणेत येईल.

(८) यापुढे योजनेची कार्यवाही, साहित्य वाटप याबाबतची कार्यवाही वित्तीय वर्ष अखेर पुर्वी होईल याबाबत दक्षता घेण्यात येत आहे.

(९) श्री. एकनाथ हरी दळवी अ.क्र.९१ हे दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी असून दारिद्र्य रेषेचा क्रमांक ५४ असुन मुळ दारिद्र्य रेषेचा दाखला दप्तरी ठेवण्यात आलेला आहे. श्री.नारायण लक्ष्मण उघडे यांचेकडुन दिलेल्या लाभाची रक्कम रुपये- ३३७५/- वसुल करण्यांत आलेली आहे.

(१०) विस्तार अधिकारी यांनी प्रत्यक्ष भेटी देवुन वस्तुचा विनियोगाबाबत खात्री करुन तसा अहवाल सादर केलेला असुन तो दप्तरी ठेवणेत आलेला आहे.

(११) सदर पुरवठाधारकाकडुन करारनामा लिहुन घेणेत आला असुन ती दप्तरी ठेवणेत आलेला आहे.

(१२) एकूण १२ महिला लाभार्थींना लाभ देणेत आलेला आहे, ही बाब खरी आहे. तथापी यापुढे लाभार्थी निवड करताना ३० टक्के महिला लाभार्थींची निवड करण्याची दक्षता घेणेत येत आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.१७५ :- पंचायत समिती सेस मधुन (१०० टक्के अनुदानावर) सौर कंदिल पुरविणेबाबत (सन २००८-०९)**

पंचायत समिती, सुरगाणा यांनी सन २००८-०९ मध्ये पंचायत समिती सेस अंतर्गत सौर कंदिल खरेदीसाठी प्रमाणक क्र.१ दि २६.०३.२००९ अन्वये रु ४१,२५०/- एवढ्या रक्कमेचे मे.दर्शन सोलर नाशिक यांना ११ सौर कंदिलाचे (प्रति दर रुपये ३,५४६/-) प्रदान करण्यात आले आहे याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) पंचायत समिती ठराव क्र.२८ दि. २६.०३.२००९ नुसार सदर योजनाची निवड करण्यात आली आहे यामध्ये १२ लाभार्थ्यांची यादी नमुद नाही लाभार्थी निवड व संख्या याची पडताळणी करता आली नाही.

(२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र झेडपीए/ २००८/प्र.क्र ४४६/ वित्त-९ दि.२०.०६.०८ अन्वये वेळापत्रकानुसार योजना राबविण्यात आली नाही.

(३) मास्टर लाभार्थी नोंदवही ठेवण्यात आली नाही दुबार लाभ झाला किंवा कसे याची पडताळणी करता आली नाही.

(४) महा उर्जाकडील दरकरार क्र आयएन/एसपीव्ही-५७/ ५४१८/ ०६ दिनांक १३/०६/२००६ नुसार दरकरारातील अटी व शर्ती पुढील ५ वर्षासाठी बांधील रहाव्यात याकरीता करारनामा केलेला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

शकात नमुद केलेनुसार खालील प्रमाणे मुद्दे निहाय अनुपालन सादर करण्यात येत आहे.

(१) पंचायत समिती सुरगाणा मासिक सभा ठराव क्र.२८ दि.०३.०१.२००९ नुसार मागासवर्गीय लाभार्थी यांना १०० टक्के अनुदानावर सौर कंदिल पुरविणे योजनेची निवड करण्यात आली होती. लाभार्थी निवडीचे निकष पुढीलप्रमाणे :- १) मागासवर्गीय शेतकरी असावा, २) दारिद्र्य रेषा दाखला, ३) घराचा उतारा, ४) जातीचा दाखला व सन २००८-०९ च्या पंचायत समिती सेस अनुदानाचे २० टक्के प्रमाणे सौर कंदिलाची संख्या निश्चित करण्यात आली होती तसेच सभेत रक्कम रू ३,७५०/- प्रमाणे संख्या निश्चित करून त्याच सभेवर ११ लाभार्थीचा निवड करून मंजुरी घेण्यात आलेली आहे.

(२) सदरची योजना मुदतीत राबविण्यासाठी अर्थिक तरतुद मुदतीत प्राप्त न झाल्याने महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.झेडपीए/२००८/प्र.क्र.४४६/वित्त-९ दि.२०.०६.२००८ अन्वये वेळापत्रकानुसार योजना राबविण्यात आली नाही.

(३) पंचायत समिती २० टक्के सेस योजनेची मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली असून एकाच लाभार्थीस दुबार लाभ देण्यात आलेला नाही यांची खात्री करण्यात आलेली आहे.

(४) सदरचे सौर कंदिल महाउर्जा कडील दरकरार क्र आयएन/ एसपीव्ही. ५७/५८१८/०६ दि.१३.०९.२००६. नुसार केलेल्या दरपत्रकानुसार खरेदी करण्यात आलेली आहे. सदरचा दर करारातील अटी व शर्ती नुसार पुढील ५ वर्षाकरीता बांधील रहावा या करीता त्याचेकडून करारनामा करून घेण्यात आलेला आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.१७६/७ :- पंचायत समिती सेस मधुन ५० टक्के अनुदानावर सर्व प्रकारच्या शेतक-यांना नॅपसॅक स्प्रे पंप पुरविणेबाबत (सन २००८-०९)**

पंचायत समिती, कळवण यांनी सन २००८-२००९ या वित्तीय वर्षात पंचायत समिती सेस मधुन ५० टक्के अनुदानावर शेतक-यांना नॅपसॅक स्प्रे पंप पुरविणेसाठी ५० टक्के अनुदानावर दिनांक ३१.०३.२००९ अन्वये रु २४,९३८/- एवढा खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) लाभार्थी यादी पंचायत समितीची मंजुरी घेण्यात आलेली नाही.

(२) ग्रामविकास परिपत्रक क्र पंरास/ सीआर/ १६३३/ ५७ दि.१९/१/१९८५ नुसार पुरवठा आदेश देणेपुर्वी लाभार्थी हिस्सा वसुल करण्यात आलेला नाही.

(३) शासन परिपत्रक क्र झेडपीए/२००८/प्र.क्र./ ४४६/ वित्त ९, दिनांक २०/६/२००८ मधील अटी व शर्तीनुसार योजना दि.३१/०३/२००९ पुर्वी तशी कार्यवाही झाली नाही.

(४) शासन परिपत्रक क्र पंरास-१०९५८/प्र.क्र.७३/३४ दि.२०.११.१९९९ नुसार प्रपत्र-अ मध्ये मास्टर नोंदवही ठेवून दुबार लाभ टाळण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात आलेली नाही.

(५) शासन परिपत्रक क्र झेडपीए/२००८/प्र.क्र./४४६/वित्त ९, दिनांक २०/६/२००८ मध्ये ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार योजना राबविली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) सदर प्रकरण लाभार्थी यादीस पंचायत समिती ठराव क्रमांक १८२ दिनांक १०/११/२००९ अन्वये कार्योत्तर मंजुरी घेणेत आली आहे.

(२) लाभार्थी निवडणे व त्यांचेकडून लाभार्थी हिस्सा ५० टक्के वसुली असल्यामुळे योजनेसाठी पात्र लाभार्थी मिळणे कठीण होते त्यामुळे लाभार्थ्यांकडून लाभार्थी हिस्सा वसुल करणेस विलंब झालेला आहे. प्रत्यक्ष लाभ देतांना लाभार्थी हिस्सा घेणेत आलेला आहे. भविष्यात निवड करतांना त्यांचा लाभार्थी हिस्सा वसुल करणेची दक्षता घेणेत येईल.

(३) शासन परिपत्रक क्र झेडपीए/२००८/प्र.क्र./ ४४६/ वित्त ९, दिनांक २०/६/२००८ मधील अटी व शर्तीनुसार दिनांक २१/३/२००९ योजना राबवितांना कालमर्यादा वगळता शासन परिपत्रकानुसार कार्यवाही केलेली आहे. तसेच साहित्यांची खरेदी सरकार मान्य महाराष्ट्र कृषि विकास महामंडळ मर्यादित यांचेकडूनच खरेदी केलेली आहे. तसेच झालेली कार्यवाही ही अटी व शर्तीनुसार दिनांक १/६/२००८ चे परिपत्रकाप्रमाणेच कार्यवाही केलेली आहे.

(४) शासन परिपत्रक क्र पंरास-१०९५८/प्र.क्र.७३/३४ दि.२०.११.१९९९ नुसार प्रपत्र-अ मध्ये मास्टर नोंदवही मध्ये व साठा रजिस्टरमध्ये नोंद घेतली आहे. दुबार लाभ थांबविण्याचे दृष्टीने सर्व लाभार्थींची नोंद मास्टर नोंदवहीमध्ये घेतल्या असून एकही लाभार्थ्यांस दुबार लाभ दिला नसल्यांची खात्री केली आहे.

(५) स्थानिक परिस्थितीमध्ये लाभार्थी मिळण्यास अडचण येत असल्याने शासन परिपत्रकांत दिलेल्या कालमर्यादित योजना राबविता आली नाही. तसेच योजनेचा लाभ हा अत्यंत अल्प असल्याने रक्कम रुपये ४३७.५० (अदमासे) अक्षरी रुपये चारशे सदोतीस पैसे पन्नास मात्र) असल्याने लाभार्थी मिळणेस विलंब होत आहे.

सदरचा खुलासा मान्य होवून परिच्छेद वगळणेस विनंती.

**परिच्छेद क्रमांक :४.१७८/५३४/३ : पंचायत समिती सेस अंतर्गत ५० टक्के अनुदानावर बळीनांगर पुरविणे (सन २००८-०९)**

पंचायत समिती उपकरातून सदरचे बळीनांगर पुरविणेसाठी रक्कम रु.२,४८,९४०/- इतका खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) पंचायत समिती ठरावामध्ये लाभार्थ्यांची यादी नमूद नाही.

(२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक झेडपीए-२००८/ प्र.क्र.४४६/ वित्त ९ दि.२०/०६/२००८ नुसार ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार योजना राबविण्यात आली नाही.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता मालाची पडताळणी करुन आवश्यक ते प्रमाणपत्र गटविकास अधिकारी यांनी दिलेले नाही.

(४) प्रपत्र-अ मधील मास्टर नोंदवही अपूर्ण असल्याने लाभार्थ्यास दुबार लाभ देण्यात आला किंवा कसे याची खात्री करता आली नाही.

(५) लाभार्थ्यांचे विनियोग दाखले उपलब्ध करण्यात आलेले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) पंचायत समिती सभा दिनांक ०९/०२/२००९ ठराव क्र.६०८ अन्वये पंचायत समिती सेस अंतर्गत ५०% अनुदानावर बळी नांगर घेण्याचे ठरले होते. त्यानुसार सदर योजनेची अंमलबजावणी करताना लाभार्थीची निवड करण्याचे अधिकार हे मा.सभागृहाचे होते. त्यानुसार लाभार्थी निवड करण्यांचे अधिकार हे मा.सभागृहाचे होते. त्यानुसार लाभार्थी निवड करुन ५०% अनुदानावर बळी नांगर वाटपाची योजना घेण्यात येऊन, अंमलबाजावणी करण्यात आलेली आहे व वस्तु वाटप होऊन त्याच लाभार्थीच्या यादीला सभागृहाने ठराव क्र.६३५ दि.२८/०७/२००९ अन्वये कार्योत्तर मंजुरी दिली आहे.

(२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.झेडपीए-२००८/प्र.क्र.४४६/वित्त ९ दिनांक २०.०६.२००८ परिशिष्ट इ.नुसार सदरची योजनेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | सन २००८-०९ साठी सूचना | सन २००९-१० पासुन कालावधीसाठी स्थायी सूचना |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | योजनांची निवड व अर्थसंकल्पात तरतुद करणे | मे पुर्वी | मार्च पुर्वी |
| २. | विविध योजनांचे प्रारुप निश्चित करुन त्यास विषय समितीची मान्यता/मंजुरी घेणे | ३० जून | ३० एप्रिल |
| ३. | योजनेस प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी देणे | ३१ ऑगस्ट | ३० जून |
| ४. | पंचायत समिती निहाय उद्दीष्ट वाटप व प्रस्ताव मागणे, प्रस्तावाची छाननी करणे प्रस्तावाची छाननी करण | ३१ जुलै अखेर | ३१ मे अखेर |
| ५. | लाभार्थींची निवड करणे | ३१ जुलै अखेर | ३१ मे अखेर |
| ६. | निविदा प्रक्रिया पुर्ण करुन खरेदीस / समितीची मान्यता घेणे | ३१ ऑक्टोबर पर्यंत | ३१ ऑगस्ट पर्यंत |
| ७. | साहित्य खरेदीचे पुरवठा आदेश | ३० नोव्हेंबर | ३० सप्टेंबर |
| ८. | लाभार्थ्यांना साहित्य वाटप करणे | ३१ जानेवारी | ३० नोव्हेंबर |
| ९. | पुरवठादाराचे देयके अदा करणे | फेब्रुवारीपर्यंत | ३१ जानेवारी |
| १०. | विनियोग दाखले प्राप्त करुन घेणे | मार्च | मार्च |

परंतु सेस निधी उशिरा, आर्थिक वर्षाच्या शेवटी प्राप्त झाल्याने वेळापत्रकानुसार योजना राबविणे शक्य झाले नाही. सभागृहाने लाभार्थी यादीस कार्योत्तर मंजुरी घेतली आहे.

(३) पुरवठादाराकडून साहित्य प्राप्त झाल्या नंतर मालाची पडताळणी करुन सुस्थितीत साहित्य प्राप्त झाल्याबाबतचे ग.वि.अ. यांचे प्रमाणपत्र घेण्यात आले आहे.

(४) दुबार लाभ दिला नसलेबाबत खात्री करुनच साहित्याचे वाटप करण्यात आले आहे. त्याबाबतचे ग्रामसेवक/ ग्रा.वि.अधिकारी यांचे प्रमाणपत्र प्रस्तावासोबत घेण्यात आले आहे. मास्टर नोंदवही मध्ये नोंदी घेण्यात आल्या आहेत.

(५) लाभार्थ्यांचे विनियोग दाखले, ग्रामसेवक/ग्रा.वि.अधिकारी यांचे स्वाक्षरीचे घेण्यात आले आहेत व ते दप्तरी ठेवण्यात आले आहेत.

तरी कृपया परिच्छेद स्विकृत होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक : ४.२२१/५५२/२ :- पंचायत समिती वाढीव उपकर उत्पन्नाचा २० टक्के राखीव निधी मधुन १०० % अनुदानातून मागासवर्गीयांसाठी ताडपत्री पुरवठा करणेबाबत (सन २००८-०९)**

पंचायत समिती देवळा यांनी पंचायत समिती वाढीव उपकर उत्पन्नाच्या २० टक्के राखीव अनुदानातून मागासवर्गीयासाठी १०० टक्के अनुदानातून ताडपत्री पुरवठ्याबाबत रक्कम रु.१,१३,९२५/- एवढा खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र. मागास/१०९८/प्र.क्र.७३/३४ दि.२०/१०/१९९९ मधील तरतुदी नुसार लाभार्थ्याची निवड ग्रामसभेद्वारे केलेली नाही.

(२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र.झेडपीए/२००८ प्र.क्र.४४६ वित्त-९ दि.२०/०६/०८ नुसार पंचायत समितीने नियोजन करुन योजना राबविलेली नाही.

(३) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासननिर्णय क्र.पंरास/ १०९८/ प्र.क्र.७३/३४. दि.२०/१०/१९९९ अन्वये प्रपत्र-अ मध्ये नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तथापी पंचायत समितीने लाभार्थ्याच्या नावाची गावनिहाय नियंत्रण नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे ठराविक लाभार्थ्यास शासकीय योजनेचा दुबार लाभ मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे गरजू लाभार्थ्याना शासकीय योजनांचा लाभापासून वंचित राहावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

(४) सदर साहित्य लाभार्थ्यास वाटप केल्याचे ग्रामसेवक, ग्रामपंचायतीचे अभिलेख्यांत नोंद घेऊन तसा अहवाल सादर करणे आवश्यक होते. तथापी तसे केलेले नाही. साहित्य वापरबाबतचे विनियोजन प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतलेले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती वाढीव उपकर उत्पन्नाच्या २० टक्के राखीव निधीमधून १०० टक्के अनुदानातुन मागासवर्गीय ताडपत्री पुरवठा केलेबाबत.

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग शासननिर्णय क्रमांक/ मागास/ १०९८/ प्र.क्र./ ७३/ ३४ दि.२०/१०/१९९९ मधील तरतुदीनुसार लाभार्थ्यांची निवड ग्रामसभेद्वारे केलेली असुन सदर ग्रामसभेचे ठराव ग्रा.पं. कार्यालयाचे दप्तरी जतन करुन ठेवण्यात आलेले आहे.

(२) सदर बाब काही अंशी खरी असली तरी प्रत्यक्षात मुळ परिच्छात नमुद महाराष्ट्र शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र.झेडपीए/२००० प्र.क्र. ४१/३३/ दि.१७/०१/२००१ मधील निर्देशानुसार योजना राबविली आहे म्हणजेच ग्रामसभेवर लाभार्थी निवड करुन पंचायत समितीचे मासीक सभा दि.१८/१२/२००८ मध्ये चर्चा करून ठराव क्र.७० अन्वये पं.स.सेस २०% समाज कल्याण अंतर्गत मागासवर्गीय लाभार्थ्यासाठी ताडपत्री पुरवठा करणेची योजना मंजुरीचा ठराव सर्वानुमते मंजुर करणेत आलेला आहे. त्यानंतर मा.अतिरिक्त मु.का.अधिकारी जि.प.नाशिक यांचेकडील आदेश क्र.सकना/ सक-४/ १६४/०९ नाशिक दि.०७/०२/२००९ अन्वये तांत्रीक मान्यता देण्यात आली असुन या कार्यालयाचे आदेश देऊन त्यानुसार प्राप्त साहित्याचे वाटप दि.२०/०२/२००९ ते दि.०२/०३/२००९ या कालावधीत समक्ष लाभार्थीना करण्यात आले आहे. तरी यापुढे मुदतीत योजना राबविण्याची दक्षता घेतली आहे.

(३) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. पंरास/ १०९८/ प्र.क्र.७३/३४ दिनांक २०/१०/ १९९९ अन्वये पं.स.मध्ये लाभार्थ्यांच्या नावाची गावनिहाय नियंत्रण नोंदवली ठेवलेली नाही मात्र एकत्रित प्रपत्र- अ मध्ये नोंदवही ठेवलेली आहे वा या पुढे सन २००९/२०१० पासून स्वतंत्र गांवनिहाय लाभार्थीची प्रपत्र- अ मध्ये नोंदवही ठेवण्यात आलेली असून कुठल्याही लाभार्थ्यास दुबार लाभ दिलेला नाही.

(४) ग्रामपंचायतीमध्ये साहित्य लाभार्थ्यास वाटप केल्याबाबत नोंदवही अद्यावत ठेवणेत आली असुन वापराबाबतचे विनीयोजन दाखले संबंधित ग्रामसेवक/ग्रा.वि.अधि. यांचेकडून घेण्यात आले असुन ते दप्तरी जतन करुन ठेवण्यात आले आहे. सदर लाभ उपलब्धतेबाबत व त्याची सध्यास्थिती व वापरबाबत सविस्तर प्रमाणपत्र संबधित ग्रामसेवक. ग्रा.वि.अ. यांचेकडून घेण्यात आलेले आहे.

कृपया सदरचा शक स्विकृत होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक :४.३०८/५८७/४ : ९० टक्के अनुदानावर महिलांसाठी शिलाई मशिन खरेदी करणे (सन २००८-०९)**

पंचायत समिती उपकरातून सदरची योजना राबविण्यात आलेली असून त्यावर रक्कम रु.१,७९,२८०/- इतका खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) पंचायत समिती ठरावमध्ये लाभार्थी यादी नमुद नसल्याने याबाबत स्पष्टीकरणासह लाभार्थी यादीस पंचायत समिती कार्योत्तर मान्यता घेणे आवश्यक आहे.

(२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक झेडपीए- २००८/प्र.क्र.४४६ वित्त दि.२०/०६/०८ नुसार दिलेल्या वेळापत्रकानुसार सदरची योजना राबविण्यात आलेली नाही.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत पंचायत समिती लेखासंहिता, १९३८ चे नियम ८३(३) नुसार साहित्य प्राप्त झाले नंतर मालाची पडताळणी करुन आवश्यक ते प्रमाणपत्र गटविकास अधिकारी यांनी निर्गमित केलेले नाही.

(४) प्रपत्र अ मधील मास्टर नोंदवही अपुर्ण असल्याने लाभार्थ्यास दुबार लाभ देण्यात आला किंवा कसे याची खात्री करता आली नाही.

(५) लाभार्थ्याचे विनियोग दाखले उपलब्ध करण्यात आले नाही.

(६) एकूण ४३ शिलाई मशीन वाटप करण्यात आले असून त्यापैकी ६ प्रस्ताव लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत. तसेच २९ शिलाई मशिन वाटप करण्यात आलेले नाही. त्यामुळे योजनेचा हेतू सफल झालेला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती सेस अंतर्गत २००८-०९ या वित्तीय वर्षात पं.स.सेस अंतर्गत ९० टक्के अनुदानावर शिलाई मशीन खरेदी बाबत खालीलप्रमाणे पुर्तता करण्यात आलेली आहे.

(१) पं.स. सभा दि.१३/१०/२००८ ठराव क्र.६०८ अन्वये उपलब्ध तरतूदीनुसार योजना राबविणेत आलेली असून दि.०५/०८/२०१० रोजीचे ठराव क्र.७१० नुसार सदर लाभार्थी यादीस प.सं. सभेची कार्योत्तर मान्यता घेण्यात आलेली आहे.

(२) सेस निधी उशिरा आर्थिक वर्षाच्या शेवटी प्राप्त झाल्याने वेळापत्रकानुसार योजना राबवणे शक्य झाले नाही. सभागृहाने लाभार्थी यादीस कार्योत्तर मंजुरी घेतली आहे.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व समिती लेखा संहिता, १९६८ मधील नियम ८३(३) नुसार पुरवठादाराकडून साहित्य प्राप्त झाल्यावर मालाची पडताळणी करुन मागणीनुसार व सुस्थितीत साहित्य प्राप्त झाल्याबाबतचे गट विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र दप्तरी ठेवण्यात आले आहे.

(४) मास्टर नोंदवहीत नोंदी घेण्यात आल्या असून सदर लाभार्थ्यांना दुबार लाभ देण्यात आलेला नाही. याची खात्री करण्यात आलेली आहे. बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी खात्री केली आहे.

(५) लाभार्थीना दिलेल्या साहित्याचे विहीत विनियोग दाखले उपलब्ध करुन घेण्यात आलेले आहेत.

(६) लेखापरीक्षण कालावधी पर्यंत ४३ शिलाई मशीन वाटप करण्यात आले होते. २९ शिलाई मशीन वाटप करण्यात आले आहेत. ६ प्रस्ताव दप्तरी ठेवण्यात आले आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक :४.३४७(३)/६०५-६०६/३९ :पंचायत समित्यांनी लेखापरिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे (सन २००८-०९)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सुरु करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरीक्षण सुरु झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/ पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहीत मुदतीत सादर करणे बाबत कालावधी दिला जातो. तरी सुध्दा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेख उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद विभाग/ पंचायत समिती अंतिमिकरणाच्या वेळी अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाकणेत येते. त्या मुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केलेले परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड केलेले परिच्छेदांबाबत लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्या बाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व मुख्य लेखा व वित्त अधिकारी/ गट विकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणे बाबत सुचित केले जाते. तथापि या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करुन देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करून देवूनसुध्दा लेखा परिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल. पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखा परिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ३ | नाशिक | नाशिक | ३९ | — |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

नाशिक तालुक्यातील ३३ ग्रामपंचायतीचे एकूण ११२ घटकांचे अभिलेखे लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात आले असून आजपावेतो सन २००६-०७ अखेरचे थकीत घटकांचे लेखा परीक्षण पूर्ण झालेले आहे.

सन २००६-०७ अखेरचे थकित लेखापरिक्षण हे मार्च २०१० पुर्वी पूर्ण करण्यात आले असून त्यामुळे लेखापरिक्षण पूर्ण करण्याबाबतचे आश्वासनाची पुर्ती झाली आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.३४७(४) : पंचायत समित्यांनी लेखापरिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे (सन २००८-०९)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम,१९३० मधील कलम ६(३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सूरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधीत जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरी सुध्दा लेखापरिक्षणास कागदपत्रे/अभिलेख उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद विभाग/पंचायत समिती अंतिमिकरण्याच्या वेळी अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेच उपलब्ध करणे टाळणेत येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखापरिक्षण अहवाल समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य

कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणे बाबत सूचित केले जाते. तथापि या सूचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभिर्याने लक्ष देत नसल्याने आढळून येते. वर नमुद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी योग्य ती प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल. पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखापरिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ४ | नाशिक | पेठ | ३०(अ) | --- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडील आदेशान्वये टंचाई कालावधी करीता अन्य तालुक्यातून सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासकीय टँकर अधिग्रहित करुन पेठ गटाकडेस देणेत आले होते. टंचाई कालावधी पुर्ण झाले नंतर संबंधित शासकीय वाहने पुनश्च त्यांचे मुळ विभागाकडेस कार्यमुक्त करणेत आलेने, वाहनाची मुळ आ.सी.बुक नोंदवही लेखा परिक्षण कामी उपलब्ध करुन देता आली नव्हती, परंतु त्याच्या सत्यप्रती उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या.

तसेच टँकरचे लॉगबुक मध्ये प्रत्येक टंचाईग्रस्त गावामध्ये टँकर पोहोचले नंतर स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणुन सरपंच व शासकीय कर्मचारी म्हणून ग्रामसेवक यांची स्वाक्षरी घेणे बाबत दक्षता घेणेत येईल. तरी सदरचा आक्षेप मान्य होणेस विनंती आहे.

(२) सन २००८/०९ च्या हातपंप/ विद्युतपंप नोंदवहया अदयावत ठेवण्यात आलेल्या आहेत. सोबत छायांकित प्रती जोडण्यात आल्या आहेत.

(३) सेवा निवृत्ती प्राथमिक शिक्षकांचे ए.पी.पी-९ व ए.पी.पी-१० हे जून २००३ ते डिसेंबर २०१४ पावेतो अदयावत केले आहे. सदरचे रजिस्टर हे खुपच मोठे असल्याने पुरावा म्हणून तुर्त रजिस्टरचे पहिले व शेवटचे पानांची छायांकित प्रत सोबत जोडलेली आहे. सर्व अभिलेखे उपलब्ध असून स्थानिक निधी लेखा विभागास लेखापरिक्षणासाठी उपलब्ध आहेत.

(४) सदर मोजमाप पुस्तीका उपलब्ध असुन लेखा परिक्षणाच्या वेळी दाखविण्यात येईल. सदर वाहन फिरती नोंदवही आता उपलब्ध केली आहे लेखा परिक्षण कॅम्पच्यावेळी दाखविण्यात येईल.

(५) सदरचा कार्यभार पाहणारे श्री.चौधरी यांची दिंडोरी येथे बदली झाली असून त्यांनी आज दिनांक २७/१/२०१६ रोजी सदरचे नोंदवही पं.स.कार्यालयास उपलब्ध करून दिले आहे.

(६) तत्कालीन सदर काम करणारे श्री.व्ही.व्ही.पाटील कनिष्ठ सहा.लेखा यांनी त्यांची बदली पेठ येथून झालेनंतर संपुर्ण कार्यभार दिलेला नसल्याने त्यांना दप्तर उपलब्ध करून देणेबाबत कारणे दाखवा नोटीस बजावली असल्याने त्यांचा खाते चौकशीचा प्रस्ताव जि.प.कार्यालयास दि-जाक/ आस्था/ १६ दि.२७/०१/२०१६ अन्वये सादर करण्यात आला आहे.

(७) ग्राम पंचायती अभिलेखे उपलब्ध न करून दिलेल्या संबंधित ग्रामपंचायतींच्या ग्रामसेवकांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक- जाक्र/ ग्राप/ ६०/ लेप/ १६. दि.२५/०१/२०१६ नोटीसा बजावण्यात आल्या असून लेखा परिक्षणाच्या वेळी दप्तर उपलब्ध करून दिले जाईल.

**परिच्छेद क्रमांक ४.३४७(५)/ ६०५ - ६०६/ ३४ :पंचायत समित्यांनी लेखापरिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे (सन २००८-०९)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६(३) प्रमाणे तारखेला लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधीत जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्या नंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा

लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/ पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहीत मुदतीत सादर करणे बाबत कालावधी दिला जातो. तरी सुध्दा लेखा परिक्षणास कागदपत्रे/ अभिलेख उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद विभाग/ पंचायत समिती अंतिमिकरणाच्या वेळी अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळणेत येते. त्या मुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणे साठी प्रस्तावित केले जाते. तथापि या सूचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभिर्याने लक्ष देत नसल्याने आढळून येते. वर नमुद केल्याप्रमाणे संबधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करून देवूनसुध्दा लेखापरिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल. पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखापरिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ५ | नाशिक | सुरगाणा | ३४ | —— |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती सुरगणा अंतर्गत ग्रामपंचायतीमधील लेखे परिक्षणास न उपलब्ध करुन देण्यातबाबत खालीलप्रमाणे अनुपालन सादर करण्यात येत आहे.

प्रलंबित लेखा परिक्षणापैकी एकुन ८ ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षण आजमितीस झालेले आहे. उर्वरित २२ ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षण आजमितीस झालेले आहे. उर्वरित २२ ग्रामपंचायतीचे प्रलंबित लेखा परिक्षण न झाल्याने त्या कार्यकाळातील तत्कालीन २२ ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकारी यांना लेखापरिक्षणास दप्तर उपलब्ध न करुन दिल्याने रुपये २५,०००/- दंडाची नोटीस जा.क्र.पससु/ ग्राप/ विअ/२८७ ते ३१५ सुरगाणा दि.११/०४/२०१६ अन्वये बजावण्यात आल्या आहेत. भवाडा ग्रामपंचायतचे ग्रामसेवक श्री. माळघरे यांनी ग्रामपंयाचत दप्तराचा कार्यभार न दिल्याने त्याच्या विरूध्द मुंबई ग्रामपंचायत कलम १९८५ चे कलम १७९ अन्वये कार्यवाही केलेली आहे. मा.अप्पर जिल्हाधिकारी यांनी विवाद अर्ज क्रमांक ४१/९ दि.२३/०४/२०१० अन्वये माळघरे यांनी कार्यभार न दिल्यास त्यांचेवर फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ प्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. फौजदारी गुन्हा दाखल करण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक नाशिक शाखा सुरगाणा यांना बँक स्क्रोल मिळण्यासाठी जा.क्र.वि.अ/ग्राप/ २०३/ २०१५ दि.०२/०३/२०१५ अन्वये मागणी करुन ही अद्याप स्क्रोल मिळालेला नाही. तो मिळताच फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

कृपया खुलास मान्य होणेस विनंती

**परिच्छेद क्रमांक ४.३४७(६)/ ६०५ - ६०६/ २२ :- पंचायत समित्यांनी लेखापरिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे (सन २००८-०९)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६(३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधीत जिल्हा परिषदेचे विभाग/ पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्या नंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/ पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहीत मुदतीत सादर करणे बाबत कालावधी दिला जातो. तरी सुध्दा लेखा परिक्षणास कागदपत्रे/ अभिलेख उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद/ पंचायत समिती अंतिमिकरणाच्या वेळी अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळणेत येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणे साठी प्रस्तावित केले जातात व संबधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्या बाबतचे अनुपालन मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणे बाबत सूचित केले जाते. तथापि या

सूचणेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याने आढळून येते. वर नमुद केल्याप्रमाणे संबधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देवूनसुध्दा लेखा परिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखा परिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ६ | नाशिक | बागलाण | २२ | —— |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

शकात नमुद केल्याप्रमाणे -

| अं.नं. | शाळा | अं.नं. | शाळा | अं.नं | शाळा |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | खामलोण | १८ | चिराई | ३५ | भाक्षी |
| २ | सटाणा | १९ | उत्राणे | ३६ | सटाणाबर्डी |
| ३ | आराई | २० | सटाणा | ३७ | औंदाणेपाडा |
| ४ | नवीशेमळी | २१ | आसखेडा | ३८ | अंतापुर |
| ५ | वायगांव | २२ | वाघंबा | ३९ | नवेनिरपुर |
| ६ | मोहळांगी | २३ | जायखेड | ४० | मुल्हेर |
| ७ | खरड | २४ | वाडीचौलेर | ४१ | मुंजवाड केप्र |
| ८ | अंजदे | २५ | यशवंतनगर | ४२ | डांगसौंदाणे |
| ९ | दुधमाळ | २६ | कॅनालचौफुली | ४३ | तरसाळी |
| १० | बो-हाटे | २७ | सटाणा नं.२ | ४४ | कंधाणे |
| ११ | गोकुळपाडा | २८ | खडकीपाडा | ४५ | वाडीपिसोळ |
| १२ | कारसारपाडे | २९ | सुकडनाला | ४६ | जुनीशेमळी |
| १३ | मोरेनगर | ३० | पिंपळकोठे | ४७ | आराई |
| १४ | अलियाबाद | ३१ | मुल्हेर के.प्र. | ४८ | ब्रम्हाणगांव |
| १५ | विरगांव | ३२ | सटाना नं.१ | ४९ | आ.सौंदाणे |
| १६ | लखमापुर | ३३ | करंजाड | ५० | नामपुरमुले |
| १७ | अजमेर सौं. | ३४ | फुलेनगर | | |

वरील सर्व शाळा वगळून उर्वरित १७३ मुख्याध्यापक व केंद्रप्रमुख यांचे दप्तर पुढील लेखा परिक्षणाकामी प्रथम प्राधान्याने पडताळणी कामी उपलब्ध करुन देणेत आलेले असून त्यांचे लेख्यात कुठल्याही प्रकारे अफरातफर आढळून आलेली नाही. तसेच त्यांना देण्यात आलेल्या सादील खर्चाचा विनियोग त्याच कामासाठी केल्याचे आढळून आलेले आहे. बाबत समवेत पडताळणी केलेल्या दप्तराचे दस्तऐवजांची छायांकित प्रत व मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख यांचा दाखला अवलोकनार्थ जोडले आहेत.

तरी कृपया शकाचे अवलोकन होऊन शक स्विकृत होऊन वगळणेस विनंती.

**परिच्छेद क्रमांक ४.३४७(७)/ ६०५ - ६०६/ २६(अ) :पंचायत समित्यांनी लेखापरिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे (सन २००८-०९)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६(३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/ पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्या नंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद / पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जातात. तरी सुध्दा लेखा परिक्षणास कागदपत्रे/ अभिलेख उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद विभाग/ पंचायत समिती अंतिमिकरणाच्या वेळी अभिलेख उपलब्ध करणे टाळणेत येते. त्या मुळे असे परिच्छेदांबाबत लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणे साठी प्रस्तवित केले जातात व संबधित जिल्हा परिषद विभाग आणी पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्या बाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणे बाबत सूचित केले जाते. तथापी या सूचणेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने सूचणेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याने आढळून येते. वर नमुद केल्याप्रमाणे संबधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करून देवूनसुध्दा लेखा परिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल. पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखा परिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ७ | नाशिक | बागलाण | २६ (अ) | —— |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदर क्रमांकाचा परिच्छेद स्थानिक निधी लेखापरिक्षा अहवालात समाविष्ट नसल्याने अनुपालन नाही.

**परिच्छेद क्रमांक ४.३४७(८)/ ६०५ - ६०६/ २८ (अ) :- पंचायत समित्यांनी लेखापरिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे (सन २००८-०९)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६(३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सुरु करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/ पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्या नंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद / पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहीत मुदतीत सादर करणे बाबत कालावधी दिला जातो. तरी सुध्दा लेखा परिक्षणास कागदपत्रे/ अभिलेख उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद विभाग / पंचायत समिती अंतिमिकरणाच्या वेळी अभिलेख उपलब्ध करणे टाळणेत येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखा परिक्षण अहवालामध्ये निवड करणे साठी प्रस्तावित केले जातात व संबधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्या बाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणे बाबत सूचित केले जाते. तथापी या सूचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याने आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करून देवूनसुध्दा लेखा परिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल. पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखा परिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ८ | नाशिक | मालेगाव | २८ (अ) | —— |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

शकात नमुद केल्याप्रमाणे सन २००८-२००९ या वित्तीय वर्षात ग्रामपंचायत विभागातील कार्यरत एकूण-३ विस्तार अधिकारी (क्षेत्रिय अधिकारी) यांनी ३६० चे ग्रामपंचायत दप्तर तपासणी उद्दिष्ट पूर्ण करणे आवश्यक होते. परंतु १९८ ग्रामपंचायत दप्तर तपासणी पूर्ण केले आहे.

प्रति विस्तार अधिकारी (ग्रा.पं) यांनी १२० चे ग्रामपंचायत तपासणीचे इष्टांक ग्रामपंचायत विभागाकडे असलेल्या विविध योजनांच्या कामकाजामुळे दिलेले ग्रामपंचायत तपासणीचे इष्टांक सदर वित्तीय वर्षात पुर्ण करता आलेले नाही. मात्र १९८ ग्रामपंचायत तपासणी ह्या प्रत्यक्षात करण्यात आलेल्या आहे. यापुढे ग्राम पंचायतीच्या सखोल तपासणी करणे बाबत दक्षता घेण्यात येत आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.३४७(९)/ ६०५ - ६०६/ ३२ (अ) :पंचायत समित्यांनी लेखापरिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे (सन २००८-०९)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६(३) प्रमाणे ज्या त्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सूरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबधित जिल्हा परिषदेचे विभाग/ पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्या नंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद / पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहीत मुदतीत सादर करणे बाबत कालावधी दिला जातो. तरी सुध्दा लेखा परीक्षणास कागदपत्रे/ अभिलेख उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद विभाग / पंचायत समिती अंतिमिकरणाच्या वेळी अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळणेत येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्या बाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणे बाबत सूचित केले जाते. तथापी या सूचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याने आढळून येते. वर नमुद केल्याप्रमाणे संबधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणे साठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देवून सुध्दा लेखा परिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभिर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायत राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल. पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखा परिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ९ | नाशिक | येवला | ३२ (अ) | —— |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

मुंबई स्थानिक लेखा अधिनियम १९३० मधील कलम ६(३) नुसार पंचायत समितीच्या लेखा परिक्षणाच्या वेळी आवश्यक ती सर्व अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.३४७(१०)/ ६०५ - ६०६/ ३१ (अ):पंचायत समित्यांनी लेखापरिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे (सन २००८-०९)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६(३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सूरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबधित जिल्हा परिषदेचे विभाग/ पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्या नंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद / पंचायत समित्या यांना अर्धतास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहीत मुदतीत सादर करणे बाबत कालावधी दिला जातो. तरी सुध्दा लेखा परिक्षणास कागदपत्रे/ अभिलेख केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद विभाग/ पंचायत समिती अंतिमिकरणाच्या वेळी अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळणेत येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणे साठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्या बाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांच्या आत सादर करणे बाबत सूचित केले जाते. तथापी या सूचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याने आढळून येते. वर नमुद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करून देवूनसुध्दा लेखा परिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल. पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखा परिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १० | नाशिक | निफाड | ३१ (अ) | —— |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

शकात नमुद केल्याप्रमाणे पंचायत समिती, निफाड यांचेकडील शकाची पुर्तता खालील प्रमाणे सादर केली आहे.

(१) शासकीय अनुदानातुन खरेदी केलेले साहित्य एकात्मिक बालविकास योजना/शेती (कृषि) समाजकल्याण विभागाचे वाटप रजिस्टरच्या सत्य प्रती समवेत सादर केलेल्या आहेत. सन २००८-०९ चे साहित्य वाटपाअभावी शिल्लक नसल्याबाबतचा दाखला समवेत सादर केलेला आहे. लाभार्थ्यांची स्वाक्षरी घेवून नोंदी साक्षांकित केलेले आहे. त्याच्या सत्यप्रती समवेत सादर केलेल्या आहेत.

(२) पंचायत समिती, निफाड जमाखर्च विवरणापैकी अग्रिम विवरण पत्र ३१/३/२००९ अखेर चा गोषवारा समवेत सादर केलेला आहे. त्याप्रमाणे अग्रिम रजिस्टर सन २०१४-१५ पावेतो पुर्ण केलेले आहे. सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचा ३१/३/२०१५ चा गोषवारा समवेत सादर केलेला आहे. सन २००८-०९ ते २०१३-१४ पावेतो मागील अग्रीम शिल्लक नाही तसा दाखला समवेत सादर केलेला आहे.

(३) सन २००८-०९ या आर्थिक वर्षात २२४५ नैसर्गिक आपत्ती ग्रामीण पुरवठा अंतर्गत पंचायत समिती, निफाड या गटाकडे पाणी पुरविणेसाठी रुपये १४,७७२/- वित्त प्रेषणाद्वारे प्राप्त झालेले होते त्यापैकी खर्च रुपये १४,७७२/- झालेला आहे. वर्षा अखेर दिनांक ३१/३/२००९ रोजी शिल्लक निरंक आहे. तसेच उपयोगिता प्रमाणपत्र समवेत सादर केलेले आहे. खर्चाचे रजिस्टर क्रमांक १४ व जमा रजिस्टर क्रमांक १३ चे सत्यप्रती समवेत सादर केलेल्या आहेत.

(४) पंचायत समिती निफाड कर्मचा-यांच्या वेतनातून आयकर कपात खालील प्रमाणे करण्यात आलेली आहे.

| अ.न. | दिनांक | धनादेश क्रमांक | रक्कम |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| (१) | ४/५/२००८ | ८५३०८ | ३६४५/- |
| (२) | २/३/२००९ | ५२०५७५ | २५७८४/- |
| (३) | ३१/३/२००९ | ५९२४७३ | ४२४४९/- |
| (४) | ३१/३/२००९ | ५९५२३३ | २३६९६४/- |
| (५) | ३१/३/२००९ | ५९२६४३ | २६४७/- |

एकूण रक्कमेचे चेकाचा भरणा भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा, निफाड येथे चलनाने भरणा करण्यात आलेला आहे.

(५) पंचायत समिती, निफाड गटाकडे सन २००८-०९ या वर्षात मुदतबाह्य झालेले देयक गटाकडेच शिल्लक नाही या बाबत समवेत प्रमाणपत्र सादर केलेले आहे. दप्तर लेखापरिक्षणास उपलब्ध करुन न दिल्याबद्दल संबंधितांस कारणे दाखवा नोटीस देवून जबाबदारी निश्चित करण्यात येत आहे. कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.३४७(११)/ ६०५ - ६०६/ ३६ :पंचायत समित्यांनी लेखापरिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे (सन २००८-०९)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६(३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सूरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबधित जिल्हा परिषदेचे विभाग/ पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्या नंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद / पंचायत समित्या यांना अर्धतास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहीत मुदतीत सादर करणे बाबत कालावधी दिला जातो. तरी सुध्दा लेखा परिक्षणास कागदपत्रे/ अभिलेख केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद विभाग/ पंचायत समिती अंतिमिकरणाच्या वेळी अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळणेत येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणे साठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्या बाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणे बाबत सूचित केले जाते. तथापी या सूचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याने आढळून येते. वर नमुद केल्याप्रमाणे संबधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देवूनसुध्दा लेखा परिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल. पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखा परिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ११ | नाशिक | सिन्नर | ३६ | — |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

आक्षेपात ७१ ग्रामपंचायतीनी लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध न करुन दिले बाबत नमुद आहे. सद्यस्थितीत सदर ग्रामपंचायतीचे सन २००८-२००९ पावेतोचे लेखापरिक्षण झालेले असून सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा यांचे पत्र

अ.शा.पत्र क्र.स्था-१८/ब/ग्राप/अभिलेखे, अभिलेखे उपलब्ध न झालेले/नावि/३/ दि.२८/१०/२०१५ व मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं) जा.क्र.साप्रवि/ग्रापं/अफरातफर/४/२०१६ नाशिक दि.११/०१/२०१६ अन्वये संपूर्ण ग्रामपंचायतीचे सन २०१४-१५ अखेरचे लेखा परिक्षण मार्च २०१६ पर्यंत करणे बाबत कळविलेले आहे. याबाबत सर्व ग्रामविकास अधिकारी/ ग्रामसेवक यांना लेखापरिक्षण पुर्ण करुन घेणेबाबत सक्त सुचना देण्यांत आलेल्या आहेत.

कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५, ६ व ७ मे, २०१६ रोजी साक्ष घेतली. सन २००८-०९ व सन २०११-१२ या पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात आले नाही असे आक्षेप ६६ परिच्छेदांमध्ये घेतल्याचे समितीस आढळून आले. समितीने या सर्व परिच्छेदांमधील संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये दंडात्मक कारवाई करुन त्यांच्या सेवापुस्तकात नोंद घ्यावी. त्यांची एक वेतनवाढ थांबवावी, त्यांच्या गोपनीय अहवालात नोंद घ्यावी अशा कर्मचा-यांची नावे व त्यांच्याकडून वसुल केलेल्या रक्कमेबाबतचा अहवाल समितीस सादर करावा असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

खालील परिच्छेदातील सर्व प्रकरणांमध्ये अभिलेखे लेखा परिक्षणास का उपलब्ध केले नाही त्याबाबत संबंधितांवर कोणती प्रशासकीय कार्यवाही करण्यात आलेली आहे.तसेच तत्कालीन अधिका-यांनी आपल्या कर्तव्यात कसूर केलेली आहे.त्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीस देवून संबंधितांवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम १९३० अन्वये दंडाची कार्यवाही केली आहे काय ? तसेच त्यांची एक वेतनवाढ रोखून त्या बाबतची नोंद अशा कर्मचा-यांच्या / अधिका-यांच्या सेवापुस्तकात घेतली आहे काय ? त्यानुसार प्रकरण / परिच्छेद निहाय दोन्ही अहवाल वर्षाची माहिती सादर न करण्याची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

एकूण ७७ प्रकरणांपैकी ११ प्रकरणांमध्ये संबधित कर्मचा-यांवर जबाबदारी निश्चित करण्यात आलेली असून रू.२४,८४,१६३/- इतकी दंडाची वसूल करण्यात आलेली आहे.उर्वरित ६६ प्रकरणांमध्ये अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेले असल्याने दंडात्मक वसूलीची कार्यवाही करण्यात आलेली नाही.सोबत प्रकरणनिहाय विवरणपत्र (प्रपत्र) सादर केले आहे.

पंचायत राज समितीने दि.५ ते ७ मे, २०१६ या कालावधीत नाशिक जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष

| अ.क्र | परिच्छेद क्रमांक | वर्ष | विभागाचे/पंचायत समितीचे नांव | जबाबदार अधिकारी/कर्मचाऱ्याचे नांव व हुद्दा | | दंडाची रक्कम | वसूल रक्कम | शेरा(दंडाची रक्कम वसूल केली नसल्यास कारणे) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नाव | हुद्दा | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | ३.७८/११ | २०११-१२ | शिक्षण | श्री.एस.व्ही.देवरे | अधिक्षक शालेय पो.आहार | २५,००० | २५,००० | |
| २ | ३.७९/४३ | २०११-१२ | शिक्षण | श्री.के.जी.मोले | मुख्याध्यापक | २५,००० | २५,००० | |
| ३ | ३.८२/१२३ | २०११-१२ | शिक्षण | श्री.के.बी.मारवळ<br>श्री.के.एस.पवार<br>श्री.विकार अन्सार शेख<br>श्री.एम.बी.निफाडे | ग.शि.अ.क.प्र.अधि.व सहा. क.सहा. | २५,००० | २५,००० | |
| ४ | ३.२०३/४६ | २०११-१२ | इवद-३ | ० | ० | ० | ० | अभिलेखे उपलब्ध झाले आहेत म्हणून दंडात्मक कारवाई केलेली नाही |
| ५ | ३.२०४/७० | २०११-१२ | इवद-१ | दादाजी नानाजी गागुर्डे<br>श्री.सी.जी.पाटील | उप अभियंता जि.प.उपविभाग नाशिक<br>उप अभियंता जि.प.उपविभाग नाशिक | २५,०००<br>२५,००० | ०<br>० | अभिलेखे उपलब्ध झाले आहेत म्हणून दंडात्मक कारवाई केलेली नाही |
| ६ | ३.२०५/२७६ | २०११-१२ | इवद ३ | श्री.एन.एम.वाघ सेवानिवृत्त शाखा अभियंता | २५,००० | २५,००० | ० | अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत म्हणून दंडात्मक कारवाई केलेली आहे |
| ७ | ३.३११/९ | २०११-१२ | लपा प | ० | ० | ० | ० | अभिलेखे उपलब्ध झाले आहेत म्हणून दंडात्मक कारवाई केलेली नाही |
| ८ | ३.३१२/७२ | २०११-१२ | लपा प | ० | ० | ० | ० | अभिलेखे उपलब्ध झाले आहेत म्हणून दंडात्मक कारवाई केलेली नाही |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ३.३९१/४ | २०११-१२ | ग्रापापु | श्री.एच.के.शेख | क.सहा | ० | ० | अभिलेखे उपलब्ध झाले आहेत म्हणून दंडात्मक कारवाई केलेली नाही |
| १० | ३.३९३/१० | २०११-१२ | ग्रापापु | १.श्रीमती.मालती एम.जाधव<br>२.श्री.सुरेश यादवराव चौधरी | ग.वि.अ.<br>क.सहा | ० | ० | अभिलेखे उपलब्ध झाले आहेत म्हणून दंडात्मक कारवाई केलेली नाही<br>सेवानिवृत्त झाले आहेत. |
| ११ | ३.३९४/४४ | २०११-१२ | ग्रापापु | श्री.पी.टि.बोरसे | शाखा अभियंता | ० | ० | अभिलेखे उपलब्ध झाले आहेत म्हणून दंडात्मक कारवाई केलेली नाही |
| १२ | ३.५३९/१६ | २०११-१२ | पशुसंवर्धन | ० | ० | ० | ० | अभिलेखे उपलब्ध झाले आहेत म्हणून दंडात्मक कारवाई केलेली नाही |
| १३ | ३.५७७/२ | २०११-१२ | समाजकल्याण | ० | ० | ० | ० | अभिलेखे उपलब्ध झाले आहेत म्हणून दंडात्मक कारवाई केलेली नाही |
| १४ | ३.५८०/३ | २०११-१२ | समाजकल्याण | ० | ० | ० | ० | अभिलेखे उपलब्ध झाले आहेत म्हणून दंडात्मक कारवाई केलेली नाही |
| १५ | ३.५८२/१० | २०११-१२ | समाजकल्याण | ० | ० | ० | ० | अभिलेखे उपलब्ध झाले आहेत म्हणून दंडात्मक कारवाई केलेली नाही |
| १६ | ३.६९८/३ | २०११-१२ | म व बा क | ० | ० | ० | ० | अभिलेखे उपलब्ध झाले आहेत म्हणून दंडात्मक कारवाई केलेली नाही |
(३) या विभागामार्फत दिल्या जाणा-या योजनांचा लाभ हा केवळ आदिवासी व ग्रामीण भागासाठीच दिला जातो. सदरची योजना ही श्रेणी ३, ४ आणि GF/GD बालकांसाठी असून त्या सर्वांना या योजनेचा लाभ मिळणे आवश्यक असल्याने व शासन निर्णयामध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल हा निकष नमुद नसल्याने आणि मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य पुणे महिला व बालकल्याण विभाग व मबाविअ/ताम/का-६/प्र.५/प्र.क्र.४२/नाशिक/०७-०८/२१६४२ पुणे दि.२६.०३.२००८ चे अट क्र.१ नुसार ग्रामीण व आदिवासी भागातील सर्व श्रेणी ३,४ आणि GF/GD बालकांना लाभ दिलेला आहे. तसेच भौतिक साध्य अहवाल दरमहा मासिक प्रगती अहवालामध्ये घेण्यात आलेला आहे.

(४) GF/GD आणि श्रेणी ३, ४ च्या बालकांसाठी श्रेणीवर्धनासाठी कोणत्या प्रकारचा आहार व शक्तीवर्धक औषधी खरेदी करावी, याबाबत जिल्हा परिषदेच्या मा. जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे अभिप्रायानुसार आहार व औषधी खरेदी करण्यात आलेली आहे. मा. जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी नमुद केलेल्या अभिप्रायाची प्रत सोबत सादर केलेली असून याबाबत मा. उपायुक्त (आरोग्य व पोषण) ए.बा.वि.से.यो. रायगड भवन यांचे पत्र क्र.एबाविसेयो/का-२/१२८३/२००८ दि.२६.०६.२००८ चे पत्र सोबत सादर केलेले असून सदर पत्रात नमुद केले नुसार दुध, अंडी, केळी, फळे, गुळ, शेंगदाणे या वस्तु स्थानिक पातळीवर उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण होतात. तसेच या वस्तुंचा साठा करून ठेवल्यास त्या खराब होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने मायक्रोन्युट्रीस्न्ट, प्रोटीन, मल्टीव्हीटॅमिन युक्त औषधी ही महिला व बालकल्याण समितीच्या मान्यतेने खरेदी करण्याबाबत सुचित केलेले असल्याने त्या सुचनांच्या आधारे सदर औषधी खरेदी महिला व बालविकास समितीचे मान्यतेने केलेली आहे. आहार पुरवठा केले नंतर श्रेणी वर्धनाच्या नोंदी अंगणवाडी बिट व प्रकल्पस्तरावर ठेवलेली असून तसा अहवाल मासिक प्रगती अहवालात घेण्यात आलेला आहे. कुपोषण निर्मुलन ही एक सामाजिक प्रक्रिया आहे. त्यामध्ये अन्य विभागांनी प्रकल्पातील बालकांना लाभ दिल्या बाबतचे कोणतेही आदेश अथवा पत्र या विभागास प्राप्त झालेले नाही.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ मे, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, अतिरिक्त आहारात दुध, अंडी, फळे, गुळ, शेंगदाणे इत्यादीचा पुरवठा आवश्यक असताना मायक्रोन्युट्रीएन्ट प्रोटीन व मल्टी व्हिटॅमिन्स युक्त औषधे असा बदल कोणत्या प्राधिकारान्वये केला. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अशी माहिती दिली की, उप आयुक्त (आरोग्य व पोषण) एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई यांच्या दिनांक २६/६/२००८ रोजीच्या पत्रात असा उल्लेख केलेला आहे की, "राज्यातील ग्रामीण व आदिवासी भागाची भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता सर्वच ठिकाणी दुध, अंडी, फळे, गुळ, शेंगदाणे या वस्तू उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण होतात, तसेच या वस्तूंचा साठा करुन ठेवल्यास तो खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही."

अंडी, केळी, शेंगदाणे या वस्तू सर्वच ठिकाणी उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण होतात, असा शासन निर्णय नाही. दुध, अंडी, केळी या वस्तू देण्यामध्ये जो बदल केला आहे तो गुणवत्तेचा आहे किंवा नाही हे ठरविणे वाटते तेवढे सोपे नाही. तसेच व्हिटॅमीनची जी कंपनी आहे त्यांचेच हे काम असावे. आता सध्या काय खरेदी सुरू आहे तसेच मागील वर्षी काय वाटप केलेले आहे, या प्रकरणी उप आयुक्तांना साक्षीला बोलाविण्यात यावे असे निदेश समितीने दिले.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) यांनी समितीस विदीत केले की, सन २०१५-२०१६ या वर्षात काहीही वाटप केलेले नाही. दिनांक १० ऑक्टोबरचा शासन निर्णय आहे की, १५ फेब्रुवारी पूर्वी आदेश द्यावयाचे होते.

यावर समितीने असे नमूद केली की, ग्रामविकास विभागाचा शासन निर्णय असताना विभागाने उप आयुक्त (आरोग्य व पोषण) यांचेकडून मार्गदर्शन का घेतले. त्यामुळे या विषयासंबंधी सचिवांची साक्ष घेण्यात यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) जिल्हा परिषदांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या महिला व बालकल्याण समितीने कोणत्या योजना राबवाव्यात या बाबत दि.१९ डिसेंबर, २००७ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. यातील २१ योजनांपैकी क्रं.१० वर कुपोषित मुलांसाठी अतिरिक्त आहार म्हणून स्थानिक उपलब्धतेवर दुध, अंडी, फळे, गुळ, शेंगदाणे इ.वस्तुंचा पुरवठा करणे आवश्यक असतांना जिल्हा परिषद, नाशिक यांनी मायक्रोन्युट्रीएन्ट प्रोटीन व मल्टीव्हीटॅमिन्स युक्त औषधे असा बदल केलेला असणे मुळ दरपत्रके, चाचणी प्रमाणपत्र व महत्वाचे म्हणजे कुपोषित बालकांची यादी समितीस उपलब्ध करून दिलेली नसणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व ग्रामिण भागातील बालकांची निवड केल्याबाबतीत अभिलेख लेखापरिक्षणास दाखवले नसणे औषधे खरेदीबाबत जिल्हाधिकारी यांचे अभिप्राय दाखवले नसणे, इ.गंभीर बाबी संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यावरून कोणती कारवाई करण्यात आली आहे.

(२) दि.१९.१२.२००७ च्या ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयाला एकात्मिक बालविकास सेवा योजना यांचे उप आयुक्त यांनी दिनांक २६ जून, २००८ रोजीच्या पत्राव्दारे छेद देवून ग्रामीण भागात गुळ, शेंगदाणे, दुध उपलब्ध होत नसते असे कारण देवून कुपोषणावरील औषधे खरेदी करण्याकरीता जिल्हा परिषदांना अग्रेषित केलेले आहे. या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, अद्याप चौकशी केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत.

(३) एकात्मिक बालविकास सेवा योजना आयुक्तालयाने देखील अहवाल वर्षात औषधांची खरेदी केल्याचे चौकशी अहवालावरून प्रतित होणे, त्यानुसार चौकशी अहवालात नमुद केल्याप्रमाणे जिल्हा परिषद नंदुरबार यांनी सुमारे १ कोटी (सन २००७), धुळे १.३५ कोटी,नंदुरबार १.५७ कोटी / २.१५ कोटी,ठाणे ५.५६ कोटी एवढ्या मोठ्या प्रमाणात औषधांची खरेदी झाली आहे. परंतु सदर औषधांची पुनरावृत्ती किंवा जास्तीची खरेदी तर झालेली नाही, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

दि.१९ डिसेंबर,२००७ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे.यातील २१ योजनांपैकी क्रं.१० वर कुपोषित मुलांसाठी अतिरिक्त आहार म्हणून स्थानिक उपलब्धतेवर दुध,अंडी,फळे,गुळ,शेंगदाणे इ.वस्तूंचा पुरवठा करणे असे नमुद आहे तथापि मा. उपायुक्त (आरोग्य व पोषण) एकात्मिक बालविकास सेवा योजना मुंबई यांचे दि.२६.०६.२००८ चे पत्रात नमुद केलेप्रमाणे व मा. सहाय्यक संचालक,आरोग्य सेवा यांचेकडील पत्र संअसो/निविमु/बालमृत्यू/कक्ष ७-अ/६४ दि.२४.०६.२००४ मध्ये कुपोषणाला आळा घाळण्यासाठी प्रथीने,जीवनसत्वे,लोह,खनिजे यांचे प्रमाण असलेली औषधी देणे योग्य राहील असे नमुद केले आहे.याबाबत संचालनालय आरोग्य सेवा यांचेकडील त्रिसदस्यीय समितीची नेमणूक केलेली असून सदर समितीने दि.२०.०९.२००६ रोजी घेतलेल्या समितीचे इतिवृत्त क्रं.संआसे/निविमु/बैठक/इतिवृत्त/कक्ष-७/०६ दि.२६.०९.२००६ अन्वये प्राप्त असून सदर समितीने आदिवासी क्षेत्रातील बालकांमध्ये कुपोषणाचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून येते सदर बालकांकरीता नियमित आहार,पुरक आहार या दोन्ही व्यतिरिक्त औषधीरूपी प्रथीने देणे आवश्यक असल्याचे नमुद केलेले आहे.या बालकांची निवड ही अंगणवाडी सेविका दरमहा त्यांची वजने घेतात व त्यानुसार या बालकांची दरमहा संख्या ही बदलत असते. ह्या बालकांची संख्यात्मक आकडेवारी ही मासिक प्रगती अहवालात नमुद असते व त्यांचे नावांची यादी ही अंगणवाडी स्तरावर उपलब्ध असते.औषधे खरेदी संदर्भात मा.जिल्हाधिकारी यांचे अभिप्राय घेण्यात येत नाही.

महिला व बालकल्याण समितीने राबवावयाच्या योजनांचा शासन निर्णय हा ग्रामविकास विभागाने निर्गमित केलेला आहे. कुपोषित बालके,गरोदर महिला व स्तनदा माता तसेच किशोरवयीन मुलीच्या आरोग्यासंदर्भात एकात्मिक बालविकास सेवा योजना, तसेच राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य व पोषण मिशन हे कामकाज करीत असतात.त्यामुळे या लाभार्थ्याच्या आरोग्यासंदर्भात वेळोवेळी विभागाने मार्गदर्शक सुचना निर्गमितकेलेल्या असून त्यांचे पालन प्रस्तुत प्रकरणात करण्यात आलेले आहे.त्यामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील महिला व बालके यांचे आरोग्यात सुधारणा होऊन कुपोषित बालकांचे प्रमाण तसेच ॲनिमियाचे प्रमाणात घट होणेस मदत झालेली आहे.सदर बाब ही शासन स्तरावरील असल्याने खुलासा नमुद केलेला नाही.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय :-**

**महिला व बाल विकास विभागाचे अभिप्रायः-**

(१) व (२) जिल्हा परिषद नाशिक यांचे अभिप्रायाशी सहमत आहे.

(३) आयुक्त कार्यालयाने व जिल्हा परिषदेने खरेदी केलेल्या औषधांचा कालावधी वेगवेगळा आहे. सदर औषधांची पुनरावृत्ती किंवा जास्तीची खरेदी झालेली नसुन सदर औषधांचा वेळोवेळी योग्य वापर झालेला आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने नाशिक जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारलेल्या प्रश्नावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, दिनांक १९ डिसेंबर, २००७ रोजीच्या शासन निर्णयानुसार कुपोषण कमी करण्यासाठी आहार पुरेसा नसल्याने कुपोषित मुलांना अंगणवाडीतून पुरविण्यात येणा-या आहाराव्यतिरिक्त विशेष आहार म्हणून स्थानिक उपलब्धतेनुसार दुध, अंडी, फळे, गुळ, शेंगदाणे इत्यादी वस्तुचा पुरवठा करण्यात येतो. दिनांक २६ जून, २००८ रोजी उपायुक्त (आरोग्य आणि पोषण) एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांनी पत्राद्वारे कळविले होते की, यामध्ये मायक्रोन्युट्रीएन्ट प्रोटीन आणि इतर शक्तीवर्धक पदार्थ देता येतील. याबाबत दिनांक ७ जानेवारी, २००६ आणि दिनांक ८ मे, २००७ रोजी संचालक, आरोग्य सेवा आणि सह संचालक आरोग्य सेवा यांनी सुध्दा खरेदी करण्यासाठी मान्यता दिलेली आहे. परंतु औषध खरेदी करण्याची परवानगी नव्हती तरी यामध्ये जो 'इत्यादी शब्द' अंतर्भूत केला असल्यामुळे खरेदी केली आहे असे समितीस सांगण्यात आले त्यावरुन समितीने हरकत घेतली होती.

यासंदर्भात सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी असे विदित केले की, दुध, अंडी किंवा मल्टी व्हिटॅमीन यांचासुध्दा खरेदी करण्याचा प्रस्ताव मान्य केल्याने जिल्हा परिषदेने खरेदी केलेली आहे. यानंतर समितीने अशी विचारणा केली की, सर्वसाधारण वर्गवारीच्या मुलांना सकस आहार नियमितपणे पुरविण्यात येतो काय, याबाबत सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी कुपोषणाच्या बाबतीत नंदुरबार जिल्ह्यात व इतर ठिकाणी फरक जाणवला आहे तसेच जिल्हा परिषद त्यांना कुपोषणाबाबतच्या गोळ्या देणे बंद केले आहे, आदिवासी क्षेत्रात अमृत आहार योजनेअंतर्गत आठवड्यातून ४ वेळेला अंडी देण्याचा प्रकल्प महाराष्ट्र शासनाच्या निधीतून सुरु केला आहे अशी माहिती समितीला दिली.

उपायुक्तांच्या आदेशानुसार उप संचालकांनी ५ जिल्ह्यांमध्ये औषध खरेदी करताना परवानगी घेतली होती काय, तसेच त्यांच्या मान्यतेचे आदेश दाखविण्यात यावेत अशी समितीने विचारणा केली असता सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी उपायुक्त हे एकात्मिक बालविकास सेवा योजनाचे असल्याने आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना यांची मान्यताघेतली होती. सदरहू आदेश उपलब्ध करुन देण्यात येतील असे समितीस आश्वासित केले.

यानंतर समितीच्या उपरोक्त प्रश्नाबाबत सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस अशी माहिती विषद केली की, सन २०१४ मध्ये शासनाने एक योजना आणली होती आणि त्यानुसार औषधे दिली जात होती. कालांतराने औषधांमध्ये बदल झाला असून त्यानुसार आता नवीन पोषण आहार धोरण आणले असेल अशा प्रकारे धोरणामध्ये बदल होत असतो. औषधे खरेदी करण्यापूर्वी ती तांत्रिकदृष्ट्या योग्य आहेत किंवा नाही हे आरोग्य विभागामार्फत तपासणी करणे आवश्यक होते.

योजनेतील खरेदी केलेली औषधे तपासलीच नाहीत, कारण यामध्ये मुळ बाबी ड पत्रके, चाचणी प्रमाणपत्र आणि कुपोषित बालकांची यादी, मायक्रोन्युट्रीशन प्रमाणपत्रे आहेत किंवा नाहीत तसेच उपायुक्तांच्या पत्रावरुन १० कोटी ६३ लाख रुपयांचा निधी औषधांसाठी खर्च केला आहे याबाबत त्यांना तसे अधिकार आहेत का याची माहिती समितीस देण्यात यावी अशी विचारणा समितीने केली असता प्रकल्प आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, नवी मुंबई यांना पत्र दिले असता आदिवासी जिल्ह्यांतील माता व बालके यांच्यावर उपचार करण्याच्या दृष्टीने सिरप, व्हिटॅमिन्स आणि लिपिड प्रोटिन ही औषधे जिल्हा आरोग्य अधिकारी यांना आवश्यक असतात. याबाबत सन २००८ मध्ये ग्रामविकास विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयामध्ये सन २०११ मध्ये सुधारणा करण्यात येऊन त्यात याबाबींचा समावेश करण्यात आला आहे अशी माहिती सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विशद केली.

चाचणी अहवाल, बालकांची संख्या, अंगणवाड्यांना साहित्य पुरवठा केल्याची माहिती समितीला देण्यात यावी असे निदेश समितीने दिले असता, याबाबत ८ जिल्ह्यांची माहिती १ दिवसांत समितीस देणे शक्य होणार नसल्यामुळे याबाबतीत १५ दिवसांचा वेळ दिल्यास समितीस माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल अशी सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विनंती केली.

**अभिप्राय व शिफारशी**

पंचायती राज समितीने नाशिक जिल्हा परिषदेसंदर्भात दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारलेल्या प्रश्नावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी अशी माहिती दिली की, दिनांक १९ डिसेंबर, २००७ च्या शासन निर्णयानुसार कुपोषण कमी करण्यासाठी आहार पुरेसा नसल्याने कुपोषित मुलांना अंगणवाडीतुन पुरविण्यात येणा-या आहाराव्यतिरिक्त दुध, अंडी, फळे, गुळ, शेंगदाणे इत्यादी वस्तुंचा पुरवठा करण्यात येतो. उपायुक्त (आरोग्य आणि पोषण) एकात्मिक बालविकास सेवा योजना यांनी मायक्रोन्युट्रीएंट आणि इतर शक्तीवर्धक पदार्थ देता येतील. याबाबत संचालक, आरोग्य सेवा व सह संचालक यांनी सुध्दा मान्यता दिलेली आहे. जिल्हा परिषदेने खरेदी केलेल्या साहित्यातून खरेदी करण्यासाठी परवानगी नव्हती मात्र सुचनेमध्ये इत्यादी हा शब्द अंतर्भूत केला असल्याने खरेदी केल्याचे समितीच्या निदर्शनास आणून दिल्याप्रकरणी समिती आश्चर्य व्यक्त करते. कारण सदर शासन निर्णयामध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, कुपोषण कमी करण्यासाठी अंगणवाड्यांमार्फत देण्यात येणा-या आहाराव्यतिरिक्त विशेष आहार म्हणून स्थानिक उपलब्धतेनुसार दुध, अंडी, फळे, गुळ, शेंगदाणे या खाद्यपदार्थाप्रमाणेच स्थानिक खाद्यपदार्थ उपलब्ध करुन देणे अभिप्रेत असताना मायक्रोन्युट्रीयंट व्हिटॅमीन व प्रोटीनयुक्त शक्तिवर्धक पदार्थ स्थानिक खाद्यपदार्थाच्या तुलनेने अत्यंत महाग पदार्थ उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. तसेच उपरोक्त शक्तिवर्धक पदार्थांची मात्रा जास्त प्रमाणात झाल्यास त्या बालकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच बालरोगतज्ञांमार्फत प्रभावी आहाराची निवड केल्याचे प्रमाणित केलेले नाही व बालकांना आहार पुरवठा केल्यानंतर श्रेणीवर्धनाची माहिती संकलित केल्याचे दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात न घेता केवळ उत्पादक कंपन्यांच्या हितसंवर्धनासाठी हा निर्णय घेतला आहे किंवा कसे अशी शंका उपस्थित होते. **केवळ उपायुक्त (आरोग्य व पोषण) एकात्मिक बालविकास सेवा योजना मुंबई व सहायक संचालक, आरोग्य सेवा यांनी त्यांच्या पत्रामध्ये 'इत्यादी' हा शब्दनमुद केला म्हणून त्या शब्दाचा सोयीस्कर अर्थ लावून उपरोक्त शक्तीवर्धक पदार्थांची खरेदी करणे समितीस अनाकलनीय व आश्चर्यकारक वाटते. याप्रकरणी शासनाने निर्गमित केलेल्या पत्रामधील मजकूर हा शासन निर्णयाशी विसंगत असल्यास संबंधित अधिका-यांची चौकशी करुन कारवाई करावी. त्याचप्रमाणे यासंदर्भात शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयात असलेली विसंगती दूर करण्यासंदर्भात सदर शासन निर्णयात योग्य तो बदल करुन त्यात सुधारणा करुन निर्गमित करावा व संदिग्धता टाळावी. त्याचप्रमाणे याप्रकरणी निर्णय घेणा-या संबंधितांची चौकशी करुन त्यांचेवर जबाबदारी निश्चित करावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

# प्रकरण वीस

## जिल्हा परिषद, नाशिक

## पंचायत समिती सेस मधून अंगणवाडी केंद्रासाठी खेळणी खरेदी करणेबाबत

**परिच्छेद क्रमांक ४.३४३ (सन २०११-२०१२)**

पंचायत समिती सेस अंतर्गत सन २०११-१२ या वर्षामध्ये महिला व बालकल्याण विभागाने अंगणवाडी केंद्रासाठी खेळणी खरेदी करण्याकरीता एकूण रुपये ३,६७,५०० एवढा खर्च केला आहे. याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.भाखस/१०८८/८२५५२/उद्योग-६ मुंबई दिनांक ०२/०१/१९९२ मधील साहित्य/वस्तु खरेदी बाबतचे नमुद केलेल्या अटी व शर्तीचे व कार्यपध्दतीचे पालन करण्यात आलेले नाही.

(२) रुपये ५०,००० किंवा त्यापेक्षा अधिक खरेदीच्या निविदेची राजपत्रामध्ये निविदा चौकशी प्रसिध्दी देण्यात आलेली नाही. त्यामुळे तुलनात्मक दराचा फायदा झालेला नाही.

(३) साहित्य खरेदी करण्यापूर्वी स्थानिक बाजार भावाची चौकशी करणे आवश्यक होते.

(४) सदर साहित्याचा खरेदीसाठी शासनाने दरकरार केले असल्यास तशी खात्री करुन दरकरारावर साहित्य खरेदी न करता खुल्या बाजारातुन साहित्य खरेदी केली आहे.

(५) गटातील अंगणवाडी केंद्राकडून साहित्य मागणी प्राप्त न करताच साहित्य खरेदी केलेली आहे.

(६) साहित्य खरेदीची नोंद नोंदवहीत घेण्यात आलेली नाही व अद्याप साहित्य वाटप केलेले नाही.

(७) शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.मागास/१०९३/प्रक्र.१२३९/३४ दिनांक १/१/१९९३ अन्वये ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले आहे. त्याच वित्तीय वर्षात साहित्य वाटप होणे आवश्यक आहे याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(८) महाराष्ट्र शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.झेडपी/२००८ प्र.क्र.४४६ वित्त ९ दिनांक २०/६/२००८ नुसार जिल्हा परिषदेने वैयक्तिक लाभाच्या योजना राबविणे बाबतचे वेळापत्रक ठरवून दिलेले आहे. सदर वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(९) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ८३ (३) नुसार साहित्य प्राप्त झाल्यानंतर ते सुस्थितीत प्राप्त झाल्या बाबतचे प्रमाणपत्र गटविकास अधिकारी/बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी सादर केलेले नाही.

(१०) साहित्य तपासणी सक्षम यंत्रणेचा चाचणी अहवाल प्राप्त नाही.

(११) पुरवठा आदेशात साहित्य पुरवठा करणेबाबतचा पुरवठादाराला मुदत दिलेली नाही.

(१२) पुरवठादाराकडून करारनामा केलेला नसलेने विक्री पश्चात सेवेचा लाभ मिळालेला नाही.

(१३) साहित्याच्या दर्जा व गुणवत्तेबाबत पावतीवर प्रमाणपत्र नमुद नाही.

(१४) पुरवठादाराकडून ३% किंवा ५% सुरक्षा अनामत रक्कम घेण्यात आलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय मुंबई क्र.भांखस-१०८८/(२५१२)/उद्योग-६ दिनांक ०२/०१/१९९२ नुसार व त्यात नमुद अटी व शर्ती नुसार कार्यवाही केलेली आहेत व त्यानुसार निधी प्राप्त होताच कार्यवाही केलेली आहे.

(२) महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ यांचेकडेस खरेदीस मान्यता असल्यामुळे निविदा प्रसिध्दी देण्यात आलेली नाही.

(३) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.भारास/१०८८/८२५२५/उद्योग-६ मुंबई दिनांक ०२/०१/१९९२ मधील क्र. (७) नुसार महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळामार्फत खरेदी असल्यामुळे त्यांनी ठरविलेल्या दरपत्रकानुसार खरेदी केलेली आहे.

(४) शासनाची प्राधिकृत संस्था महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ यांचेमार्फत साहित्य खरेदी केलेली आहे.

(५) खेळणी कोणत्याच केंद्रावर नसल्याने अंगणवाडी केंद्र निहाय उपलब्ध साहित्याचा आढावा घेऊन ज्या अंगणवाडी केंद्रास पुरेशी जागा आहे त्या अंगणवाडी केंद्रास खेळणी वाटप केली आहे.

(६) साहित्य खरेदीची नोंद साठा रजिस्टर पान क्र.१४४ ते १४९ वर घेतली आहे.

(७) नाशिक जिल्ह्यात विधान परिषदेची आदर्श आचार संहिता असलेमुळे वाटप करता आले नाही, परंतु आचारसंहिता संपलेनंतर लगेचच दिनांक १८/६/२०१२ रोजी साहित्य वाटप करण्यात आलेले आहे.

(८) शासन निर्णयाप्रमाणे नमुद वेळापत्रकानुसार अनुदान प्राप्त होताच कार्यवाही केली आहे.

(९) खरेदी केलेले साहित्य सुस्थितीत प्राप्त झालेबाबत गटविकास अधिकारी व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचा दाखला आहे.

(१०) महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाने चाचणी करुनच साहित्य पुरविले आहे.

(११) पुरवठादारास दिनांक २९/१२/२०११ चे पुरवठा आदेशात १५ दिवसांची मुदत देण्यात आलेली होती.

(१२) शासनाची अधिकृत संस्था MSSIDC कडून खरेदी केलेली असल्यामुळे करारनामा केलेला नाही.

(१३) साहित्य व गुणवत्तेबाबत पावतीवर प्रमाणपत्र नमुद आहे.

(१४) शासन निर्णय उद्योग व कामगार विभाग क्र.एसपीओ/१०८५/३९०२४ (२३१८/(२) उद्योग-६, मंत्रालय, मुंबई दिनांक २६ नोव्हेंबर, १९८५ मध्ये नमुद नुसार बयाणा/अनामत रक्कमेची मागणी नमुद करु नये असे असल्याने ३% ते ५% सुरक्षा अनामत घेण्यात आलेली नाही. सोबत शासन निर्णयाची प्रत जोडलेली आहे. कृपया खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ मे, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,अंगणवाडी केंद्रासाठी खेळणी खरेदी करण्यासाठी जाहीर निविदा का डावलण्यात आली, सन २०११-१२ मध्ये खेळण्यांसाठी महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचा दर करार होता काय, नसल्यास, त्यांच्याकडून थेटपणे खरेदी कोणत्या प्राधिकारान्वये करण्यात आली तसेच गटातील अंगणवाडी केंद्राकडून साहित्य मागणी प्राप्त न करताच खरेदी कोणत्या आधारे करण्यात आली आहे. यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नाशिक यांनी समितीस विदित केले की, सन २०११-१२ मध्ये रू.३,६७,५००/- मधून अंगणवाडीसाठी सीसॉचे ६२ नग महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाकडून खरेदी करण्यात आले. खरेदीच्या संदर्भात करारनामा आहे. निविदा काढण्याची आवश्यकता नसल्यामुळे निविदा प्रक्रिया केली नव्हती. यावर समितीने अशी विचारणा केली की, हा दर करार आहे का, असल्यास किती तारखेचा आहे व दर कराराची मुदत समितीस सांगावी. यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नाशिक यांनी समितीस विदित केले की, होय हा दर करार आहे व तो सन २०१२-१३ चा दर करार होता. यावर सह संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी अशी विचारणा केली की, दर कराराची मुदत सांगावी. यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नाशिक यांनी समितीस विदित केले की, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय आहे आणि त्यानुसार मार्च, २०१३ पर्यंत खरेदीला मान्यता आहे. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाच्या दिनांक १५.१२.२०११ च्या पत्रानुसार खरेदी करण्यात आली आहे. तसेच साहित्य नव्हते म्हणून सीसॉ घेतले होते. ६ हजार रूपयाने ते घेतले होते. सर्व साहित्य अंगणवाडीला प्राप्त झाले आहे. साहित्याची पडताळणी देखील करण्यात आली आहे.

यावर सह संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी अशी विचारणा केली की, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ या पध्दतीने खेळण्यांसाठी दर करार करीत नाही. एमएसएसआयडीसी बरोबर दर करार केला जात नाही. दर करार नसताना

महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाकडून थेटपणे अशाप्रकारे खरेदीच करता येणार नाही असे लेखापरिक्षकांचे मत आहे. यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नाशिक यांनी समितीस विदित केले की, उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे तसे परिपत्रक आहे, त्यामुळे खरेदी केली आहे. त्यामध्ये महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाकडून वस्तू घ्याव्यात असे लिहिले आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, त्यामध्ये कोणकोणत्या वस्तू नमूद केल्या आहेत, यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नाशिक यांनी समितीस असे विदित केले की, शासनाचे उत्पादन असेल किंवा शासन विक्री करीत असेल तर त्या वस्तुंना प्राधान्य द्यावे असे शासनाचे निर्देश आहेत. तद्नंतर समितीने पुढे अशी विचारणा केली की, दर करार नसताना खरेदी करता येत नाही. तुम्हाला या संदर्भात निविदा मागवाव्या लागल्या असत्या आणि एकूण किती नग होते. यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नाशिक यांनी समितीस विदित केले की, एकूण ६२ नग खरेदी केले आणि त्यांची किंमत रुपये ३,६७,५००/- होती. एकाची किंमत ६ हजार रूपये होती.

यावर समितीने असे निदेश दिले की, दर करार नसताना सुध्दा खरेदी झाली आहे. दर करार नसताना, निविदा न मागविता ज्या अधिका-यांनी ही खरेदी केली असेल त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी व याबाबतचा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वतः चौकशी करून अहवाल समितीस सादर करावा तसेच सदर विषय विभागीय सचिवांच्या साक्षीसाठी घेण्यात येत आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) पंचायत समिती नाशिक सेस अंतर्गत महिला व बालकल्याण विभागाने अंगणवाडी केंद्रांसाठी खेळणी खरेदी करण्यांकरीता ३,६७,५००/- एवढ्या केलेल्या खर्चाच्या अनुषंगाने पंचायत समिती, नाशिक यांनी शासन निर्णय ऊद्योग ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई क्र भाखंस-१०८८(२५१२)-ऊद्योग-६ दिनांक २ जानेवारी, १९९२ (परिशिष्ट २०.१) मधील नमुद अटी व शर्तींचे पालन केलेले नसणे, रु.५०,०००/- रुपयांपेक्षा अधिक खरेदी करीता निविदा मागविण्यात आलेल्या नसणे, स्थानिक दराची चौकशी केलेली नसणे शासनाने सदर साहित्याचा दरकरार केलेला आहे किंवा नाही याची खात्री केलेली नसणे याउलट शासन निर्णय ०२ जानेवारी, १९९२ चा चुकीचा अन्वय लावुन परिशिष्ट ३ मध्ये ज्या १६ वस्तुंची यादी दिलेली आहे त्या यादीमध्ये समाविष्ठ नसलेल्या वस्तुंची खरेदी महाराष्ट्र लघु ऊद्योग विकास महामंडळ यांच्यामार्फत करण्यात आलेली आहे. या सर्व बाबींची चौकशी करुन समितीस अहवाल सादर करण्याबाबत समितीचे निर्देश आहेत त्यानुसार शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास त्यात काय आढळुन आले ?

(२) महाराष्ट्र लघु ऊद्योग विकास महामंडळ खेळण्यांकरीता दरकरार करीत नाही एवढेच नव्हे तर महाराष्ट्र लघु ऊद्योग विकास महामंडळाबरोबर दरकरार केला जात नाही तेव्हा दरकरार केलेला नसताना महाराष्ट्र लघु ऊद्योग विकास महामंडळाकडुन थेट अशी खरेदी करता येते काय ?

(३) महाराष्ट्र लघु ऊद्योग विकास महामंडळ यांच्याकडे १ डिसेंबर, २०११ रोजी पंचायत समितीने दराविषयी विचारणा केली असता दि.१५ डिसेंबर, २०११ रोजी महाराष्ट्र लघु ऊद्योग विकास महामंडळ नाशिक यांनी राज्यातील त्यांची आठही विभागीय कार्यालय आणि NICE, NIMA व AIMA आणि अंबडचे दोन तसेच दिंडोरी आणि सिडको मधील एक पुरवठादार यांना महामंडळाने विचारणा केली त्यापैकी अंबडच्या दोन आणि दिंडोरीचा एक अशा केवळ तीन पुरवठादारांनी आपले दरपत्रक महाराष्ट्र लघु ऊद्योग विकास महामंडळ नाशिक यांच्याकडे पाठविले त्यांच्यावर कोठेही दिनांक, प्राप्त झाल्याचा दिनांक नमुद केलेला नाही ज्या दिवशी दरांची विचारणा करण्यात आली त्याच दिवशी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ यांनी दिनांक १५ डिसेंबर, २०११ रोजी बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे दरपत्रक पाठविलेले असुन गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नाशिक यांनी दिनांक २९ डिसेंबर, २०११ रोजी महाराष्ट्र लघु ऊद्योग विकास महामंडळ नाशिक यांना पुरवठा आदेश दिले असुन ते महाराष्ट्र लघु ऊद्योग विकास महामंडळ नाशिक यांना आवक क्रमांक १२४८ दिनांक २ जानेवारी, २०१२ रोजी प्राप्त झालेले आहेत. ही सर्व खरेदी प्रक्रीया घाईघाईने केल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले आहे. पंचायत समिती, नाशिक व महाराष्ट्र लघुऊद्योग विकास महामंडळ नाशिक यांनी केलेली कार्यवाही नियमानुसार आहे काय, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले ?

(४) शासन निर्णय १ जानेवारी, १९९३ नुसार साहित्याचे वाटप त्याच वर्षाकरीता करण्याकरीता निवडणुकीच्या आचार संहितेचा प्रत्यावाय असणे हे नियमानुसार आहे काय, तसेच महाराष्ट्र लघु ऊद्योग विकास महामंडळ यांच्याकडुन पुरवठा झालेला असल्यामुळे पुरवठादारांनी करारनामा करणे आवश्यक नाही हे ही नियमानुसार आहे काय ?

(५) प्रस्तुत प्रकरणात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात कोण दोषी आढळुन आले व त्यांचेवर कोणती कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(६) सन २०११-२०१२ मध्ये खेळण्यांसाठी लघु ऊद्योग विकास महामंडळाचा दरकरार नसताना कोणत्या प्राधिकारान्वये खरेदी करण्यात आली. अंगणवाडी केंद्रासाठी खेळणी खरेदी करण्यासाठी जाहिर निविदा प्रक्रिया का डावलण्यांत आली, तसेच याप्रकरणी ज्या अधिका-यांनी ही खरेदी केली, त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद, नाशिक मार्फत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील आदेश जावक क्र.जिपना/एबाविसेयो/७६२/२०१७, दि.१४.११.२०१७ अन्वये या संदर्भात त्रीसदस्यीय चौकशी समिती स्थापन करण्यात येवुन सदर खरेदी प्रकरणाची सखोल चौकशी पुर्ण करण्यात आलेली आहे. सोबत चौकशी समितीचा अहवाल अवलोकनार्थ सादर केलेला आहे. सदर चौकशी समितीचे अहवालानुसार पंचायत समिती सेसमधुन खेळणी खरेदी करताना वित्तीय नियमांचे पालन झालेले नसल्याबाबत नमुद केले आहे.

अहवालात नमुद केलेनुसार सदर खरेदी करताना महाराष्ट्र लघु ऊद्योग विकास महामंडळ, नाशिक यांचेकडुन दर घेवुन आदेश दिलेला आहे. चौकशी अहवालनुसार सदर बाब चुकीची आहे. शासन अंगिकृत उपक्रमा मार्फतच ही खरेदी करण्यात आलेली आहे. अंगणवाडी केंद्रांतील मुलांची उपस्थिती वाढविणेसाठी सदर खरेदी करण्यात आलेली आहे.

अहवालात नमुद केलेनुसार खेळणी साहित्य खरेदी करताना दैनिक वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देवुन निविदा पध्दतीने इच्छुक पुरवठाधारक यांचेकडुन दरपत्रके मागवुन निविदा पध्दतीने खरेदी करणे ऐवजी घाईघाईने शासन नियमांचे उल्लंघन करुन महाराष्ट्र लघु ऊद्योग विकास महामंडळाकडुन दर घेवून पुरवठा आदेश दिलेला आहे. सदर बाब चुकीची आहे.

नमुद शासन निर्णयानुसार साहित्याचे वाटप त्याच वर्षाकरीता करण्याकरीता निवडणुकीच्या आचार संहितेचा प्रत्यावाच असणे नियमानुसार आहे. परंतु सदर खरेदी केलेले साहित्य हे कोणत्याही वैयक्तिक लाभार्थ्यांना न देता अंगणवाडी केंद्रांना वाटप करावयाचे होते व त्यामुळे याबाबत निवडणुक आचारसंहितेचा प्रत्यावाच असणे किंवा पाळणे चुकीचे आहे. तसेच खरेदी करताना महाराष्ट्र लघु ऊद्योग विकास महामंडळ या पुरवठादारांकडुन करारनामा करुन घेणे आवश्यक होते.

याबाबत वर नमुद केल्याप्रमाणे जिल्हा परिषद, नाशिक मार्फत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील आदेश जावक क्र.जिपना/एबाविसेयो/७६२/२०१७,दि.१४.११.२०१७ अन्वये या बाबतीत त्रीसदस्यीय चौकशी समिती स्थापन करण्यात येवुन चौकशी पुर्ण करण्यात आलेली आहे. सदर चौकशी अहवालात नमुद केल्याप्रमाणे खरेदी कालावधीत एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नाशिक प्रकल्पात बाल विकास प्रकल्प अधिकारी म्हणुन श्री आत्माराम सुकलाल साळुंके कार्यरत होते तसेच पंचायत समितीचे गट विकास अधिकारी म्हणुन श्री मनिष सांगळे कार्यरत होते. या अधिका-यांच्या विरुध्द योग्य ती प्रशासकीय कार्यवाही योग्य त्या आस्थापनांमार्फत प्रस्तावित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन ऊद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भाखंस-१०८८/ (२५१२) उद्योग-६ दिनांक ०२ जाने, १९९२ नुसार एका विशिष्ट वस्तुची एकुण वार्षिक खरेदी रु.५०,०००/- किंवा त्यापेक्षा अधिक असेल अशावेळी राजपत्रामध्ये विविध चौकशी प्रसिध्द करुन निविदा मागविणे बंधनकारक असताना अशा प्रकारची कार्यवाही न करता महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाकडून दर मागवुन म्हणजेच जाहीर निविदा प्रक्रीया डावलुन सदर खरेदी करण्यात आलेली आहे. सदर खरेदी कालावधीत कार्यरत असणा-या अधिका-यांवर जबाबदारी निश्चिती व योग्य ती प्रशासकीय कार्यवाही योग्य त्या आस्थापनांमार्फत प्रस्तावित करण्यात येत आहे.

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) शासनाने शासन निर्णय क्र. क-भाखंस.६ उद्योग - (२५१२)/१०८८ दि.२ जानेवारी, १९९२ अन्वये मध्यवर्ती भांडार खरेदी समिती यांना शासकीय विभागांना पुरवठा करावयाच्या वस्तु पुरवठ्याचे दर करार निश्चित करण्यासाठी अधिकृत केले होते. सदर निर्णयाअन्वये एकापेक्षा अधिक दर वस्तुचे १५ विभागांना लागणा-या अशा करार महामंडळाने निश्चित करुन वस्तु पुरवठा करण्यासाठी महामंडळांस अधिकृत केले होते.

त्या व्यतिरिक्त लघु उद्योग उत्पादित करणा-या वस्तुंना विक्री सहाय होण्यासाठी महामंडळाने खरेदी विभागाने मागविलेल्या दरांच्या स्पर्धेमध्ये उद्योग घटकांच्या वतीने भाग घेणे, पुरवठा आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधितांना पुरवठा आदेश पुरवठ्यानंतर खरेदी पुरवठ्याच्या सुचना करणे विभागाकडे पुरवठ्याच्या देयकाची मागणी करणे इत्यादी साठी महामंडळाशी संलग्न लघु उद्योग घटकांच्या वतीने विक्रीचे दर देण्याबाबतचे मार्गदर्शक सूचना निश्चित केलेली असुन दरकरार व्यतिरीक्त खरेदी विभागाकडून मागणी अथवा निविदा निघाल्यास सदर मार्गदर्शक सूचना नुसार लघुउद्योग निर्मित वस्तुंचे शासकीय विभागांना दर देवून पुरवठा करत असतो.

सबब, दि २ जानेवारी १९९२ मधील वस्तु सोडून १५ महामंडळाकरीता आरक्षित साठी दर करार निश्चितेचे अधिकार बाकी खरेदी भांडार खरेदी समितीला अधिकृत केले आहेत व त्याची खात्री खरेदी विभागाने त्यांच्या स्तरावर करणे अभिप्रेत आहे.

(२) महामंडळाने खेळणी पुरवठ्याचा कुठलाही दरकरार केलेला नाही आणि महामंडळाच्या कार्यालयामार्फत दरकरार केले असल्याचे पंचायत समितीला लेखी कळविण्यात आलेले नाही.

(३) परिच्छेद क्र. : १ च्या पुढे नमुद केलेल्या खुलासानुसार महामंडळाने बाल विकास प्रकल्प अधिकारी, नाशिक यांच्याकडून दरपत्रक मागणी केल्यानंतर महामंडळाने लघु उद्योग घटकाच्या वतीने दर देण्याबाबतचे मार्गदर्शक सूचनांचे अवलंब करुन खालील प्रमाणे कार्यवाही केलेली आहे.

बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास प्रकल्प सेवायोजना नाशिक यांनी त्यांचे पत्र क्र.अर्थ/एबाविसयो २२१/२०११ दि.१/१२/२०११ अन्वये महामंडळाकडे नोंदणी असलेल्या अधिकृत उद्योग घटकांकडून दर मागवून ते त्यांना देण्याबाबत विनंती केली होती, हे पत्र महामंडळास दिनांक०७/१२/२०११ रोजी प्राप्त झाले होते.

पंचायत समिती, नाशिक यांच्या मागणीनुसार महामंडळाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार दि.१५/१२/२०११ रोजी महामंडळाच्या नाशिक विभागीय कार्यालयाकडे नोंदणीकृत लघुउद्योग घटक सर्व विभागीय कार्यालयाकडे व औद्योगिक संघटना यांना दर देण्याबाबतचे पत्र देण्यात आले या पत्रामध्ये दर दि.२१/१२/२०११ पर्यंत सादर करण्यास मुदत देण्यात आली होती.

या प्रकरणामध्ये महामंडळाकडे उपलब्ध कागदपत्रांची पडताळणी केली असता सदर पत्रास तीन उद्योग घटकांनी प्रतिसाद देवून त्यांची दरपत्रके महामंडळास सादर केली होती. या दरपत्रकांवर दिनांक नमुद केलेला नाही. परंतु ते दरपत्रक दिनांक १५/१२/२०११ रोजी प्राप्त झाल्याचे नमुद केले आहे. त्यावर कोणाचीही स्वाक्षरी नाही. महामंडळाकडे प्राप्त दरपत्रकातील कमीत कमी दर महामंडळाने त्याच दिवशी म्हणजे दिनांक १५/१२/२०११ रोजी बालविकास प्रकल्प अधिकारी यांना सादर केल्याचे दिसून येते. सदर प्रकरणात दरपत्रक मागविण्यापासून दरपत्रक सादर करण्यापर्यंतची प्रक्रिया ही एका दिवसात पूर्ण करण्यात आल्याचे दिसून येते. याबाबत महामंडळाने संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

गटविकास अधिकारी यांनी महामंडळाने सादर केलेले दर मंजूर करुन पुरवठा आदेश क्र.एबाबिसयो/अर्थ/५०४/२०११ दिनांक २९/१२/२०११ रुपये २,२५,०००/- व पुरवठा आदेश क्र.एबाविसयो/अर्थ/५०४/२०११ दिनांक २९/०३/२०१२ रुपये १,४२,५००/- रक्कमेचा असेल असे एकूण रुपये ३,६७,५००/- एवढ्या रक्कमेचे आदेश महामंडळास देण्यात आले होते. सदर आदेशानुसार महामंडळामार्फत खेळण्याचा पुरवठा करण्यात आला. बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प, नाशिक यांच्यामार्फत पुरवठा स्वीकारुन खेळणी चांगल्या स्थितीत मिळाल्याबाबतचे महामंडळाच्या विविध नमुन्यातील प्रमाणपत्र सुध्दा देण्यात आले आहे. महामंडळामार्फत पुरवठा करण्यात आलेल्या खेळण्यांची संपूर्ण रक्कम महामंडळास अदा करण्यात आलेली आहे. पुरवठा करण्यात आलेल्या खेळण्यांबाबत कुठल्याही प्रकारची तक्रार आजपर्यंत महामंडळास गटविकास अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही.

(४) महामंडळाशी संबंधीत नसुन पंचायत समितीशी संबंधीत आहे.

(५) महामंडळाशी संबंधीत नसून पंचायत समितीशी संबंधीत आहे.

(६) महामंडळाशी संबंधीत नसून पंचायत समितीशी संबंधीत आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त-३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी स्थापन केलेल्या समितीचा चौकशी अहवाल सोबत जोडला आहे. जिल्हा परिषदेच्या अभिप्रायांशी विभाग सहमत आहे.

**मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय :-**

(१) सदर उत्तराशी सहमत आहे.

(२) सदर उत्तराशी सहमत आहे.

(३) सदर उत्तराशी सहमत आहे.

(४) सदर उत्तराशी सहमत आहे.

(५) सदर उत्तराशी सहमत आहे.

(६) सदर उत्तराशी सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने नाशिक जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १५फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारलेल्या प्रश्नावर व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ यांनी समितीस अशी माहिती दिली की, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा दिनांक २ जानेवारी, १९९२ रोजीचा शासन निर्णय आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील ग्रामीण भागामध्ये जे लघुउद्योग असतात त्यांच्या विपननासाठी महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाला १५ वस्तु राखीव ठेवण्यात आल्या होत्या आणि शासनाच्या भांडार समितीच्या मान्यतेने त्या वस्तुंचे दर करार निश्चित केले जात होते. सदर दरकरार निश्चित करीत असताना ज्या विभागाचे दर करार नाही आणि ज्या विभागांची दोन ते तीन लाखापर्यंतच्या रकमेची मागणी असेल अशासाठी महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाने दिनांक २९ जून, १९९८ रोजी अंतर्गत आदेश काढून अशा चौकशी व निविदा प्रक्रियेमध्ये कसे सहभागी व्हावे या संदर्भात विस्तृत परिपत्रक पारित केले होते. एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प नाशिक यांनी दिनांक १ डिसेंबर, २०११ रोजी अधीक्षक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ यांच्याकडे अंगणवाडी केंद्राला खेळाचे साहित्य खरेदी करावयाचे असल्याने त्याबाबत दर पुरविण्यात यावेत असे पत्र दिले होते. यामध्ये दर करार नसल्याने दर कळविण्यात यावेत असे नमूद केले होते. त्यानुसार महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ विभागीय अधिका-यांनी जे नोंदणीकृत लघु उद्योग घटक आहेत त्यांना वेबसाईटद्वारे व प्रत्यक्षरित्या कळविले आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, साहित्य खरेदीकरीता निविदा मागविली होती काय, यावर व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ यांनी समितीस विदित केले की, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचे जे सन १९९८ चे परिपत्रक आहे त्यानुसार अशा कमी किंमतीच्या ज्या काही वस्तु असतील तसेच ज्या ज्या विभागाची अशा स्वरुपाच्या वस्तुंची मागणी असेल तर त्या विभागांना महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाच्या नोंदणीकृत लघु उद्योग घटकांनामार्फत वस्तुंचे वाटप केले जाते आणि त्याअनुषंगाने दर दिले जातात. यावर समितीने विचारणा केली की, आपण निविदा मागवित नाही काय, तसेच यामध्ये कोणती अनियमितता झाली आहे काय, यावर व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ यांनी समितीस विदित केले की, सदरहू माहिती ही महामंडळाच्या बेबसाईटवर नमुद करतो. तसेच जे नोंदणीकृत लघु उद्योग घटक आहेत त्यांना देखील याबाबत कळविले जात असते. त्यामुळे निविदा मागविण्याचा आवश्यकता नसते. तसेच यामध्ये अशी अनियमितता झाली आहे की, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाकडे मागणीपत्र आल्यानंतर महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाने सदरहू मागणीपत्र वेबसाईटवर तसेच नोंदणीकृत लघुउद्योग घटकांना महिन्याच्या १५ तारखेला सुचित केले होते. परंतु दरपत्रक भरुन देण्यासंदर्भात २१ तारखेपर्यंत मुदतवाढ असतानाही काही लघुउद्योग घटकांनी महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाकडे त्यांचे दरपत्रक दिले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, श्री. आत्माराम सुकलाल साळुंके यांनी अनियमितता केल्याचे दिसून येते. परंतु १ वर्ष होऊनही त्यांच्यावर कारवाई न करण्याची कारणे काय आहेत. तसेच आपण त्यांची वेतनवाढ रोखली आहे काय, यावर व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ यांनी समितीस विदित केले की, यामध्ये सखोल चौकशी केलेली आहे. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाच्या ज्या कर्मचा-यांनी अनियमितता केली आहे तसेच ज्या ऑर्डरप्रमाणे त्याना मालाचा पुरवठा करावयाचा होता त्यांनी तो केला परंतु त्यांना २१ तारखेपर्यंत थांबणे आवश्यक असताना त्यांनी २१ तारखेच्या अगोदर कार्यवाही केली तसेच पंचायत समिती ठराव १५ तारखेला झाला होता अशी त्यांनी त्यामध्ये खाडातोड केलेली असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई केली आहे. तसेच त्यांची वेतनवाढ देखील रोखली आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, यामध्ये फक्त बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्यावर कारवाई केलेली दिसून येत आहे परंतु यामध्ये गटविकास अधिकारी यांच्यावर कारवाई केलेली दिसून येत नाही, याबाबत समितीस माहिती द्यावी. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, जिल्हा परिषदेने दिनांक १४ नोव्हेंबर रोजी एक त्रिसदस्यीय समिती स्थापन केली होती. त्यानुसार त्या समितीने केलेला अहवाल विभागास प्राप्त झाला आहे. सदरहू अहवालाच्या आधारे जिल्हा परिषदेने बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु केली आहे. परंतु त्यांनी गटविकास अधिकारी यांच्यावर विभागीय चौकशी केली नाही. जर गटविकास अधिकारी दोषी असतील तर त्यांच्यावर देखील विभागीय चौकशी करण्यात यावी अशा सुचना देण्यात आल्या आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, संबंधितांवरील कारवाई किती दिवसात पूर्ण करणार तसे समितीला अवगत करावे. जिल्हा परिषदेडून गटविकास अधिकारी यांचा विभागीय चौकशीचा अहवाल विभागास प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांत विभाग कारवाई करेल असे सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस आश्वासित केले.

### अभिप्राय व शिफारशी

नाशिक पंचायत समितीने सेस अंतर्गत सन २०११-१२ या वर्षामध्ये महिला व बालकल्याण विभागामार्फत अंगणवाडी केंद्रासाठी सी-सॉचे ६२ नग महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाकडून खेळणी खरेदी करण्याकरीता एकूण रुपये ३,६७,५०० एवढा खर्च केलेला आहे. नाशिक पंचायत समितीने ५०,००० रुपयांपेक्षा अधिकच्या साहित्य खरेदीकरीता निविदा न मागविता व तुलनात्मक दराचा फायदा न घेता या ठिकाणी खरेदी करण्यात आल्याचे दिसून येते. राज्यातील आठही विभागीय कार्यालय आणि NICE, NIMA व AIMA आणि अंबडचे दोन तसेच दिंडोरी चे एक अशा केवळ तीन पुरवठादारांना विचारणा करण्यात येऊन त्याच दिवशी महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ यांनी दिनांक १५ डिसेंबर, २०११ रोजी बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे दरपत्रक पाठविलेले आहे. सर्व खरेदी प्रक्रिया घाईघाईने केल्याचे दिसून येत आहे. **जिल्हा परिषद नाशिकमार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांच्या दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये त्रिसदस्यीय चौकशी समिती स्थापन करण्यात आली होती. सदर खरेदी प्रकरणी केलेल्या चौकशीचा अहवाल समितीच्या अवलोकनार्थ सादर करण्यात यावा. खरेदी करण्यात आलेले साहित्य, दरकरार पध्दती, विक्रीपश्चात सेवेचा लाभ, साहित्याचा दर्जा व गुणवत्तेबाबतचे प्रमाणपत्र इत्यादी मुद्यांचा कोणताही विचार न करता अंगणवाडीकरीता खरेदी करण्यात आलेली आहे. वास्तविक पहाता वरील सर्व मुद्यांची पडताळणी करणे आवश्यक होते. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वतः चौकशी करावी व या संपूर्ण खरेदी प्रक्रियेसाठी जबाबदार असणा-या सर्व संबंधित अधिकारी/ कर्मचा-यांविरुध्द केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट (अ)

# शासनाचे आदेश व परिपत्रके

**(परिशिष्ट १९.१)**

**जिल्हा परिषदांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या महिला व बालकल्याण समितीने राबवावयाच्या योजना.**

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
**शासन निर्णय क्रमांक : झेडपीए १००७/४५४/प्र.क्र.५१/पंरा-१**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक : १९ डिसेंबर, २००७.**

**वाचा :-** १) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक : झेडपीई-१०९२/ प्र.क्र.३१८/०५, दिनांक ३ डिसेंबर, १९९३.
२) शासन पत्र क्रमांक झेडपीई-१०९३/सीआर-४३९/०५, दिनांक २ सप्टेंबर, १९९३.
३) शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक : झेडपीई-१०९४/ सीआर-९६६/०५, दिनांक १२ ऑगस्ट, १९९४.
४) शासन पत्र ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक : झेडपीई-१०९३/ सीआर-४३९/०५, दिनांक १२ ऑक्टोबर, १९९३.
५) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक : झेडपीई-१०/२००१/ प्र.क्र.२०६/०५, दिनांक ६ नोव्हेंबर, २००१.
६) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक : झेडपीए १००६/१२०७/ प्र.क्र.०८/पंरा-१, दिनांक २९ जून, २००६.
७) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक : झेडपीए १००६/१२०७/ प्र.क्र.०८/पंरा-१, दिनांक २५ सप्टेंबर, २००६.
८) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक : झेडपीए १००७/१२०७/ प्र.क्र.०८/पंरा-१, दिनांक ११ ऑक्टोबर, २००६.

**शासन निर्णय :-**

महिला व बाल विकासाशी संबंधित विविध कार्यक्रम राबविण्यासाठी सर्व जिल्हा परिषदांमध्ये महिला व बालकल्याण समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर समितीने राबवावयाचे कार्यक्रम संदर्भाधीन अ.क्र.५ येथील शासन निर्णयान्वये सर्व जिल्हा परिषदांना सूचना दिलेल्या आहेत. तथापि, बदलत्या परिस्थितीनुसार बऱ्याच योजना / कार्यक्रम कालबाह्य झाल्यामुळे त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे तसेच बहुतेक जिल्हा परिषदांमधील लोकप्रतिनिधींना अशा योजनांबाबत फारशी माहिती नसल्यामुळे अथवा योजनेसाठी अत्यल्प तरतूद असल्याने महिलांच्या योजनांची योग्य रीतीने अंमलबजावणी होत नाही असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. या सर्व बाबी लक्षात घेऊन महिलांना सर्व क्षेत्रात सक्षम करण्यासाठी जिल्हा परिषद क्षेत्रात महिला व बाल कल्याण समित्यांनी खालील योजना सक्षमपणे राबविण्याबाबत शासनाने उपरोक्त शासन निर्णय निर्गमित केले आहेत.

२. राज्यातील अनेक महिला व बाल कल्याण समिती सभापती यांच्याकडून महिला व बाल कल्याण समितीने राबवावयाच्या योजनांबाबत सुधारणा करण्याविषयी शासनाकडे वारंवार विचारणा होत होती. त्यानुसार शासनाने निर्गमित केलेल्या दिनांक ६ नोव्हेंबर, २००१ व २९ जून, २००६ च्या शासन निर्णयामधील योजनांबाबत मते जाणून घेण्यासाठी सर्व महिला व बाल कल्याण समितीच्या सभापतींची व महिला जिल्हा परिषद अध्यक्षांची बैठक बोलवावी, असे मा.मंत्री (ग्रा.वि.) यांनी निर्देश दिले. उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने मा.मंत्री (ग्रा.वि.) यांच्या निर्देशानुसार दिनांक ६ सप्टेंबर, २००७ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक ६ नोव्हेंबर, २००१ च्या शासन निर्णयातील २४ मान्य योजना तसेच दिनांक २९ जून, २००६ च्या शासन निर्णयामधील १७ मान्य योजनांबाबत सविस्तर चर्चा होऊन खालील सुधारित २१ योजनांना अंतिम मान्यता देण्यात आली. त्याप्रमाणे आदेश या शासन निर्णयान्वये देण्यात येत आहे.

१) **महिला व बाल कल्याण समितीमार्फत राबविण्यात यावयाच्या योजना :-**

लांब पल्ल्याच्या (२ कि.मी.अंतरावरील) शाळेत जाणाऱ्या मुलींसाठी
(इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत शिकणाऱ्या) सायकली पुरविणे.

दुर्गम भागात किंवा इतर ठिकाणी विद्यार्थिनींना त्यांच्या राहत्या गावांपासून ज्या ठिकाणी कमीत कमी २ कि.मी.अंतर चालत जावे लागते, अशा विद्यार्थिनींना मोफत सायकली पुरविण्यबाबतची ही योजना आहे. सदर योजना दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील विद्यार्थिनींना लाभ देण्याची योजना आहे. ही योजना नव्याने सुरु करावयाची आहे. या योजनेखाली किती लाभार्थ्यांना लाभ द्यावा याबाबतचा निर्णय जिल्हा परिषदेने (आता संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी) घ्यावयाचा आहे.

२) **ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या स्त्रियांसाठी मोफत शिलाई मशिन खरेदी करणे :-**

केंद्र पुरस्कृत एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाखाली दारिद्र्य रेषेखालील महिलांना शिलाई मशिन देण्याची तरतूद आहे. तसेच समाजकल्याण विभागामार्फतदेखील शिलाई मशिन पुरविण्याची तरतूद आहे. तसेच समितीला स्वतःच्या निधीतूनदेखील शिलाई मशिन खरेदी करता येतील व यासाठी लाभार्थी कसे व किती निवडावेत याबद्दल जिल्हा परिषदेने (आणि पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांनी) निर्णय घ्यावयाचा आहे.

३) **ग्रामीण महिला व बाल-कल्याण रोग निदान शिबिराचे आयोजन :-**

० ते ६ वयोगटातील बालकांच्या आरोग्याची तपासणी तज्ज्ञ डॉक्टरांकडून करुन घेणे व आवश्यक असलेले औषधोपचार करणे, यासाठी रोगनिदान शिबिरे आयोजित करण्याची ही नवीन योजना आहे. ज्या ठिकाणी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत अशा प्रकारची योजना उपलब्ध नसेल किंवा उपलब्ध असलेली योजना राबविण्यासाठी पैशाची कमतरता असेल, त्या ठिकाणी या समितीमार्फत ही योजना घेण्यात यावी. या योजनेवर किती खर्च करावा, याबद्दल निर्णय जिल्हा परिषदेने (आणि पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांनी) घ्यावयाचा आहे.

४) **आदर्श अंगणवाडी / बालवाडी सेविकांना पुरस्कार :-**

अंगणवाडी व बालवाडीमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या सेविकांना समितीस स्वतःच्या निधीमधून पुरस्कार देता येईल व उत्कृष्ट काम करणाऱ्या सेविकांची निवड तसेच पुरस्काराची रक्कम किती असावी, याबद्दल जिल्हा परिषदेने निर्णय घ्यावयाचा आहे.

५) **अंगणवाडी / बालवाडींना साहित्य पुरविणे :-**

एकात्मिक बाल विकास योजनेखाली अंगणवाडींना लागणाऱ्या साहित्याची खरेदी सदर समितीने करावी. त्यासाठी एकात्मिक बाल विकास योजनेमधून खर्च करावा. तथापि, ज्या अंगणवाड्या / बालवाड्या समिती स्वतःच्या निधीमधून चालविल, त्यावरील खर्च समितीने स्वतःच्या निधीमधून करावा.

६) **ग्राम पातळीवरील बालकांच्या / महिलांच्या कलागुणांना प्रोत्साहनासाठी स्पर्धा आयोजित करणे :-**

विविध क्षेत्रामध्ये बालकांच्या व महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी प्रोत्साहनात्मक स्पर्धा या योजनेखाली समितीला आयोजित करता येतील. सदर योजनेखाली प्रतिवर्षी कोणकोणत्या स्पर्धा आयोजित कराव्यात. किती स्पर्धा आयोजित कराव्यात व यावर प्रतिवर्षी किती खर्च येईल, याबाबत जिल्हा परिषदेने (आणि पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांनी) निर्णय घ्यावा.

७) **किशोरवयीन मुलींना व मुलांना जीवनकौशल्याचे प्रशिक्षण देणे :-**

किशोरवयीन मुलांना व मुलींना शाळेत सर्वसाधारण शिक्षण देण्यात येते. परंतु विशिष्ट किशोरवयीन समस्यांबद्दल शिक्षण देण्यात येत नाही. असे निदर्शनास आले आहे की, त्यामुळे त्यांना काही मानसिक व सामाजिक, मनोवैज्ञानिक अडचणींना तोंड द्यावे लागते. याबाबत अनुभवी व संवेदनशील तज्ज्ञ/स्वयंसेवी संस्थांमार्फत सदर प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे. त्याचे स्वरुप स्थानिक आवश्यकतेनुसार ठरविण्यात यावे. उदा. शाळेत / महाविद्यालयात शिकणा-या मुलींसाठी किंवा गळती झालेल्या मुलींसाठी दर आठवड्याला एक वर्ग (तसेच मुलांसाठी स्वतंत्र वर्ग) भरविण्यात यावेत. प्रत्येक वर्ग १ ते २ तासांचा असावा. बाहेरील तज्ज्ञांना व डॉक्टरांना, मनोवैज्ञानिकांना सदर सत्र घेण्यासाठी निमंत्रित करण्यात यावे. त्यांना प्रत्येक सत्रासाठी साधारणपणे रु.२०० ते ४०० मानधन देण्यात यावे.

**या प्रशिक्षणात मुलींसाठी साधारणतः खालील बाबींचा समावेश असावा :-**

अ) स्त्रियांच्या मासिक पाळीचे शास्त्र व उद्देश

ब) मासिक पाळीच्या काळात आरोग्यविषयक घ्यावयाच्या काळजीची आवश्यकता.

क) स्त्रियांच्या मासिक पाळीसंदर्भातील गैरसमज. उदा.मासिक पाळीच्या काळात स्त्रिया अशुध्द असतात आणि त्यांना इतरांपासून व स्वयंपाकघरापासून वेगळे ठेवणे.

ड) गर्भधारणेचे शास्त्र, सर्वसाधारणपणे कुटुंबनियोजनाची साधने.

इ) बालविवाहामुळे आरोग्यास होणारे दुष्परिणाम.

फ) लैंगिक छळ, त्यापासून स्वसंरक्षण कसे करावे, कोणाची मदत घ्यावी. अशा परिस्थितीत हेल्पलाईनचा उपयोग करणे.

भ) एडस् नियंत्रण.

यासंदर्भात आरोग्य संचालनालय, केईएम रुग्णालय तसेच मुंबई महानगरपालिकेने चांगले मार्गदर्शक पुस्तक प्रसिध्द केले आहे. त्याच प्रकारच्या पुस्तिका तयार करुन वापरणे, मुलांसाठी स्वतंत्र विषयक निश्चित करावे. उदा. शरीरशास्त्र, विकास, एडस्, मुली/स्त्रियांबरोबर कसे वागावे, लैंगिक रोगांबद्दल गैरसमज व अंधश्रध्दा इ.

८) **<u>महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे :-</u>**

कुटुंबातील मारहाण, लैंगिक छळ व इतर तऱ्हेने त्रासलेल्या तसेच मानसिकदृष्ट्या असंतुलित महिलांच्या सामाजिक, मानसशास्त्रीय, कायदेशीर समुपदेशनासाठी सदर योजना राबवावी. यासाठी समुपदेशक व सल्लागार यांच्या मानधनावर खर्च करण्यात यावा. समुपदेशक व सल्लागाराची निवड अनु.क्र.१८ मधील योजनेत अंतर्भूत केलेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समितीमार्फत करण्यात येईल. सदर योजना महाविद्यालय / तज्ज्ञांच्या संस्थांमार्फत राबवावी. उदा. ज्या संस्थांकडे यापूर्वीच अशा प्रकारच्या समुपदेशनासाठी आवश्यक मनुष्यबळ, जागा, अनुभव व सोईसुविधा उपलब्ध असतील. सध्या देण्यात आलेल्या सुविधा व समुपदेशन यांचा विस्तार करण्याची आवश्यकता असल्यास असे प्रस्तावही मंजूर करण्यात यावेत. मात्र यासाठी संस्थेकडे स्वत:ची जागा असणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी स्वतः कार्यालयीन फर्निचर व इतर अनावर्ती खर्चाची व्यवस्था करावी. समुपदेशकाचे व सल्लागाराचे मानधन जास्तीत जास्त साधारणपणे दरमहा रु.८०००/- पर्यंत असावे. तथापि स्थानिक दराप्रमाणे मानधन ठरवावे. याशिवाय कार्यालयीन / प्रशासकीय आवर्ती मासिक खर्चासाठी जिल्हा परिषदा यांनी स्वतः मर्यादा निश्चित करावी व त्याप्रमाणे अनुदान देण्यात यावे. तसेच वस्तू साहित्य खरेदीवर एकूण योजनेवरील खर्चाच्या ३०% पेक्षा जास्त खर्च करण्यात येऊ नये.

९) **<u>सामुहिक विवाह :-</u>**

हुंडापध्दतीला आळा घालण्यासाठी कमीतकमी खर्चात कोणत्याही इच्छुक मुलामुलींसाठी सामूहिक विवाह आयोजित करण्यात यावेत व यात प्रति दांपत्य रु.५०००/- पर्यंत खर्च करण्यात यावा. विशेषत: गरीब कुटुंब, कर्जात बुडालेला शेतकरी, भूमिहीन शेतमजूर अशा प्रकारच्या कुटुंबांना या योजनेचा लाभ द्यावा.

१०) **<u>कुपोषित मुलांसाठी अतिरिक्त आहार :-</u>**

ग्रामीण / आदिवासी भागातील मुलांमध्ये कुपोषणाचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले आहे. ते प्रमाण कमी करण्यासाठी कुपोषित मुलांना अंगणवाड्यांमार्फत दुप्पट आहार दिला जातो. तथापि कुपोषण कमी

करण्यासाठी तो पुरेसा नसल्याने कुपोषित मुलांना अंगणवाडीत पुरविण्यात येणाऱ्या आहाराव्यतिरिक्त विशेष आहार म्हणून स्थानिक उपलब्धतेनुसार दूध, अंडी, फळे, गूळ, शेंगदाणे, इ. वस्तूंचा पुरवठा करण्यात यावा.

११) **महिला प्रतिनिधींची अभ्यास सहल :-**

समितीस स्वतःच्या निधीमधून ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेमध्ये निवडून आलेल्या महिला लोकप्रतिनिधींना पंचायत राज संस्थेबाबतचे प्रशिक्षण ग्राम पातळीवर, तालुका पातळीवर व जिल्हा पातळीवर आयोजित करावे. प्रतिवर्षी अशा प्रकारे किती प्रशिक्षण वर्ग आयोजित करावेत व यासाठी प्रतिवर्षी किती खर्च करावा, याबाबत जिल्हा परिषदेने निर्णय घ्यावयाचा आहे.

१२) **अपंग, मुले व स्त्रियांना कृत्रिम अवयव बसविणे / त्यांचे पुनर्वसन करणे :-**

ज्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे, अशा दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील अपंग, मुले, मुली व स्त्रियांना कृत्रिम अवयव बसविणे अत्यंत निकडीचे असल्यास समितीस यासाठी स्वतःच्या निधीतून खर्च करता येईल. सदर योजनेखाली लाभार्थ्यांची निवड तसेच त्यासाठी प्रतिवर्षी किती खर्च करावा, याबद्दल जिल्हा परिषदेने (आणि पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांनी) निर्णय घ्यावा.

१३) **गणवेश वाटप करण्याची योजना :-**

इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या मुलींना गणवेश वाटप करण्याची ही योजना आहे. सर्वसाधारणपणे ज्या मुलींची आर्थिक परिस्थिती चांगली नाही, अशा मुलींना गणवेशाचे वाटप करता येईल. तथापि, सदर कार्यक्रमाखाली प्रतिवर्षी किती मुलींना गणवेश वाटप करता येईल. तसेच कोणत्या शाळेतील मुलींना गणवेशाचे वाटप करावे, याबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांनी निर्णय घ्यावयाचा आहे.

१४) **जिल्ह्याबाहेर उच्च शिक्षण घेणाऱ्या होतकरु मुलांसाठी एक रक्कमी अर्थसहाय्य :-**

आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकातील जिल्ह्याबाहेर उच्च शिक्षण घेणाऱ्या होतकरु मुलांना रु.२०००/- पर्यंत एक रक्कमी अर्थसहाय्य या योजनेखाली करता येईल. सदर मदत वस्तू स्वरुपात न देता रोख रक्कमेच्या स्वरुपात द्यावी. अशा होतकरु मुलांची निवड कशी करावी व प्रतिवर्षी अशा किती मुलांची निवड करावी, याबाबत जिल्हा परिषदेने (पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांनी) निर्णय घ्यावा.

१५) **बारावी पास मुलींना MS-CIT प्रशिक्षण देणे :-**

सध्या शासकीय/निमशासकीय नोकरीसाठी MS-CIT उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे.संगणकाबाबतचे ज्ञान तसेच संगणक चालविण्याचे कौशल्य प्राप्त करण्यासाठी १२ वी पास मुलींना MS-CIT अभ्यासक्रमासाठी प्रशिक्षण देण्याची योजना यामुळे उपयुक्त राहील. त्याप्रमाणे एखाद्या मान्यताप्राप्त संस्थेला फी देऊन त्याबाबतचे प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे.

१६) **मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण :-**

शासकीय किंवा अशासकीय संस्थांमार्फत काही तांत्रिक / व्यावसायिक प्रशिक्षण वर्ग चालविले जातात. अशा संस्थांमधून खालील प्रकारच्या प्रशिक्षणासाठी योजना राबवाव्यात. उदा.व्यक्तिमत्व विकास, इंग्रजी संभाषण, पब्लिक स्पिकिंग, आत्मविश्वास निर्माण, बालवाडी शिक्षिका, गवंडी, सुतारकाम, प्लंबर प्रशिक्षण, घरगुती विद्युत उपकरणांची दुरुस्ती ( टी.व्ही., रेडिओ, मिक्सर, इस्त्री, टोस्टर, इ. मोबाईल दुरुस्ती, संगणक दुरुस्ती, म्युझिक सिस्टीम दुरुस्ती) वाहन दुरुस्ती, सौंदर्यप्रसाधनांचे प्रशिक्षण, केटरींग, बेकींग, विशिष्ट पध्दतीच्या स्वयंपाकाचे प्रशिक्षण, घरगुती कामकाजाचे प्रशिक्षण (Full time domestic help), शासकीय व अशासकीय नोकरीसाठी प्रशिक्षण उदा. महिला हवालदार, ड्रायव्हर व कंडक्टर, विमा एजंट, रिसेप्शनिस्ट, लघुलेखन/ टंकलेखन, सेल्स गर्ल, परिचारिका (नर्स) प्रशिक्षण, वृध्दांची देखभाल, लहान मुलांची देखभाल, फिजिओथेरपी प्रशिक्षण, पॅकेजिंग, फुडप्रोसेसिंग, दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन, कचऱ्यापासून खतनिर्मिती, गांडूळखत, कचऱ्याचे विभाजन व व्यवस्थापन, शोभिवंत फुलझाडांची लागवड व विक्री, औषधी वनस्पतीचे उत्पन्न, इ. १४ वर्षे वय किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या मुलींना व शाळेतून गळती झालेल्या मुलींना अशा व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देण्यासाठी सदर योजना प्रस्तावित करण्यात येत आहे. या योजनेखाली मान्यताप्राप्त संस्थेत प्रशिक्षण घेणाऱ्या मुलींना प्रति लाभार्थी रु.५०००/- पर्यंत प्रशिक्षणाचे शुल्क (Fees) भरण्याची तरतूद राहील. प्रशिक्षण शुल्काच्या रकमेच्या दहा टक्के रक्कम लाभार्थ्यांने स्वत: भरावी. प्रशिक्षण कालावधी जास्तीत जास्त एक वर्षाचा असावा. शुल्क भरण्याचे नियम व प्रक्रिया संबंधित जिल्हा परिषदांनी ठरवावी.

१७) **मुलींना स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारीरिक विकासासाठी प्रशिक्षण योजना :-**

या योजनेमध्ये मुलीना कुंग्फू-कराटे, योगाचे प्रशिक्षण देण्यात यावे. कोणत्याही वयोगटातील परंतु आर्थिकदृष्टया मागासलेल्या कुटुंबातील मुलींना सदर प्रशिक्षण मोफत देण्यात यावे. सदर प्रशिक्षण किमान तीन महिन्यांचे असावे. ते शाळा व महाविद्यालये यांच्या समन्वयाने आयोजित करण्यात यावे. या योजनेतून प्रशिक्षकाच्या मानधनावर साधारणपणे प्रति लाभार्थी रु.३००/- प्रतिमहापर्यंत खर्च करण्यात यावा.

१८) **महिलांना कायदेशीर / विधिविषयक सल्ला देणे :-** बहुतेक मुलींना व महिलांना त्यांच्या कायदेशीर अधिकारांबद्दल माहिती नसते. तसेच महिलांसबंधी विविध कायद्यांची कल्पना नसते. विशेषत: हुंडाविषयक कायदे, स्त्रीधन, मालमत्ता अधिकार, वारसा हक्क, लग्न, घटस्फोट, पोटगीविषयक कायदे, बलात्कारविषयक काय द्यातील तरतूदी, लग्नानंतरचे अधिकार. त्यामुळे सदर विषयावर महाविद्यालय व इतर ठिकाणी मुली व महिलांसाठी लेक्चर ठेवण्यात यावे व यासाठी या विषयाबाबत कुशल वकीलाची नेमणूक करण्यात यावी. तसेच चांगल्या वकीलाची निवड करण्यासाठी जिल्हास्तरीय निवड समिती असावी व यावर मुख्य कार्यकारी

अधिकारी, जिल्हा सरकारी वकील, सिनीयर जे.एफ.एम.सी. (ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट) इ.अधिकारी असावेत, जेणेकरुन फक्त चांगल्या वकीलांची निवड होईल.

१९) **<u>महिलांसाठी हेल्पलाईन सुरु करणे.</u>**

२०) **<u>अंगणवाड्यांना आयर्न टॅब्लेटस व ओ.आर.एस. पाकिटे पुरविणे.</u>**

२१) **<u>अंगणवाडीतील मुख्य सेविकांना उत्तम कामासाठी बक्षिसे देणे.</u>**

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक संकेतांक 200712191711951001 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुनील चव्हाण)
विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.
२) विभागीय आयुक्त (सर्व).
३) जिल्हाधिकारी (सर्व).
४) जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व).
५) जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (सर्व).
६) आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, ३ चर्च रोड, पुणे - ४११ ००१..
७) संचालक, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, कोकण भवन, नवी मुंबई.
८) सर्व मंत्रालयीन विभाग.
९) मुख्यमंत्र्यांचे सचिवालय.
१०) मा. मंत्री (ग्रा. वि.) यांचे खाजगी सचिव.
११) मा. राज्यमंत्री (ग्रा. वि.) यांचे स्वीय सहाय्यक.
१२) ग्राम विकास व जलसंधारण विभागाची सर्व कार्यासने.
१३) निवड नस्ती, कार्यासन क्र.पंरा-१, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रत,**

१) सचिव, महिलांचे हक्क व कल्याण समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
२) सचिव, पंचायत राज समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई यांजकडे माहितीसाठी रवाना.

(परिशिष्ट २०.१)

संगणक संकेतांक

मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या कामाचे विकेंद्रीकरण आणि शासकीय विभागांमार्फत वस्तू खरेदी करण्याच्या व्यवस्थेची कार्यपद्धती. लघुउद्योग, सार्वजनिक उपक्रम, इत्यादी, यांना द्यावयाची प्राधान्ये-सवलती बाबतचा.

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय, क्र. भांखस- १०८८/(२५१२)/उद्योग-६,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

दिनांक २ जानेवारी १९९२

पार्श्वभूमिका

शासनाला आवश्यक असणाऱ्या वस्तू खरेदी करताना मध्यवर्ती खरेदीमुळे होणारा विलंब टाळण्यासाठी मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या कामाचे विकेंद्रीकरण करणे शासनास आवश्यक वाटल्याने शासनाने दिनांक १८ मार्च १९७६ च्या शासन निर्णयान्वये एक समिती नियुक्त केली होती व त्या समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या कामाचे विकेंद्रीकरण करून त्यात सुसूत्रता व सुलभीकरण आणण्यात आले होते. त्यानंतरच्या काळात दळणवळणातील सुविधा, उद्योगांचे विकेंद्रीकरण व मागास भागात उद्योग स्थापण्यासाठी शासनाने देऊ केलेल्या प्रोत्साहनामुळे झालेली औद्योगिक वाढ व शासनास आवश्यक असणाऱ्या मालाची राज्यात सर्वत्र उपलब्धता यामुळे सध्या अस्तित्वात असलेल्या मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या कामाचे अधिक विकेंद्रीकरण करण्यासाठी तसेच लघुउद्योगासाठी राखीव वस्तूंच्या यादीचे पुनर्विलोकन, लघुउद्योग, सार्वजनिक उपक्रम, अंध व अपंग यांच्या संस्था व इतर संस्था यांना शासनाने देऊ केलेले प्राधान्य व आरक्षण इत्यादी सवलतींचे पुनर्विलोकन करण्यासाठी शासनाने विकास आयुक्त (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती जून १९८७ मध्ये स्थापन केली होती. सदर समितीवर विविध विभागांना प्रतिनिधित्व देण्यात आले होते. समितीने महालेखापाल, महाराष्ट्र, मुंबई यांचे विचार, तसेच गुजरात, मध्यप्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक या जवळच्या राज्यांतील खरेदी संघटनेच्या कार्यपद्धतीची माहिती घेऊन तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाच्या खरेदीबाबत लेंटिन आयोगाच्या शिफारशींवर विचार केला व तदनुषंगाने सदर समितीने आपला अहवाल दिनांक २७ डिसेंबर १९८८ रोजी शासनाला सादर केला. या अहवालावर भांडार खरेदी संघटनेमध्ये सांगोपांग चर्चा करण्यात आली. तसेच समितीच्या अहवालावर संबंधित विभागांची मतेही मागून घेण्यात आली. समितीने विकेंद्रीकरणाबाबत, विभागवार वस्तू खरेदीबाबत तसेच किंमती प्राधान्य, खरेदीसाठी आरक्षण वगैरेबाबत शिफारशी केल्या आहेत.

समितीच्या सर्व शिफारशींवर मंत्रिमंडळ पातळीवर चर्चा होऊन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत :—

शासन निर्णय

१. भांडार खरेदी संघटनेच्या कार्यपद्धती व विकेंद्रीकरणाबाबत क्र. एसपीओ-१०७७/६०९६३ (डीएसपीओ. ५७२)/उद्योग-६ दिनांक २१ फेब्रुवारी १९७८ च्या समग्र शासन निर्णयानंतरही बरेच शासन निर्णय प्रसृत करण्यात आले होते. या सर्व शासन निर्णयांचे सुसूत्रीकरण, आवश्यक तेथे बदल व एकत्रीकरण करण्याची आवश्यकता बऱ्याच काळापासून शासनाच्या विचाराधीन होती. समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगानेही काही बाबतीत बदल आवश्यक वाटल्यामुळे सुधारित आदेश या शासन निर्णयाद्वारे निर्गमित करण्यात येत आहेत.

विभागवार खरेदी

२. सध्या मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेमार्फत खरेदी करण्यात येत असलेल्या वस्तूंपैकी परिशिष्ट एकमध्ये दर्शविलेल्या एकूण ८ वस्तू या एखाद्याच विभागाला खरेदीसाठी आवश्यक असल्यामुळे त्या त्या संबंधित विभागाने, आवश्यकतेनुसार खरेदी करावयाच्या आहेत. या वस्तूंच्या पुरवठ्यासाठी मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेमार्फत दर करार/संख्या करार यापुढे करण्यात येणार नाही. परिशिष्ट एक-बीत ज्या वस्तू एकापेक्षा अधिक विभागांना खरेदी करणे आवश्यक असेल त्यासाठी संबंधित प्रशासकीय विभागांच्या सचिवांनी विचारविनिमय करून एक संयुक्त समितीमार्फत दर/संख्या करारावर खरेदीची व्यवस्था करावी.

मुद्रण व लेखनसाहित्य

३. शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय यांच्यामार्फत सध्या खरेदी होत असलेल्या वस्तूंच्या व्यतिरिक्त अतिरिक्त २८ वस्तू सूची खरेदी त्यांच्याकडे सोपविण्यात येत आहे. त्यामुळे शासन निर्णय, दिनांक २१ फेब्रुवारी १९७८ च्या सहपत्रातील परिशिष्ट "क" मधून [illegible] वस्तू वगळण्यात येत आहेत. आता मुद्रण व लेखनसामग्री संचालनालयाने आवश्यकतेनुसार या वस्तूंबाबत दर करार/संख्या करार

निश्चित करावयाचा आहे. सदर २८ वस्तूंची यादी परिशिष्ट दोनमध्ये दिलेली आहे. शासन मुद्रण व लेखनसामग्री संचालनालयाच्या लागणाऱ्या ज्या वस्तूंची खरेदी किंमत वार्षिक रु. १० लाखांपेक्षा अधिक आहे अशा वस्तूंच्या खरेदी संबंधात शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक पीपीएम. १०९०/(८९६५)/उद्योग-६, दिनांक १ सप्टेंबर १९९० अन्वये एक उच्चस्तरीय भांडार खरेदी समिती नेमण्यात आली आहे. या आदेशातील समितीच्या रचनेत अंशतः फेरफार करून आता खालील सदस्यांची भांडार खरेदी समिती या प्रयोजनार्थ नेमण्यात येत आहे :—

(१) उप सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग .. .. .. अध्यक्ष
(२) उद्योग सहसंचालक (भांडार खरेदी), उद्योग संचालनालय .. .. .. सभासद
(३) संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय .. .. .. सभासद
(४) उप संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय .. .. .. निमंत्रक

तथापि, एकूण वार्षिक खरेदी रु. १० लाखांपेक्षा कमी असणाऱ्या वस्तूंच्या खरेदीच्या बाबतीत शासन निर्णय, दिनांक २१ फेब्रुवारी १९७८ नुसार नेमण्यात आलेल्या संचालनालयांतर्गत कार्यालयीन समितीमार्फत खरेदी करण्यात यावी.

सार्वत्रिक निवडणुकीसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूंच्या खरेदीबाबत शासन निर्णय, दिनांक ५ नोव्हेंबर १९६६ तसेच ३ ऑक्टोबर १९७९ अन्वये आदेश देण्यात आले होते. आता या सर्व वस्तू सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय यांनी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे "दरपत्रके खरेदी पद्धत" अन्वये प्रमाणपत्र मिळवून तसेच शासकीय खरेदी पद्धत अवलंबून खरेदी करावयाच्या आहेत. सदर खरेदीसाठी खालीलप्रमाणे एक भांडार खरेदी समिती नेमण्यात येत आहे :—

(१) उप सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग .. .. .. अध्यक्ष
(२) उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग/उपमुख्य निवडणूक अधिकारी .. .. सभासद
(३) उद्योग सहसंचालक (भांडार खरेदी), उद्योग संचालनालय .. .. .. सभासद
(४) संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय .. .. .. सभासद
(५) उप संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय .. .. .. निमंत्रक

कारागृह विभागाकडून खरेदी

४. कारागृह विभागाकडून खरेदी करण्यासाठी काही वस्तू यापूर्वीच शासन निर्णय, क्रमांक भांखस. १०८७/३१२५०२/(२४४०)/उद्योग-६, दिनांक २६ ऑगस्ट १९८७ अन्वये आरक्षित करण्यात आल्या आहेत. या वस्तूंच्या यादीत आणखी ४ वस्तूंचा अंतर्भाव करण्यात आला आहे त्या म्हणजे—(१) स्टील फोल्डींग कॉट्स (प्लेन), (२) स्टील फोल्डींग कॉट्स (विलफोर्ड), (३) मॉस्क्युटो नेट्स व (४) वैरिंग ब्लँकेट. महानिरीक्षक, कारागृहे यांनी या वस्तूंचे मान्यताप्राप्त दर गृह विभागाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे प्रत्येक वर्षी ३१ मार्चपर्यंत ठरवून ते सर्व विभागांना माहितीसाठी पाठवावेत. कारागृह विभागाकडून वेळेवर व नियमित पुरवठा न झाल्यामुळे विभागांना वस्तू खरेदीबाबत अडचणी येऊ नयेत यासाठी ज्या वस्तूंच्या पुरवठ्याबाबत कारागृह विभाग असमर्थ असेल अशा वस्तूंची खरेदी संबंधित विभागांनी या वस्तू उत्पादन करीत असलेली राज्य शासनाची महामंडळे, शासकीय/निमशासकीय संस्था (परिशिष्ट पाचमध्ये दर्शविल्याप्रमाणे) यांचेकडून भांडार खरेदी संघटनेने ठरवून दिलेल्या दराने खरेदी करण्यास मुभा राहील.

महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळामार्फत खरेदी करावयाच्या वस्तू

५. लघुउद्योग निर्मित वस्तू खरेदी करताना राज्याच्या सर्व भागातील लघुउद्योजकांना वाव मिळावा व त्यामुळे निर्माण झालेल्या स्पर्धेतून शासनास अधिकाधिक दर्जेदार वस्तू माफक किंमतीत सर्वत्र मिळाव्यात या सार्वजनिक हिताच्या दृष्टिकोनातून लघुउद्योजकांना विक्रीसहाय्य करणाऱ्या महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाकडून खरेदी करण्यासाठी शासनाच्या विविध विभागांना लागणाऱ्या एकूण १५ वस्तूंची खरेदी यापुढे सदर महामंडळातर्फे करण्याचे शासनाने ठरविले आहे. या वस्तूंची यादी सदर निर्णयाच्या परिशिष्ट तीन येथे दर्शविली आहे. या खरेदीसाठी सध्या अस्तित्वात असलेल्या भांडार खरेदी समितीकडून दर करार निश्चित करण्यात येतील. या समितीवर महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचा प्रतिनिधी व बहुसंख्य खरेदीदार विभागांचा प्रतिनिधी यांना निमंत्रित म्हणून बोलाविण्यात यावे. या वस्तू खरेदीसाठी महामंडळाने त्यांच्याशी संलग्न तसेच इतर लघुउद्योजकांकडून निविदा मागवून उक्त समितीच्या निर्णयानुसार दर करार/चालू करार निश्चित करावयाचा आहे. यासाठी सध्या मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेकडून पाळण्यात येत असलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब महामंडळाने करावयाचा आहे. सर्व शासकीय विभाग, महामंडळे, शासकीय व निमशासकीय संस्था यांनी सदर वस्तूंची खरेदी महामंडळामार्फत करावी असे बंधन राहील.

मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेमार्फत खरेदी

६. मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेकडून यापुढे खरेदी करावयाच्या वस्तूंची यादी परिशिष्ट चारमध्ये दर्शविण्यात आलेली आहे. उद्योगाचा होणारा विकास व त्यामुळे बदलणारी शासकीय विभागांची गरज लक्षात घेता या यादीत बदल करण्याचे अधिकार सचिव (उद्योग) यांना राहतील.

**शासकीय व इतर संस्थांकडून उत्पादित वस्तूंचे दर ठरविण्यासंबंधीची कार्यपद्धती**

७. शासनाचा अंगीकृत व्यवसाय जसे, लिडकॉम, महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ तसेच इतर सहकारी संस्था तसेच अंध व अपंग यांच्या धर्मादाय संस्था, पुनर्वसन उत्पादन केंद्र, उल्हासनगर व पिंपरी आणि अशीच सार्वजनिक सेवाभावी संस्थांनी उत्पादित केलेल्या मालाची खरेदी शासनाच्या वेगवेगळ्या विभागांकडून यापूर्वी प्रसृत करण्यात आलेल्या शासन निर्णयान्वये करण्यात येते. यापुढे परिशिष्ट पाचमध्ये नमूद केल्याप्रमाणे अशा उत्पादन संस्था व त्यांच्यासमोर दर्शविलेली उत्पादने त्या त्या संस्थांकडून खरेदीसाठी राखून ठेवण्यात येत आहेत. तथापि, या सर्व वस्तूंच्या किंमतीची वेगवेगळ्या संस्थांकडून वेगवेगळ्या दराने आकारणी होत असल्यामुळे, तसेच एखाद्या संस्थेकडून वस्तूंचा वेळीच पुरवठा न झाल्यामुळे शासकीय विभागांना अडचण येऊ नये या दृष्टिकोनातून संबंधित संस्थांकडून पुरवठा करण्यात येणाऱ्या वस्तूंची किंमत ठरविण्याचे अधिकार यापुढे सध्या अस्तित्वात असलेल्या मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या सामान खरेदी समितीकडे सोपविण्यात आले आहेत. वस्तूंचे दर ठरविताना संबंधित संस्थांच्या वतीने प्रतिनिधित्व करण्यासाठी म्हणून संबंधित प्रशासकीय विभागातील उप सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यास या समितीवर निमंत्रक म्हणून बोलाविण्यात यावे. सध्या या वस्तूंच्या किंमती ठरविण्याबाबत अस्तित्वात असलेल्या विभागवार समित्या बरखास्त करण्यात येत आहेत. दर ठरविताना बाजारभाव तसेच उत्पादन खर्च यांचा सारासार विचार करण्यात यावा. या सर्व संस्थांनी वस्तूंबाबतचे दर मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेमार्फत दरवर्षी १ मे पूर्वी निश्चित करून ते सर्व विभागांना कळवायचे आहेत. तसेच ज्या वस्तूंच्या बाबतीत वस्तू पुरवठा करण्यास सदर संस्था असमर्थ असतील अशा वस्तूंची यादी मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेस त्यांनी दिनांक १ मार्च पूर्वी द्यावयाची आहे. सदर वस्तूंची यादी मिळाल्यानंतर मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेने नेहमीच्या पद्धतीचा अवलंब करून दर करार करावयाचा आहे. एखाद्या वस्तूचा पुरवठा परिच्छेद-५ तसेच परिच्छेद-७ मध्ये नमूद केलेल्या संस्था या दोहोंकडून होणार असेल तर त्या वस्तूंची किंमत सारखीच असावी याची दक्षता संबंधित खरेदी समितीने घ्यावयाची आहे.

**विभागवार वस्तू खरेदीची कार्यपद्धती**

८.१. प्रत्येक विभागाने वस्तू खरेदीसंबंधी एक खरेदी समिती स्थापन करण्याविषयी दिनांक २१ फेब्रुवारी १९७८ रोजी शासकीय आदेश प्रसृत करण्यात आले होते. काही मोजकेच विभाग वगळता अशा विभागवार समित्या स्थापन झाल्याचे दिसून येत नाही. प्रत्येक विभागाने यापुढे वस्तू खरेदी करताना त्यासाठी विभागीय खरेदी समिती स्थापन करावी व या समितीद्वारे दर करार किंवा संख्या करार करण्यात यावा. जरूर वाटल्यास या समितीवर भांडार खरेदी संघटनेच्या अधिकाऱ्यांची सभासद म्हणून नेमणूक करावी.

८.२. मध्यंतरी राज्य शासनाने नेमलेल्या लैटिन आयोगाने मध्यवर्ती भांडार खरेदी समितीच्या कार्यवाहीत सुटसुटीतपणा आणण्यासाठी काही उपयुक्त शिफारशी केल्या होत्या. या शिफारशी परिशिष्ट सहा येथे दर्शविण्यात आल्या आहेत. या शिफारशींची अंमलबजावणी मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेकडून तसेच संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री यांच्या खरेदी समितीकडून यापूर्वीच करण्यात आली आहे. सर्व विभागीय समित्यांनासुद्धा सदर शिफारशी बंधनकारक आहेत. विभागवार समित्यांनी या सर्व शिफारशींची अंमलबजावणी यापूर्वीच केली नसल्यास हा शासकीय आदेश निर्गमित होईल त्या दिनांकापासून तात्काळ करावयाची आहे.

८.३. विभागवार खरेदी करताना निविदा काढण्यापासून माल स्वीकारण्यापर्यंत घ्यावयाच्या दक्षतेविषयी सविस्तर सूचना "मॅन्युअल ऑफ ऑफिस प्रोसीजर फॉर परचेस ऑफ स्टोअर्स बाय दी गव्हर्नमेंट डिपार्टमेंट्स" मध्ये देण्यात आल्या आहेत. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, या महत्त्वाच्या तरतुदींतील खाली दिलेल्या काही महत्त्वाच्या तरतुदींचे पालन अभावानेच झाल्याचे आढळून येते :—

(अ) निविदा प्रसिद्ध झाल्यानंतर पुरवठादारांना निविदा भरण्यासाठी कमीत कमी तीन आठवड्यांचा कालावधी द्यावा, असे आदेश आहेत. तथापि बऱ्याच वेळा यापेक्षाही कमी कालावधीसाठीची निविदा प्रसिद्ध करण्यात येते.

(ब) एखाद्या निविदेतून कमी प्रतिसाद मिळाल्यास निविदा चौकशीला दोन वेळा मुदतवाढ द्यावी असे आदेश आहेत. तथापि, असे न करता उपलब्ध निविदेतूनच पुरवठादारांची निवड करण्यात येते.

(क) निविदा उघडताना त्याची पूर्वसूचना निविदाकारांना देणे व ठराविक वेळी व ठराविक ठिकाणी अशी निविदा हजर असलेल्या निविदाकारांसमोर उघडण्यात असे बंधन असले तरीही निविदाकारांना पूर्वसूचना न देणे अथवा निविदाकारांसमोर निविदा उघडण्याचे टाळणे, असे प्रकार आढळून येतात.

(ड) एकावेळी रु. ५०० पेक्षा कमी किंमतीची एकूण खरेदी असल्यास त्यासाठी कमीत कमी ३ दरपत्रके मागविण्याची गरज नसली तरीही अशी खरेदी मान्यताप्राप्त सहकारी भांडारातून करणे आवश्यक आहे. असे न करता इतर ठिकाणाहून करण्यात येते.

(इ) एकावेळची एकूण खरेदी रु. ५०० पेक्षा जास्त असेल किंवा एखाद्या विशिष्ट वस्तूची वार्षिक खरेदी ही रु. २०,००० पर्यंत असेल तर अशा वेळी कमीत कमी ३ दरपत्रके मागविणे बंधनकारक असूनसुद्धा अशी दरपत्रके न मागविता खरेदी केली जाते.

(फ) एका विशिष्ट वस्तूची एकूण वार्षिक खरेदी रु. २०,००० किंवा त्यापेक्षा अधिक असेल तर अशा वेळी वर्तमानपत्रात निविदा चौकशी प्रसिद्ध करून निविदा मागविणे बंधनकारक आहे. तथापि, अशी जाहिरात न देता खरेदी झाल्याचे प्रकार आढळून येतात.

(ब) तसेच निविदा प्रपत्रकाचे मूल्य आकारणीसंबंधी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने शासन निर्णय, क्रमांक खोपस. १०८८/(२५००)/उद्योग-६, दिनांक २ जून १९९० मध्ये कोऱ्या निविदा प्रपत्राच्या सुधारित किमती ठरविण्यात आल्या आहेत त्या खालीलप्रमाणे आहेत :—

| अनुक्रमांक | खरेदी करावयाच्या साहित्याची अंदाजे किमत (रुपये) | कोऱ्या निविदेची किमत (रुपये) |
|---|---|---|
| १ | ५०,००० पर्यंत | १० |
| २ | ५०,००० ते १,००,००० | २५ |
| ३ | १ लाख ते २ लाख | ५० |
| ४ | २ लाख ते ५ लाख | १५० |
| ५ | ५ लाख ते १० लाख | २५० |
| ६ | १० लाखापेक्षा अधिक | ३०० |

तथापि, विविध विभागांच्या खरेदी अधिकाऱ्यांकडून अजूनही जुन्याच किमतीत कोऱ्या निविदा पत्रकांची विक्री केली जाते असे आढळून आले आहे.

(ड) पुनर्आदेशाबाबत (रिपीट ऑर्डर) मार्गदर्शक तत्वे विहित केली असूनसुद्धा त्यांचे पालन अपवादानेच होत असल्याचे आढळून येते. आता पूर्वीच्या पुनर्आदेशाबाबतच्या अंशतः बदल करून सुधारित मार्गदर्शक तत्वे परिशिष्ट आठमध्ये दर्शविली आहेत. यापुढे पुनर्आदेश देताना सदर परिशिष्टात दिलेल्या अटींचे काटेकोर पालन खरेदी अधिकाऱ्यांनी/समितीने करावे.

(इ) वर्षभर आवश्यकतेनुसार वस्तू खरेदीसाठी संस्था करारापेक्षा दर करार करणे अधिक श्रेयस्कर ठरते, तथापि त्यासाठी दर करार न करता संस्था करार केल्याचे आढळून आले आहे.

वरील यादी सर्वंकष नसून केवळ उदाहरण म्हणून देण्यात आली आहे.

८४. शासन परिपत्रक, दिनांक १४ ऑक्टोबर १९८६ अन्वये भारतीय मानक संस्थेने ( Bureau of Indian Standards ) चिन्हांकित केलेल्या वस्तू खरेदी करण्याविषयी आदेश देण्यात आले आहेत. असे असून सुद्धा काही वेळा विभागाकडून अचिन्हांकित वस्तूंची खरेदी होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. शासनास दर्जेदार मालाचा पुरवठा अधिकाधिक प्रमाणात व्हावा म्हणून भारतीय मानक संस्थेने चिन्हांकित केलेल्या वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या लघु उद्योजकांना आता ५ टक्के पर्यंतचे अधिकचे किमती प्राधान्य देण्यात येत आहे. त्यामुळे यापुढे भारतीय मानक संस्थेने (B I S) चिन्हांकित केलेल्या वस्तूंचीच खरेदी करण्यात यावी. क्वचित प्रसंगी भारतीय मानक संस्थेने प्रमाणित केलेली मानके अस्तित्वात नसतील अथवा भारतीय मानक संस्थेकडून मानके ठरविली असूनही पुरेसे पुरवठादार उपलब्ध नसतील अशा वेळी चिन्हांकित नसलेल्या वस्तूंची खरेदी करण्यास हरकत नाही. तथापि अशी खरेदी करण्यापूर्वी संबंधित विभागाने उद्योग संचालनालयातील भांडार खरेदी संघटनेकडून मानके ठरविली नसल्याबद्दल, लेखी आदेश प्राप्त करून घेणे बंधनकारक राहील. चिन्हांकित नसलेल्या वस्तूंची खरेदी करताना खरेदीदार विभाग स्वतःच एखाद्या वस्तूच्या दर्जाविषयी तपासणी करू शकत नसेल अशा वेळी मालाच्या दर्जाविषयी त्रयस्थ संस्थांकडून (उदा एस.आय.एल.आय., अंधेरी/यू.डी.सी.टी., माटुंगा/व्ही.जे.टी.आय. प्रयोगशाळा इत्यादी, अशा सर्व मान्यताप्राप्त संस्थांची यादी परिशिष्ट आठ येथे दर्शविण्यात आली आहे.) चाचणी प्रमाणपत्रे, पूर्वतपासणी, पुरवठापूर्व तपासणी करून घेणे बंधनकारक राहील. याकरिता निविदा काढताना वस्तूंची तपासणी ज्या संस्थेद्वारे करावयाची आहे त्या त्रयस्थ संस्थेचे नाव, तपासणी खर्च यांचा उल्लेख संबंधित खरेदी अधिकाऱ्याने करावा तसेच तपासणी खर्च पुरवठादारांकडून वसूल करावा. अतिमहत्वाच्या व मौल्यवान वस्तूंसाठी १०० टक्के तपासण्या त्रयस्थ संस्थांकडून करण्यात याव्यात. जेथे भारतीय मानक संस्था चिन्हांकित वस्तू खरेदी करण्याचा निर्णय झाला असेल तेथे त्रयस्थ संस्थांकडून तपासणी करण्याची आवश्यकता नाही. परंतु वस्तू स्वीकारताना उपभोक्त्याने तपशीलवार तपासणी करणे आवश्यक राहील. तथापि, वरीलप्रमाणे भारतीय मानक संस्था चिन्हांकित वस्तू खरेदी करीत असतानाही त्रयस्थ संस्थांकडून तपासणी करण्याबाबत विभागाचा आग्रह असेल तर तपासणी खर्च संबंधित विभागाकडून करावा लागेल.

दोन लिफाफे (टू बीड) पद्धती

८५. चिन्हांकित नसलेल्या तथापि, तांत्रिकदृष्ट्या प्रकृष्ट वस्तूंची खरेदी करताना सध्या सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच पाटबंधारे विभाग यांचेकडे अंमलात असलेली निविदेची दोन लिफाफे पद्धत अवलंब करणे श्रेयस्कर व्हावे. सध्या सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच पाटबंधारे विभाग यांच्या कामाच्या बाबतीत ही पद्धत सरसकट अवलंबिली जात आहे. कागद खरेदीच्या बाबतीतसुद्धा शासकीय मुद्रण व लेखनसामग्री यांनी या पद्धतीचा अवलंब सुरू केला आहे. या पद्धतीत निविदा दोन वेगवेगळ्या लिफाफ्यांत देण्यात येते. पहिल्या लिफाफ्यात,—

(अ) कोषागार चलान तसेच अनामत रकमेचा ड्राफ्ट अथवा अनामत रक्कम भरण्यातून सूट दर्शविणारे प्रमाणपत्र तसेच [illegible] विभागाकडे नोंदणी झाल्याचे नोंदणीपत्र

(ब) उद्योग घटकाकडे प्रस्तुत पुरवठा पूर्ण करण्यासाठी उपलब्ध असणारी यंत्रसामुग्री बद्दलची माहिती तसेच आवश्यक असल्यास नवीन घेण्यात येणारी यंत्रसामुग्री संबंधीची माहिती.

(क) पूर्वानुभवाबद्दलची तपशीलवार माहिती व विक्रीकरासंबंधीचा नोंदणी क्रमांक (असल्यास).

(ड) अशा प्रकारच्या निविदेत इतर ठिकाणी भाग घेतला असल्यास त्यासंबंधीची तपशीलवार माहिती.

(इ) निविदेच्या अंतिम तारखेपर्यंत ग्राह्य असलेले आयकर भरल्यासंबंधीचे प्रमाणपत्र.

वरील माहिती देण्यात येते. या लिफाफ्याला "तांत्रिक निविदेचा लिफाफा" असे संबोधण्यात येते. दुसऱ्या लिफाफ्यात फक्त मुख्य निविदा व त्यामध्ये घातलेल्या अटी व शर्ती यांचाच समावेश करण्यात येतो. हे दोन्ही लिफाफे त्यानंतर प्रत्येक लिफाफ्यावर लिफाफा क्रमांक १ व लिफाफा क्रमांक २ असे ठळक अक्षरात दर्शवून एकाच पाकिटात हे दोन्ही लिफाफे बंद करण्यात येतात. त्यावर निविदेविषयीची माहिती निविदाकाराचे नाव, इतर मजकूर स्पष्ट करण्यात येतो. पूर्वनियोजित तारखेला निविदेचा लिफाफा खोलताना प्रथम लिफाफा क्रमांक १ खोलून त्यामध्ये आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केली आहे किंवा कसे याची खातरजमा करण्यात येते व अशी पूर्तता केली नाही अशी खरेदी अधिकाऱ्याची खात्री झाली असल्यास लिफाफा क्रमांक २ उघडण्यात येत नाही व निविदाकाराची निविदा रद्द समजण्यात येते पहिल्या लिफाफ्याची पूर्तता झाली असल्यास, मग दुसऱ्या लिफाफ्याबद्दल विचार करण्यात येऊन त्याविषयी दर ठरविण्याबाबत विचार करण्यात येतो. खरेदी अधिकाऱ्याने वरील पद्धतीचा अवलंब करताना अधिक तपशीलासाठी शासन परिपत्रक, पाटबंधारे विभाग, दिनांक ३० ऑक्टोबर १९८७ मधील कार्यप्रणालीचा अवलंब करावा.

**माल स्वीकारताना घ्यावयाची दक्षता**

८६. (अ) पुरवठ्याच्या ठिकाणी माल पोहोचताच मालाचे त्वरित निरीक्षण केले जाणे आवश्यक आहे.

(ब) या निरीक्षणात मालामध्ये आढळलेल्या उणिवा/त्रुटी/दोष तात्काळ पुरवठादारांच्या व खरेदी संघटनेच्या/खरेदी समितीच्या निदर्शनास आणाव्यात. ही कार्यवाही वस्तू पुरवठ्याच्या तारखेपासून १५ दिवसात करण्यात यावी.

(क) माल पाठविण्याची रेल्वेची पावती (आरआर) किंवा निरीक्षणाची अट असल्यास निरीक्षण पत्र (Inspection Note) मिळाल्याखेरीज ९० टक्के रक्कम अदा करण्यात येऊ नये किंवा रक्कम प्रदान उपवाक्य (Payment clause) नुसार अटींची पूर्तता झाल्याखेरीज रक्कम प्रदान करू नये.

(ड) उरलेली रक्कम मालाची तपशीलवार तपासणी केल्याशिवाय व माल विनिर्देशाप्रमाणे आहे याची खात्री करून घेतल्याशिवाय प्रदान करू नये.

**कोषागारात सादर करावयाचा दाखला**

८७. कोषागार नियमानुसार सामानाच्या खरेदीसाठी दिलेल्या रकमेचा पुरावा म्हणून खालीलप्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे :—

(अ) प्रमाणकांत वर्णिलेल्या वस्तू प्रत्यक्षात मिळाल्या आहेत.

(ब) मालाचे प्रमाण विनिर्देशानुसार असून माल चांगल्या प्रतीचा आहे.

(क) दिलेले दर हे स्वीकृत दरापेक्षा जास्त नाहीत.

(ड) सामान नोंदवहीत मालाची नोंदणी झाली आहे आणि त्यासाठी यापूर्वी कोणतीही रक्कम दिलेली नाही.

**समांतर दर-कराराचे तत्त्व**

९. मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेमार्फत निविदेद्वारे आलेल्या कमीत कमी दराने महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाशी ५० टक्केपर्यंत वस्तू पुरवठ्याचा समांतर दर-करार करण्याचे आदेश शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक एसपीओ. १०८४/२९६२१/(२१९२)/उद्योग-६, दिनांक २१ ऑगस्ट १९८४ अनुसार निर्गमित केले आहेत. परिशिष्ट तीनमध्ये नमूद केलेल्या १५ वस्तू या महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाकडूनच खरेदी करण्याचे ठरविले असल्यामुळे या वस्तूंच्या बाबतीत समांतर दर-करार करता येणार नाही. यापुढे मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेकडून खरेदी करावयाच्या (परिशिष्ट चार) वस्तूंच्या बाबतीत समांतर दर-कराराचे तत्त्व हे महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ तसेच महिला आर्थिक विकास महामंडळ या दोन्ही महामंडळांसाठी खालील अटींवर यापुढे अंगीकारावयाचे आहे :—

(अ) सदर महामंडळांनी नोंदणीकृत लघुउद्योजकांच्या वतीने प्रत्यक्ष निविदा भरून खरेदीत भाग घेतलेला असावा. तसेच निविदेतील वस्तूंच्या वर्णनातील दर्जाप्रमाणे आणि निविदेप्रमाणे आलेल्या कमीत कमी मान्य किंमतीत वस्तू पुरवठ्याची तयारी दर्शविली असली पाहिजे.

(ब) सदर महामंडळांनी वस्तू पुरवठ्याची तयारी दर्शविली तर एकूण मागणीपैकी ५० टक्क्यांची मागणी महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ किंवा महिला आर्थिक विकास महामंडळाकडे नोंदविण्यात यावी.

(ठ) महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळ या दोन्ही संस्थांनी जर एकाच वेळी पुरवठ्याची तयारी दर्शविली असेल [तर महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाकडे महिला उद्योजकांचीसुद्धा नोंदणी होत असल्याने ५० टक्के पैकी ७० टक्के मागणी महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाला व उरलेली] ३० टक्के मागणी महिला आर्थिक विकास महामंडळाला देण्यात यावी.

(ड) ज्या अटी व शर्तीवर दर-करार करण्यात आला असेल त्या सर्व अटी व शर्ती इतर पुरवठादारांप्रमाणेच महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळ यांचेवर बंधनकारक राहतील.

(ढ) महामंडळाची निविदा जर सर्वात कमी दराची असेल व ती मान्य झाली असेल तर मात्र १०० टक्के पुरवठा महामंडळाकडून घेण्यात यावा.

(ण) महिला आर्थिक विकास महामंडळाने, महिला उत्पादक लघुउद्योजकांचे तर महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाने उत्पादक लघुउद्योजकांचे नोंदणीकरण करून अशा नोंदणी झालेल्या उत्पादक लघुउद्योजकांमार्फतच निविदा भरल्या पाहिजेत आणि ज्या उत्पादक लघुउद्योजकांमार्फत अशा निविदा भरल्या जातील त्यांची नावे व त्या लघुउद्योगांच्या नोंदणीपत्रकाची प्रत निविदेबरोबर जोडणे महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळ यांचेवर बंधनकारक राहील.

(त) ज्या वेळी राज्याबाहेरील पुरवठादारांनी व राज्यातील पुरवठादारांनी निविदेमध्ये एकत्र भाग घेतला असेल अशा वेळी परिशिष्ट मध्ये दर्शविल्याप्रमाणे सूत्र वापरून प्रथम किंमतीतील साम्य ठरविण्यात यावे. त्यानंतर जर एखाद्या निविदेत राज्याबाहेरील पुरवठादाराचा दर हा कमीत कमी मान्यताप्राप्त दर ठरला असेल तर अशा वेळी राज्यातील उद्योजकाला संधी मिळावी या दृष्टिकोनातून जर राज्यातील उद्योजक कमीत कमी मान्यताप्राप्त दराने समान दर्जाचा माल पुरवठा करण्यास तयार असतील तर अशा राज्यातील उद्योजकांपैकी ज्या उद्योजकांनी कमीत कमी दराची निविदा भरली असेल अशा उद्योजकांस एकूण मागणीच्या ५० टक्केपर्यंत मागणी (जरूर पडल्यास विभागून) कमीत कमी मान्यताप्राप्त दराने देण्यात यावी. मात्र जर राज्यातील उद्योजक सदर मागणी स्वीकारण्यास तयार नसतील तर राज्याबाहेरील पुरवठादारास संपूर्ण मागणी देण्यात यावी. मागणी विभागून देण्याचे सर्वाधिकार संबंधित सामान खरेदी समितीस राहतील.

लघुउद्योजकांना खरेदी व किंमती प्राधान्य

१०.१. राज्य शासनाच्या उद्योगांच्या विकेंद्रीकरणाच्या धोरणामुळे मुंबई, पुणे व्यतिरिक्त इतर भागातही उद्योगांचे जाळे पसरण्यास मदत झाली आहे. नवनवीन उद्योजक मुख्यत्वेकरून पहिल्या पिढीतील उद्योजक (फर्स्ट जनरेशन) पुढे येत आहेत. त्यामुळे अत्यावश्यक असलेला असा रोजगार उपलब्ध होत आहे. तथापि, अशा उद्योजकांना आपण तयार करीत असलेल्या मालाच्या विक्रीबाबत मध्यम व मोठ्या उद्योजकांशी स्पर्धा करणे सुरुवातीला कठीण असते. यासाठी अशा उद्योजकांना विक्रीसहाय्य देण्यासाठी महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. लघुउद्योगांना त्यांचा उद्योग सुरू झाल्यापासून पहिल्या काही वर्षात विक्रीसहाय्य देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी उद्युक्त करण्याचे शासनाचे धोरण असल्यामुळे अशा उद्योगांना पहिल्या काही वर्षात खरेदी प्राधान्याबरोबरच किंमती प्राधान्य देण्याचे धोरण शासनाने यापूर्वीच दिनांक १५ मार्च १९६९ च्या शासन निर्णयात स्पष्ट केले आहे. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, हे आदेश सर्व शासकीय विभाग तसेच महामंडळे यांना लागू करण्यात आले असूनसुद्धा त्यांची अंमलबजावणी नीटपणे होत नाही. काही उपक्रम केवळ निविदांचे मूल्यमापन करण्यापुरतेच किंमती प्राधान्याचे तत्त्व लक्षात घेतात व प्रत्यक्ष दर ठरविताना किंमती प्राधान्याच्या तत्त्वांचा अंगीकार करीत नाहीत. या दृष्टिकोनातून लघुउद्योगांना मध्यम, मोठे उद्योग व व्यापारी यांच्या तुलनेत खरेदी व किंमती प्राधान्य देण्याचे तत्त्व यापुढेही अंगीकारण्याचे शासनाचे धोरण राहील. तथापि लघुउद्योगांनी या सवलतीचा फायदा घेताना अधिकाधिक दर्जेदार मालाचे उत्पादन करावे तसेच शासनाला दर्जेदार व प्रमाणित मालाचा नियमित पुरवठा व्हावा या दृष्टिकोनातून भारतीय मानक संस्थेने प्रमाणित केलेल्या वस्तूंची खरेदी करण्यात यावी, असे शासनाचे धोरण यापुढे राहणार असल्याने त्या अनुषंगाने भारतीय मानक संस्थेने प्रमाणित केलेल्या वस्तूंची निर्मिती करणाऱ्या लघुउद्योगांना सदर मानकपत्र मिळविण्यासाठी आवश्यक असलेली तांत्रिक सेवा, प्रयोगशाळा, रसायन शाळा या व इतर बाबतीत येणारा खर्च विचारात घेता यापुढे ५ टक्केपर्यंतचे अधिकचे किंमती प्राधान्य देण्याचे शासनाने ठरविले आहे. त्यामुळे यापुढे लघुउद्योगांना या पूर्वी देय असलेल्या सरसकट १५ टक्केऐवजी १० टक्केपर्यंतच किंमती प्राधान्य परिशिष्ट १० (दहा) मध्ये नमूद केलेल्या तरतुदींना अधीन राहून देय राहील. त्याचप्रमाणे भारतीय मानक संस्थेने प्रमाणित केलेल्या वस्तूंची निर्मिती करणाऱ्या लघुउद्योगांना यापुढे १५ टक्केपर्यंतचे किंमती प्राधान्य परिशिष्ट १० (दहा) मध्ये नमूद केलेल्या तरतुदींना अधीन राहून देण्यात यावयाचे आहे.

१०.२. नवनवीन लघुउद्योगांना विक्रीसहाय्य पुरेसा प्रमाणात उपलब्ध व्हावे या वर नमूद केलेल्या शासनाच्या धोरणाप्रमाणे सदर किंमती प्राधान्य लघुउद्योगांना कायम स्वरूपी न देता ते सध्या अस्तित्वात असलेल्या लघुउद्योगांसाठी दिनांक ३१ मार्च १९९५ पर्यंत देय राहील. तर नवीन उत्पादनात येणाऱ्या लघुउद्योजकांना त्यांना देण्यात आलेल्या कायमस्वरूपी प्रमाणपत्रावर उत्पादनात गेल्याचा जो दिनांक नोंदविला असेल त्या दिनांकापासून पुढे ५ (पाच) वर्षाच्या कालावधीपर्यंत सदर किंमती प्राधान्य सीमित राहील. असे किंमती प्राधान्य

देताना लघुउद्योग प्रत्यक्ष उत्पादन करीत असेल व कायम स्वरूपी लघुउद्योग प्रमाणपत्रात त्या उत्पादनाची नोंद असेल अशा लघुउद्योगा-साठीच किमती प्राधान्य देय आहे. तसेच हा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी उघडण्यात येणाऱ्या सर्व निविदांत किमती प्राधान्य मिळण्यास संदर लघुउद्योग पात्र समजला जाईल.

१०.३. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळ यांनी लघुउद्योगांना व्यावसायिक मिळवून देण्याच्या दृष्टीने निविदा भरल्या असतील व वरील परिच्छेद १०.२ मधील अटीस पात्र असतील तर त्यांना किमती प्राधान्य देण्यात यावे. तथापि, ज्या लघुउद्योगांतर्फे अशा निविदा भरल्या असतील अशा लघुउद्योगांना त्यांनी वेगळी निविदा भरली असल्यास वेगळे किमती प्राधान्य देता येणार नाही. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ व महिला आर्थिक विकास महामंडळ यांनी नवनवीन लघुउद्योगांना विक्रीसहाय्य पुरेशा प्रमाणात उपलब्ध होईल यादृष्टीने प्रयत्नशील रहाणे आवश्यक आहे. महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ यांच्यामार्फत सुद्धा खादी व ग्रामोद्योग वस्तूंच्या उत्पादन घटकांना विक्रीसहाय्य पुरविण्यात येते. असे घटक व महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ यांनाही जर ते १०.२ मधील अटी पूर्ण करीत असतील तर किमती प्राधान्य देय राहील.

१०.४. खरेदी व किमती प्राधान्य देताना अंगिकारावयाची तत्वे परिशिष्ट बहामध्ये स्पष्ट केली आहेत. सर्व शासकीय विभाग, महामंडळे तसेच शासकीय व निमशासकीय संस्था यांनी वस्तू खरेदी करताना परिशिष्ट बहामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे लघुउद्योगांना खरेदी व किमती प्राधान्य द्यावयाचे आहे.

राज्य सहकारी औद्योगिक संघटनांमार्फत खरेदी करताना अधिकचे १० टक्केपर्यंतचे किमती प्राधान्य

१०.५. दिनांक ९ ऑगस्ट १९७७ च्या आदेशान्वये १५ टक्केपर्यंतचे किमती प्राधान्याशिवाय अधिकचे १० टक्केपर्यंतचे किमती प्राधान्य खालील संस्थांना देण्यात आले होते :—

(अ) उद्योग संचालनालयाकडे नोंदणीकृत असलेल्या सहकारी औद्योगिक संस्था,

(ब) शासकीय मदत मिळत असलेल्या अंध व अपंग व्यक्तींसाठी चालविल्या जाणाऱ्या संस्था आणि,

(क) स्त्री सेवा सहकारी संघ मर्यादित, मुंबई.

तथापि या आदेशामुळे लघुउद्योजकांना देण्यात येणाऱ्या किमती प्राधान्यामध्ये भेदभाव होत असल्यामुळे व दर-करार करताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत असल्यामुळे वरील संस्थांना लघुउद्योजक म्हणून पात्र असतील व परिच्छेद १०.२ मधील अटी पूर्ण करीत असतील तरच परिशिष्ट दहामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे लघुउद्योजकांना जे किमती प्राधान्य देय राहील त्याप्रमाणे किमती प्राधान्य देण्यात यावे.

लघुउद्योजकांसाठी वस्तु पुरवठ्याचे आरक्षण

१०.६. शासनाने दिनांक ३० एप्रिल १९८६ च्या आदेशान्वये यापूर्वी एकूण १२१ वस्तू लघुउद्योगांकडून खरेदी करण्यासाठी आरक्षित ठेवल्या होत्या. मध्यंतरीच्या काळात झालेल्या तांत्रिक प्रगतीमुळे व केंद्र शासनाच्या धोरणामुळे अधिकाधिक वस्तूंचे उत्पादन आता लघुउद्योजकांकडून केले जात आहे हे लक्षात घेता, तसेच केंद्र शासनाचे व जवळच्या राज्यांचे याबाबतीचे धोरण विचारात घेता सध्याच्या यादीत आणखी १२० वस्तूंचा समावेश करण्यात येत आहे. या सर्व वस्तू लघुउद्योजकांकडून खरेदी करण्यासाठी आरक्षित समजल्या जातील. या सर्व वस्तूंची यादी परिशिष्ट अकरामध्ये देण्यात आली आहे.

१०.७. विकास आयुक्त (उद्योग) व भांडार खरेदी अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या मान्यवर पुरवठादारांच्या यादीत नोंदणी करताना लघुउद्योगांना काही विशेष सवलती प्रदान करण्यात आल्या आहेत. या सवलती तसेच पुरवठादारांची नोंदणी, बयाणा रक्कम व अनामत रक्कम व त्यांचा परतावा याबाबतची घ्यावयाच्या विशेष दक्षताविषयीच्या सूचना परिशिष्ट बारामध्ये दर्शविण्यात आल्या आहेत.

१०.८. वस्तू खरेदीसाठी निविदा मागविताना प्रसिद्धी माध्यमांचा अधिकाधिक वापर करणे योग्य ठरते. अशा वेळी केवळ पत्र-व्यवहाराद्वारेच निविदेला प्रसिद्धी न देता स्थानिक पातळीवरील, राज्य पातळीवरील व राष्ट्रीय पातळीवरील, वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणे अधिक श्रेयस्कर ठरते. अशा प्रसिद्धीद्वारे स्पर्धात्मक दरपत्रके प्राप्त होतात व त्यातून दर्जेदार तसेच वाजवी दराने वस्तू खरेदीची संधी उपलब्ध होते. अशा वेळी जाहिरातीचा खर्च कोण्या निविदाधारकाच्या किमतीतून काही प्रमाणात वसूल करता येणे सहज शक्य आहे. विभागवार खरेदी समितीने खरेदीसंबंधीची निविदा काढताना याविषयी योग्य ती काळजी घ्यावयाची आहे. आता दर-कराराचा कालावधी हा सर्व वस्तूंच्या खरेदीबाबत १ जुलै ते ३० जून असा ठरविण्यात आल्यामुळे एकाच वेळी वस्तू खरेदीची जाहिरात देणे सहज शक्य आहे. मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री व महाराष्ट्र लघुउद्योग विकास महा-मंडळ तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग यांचेमार्फत खरेदी करावयाच्या वस्तूंबाबत राजपत्राव्यतिरिक्त राज्य व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमानपत्रात जाहिरात देणे बंधनकारक राहील.

सर्वसमावेशित दर

११.१. शासनास असे आढळून आले आहे की, दरकराराबाबत निविदा मागविताना दराचे बाबतीत वेगवेगळ्या प्रकारच्या निविदा मागविण्यात येतात. असे काही बाबतीत मूळ दर वेगळे दर्शवून इतर खर्च वेगळे दर्शविणारे दर मागण्यात येतात. तर काही ठिकाणी सर्वसमावेशित एकच दर मागविण्याचे प्रचलन आहेत. वाहतूक खर्चाच्या बाबतीतही कधी वाहतूक खर्च अंतर्भूत असलेला दर (एफ.ओ.आर.

डेस्टिनेशन) दर फक्त वाहतूक खर्च वेगळा दर्शविणारे दर अशी विसंगती आढळून येते. शासनाच असेही आढळून आले आहे की, वेगवेगळ्या वस्तू खरेदीसाठी सध्या दर कराराचा अवधी अस्तित्वात असताना राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या अर्थसंकल्पामुळे कर आकारणीत बदल झाल्यामुळे अथवा अन्य कारणामुळे किमतीवाढ (प्राईस एस्कलेशन) देण्याबाबतची प्रकरणे खरेदी समितीकडे अथवा शासनाकडे प्राप्त होतात. या सर्व अडचणींचा विचार करुन यापुढे मूळ दर, केंद्र व राज्य शासनाचे विविध कर आणि इतर खर्च या सर्वांचा समावेश असलेला एकच सर्वसमाविष्टित दर निविदेद्वारे मागविण्यात यावा, असे शासनाने ठरविले आहे. तसेच वाहतूक खर्चाबाबत सध्या असलेली विसंगती टाळण्यासाठी व सर्वसमाविष्टित दरात वाहतूक खर्चाचाही समावेश असावा या दृष्टिकोनातून यापुढे सर्व दर/करारांच्या बाबतीत वाहतूक खर्च अंतर्भूत असलेला दर (एफ.ओ.आर. डेस्टिनेशन) म्हणूनच निविदा मागवायाच्या आहेत. मा. बऱ्याच निविदांच्या बाबतीत राज्याबाहेरील पुरवठादारांनी भाग घेतल्यामुळे परिच्छेद ९ (ग) येथे नमूद केल्याप्रमाणे तुलनात्मक दर ठरविण्यास अडचण येऊ नये म्हणून राज्य शासनाच्या विक्रीकराच्या बाबतीत मात्र राज्य शासनाचा व केंद्र शासनाचा विक्रीकर (एम.एस.टी. आणि सी.एस.टी.) यांचा दर वेगळा दर्शविण्यात यावयाचा आहे. तसेच यापुढे सर्व (दरकराराचा) कालावधी हा १ जुलै ते ३० जून असा ठरविण्यात यावयाचा आहे, म्हणजे दरकरार व संख्याकरार करण्यापूर्वी केंद्र शासन व राज्य शासनाचे अर्थसंकल्प जाहीर झाले असल्यामुळे कराच्याबाबतीत पूर्वकल्पना सर्व पुरवठादारांना असेल. त्यामुळे यापुढे कराच्या व इतर खर्चाच्या (सांविधिक मूल्यवाढ धरुन) वाढीमुळे अशी वाढ किमती-वाढ मिळण्यास यापुढे पात्र ठरणार नाही. व कुठल्याही दर/कराराच्या बाबतीत अशी किमतीवाढ यापुढे देय ठरणार नाही.

११.२. वर परिच्छेद ११.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्वसमाविष्टित एकच दर निविदेद्वारे मागविण्यात येणार असल्यामुळे यापुढे लघुउद्योगांना मूळ किमतीवर किमती प्राधान्य देण्याविषयी अडचण निर्माण होऊ शकते. त्यामुळे शासनाने असे ठरविले आहे की, निविदा-द्वारे मागविण्यात येणाऱ्या सर्वसमाविष्टित दरातील इतर खर्चाचा भाग वगळून राहिलेल्या खर्चावर किमत प्राधान्य देणे तर्कसंगत ठरत असल्यामुळे यापुढे सर्व निविदांच्या बाबतीत सर्वसमाविष्टित दरापैकी २० टक्के भाग हा इतर खर्चाचा आहे असे सरसकट गृहित धरुन राहिलेल्या ८० टक्क्यांवरच किमती प्राधान्य लघुउद्योगांना द्यावयाचे आहे. असे करताना परिच्छेद १०.२ मधील तसेच परिशिष्ट क्र. १० यातील तरतुदीनुसार किमती प्राधान्य द्यावयाच्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करावयाची आहे.

११.३. भांडार खरेदी संघटना; मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय तसेच इतर विभागीय खरेदी अधिकारी यांनी वरील ११.१ व ११.२ मध्ये दर्शविलेल्या निर्णयामुळे होणाऱ्या बदलाची नोंद घ्यावी व त्यानुसार राजपत्र, भाग दोन पुरवणी, स्वीकृती पत्र, निविदा स्वीकृती व दर-करार यांचे विहित नमुन्यात दुरुस्ती करावी.

**विकसनशील भागातील सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत पात्र ठरणाऱ्या उद्योगकांना खरेदी प्राधान्य**

१२. १९७७ च्या सामूहिक प्रोत्साहन योजनेसंबंधीच्या शासन निर्णयात शासकीय खरेदीत विकसनशील भागातील (मुंबई, ठाणे पुणे, पिंपरी-चिंचवड व तत्सम वगळता) उद्योजकांना वाव मिळावा या दृष्टिकोनातून एकूण खरेदीच्या ठराविक ३३ टक्के पर्यंतची खरेदी अशा उद्योजकांकडून करावी असे शासकीय धोरण सुस्पष्ट करण्यात आले होते. सदर धोरणाचा त्यानंतर जाहीर झालेल्या प्रत्येक सामूहिक प्रोत्साहन योजनेत अंतर्भाव करण्यात आला होता. सध्या अस्तित्वात असलेल्या १९८८ च्या सामूहिक प्रोत्साहन योजनेतसुद्धा वरील तत्त्वाचा अंतर्भाव करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने विकसनशील भागातील ज्या उद्योजकांकडे सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत दिले गेलेले प्राप्त पात्रता-प्रमाणपत्र असेल अशा उद्योजकांकडून जर त्यांनी निविदेत भाग घेतला असेल व निविदेत दिलेल्या कमीत कमी दराने व समान दर्जाच्या वस्तू पुरवठ्याची तयारी दर्शविली असेल तर सर्व शासकीय विभाग, महामंडळे तसेच शासकीय व निमशासकीय संस्था यांनी अशा उद्योजकांकडून एकूण खरेदीच्या ३३ टक्के खरेदी करावयाची आहे. आवश्यकता पडल्यास सदर ३३ टक्के मागणी ही अशा पात्र उद्योग घटकांना विभागून द्यावयाची आहे. १९८८ च्या सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत सदर सवलती या "ब" विभागांतर्गत ३ वर्षांसाठी "क" विभागांतर्गत ५ वर्षांसाठी "ड" विभागांतर्गत ७ वर्षे तर पायोनियर युनिटसाठी ९ वर्षांसाठी, उत्पादनाला सुरुवात झाल्याच्या तारखेपासून देय असतील. १९८८ प्रोत्साहन योजनेतील संबंधित उतारा सोबत परिशिष्ट तेरा येथे जोडला आहे.

१३. वस्तू खरेदीच्याबाबत खरेदी अधिकाऱ्यांना निविदा, निम्नदर, किमती प्राधान्य, समांतर दर करार या व इतर आनुषंगिक बाबींसंबंधी सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने काही अडचणी असल्यास त्यांनी विकास आयुक्त (उद्योग) यांचेकडे संपर्क करावयाचा आहे व याबाबत विकास आयुक्त (उद्योग) यांनी दिलेले निर्देश हे त्या शासकीय विभागांनी तसेच महामंडळे, शासकीय व निमशासकीय संस्था यांनी पाळावयाचे आहेत.

१४. प्रस्तुत शासन निर्णयामुळे यापूर्वी निर्गमित केलेल्या आदेशांपैकी जे आदेश निष्प्रभ ठरतात अशा आदेशांची यादी परिशिष्ट चौदामध्ये दर्शविण्यात आली आहे. तसेच या आदेशामुळे पूर्वी निर्गमित झालेल्या आदेशामध्ये सुधारणा होत असल्यास, सदर शासन निर्णयातील तरतुदी अंतिम समजाव्यात. निर्गमित केल्याच्या दिनांकापासून सदर आदेश अंमलात येतील.

१५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनुमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक सीआर. ९३५/९१/व्यय-१६, दिनांक ३ डिसेंबर १९९१ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

एस. राममूर्ती,
शासनाचे मुख्य सचिव.

शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखरी.१०८८/(२५१२)/उद्योग-६, दिनांक २ जानेवारी १९९२

सोबत जोडलेल्या परिशिष्टांची यादी

| | | |
|---|---|---|
| परिशिष्ट १ | .. | संबंधित विभागांनी खरेदी करावयाच्या वस्तू. |
| परिशिष्ट २ | .. | शासन मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय यांचेकडून खरेदी करण्यासाठी राखून ठेवण्यात आलेल्या वस्तूंची यादी. |
| परिशिष्ट ३ | .. | महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळामार्फत खरेदी करण्यासाठी राखून ठेवलेल्या वस्तूंची यादी. |
| परिशिष्ट ४ | .. | मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेमार्फत खरेदी करावयाच्या वस्तूंची यादी. |
| परिशिष्ट ५ | .. | शासनाचे अंगीकृत व्यवसाय, सहकारी संस्था, अंध व अपंग यांच्या धर्मादाय संस्था व इतर संस्था यांचेकडून खरेदी करावयाच्या वस्तूंची यादी. |
| परिशिष्ट ६ | .. | लेंटिन आयोगाच्या शिफारशी. |
| परिशिष्ट ७ | .. | पुनर्मागणी आदेशाबाबत मार्गदर्शक तत्वे. |
| परिशिष्ट ८ | .. | दर्जाविषयी तपासणी करणाऱ्या मान्यताप्राप्त संस्थांची यादी. |
| परिशिष्ट ९ | .. | राज्याबाहेरील व राज्यातील पुरवठादारांच्या किंमतीतील साम्य ठरविण्याचे सूत्र. |
| परिशिष्ट १० | .. | लघुउद्योगांना खरेदी व किंमती प्राधान्य देताना अंगीकारावयाची तत्वे. |
| परिशिष्ट ११ | .. | लघुउद्योगांकडून खरेदीसाठी राखून ठेवण्यात आलेल्या वस्तूंची यादी. |
| परिशिष्ट १२ | .. | लघुउद्योगांसाठी विशेष तरतुदी. |
| परिशिष्ट १३ | .. | १९८८ च्या सामूहिक प्रोत्साहन योजनेतील सुधारणा. |
| परिशिष्ट १४ | .. | निष्प्रभ ठरलेल्या शासकीय आदेशांची यादी. |

---

परिशिष्ट एक

(परिच्छेद २ पहावा)

संबंधित विभागांनी खरेदी करावयाच्या वस्तू

| | वस्तूचे नाव | सर्वसाधारण खरेदी विभाग |
|---|---|---|
| (१) | ब्लड काऊंटिंग मशीन .. | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग आणि सार्वजनिक आरोग्य विभाग. |
| (२) | हॉस्पिटल फर्निचर (स्टील) .. | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग. |
| (३) | स्टरलायझर्स, सेंट्रीफ्यूजेस, ऑटोक्लेव्हज् | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग. |
| (४) | अमोनिया लिक्विड .. | पाटबंधारे विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग. |
| (५) | अमोनिया एक्स्पोझिंग मशीन .. | पाटबंधारे विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग. |
| (६) | पेंटस् आणि वारनिशेस .. | पाटबंधारे विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग. |
| (७) | अमोनिया पेपर | पाटबंधारे विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग. |
| (८) | फेरो पेपर .. | पाटबंधारे विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग. |
| (९) | रेन गॉज .. | पाटबंधारे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महसूल व वन विभाग. |
| (१०) | बॉथ प्लेट ... | पाटबंधारे विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग. |
| (११) | मेटॅलिक टेप्स .. | पाटबंधारे विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग. |
| (१२) | गमबूट ग्लोव्हस् .. | कृषि व पदुम विभाग (दुग्धविकास). |
| (१३) | स्नो व्हाईट सूट .. | कृषि व पदुम विभाग (दुग्धविकास). |
| (१४) | स्टिरप पम्प्स, हँड स्प्रेयर्स, .. | कृषि व पदुम विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग. |
| (१५) | वेट प्रूफ क्लॉथ .. | गृह विभाग |
| (१६) | ट्रॅफिक बॅटेला .. | गृह विभाग |
| (१७) | साऊंड सिस्टम् .. | गृह विभाग |
| (१८) | कॅनव्हास, कॉटन क्लॉथ, हॅवरसॅक .. | गृह विभाग |
| (१९) | रबर कोटेड ताडपत्री .. | गृह विभाग/अन्न व नागरी पुरवठा विभाग संयुक्त दर करार. |

## परिशिष्ट पाच

(परिच्छेद ३ पहावा)

शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय यांचेकडून खरेदी करण्यासाठी राखून ठेवण्यात आलेल्या वस्तूंची यादी

| अनुक्रमांक | वस्तूचे नाव | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | कॉटन वेस्ट | शासकीय मुद्रण व लेखनसामग्री यांनी सर्व खरेदी ही महाराष्ट्र वस्त्रोद्योग विकास महामंडळ महाराष्ट्र पॉवरलूम कॉर्पोरेशन व टेक्सकॉम यांचेकडून भांडार खरेदी संघटनेने ठरविलेल्या दराने करावी. |
| २ | फाईल कव्हर्स | शासकीय मुद्रण व लेखनसामग्री यांनी सर्व खरेदी जेल विभाग किंवा महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ किंवा त्यांच्या संलग्न उत्पादन घटकाकडून करावी. |
| ३ | गनी क्लॉथ | |
| ४ | (परिशिष्ट चार) | |
| ५ | कॉटन टॅग्स | |
| ६ | सिलींग वॅक्स | |
| ७ | पेन्सिल ब्लॅक लीड | |
| ८ | इंक्स | |
| ९ | ऑईल फॉर टाईपरायटर्स | |
| १० | वॉल क्लॉक्स/टाईम पिसेस | |
| ११ | पेन व पेन्सिल कार्बन पेपर्स | |
| १२ | डुप्लिकेटिंग इंक | |
| १३ | रबर स्टॅम्प पॅड | |
| १४ | गम क्रिस्टल्स | |
| १५ | ऑफिस पेस्ट | |
| १६ | ट्वाईन बॉल्स | |
| १७ | पेपर पिन्स | |
| १८ | पेपर वेट | |
| १९ | ट्रेसिंग पेपर | |
| २० | टेसिंग क्लॉथ | |
| २१ | प्रिंटींग मशीन्स | |
| २२ | पेपर | |
| २३ | थ्रेड हँड स्युईंग व मशीन स्युईंग | |
| २४ | डार्क ब्ल्यू वुलन क्लॉथ | |
| २५ | टाईपरायटर रिबन | |
| २६ | कार्बन पेपर्स (टाईपरायटरसाठी) | |
| २७ | स्टेन्सिल पेपर | |
| २८ | छत्र्या | शासकीय मुद्रण व लेखनसामग्री यांनी प्रत्येकी ५० टक्के खरेदी—<br>(१) महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाच्या कोल्हापूर केंद्रामार्फत व<br>(२) महाराष्ट्र छत्री उत्पादन सहकारी सोसायटी लि., कर्जत यांचेमार्फत मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेने ठरविलेल्या दरानुसार करावी. |

## परिशिष्ट तीन

(परिच्छेद ५ पहावा)

### महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळामार्फत खरेदी करण्यासाठी राखून ठेवण्यात आलेल्या वस्तूंची यादी

| अनुक्रमांक | वस्तूचे नाव |
|---|---|
| १ | पॉलिथीन बॅग्ज |
| २ | आर.सी.सी. पाईप्स |
| ३ | जीप्सी हुटस् |
| ४ | पी.व्ही.सी. पाईप्स |
| ५ | एअर कूलर्स |
| ६ | वॉटर स्टोरेज टँक्स (रिजिड) |
| ७ | स्टील फोल्डींग चेअर्स |
| ८ | स्टील टयुबलर टेबल्स |
| ९ | स्टील टयुबलर चेअर्स |
| १० | स्टील फायलिंग कॅबिनेटस् |
| ११ | स्टील लॉकर्स |
| १२ | स्टील बुक केसेस |
| १३ | स्टील कॅबिनेट मायनर |
| १४ | स्टील कॅबिनेट मेजर |
| *१५ | ए.सी. प्रेशर पाईप्स, ए.सी. कपलर्स, सी.आय.डी. जॉईन्टस |
| १६ | स्टील रॅक्स व स्टील कॉट्स |
| १७ | संगणकासाठी फर्निचर |
| १८ | लोखंडी तिजोरी |

*या वस्तू राज्यातील उद्योजकांकडून खरेदी करावयाच्या असल्यामुळे लघुउद्योजकांची क्षमता संपल्यानंतर मध्यम व मोठया उद्योजकांकडून सदर वस्तू खरेदी करण्यास महामंडळाला मुभा राहील.

## परिशिष्ट चार

(परिच्छेद ६ पहावा)

### मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेमार्फत खरेदी करावयाच्या वस्तूंची यादी

(१) बायनोक्युलर रिसर्च मायक्रोस्कोप

(२) मोनोक्युलर रिसर्च मायक्रोस्कोप

(३) सायकली

(४) बॉल पेन्स व रिफिल्स

(५) इलेक्ट्रिक बल्ब व ट्यूब्स

(६) ताडपत्र्या

(७) रेनकोट (पांढरे-काळे)

(८) रेनकोट (खाकी)

(९) इलेक्ट्रॉनिक कॅल्क्युलेटर

(१०) इंटरकॉम सिस्टीम

(११) गमबूट–रबर

(१२) प्लेन पेपर कॉपीअर

(१३) ड्रील रॉडस्

(१४) हॅमर–सर्व प्रकारचे

(१५) ड्रीलिंग बीटस्

(१६) ड्रीलिंग रीग्ज

(१७) इलेक्ट्रिकल रेझिस्टन्स वेल्डेड पाईप्स अ‍ॅण्ड ट्यूब्स

(१८) वुलन जर्सीज

(१९) कॉम्प्युटर स्टेशनरी

(२०) जनरेटिंग सेटस

(२१) डीझेल इंजिन्स

(२२) सेंट्रीफ्युगल आणि रेसीप्रोकेटिंग पंपींग सेटस्

(२३) हायड्रॉलिक पंप्स

(२४) कॅनव्हास शूज–ब्राऊन

(२५) लॅमिनेटींग मशीन्स

(२६) बाईंडींग मशीन्स

(२७) इलेक्ट्रिकल/इलेक्ट्रॉनिक टाईपरायटर

